१२
१

# स्वातं...



स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत झपाट्याने स्थित्यंतर झाले आहे. गेल्या पंचवीस वर्षांत ही स्थित्यंतरांची क्रिया तशीच चालू आहे. ही क्रिया इतकी मूलग्राही त्याचबरोबर परस्पर निगडीत आहे की त्या संक्रमणातून विविध विभागांत जी नवी घडी बसू पहात आहे तिचा सशास्त्रपद्धतीने व सखोल शोधपूर्वक अभ्यास होणे अवश्य आहे.

प्रस्तुत ग्रंथात, स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय स्त्रीच्या स्थानात जे परिवर्तन होत आहे त्याचा बहुविधव्यापक संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याकरिता महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर व सोलापूर ह्या चार मोठ्या शहरातील समाजरुपी देहाचा जणू आधारस्तंभ अशा मध्यमवर्गातील अर्थार्जन करणाऱ्या व न करणाऱ्या स्त्रिया नमुन्यादाखल घेतल्या आहेत

सामाजाचे जीवन घडविण्यामध्ये भारतीय स्त्रिया जो कार्यभाग उचलीत आहेत व त्यामुळे त्यांना निरनिराळ्या क्षेत्रात जे स्थान लाभत आहे त्याची तुलना सहा विकसित राष्ट्रांतील तत्सम क्षेत्रांतील स्त्रियांबरोबर करून अन्य राष्ट्रीय भगिनींचा साम्यविरोध प्रकट केला आहे.

ह्या संशोधनांतून स्त्रिच्या स्थानात निश्चित परंतु अपूर्ण परिवर्तन झाले आहे असे दिसून येते. समानतेच्या युगात मिळालेल्या नवनव्या सुसंधींचा पूर्णतया फायदा घेण्याकरिता ज्या समस्यांना स्त्रियांना तोंड द्यावे लागत आहे. त्याचे चित्रण स्त्रियांच्या स्वतःच्याच शब्दात केले आहे.

# स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय कार्यालय
मुंबई-४०० ०३२.

रजिस्टर नंबर
वर्गीकरण नंबर

# स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री

## CHANGING STATUS OF WOMAN
## In Post-Independence India

*By*

Chandrakala A. Hate

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय सचिवालय
मुंबई-४०० ०३२.
रजिस्टर नंबर
वर्गीकरण नंबर
म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
मंत्रालय

अनुवादिका :

चंद्रकला हाटे

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

मुंबई, १९७३

प्रथमावृत्ती : एप्रिल १९७३ (चैत्र १८९५)

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई-४०० ०३२

© भाषांतरित आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
दी बुक सेंटर (प्रा.) लि.
शीव, मुंबई-४०० ०२२

**किंमत : रु. १०**

# निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे, इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङ्मय-निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

२. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन, इत्यादी पश्चिमी अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश-अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा अुद्देश आहे.

३. भाषांतर-योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हॅजिल, एस्किलस्, अॅरिस्टोफेनीस, युरापिडिस, प्लेटो, अॅरिस्टॉटल, थॉमस अॅक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टाय्, दोस्तएवस्की, स्तानिस्लावस्की, बर्ट्रांड रसेल, रुथ बेनेडिक्ट, रायशेनबाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनव्स्की, कॉसेरेर, गॉर्डन व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, 'भरताचे नाटयशास्त्र', 'संगीतरत्नाकर', 'ध्वन्यालोक', 'प्राकृतातील' "'गाथासप्तशती'', त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

४. स्वातंत्र्योत्तर कालखंडात समता, स्वातंत्र्य व शोषणरहितता या मूलभूत मानवी हक्कांमुळे, नव्या दृष्टीकोनातून, स्त्रीजीवनावर सांस्कृतिक-नैतिक परिस्थितीबरोबर आर्थिक व सामाजिक परिस्थिती कसकसा परिणाम करीत आहे या गोष्टीचा शोध घेण्यासाठी व स्त्रीजीवनाच्या विविध अंगोपांगांचे मूल्यांकन करण्याच्या अुद्देशाने "स्त्रीचे परिवर्तित स्थान" ( Changing status of woman ) या विषयावर डॉ. श्रीमती चंद्रकलाबाई हाटे यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजनेखाली संशोधन केले. सदर संशोधन कार्य डॉ. श्रीमती हाटे यांनी केन्द्रीय व राज्य सरकारांच्या कचेऱ्या, स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी व औद्योगिक प्रतिष्ठाने, बँका, नियत-

कालिके, शैक्षणिक व समाजकल्याण संस्था यांमध्ये काम करणाऱ्या व डॉक्टर, वकील इ. या नात्याने स्वतंत्ररीत्या काम करणाऱ्या सर्व थरांतील स्त्रिया यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून, परस्पर विचारविनमय करून व प्रश्नपत्रिकेच्या द्वारे माहिती मिळवून केले आहे. वैवाहिक, शैक्षणिक अगर कौटुंबिक अशा एकाच बाजूचा अभ्यास करण्याऐवजी सामाजिक, नैतिक, व्यावसायिक, रोजगारविषयक, मातृत्व, नागरिकत्व इत्यादि स्त्रीजीवनविषयक सर्व बाजू विचारात घेऊन स्वातंत्र्योत्तर कालातील भारतीय स्त्रियांच्या परिवर्तित स्थानाचा अभ्यास करण्याचा मुख्य हेतु ठेवून यथार्थ स्त्रीचित्रण "Changing status of Woman in Post-Independence India" या शोधग्रंथात सादर केले आहे. सदर ग्रंथाचा प्रस्तुत अनुवाद डॉ. श्रीमती हाटे यांनीच केला आहे व प्रकाशात आलेल्या नवीन माहितीची त्यात भर घालून अद्यावत स्वरुपात तो प्रकाशनार्थ मंडळाच्या स्वाधीन केला. सदर अनुवाद "स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री" या शीर्षकाने आज मंडळाच्या भाषांतर योजनेखाली प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

सचिवालय.
दिनांक ४ एप्रिल, १९७३
'गुढीपाडवा' चैत्र १४, १८९५

*लक्ष्मणशास्त्री जोशी*
अध्यक्ष.

भगिनीवर्गास

# दोन शब्द

कोणत्याही विषयाचा आणि त्याच्या अभ्यासूचा विकास होत रहावा अशी सामान्यतः अपेक्षा असते. "स्त्री आणि तिचे स्थान" ह्या प्रश्नाचाही असाच विकास होत गेला आणि लेखिकेला स्वतःच्या बाबतीत हेच विधान थोड्याफार अंशाने लागू करता येईल. हरएक मानवाला मग तो पुरुष वा स्त्री असो, स्वतंत्र व्यक्ति म्हणून त्याचे हक्क व कर्तव्यें ह्यांची नवी जाणीव दुसऱ्या महायुद्धाने करुन दिली आहे. ह्याच जाणिवेने आपण जागतिक समाजाचे अविभाज्य घटक आहोत ही जागृती येते. स्त्री ही मानवतेचे अर्धांग आहे. एक स्वतंत्र व्यक्ति म्हणून तिची पातळी उंचाविण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने एक कायम कमिशन नेमले आहे. जगातील कोणत्याही भागात स्त्रीविरुद्ध पक्षपात होऊ नये म्हणून ह्या कमिशनने संयुक्त राष्ट्र-संघाच्या आम समितीला वेळोवेळी सल्ला द्यावयाचा असतो. म्हणूनच स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या काळात भारतीय स्त्रियांच्या स्थानात कसकसा बदल होत गेला आहे, ह्या विषयावर थोडाफार प्रकाश टाकण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

गेल्या तीसचाळीस वर्षांत स्त्रीला येणाऱ्या अनुभवांतून व पडणाऱ्या समस्या-रुपी मांडवाखालून गेल्यामुळे स्त्रीचे सामाजिक स्थान व तिचे प्रश्न ह्या बाबतीत स्वाभाविकपणे आत्मियता वाटू लागली. विद्यार्थीदशेपासून ह्या विषयाच्या अभ्यासाला सुरुवात केली. कदाचित प्रस्तुत लेखन हे स्त्रीविषयावर अखेरचे ठरेल. आधुनिक स्त्रीला विविध व संमिश्र भूमिका पार पाडणे अवश्य आहे असा प्रस्तुत ग्रंथाचा निष्कर्ष आहे. घटनेने व कायद्याने दिलेले हक्क, तिला मिळालेले स्वातंत्र्य आणि ती घेत असलेले शिक्षण ह्यातून आपणास प्राप्त झालेल्या संधींचा उपयोग करण्यास व तेणेकरुन मानवतेच्या कल्याणाला अल्पस्वल्प हातभार लावण्याची तिला स्फूर्ति यावी. स्त्रीजीवनाच्या काही अंगांचा सखोल अभ्यास करणे प्रस्तुत लेखिकेला शक्य झाले नाही तो करण्याचीही ह्या लेखनाच्या वाचनाने चालना मिळेल अशी आशा आहे.

अनेक तक्त्यांतून आंकडेवार माहिती दिलेली असली तरी वाचकवर्ग त्रस्त होणार नाही अशी काळजी घेतली आहे आणि ती सार्थ ठरो. धार्मिक दृष्टिकोन, वाचनाच्या आवडीनिवडी वगैरे मुद्दे गौण आहेत. मागली व सध्याची पिढी ह्यातील फरक दर्शविण्याकरिता त्यांचा उल्लेख आहे.

हे संशोधन कार्य ज्या संस्थांच्या व व्यक्तींच्या मदतीने पार पडले त्यांचा ऋण-निर्देश करणे अवश्य आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या नियुक्तीने ही योजना हाती घेतली व ते संशोधन

पूर्ण झाल्यावर त्यांच्याच अनुदानाने इंग्रजीतून फेब्रुआरी १९६९ साली 'चेंजिंग स्टेटस् ऑफ वुमन इनपोस्ट इंडिपेन्डन्स् इंडिया" ह्या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले. प्रस्तुत ग्रंथ हे त्याचेच रूपांतर आहे. दरम्यानच्या चार वर्षांच्या अवधीत जो थोडाबहुत फरक पडला त्यानुसार आद्यावत माहिती देण्याचा यत्न केला आहे.

श्री ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, तेथील ग्रंथपालिका, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. द. शं. फाटक ह्यानी सर्व प्रकारचा हातभार लावला आहे.

मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्राचे सन्माननीय प्राध्यापक डॉ. गो. स. घुर्ये ह्यानी इंग्रजी हस्तलिखित वाचून महत्त्वाच्या सुचना केल्या त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

सरकारी व खाजगी कचेऱ्या व औद्योगिक संस्था ह्यांतील कर्मचारी भगिनींनी व तेथील अधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका भरून देण्याचे व इतर माहीती पुरविण्याचे सहकार्य दिले नसते तर हे संशोधन होऊ शकले नसते.

माहिती गोळा करण्यास श्रीमती इंदूमती गोखले, सौ. शशीकला देशपांडे, सौ. विद्या कारुळकर, सौ. विमल भोळे, कु. सुधा कानिटकर व कु. हेमलता जोशी ह्यांनी मदत केली. प्रश्नपत्रिकांतून तक्ते तयार करणे व इतर मदतनिसाचे जिकीरीचे काम श्री. म. द. पंडित ह्यांनी पार पाडले. ह्यासर्वांची आभारी आहे.

महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मंडळाचे अध्यक्ष श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व सचिव श्री. द. य. राजाध्यक्ष ह्यांनी मराठीत पुनर्मुद्रण करण्याची जबाबदारी घेतली ह्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करते.

मुंबई, १५-३-७३. **चं. हा.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | निवेदन | |
| | दोन शब्द | |
| | पारिभाषिक शब्दसूची, इंग्रजी—मराठी<br>मराठी—इंग्रजी | |
| | प्रस्तावना .. .. .. | १ |
| प्रकरण १ ले | काही जीवशास्त्रीय व सामाजिक बाजू .. | २७ |
| प्रकरण २ रे | विवाहविषयक स्थिती .. .. | ५० |
| प्रकरण ३ रे | कुटुंब .. .. .. | ७८ |
| प्रकरण ४ थे | कुटुंबनियोजन .. .. .. | ९५ |
| प्रकरण ५ वे | शिक्षणविषयक यथार्थदर्शन .. .. | १२४ |
| प्रकरण ६ वे | व्यवसायांची गुंतागुंत .. .. | १७३ |
| प्रकरण ७ वे | अन्य भूमिका आणि मूल्ये .. .. | २१५ |
| प्रकरण ८ वे | समारोप .. .. .. | २५५ |
| | सूची .. .. .. | २७३ |


# तक्त्यांची अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| तक्ता १. | कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण, उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी | १०–१९ |
| तक्ता २. | स्थानिक फरकांसहीत गोळा केलेल्या माहितीचा थोडक्यात गोषवारा | २१–२४ |
| तक्ता ३. | राष्ट्रांनुसार स्त्रीपुरुष प्रमाण | २८ |
| तक्ता ४. | १९०१-७१ च्या दरम्यान दर हजारी पुरुषांच्या प्रमाणाशी स्त्रियांच्या प्रमाणात झालेला बदल | २९ |
| तक्ता ५. | धर्म आणि अर्थार्जन करण्याचा उद्देश ह्यासहित गट अ मधील स्त्रियांची संख्या | ३७ |
| तक्ता ६. | हिंदु स्त्रियांचे जातीनुसार वर्गीकरण (गट अ) | ४० |
| तक्ता ७. | आंतरजातीय विवाहांचा क्रमांक, विवाहसमयीचे वय, आईवडिलांची संमती।असंमती आणि यशस्वी विवाह | ४३ |

| | | |
|---|---|---|
| तक्ता ८. | भाषेनुसार चार शहरांतील स्त्रियांची वर्गवारी | ४५ |
| तक्ता ९. | अविवाहित स्त्रियांची संख्या, विवाह न करण्याची कारणे आणि विवाह करावयाचा झाल्यास काही खास अटी | ५२–३ |
| तक्ता १०. | विवाहित स्त्रिया:– धर्मप्रमाणे त्यांचे विवाहसमयीचे मध्यम वय, वैवाहिक जीवनाची सरासरी कालमर्यादा, विवाहाचे प्रकार आणि पतिपत्नी संबंध | ६१–२ |
| तक्ता ११. | १९६१ च्या खानेसुमारीनुसार सौभाग्यवती, विधवा व घटस्फोटित स्त्रियांची १०-१९ वयोमान गटातील संख्या | ६३ |
| तक्ता १२. | विवाहित स्त्रियांच्या पसंतीच्या भूमिकांची अविवाहितांच्या पसंतीच्या भूमिकेशी तुलना | ६५–६ |
| तक्ता १३. | विधवा, घटस्फोटिता व विभक्त स्त्रियांची संख्या, त्यांचे मध्यम वय आणि वैवाहिक जीवनाचा काल, त्यांच्या समस्या, पुर्नविवाह/पुर्नमिलनाची शक्यता, घटस्फोटाची व विभक्तपणाची कारणें | ७०–१ |
| तक्ता १४. | कुटुंबाची संख्या, व्याप्ती, प्रकार-विस्तारित, मूळ, भग्नकुटुंबसदस्यांची प्रतिक्रिया आणि असंतोषाची कारणे | ८०–१ |
| तक्ता १५. | अपत्यविरहित व अपत्यसहित स्त्रियांची संख्या, वैवाहिक जीवनाची कालमर्यादा, मुलांच्या संख्येची सरासरी, त्यांचे सरासरी वयोमान व त्यांची देखरेख | ८७ |
| तक्ता १६. | जीवनसंख्याशास्त्रीय आकडयांचा सारांश:– विशिष्ट देश, अद्यावत वर्ष | ९६ |
| तक्ता १७. | भारत सरकारची कुटुंबनियोजनविषयक कामगिरी | ९९ |
| तक्ता १८. | अपत्यरहित विवाहित उत्तरदायी स्त्रियांचे पृथक्करण | १०१ |
| तक्ता १९. | शिक्षित, मिळवित्या व मध्यमवर्गीय स्त्रिया आणि कुटुंबनियोजन | १०४–५ |
| तक्ता २०. | वयानुसार स्त्रियांची संख्या आणि जिवंत जन्मास आलेल्या एकूण मुलांची संख्या | १०७ |
| तक्ता २१. | वय, गट व अपत्यांची संख्या, ह्यानुसार उत्तरदायी स्त्रिया | १०९ |
| तक्ता २२. | चार किंवा अधिक मुलांच्या संख्येचे जास्त पृथक्करण | ११० |
| तक्ता २३. | अ, ब, क१ व क२ गटांतील वेगवेगळ्या खेपेच्या वेळी निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेचे आकडे | ११३-४ |
| तक्ता २४. | स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचे सिंहावलोकन | १२५ |
| तक्ता २५. | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीशिक्षकांची संख्या | १२८ |
| तक्ता २६. | आयएफडब्ल्यू, दी पोझीशन ऑफ दी वुमन ग्रॅज्युएट टुडे | १३० |

| | | |
|---|---|---|
| तक्ता २७. | निकालांचे मूल्यमापन | १३२ |
| तक्ता २८. | मुंबई विद्यापीठाच्या निकालांचा गोषवारा-मार्च १९६७ | १३५–७ |
| तक्ता २९. | अ आणि ब गटातील स्त्रियांची शैक्षणिक पात्रता | १४०–३ |
| तक्ता ३०. | महाराष्ट्र राज्यातील शिक्षण व शेती सोडून इतर व्यवसायांचा संबंध, एकूण/नागरी स्थानात | १४६–९ |
| तक्ता ३१. | तीन शहरातील सेवायोजन कार्यालयांतील नोंदणी पुस्तकातील चालू आकडेवारी व त्यांना मिळालेल्या नोकऱ्यांच्या अनुमानाने काढलेले आकडे आणि नवी नोंद | १५४ |
| तक्ता ३२. | शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीची अपेक्षा | १५५ |
| तक्ता ३३. | अ गटातील उत्तरदायी स्त्रियांचे शिक्षण व व्यवसाय ह्यांचा परस्परसंबंध दाखविणारे वर्गीकरण | १५८-९ |
| तक्ता ३४. | श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या एम्.ए. विद्यार्थिनी, त्यांचे वय, सामाजिक दर्जा, मातृभाषा, संपादित गुण व आकांक्षा | १६२–३ |
| तक्ता ३५. | सहा इतर व भारत देशांतील सर्व संभवनीय आणि प्रत्यक्ष श्रमिक लोकसंख्या | १७६–८ |
| तक्ता ३६. | सहा इतर व भारत देशांतील अकरा प्रकारच्या व्यवसायांनुसार श्रमिकांची टक्केवारी तुलना | १८२-३ |
| तक्ता ३७. | नमुन्याच्या अनुषंगाने व्यवसायांनुसार निरनिराळ्या देशांतील स्त्रीश्रमिकांची तुलना | १८८-९१ |
| तक्ता ३८. | कामाची परिस्थिती दिग्दर्शित करणारी माहिती व असमाधानाची कारणें | २०१ |
| तक्ता ३९. | प्रतिसादी स्त्रियांच्या दृष्टिकोनातून | २०५ |
| तक्ता ४०. | व्यवसायाचा व नोकरीचा काळ | २०८ |
| तक्ता ४१. | नमुन्यातील प्रतिसादी स्त्रियांच्या समस्यांचे निवेदन | २१० |
| तक्ता ४२. | अकरा राज्यांतील पुरुषांच्या राजकीय भूमिकेशी स्त्रियांच्या राजकीय भूमिकेची तुलना | २१८–२१ |

# प्रस्तावना

अखिल मानवतेवर दूरगामी परिणाम करणाऱ्या अशा ज्या काही जागतिक घटना झाल्या त्यांतील १७८९ साली झालेली फ्रेंच राज्यक्रांती ही महत्त्वाची होय. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्या उच्च ध्येयांच्या घोषणेने स्त्रीवर्गालाही जाग आली. पुढे तीनच वर्षांनी मेरी वुइल्स्टोनेक्रॅफ्ट ह्या बाईंनी 'अ व्हिंडिकेशन ऑफ द राइटस् ऑफ वुमन' असे स्त्रियांच्या हक्कांविषयीचे पहिलेच पुस्तक प्रसिद्ध केले. त्यातील संदेशाला जरी विशेष महत्त्व देण्यात आले नाही तरी औद्योगिक क्रांतीसारख्या घटनांमुळे स्त्रियांनी आपल्या हक्कांची लढत चालू ठेवली. जे. एस्. मिल्सारख्या उदारमतवाद्यांनी त्यांची बाजू उचलून धरून 'सब्जेक्शन ऑफ् वुइमेन' या ग्रंथाद्वारे स्त्रियांची समानता पुढे मांडली. हा ग्रंथ तत्सम अक्षर वाङ्मयात जमा झाला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालानंतर हळूहळू स्त्रीविमोचन कार्याला सुरवात झाली. मात्र विसाव्या शतकात आणि त्यातल्यात्यात पहिल्या महायुद्धानंतर त्या चळवळीला गती आली आणि पुढे दोस्त राष्ट्रांतील स्त्रियांनी युद्धकाळात केलेल्या मदतीमुळे त्यांना मतदानाचा हक्क मिळाला.

पहिल्या महायुद्धानंतर रशियात साम्यवादी राजवट स्थापन झाली आणि स्त्रियांना तेथे पूर्ण समानता देण्यात आली. स्त्रीपुरुषविषयक सामाजिक व नैतिक बाबतींतही भिन्न नियम रद्द करण्यात आले. हिंदुस्थानात १९२१ च्या सुधारणा कायद्याने प्रथमच हिंदी प्रजेपैकी थोड्या जणांना मतदानाचा हक्क मिळाला व त्यांत स्त्रियांनाही समाविष्ट करण्यात आले. पतीला हा हक्क असल्यास पत्नीला मिळे. तसेच त्यांच्याकरिता विधिमंडळात काही जागा राखून ठेवण्यात आल्या. मात्र पहिल्या महायुद्धानंतरची सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे संततीनियमनाला लाभलेली जाहीर मान्यता. तेणेकरून स्त्रियांच्या जीवनात कशी क्रांती झाली आहे त्याची चर्चा पुढे करण्यात येईल.

दोन महायुद्धांच्या मध्यंतरात समानतेच्या दिशेने होत असलेल्या स्त्रियांच्या वाटचालीला फॅसिस्ट देशात दुर्दैवाने उलट कलाटणी मिळाली. जर्मनी व इटली येथील हुकूमशाह्यांनी स्त्रियांना चूल व मूल हा आदेश दिला. त्यांच्या श्रमाचा मात्र पुरेपूर फायदा तेथील हुकूमशहांनी घेतला. "स्त्रीमजूर अगदी अपरिहार्य होते . . . घराबाहेर श्रम करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत वाढ झाली . . . सर्वांत कळस म्हणजे मातृकर्तव्यात विक्षेप निर्माण करणाऱ्या अशा यांत्रिक कार्यक्षेत्रात कित्येक स्त्रिया काम करीत होत्या."[1]

दुसरे महायुद्ध सुरू झाले. सामाजिक व आर्थिक आंदोलनामुळे व विज्ञानशास्त्रे आणि तंत्रशास्त्रे ह्यांतील झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे सामाजिक संबंधात बदल होऊ लागले. मॅक्आयव्हर ह्या समाजशास्त्रज्ञाच्या मते हे बदल मूलभूत होते आणि म्हणून तेच फक्त वास्तव होत.

ह्या स्थित्यंतराची उज्ज्वल बाजू म्हणजे बहुजनवर्गात झालेली जागृती आणि मानवाला आपल्या हक्कांची आलेली जाग. ह्या जागृतीला संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८च्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याने मान्यता दिली आहे. जाहीरनाम्याच्या प्रास्ताविकेत म्हटले आहे :

". . . संयुक्त राष्ट्रसंघातील जनतेने जाहीरनाम्याच्या द्वारे मानवाच्या मूलभूत हक्कांवरील आपल्या श्रद्धेस, मानव म्हणून त्याचे हक्क व योग्यता ह्यांना व स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांना मान्यता व्यक्त केली आहे आणि सामाजिक प्रगती व व्यापक स्वातंत्र्याचे जीवनमान अधिकाधिक प्राप्त करण्यास चालना दिली आहे,

"कलम २ रे—वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राष्ट्रीय अगर सामाजिक उत्पत्ती, मालमत्ता, जन्म अगर इतर दर्जा ह्यांपैकी कोणत्याही प्रकारे भेद न करिता ह्या जाहीरनाम्यात दिलेले सर्व हक्क व स्वातंत्र्य उपभोगण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

"कलम २९ वे—प्रत्येकास समाजविषयक कर्तव्ये आहेत. ती बजावल्यानेच व्यक्तीचा स्वतंत्र व पूर्ण विकास होणे शक्य आहे."

अशा प्रकारच्या मानवतेच्या प्रगतिपथावरील वाटचालीबरोबर आधुनिक काळात एक अस्वस्थ करून टाकणारी बाजूही आढळते. ती म्हणजे विध्वंसक शस्त्रास्त्रांच्या शोधांमुळे मानवाने मिळविलेली सत्ता होय. ती इतकी वाढली आहे की मानवतेचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. अशा ह्या संकटाच्या कात्रीत सापडलेल्या मानवाने त्याची जी नवमुक्त माता तिला एक आव्हानच दिले आहे म्हणाना! "अर्ध्या मानवतेने आपल्या चुरशीच्या गतीने आणि तांत्रिक प्रगतीने आपल्या सर्व संपन्नतेसह आम्हा सर्वांना एका राक्षसी दरीच्या काठी आणून सोडले आहे."[२] अशा स्थितीत स्त्री आपले सर्व वजन विधायक बाजूकडे टाकील का? तसे तिला करता येईल का? जर येत असेल तर ते कुठपर्यंत?—हे प्रश्न उपस्थित होतात. तसे पाहिले तर स्त्री अगर पुरुष हे दोघेही पूर्णतया स्वतंत्र नाहीत. ज्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत ते जगत असतात त्या परिस्थितीने त्यांचे जीवन घडविले जाते. ज्या वातावरणाने ते वेष्टिलेले असतात त्या पलीकडे त्याला अगर तिला जाणे व्यक्ती म्हणून जरा अवघडच आहे.

कदाचित बदलत्या परिस्थितीत स्त्रिया आणि पुरुष ह्यांनी "मिळून नवी तडजोड—नवे समायोजन" केल्यास स्त्रीला अधिक चांगली संधी मिळू शकेल. "वुइमेन अँड् सायंटिफिक् प्रोफेशनस्" ह्या विषयावरील परिसंवादाचा उपसंहार करताना प्रा. एरिक् एच्. एरिक्सन् पुढे म्हणतात : "ज्या समाजाला आपल्या मूल्यांची खात्री आहे

त्याला समाजशास्त्रीय संशोधक बुद्धी आणि नवनवे ज्ञान हे अशी तडजोड आखून देऊ शकेल. परंतु अशा मूल्यांच्या अभावी वर्तनशास्त्रे फारसे काही निर्दिशित करू शकणार नाहीत."[३]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आपल्या घटनेनुसार लोकशाही राज्यव्यवस्था व समाजवादी समाजरचना मान्य केली असून वंश, लिंग, धर्म निरपेक्ष सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य व शोषणरहितता हे त्यांचे मूलभूत हक्क म्हणून मान्य केले आहेत. १५व्या कलमानुसार "स्त्री व पुरुष असा कोणताही भेद भारतराज्य करणार नाही." पाश्चात्य लोकशाही राज्यांत अजूनही स्त्रीविरोधी विचारप्रवाह रेंगाळत आहेत. लोकशाही राज्यांमध्ये राजकीय क्षेत्रात स्त्रिया जो कार्यभाग उचलतात त्याविषयीच्या युनेस्कोच्या अहवालात म्हटले आहे, "राज्यांच्या प्रभावी नेतृत्वामध्ये म्हणजे राज्यकारभारविषयक निर्णय घेणे व त्याची अंमलबजावणी करणे ह्यात स्त्रियांचा फार थोडा भाग असतो. ह्याचे पहिले कारण म्हणजे पुरुषांचा विरोध . . . तो विरोध मूलतःच (स्त्रियांच्या) समानतेविरुद्ध आहे. कारण पुरुष हा बहुयोजी व स्त्री ही एकयोजी आहे असे अध्याहृत धरूनच ते चालतात."[४]

ह्या पुरोगामी राष्ट्रांशी तुलना केल्यास वरवर पहाताही स्त्रियांच्या विरुद्ध कोणत्याही क्षेत्रात भारतराज्य भेदभाव करीत नाही. ताया झिनकिनच्या मते "स्त्री विमोचनाचे लोण हे अगदी खेड्यापर्यंत पोहोचले आहे."[५] आणि तेसुद्धा स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षांच्या छोट्या अवधीत! वर उल्लेखिलेले सर्व हक्क भारतराज्याने तर स्त्रियांना दिलेच आहेत परंतु हिंदू विवाह-कायदा आणि हिंदू वारसा-कायदा पास करून बहुसंख्य स्त्रियांना दिवाणी अधिकारांच्या बाबतीत पुरुषांच्या समान पातळीवर आणून सोडले आहे. अशा तऱ्हेने समानतेची भूमिका तर तयार आहे. प्रश्न आहे असा: नव्या दृष्टिकोनातून स्त्रीपुरुषांनी नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा. हे कितपत साध्य होत आहे त्याचे संशोधन करणे योग्य ठरेल.

तसे म्हटले तर भारत गणराज्याचा जन्म अगदी अलिकडील आहे. त्यामुळे घटनेने दिलेल्या हक्कांचा व संधीचा परिणाम थोडा सावकाशच होणार. तथापि शास्त्रीय व तांत्रिक शोधांमुळे अखिल जगात सर्वत्र झपाट्याने बदल होत असल्याने भारतदेश त्याला अपवाद ठरणार नाही. हे नवजात राष्ट्र आहे, त्याची संपत्ती अविकसित आहे; शतकांचे दारिद्र्य त्याच्या वाट्यास आले आहे आणि लोकसंख्या तर झपाट्याने वाढत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन आपले स्वातंत्र्य टिकविण्याचा आणि कोट्यावधी नागरिकांचे रहाणीमान सुधारण्याचा भारताचा निश्चय आहे. म्हणूनच ह्या समाजकल्याणवादी राज्याने नियोजनाचा अवलंब केला आहे. तेव्हा प्रत्येक नागरिकाला आपल्या सुप्त गुणांचा विकास करून समाजकल्याणाचे साध्य प्राप्त होण्यास आपल्या कुवतीप्रमाणे हातभार लावण्याचे हे जणू आव्हानच आहे. "संपूर्ण मानवत्व साधणे हे हरएकास पुरेसे उच्च ध्येय आहे. त्यात स्त्री व पुरुष ह्यांच्या

सुप्त शक्ती कायमच्या निगडित होतात."[६]

"पूर्ण व्यक्तिमत्वाचे" उच्च ध्येय गाठणे हे भारतीय स्त्रियांना तितकेसे सहज-साध्य नाही. पुरातन परंपरा, निरुपयोगी रुढी हे स्त्रियांच्या वाटेतले जुने अडथळे आहेतच शिवाय सध्याची झपाट्याने बदलणारी परिस्थिती. एकीकडे ह्या अडचणी आणि दुसरीकडे वर उल्लेखिलेले हक्क व नवप्राप्त लोकशाहीतील अनुकूल संधी. त्यामुळे ज्या स्त्रियांमध्ये स्वयंविकासाची ज्योत प्रज्वलित झाली आहे त्यांना आपला मार्ग काढण्याकरिता झगडावे लागत आहे. शिवाय भारताची संस्कृती फारा वर्षांची आहे. स्त्री आणि पुरुष ह्या उभयतांनी आधुनिक परिस्थितीच्या अनुषंगाने ही संस्कृती जतन करावयास हवी. स्त्रीजीवनावर सांस्कृतिक व नैतिक परिस्थिती कशा रीतीने परिणाम करीत आहे ह्याचीही चर्चा होणे इष्ट आहे. प्रगतीची वाटचाल करीत असताना स्त्रियांच्या पदरात काही निश्चित माप पडले असेल परंतु त्याचबरोबर कुठे घसरावयास झाले असेल अगर चुकाही होत असतील. आणि ज्या-अर्थी त्या पुरुषांच्या मानाने मागे आहेत त्याअर्थी काही समस्या उपस्थित होणारच. "बदलत्या परिस्थितीत आपले स्वत्व टिकवून धरावयाचे, स्त्री आणि कर्मचारी, पत्नी आणि सहकारी, माता आणि निर्माती ह्या विविध भूमिका सांभाळून त्यांचे सातत्य राखावयाचे म्हणजे एक आव्हानरुपी असे जिकिरीचे काम आहे."[७] ह्या अंगोपांगांचे काही प्रमाणात मूल्यांकन करून अपुरी का होईना, शोधज्योत टाकण्या-करिता 'स्त्रीचे परिवर्तित स्थान' हे संशोधनकार्य विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजनेखाली प्रस्तुत लेखिकेने हाती घेतले.

व्यक्तीचा दर्जा आणि तद्विषयक भूमिका ह्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. सुप्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ राल्फ लिंटन म्हणतात, "व्यक्ती ज्या पदावर आहे त्या पदाचा दर्जा व तद्विषयक भूमिका ह्यांत फरक आहे. दर्जा म्हणजे हक्क व कर्तव्ये ह्यांचे मिश्रण. . . तर दर्जामुळे मिळणाऱ्या प्रेरणेतून भूमिका वठली जाते. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा समाजाकडून ठरविला जातो. परंतु त्याचबरोबर कौटुंबिक वगैरे निराळा दर्जा असतोच. जेव्हा मनुष्यमात्र दर्जाच्या अनुषंगाने येणारे हक्क उपयोगात आणतो, कर्तव्ये करू लागतो तेव्हा तो आपली भूमिका बजावीत असतो. भूमिका आणि दर्जा अविभिन्न आहेत. आणि त्यांतला फरक केवळ शाब्दिक महत्त्वाचा आहे."[८]

जगातील विकसित राष्ट्रांच्या जोडीला जाऊन बसण्याकरिता भारताने औद्यो-गीकरणावर बराचसा भर दिला आहे. त्याचा परिणाम म्हणजे अधिकाधिक प्रमाणात शहरांची वाढ झाली आहे. उदाहरणार्थ १९५१ ते १९६१ च्या दहा वर्षांच्या अवधीत मुंबई शहराची लोकसंख्या २८ लक्षांवरून ४१ लक्षांवर गेली आहे, आणि १९६१-७१ च्या दरम्यान ती ५९ लक्ष झाली आहे! आधुनिकतेचे भलेबुरे आघात प्रथम शहरांवर व नंतर खेड्यांवर होत असतात. उदाहरणार्थ, पोषाखाची नवी फॅशन शहरांतून खेड्यांकडे गेली आहे हे लक्षात घेऊन आणि वेळ व संशोधनास

उपलब्ध असलेली साधने विचारात घेऊन स्त्रियांच्या दर्जावर शोधज्योत टाकण्याकरिता महाराष्ट्रातील* चार मुख्य शहरे–मुंबई, पुणे, नागपूर व सोलापूर–येथील मध्यमवर्गीय स्त्रियांची पहाणी करण्यात आली.

मुंबई शहराच्या खानेसुमारीच्या अहवालात मुंबईचे महत्त्व पुढीलप्रमाणे दाखविलेले आहे : "मुंबई ही भारताची आद्यनगरी आहे. ती देशातील व्यापारी उत्पन्नाचे आगर असून उद्योगधंदा, व्यापार, वाहतूक व दळणवळणाचे केंद्र आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनावर मुंबापुरी आपली सत्ता चालविते."[९]

" आधुनिक उद्योगप्रधान समाजामध्ये उद्योगपती व व्यावसायिक मध्यमवर्गीयांची जी मूल्ये आहेत त्यानुसार मुख्यतः व्यक्तीचा दर्जा कमीअधिक प्रमाणात ठरविला जातो."[१०] अशा तऱ्हेने मध्यमवर्गीयांचे महत्त्व दर्शवून डेव्हिड लॉकवूड शेवटी म्हणतात, "आजवर मान्य झालेले बुद्धिजीवी श्रमाचे श्रेष्ठत्व गेल्या अर्ध्या शतकात झालेल्या बदलानंतरही पूर्णतया कमी झाले नाही. मात्र पुष्कळ वेळा त्या वर्गाला असे श्रेष्ठत्व का असा प्रश्न उपस्थित केला जातो."[११]

मुख्यतः ज्या युनायटेड किंगडममध्ये उद्योगप्रधान व दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवादी तत्त्वावर समाजव्यवस्था प्रस्थापित झाली आहे त्या देशात आजही मध्यमवर्गाचे ज्येष्ठत्व आहे; तर जेथे जातीसंस्थेवर उभारलेली व्यवस्था प्रामुख्याने आढळून येते तेथे वरील विधान अधिकच सत्य ठरेल. शिवाय प्रा. घुर्ये म्हणतात, "इ. स. १८१२ मध्ये 'मध्यमवर्ग' हा शब्दप्रयोग प्रथम वापरण्यात आला. पुढे १८३१ मध्ये ब्राउहॅम ह्यांनी 'स्पेक्टेटर' पत्रात मध्यमवर्गाची 'देशाची संपत्ती व बुद्धिमत्ता' अशी व्याख्या केली . . . १९६१ साली ग्रँटच्या म्हणण्याप्रमाणे ६० वर्षांत त्या

---

* महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल निरनिराळी मते आहेत. जे. एच. हटन–सामाजिक मानवशास्त्रज्ञ आपल्या कास्ट इन इंडिया ग्रंथात म्हणतात, "महार हे ज्याअर्थी वेसरक्षक असतात, त्याअर्थी ते महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असावे. दीर्घमस्तकी कुणबी व श्वेतवर्णीय ब्राह्मण ह्या लोकांच्या आधी ते होते आणि संख्येने जास्त व सर्वत्र पसरलेले असल्यामुळे वरील विधानास पुष्टी मिळते. व त्यांच्यावरून महाराष्ट्र नाव पडले असावे."–जे. एच्. हटन, सामाजिक नृवंशशास्त्राचे प्राध्यापक–कास्ट इन इंडिया (१९६३), पान ३०.

"हा महाराष्ट्राच्या व्युत्पत्तीबद्दलचा सिद्धांत प्रथम मोलस्वर्थने आपल्या कोशात दिला होता. त्याला पुढे डॉ. स. वी. केतकरांनी पुष्टी दिली. तथापि डॉ. भांडारकर व डॉ. काणे ह्यांनी तो खोडून काढला. महाराष्ट्र (महा-राष्ट्र) म्हणजे विदर्भ, अश्मक व अपरान्त आदी राष्ट्रांचे संघराज्य." –महाराष्ट्र सारस्वत, पान ६४३.

"राष्ट्रीक, वैराष्ट्रीक व महाराष्ट्रीक हे लोक मगध, कुरुपांचाल व उत्तरकुरु ह्या नर्मदेपलीकडील देशांतून बुद्धक्रांतीनंतर दक्षिणेकडे आले. हे भाषेच्या आधारे सिद्ध करता येते."–लक्ष्मणशास्त्री जोशी-राजवाडे लेखसंग्रह (१९५८), पान ११६.

वर्गाची संख्या ८५ टक्क्यांनी वाढली. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की मध्यमवर्ग हा स्थिर असतो, तो सुवर्णमध्यमार्गे रहात असतो, आणि तो समाजातील नीतिमान वर्ग आहे."[१२] अशा तऱ्हेने मध्यमवर्गाच्या महत्त्वाबद्दल खात्री पटून पण त्याचबरोबर मॅक्सवेबरच्या पुढील मताशी सहमत होऊन–"मनुष्याला जेव्हा व्यक्तिशः अगर काही पिढ्यांनंतर एका समाजगटातून दुसऱ्या गटात संक्रमण करता येते; तेव्हाच वर्ग असू शकतात"[१३]–वर्ग व जाती ह्या संक्रमणावस्थेचाही येथे विचार केला आहे. प्रस्तुत प्रबंधापुरती सेंट्रल स्टॅटिस्टीकल ऑरगनायझेशनने केलेल्या पहाणीनुसार "शेती-व्यतिरिक्त बौद्धिक व्यवसाय करणारी सर्व कुटुंबे"[१४] अशी मध्यमवर्गाची व्याख्या मान्य केली आहे.

पण मुळात कूटप्रश्न उपस्थित होतो तो हा की ह्या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीपुरुष हा भेद बहुतेक नष्ट झाला असताना स्त्रियांचे म्हणून काही विवाद्य प्रश्न आहेत का? मागल्या युगामध्ये स्त्री ही नैसर्गिक परिस्थितीची दास होती. मोठ्या कुटुंबाचे संवर्धन करण्यात चुलीभोवती तिचे जीवन गुंफिलेले असे. त्यामुळे ती असहाय होती व पतीचा तिला आधार घ्यावा लागे. तिची ही असहायता व वन्यावस्थेतील तीव्र जीवनकलह यामुळे पुरुषवर्गाला वर्चस्व मिळाले. परंपरेने तिला स्वतःचे असे थोडेच हक्क दिले होते. ह्याला अपवाद म्हणजे वैदिक काळातील आर्यांचा समाज व रोमन साम्राज्याचा अखेरीचा काल. "ऋग्वेदकाळी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात निदान वरच्या व संपन्न वर्गातील आर्य स्त्रियांना पुरुषांइतकीच स्वतंत्रता होती. समानता व स्वातंत्र्यामुळे आर्य स्त्रियांतील उच्च गुणसंपन्नता उदयास आली व समाजाला संस्कृतीची वरची पातळी गाठता आली."[१५]

आधुनिक काळात सर्व परिस्थिती बदलली आहे. निसर्गावरील मानवाच्या वाढत्या वर्चस्वामुळे स्त्रीचे विमोचन होऊ लागले आहे. प्रजोत्पादनावर एकीकडून मिळालेला ताबा आणि दुसरीकडून निरनिराळ्या क्षेत्रांत तिच्यापुढे चालून येत असलेली संधी, तसेच श्रमांची बचत करणारी साधने ह्या सर्वांच्या मदतीने स्वतंत्र प्रतिष्ठित मानव म्हणून तिला स्थान मिळविता येईल व मानवतेच्या प्रगतिपथाच्या आक्रमणास यथाशक्ती तिला हातभार लावता येईल असे वातावरण निर्माण झाले आहे.

दास्यविमोचनाची प्रक्रिया स्त्रियांपुरतीच मर्यादित राहिलेली नसून मागासलेले वंश व जमाती यांच्यातही सुरू झाली आहे. व तशीच ती चालू रहाणार, कदाचित मानवतेच्या अखेरीपर्यंत ती चालू राहील; कारण अपूर्णता हा भौतिक जगाचा नियम आहे. ". . . मानवजातीला पूर्णता प्राप्त होऊ शकेल ह्या मानवाच्या ध्येयवादाने, आणि विश्वासाने मानवी स्वातंत्र्याला अगर लोकशाहीला मदत न होता त्यांचे ते अत्यंत घातक शत्रू ठरतात. स्वतःच्या अपूर्णतेची वास्तव जाणीव झाल्यानेच मानवाला ऐहिक जीवन सुसह्य होऊ शकते" ह्या डॉ. निभूरच्या विचारसरणीमुळेच ते आजच्या काळातील एक मननीय व परिणामकारक विचारवंत ठरले आहेत. (२५-११-१९६०च्या

'गार्डीयन'मधील रेनहोल्ड निभूरच्या नेशनस् अँड एम्पायरस् ह्या लेखाच्या परी-क्षणावर इझिया बर्लिन ह्यांची टीका).

"मनुष्यातील आध्यात्मिक तत्त्वाच्या अस्तित्वामुळे सामाजिक विकासाबद्दलची स्फूर्ती निर्माण होते. व्यक्तीतील आध्यात्मिक तत्त्वामुळे समाजातील आध्यात्मिक तत्त्व, त्याला शोधून काढता येते. म्हणूनच एकाच्या परिपूर्णतेवर दुसऱ्याची परिपूर्णता अवलंबून असते."[१६] तेव्हा पूर्ण मानवत्व–सिद्धावस्था–प्राप्त करून घेणे हे प्रत्येकाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्याच्या प्रयत्नांमध्ये स्त्रीपुरुष भेद काहीसा आड येतो. स्त्रीच्या भूमिकेसंबंधी चर्चा करीत असताना एथेल एम्. आलबर्ट म्हणतात, "लिंगविषयक भेदाचा अभ्यास करीत असताना निसर्गाने–जीवशास्त्राने म्हणूया– आपणास नर व मादी केले आहे. समाजाच्या ज्या मूल्यांनुसार व नियमांनुसार आपला विकास होतो, त्याप्रमाणे आपण स्त्री व पुरुष म्हणून घडविले जातो आणि ह्या घटकांच्या व ध्येयवादी, सामाजिक व परिस्थितिजन्य अनुभवाचे जे धडे मिळतात त्या सर्वांच्या परस्पर प्रतिक्रियेनुसार आपले व्यक्तिमत्व बनले जाते."[१७]

तेव्हा वरील घटकांच्या प्रतिक्रियेच्या गुंतागुंतीमुळे तसेच मानवी इतिहासात स्त्रीविमोचन ही अगदी अलिकडील घटना असल्यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण प्रश्नांचा साकल्याने अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

'दी पोटेंशिअल ऑफ वुमन' ह्या परिसंवादाच्या प्रस्तावनेत संपादक म्हणतात, "पत्नी व माता ह्या व्यतिरिक्त स्त्रीने अधिक काहीतरी करावे असे म्हणणे सोपे आहे, परंतु 'अधिक काहीतरी' ह्याची व्याख्या करणे आणि तिच्या नैसर्गिक भूमिकेचा व समानतेत अंतर्भूत असलेल्या वाढत्या जबाबदारीचा समन्वय करणे कठीण आहे."[१८]

ह्या शतकाच्या सुरवातीच्या काळामध्ये भारतीय स्त्रीपुरते बोलावयाचे तर बालविवाह रूढ असल्यामुळे अक्षरओळख होण्याची मारामार पडे. ह्याच्या उलट आज तीच स्त्री उच्च पदव्यांनी केवळ विभूषितच होत नाही, तर तांत्रिक क्षेत्रांतही पदार्पण करीत आहे. १९४३ मध्ये जेव्हा प्रथम शिधावाटप-पद्धती सुरू झाली तेव्हा मध्यमवर्गीय स्त्रिया बहुसंख्येने घराबाहेर पडून कचेऱ्यांतून काम करू लागल्या. तत्पूर्वी काही तुरळक स्त्रिया शिक्षिका, डॉक्टर्स व परिचारिका म्हणून काम करीत होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात पत्नी व माता म्हणून नैसर्गिक जबाबदारी पार पाडीत असतानाही स्त्री आपल्या व्यक्तिमत्वाची 'उंची' किती उंचावू शकली आहे, हे शोधून काढण्याकरिता शिक्षित, अर्थोत्पादन करणाऱ्या व न करणाऱ्या अशा मध्यमवर्गीय स्त्रिया नमुन्यादाखल येथे घेतल्या आहेत. दुय्यम शालान्त परीक्षा पास झालेल्यांना व त्यापेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्यांना शिक्षित ह्या सदराखाली घेतले असून त्यांचा 'अ' गट केला आहे. दुसरा गट 'ब' असून त्यात मध्यमवर्गीय कुटुंब हा एकांक घेतल्यामुळे शिक्षणाचा प्रश्न येत नाही.

प्रस्तुत विषयाचे संशोधन संकलितरीत्या करावयाचे असल्यामुळे सर्व बाजूंनी

अभ्यास करता येईल अशी पद्धत स्वीकारली आहे. कार्ल पिअरसन म्हणतात की सर्व शास्त्रातील विविध विषयांचा मेळ पद्धतीवर अवलंबून असतो. "कसल्याही प्रकारच्या माहितीचे वर्गीकरण करून परस्पर संबंध दाखवून जी व्यक्ती त्याचे परिणाम दर्शवून देते ती व्यक्तीच शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करीत असते. व तिलाच शास्त्रज्ञ म्हणता येईल."[१९] म्हणून वैवाहिक, शैक्षणिक अगर कौटुंबिक अशा एकाच बाजूचा अभ्यास करण्याऐवजी सामाजिक, नैतिक, व्यावसायिक, रोजगारविषयक, मातृत्व व नागरिकत्वासंबंधी इत्यादी स्त्रीजीवनविषयक सर्व बाजू विचारात घेऊन संयोगिकरीत्या अभ्यास करण्याचा हा विनम्र प्रयत्न आहे. हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून तीन प्रकारच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या. त्यांपैकी पहिली 'अ' गटाकरिता. त्यात वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती, मुले, कुटुंबनियोजन, आर्थिक स्थिती, नोकरी अगर व्यवसाय व तत्संबंधीची परिस्थिती, नागरिकत्व आणि स्वतःच्या असलेल्या समस्या, ह्या सर्व बाजूंविषयी प्रश्न विचारले होते. शेवटी आयुष्यात कितपत समाधान लाभले असा एक सूचक प्रश्न टाकण्यात आला होता. अशा तऱ्हेने जरी फार खोलवर नसले तरी स्वचित्रित स्त्रीचित्रण येथे केले आहे.

दुसरी प्रश्नपत्रिका कुटुंबविषयक असून त्यात आधुनिक काळातील झालेल्या फेरबदलामुळे स्त्रिया व कुटुंब ह्यांच्यावर कोणते परिणाम झाले आहेत, त्याचे मूल्यांकन करण्याच्या दृष्टीने प्रश्न विचारले होते. दोन्ही प्रश्नपत्रिकांतील प्रश्न सुटसुटीत होते. वैयक्तिक माहिती देण्यास स्त्रिया नाखूष असतात असा प्रस्तुत लेखिकेचा मागल्या दोन खेपांचा अनुभव आहे. १९२७-२८ मध्ये 'मुंबई शहरातील शिकलेल्या स्त्रियांची आर्थिक परिस्थिती' ही पहिली पहाणी व १९४३-४५ मध्ये 'हिंदू स्त्रियांचा सामाजिक दर्जा' ही दुसरी पहाणी ह्या विषयाच्या अनुषंगाने केली होती. दोन्ही वेळेस स्त्रियांची नाखुषी बरीच होती. परंतु प्रस्तुत पहाणीच्या वेळी स्त्रियांची उत्तरे देण्याची तत्परता व त्यांचे सहकार्य बरेच आढळून आले. तथापि टपालमार्गे मात्र माहिती मागविण्यात आली नाही. उलट परस्पर विचारविनिमयावर भर देण्यात आला होता. काही स्त्रीमदतनिसांच्या सहाय्याने वरील दोन प्रश्नपत्रिकांच्या द्वारे माहिती गोळा केल्यावर लेखिका व मदतनीस ह्यांनी त्या स्त्रियांसंबंधी झालेले व्यक्तिदर्शनही शक्यतो नमूद करून ठेवले होते.

ह्या पहाणीत समाविष्ट केलेल्या स्त्रिया ज्या अधिकाऱ्यांच्या व वरिष्ठांच्या हाताखाली काम करीत होत्या त्यांच्यासाठी तिसरी प्रश्नपत्रिका काढली असून स्त्रीकर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, त्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण आणि पुरुष कर्मचाऱ्यांचा त्यांच्याविषयीचा दृष्टिकोन हे सर्व शोधून काढण्याकरिता त्यात प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नांची उत्तरे देताना वैयक्तिक मताची छाप पडणे स्वाभाविक आहे. ही गोष्ट जमेस धरूनही सर्वांचे मतैक्य जितपत आढळले तितपत त्याला महत्त्व आहे. हे अधिकारी वरच्या श्रेणींतील असल्यामुळे त्यांची उत्तरे जबाबदारपणे दिली जाण्याचा

संभव आहे. अशा तऱ्हेने स्त्रीकर्मचाऱ्यांचे प्रकट होणारे चित्र त्यांच्या जीवनासंबंधी शोधज्योत टाकणारे ठरते. एकंदरीत दोनशेवीस अधिकाऱ्यांच्या प्रश्नपत्रिका व मुलाखती घेण्यात आल्या. प्रश्नपत्रिकेतून गोळा केलेल्या माहितीव्यतिरिक्त स्त्रियांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यात आल्या, अधिक माहितीची भर घातली आणि ज्या ज्या क्षेत्रात त्या स्त्रिया काम करीत होत्या, तद्विषयक प्रश्नांची चर्चा करण्याकरिता स्त्रियांच्या एकत्र बैठकीही घेण्यात आल्या होत्या. ह्या संशोधनकार्यात अधिकारीवर्गाने जरूर तितके सहकार्य दिले हे प्रशंसनीय आहे.

सदरहू संशोधन हे बहुउद्देशीय असल्यामुळे प्रथमतः बुद्धिजीवी काम करणाऱ्या स्त्रियांपासून सुरवात करण्यात आली. मुंबई नगरपालिका प्राथमिक शिक्षिका, त्यांची संख्या फार मोठी (६,०६०) असल्यामुळे नॅशनल सॅम्पल सर्व्हेप्रमाणे फक्त दोन टक्केच शिक्षिकांची माहिती घेण्यात आली. उलटपक्षी सोलापूरच्या मेडिकल कॉलिजा-तील शिक्षिकांसारखी संख्या फारच लहान (४) असेल तेथे सर्वांना समाविष्ट करण्यात आले. अशा तऱ्हेने संख्याविषयक ह्या दोन टोकांत समन्वय करण्यात आलेला आहे. शिवाय उत्तरदायी स्त्रियांची स्वखुषी पण लक्षात घ्यावी लागली. जेथे अधिकारीवर्ग आणि कर्मचारी ह्यांचे सहकार्य लाभले तेथे अधिक स्त्रियांचा समावेश करण्यात आला.

पहिल्या तक्त्यात काम करण्याचे ठिकाण, शहरानुसार व अधिकारीवर्गाने पुरविलेल्या माहितीनुसार स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांची संख्या त्याचप्रमाणे ह्या पहाणी-करिता नमुन्यादाखल घेतलेल्या स्त्रियांची मूळ संख्येशी टक्केवारी दिली आहे.

ह्या तक्त्यावरून दिसून येते की केंद्र सरकारच्या सात विविध प्रकारचे काम करणाऱ्या बारा कचेऱ्यांना भेट देऊन २९२ वैयक्तिक व १९ मुलाखतवजा प्रश्न-पत्रिका गोळा करण्यात आल्या. एकूण अखिल केंद्र सरकारी कर्मचारी स्त्रियांच्या प्रमाणाशी ह्या २९२ स्त्रियांचे प्रमाण दहा टक्के पडते. नमुन्याकरिता म्हणून स्त्रियांची निवड करताना दोन घटक लक्षात घेतले होते. एक नोकरीत गेलेली वर्षे आणि दुसरा वैवाहिक दर्जा. यात केवळ नोकरीविषयक परिस्थितीचा अभ्यास करण्याचा उद्देश नसून स्त्रीच्या परिवर्तित स्थानाचा अभ्यास करण्याचा हेतू असल्यामुळे ह्या दोन घटकांचे विशेषतः दुसऱ्या घटकाचे महत्त्व लक्षात येईल. अधिकाऱ्यांनी दिलेल्या आकड्यांनुसार स्त्रीपुरुष कर्मचाऱ्यांचे प्रमाण १ : ३ असे पडते. टेलिफोन कार्यवाहीच्या बाबतीत इतर प्रगत देशांप्रमाणे भारत सरकारनेही हा व्यवसाय संपूर्णतया स्त्रियांच्या हाती सोपविण्याचे धोरण स्वीकारले आहे.

केंद्र सरकारप्रमाणे महाराष्ट्र राज्य-सरकारच्या सात प्रकारच्या श्रमिक महिला ११ कचेऱ्यांतून येथे घेतलेल्या आहेत. १७३ स्त्रियांकडून आणि ३५ अधिकाऱ्यांकडून घेतलेल्या प्रश्नपत्रिका म्हणजे सचिवालयातील—कारण फक्त तेथूनच आकडेवारी मिळाली—स्त्रीकर्मचाऱ्यांपैकी ११ टक्के नमुना होतो. वरील

**तक्ता १**

कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण,

| स्थळांची संख्या | संघटना | | | व्यक्तिगत प्रश्नपत्रिका | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | मुं. | पु. | ना. | सो. |
| **गट अ** | **I केंद्रिय सरकार** | | | | | |
| १२/७ | १. टेलिफोन एक्स्चेंज् | ९० | | | | |
| | (अ) मुंबई | | ५८ | | | |
| | (ब) पुणे | | | १० | | |
| | (क) नागपूर | | | | १६ | |
| | (ड) सोलापूर | | | | | ६ |
| | २. इन्कम टॅक्स | ७२ | ७२ | | | |
| | ३. ऑल् इंडिया रेडिओ | १८ | १८ | | | |
| | ४. संरक्षक खाते (इंजिनिअर वर्क्स) | १३ | १३ | | | |
| | ५. पश्चिम रेल्वे | ५४ | ५४ | | | |
| | ६. पोस्ट व टेलिग्राफ कारकून | २० | | | | |
| | पुणे | | | १९ | | |
| | नागपूर | | | | १ | |
| | ७. सॉर्टरस् | १५ | | १५ | | |
| | ८. टेलिग्राफिस्टस् | १० | | १० | | |
| | | २९२ | २१५ | ५४ | १७ | ६ |
| | **II राज्य सरकार** | | | | | |
| ११/७ | ९. सचिवालय/सेक्रेटरियट | ७४ | ७४ | | | |
| | १०. मिल्क कमिशनर | २० | २० | | | |
| | ११. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय : | ४९ | | | | |
| | पुणे | | | १२ | | |
| | नागपूर | | | | २७ | |
| | सोलापूर | | | | | १० |
| | १२. सेवायोजन कार्यालय | | | | | |
| | १३. शिधावाटप कार्यालय | १७ | | १० | | ७ |
| | १४. महसूल आयुक्त कार्यालय | ९ | | | ९ | |
| | १५. रिमांड होम | ३ | | | | |
| | नागपूर | | | | २ | |
| | सोलापूर | | | | | १ |
| | १६. न्यायविषयक | १ | | | | १ |
| | | १७३ | ९४ | २२ | ३८ | १९ |

तक्ता १

उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी

| मुलाखत प्रश्नपत्रिका | | | | | | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | मुं. | पु. | ना. | सो. | पुरुषांची संख्या | स्त्रियांची संख्या | एकूण | एकूण संख्येशी स्त्रिया | पुरुषांशी स्त्रिया | स्त्रियांशी नमुना |
| १ | | | | | | | | | | |
| | | | | | ० | १,१८३ | १,१८३ | १००.०० | – | ५.०० |
| | | | | | २१ | ३५१ | ३७२ | ९४.६० | १७००.०० | २.४२ |
| | | | १ | | ७० | ११० | १८० | ६१.०० | १५७.१४ | १४.५० |
| | | | | | मिळाली नाही | | | | | |
| | | | | | २,९०९ | ६०१ | ३,५१० | १७.०० | २०.७२ | १२.०० |
| ५ | ५ | | | | ३०७ | ६७ | ३७४ | २२.०० | २१.७४ | २७.०० |
| ४ | ४ | | | | १३३ | ४२ | १७५ | २४.०० | ३१.५८ | ३०.९५ |
| ६ | ६ | | | | १,७४३ | ५९४ | २,३३७ | २५.४० | ३१.७३ | ९.१० |
| १ | १ | | | | | | | | | |
| | | | | | ४०० | २६ | ४२६ | ६.१० | ६.५० | ८०.०० |
| १ | | १ | | | १,३२८ | ३२ | १,३५० | २.४० | २.५० | ४७.०० |
| १ | १ | | | | ६२ | १९ | ८१ | २३.७० | ३०.६८ | ५२.२७ |
| १९ | १७ | १ | १ | | | | | | | |
| २७ | १५ | ३ | ४ | ५ | २,६५२ | ६६१ | ३,३१३ | २०.०० | २५.०० | ११.०० |
| ७ | ६ | | | १ | मिळाली नाही | | | | | |
| १ | | | १ | | | | | | | |
| ३५ | २१ | ३ | ५ | ६ | | | | | | |

**तक्ता १** (पुढे चालू)

कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण,

| स्थळांची संख्या | संघटना | व्यक्तिगत प्रश्नपत्रिका एकूण | मुं. | पु. | ना. | सो. |
|---|---|---|---|---|---|---|
| | **III स्थानिक स्वराज्य** | | | | | |
| २/२ | १७. महानगरपालिका | ५२ | ५२ | | | |
| | १८. जिल्हा परिषद | ८ | | | | ८ |
| | | ६० | ५२ | | | ८ |
| | **IV स्वायत्त संस्था** | | | | | |
| ३/३ | १९. रिझर्व बँक | ७१ | ७१ | | | |
| | २०. पोर्ट ट्रस्ट | ५५ | ५५ | | | |
| | २१. ला. इ. कॉर्पोरेशन | ४५ | ४५ | | | |
| | | १७१ | १७१ | | | |
| | **V व्यापारी संस्था** | | | | | |
| | **बँका** | | | | | |
| १४/२ | २२. बँक ऑफ् बरोडा | ७ | ७ | | | |
| | २३. म. रा. सहकारी बँक | १६ | १६ | | | |
| | २४. बँक ऑफ् इंडिया | २२ | २२ | | | |
| | **गृहपयोगी** | | | | | |
| | २५. हिंदुस्थान लिव्हर | १६ | १६ | | | |
| | **औषधोपयोगी** | | | | | |
| | २६. मे अँन्ड बेकर | ९ | ९ | | | |
| | २७. ग्लॅक्सो लॅबोरेटरी | ६ | ६ | | | |
| | **नियतकालिके** | | | | | |
| | २८. टाइम्स ऑफ् इंडिया | ८ | ८ | | | |
| | २९. केसरी-मराठा-सकाळ | २ | | २ | | |
| | **इतर** | | | | | |
| | ३०. सहकारी सोसायटी | १ | | | १ | |
| | ३१. स्वतःचा धंदा/व्यवसाय | ४ | ३ | | १ | |
| | | ९१ | ८७ | २ | २ | |

उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी

| मुलाखत प्रश्नपत्रिका | | | | | | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | मुं. | पु. | ना. | सो. | पुरुषांची संख्या | स्त्रियांची संख्या | एकूण | एकूण संख्येशी स्त्रिया | पुरुषांशी स्त्रिया | स्त्रियांशी नमुना |
| | | | | | | मिळाली नाही | | | | |
| | | | | | ६,८९६ | ९६३ | ७,८५९ | १२.८८ | १४.२८ | ०.८० |
| १० | १० | | | | ३,८६९ | ६५५ | ४,५२४ | १६.०० | १७.५० | ११.०० |
| ५ | ५ | | | | | | | | | |
| १० | १० | | | | १,०११ | १०९ | १,१२० | १०.८० | १०.७८ | ४१.०० |
| २५ | २५ | | | | | | | | | |
| | | | | | ६४५ | ७७ | ७२२ | १०.६६ | १२.१० | २०.८० |
| | | | | | २,५४६ | ३४२ | २,८८८ | १२.०० | १३.२० | ६.३० |
| २ | २ | | | | | | | | | |
| ३ | ३ | | | | | मिळाली नाही | | | | |
| ५ | ५ | | | | | | | | | |

**तक्ता १** (पुढे चालू)

कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण,

| स्थळांची संख्या | संघटना | व्यक्तिगत प्रश्नपत्रिका एकूण | मुं. | पु. | ना. | सो. |
|---|---|---|---|---|---|---|
| | **VI शैक्षणिक व तत्संबंधित** | | | | | |
| ३०/१० | ३२. टाटा इन्स्टिटयूट ऑफ् सो. सा. | १ | १ | | | |
| | ३३. रूपारेल कॉलेज | ११ | ११ | | | |
| | ३४. पार्ले कॉलेज | ८ | ८ | | | |
| | ३५. श्री. ना. दा. ठा. कॉलेजिस् | ७८ | ७८ | | | |
| | ३६. डेक्कन कॉलेज | १६ | | १६ | | |
| | ३७. मुंबई विद्यापीठ लायब्ररी | १३ | १३ | | | |
| | ३८. श्री. ना. दा. ठा. लायब्ररी | ७ | ७ | | | |
| | ३९. पुणे विद्यापीठ | ९ | | ९ | | |
| | ४०. संगम कॉलेज | ५ | | | | ५ |
| | ४१. वुइमेन्स् कॉलेज | २ | | | २ | |
| | *४२. करमाळा ट्रेनिंग कॉलेज | २४ | २४ | | | |
| | ४३. दुय्यम शिक्षक | १३२ | | | | |
| | मुंबई | | ९४ | | | |
| | पुणे | | | १९ | | |
| | नागपूर | | | | ७ | |
| | सोलापूर | | | | | १२ |
| | ४४. प्राथमिक शिक्षक | १५९ | | | | |
| | मुंबई | | १३२ | | | |
| | पुणे | | | २० | | |
| | नागपूर | | | | | |
| | सोलापूर | | | | | ७ |
| | | ४६५ | ३६८ | ६४ | ९ | २४ |
| | **VII समाजसेवा संस्था** | | | | | |
| २/१ | ४५. माझी आई वगैरे | ६ | ६ | | | |
| | ४६. मातृसेवासंघ | ३ | | | ३ | |
| | | ९ | ६ | | ३ | |

* करमाळा ट्रेनिंग कॉलेज, जिल्हा सातारा: फक्त येथल्याच प्रश्नपत्रिका मुंबईस पोस्टाने आल्या.

**तक्ता १** (पुढे चालू)

उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी

| मुलाखत प्रश्नपत्रिका | | | | | | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | मुं. | पु. | ना. | सो. | पुरुषांची संख्या | स्त्रियांची संख्या | एकूण | एकूण संख्येशी स्त्रिया | पुरुषांशी स्त्रिया | स्त्रियांशी नमुना |
| ६ | ६ | | | | मिळाली नाही | | | | | |
| १ | १ | | | | | | | | | |
| २ | २ | | | | | | | | | |
| ३ | | ३ | | | २२ | १२१ | १४३ | ८४.६२ | ५५० | ५४.५४ |
| १ | १ | | | | मिळाली नाही | | | | | |
| २ | | २ | | | १ | १४ | १५ | ९३.३३ | १४०० | ५० |
| ३ | १ | | २ | | | | | | | |
| १ | | | | १ | मिळाली नाही | | | | | |
| | | | | | मिळाली नाही | | | | | |
| | | | | | ३ | २३ | ३६ | ६५.०० | १७७.०० | ५१.०० |
| | | | | | २,४५३ | ३,६०७ | ६,०६० | ६०.०० | १४८.०० | २.०० |
| | | | | | मिळाली नाही | | | | | |
| | | | | | ४११ | ६४२ | १,०५३ | ६३.६० | १५२.०० | २.०० |
| १९ | ११ | ५ | २ | १ | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | | | १ | |
| १ | | | १ | |

**तक्ता १** (पुढे चालू)

कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण,

| स्थळांचा | संघटना | व्यक्तिगत प्रश्नपत्रिका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | मुं. | पु. | ना. | सो. |
| | **VIII डॉक्टर शिक्षक** | | | | | |
| २१/१३ | ४७–४९. —नायर, के.ई.एम्., सायन | १३ | १३ | | | |
| | ५०. बी. जे. मेडिकल | १५ | | १५ | | |
| | ५१. मेडिकल कॉलेजिस् | १५ | | | ११ | ४ |
| शिक्षकेतर : | ५२. जगजीवनराम रेल्वे | २३ | २३ | | | |
| | ५३. पोलीस मॅटर्निटी | ७ | ७ | | | |
| | ५४. कामा व जे. जे. | ११ | ११ | | | |
| | ५५. के.ई.एम्. व नायर | १७ | १७ | | | |
| | ५६. एल्. टी. एम्. जी. हॉस्पिटल | ५० | ५० | | | |
| | ५७. ससून हॉस्पिटल | २८ | | २८ | | |
| | ५८. के.ई.एम्. हॉस्पिटल | ४ | | ४ | | |
| | ५९. सिव्हिल हॉस्पिटल | ९ | | | ९ | |
| | ६०. मेयो हॉस्पिटल | १५ | | | १५ | |
| | ६१. वाडिया हॉस्पिटल | १ | | | | १ |
| | ६२. सिव्हिल हॉस्पिटल | १६ | | | | १६ |
| | ६३. डफरीन् हॉस्पिटल | ९ | | | | ९ |
| | ६४. धनराज गिरजी हॉस्पिटल | ६ | | | | ६ |
| | मेडिकल नॉन-टीचिंग | | | | | |
| | डॉक्टरस् | | | | | |
| | नर्सिस् | | | | | |
| | | २३९ | १२१ | ४७ | ३५ | ३६ |

उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी

| मुलाखत प्रश्नपत्रिका | | | | | | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरुषांची | स्त्रियांची | | एकूण संख्येशी | पुरुषांशी | स्त्रियांशी |
| एकूण | मुं. | पु. | ना. | सो. | संख्या | संख्या | एकूण | स्त्रिया | स्त्रिया | नमुना |
| ३ | ३ | | | | | | | | | |
| १५ | | १५ | | | | | | | | |
| ७ | | | ४ | ३ | | | | | | |
| ७ | ७ | | | | | | | | | |
| १ | १ | | | | | | | | | |
| ११ | ११ | | | | | | | | | |
| १६ | १६ | | | | | | | | | |
| १ | | १ | | | | | | | | |
| २ | | | २ | | | | | | | |
| ९ | | | ९ | | | | | | | |
| १ | | | | १ | | | | | | |
| ३ | | | | ३ | | | | | | |
| | | | | | ११,८०८ | २,५८६ | १४,३९४ | १६.६९ | २४.०० | ३.४५ |
| | | | | | ५६४ | ११,१९४ | ११,७५८ | ९५.०० | १९००.०० | ११.०० |
| ७६ | ३८ | १६ | १५ | ७ | | | | | | |

कामाच्या स्थळानुसार घेतलेला नमुना, स्त्रीपुरुषांचे प्रमाण

| स्थळांची संख्या | संघटना | व्यक्तिगत प्रश्नपत्रिका | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | मुं. | पु. | ना. | सो. |
| | **IX विविध, प्राध्यापक वगैरे** | | | | | |
| | ६५. इंजिनिअरिंग ग्रॅज्युएटस् | ९ | | ९ | | |
| | ६६. आर्किटेक्टस् | ४ | ४ | | | |
| | ६७. टेकनॉलॉजिस्टस् | १ | १ | | | |
| | ६८. ॲडव्होकेटस् | ६ | ६ | | | |
| | ६९. मेडिकल प्रॅक्टीशनरस् | ८ | ८ | | | |
| | ७०. ॲक्ट्रेसिस् | ४ | ४ | | | |
| | ७१. वर्गीकरण करता येत नाही | २ | २ | | | |
| | | ३४ | २५ | ९ | | |
| | बेरीज | १५३४ | ११३९ | १९८ | १०४ | ९३ |
| **गट ब** | १४३ कुटुंबे | २५९ | २५९ | | | |
| एकूण बेरीज गट अ + ब | | १७९३ | १३९८ | १९८ | १०४ | ९३ |
| | ७२. श्रद्धानंद आश्रम | २२ | २२ | | | |
| | ७३. खाजगी सूतिकागृहे ४ } निर्बीजीकरणाची उदाहरणे | १६० | १६० | | | |
| | ७४. सार्वजनिक सूतिकागृहे ९ } निर्बीजीकरणाची उदाहरणे | ८५० | ८५० | | | |
| | ७५. श्री. ना. दा. ठा. एम्.ए. विद्यार्थिनी | १५१ | २५ | | | |

उत्तरदायी स्त्रियांची संख्या व टक्केवारी

| मुलाखत प्रश्नपत्रिका | | | | | | | | टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | मुं. | पु. | ना. | सो. | पुरुषांची संख्या | स्त्रियांची संख्या | एकूण | एकूण संख्येशी स्त्रिया | पुरुषांशी स्त्रिया | स्त्रियांशी नमुना |
| १ | | १ | | | मिळाली नाही | | | | | |
| | | | | | ९,६२९ | ३१२ | ९,९४१ | ३.१४ | ३.२४ | २.०० |
| १४ | १२ | १ | | १ | मिळाली नाही | | | | | |
| १५ | १२ | २ | | १ | | | | | | |
| १९५ | १२९ | २५ | २४ | १७ | | | | | | |
| १९५ | १२९ | २५ | २४ | १७ | | | | | | |
| १ | १ | | | | | | | | | |

आकडयांशी तुलना केल्यास थोडयाच स्थानिक नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांची माहिती मिळाली. कारण सुरवातीसच तेथून फारसे प्रोत्साहन मिळाले नाही.

तीन स्वनियंत्रित संस्थांकडून २६ टक्के स्त्रीकर्मचाऱ्यांचे आणि दोन शहरांतल्या चौदा व्यापारी संस्थांतून ९१ कर्मचारी व पाच मुलाखत प्रश्नपत्रिका गोळा केल्या होत्या. ह्यांत महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेतून २० टक्के नमुन्याचे प्रमाण पडते. इतर ठिकाणचे प्रमाण देता येत नाही कारण तेथील अधिकाऱ्यांना विनंती केली असतानाही आकडे देण्यात आले नाहीत.

शिक्षण व तत्संबंधी संस्थांतून ४६५ स्त्रियांकडून व एकोणीस अधिकाऱ्यांच्याकडून प्रश्नपत्रिका भरून घेतल्या. ह्यांची टक्केवारी देणे चुकीचे ठरेल. म्हणून फक्त प्राथमिक शिक्षिका २ टक्के घेण्यात आल्या, येवढेच नमूद करावेसे वाटते.

दोन सामाजिक संस्थांच्या बाबतीतही वरील विधान सत्य ठरते.

एकवीस वैद्यकीय संस्थांतून २३९ स्त्रियांची–उच्च शिक्षित डॉक्टर व परिचारिकांची गाठ घेतली. तसेच डॉक्टर वर्गाकडून ७६ मुलाखत प्रश्नपत्रिका मिळाल्या. वैद्यकीय व्यवसायाचे दोन भाग आहेत. एक शिक्षक वर्ग व दुसरा, शिकविण्याच्या व्यवसायाव्यतिरिक्त मुख्यतः रोगचिकित्सा, उपाययोजना, व प्रयोगशालेय काम करणाऱ्यांचा वर्ग. येथेही स्त्रीपुरुष प्रमाण मिळाले नाही. म्हणून महाराष्ट्र राज्यातील नोंद झालेल्या डॉक्टरांचे आकडे घेतले. त्यानुसार प्रस्तुत नमुन्याचे प्रमाण ३.४५ टक्के पडते. तसेच परिचारिकेचा व्यवसाय हा मूलतः स्त्रियांचाच असल्यामुळे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या आकडयानुसार ११ टक्के नमुना घेण्यात आला.

इंजिनियरिंग, टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर, कायदा आणि सिनेनटी हे सर्व व्यवसाय 'विविध' या सदराखाली घातले आहेत. कारण ह्या क्षेत्रांत स्त्रिया अलिकडेच पदार्पण करू लागल्यामुळे त्यांची संख्या कमी आहे. फक्त इंजिनियरिंग व कायदा हे व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे आकडे मिळू शकले. वरील व्यवसायांतील स्त्रियांची भेट व्यक्तिशःच घ्यावी लागली. मुलाखत प्रश्नपत्रिका मात्र एकंदरीने १५ मिळाल्या.

अशा तऱ्हेने चार शहरांतील १२९ ठिकाणी जाऊन १५३४ स्त्रिया, १२९ मुलाखती व २६ व्यक्तिदर्शनांची नोंद घेण्यात आली. तसेच तुलनात्मक अभ्यासासाठी १४३ कुटुंबांना भेट देऊन २५९ ('ब' गट) स्त्रियांकडून प्रश्नपत्रिका भरून घेतल्या. त्याचप्रमाणे श्रद्धानंद महिलाश्रमातील बावीस स्त्रिया व तेथील सन्माननीय चिटणीस ह्यांच्याकडूनही माहिती घेण्यात आली. परंतु आश्रमातील स्त्रियांची उदाहरणे असामान्य असल्यामुळे ती ह्यात धरली नाहीत. फक्त थोडीशी विरोधात्मक बाजू म्हणूनच त्या संस्थेस भेट देण्यात आली होती. तसेच चार खाजगी व नऊ सार्वजनिक सूतिकागृहांतून निर्बीजीकरण केलेल्या १०१० स्त्रियांची तेवढयापुरतीच माहिती घेऊन ती कुटुंबनियोजन प्रकरणात घालण्यात आली आहे. शिवाय एम्. ए. चा अभ्यास करणाऱ्या २५ विद्यार्थिनींच्या मुलाखती घेऊन आधुनिक

## तक्ता २

स्थानिक फरकांसहित गोळा केलेल्या माहितीचा थोडक्यात गोषवारा

| तपशील | गट अ | | | | | गट ब | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर | नागपूर | पुणे | मुंबई | उप बेरीज | | |
| १. संख्या | ९३ | १०४ | १९८ | १,१३९ | १,५३४ | २५९ | १,७९३ |
| % | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| २. वय | | | | | | | |
| २० वर्षा-खालील | ४ | २ | २० | १८ | ४४ | २७ | ७१ |
| % | ४.३ | २.० | १०.१ | १.६ | २.८५ | १०.५ | ४.० |
| २१ ते ३० वर्षे | ४५ | ५४ | ८४ | ५६६ | ७४९ | ७८ | ८२७ |
| % | ४८.४ | ५२.० | ४२.५ | ४९.७ | ४८.८ | ३०.१ | ४६.० |
| ३१ ते ४० वर्षे | ३० | २८ | ५९ | ३५८ | ४७५ | ८३ | ५५८ |
| % | ३२.२ | २७.० | २९.७५ | ३१.४ | ३१.० | ३२.० | ३१.० |
| ४१ वर्षे व वरील | १४ | २० | ३५ | १९७ | २६६ | ७१ | ३३७ |
| % | १५.१ | १९.० | १७.६५ | १७.३ | १७.३५ | २७.४ | १९.० |
| ३. शिक्षण | | | | | | | |
| पदवीपेक्षा कमी | ६५ | ७१ | १२५ | ५८९ | ८५० | २१६ | १०६६ |
| % | ७०.० | ६८.० | ६३.१ | ५१.७५ | ५५.४ | ८३.४ | ५९.४ |
| फक्त पदवी | ७ | १२ | २२ | २७१ | ३१२ | ३३ | ३४५ |
| % | ७.४२ | ११.५ | ११.१ | २३.७५ | २०.३ | १२.७ | १९.२ |

| तपशील | गट अ | | | | | गट ब | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर | नागपूर | पुणे | मुंबई | उप बेरीज | | बेरीज |
| पदवीपेक्षा अधिक | २१ | २१ | ५१ | २८९ | ३७२ | १० | ३८२ |
| % | २२.५८ | २०.५ | २५.८ | २४.५ | २४.३ | ३.९ | २१.४ |
| ४. धर्म | | | | | | | |
| हिंदू | ८३ | ८८ | १८० | १०१७ | १३६८ | २५६ | १६२४ |
| % | ८९.२५ | ८४.५ | ९१.० | ८९.३ | ८९.२ | ९८.८ | ९०.६ |
| मुसलमान | ४ | १ | ४ | ३६ | ४५ | २ | ४७ |
| % | ४.३ | १.० | २.० | ३.२५ | २.९ | ०.८ | २.६ |
| इतर | ६ | १५ | १४ | ८६ | १२१ | १ | १२२ |
| % | ६.४५ | १४.५ | ७.० | ७.५ | ७.९ | ०.४ | ६.८ |
| ५. वैवाहिक दर्जा | | | | | | | |
| अविवाहित | ४१ | ५५ | १०४ | ४६५ | ६६५ | ५६ | ७२१ |
| % | ४४.०५ | ५२.८५ | ५२.५० | ४०.८ | ४३.३ | २१.७ | ४९.२ |
| विवाहित | ४५ | ४४ | ८१ | ६२५ | ७९५ | १९२ | ९८७ |
| % | ४८.४ | ४२.२५ | ४०.७५ | ५४.९ | ५१.७ | ७४.१ | ५५.० |
| विधवा | ६ | २ | ७ | ३० | ४५ | ६ | ५१ |
| % | ६.४५ | १.९५ | ३.५ | २.६ | २.९ | २.२७ | २.८ |
| घटस्फोटिता | ० | १ | २ | ५ | ८ | ० | ८ |
| % | – | १.० | १.०८ | ०.४५ | ०.७ | – | ०.६ |
| परित्यक्ता | १ | २ | ४ | १४ | २१ | ५ | २६ |
| % | १.१ | १.९५ | २.१७ | १.२५ | १.४ | १.९३ | १.४ |
| ६. कुटुंबपद्धती | | | | | | | |
| अविभक्त | ३५ | ३२ | ६० | ३३४ | ४६१ | ४३ | ५०४ |
| % | ३७.६ | ३०.७५ | ३०.३ | २९.४ | ३०.० | ३०.० | ३०.० |

| तपशील | गट अ | | | | | गट ब | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर | नागपूर | पुणे | मुंबई | उप बेरीज | | |
| मूळ | ५७ | ६९ | १३२ | ७९८ | १०५६ | ९५ | ११५१ |
| % | ६१.३ | ६६.३५ | ६६.६७ | ७०.० | ६९.० | ६६.४३ | ६७.७ |
| भग्न | १ | ३ | ६ | ७ | १७ | ५ | २२ |
| % | १.१ | २.९ | ३.०३ | ०.६ | १.० | ३.५७ | २.३ |
| *७. कुटुंब-नियोजन | | | | | | | |
| अनुकूल | १५ | १४ | ३५ | २५६ | ३२० | ६० | ३८० |
| प्रतिकूल | ० | ९ | ६ | ६२ | ७७ | १०९ | १८६ |
| तटस्थ | २३ | २१ | ४० | २८१ | ३६५ | १४ | ३७९ |
| ८. प्राप्तीकर | | | | | | | |
| देणाऱ्या | १७ | २० | ४८ | ३४१ | ४२६ | ० | ४२६ |
| % | १८.२८ | १९.२ | २४.२५ | ३०.० | २७.८ | – | – |
| न देणाऱ्या | ७६ | ८४ | १५० | ७९८ | ११०८ | ० | ११०८ |
| % | ८१.७२ | ८०.५ | ७५.७५ | ७०.० | ७२.२ | – | – |
| ९. व्यवसाय | | | | | | | |
| डॉक्टरी | ९ | १४ | १२ | ४९ | ८४ | ० | ८४ |
| % | ९.६५ | १३.५ | ६.० | ४.४ | ५.६ | ० | ४.७ |
| वकिली | १ | ० | ० | ८ | ९ | ० | ९ |
| % | १.१ | ० | ० | ०.७ | ०.६ | ० | ०.५ |
| शिक्षिका | २२ | ९ | ६९ | ३६० | ४६० | १२ | ४७२ |
| % | २३.६८ | ८.७५ | ३४.७ | ३१.५ | ३०.० | ४.७ | २६.३ |
| परिचारिका | २८ | २२ | २८ | ६६ | १४४ | ० | १४४ |
| % | ३०.० | २१.० | १४.३ | ६.८ | ९.४ | ० | ८.० |

* कुटुंबनियोजनाची टक्केवारी दिली नाही कारण नमुन्यामध्ये अविवाहित, विधवा वगैरेही स्त्रिया आहेत.

| तपशील | गट अ | | | | | गट ब | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर | नागपूर | पुणे | मुंबई | उप बेरीज | | बेरीज |
| शासकीय | २७ | ४१ | ५८ | ५६२ | ६८८ | ७ | ६९५ |
| % | २९.५७ | ४०.० | २९.५ | ४९.४ | ४४.८ | ०.२७ | ३८.८ |
| टेलिफोन/ग्राफ ऑप-रेशन | ६ | १६ | २० | ५८ | १०० | ० | १०० |
| % | ६.० | १५.० | १०.१५ | ५.१ | ६.५ | ० | ५.६ |
| इतर | ० | २ | ११ | ३६ | ४९ | ० | ४९ |
| % | ० | १.७५ | ५.३५ | ३.२ | ३.२ | ० | २.८ |
| गृहिणी | – | – | – | – | – | २४० | २४० |
| % | – | – | – | – | – | ९२.६ | १३.३ |
| **१०. समाधानाची जाणीव** | | | | | | | |
| पूर्ण समाधानी | ८० | ५९ | १०१ | ६८२ | ९२२ | १०६ | १०२८ |
| % | ८५.७ | ५६.७५ | ५१.० | ५९.९ | ६०.१ | ४०.९२ | ५९.८ |
| अंशतः समाधानी | २ | १७ | २० | १२२ | १६१ | ३७ | १९८ |
| % | २.२ | १६.५ | १०.१ | १०.७५ | १०.४९ | १४.२८ | ११.१ |
| असमामाधानी | ११ | १५ | ३२ | १७९ | २३७ | ५१ | २८८ |
| % | १२.१ | १४.५ | १६.२५ | १५.७ | १५.४४ | १९.७९ | १६.० |
| उत्तर दिले नाही | ० | १३ | ४५ | १५६ | २१४ | ६५ | २७९ |
| % | ० | १२.२५ | २२.६५ | १३.६५ | १३.९७ | २५.०१ | १३.१ |

विद्यार्थी-वर्गाचा कल पहाण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनाही सदर नमुन्यात जमा केले नाही.

तक्ता क्र. २ मध्ये स्थानिक फरकांसहित सारांश रूपाने १७९३ स्त्रियांची माहिती थोडक्यात चित्रित केली आहे.

शिक्षणासंबंधी विचार करता १०६६, अगर ५९.४० टक्के ह्या पदवीपूर्व शिक्षण घेतलेल्या परंतु ३८२, अगर २१.४ टक्के ह्या पदवी घेतलेल्या आढळतात. १०६६

स्त्रियांमध्ये ब गटातील २५९ पैकी २१६ स्त्रिया जमा आहेत. अ आणि ब गटांची तुलना केल्यास ब गटात अधिक वयस्कर स्त्रिया आहेत. त्यामुळे त्या फारशा शिकलेल्या नसणे स्वाभाविक आहे.

गट अ १५३४ व गट ब २५९ मिळून १७९३ स्त्रियांचे दहा प्रकारचे वर्गीकरण केलेले आहे. पहिल्यांदा त्यांच्या वयानुसार पहाता ८२७, अगर ४६.०९ टक्के ह्या २१ ते ३० ह्या वयोमान गटात येतात. जरी ह्या स्त्रियांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात झालेला असला तरी त्यांचे संवर्धन तदनंतरच्या काळात झाले आहे. वरील संख्येत ७१, अगर ४ टक्के वीस वर्षांखालील–अ गटात कमीतकमी १७ व ब गटात कमीतकमी १८ वयोमान मिळाले आहे–आणि ५५८, अगर ३१ टक्के ३१ ते ४० वयोमानातल्या स्त्रिया जमा केल्यास प्रस्तुत पहाणीमध्ये ८१ टक्के स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचा समावेश होतो असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

आठव्या व दहाव्या वर्गीकरणाचे थोडे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. अ गटातील स्त्रियांना पुढील प्रश्न विचारला, "तुम्ही प्राप्तीकर भरता का ? भरत असल्यास कशावर भरता–नोकरी, व्यवसाय, मालमत्ता?" ह्या प्रश्नानुसार ४२६, अगर २७.०८ टक्के स्त्रिया सदरहू कर देतात व तोही मुख्यत: नोकरीच्या अगर व्यवसायाच्या उत्पन्नावर देतात. फारच थोड्या उत्पन्न व मालमत्ता ह्या दोहोंवर कर भरतात. ह्यावरून असे दिसून येते की प्रस्तुत पहाणीतील नमुना हा मध्यमवर्गाचा मध्यछेदित विभाग आहे. उरलेल्या वर्गीकरणासंबंधी विवेचन पुढे दिलेले असून शक्यतो परस्परसंबंध दाखविण्यात आला आहे.

शिक्षण लाभल्यामुळे आणि/अगर काम करण्यास संधी मिळाल्याने वा न मिळाल्याने असो, आयुष्यातील अंतिम समाधान हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. अ गटात ६०.१ टक्के व ब गटात ४०.९२ टक्के स्त्रिया समाधानी आहेत असे दिसून आले. अ गटातील समाधानी स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. त्यावरून घराबाहेर काम करण्याची संधी आणि तेणेकरून स्वावलंबी झाल्यामुळे स्वकर्तृत्व दाखविण्याचा लाभलेला योग हा समाधानास कारणीभूत असावा.

ह्या समाधानाला वरवरचे महत्त्व आहे असा मुद्दा कोणी उपस्थित करील. कारण समाधान म्हटले तर सापेक्ष आहे. ह्या मुद्याला असे उत्तर देता येईल की, कोणत्याही प्रश्नाला फारसा विचार न करता एकदम दिलेल्या उत्तरातून मनातील अव्यक्त विचार प्रगट होतात. शिवाय समाधान आहे किंवा नाही त्याला पूरक उत्तरे पुढे दिली आहेत. समाधान हे आकड्याने मोजता येत नसले तरी मध्यमवर्गीय स्त्रियांचा कल कोणत्या दिशेने वहात आहे हे तरी उघड होते.

## संदर्भ

१. सी. कर्कपॅट्रिक, वुमन् इन् नाझी जर्मनी, पा. २३७.
२. एरिक् एच्. एरिकसन्, वुइमेन अँड सायन्टिफिक प्रोफेशन्स (१९६५), पा. २४४.
३. एरिक् एच्. एरिकसन्, वुइमेन अँड सायन्टिफिक प्रोफेशन्स (१९६५), पा. २४५.
४. युनेस्को, पोलिटिकल रोल ऑफ् वुइमेन (१९५६), पा. १२४.
५. ताया झिनकिन्, चॅलेंजिस् इन् इंडिया (१९६६), पा. १९९.
६. एथेल एम्. आलबर्ट, "द रोलस् ऑफ वुइमेन", इन् एस्. एम्. फार्बर अँड आर्. एच्. एल्. वुइल्सन, द पोटेंशिअल ऑफ वुमन (१९६३), पा. ११५.
७. वुइमेन अँड द सायन्टिफिक प्रोफेशन्स (१९६५), पा. २३४.
८. बी. जे. बिडल् अँड इ. जे. थॉमस्, रोल थिअरी—कन्सेप्टस् अँड रीसर्च (१९६६), पा. ७.
९. सेन्सस् ऑफ इंडिया, १९६१, व्हॉल्युम् १०, पार्ट १० (१-बी).
१०. डेव्हिड लॉकवुड, द ब्लॅककोटेड, वर्कर (१९५८), पा. २०९.
११. डेव्हिड लॉकवुड, द ब्लॅककोटेड वर्कर (१९५८), पा. २११.
१२. जी. एस्. घुर्ये, कास्ट, क्लास, ऑक्युपेशन (१९६२), पा. २९.
१३. एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सिस्, व्हॉल्युम ३-४, पा. ५३३.
१४. सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑरगनायझेशन, एकॉनॉमिक सर्व्हे ऑफ मिडल् क्लास (१९५८-५९).
१५. अविनाशचंद्र दास, ऋग्वेदिक कल्चर, पा. १०६.
१६. रा. द. रानडे, द भगवद्गीता ॲज् अ फिलॉसॉफी ऑफ् गॉड् रिअलायझेशन् (१९५८), पा. १३०.
१७. इ. एम्. आलबर्ट, द रोलस् ऑफ वुइमेन, पा. १०८.
१८. एस्. एम्. फार्बर अँड वुइल्सन, पा. ८.
१९. कार्ल पिअरसन, ग्रॅमर ऑफ् सायन्स्, पा. १०.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
मंत्रालय

## प्रकरण १ ले

# काही जीवशास्त्रीय व सामाजिक बाजू

स्त्रीपुरुष हा भेद निसर्गाने निर्माण केला आहे. दोघांमधील ही भिन्नता मान्य करूनही किंवा त्यामुळे का होईना, स्त्री ही मानव आहे आणि सजीव प्राण्यांमध्ये अगदी अग्रस्थानी आहे हे मान्य करावे लागते. मानव म्हणून स्त्री आणि पुरुष ह्यांच्यात विभिन्नतेपेक्षा अधिक प्रमाणात साम्य आहे ही वस्तुस्थिती पुष्कळ वेळा नजरेआड केली जाते. आपण पुरुषांपेक्षा वेगळे आहोत हे स्त्रियांवर फार मोठे दडपण होते. ही भिन्नता किती आणि साम्य किती हा एक प्रश्नच आहे. स्त्रीपुरुषातील भेदामुळे व भिन्न कार्यामुळे जो वागणुकीत फरक आढळतो त्यासंबंधी पाश्चात्य देशांत थोडेबहुत संशोधन झाले आहे.

"...स्त्रीपुरुषांच्या कार्यांत स्त्रीपुरुषत्व भेदामुळे आजवर जो फरक केला जात होता तो प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याकरता होय. जो फरक अजूनही औद्योगिक प्रगत राष्ट्रांत आढळतो...तो चालू ठेवण्याचे कारण नाही. उलट त्यांची कार्ये सहजरीत्या परस्पर निगडित करणे इष्ट आहे" असे ब्रिटिश शास्त्रज्ञ पतिपत्नी सौ. क्लेअर रसेल व डॉ. डब्ल्यू. एम. एस. रसेल म्हणतात.[1]

अमेरिकन स्त्रीस्वातंत्र्याच्या पुढारी मिसेस हिल्डे म्हणतात की जोपर्यंत पुरुषांच्या हाती राष्ट्राची राज्यसूत्रे आहेत तोपर्यंत कोणतेही राज्य आपला लष्करी दृष्टिकोन सोडणार नाही. कारण पुरुषवर्गाची मूल्ये म्हणजे हिंसेला मान्यता व तिचा उदोउदो होय.[1]

स्त्री-नेतृत्व समाज हा मानवतेला उपकारक ठरेल काय?

ह्या संशोधनातून उपलब्ध झालेली माहिती लक्षात घेता प्रस्तुत पहाणी उपरोक्त प्रश्नावर काहीसा प्रकाश टाकेल काय ?

वरील प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी भारतात पुरुषांच्या मानाने स्त्रियांची संख्या कमी आहे ह्या लोकसंख्याविषयक एका महत्त्वाच्या बाजूकडे वाचकांचे लक्ष वेधावेसे वाटते. भारतीय दर्शनातील हे एक वैशिष्टच आहे. ह्या देशातील स्त्रीपुरुष प्रमाणाची तुलना इतर देशांतील तत्सम आकड्यांबरोबर केल्यास ती चिंताजनकच वाटते.

तक्ता ३ मधील आकड्यांवरून पाच प्रगत देशांत व त्यातल्या त्यात रशियात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे असे दिसून येते. उलटपक्षी भारत, महाराष्ट्र व ज्या चार शहरांतून प्रस्तुत पहाणीसाठी स्त्रियांची निवड केली आहे तेथे सर्वत्र ते प्रमाण फारच

तक्ता ३

राष्ट्रानुसार स्त्रीपुरुष प्रमाण

| राष्ट्र | वर्ष | दर हजार पुरुषांस स्त्रियांचे प्रमाण | |
|---|---|---|---|
| यू.एस्.ए. (अमेरिका) | १९६७ | १,०३३ * | |
| यू.एस्.एस्.आर. (रशिया) | १९६१ | १,२०९ * | |
| यू.के. (ब्रिटन) | १९६९ | १,०६० T | |
| स्वीडन | १९६६ | १,००२ * | |
| जपान | १९६६ | १,०३७ * | |
| इस्राएल | १९६६ | ९७८ * | |
| भारत | १९६१ | ९४१ ■ | |
| | १९७१ | ९३२ ■ | |
| केरळ | १९६१ | १,०२२ | |
| | १९७१ | १,०१९ | |
| महाराष्ट्र | १९६१ | ९३६ | |
| | १९७१ | ९३३ | |
| सोलापूर | १९६१ | ९०२ | |
| | १९७१ | ९११ | |
| पुणे | १९६१ | ८८४ | मध्यम |
| | १९७१ | ८७९ | ८३३ |
| नागपूर | १९६१ | ८८४ | (१९६१) |
| | १९७१ | ९०० | ८५३ |
| बृहन्मुंबई | १९६१ | ६६३ | (१९७१) |
| | १९७१ | ७२१ | |
| गट अ | १९६५-६६ | ९८० | पहाणीतील स्त्रियां-च्या मुलामुलींचे प्रमाण |
| गट ब | १९६६-६७ | ९२१ | |

*यू.एन्.ओ. डेमोग्रॅफिक इअर बुक १९६७. T ब्रिटन–ॲन् ऑफिशिअल हॅन्डबुक १९७०. ■ सेन्सस् ऑफ इंडिया १९६१, १९७१.

कमी आहे. सामान्यतः स्त्रियांची संख्या शहरात कमी ह्याचे कारण उपजीविकेसाठी स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक संख्येने शहराकडे धाव घेतात. शिवाय जागेची टंचाई वगैरे अडचणींमुळेही पुरुषांना आपली कुटुंबे शहरात आणता येत नाहीत. ही गोष्ट जमेस धरूनही केरळ घटकराज्य वगळल्यास भारत व भारतातील बाकीच्या राज्यां-मध्ये पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा अधिक आढळते! इतर तुलनेकरिता घेतलेल्या देशांत औद्योगीकरण, युद्ध वगैरेंमुळे पुरुषांची प्राणहानी अधिक होते ही गोष्ट खरी तरीसुद्धा भारतातील ही विषमता चिंताजनक वाटते. प्रस्तुत पहाणीतील स्त्रियांच्या १०९६ मुलामुलींच्या संख्येत मुलींचे प्रमाण कमी असले तरी अ गटात चार शहरांतील सरासरीपेक्षा बरीच अधिक व ब गटात काहीशी पण अधिकच आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये मुलामुलींची संख्या व त्यांची जन्मतारीख असा प्रश्न विचारिला होता. त्यानुसार हे प्रमाण काढण्यात आले आहे. अ गटातील स्त्रियांचे अधिकात अधिक वय ५८ व ब गटातील स्त्रियांचे ८२ असल्यामुळे, त्यांच्या मुलामुलींच्या वयांत १ पासून ३२ पर्यंत फरक आढळून येतो. मुलांचे सरासरी वय ९.१८ व मुलींचे सरासरी ९.६८ असून दोघांची सरासरी ९.५२ येते. ह्यावरून दोन निष्कर्ष निघतात. एक, ही पिढी बालपणी येणाऱ्या जीवनातील धोक्यातून वाचली आहे व दुसरा निष्कर्ष म्हणजे मध्यमवर्गीय मुली आपल्याला मुलांच्यापेक्षा रोगप्रतिकारशक्ती अधिक आहे असे दाखवून देतात.

सर्वांत खेदाची गोष्ट म्हणजे गेल्या साठ वर्षांत एकटे केरळ राज्य सोडल्यास अखिल भारतात स्त्रियांचे प्रमाण घटत आहे. पुढील तक्ता हे विधान सत्य आहे असे दाखवून देतो.

**तक्ता ४**

१९०१-७१ च्या दरम्यान दर हजारी पुरुषांच्या प्रमाणाशी
स्त्रियांच्या प्रमाणात झालेला बदल

| राष्ट्र | वर्ष | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९६९ | १९७१ |
| ब्रिटन | १,०६७ | – | – | १,०९१ | – | १,०८० | १०६८ | १०६०* | |
| भारत | ९७२ | ९६४ | ९५५ | ९५० | ९४५ | ९४६ | ९४१ | | ९३२φ |
| महाराष्ट्र | ९७८ | ९६६ | ९५० | ९४७ | ९४९ | ९४१ | ९३६ | | ९३३ |
| केरळ | १,००४ | १,००८ | १,०११ | १,०२२ | १,०२७ | १,०२८ | १,०२२ | | १,०१९ |

*ब्रिटन–ॲन ऑफिशिअल हॅन्डबुक १९७०, पा. ६. φ इंडिया १९६८, पब्लिकेशन्स डिव्हीजन, पा. १९० आणि सेन्सस ऑफ इंडिया पेपर १, १९७१, पा. ३.

'ब्रिटन–अॅन ऑफिशिअल हॅन्डबुक'मध्ये स्त्रीपुरुष विषम प्रमाणाबद्दल म्हटले आहे : "साधारणपणे मुलींच्यापेक्षा ६ टक्क्यांनी अधिक मुलगे जन्माला येतात. परंतु बहुतेक सर्व देशांत–आणि जेव्हापासून नोंद ठेवण्यात आली आहे तेव्हापासून ब्रिटनमध्येही–जन्मतः मृत बालकांचे आणि बहुतेक सर्व वयोमान गटांतील मृत्यूचे प्रमाण हे स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या बाबतीत अधिक असते. त्यामुळे उतार वयातील गटांत आणि एकंदरीत लोकसंख्येतही पुरुषांपेक्षा स्त्रिया संख्येने वरचढ असतात."[२] जरी वरील देशांइतके नसले तरी अखिल भारत व महाराष्ट्रातसुद्धा मुलींच्यापेक्षा मुलेच अधिक जन्मास येतात. आकड्यांत हे विधान मांडावयाचे तर १९६१च्या खानेसुमारीनुसार त्या वर्षी अखिल भारतात ०.६ टक्के व महाराष्ट्रात २.६ टक्के इतके मुलांचे प्रमाण जन्मतः अधिक होते. असे असूनही भारताखेरीज इतर देशांत स्त्रियांची संख्या का अधिक असावी? एक स्पष्टीकरण असे देता येईल की, तुलनात्मकदृष्ट्या औद्योगीकरणामुळे कदाचित पुरुषवर्गाला अपघातासारखे बरेच धोके संभवतात. तसेच समुद्रपर्यटनात, युद्धामध्येही पुरुषवर्गच कामास येतो. उलटपक्षी भारतात स्त्रीवर्गाला जास्त मृत्यूची संभवनीयता आहे. ". . . १९३१ पासून बहुतेक सर्व वयांतील पुरुषांच्या मृत्यूचे प्रमाण घटत असले तरी तसे स्त्रियांच्या बाबतीत दिसून येत नाही. . . . बालवयात मुलांच्यापेक्षा मुलींची अधिक आबाळ होते असे दिसते."[3] ह्यामुळेच कदाचित लाइफ इन्शुअरन्स् कॉर्पोरेशन, भारतीय स्त्रीकडून, ती शालान्त परीक्षा उत्तीर्ण नसल्यास व मिळवती नसल्यास, विम्याचा हप्ता अधिक प्रमाणात घेत असते.

लाइफ् इन्शुअरन्स् कॉर्पोरेशन ऑफ् इंडियाच्या मॅन्युअलमध्ये म्हटले आहे : "... ह्या देशातील बहुसंख्य स्त्रियांच्या बाबतीत त्यांच्या स्वतःच्या आयुष्याचा विमा उतरविण्यात फारसा अर्थ नाही असाच निर्णय घेणे भाग आहे. ज्या अविवाहित स्त्रिया स्वतःच्या उपजीविकेकरिता अर्थार्जन करतात त्यांच्यावर बहुधा कोणीही अवलंबीत नसतात. फक्त त्यांच्या स्वतःच्या वार्धक्याची तरतूद करण्याकरिता विमा उतरविण्याची आवश्यकता असते."[४] पुढे म्हटले आहे, "तुलनात्मकदृष्ट्या पहाता स्त्रियांच्या बाबतीत शारीरिक धोके अधिक असतात आणि त्यातच बाळंतपणातील धोके व स्त्रियांच्या खास रोगांची त्यांत भर पडते. हे शेवटचे पण तितकेच महत्त्वाचे कारण आहे."[५] अशा तऱ्हेने विमायोजनेमध्ये स्त्री व पुरुष ह्यांमध्ये फरक केला जातो. शिवाय स्त्रियांच्या बाबतीत नैतिक जोखीम असल्यामुळेही मुख्यतः स्त्रियांचा विमा उतरविण्याच्या बाबतीत ही प्रतिकूलता असावी.

पन्नास वर्षांपूर्वी भारतीय स्त्रियांचे जे स्थान होते त्यापेक्षा ते स्थान आज उंचावले आहे. शिवाय स्वातंत्र्योत्तर कालात सूतिकागृहांची संख्या वाढविली आहे. खेड्यांत शिक्षित दायांची व्यवस्था केली आहे. त्याकरिता यूनिसेफ संस्थेकडूनही मदत घेतली जाते. इतकी अनुकूल तरतूद करूनही, ". . . १५ ते ३४ च्या प्रसूती-

कालातील पूर्ववयात स्त्रिया बहुसंख्येने मृत्युमुखी पडतात. ही संख्या इतकी मोठी असते की स्त्रीपुरुष प्रमाणात झपाट्याने अंतर वाढत जाते आणि ते अंतर मधल्या अगर उतार वयातसुद्धा भरून निघत नाही. अधिक खेदाची गोष्ट म्हणजे ३५ ते ५४ वयात सर्वसाधारण समजुतीपेक्षा स्त्रिया अधिक प्रमाणात मृत्यू पावतात."[६] खानेसुमारी अधिकाऱ्यांनी स्त्रीपुरुष विषम प्रमाणाबद्दलचे केलेले हे स्पष्टीकरण सत्य असू शकेल. डॉ. मिहलन म्हणतात, "बेकायदेशीर गर्भपात हे मातांच्या मृत्यूचे मुख्य कारण आहे. जर हे प्रमाण शंभर असेल तर ३० ते ५० टक्के मृत्यू अशा गर्भपातामुळे होतात. ह्याखेरीज सरकारच्या आरोग्यविषयक पैशाचा बराच मोठा भाग कृत्रिम उपायांनी गर्भपात करणाऱ्या स्त्रियांसाठी खर्चिला जातो."[७] काहीही असो, ही फार गंभीर परिस्थिती आहे आणि ह्या बाबतीत सरकारने निकडीने लक्ष घालणे आवश्यक आहे.[८]

मध्यमवर्गाच्या शिक्षणाची व रहाणीची पातळी पण वरच्या दर्जाची असल्यामुळे व त्यात मुलासारखे मुलीला वाढविले जात असल्यामुळे शिक्षित कमावत्या स्त्रियांच्या व थोड्या कमी प्रमाणात त्याच वर्गातील न मिळवत्या स्त्रियांच्या मुलींची संख्या, तुलना करिता अधिक दिसून येते (तक्ता ३). स्त्रीसंख्याविषयक अशी ही परिस्थिती आहे.

ह्यापुढे स्त्रीपुरुषांच्या वागणुकीत जो फरक आढळून येतो त्याचा आता विचार करू. हॅवलॉक एलिसच्या मते स्त्रियांची मुख्य लक्षणे पुढीलप्रमाणे आढळतात :

१. अधिक संवेदनाक्षमता. त्याची भरपाई अधिक रोगप्रतिकार शक्ती.
२. कमी अनातिरेकी प्रगती म्हणजे अलौकिक बुद्धिमत्ता अगर पराकाष्ठेची अधमता निपजण्याचा संभव कमी.
३. प्राणिशास्त्रीय शक्तिपरिग्रहता आणि शैशव-उत्क्रांतीच्या प्रक्रियेत नेतृत्वाचा अभाव.

स्त्रीत्वदर्शक वरील प्रवृत्ती जरी हॅवलॉक एलिस ह्यांनी दिलेल्या असल्या तरी "मानवातील सर्व प्रवृत्तींवर बाह्य परिस्थितीचा परिणाम होतो हे ते जाणून आहेत."[९] आसपासच्या वातावरणाचे मनुष्याच्या सहजमनोवृत्तींवर संस्कार होतात आणि त्यातल्यात्यात सध्याच्या झपाट्याने बदलत्या जागतिक परिस्थितीचे संस्कार अधिकच होण्याचा संभव आहे.

स्त्रिया ह्या अधिक संवेदनाक्षम असतात. ह्या दृष्टीने कर्मचारी स्त्रिया–अगर मुलीच म्हणणे अधिक बरोबर ठरेल, कारण अगदी तरुण व नुकत्याच नोकरी करू लागल्यामुळे–त्यांच्या विषयी एकदोघा पोक्त अधिकाऱ्यांनी मारलेले शेरे विचारात घेण्यासारखे आहेत : "उशीर झाल्याबद्दल अगर कचेरीतील कामात काही चुका झाल्यास आम्ही रागे भरल्यावर त्या लगेच रडावयास लागतात आणि आम्ही हतबल होतो ! मुलगे असे वागत नाहीत." ह्याचे थोडेसे स्पष्टीकरण असे करता येईल की,

कचेरीत येणाऱ्या मुलींच्या मनावर थोडेफार दडपण असते. मुलीने घरकामात मदत केली पाहिजे अशी इतरांची अपेक्षा असते ही बारिकसारिक न संपणारी कामे आवरून कचेरीत वेळेवर हजर रहावयाचे म्हणजे काहीतरी मानसिक ताण पडतोच. शिवाय मुलींनी नोकरी करणे हे तितकेसे मान्य झालेले नाही. त्यातच भर म्हणजे वाटेतील धोक्यापासून सुरक्षितता असावी म्हणून इतर मुलींची सोबत मिळाली तर त्या पहातात. ह्या सर्व कारणांमुळे उशीर होतो व त्यातच रागावणे ऐकण्याची वेळ आल्यास आवरून धरलेले मन अश्रूवाटे मोकळे होऊ पहाते असे म्हणता येण्या-सारखे आहे. परंतु चारचौघांसमोर रडण्याची सुरवात व्हावी ही भावनाविवशता म्हणावी की त्यांच्या अप्रौढतेमुळे तसे होत असावे? दुसरा मुद्दा स्त्रियांच्या रोगप्रतिकार-क्षमतेबद्दल. भारत सोडल्यास सर्व जगातील स्त्रीपुरुष प्रमाणाचे आकडेच ते विधान सिद्ध करीत आहेत.

अलौकिक बुद्धिमत्ता अगर अत्यंत अधमता स्त्रियांमध्ये आढळत नाही असे हॅवलॉक एलिस ह्यांचे दुसरे विधान आहे. मिशिगन येथील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या मानसशास्त्राच्या सहकारी प्राध्यापिका डॉ. एलिनॉर ई. मॅकोबी यांनी स्त्रियांच्या बुद्धिमत्तेविषयी चर्चा करीत असताना, पुरुषांच्या मानाने स्त्रियांच्या-पासून कमी प्रमाणात ग्रंथनिर्मिती झाली आहे ही गोष्ट मान्य करून त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे : "तो अगर ती जर स्पर्धा करणारी, स्वमताबद्दल आग्रह धरणारी, स्वतंत्र बुद्धिमत्तेची आणि इतर मुलांवर हुकमत गाजवणारी असेल" तर त्या मुलाचा अगर मुलीचा बुद्धिनिर्देशांक पुढील चार वर्षांत वाढत जातो. पुढे त्या म्हणतात, "स्त्रियांची म्हणून समजली जाणारी वैशिष्टये आणि वाढत्या बुद्धिमत्तेस लागणारी वैशिष्टये ही एकच नसतात. फेल्स् येथे जे संशोधन चालले आहे तेथील एका संशोधकांना मी (मॅकोबी) विचारले, "एखादी मुलगी पुढील आयुष्यात बुद्धिमान व्यक्ती म्हणून ठरण्याकरिता कोणत्या प्रकारे तिची वाढ व्हावयास पाहिजे?" त्यांनी उत्तर दिले, "सोप्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ती बालपणी एखाद्या हूड मुलाप्रमाणे वागणारी असावी."[१०] प्रस्तुत विधान वाचल्यानंतर एक सुशिक्षित व वरच्या दर्जाच्या स्त्रीअधिकारी सहज बोलून गेलेल्या त्या शब्दांची आठवण झाली. त्या म्हणाल्या, "लहान असताना की नाही मी शीळ घालीत असे." दुसऱ्या एका प्राध्यापिकेने सांगितले, "मी व माझा भाऊ ह्यांना वागविण्यात आईवडील फरक करीत नसत. लहानपणापासून आम्हाला स्वावलंबी करण्यात आले."

डॉ. मॅकोबी पुढे म्हणतात, "स्त्रीत्वाला साजेशा वागण्याच्या ज्या पद्धती आहेत, त्या अवमानण्यामुळे जो मनावर ताण पडतो त्यामुळे बुद्धिजीवी पेशा घालविणाऱ्या स्त्रियांपासून विशेष ग्रंथादी निर्मिती होत नसावी, असा तर्क करण्याचे मी धाडस करते."[११] समारोपादाखल त्या म्हणतात, "बुद्धिमान मुलीची चपळाई, वरचढपणा, स्वतंत्र गुणवत्ता ह्यांना पुरुषी असे न म्हणता तिला उत्तेजन का देऊ

नये? तसेच विश्लेषणात्मक बुद्धीला जी स्त्रीत्वदर्शक अंगे असतील ती का वाढीस लावू नयेत?"[१२] अर्थोत्पादनाच्या वरच्या पातळीवर त्या अलिकडेस पदार्पण करू लागल्यामुळे स्त्रियांच्यापासून निर्माणक कार्य तितक्या प्रमाणात होत नसावे. त्या पातळीवर चढण्याचा मान त्यांना नुकताच कुठे मिळाला आहे. शिवाय, " प्रौढ ( ३५ च्या वरच्या) स्त्रियांची कार्यनिष्पत्ती अधिक चांगली असते. ४५ ते ६५ वयोमानात त्यांनी कामाचा उच्चांक गाठला आहे. तरुणींच्याकडून कमी काम होऊ शकते."[१३]

यू. एस्. ए. ची तुलना भारताबरोबर केल्यास तो देश फारच प्रगत आहे, विशेषत: शिक्षण आणि प्रत्येक विषयाच्या निरनिराळ्या शाखांचा अभ्यास ह्यांमध्ये तर विशेष आघाडीवर आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. स्वाभाविकपणे अनेक अमेरिकन स्त्रिया बुद्धिजीवी व्यवसायांत शिरल्या आहेत. तशी भारतीय स्त्रियांची स्थिती नाही. येथे साक्षरतेचे प्रमाणसुद्धा मुंगीच्या पावलाने वर सरकत आहे. १९७१ च्या खानेसुमारीप्रमाणे भारतात साक्षर पुरुषांचे प्रमाण शंभरात ५१ आणि स्त्रियांचे शंभरी २६ आहे. महाराष्ट्रात पुरुषांचे प्रमाण शंभरी ५१ आणि स्त्रियांचे शंभरी २६ म्हणजे अखिल भारताइतके आहे.[१४] शाळेत जाण्याच्या वयोमानातील मुलांच्यामध्ये १९६१ साली ९४.६ टक्के व मुलींच्यामध्ये ६०.६६ टक्के साक्षर होते ही समाधानाची गोष्ट आहे. विद्यापीठात प्रवेश करण्यास लागणाऱ्या वयोमानातील मुलांपैकी शेकडा २.७ व मुलींपैकी ०.७ फक्त उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत.[१५] म्हणजे ह्या बाबतीत भारत फार मागे असल्यामुळे फारच थोड्या मुली तैलबुद्धीची चमक दाखवू शकल्या आहेत.

मात्र मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहिल्यास स्त्रियांच्या कर्तृत्वाची साक्ष दृष्टीस पडते. सामाजिक मानवशास्त्राचे आजीव प्राध्यापक जे. एच्.हटन ह्यांनी "मराठ्यां"ची –मराठी भाषा बोलणारे–पुढील शब्दांत स्तुती केली आहे : "सार्वजनिक क्षेत्रांत केलेल्या कामगिरीबद्दल मराठी स्त्रिया प्रसिद्धी पावल्या आहेत."[१६] आजसुद्धा पुढे आलेल्या विदुषींची नावे भारताला घेता येतील.[१७] तसेच शालान्त परीक्षेचे व मुंबई विद्यापीठाचे (१९६७) निकाल स्त्रियांची वरचढच दाखवून देतात (तक्ता २७ व २८ पहा).

मुंबईतील दोन सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या बरोबर ह्या स्त्रियांच्या "कमी विविधते"-बद्दल चर्चा केली होती. त्यांनी ठामपणाने सांगितले "स्त्रियांना समान संधी द्या." शिवाय मुंबई, पुणे व नागपूर येथील स्त्रीडॉक्टरांच्या पाच वेळा निरनिराळ्या ठिकाणी गटाने मुलाखती घेऊन ह्याच मुद्यावर चर्चा केली होती. इतर प्रश्नांबरोबर हा एक सवाल टाकला होता : "मध्यमवर्गाचे आरोग्य आणि आर्थिक स्थिती लक्षात घेता मातृत्व व अर्थार्जन–मग ते स्वतंत्रपणे असो की नोकरीतून असो–ही दुहेरी जबाबदारी आजच्या स्त्रीला उचलता येईल का?" हा प्रश्न विचारून जीवशास्त्र व वैद्यकीयशास्त्र ह्या दोन्ही दृष्टिकोनांतून त्यांचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न

केला. मासिक पाळीमुळे होणाऱ्या त्रासाबद्दलही विचारले होते. ह्या नंतरच्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी पुढीलप्रमाणे दिले : "फारसा त्रास होत नाही. परंतु प्रत्येकीच्या प्रकृतीवर अवलंबून असते."

त्रेपन्न स्त्रीडॉक्टरांनी पहिल्या प्रश्नास निरनिराळी उत्तरे दिली. नुकत्याच पदवीधर झालेल्या दोन डॉक्टरांनी म्हटले : "आम्ही ह्याबद्दल काही बोलत नाही." दुसऱ्या दोघींनी उत्तर दिले "कुटुंबावर परिणाम होतो." अकरा जणी म्हणाल्या, "दोन आघाड्या सांभाळणे स्त्रीला जड जाते." उलटपक्षी चाळीस म्हणजे तीन चतुर्थांश स्त्रीडॉक्टरांनी समर्थक उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "स्त्रीला ह्या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळता येतील पण कुटुंबियांचे, विशेषतः यजमानांचे सहकार्य पाहिजे." अशा तऱ्हेने बहुसंख्य स्त्रीडॉक्टरांनी दुहेरी जबाबदारीविषयक व स्त्रीच्या कार्यक्षमतेबद्दल अनुकूल मत व्यक्त केले. ह्यावर कोणी असा आक्षेप घेईल की ही त्यांची वैयक्तिक मते असल्यामुळे त्याला शास्त्रीय आधार नाही. ह्या आक्षेपाला असे उत्तर की ज्या स्त्रिया–त्यासुद्धा डॉक्टरांसारख्या दगदगीच्या पेशातल्या–त्याच मांडवाखालून जाणाऱ्या, त्यांची ही मते आहेत. जोपर्यंत शास्त्रशुद्ध उलट पुरावा पुढे येत नाही, तोपर्यंत भारतीय स्त्रियांच्यापुरते हे अनुकूल मत स्वीकारण्यास हरकत नाही. मातृत्व आणि अर्थार्जन अगर इतर व्यवसाय ह्यांची सांगड घालण्याची पात्रता मान्य केली तरी त्याचे काही दूरगामी परिणाम होतात का आणि होत असल्यास त्यावर उपाय कोणते ह्याचा विचार उपसंहारात केला आहे.

हॅवलॉक एलिस ह्यांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या मुद्यावर वरीलप्रमाणे चर्चा केल्यानंतर त्यांचा तिसरा मुद्दा "अप्रौढत्व–नेतृत्वाचा अभाव" ह्यावर विवेचन करणे अप्रस्तुत ठरेल. 'वुइमेन अँड सायंटिफिक प्रोफेशनस्' ह्या विषयावर भरलेल्या यू. एस्. येथील राष्ट्रीय परिषदेमध्ये प्राध्यापक बी. बेटलहेम समारोप करताना म्हणतात : "मानवतेपुढे असलेला आजचा पेचप्रसंग सोडविण्यासाठी जे विशिष्ट कार्य करावयाचे आहे त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. तसे अवधान देऊन कार्य घडवून आणण्याकरिता स्त्रीत्व व पुरुषत्वदर्शक प्रवृत्तींचा समन्वय घडवून येणे अवश्य आहे हे आपण बुद्धिपुरस्सर मान्य केले पाहिजे."[१८] ह्या म्हणण्याला वर उल्लेखिलेल्या स्त्री डॉक्टरांच्या मतांची जोड दिल्यास, ज्या स्त्रियांच्यात पात्रता आहे त्यांना संधी देणे आणि त्यांच्यातील उत्तम गुणांचा समाजाला फायदा मिळू देणे हेच ध्येय ठरेल.

भारत हा विशाल खंड असून त्यात अनेक धर्म व पंथ आहेत. राष्ट्र ह्या नात्याने भारतात धर्मातीततेचे धोरण मान्य केले आहे. परंतु त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्मानुसार आचरण करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. (भारतीय घटना–कलम २५).

धर्मानुसार लोकसंख्येची विभागणी केल्यास हिंदुधर्मीय बहुसंख्येने आहेत– भारतात ८९ टक्के, महाराष्ट्रात ८३ टक्के आणि त्यातील पहाणीसाठी निवडलेल्या

चार शहरांत ७० टक्के. प्रस्तुत पहाणीनुसार १५३४ अर्थार्जन करणाऱ्या अ गटातील स्त्रियांपैकी ८९ टक्के हिंदू आहेत (तक्ता ५). प्रत्येक धर्माचा जीवनविषयक दृष्टिकोन कसकसा आहे आणि त्या दृष्टिकोनाचा स्त्रियांच्या स्थानावर कोणता परिणाम होतो हे विचारात घेण्यासारखे असल्यामुळे प्रश्नपत्रिकेत धर्मविषयक प्रश्न विचारला होता.

असतो मा सद्‌गमय,
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्मामृतं गमय॥
—बृहराण्यकोपनिषद् १.३.२८

हिंदू अशी प्रार्थना करीत असतो. जीवनातील परमोच्च ध्येय म्हणजे मोक्ष—आत्मसाक्षात्कार—ह्याबद्दल जरी हिंदुधर्माचा कटाक्ष असला तरी गृहस्थाश्रमाला, हिंदुधर्माने तितकेच उचलून धरले आहे. मनुष्यप्राण्याने चारी आश्रमांतून व्यवस्थितपणे जीवन घालविल्यास त्यास अंतिम साध्य अखेरीस प्राप्त होईल. "याज्ञवल्क्यांच्या शब्दांत सांगावयाचे तर आत्मसाक्षात्काराला जे जे पोषक आहे त्यालाच फक्त किंमत आहे."[१९] स्त्रिया आणि पुरुष ह्या उभयतांना हे साध्य मिळवावयाचे आहे. तेथे कसलाच भेद नाही. म्हणूनच वैदिक काळात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचा मान होता. नंतरच्या काळात ती त्या स्थानावरून खाली घसरली ही गोष्ट निराळी.

हरएक धार्मिक विधी दाम्पत्याने करावयाचा असतो. ऋग्वेदात म्हटले आहे, "सोमवल्लीचा रस दाम्पत्याने पूर्ण अवधान देऊन पिळून काढावा, त्यात दुधाचे मिश्रण करावे आणि ते पेय स्तुतीपर मंत्रांनी देवांना अर्पण करावे."[२०] अजूनही सर्व प्रकारचे धार्मिक विधी करण्यास दाम्पत्याची जरुरी असते. कन्यादानालासुद्धा आई अगर वडील नसल्यास दुसऱ्या कोणत्या तरी नात्यातील दाम्पत्याने ते करावयाचे असते. डॉ. राधाकृष्णन् म्हणतात, "स्त्रीला हिंदुधर्मीय मानाचे स्थान देतो. आपल्या हरएक कार्यात स्त्री ही जोडीदारीण असल्यामळे तिला सहधर्मीणी म्हणतात."[२१] जोडीदारीण पण त्याचबरोबर एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिचे जे स्थान आहे ते तक्ता ५ वरून विशद होते.

ह्या तक्त्यावर विवेचन करण्यापूर्वी ख्रिश्चन व मुसलमान धर्मांच्या जीवनविषयक आणि विशेषतः स्त्रीकडे पहाण्याच्या दृष्टिकोनाविषयी थोडक्यात परामर्ष घेऊ या. "ईश्वर आणि मनुष्यमात्र ह्यांवर प्रेम करणारे जीवन घालवावे असा आदेश ख्रिश्चन धर्माच्या आद्य शिकवणीतून मानवतेला देण्यात आला आहे. मनष्यमात्रावरील प्रेमात ईश्वरभक्ती सामावलेली आहे."[२२] अशातऱ्हेने ईश्वराची लेकरे म्हणून मानवतेवर प्रेम करणे हा ख्रिश्चन धर्माचा पाया आहे. रुग्ण आणि गरजवंत ह्यांची सेवा करणे ह्यामध्ये मानवतेवरील प्रेमाचे व्यवहारी स्वरूप दिसून येते. ". . गरजवंतांचे ऋण आणि संपत्तीच्या मालकीहक्कविषयक सर्वसाधारण विश्वस्तपणाचा भाव ह्यांना ख्रिश्चन धर्माने आजपर्यंत टिकवून धरले आहे आणि ख्रिश्चन धर्मगुरूंच्या बाबतीत

ती तत्त्वे समाजशास्त्रीयदृष्टचा सार्वजनिक संस्थेच्या स्वरूपात चालत आली आहेत."[२३]

स्त्रीबद्दल तो धर्म म्हणतो, "प्रभूने पुरुषाची एक फासळी काढून त्यातून स्त्री निर्माण केली आणि तिला पुरुषाजवळ आणली."[२४] अशा तऱ्हेने ख्रिश्चन धर्मानुसार पुरुषाच्या हाडामासातून स्त्रीचा जन्म झाला आहे. ज्याअर्थी स्त्री ही पुरुषामधून उत्पन्न केली आहे त्याअर्थी ते उभयता समान आहेत अगर स्त्रीचे स्थान दुय्यम आहे. दोन्ही दृष्टचा वरील बायबलातील वचनाचा अर्थ लावता येईल.

प्रस्तुत पहाणीमध्ये ख्रिश्चनधर्मीय स्त्रिया पाच टक्के असल्यामुळे त्यांचा उल्लेख दुसऱ्या क्रमांकामध्ये केला आहे. परंतु अखिल भारतात, महाराष्ट्रात व चार शहरांत मिळून ख्रिश्चन धर्मीयांचे प्रमाण अनुक्रमं १.३५ टक्के, २.४४ व ६ टक्के असून धर्मानुसार त्यांचा क्रमांक लोकसंख्येत तिसरा लागतो. ह्यावरून ख्रिश्चन लोक शहरी जीवन पसंत करतात असे दिसते.

तिसरा अनुक्रम मुसलमान स्त्रियांचा लागतो. अरबी भाषेमध्ये इस्लाम शब्दाचा अर्थ "ईश्वरेच्छा शिरसावंद्य"[२५] असा आहे. परंतु 'एन्सायक्लोपिडीया ऑफ् रिलीजन् अँन्ड एथिकस्'मध्ये "ईश्वरी इच्छा पूर्णतया शिरसावंद्य ह्या नैतिक कल्पनेभोवती असलेली रमणीयता बहुतांशी इस्लाममधून . . . नष्ट झाली असून मुख्यत: धर्माच्या बाह्यांगावर व कायदेशीर भागावर भर दिला जातो"[२६] असे म्हटले आहे. मुसलमानी जगतात सुरू झालेल्या सुधारणा चळवळीविषयी एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकामध्ये असे म्हटले आहे की, "बहुजन समाजावर त्याचप्रमाणे युरोपियन प्रभावाखाली आलेल्या सुशिक्षित लोकांना वगळल्यास इतर बहुतेक सामान्य व सुशिक्षित लोकांवर सनातनी परंपरेचा अजूनही पगडा आहे."[२७] वरवर पहाता तुर्कस्थानात सुधारणेचे वारे वहात आहेत खरे, परंतु स्पष्ट बोलावयाचे झाल्यास जरा मंदगतीनेच. मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण ह्यात स्त्रियांसंबंधी पुरुषांना उद्देशून म्हटले आहे: "ज्या देवाच्या नावे तुम्ही परस्पर सहकार्य अपेक्षिता त्या देवाला भिऊन वागा —आणि ज्या मातांनी तुम्हाला नऊ महिने उदरात वाळगिले होते त्यांना मान द्या."[२८]

अशा तऱ्हेने प्रेषित महंमदाने आपल्या अनुयायांना वरील प्रकारची आज्ञा दिलेली असली आणि "इस्लाम धर्माने पत्नीला हुंडा म्हणून योग्य ती रक्कम द्यावी अशी कायदेशीर तरतूद केलेली असली"[२९] आणि शिवाय मुलीला मुलाच्या निम्मा हिस्सा पित्याच्या मालमत्तेतून मिळावा ही व्यवस्था असली तरी "कुराणामध्ये स्त्रियांच्यापेक्षा पुरुष एका अंशाने श्रेष्ठ आहेत असेच म्हटले आहे. हा श्रेष्ठपणा घरगुती व राजकीय अशा उभय क्षेत्रांत देण्यात आला आहे."[३०]

धर्माचा जीवनावर कसा परिणाम होतो हे तक्ता ५ वरून दिसून येईल. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आणि प्रस्तुत पहाणीनुसारही अर्थार्जन करणाऱ्या मुसलमानी स्त्रियांचे प्रमाण फार कमी आढळते. महाराष्ट्रात मुसलमानांची संख्या ७.६ टक्के आहे पण अवघ्या २.९ टक्के सुशिक्षित अर्थार्जन करणाऱ्या स्त्रिया आढळल्या.

## तक्ता ५

### धर्म आणि अर्थार्जन करण्याचा उद्देश ह्यांसहित गट अ मधील स्त्रियांची संख्या

| धर्म | संख्या | टक्केवारी | | | | | अर्थार्जनाचा उद्देश | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पहाणी | चारशहरे | महाराष्ट्र | भारत | भारत (१९७१) | कुटुंबाच्या पोषणासाठी सर्वस्वी | | कुटुंबाच्या पोषणासाठी काही अंशी | | स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी | |
| | | | | | | | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| हिंदू | १,३६८ | ८९.१७ | ७०.४५ | ८३.५१ | ८९.५० | ८२.७२ | १०५ | ७.५६ | ११२२ | ८२.३ | १४१ | १०.१४ |
| ख्रिश्चन | ७९ | ५.११ | ६.०० | २.४४ | १.३५ | २.६० | २९ | ३६.७० | ३४ | ४३.१ | १६ | २०.२० |
| मुसलमान | ४५ | ३.०० | ११.९३ | १०.६९ | ७.६१ | ११.२१ | ९ | २०.५० | २९ | ६३.६ | ७ | १५.९० |
| जैन | २२ | १.४० | ३.१५ | .४६ | १.०६ | ०.४७ | ५ | २३.५० | १२ | ५३.० | ५ | २३.५० |
| झोरास्ट्रियन | १५ | १.०० | — | — | — | — | ३ | २०.०० | २ | १३.४ | १० | ६६.६० |
| इतर(४ ज्यू व एक बुद्ध) | ५ | ०.३२ | — | — | — | — | — | — | ४ | ८०.० | १ | २०.०० |
| | १,५३४ | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १५१ | ९.७० | १,२०३ | ७८.७३ | १८० | ११.६७ |

### आंतर्धर्मीय विवाह

| पतीचा धर्म → / पत्नीचा धर्म ↓ | हिं. | ख्रि. | मु. | जै. | झो. | बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|
| हिं. | ψ | १ | ३ | — | — | ४ |
| ख्रि. | — | ψ | — | — | — | — |
| मु. | १ | — | ψ | — | — | १ |
| जै. | — | — | — | ψ | — | — |
| झो. | — | — | १ | — | ψ | १ |
| | १ | १ | ४ | — | — | ६ |

पहाणीनुसार शंभर स्त्रियांमध्ये जैन व झोरास्ट्रियन फक्त १.४ व १ ह्या प्रमाणात असल्यामुळे आणि चार ज्यू व एक बुद्धधर्मीय कर्मचारी स्त्री असल्यामुळे वरील धर्मासंबंधी अधिक लिहिणे अप्रस्तुत ठरेल. शिवाय हिंदू कायदा जैन व बौद्ध लोकांना लागू पडतो.

१,५३४ कमावत्या स्त्रियांपैकी १,३६८ अथवा ८९.१७ टक्के स्त्रिया हिंदू आहेत. पहाणीसाठी निवडलेल्या चार शहरांत हिंदू लोकांचे प्रमाण ७०.४ टक्के आहे. तेव्हा हिंदू स्त्रिया अधिक प्रमाणात शिक्षण घेऊन अर्थार्जन करतात आणि त्या ८९.१७ टक्क्यांपैकी ८२.३ टक्के कुटुंबाच्या निर्वाहासाठी 'काही अंशी' द्रव्यार्जन करीत असतात. "आपण अंशतः–किंवा मुळीच नाही–कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविता काय?" ह्या प्रश्नाला हिंदू स्त्रियांपैकी ७.५६ टक्के महिलांनी 'सर्वस्वी' असे उत्तर दिले. त्या ह्या ७.५६ टक्के महिला एकतर अविवाहित, विधवा, घटस्फोटित अथवा परित्यक्ता आहेत. ८२.३ टक्के 'काही अंशी' कुटुंबाला हातभार लावतात. ह्यात बहुतेक विवाहित स्त्रिया समाविष्ट आहेत. उरलेल्या १० टक्के स्वतःसाठीच व्यवसाय करीत असतात. ह्यावरून हिंदू स्त्रिया मुख्यतः कुटुंबासाठी नोकरी अगर व्यवसायाची धडपड करतात असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

ख्रिश्चन लोकांत अविभक्त कुटुंबपद्धती आढळत नाही. एखाद्या ख्रिश्चन स्त्रीवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली, तर तिला स्वतःचा व मुलाबाळांचा उदरनिर्वाह चालवावा लागतो. म्हणूनच कुटुंबाचा सर्वस्वी आर्थिक भार उचलावा लागणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ख्रिश्चनांत सर्वांत अधिक सापडते. शिवाय त्यांच्यात अनेक कुमारिका आढळल्या आणि त्यांना स्वतःकरिता अर्थार्जन करावे लागते. बहुतेक स्त्रिया परिचारिका आणि शिक्षिका हा व्यवसाय पसंत करतात. आर्तांची सेवा करणे हा ख्रिश्चन धर्माचा आदेश आहे.

अजूनही काही मुसलमान स्त्रिया पडदानशीन असतात. फेब्रुआरी १९६७ मध्ये झालेल्या निवडणुकांच्या वेळी हे विशेषतः लक्षात आले. त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला, पण मत दिले ते बुरखा पांघरूनच! विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात–स्त्रीविमोचनाच्या काळात–स्त्री जर पडद्यात राहिली तर ती मतदानाचा आपला हक्क कितपत स्वतंत्रपणे बजावू शकते, हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. "आपल्या राजकीय हक्काची कितपत बजावणी केलीत ?"* असा एक प्रश्न प्रश्नपत्रिकेत विचारला होता. शिवाय प्रस्तुत पहाणीमध्ये मुसलमान स्त्रियांच्या स्थानावर एका प्रश्नरूपाने अप्रत्यक्ष प्रकाश टाकण्यात आला होता. "विवाह करण्याची तुमची इच्छा असल्यास तुम्ही काही अटी घालू इच्छिता का?" सर्वांनी एकच उत्तर दिले : "विवाह जमविण्यात काहीच बोलता येत नाही. वडील मंडळी ठरवतील ते खरे."

जैन व पारशी जमाती ह्या बहुतेक सधन जमाती आहेत. उद्योगधंदा व व्यापार

---

*"आपल्या राजकीय हक्कांची कितपत बजावणी केलीत?" असा एक प्रश्न प्रश्नपत्रिकेत विचारला होता. त्याच्यावरील विवेचन पुढे येईल.

हे त्यांचे व्यवसाय. त्यामुळे त्यांच्यातील स्त्रियांना अर्थार्जन करण्याची कमी आवश्यकता आणि तेही कुटुंबाच्या पोषणासाठी. म्हणूनच २३.५ टक्के जैन आणि ६६.६ टक्के पारशी स्त्रिया स्वतःचा उदरनिर्वाह चालविण्याकरिता नोकरी अगर व्यवसाय करतात.

१,५३४ पैकी १,०७२ स्त्रिया विवाहित असून फक्त सहाजणींनीच आंतर-धर्मीय विवाह केले आहेत. ही संख्या फारच लहान असल्यामुळे कोणताही सर्वसामान्य निष्कर्ष काढता येणार नाही. परंतु भिन्नधर्मीय जोडप्यांमध्ये कसे आश्चर्यकारक परस्परमीलन झालेले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. दोन उदाहरणे : उभयता पतिपत्नी सुशिक्षित असून अधिकारी पदावर काम करीत आहेत. पहिल्या उदाहरणात एका हिंदू स्त्रीने ख्रिश्चन अधिकाऱ्याशी विवाह केला आहे. पतिपत्नी आपापल्या धर्माचे पालन करतात, आपापले सण साजरे करतात. मुले मात्र पित्याच्या धर्मा-नुसार ख्रिश्चनधर्मीय समजली जातात. पत्नी इतकी सुसंस्कृत आहे की स्वतःची मुले आणि सावत्र मुलगा ह्यांत मुळीच भेद करीत नाही. सावत्र मुलगा तिला सख्खी आईच समजतो.

दुसरे उदाहरण अधिक चित्तथरारक आहे. एका मुसलमान स्त्रीने हिंदू पतीबरोबर विवाह केला आहे. परंपरेने सासू ही खाष्ट समजली जाते. परंतु प्रस्तुत उदाहरणातील हिंदू सासूने मुसलमान सुनेचा आनंदाने स्वीकार केला आहे. मुलगा इतका आज्ञाधारक आहे, की आई सांगेल तेव्हा घरातील देवपूजा करीत असतो. सूनबाई आपल्या खोलीत धर्मनिष्ठ मुसलमानांच्या रिवाजाप्रमाणे नमाज पढते. ही झाली धर्मपालनाची बाजू. दुसरी बाजू आहाराची. सूनबाई जरी मांसाहारी आहे तरी पतीचे कुटुंब शाकाहारी असल्यामुळे तिनेही तो आहार स्वीकारिला आहे.

डॉ. कानन ह्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय अशा २०० विवाहांचा खास अभ्यास केला आहे. त्यांच्या ह्या अभ्यासानुसार : "आंतरधर्मीय विवाहांच्या बाबतीत सांस्कृतिक फरक पराकोटीचा असला तरी बहुतेक उदाहरणांमध्ये फारशा अडचणी न येता परस्परांचे मीलन झालेले आढळते."[३१] प्रस्तुत पहाणीनुसार ह्या निष्कर्षाला पुष्टीच मिळते. उत्तरदायी स्त्रियांच्या धर्मविषयक बाजूचा विचार केल्यानंतर हिंदू स्त्रियांचे जातीय वर्गीकरण पाहू या.

"हिंदू समाजाची जातींमध्ये गटविभागणी झाली असून जातीनुसार कमीअधिक श्रेष्ठता असते व सामाजिक व्यवहारसंबंध जातीतच चालतात"[३२] अशा तऱ्हेने 'कास्ट, क्लास ॲन्ड ऑक्युपेशन इन इंडिया' ह्या प्रमाण ग्रंथाची सुरवात करून प्रा. घुर्ये जातीय पद्धतीची सहा लक्षणे सांगतात.[३३] हिंदू समाजाची ही जातीय व्यवस्था ब्रिटिश अमदानी अखेरपर्यंत चालू होती. चालू होती असे म्हणावयाचे कारण जातींना ब्रिटिश सरकारने मान्यता दिली होती. जेव्हा भारतीय घटनेच्या शिल्पकारांनी समानता हे मार्गदर्शक तत्त्व म्हणून जाहीर केले आणि जेव्हा भारतवासीयांनी त्यावर आपला शिक्कामोर्तब केला तेव्हाच जातिसंस्थेला आणि तदनुषंगाने असणाऱ्या श्रेष्ठकनिष्ठतेला मूठमाती

दिली. १९५१ व १९६१ च्या खानेसुमारीत जातीनुसार वर्गीकरण केलेले नाही. अशा तऱ्हेने समानतेचे तत्त्व प्रत्यक्षात उतरविले आहे. तथापि त्याचबरोबर अनुसूचित जातींना शिक्षण व नोकरी ह्यांत भारतीय घटनेनुसार खास सवलती देण्यात आल्या असून शतकानुशतकाच्या अन्यायाची भरपाई केली जात आहे.

अखिल भारतात जशी भक्तिमार्गाची चळवळ सुरू झाली तशीच महाराष्ट्रात तेराव्या शतकामध्ये संतशिरोमणी ज्ञानेश्वरांनी सुरू करून अस्पृश्यांसुद्धा सर्वांना जवळ करून मुक्तीचा मार्ग दाखवून दिला. हाच भक्तिमार्ग सोळाव्या व सतराव्या शतकांत संत एकनाथ व संत तुकाराम ह्यांनी पुढे चालविला. गेल्या शतकात न्यायमूर्ती रानडे व सर रामकृष्ण भांडारकर प्रभूतींनी प्रार्थनासमाज स्थापन करून भक्तिमार्गाचे लोण आजतागायत आणून सोडले. स्वातंत्र्योत्तर काळातील तीन पंचवार्षिक योजनांमुळे औद्योगीकरण व त्या अनुषंगाने झालेले नागरीकरण, त्यामुळे "जातिसंस्था अखेरचे निःश्वास सोडीत आहे"[३४] असे ताया झिनकिन म्हणतात. लोकशाही स्वरूपाचे राजकीय वातावरण प्रत्यक्षपणे व जातीयविरोधी कायदे तसेच 'दैवायत्तं कुले जातम्' (कर्ण) ह्या समजुतीचा कमी होत चाललेला प्रभाव, ह्यांच्या अप्रत्यक्ष कारणामुळे जातीय भावना कमी होत गेली आहे, असे ताया झिनकिनचे मत आहे.

प्रा. जे. एच्. हटनच्या मते ". . . भारतात चालत आलेली जातीय पद्धत ही एक

तक्ता ६

हिंदू स्त्रियांचे जातीनुसार वर्गीकरण (गट अ)

| | मुंबई | पुणे | नागपूर | सोलापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ब्राह्मण | ४१२ | १२७ | ६८ | ५३ | ६६० |
| सारस्वत | १८४ | ९ | २ | ४ | १९९ |
| प्रभु | ९८ | ६ | २ | २ | १०८ |
| मराठा | ५० | ८ | २ | १० | ७० |
| भंडारी | १८ | — | — | — | १८ |
| खत्री | १३ | २ | १ | — | १६ |
| सिंधी | ६८ | ४ | — | — | ७२ |
| वैश्य बनिया | ४९ | — | २ | — | ५१ |
| दाक्षिणात्य | ९ | — | — | ६ | १५ |
| पंजाबी | ९ | १ | — | — | १० |
| इतर | ५५ | १३ | ५ | ८ | ८१ |
| जात न दिलेल्या | ५२ | १० | ६ | — | ६८ |
| एकूण हिंदू | १,०१७ | १८० | ८८ | ८३ | १,३६८ |

अद्वितीय घटना आहे, आणि स्थानिक, ऐतिहासिक व विशिष्ट संघातामुळेच केवळ निर्माण झाली असावी."[३५] आज हिंदू समाज प्राचीन कडक ज्ञातिविवाहबद्ध वर्गीकरणातून ज्ञातिरहित समाजाकडे जात आहे. इतर काही प्रेरकशक्तींमुळे गतिशील वर्ग निर्माण होत आहेत. अशा ह्या स्थित्यंतराच्या अवस्थेत ज्ञातिसहित वर्ग असा अभ्यास करणे इष्ट होईल. म्हणून प्रश्नपत्रिकेत 'आपली जात कोणती' असा प्रश्न विचारिला होता.

जेव्हा स्त्रियांना आपली जात लिहिण्यास सांगितली, तेव्हा बऱ्याचजणींनी विशेषतः पदवीधर स्त्रियांनी ती लिहिण्याचे साफ नाकारले. परंतु विशेष आग्रह केल्यानंतर काहीजणींनी आपली जात लिहून दिली. ६८ अगर ५ टक्के स्त्रियांनी मात्र अजिबात उल्लेख केला नाही. ह्या प्रश्नापुरता त्यांनी असहकार करण्याची तीन कारणे संभवतात. एकतर नजरचुकीने अगर, निष्काळजीपणाने लिहिण्याचे राहून गेले असावे. दुसरे कारण असे असावे की खालच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या जातीय स्त्रियांना जातीचा उल्लेख करण्यात कमीपणा वाटत असावा. आणि तिसरे म्हणजे जातीयतेला असलेला त्यांचा विरोध. हे शेवटचे कारण जर असेल आणि ज्याअर्थी १,०३६ हिंदू विवाहांत फक्त २४च आंतरजातीय विवाह झालेले आढळतात[३६] तर "जातीय पद्धती शेवटचे निःश्वास टाकीत आहे" हे वर उल्लेखिलेले ताया झिनकिनचे म्हणणे समर्पक ठरेल का? किंवा डॉ. ए. बी. बोपेगामागे व डॉ. पी. व्ही. वीरराघवन् ह्यांचे विधान : "१०८ लोकांच्या संकलित मतानुसार स्वातंत्र्योत्तर काळात जातीय भेद कमी झाला आहे"[३७] हा निष्कर्ष मान्य करता येईल का?

वरील प्रश्नाचे उत्तर होकारार्थी धरल्यास आंतरजातीय विवाह इतके थोडे–फक्त २.४५ टक्के–का? जातीतल्या जातीत विवाह करण्याची पद्धत अजूनही रूढ नाही का? आणि तेणेकरून जातीयतेला बळकटी येत नाही का? शिवाय 'टाइम्स ऑफ् इंडिया'च्या १७ एप्रिल १९६७ च्या व इतर पत्रांत विचार करावयास लावणारी एक बातमी प्रसिद्ध झाली होती. पुण्यामधील सुभाषनगर येथील 'ब्राह्मण विनामूल्य सेवा मंडळ' दर रविवारी एक "स्वयंवर" कॅम्प उघडणार आहे अशी ती बातमी होती. ब्राह्मणजातीचे सातत्य चालविणे असा त्यामागे उद्देश नसावा काय?

प्रस्तुत पहाणीनुसार आणि सद्यःपरिस्थितीच्या अवलोकनानुसार जातीय भावनेची तीव्रता लोकशाही घटनेने बोथट केली असली तरी ती साफ नष्ट होणे तितकेसे सोपे नाही.

थोड्या स्त्रियांनी आपली पोटजात पण लिहिली आहे पण अशी उदाहरणे कमी असल्यामुळे त्यांचा विचार केलेला नाही. तक्ता ६ कडे नजर टाकल्यास सर्वांत पहिला नंबर ब्राम्हण जातीचा लागतो. ह्यामध्ये चित्तपावन, देशस्थ, कऱ्हाडे व दैवज्ञ अशा मराठी भाषीय आणि नागर, अनावील गुजराथी भाषीय ह्यांचा समावेश केला आहे. प्रा. हटन ब्राह्मण ज्ञातीविषयी म्हणतात : "ह्या वर्णात अनेक जातींचा समावेश होत असून त्यांचा परंपरागत व्यवसाय पौरोहित्याचा आहे. हिंदू समाजाच्या अग्रस्थानी ते गणले जातात."[३८] येथेही ६६०, किंवा ४८.१७ टक्के ब्राह्मण स्त्रिया शिक्षणाच्या

व अर्थार्जनाच्या दृष्टीने आघाडीवर असलेल्या आढळतात.

एकोणिसशे नव्व्याण्णव किंवा १४.५५ टक्के सारस्वत स्त्रियांचा दुसरा क्रमांक लागतो. प्रा. घुर्ये म्हणतात : "मराठी प्रदेशापुरते बोलावयाचे तर इतर ज्ञातीय, सारस्वत ब्राह्मणांना सारस्वत म्हणून ओळखतात. पण सारस्वत स्वतःला शेणवी किंवा सष्टीकर अथवा पेडणेकर असे म्हणवितात. सर्वसाधारणपणे समाज ही एक वेगळी जात मानतो तर ते स्वतःची पोटजात म्हणूनच समजतात."[३९] गुजराती लोकांत सारस्वत हे ब्राह्मणांतच गणले जातात. जर सारस्वत स्त्रिया ब्राह्मणांत जमा केल्या तर वरील तक्त्यानुसार ब्राम्हण स्त्रियांची संख्या ६३ टक्के भरेल.

पाठारे व कायस्थ मिळून प्रभू स्त्रियांची संख्या ८ टक्के होते. प्रभूज्ञातीचे वर्णन प्रा. हटन ह्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे : "पश्चिम भारतातील प्रभू ही लेखकांची जात असून आपण क्षत्रियकुलोत्पन्न आहोत असा त्यांचा दावा आहे व तसा पुरावाही दाखवून देता येतो."[४०] मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासकांना प्रभू लोकांच्या शूरत्वाची साक्ष निराळी पटवून द्यावयास नको. प्रभू स्त्रियांच्या नंतर मराठा स्त्रियांचा अनुक्रम लागतो. 'मराठा' ह्या सदराखाली अनेक पोटजातींचा समावेश होत असून तेही लढाऊ वृत्तीचे आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय वर्णाचे लोक पूर्वीही बुद्धिजीवी असत व आजही ते मुख्यतः तशाच प्रकारचे काम करताना आढळतात.

हिंदू स्त्रियांपैकी सिंधी स्त्रियांची संख्या प्रस्तुत पहाणीत ७२ अगर, ५ टक्के असून तो वर्ग निर्वासित असल्यामुळे मुख्यत्वे मुंबईतच स्थाईक झाला आहे. पाच सिंधी स्त्रिया पुण्यात आढळल्या. त्या अपवादात्मक म्हणता येतील. सिंधी लोकांचा विशिष्ट जीवनविषयक दृष्टिकोन, निराळी वेषभूषा व काही भिन्न चालीरीती ह्यांचा यथावकाश विचार केला जाईल.

एकंदरीने २९ जातींचा उल्लेख सापडला. वर उल्लेखिलेल्या पाच मुख्य जाती वगळल्यास पुढील क्रमांक गुजराती बोलणाऱ्या ५१ वैश्य बनिया स्त्रियांचा लागतो. ह्यावरून असे दिसून येते की व्यापारी वर्गातील स्त्रियाही अर्थार्जन करू लागल्या आहेत. किंवा त्यांना तसे करणे भाग पडत आहे. तक्ता ६ मध्ये दिलेल्या इतर जाती–भंडारी सोडून–म्हणजे प्रादेशिक वर्गवारी आहे. "इतर" ह्या सदराखाली अनुसूचित जातींचा उल्लेख आहे.

प्रा. घुर्ये म्हणतात : ". . . जातीय अमदानीची आमच्यात अजूनही उरलेली सामाजिक अपात्रता म्हणजे अस्पृश्यता."[४१] अस्पृश्यता नष्ट करणे हे तर महात्मा गांधींनी आपल्या जीवनाचे ध्येयच मानले होते. पण अस्पृश्यता नष्ट होण्याची क्रिया फार मंद गतीने चालत आहे. १,३६८ हिंदू स्त्रियांपैकी अवघ्या ९ हरिजन स्त्रिया पुरेसे शिक्षण घेऊन बुद्धिजीवी काम करीत आहेत. ह्यांपैकी ३ हिंदू बुद्ध (सोलापूर), १ बुद्ध, ४ चांभार आणि १ न्हावी अशी वर्गवारी होते. जातीयतेच्या दृष्टीने आंतरजातीय विवाह दाखविणारा तक्ता ७ अभ्यासण्यासारखा आहे.

## तक्ता ७

आंतरजातीय विवाहांचा क्रमांक, विवाह समयीचे वय,
आईवडिलांची संमती/असंमती आणि यशस्वी विवाह

| क्र. | विवाहपूर्व जात | विवाहोत्तर जात | शिक्षण | विवाह समयीचे वय | आईवडिलांची अनुमती (हो / नाही) | यश (हो / नाही) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सारस्वत | को. ब्राह्मण | एस.एस.सी. + | २४ | नाही | हो |
| २ | खत्री | मारवाडी ब्राह्मण | ,, | १६ | ,, | ,, |
| ३ | मराठा | ब्राह्मण | ,, | १६ | ,, | ,, |
| ४ | दैवज्ञ | ब्राह्मण | ,, | २७ | ,, | ,, |
| ५ | महाराष्ट्रीय ब्राह्मण | बंगाली ब्राह्मण | पदवीधर | २३ | ,, | ,, |
| ६ | भाटीया | मारवाडी | ,, + | २१ | ,, | नाही |
| ७ | ब्राह्मण | गुजराती ब्राह्मण | ,, + | १८ | ,, | हो |
| ८ | महार | मराठा | ,, | १९ | हो | हो |
| ९ | चां. का. प्रभू | मराठा | स्पेशल | २४ | ,, | ,, |
| १० | मराठा | पंजाबी | ,, | २९ | ,, | ,, |
| ११ | चां. का. प्रभू | मराठा | एस.एस.सी. | २३ | ,, | ,, |
| १२ | ब्राह्मण | गुजराती बनिया | ,, | २० | ,, | ,, |
| १३ | भंडारी | मराठा | पूर्व पदवी | २७ | ,, | ,, |
| १४ | मराठा | सारस्वत | पदवीधर | २० | ,, | ,, |
| १५ | चां. का. प्रभू | गुजराती ब्राह्मण | ,, + | २७ | ,, | ,, |
| १६ | ,, ,, | भंडारी | ,, | २२ | ,, | ,, |
| १७ | सारस्वत | दैवज्ञ | ,, + | २२ | ,, | ,, |
| १८ | ब्राह्मण | बंगाली | ,, + | २२ | ,, | ,, |

| क्र. | विवाहपूर्व जात | विवाहोत्तर जात | शिक्षण | विवाह समयीचे वय | आईवडिलांची अनुमती (हो नाही) | यश (हो नाही) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | कासार | ब्राह्मण | पदवीधर + | १४ | „ | नाही |
| २० | मराठा | „ | स्पेशल + | २७ | „ | हो |
| २१ | सारस्वत | „ | पदवीधर + | २३ | „ | „ |
| २२ | महाराष्ट्रीय ब्राह्मण | दाक्षिणात्य ब्राह्मण | „ + | २४ | „ | „ |
| २३ | पंजाबी | ब्राह्मण | „ | २० | „ | „ |
| २४ | मराठा | सारस्वत | „ | २९ | नाही | „ |
| | | | ३ स्पेशल<br>८ प. + ६ प.<br>१ पदवीपूर्वा<br>४ एस्.एस्.सी. +<br>२ „ „ | २२.३८ | १६ ८ | २२ २ |

एकंदरीने हिंदू विवाहांपैकी आंतरजातीय विवाह २.२२.

चोवीस आंतरजातीय विवाहांपैकी तेरा ब्राह्मणेतर स्त्रियांनी ब्राह्मण पुरुषांबरोबर लग्न केले. धर्मशास्त्राप्रमाणे असे विवाह शास्त्रसंमत असून त्यांना अनुलोम विवाह म्हणत असत. चार स्त्रियांनी आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीचे वर पसंत केले. ही प्रतिलोम विवाहाची उदाहरणे होत. सात विवाह आंतरप्रादेशिक असून त्यांतील एक अनुलोम विवाह आहे. सोळा उदाहरणांत आईवडिलांची अशा विवाहांना मान्यता होती तर आठ जणींच्या बाबतींत आईवडिलांच्या संमतीविरुद्ध हे विवाह करण्यात आले. विवाहसमयी वधूचे सरासरी वय २२.३८ होते. म्हणजे त्यावेळी त्या पूर्ण वयात आलेल्या होत्या. शिवाय अशा ह्या चोवीस आंतरजातीय विवाहांपैकी २२ किंवा ९१ टक्के विवाह यशस्वी झाले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. डॉ. कानन ह्यांच्या पुढे दिलेल्या निष्कर्षाला ह्यातून पुष्टी मिळते : "जेव्हा इतर परिस्थिती अनुकूल असते तेव्हा धर्मविषयक व जातीविषयक मतभेद विरून जातात."[४२]

येथे १९७२ मध्ये घडवून आणलेल्या एका इष्ट घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. बास्तार ह्या आदिवासी वस्तीजवळ असलेल्या ठिकाणी पंचवार्षिक योजनेमुळे काही इतर प्रांतीय सुशिक्षित व श्रमजीवी लोक गेले होते. १९७१च्या खानेसुमारीनुसार असे उघडकीस आले की ३०० वर आदिवासी मुली माता झाल्या असून त्यांची स्थिती फार अनुकंपनीय आहे. तेव्हा डॉ. बी. डी. शर्मा ह्या जिल्ह्याधिकाऱ्यांनी त्या मुलींना पाचारण केले. त्यांपैकी २०० मुलींचा स्पेशल मॅरेज अॅक्ट खाली देशातील निरनिराळ्या राज्यांतील पुरुषांशी विवाह घडवून आणला.[४३] अधिकारी व्यक्तीने मनात आणल्यास कशी झटपट व दूरगामी सुधारणा करता येते ह्याचे हे एक उदाहरण आहे.

अर्थार्जन करण्याची मध्यमवर्गीय स्त्रियांची प्रवृत्ती ही फक्त मराठी भाषिक स्त्रियांतच आढळत नाही. तक्ता ८ वरून भाषेनुसार पाच गट पडलेले आढळतात.

तक्ता ८

भाषेनुसार चार शहरांतील स्त्रियांची वर्गवारी

| | १९६१ च्या खानेसुमारीनुसार चार शहरांतील स्त्रियांचे प्रमाण | गट अ | | गट ब | अ+ब | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| १ मराठी भाषिक | ७८.०४ | १,२०४ | ७८.४८ | २२९ | १४३३ | ८०.१७ |
| २ गुजराती ,, | ५.०९ | ९९ | ६.४५ | २८ | १२७ | ७.० |
| ३ सिंधी ,, | ३.०७ | ६९ | ४.४९ | – | ६९ | ३.८० |
| ४ इंग्रजी ,, | १.०२ | ५६ | ३.६५ | – | ५६ | ३.०७ |
| ५ इतर ,, | १२.७८ | १०६ | ६.९३ | २ | १०८ | ५.९६ |
| | १००% | १,५३४ | १००% | २५९ | १७९३ | १००% |

१९६१ च्या खानेसुमारीनुसार चार शहरांतील मराठी भाषिक स्त्रियांचे प्रमाण ७८.०४ होते. त्याचप्रमाणे चार शहरांतील १,२०४, किंवा ७८.४८ टक्के अर्थार्जन करणाऱ्या गट अ–स्त्रिया मराठी भाषिक आहेत. तेव्हा प्रस्तुत पहाणी ही भाषेनुसार खरी प्रातिनिधिक स्वरूपाची आहे असे म्हणावयास हरकत नाही. नंतर खानेसुमारीनुसार

गुजराती भाषिकांची संख्या ५.०९ टक्के आहे तर ह्या नमुन्यामध्ये एक टक्के गुजराती भाषिक अधिक आहेत. सिंधी स्त्रियांची टक्केवारी ३.०७ आहे तर पहाणीमध्ये ४.४९ टक्के आहे. लोकसंख्येत अवघ्या एक टक्का स्त्रिया इंग्रजी भाषिक आहेत तर येथे ३.६५ टक्के आढळतात. "इतर" भाषिकांमध्ये विविध भाषांचा समावेश होतो आणि त्या तर संख्येने १२.७८ आहेत. त्यांतील निम्म्यातरी पहाणीखाली येऊन गेल्या आहेत.

भारताच्या दुर्दैवाने धर्मावरून देशात कलह चालू होते व आहेतही. त्यातच जातीजातींतही वैमनस्य आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या नेत्यांची उमेद होती की स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्व भारतीय राष्ट्रीय झेंड्याखाली एक होतील. परंतु त्या आशा अजून सफल झाल्या नाहीत.

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे सध्याची माहिती गोळा करीत असताना व कचेऱ्यांतून हिंडत असताना दुपारच्या जेवणाच्या वेळी भिन्नभाषिक, भिन्नधर्मीय अशा भगिनींमध्ये अगदी खेळीमेळीचे वातावरण आढळून आले.

ह्या प्रकरणात दिलेल्या माहितीनुसार असे दिसून येते की स्त्रीला स्त्री म्हणून काही शारीरिक धोके असतात. बाकी इतर परिस्थिती अनुकूल आहे.

### संदर्भ


१. इंपॅक्ट ऑफ सायन्स ऑन सोसायटी–यूनेस्को व्हॉल्यूम् xxi नं. १, पा. ५५, ७३.
२. ब्रिटन–ॲन् ऑफिशिअल् ह्यॅन्डबुक (१९६६ आवृत्ती), पा. ११.
३. सेन्सस् ऑफ् इंडिया–१९६२ चा पेपर नं. १, पा. xvii.
४. लाइफ् इन्शुअरन्स कॉर्पोरेशन् ऑफ् इंडिया मॅन्युअल् फॉर् एजन्टस्, (चौथी आवृत्ती, एप्रिल १९६५), पा. १९.
५. त्यातूनच पा. २०.
६. सेन्सस् ऑफ् इंडिया, पेपर नं. १, १९६२, पा. xvii.
७. फिफ्थ वर्ल्ड कॉन्फरन्स् ऑफ् गायनाकॉलॉजी व ऑबस्टेस्ट्रीकस्, "फ्रिक्वेन्सी ॲन्ड् मॉरटॅलिटी रेट असोसिएटेड् वुइथ इंडयुस्ड ॲबॉर्शन्स् ऑन ए ग्लोबल स्केल", (ॲन् असेसमेंट).
८. १९५० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या न्यूयॉर्क येथे भरलेल्या सभेत स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यवहाराकरिता चाललेल्या व्यापारावर बंदी घालण्याचा ठराव पास केला व त्यावर भारताची सही आहे. पुढे १९५६मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने तशा प्रकारचा कायदा केला. तो १९५८मध्ये अंमलात

आला. भारताच्या गृहमंत्र्यांच्या कृपेने पोलीस अहवालात नोंद झालेल्या अपहरित स्त्रियांचे आकडे मिळाले आहेत. ते पुढे दिले असून त्यावरून स्त्रियांना कोणते धोके असतात ते दिसून येते.

| वर्ष | नोंद केलेल्यांची संख्या (भारत) | नोंद केलेल्यांची संख्या (मुंबई राज्य) | नोंद केलेल्यांची संख्या (महाराष्ट्र) |
|---|---|---|---|
| १९५३ | ५,२६१ | ६२७ | — |
| १९५४ | ५,५१४ | ६४७ | — |
| १९५५ | ५,५२९ | ६१५ | — |
| १९५६ | ५,९०५ | ७७३ | — |
| १९५७ | ५,८२१ | ७९२ | — |
| १९५८ | ६,०४३ | ७५४ | — |
| १९५९ | ६,४५९ | ७३५ | — |
| १९६० | ६,०२४ | — | ४५४ |
| १९६१ | ६,६९८ | — | ४८२ |
| १९६२ | ७,११९ | — | ४६५ |
| १९६३ | ६,९२४ | — | ३३० |
| १९६४ | ८,०५० | — | ५२० |
| १९६५ | ७,९२७ | — | ५६४ |
| १९६६ | ७,८७४ | — | — |
| १९६७ | ८,१९२ | — | — |
| १९६८ | ८.८३० | — | — |

पन्नास वर्षे वयावरील स्त्रियांचे अपहरण होण्याचा संभव नाही असे गृहीत धरल्यास १९६१ च्या खानेसुमारीनुसार अखिल भारतातील स्त्रियांची संख्या १८७,३२१,४६२ होती. म्हणजे एक लक्ष स्त्रियांत चार अगर दर हजारी ०.०४ असे प्रमाणे पडते. अर्थात येवढ्या लहान संख्येमुळे स्त्री-पुरुष प्रमाण फारसे बदलणे शक्य नाही.

परंतु त्याचबरोबर हे लक्षात घेतले पाहिजे की समाजाची, लोकनिंदेची भीती व लज्जा ह्या कारणांमुळे सर्वच अपहरित स्त्रियांची माहिती दिली जात नसावी असाही संभव आहे.

वरील माहितीनुसार भारतात व महाराष्ट्रातसुद्धा ही संख्या वाढत आहे हे स्त्रियांनी स्वतः व सरकारनेही लक्षात घेण्यासारखे आहे.

९. व्हाओला क्लीन, फेमिनाईन कॅरॅक्टर, (१९४६), पा. ५०.
१०. एम्. फार्बर अॅन्ड आर्. एच्. एल्. वुइल्सन, दी पोटेन्शअल् ऑफ् वुमन् (१९६३), पा. ३३.
११. „ „ „ पा. ३३.
१२. ई. ई. मॅकोबी, वुमनस् इंटलेक्ट, पा. ३३.
१३. त्याच ग्रंथातून, पा. ३८.
१४. बुलेटिन २८५ ऑफ् यू. एस्. डिपार्टमेंट ऑफ् लेबर, हॅन्डबुक ऑफ् वुइमेन् वर्करस्, (१९६३), पा. ३७.
१५. सेन्सस् ऑफ् इंडिया पेपर i, १९७१, पा. २.
१६. जे. एच्. हटन, कास्ट इन् इंडिया (१९६३), पा. २०.
१७. मेन ऑफ् सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी इन् इंडिया (डिस्टिंगवुइशिड् हूज् हू), (१९६४).
१८. "वुइमेन अॅन्ड द सायन्टिफिक प्रोफेशन्स्", दी एम्. आय्. टी. सिम्पोझिअम् ऑन् अमेरिकन वुइमन इन् सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग, पा. ८.
१९. एस्. राधाकृष्णन्, दी हिंदू व्ह्यू ऑफ् लाइफ् (१९६६), पा. ४५.
२०. ऋग्वेद, viii, ३१-३.
२१. एस्. राधाकृष्णन्, दी हिंदू व्ह्यू ऑफ् लाइफ्, पा. ६३.
२२. एन्सायक्लोपीडिया ऑफ् सोशल सायन्सिस् व्हॉल्यूम् vii, पा. ३३८.
२३. „ „ „ पा. ४५३.
२४. द होली बायबल, ओल्ड टेस्टामेंट, प्र. २, पा. २२.
२५. एम्. एम्. सिद्दीक, वुमन इन् इस्लाम, पा. ५३.
२६. एन्सायक्लोपीडिया ऑफ् रिलीजन अॅन्ड एथिक्स्, (१९४०), व्हॉल्यूम् vii, पा. ४३८.
२७. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका (१९५५), व्हॉल्यूम् xi, पा. ७०८.
२८. जे. एम्. रॉडवेल, द कुराण, ट्रान्स्लेटेड् फ्रॉम अरेबिक, पा. ४१०.
२९. एम्. एम्. सिद्दीक, वुमन इन् इस्लाम, पा. ५३.
३०. „ „ पा. २३.
३१. सी. टी. कानन्, इंटरकास्ट अॅन्ड इंटरकम्यूनिटी मॅरेजिस् इन इंडिया, पा. १७६.
३२. जी. एस्. घुर्ये, कास्ट, क्लास अॅन्ड ऑक्युपेशन इन् इंडिया (१९६२), पा. १.
३३. „ „ „ पा. २.
३४. ताया झिन्किन्, कास्ट टुडे (१९६२), पा. ६९.
३५. जे. एच्. हटन, कास्ट इन् इंडिया, पा. १२.

३६. तक्ता ७ पहा.
३७. ए. बोपेगामागे अॅन्ड पी. व्ही. वीरराघवन्, स्टेटस् इमेजिस् इन् चेंजिग इंडिया (१९६७), पा. १७४.
३८. जे. एच्. हटन, कास्ट इन् इंडिया, पा. १२.
३९. जी. एस्. घुर्ये, कास्ट, क्लास अॅन्ड ऑक्युपेशन इन् इंडिया, पा. १९.
४०. जे. एच्. हटन, कास्ट इन् इंडिया, पा. २८०.
४१. जी. एस्. घुर्ये, का. क्ला. अॅ. ऑ. इ. इं., पा. २३६.
४२. सी. टी. कानन्, इं. अॅ. इं. मॅ. इ. इं., पा. १८४.
४३. दी. इलस्ट्रेटेड विक्ली ऑफ इंडिया, व्हॉ. xciii २३, जून ४, १९७२.

## प्रकरण २ रे

# विवाहविषयक स्थिती

समाजशास्त्रज्ञ वेस्टरमार्क विवाहाची पुढीलप्रमाणे व्याख्या करितात: "वंशवृद्धीपलीकडे कमीअधिक काल टिकणारा नरमादीचा समागम. ही निसर्गाच्या भूमिकेवरून केलेली व्याख्या. सामाजिक दृष्टचा रूढी व कायद्यांच्या बंधनांनी युक्त स्त्रीपुरुषमीलन."[1] हिंदू विवाह कायद्याप्रमाणे: "(१) हिंदू विवाह हा वरवधूपैकी एकाच्या रूढीनुसार केलेल्या विधींनी व समारंभांनी साजरा करता येतो. (२) ज्यांच्या रूढीमध्ये सप्तपदीची (अग्नीभोवती वर आणि वधू ह्यांनी मिळून सात पावले टाकावयाची असतात त्यास सप्तपदी म्हणतात) चाल आहे त्या विधीत जेव्हा सातवे पाऊल टाकले जाते तेव्हा तो विवाहविधी पुरा होतो आणि परस्परांना बंधनकारक असतो."[2] अशा तऱ्हेने रूढी व कायद्यांनी नियंत्रित केलेली विवाहसंस्था आजवर चालत आली आहे. प्रा. हॉबहाऊस म्हणतात: "विवाहसंस्था ही सर्वत्र आढळते. स्त्रीपुरुष-संबंध रूढीने नियंत्रित केले नसावे हे असंभवनीय आहे."[3] हे स्वाभाविक सत्य आहे. कारण वंशसातत्य टिकविण्याची आणि प्रजेची योग्य जोपासना करण्याची समाजाने खबरदारी घेतलीच पाहिजे.

निरनिराळ्या संस्कृतीमध्ये विवाहविषयक रूढी, नियम व बंधने ही वेगवेगळी असतात. भारतामध्ये वेगवेगळ्या धर्मांच्या प्रमाणग्रंथांनुसार वैवाहिक संबंध निश्चित केलेले आहेत आणि त्याला व्यक्तिगत कायदा म्हणतात. प्रस्तुत ठिकाणी हिंदू, ख्रिश्चन व मुसलमान रूढी व कायदे ह्यांचाच फक्त विचार केला जाईल. कारण ह्या तीन धर्मांचे मिळून बहुसंख्य लोक आहेत.

हिंदू समाजाने विवाहसंस्थाविषयक परंपरागत रूढी व कायद्यांमध्ये विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात काही उल्लेखनीय असे महत्त्वाचे बदल केले आहेत. बौद्ध, जैन, लिंगायत आणि शीख आदीकरून सर्व हिंदूंना लागू होणारा असा १९५५ चा हिंदू विवाहकायदा हा अगदी अलिकडील आहे. १९५५ पूर्वीही थोडेफार फरक करणारे कायदे पास झाले होते. परंतु १९५५ चा कायदा पूर्वीच्या कायद्यांना रद्द करतो. शिवाय तो फार व्यापक आहे आणि तदनुसार विवाहाची नोंद करणे सक्तीचे आहे. वरवधूचे किमान वय निश्चित केले असून पहिल्या पत्नीच्या हयातीत दुसरी पत्नी करता येत नाही. विवाहविच्छेदाची व पतिपत्नीला विभक्त होण्याची तरतूद केलेली आहे. सगोत्र व आंतरजातीय विवाहांना परवानगी दिल्यामुळे वधूवर पसंतीचे क्षेत्र अधिक झाले आहे. भारतातील बहुसंख्य म्हणजे ९०.६७ टक्के लोकांना हा कायदा लागू

होतो असे असूनही १९६७ च्या नोव्हेंबरमध्ये हिंदू विवाह (तामिलनाड दुरुस्ती) कायदा पास केला. त्या कायद्याने "नातेवाईक, मित्र अगर इतर मंडळी ह्यांच्या समोर कोणत्याही दोन स्त्री पुरुषांनी (अ) पती आणि पत्नी हे नाते जाहीर करून किंवा (ब) एकमेकांच्या गळयांत हार अगर बोटात अंगठी घालून किंवा (क) 'ताली' बांधून विवाह करता येतो." प्रस्तुत कायद्यानुसार पुरोहिताच्या मंत्राची जरुरी उरली नाही किंवा १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यानुसार नोंदणी करण्याची आवश्यकता नाही![४]

ख्रिश्चन जमात ही बाटलेल्या हिंदू व वन्य जमातींतून निर्माण झाली आहे. त्यांपैकी जे कॅथलिक आहेत ते पोपच्या आज्ञेनुसार वागतात. तर प्रॉटेस्टंट व इतर पंथीय त्यांचा दिवाणी कायदा प्रमाण मानतात.

भारतीय मुसलमानांनी आपल्या विवाहसंस्थेत कोणताही बदल केला नाही. फक्त एकच अपवाद सांगता येईल. १९३९ चा मुसलमान विवाहविच्छेद कायदा. ह्या जमातींतील काही विशिष्ट चालीरीतींचा प्रसंगोचित विचार केला जाईल.

विवाहादी सर्व सामाजिक संस्थांवर आर्थिक व इतर घटनांचा परिणाम होत असतो. त्यातल्या त्यात स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या उदयामुळे, तिच्या विविध कार्यामुळे—गृहिणी आणि कर्मचारी, शिक्षणामुळे व नागरिकत्वामुळे येणारी जबाबदारी इत्यादी—तिचा दृष्टिकोन बदलला असून पतिपत्नी संबंधावरही परिणाम झाला आहे. सध्याच्या पहाणीत घेतलेल्या स्त्रियांवर व त्यांच्या वैवाहिक जीवनावर तसा परिणाम झाला असल्यास नवल नाही. विवाहसंस्थेची झालेली उत्क्रांती दर्शवून सध्याच्या अगर आदर्श विवाहसंबंधाविषयी प्रा. हॉबहाऊस म्हणतात त्याप्रमाणे : ". . . दोन स्वतंत्र व जबाबदार व्यक्तींचे—परस्परांचे समानहक्क मान्य करणाऱ्यांचे —कोणत्याही तांत्रिक विधींवर न आधारलेले तथापि अत्यंत पवित्र, गाढ मीलन."[५] अशी ही व्यापक स्वरूपाची भागिदारी कितपत दृढ झाली आहे आणि पतिपत्नीचे नाते कितपत "पवित्र" राहिले आहे हे पहावयाचे आहे.

नवव्या तक्त्यावरून सध्याच्या पिढीचा विवाहविषयक दृष्टिकोन दिसून येतो. तो लक्ष वेधून घेण्यासारखा आहे. पूर्वी व अगदी पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत हिंदू मुलींच्या बाबतीत लग्न हे आवश्यक समजले जाई. तथापि ह्या सामान्य नियमाला काही अपवाद आढळतात. बृहदारण्यक उपनिषदांतली गार्गी, महाभारतातील सुलभा, रामायणातील शबरी आणि तेराव्या शतकातील मुक्ताबाई ह्या सर्व कुमारिकाच होत्या. पण मुलीने लग्न करणे कसे क्रमप्राप्त होते हे प्रा. पा. वा. काणे ह्यांनी दाखवून दिले आहे : "शल्यपर्वात (प्रकरण ५२) कुणीगर्गाच्या मुलीची [illegible] कथा आहे. नारदमुनींनी अविवाहित मुलीला स्वर्ग मिळत नाही असे सांगितले तेव्हा तिने एका दिवसाकरिता का होईना, शृंगवतबरोबर लग्न केले आणि नंतर स्वर्गारोहण केले."[६]

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ ग्रंथालय सचिवालय
मुंबई-४०० ०३२.
रजिस्टर नंबर 932
वर्गीकरण नंबर 3[illegible]

**तक्ता ९**

अविवाहित स्त्रियांची धर्मानुसार संख्या, विवाह न करण्याची कारणे, आणि विवाह करावयाचा झाल्यास काही खास अटी

| धर्म | गट | संख्या | अविवाहित | वाग्दत्त | उरलेल्या | विवाह न करण्याची कारणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | इच्छा नाही | कौटुंबिक जबाब-दारी | तत्त्व | आर्थिक कारणे हुंडा | वर मिळ-ण्याची अशक्यता | शारीरिक | न दिलेली |
| हिंदू | "अ" | १,३८९ | ५६५ | २४ | ५४१ | १३४ | ४४ | ४९ | ११ | १७ | ९ | २३ |
| | | १००% | | | ३८.९% | ९.४% | | | | | | |
| | "ब" | २५७ | ५६ | | ५६ | २ | | | | | | २ |
| | | १००% | | | २१.७% | | | | | | | |
| | | १,६४६ | ६२१ | २४ | ५९७ | १३६ | ४४ | ४९ | ११ | १७ | ९ | २५ |
| ख्रिश्चन | "अ" | ७९ | ५० | २ | ४८ | १५ | ७ | २ | | २ | १ | ३ |
| मुसलमान | "अ" | ४५ | ३३ | २ | ३१ | २ | १ | १ | | | | |
| | "ब" | २ | | | | | | | | | | |
| पारशी | "अ" | १५ | १५ | | १५ | | | | | | | |
| इतर | | ६ | २ | | २ | | | | | | | |
| | | १,७९३ | ७२१ | २८ | ६९३ | १५३ | ५२ | ५२ | ११ | १९ | १० | २८ |

तक्ता ९ (पुढे चालू)

| | | उरलेल्या विवाहेच्छु | अटी: अटी नसलेल्या | अटी: अटी असलेल्या | अटी: कमी दर्जाचा | अटी: समान दर्जाचा | अटी: उच्च दर्जाचा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंदू | "अ" | ४०७ | ९१ | ३१६ | ७ | २८ | २८१ |
| | "ब" | ५४ | – | ५४ | – | – | ५४ |
| | | ४६१ | ९१ | ३७० | ७ | २८ | ३३५ |
| ख्रिश्चन | "अ" | ३३ | ९ | २४ | – | १ | २३ |
| मुसलमान | ,, | २९ | ७ | २२ | – | – | २२ |
| पारशी | ,, | १५ | १ | १४ | – | १ | १३ |
| इतर | ,, | २ | – | २ | – | – | २ |
| | | ५४० | १०८ | ४३२ | ७ | ३० | ३९५ |

अटी

| | | धनसंचय अवश्य | धनसंचय अनावश्य | कुल / उच्च/अविभक्त | योग्य व्यक्तिमत्व | उत्तम शील | नोकरीस/ कामास परवानगी | स्वधर्मीय स्वराष्ट्रीय | कलेचा चहाता | चांगला स्वभाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंदू | "अ" | ७८ | १९ | १४ | ५१ | ३६ | ४ | २ | २ | ६ |
| ख्रिश्चन | ,, | ३ | १ | १ | ४ | ३ | १ | १ | १ | – |
| मुसलमान | ,, | ४ | १ | – | ६ | १२ | – | – | १ | – |
| इतर | ,, | ५ | २ | ३ | १ | १ | १ | १ | १ | – |
| | | ९० | २३ | १८ | ६२ | ५२ | ६ | ४ | ५ | ६ |

अशी ही दीर्घकालीन परंपरा असूनही १३८९ गट अ हिंदू स्त्रियांतील ५४१ किंवा ३८.९ टक्के स्त्रिया प्रस्तुत पहाणीच्या वेळी अविवाहित आढळून आल्या. त्यांचे मध्यम (mean) वय २६.८ वर्षे आहे. गट ब मधील ५६ अगर २१.७ टक्के अविवाहित असून मध्यम वय २३.७७ आहे.

मध्यम वयांच्या ह्या आकड्यांवरून विवाहाचे वयोमान नक्कीच वाढलेले दिसून येते! शिवाय ५४१ (५६५ अविवाहित–२४ वाग्दत्त=५४१) पैकी १३४ म्हणजे ९.४ टक्के स्त्रियांना लग्नच करावयाचे नाही! अविवाहितांचे ३८.९ टक्के हे प्रमाण १९४३-४५ मध्ये केलेल्या पहाणीतील १३ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. हा उच्च शिक्षणाचा आणि आर्थिक स्वतंत्रतेचा परिपाक असावा का? का वरपसंतीचे क्षेत्र दिवसेंदिवस ह्या वर्गात तंग होऊ लागले आहे म्हणून? ह्यापेक्षाही काही सखोल कारणे जबाबदार असावीत की ज्याकरिता वैवाहिक सुख त्या नाकारीत असाव्या? का त्यांना कुमारिकेचे जीवन घालविणे भाग पडत आहे?

शिक्षण व तदनुषंगाने आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होण्याची मिळालेली संधी तसेच व्यवसायाबद्दल वाटणारी कळकळ ह्या कारणांनी काही अंशी आधुनिक मुली अविवाहित रहाण्यास उद्युक्त होतात. ब गटात कमी टक्के–२१.७–अविवाहित मुली आढळून आल्या. ह्यावरून वरील कारण सयुक्तिक वाटते. तथापि निश्चित-पणे कोणते घटक कारणीभूत होत असावे हे शोधून काढण्याकरिता, "विवाहाचा संभव नाही, कारण (अ) कौटुंबिक जबाबदाऱ्या, (ब) योग्य वराचा अभाव, (क) आर्थिक कारणे किंवा (ड) तत्त्वासाठी?" असे प्रश्न विचारिले होते आणि त्याना पुढील उत्तरे मिळाली :

विवाह करण्याची इच्छा नसलेल्या १५३ स्त्रियांपैकी २८ जणींनी कारणे दिली नाहीत. दहा जणींच्या पैकी काहींच्या आड शरीरसौष्ठवाचा अभाव तर काहींचे वय बरेच झाले आहे. शिवाय ५२ जणींना तत्त्वासाठी कुमारिका रहावयाचे आहे. ह्यांमध्ये पाच जणी जैनधर्मीय आहेत. विरक्त जीवन घालविण्याचा ह्या धर्माचा विशेष कटाक्ष आहे. तसेच काही डॉक्टरस् व व्यवसायप्रिय महिलांची कौटुंबिक जबाबदारी स्वीकारण्याची तयारी नाही.

एकशेचौतीस अविवाहितांपैकी जेव्हा दुसऱ्या ५२, अगर ३८ टक्के स्त्रियांची विवाह न करण्याची कारणे लक्षात घेतल्यास त्यांचे साभिमान कौतुक करावेसे वाटते. वडील मुलगा ज्याप्रमाणे पिता गेल्यास अगर सेवानिवृत्त झाल्यास सर्व कुटुंबाचे पोषण, लहान भावंडांचे शिक्षण वगैरे आर्थिक जबाबदारी उचलतो त्याप्रमाणे ह्या बावन्न जणींनी कुटुंबाची जबाबदारी उचलली आहे. सध्याच्या वाढत्या महागाईच्या दिवसांत मध्यमवर्गीय लोकांना वृद्धापकाळची फारशी तरतूद करता येत नाही. विशेष हे की आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असते. कारण बौद्धिक व्यवसाय थोडे आणि त्यांत वाढती तीव्र

चुरस. जर मुलगा अगर मुलगी ह्यांपैकी एकालाच उच्च शिक्षण देता येईल असा पेच आईबापांना पडला तर बहुधा मुलाच्या शिक्षणासाठी मुलीचे शिक्षण बाजूला टाकले जाते. अशा परिस्थितीत कुटुंबाच्या मदतीला मुली धावून जातात. अर्थार्जनाची मिळेल ती संधी साधून भावंडांच्या शिक्षणाला मदत करून आईवडिलांना काळजीतून सोडवितात. दरम्यान काही वर्षे लोटतात व विवाहाचा काल आणि संधी निसटून जाते. अर्थातच त्यांना एकाकी जीवन घालविण्याची पाळी येते. उतार वयात त्यांच्याकडे दुर्लक्ष होते आणि त्यांना एकएकटे वाटत असते. ह्यातून काही शोकांतिका निर्माण झाल्यास नवल नाही. अशी दोन उदाहरणे आढळून आली. अ गटातील एका ४३ वर्षे वयाच्या प्रौढ स्त्रीने आपली कहाणी सांगितली. वडील लौकरच वारले. तेव्हा ह्या बाईने आपल्या भावाच्या शिक्षणासाठी नोकरी करून पैसा मिळविला. त्याचे आता लग्न झाले असून संसाराचा गाडा सुरळीतपणे चालत आहे. पण ह्या बाईच्या जीवनात पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी कितपत भरून काढता येईल ह्याची शंका आहे. लेखिकेला तरी त्यातून काही मार्ग दाखविणे अशक्य होते. दुसरे उदाहरण ब गटातील ४२ वर्षे वयाच्या एका प्रौढ कुमारिकेचे आहे. त्यातील खेदाची बाजू म्हणजे अशी की ह्या दोघीजणींनी आपणास 'विवाहाची इच्छा आहे' असे नमूद केले आहे! सक्तीने कौमार्य लादलेल्यांचे हे नमुने आहेत! अ गटातील अविवाहितांना बाहेरील कामाचा विरंगुळा आणि आर्थिक स्वातंत्र्याचे समाधान तरी असते. पण ब गटातील कुमारिकांना तेही नसते.

तीस जणींनी योग्य वर मिळत नाही हे कारण सांगितले आहे तर अकरा जणींनी हुंडा आदीकरून आर्थिक कारणे पुढे मांडली आहेत. काहींनी एकापेक्षा अधिक कारणे सांगितली आहेत; त्यांचा विचार पुढे करण्यात येईल.

एकंदरीत अ गटात हिंदू स्त्रियांची संख्या १३९१ व ब गटात २५७ आहे. त्यांतील अनुक्रमे ५४१ व ५६ अविवाहित. त्यांपैकी ४०७ किंवा २९ टक्के व ५६ किंवा २१ टक्के अविवाहितांना विवाह करण्याची इच्छा आहे. ही इच्छा स्वाभाविक असली तरी २३ टक्के मुलींना कोणतीही लग्नसंबंधी अट घालण्याची इच्छा नाही. मध्यमवर्गातील शिक्षित कुमारिका ह्या महत्त्वाच्या बाबतीत कशा असहाय आहेत हे नाही का यावरून दिसून येत? मात्र हा लग्नाचा विषय काढल्यावर एक प्रकारचे आनंदी वातावरण निर्माण होई. सहजच आहे ते. विवाह होणार ही नुस्ती कल्पनाच त्यांना सुखद वाटे. मात्र वरपसंतीच्या आपण काही अटी घालाव्या हे निरुपयोगी आहे असा त्यांचा रोख होता. विवाह जमविण्याचे काम वडील मंडळी करतात आणि त्यात जात, पत्रिका, घराणे आणि मुख्य म्हणज हुंडा ह्या गोष्टींना महत्त्व असते. बिचाऱ्या मुलीला ह्यात कुठे फारसा वाव असणार? मुसलमान मुलींची काय स्थिती असते हे आपण आधीच विचारात घेतले आहे. गुजरात विद्यापीठातील मानसशास्त्राचे प्राध्यापक एच्. डी. रदामींनी १७४४ कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांत ३८० मुली

होत्या. रदामींनी काढलेल्या निष्कर्षानुसार बहुतेक मुली आपल्या वरपसंतीच्या बाबतीत काही करू शकत नाहीत, पालक ठरवतील ते त्यांना मान्य करावे लागते, असा प्रा. रदामी ह्यांनी निष्कर्ष काढला आहे.

हिंदूंच्या बाबतीत अजून जातीतल्या जातीतच कसे विवाह होतात हे मागल्याच प्रकरणात दाखवून दिले आहे. एकंदरीत विवाहाच्या संख्येपैकी केवळ २.२२ टक्के विवाह आंतर्जातीय झालेले आढळले. पुणे जिल्ह्यातील ७,४३० विवाहांची पहाणी १९५५-५६ मध्ये करण्यात आली होती. त्यात असे दिसून आले की "पोटजात, जात व धर्म ह्यांच्याबाहेर अवघे ४.३ टक्के विवाह झाले होते. त्यांपैकी २.३ आंतर्जातीय व २ टक्के आंतर्धर्मीय होते."[७]

आपल्या जातीतच मुलीला देण्याच्या आग्रहाव्यतिरिक्त मुलामुलींच्या पत्रिका जमण्याचाही पालकांचा आग्रह असतो.

आयुष्याचा जोडीदार चांगल्या सुसंस्कृत घराण्यातला असावा ह्या मुद्याकडे लक्ष देणे अवश्य आहे. आनुवंशिकतेला कितपत महत्त्व आहे ह्याबद्दल समाजतज्ञांचे एकमत नाही. हिंदू धर्मशास्त्रे मात्र कुळाला अग्रस्थान देतात. त्याच्या खालोखाल व्यक्तीचे शील. कुलशीलाचा परस्परसंबंध काय आहे ह्याबद्दल मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ फुस्टर म्हणतात, "कुटुंबातच संस्कृतीचे धडे दिले जातात. ह्यामुळे आणि मातापिता व मुले ह्यांच्यातील परस्पर नात्यामुळे व्यक्तिमत्वाच्या विकासाचा प्रमुख सामाजिक घटक म्हणजे कुटुंबच होय."[८] 'जेनेटिक्स ॲण्ड एन्व्हायरन्मेंटल् फॅक्टरस् इन ह्यूमन ॲबिलिटी' ह्या विषयावर १९६५ मध्ये युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन, येथे भरलेल्या परिसंवादातून ब्रिटिश शास्त्रज्ञांनी पुढील निष्कर्ष काढला : "निरनिराळ्या सामाजिक वर्गात असलेला बुद्धिमत्तेतील फरकसुद्धा काही अंशी आनुवंशिक असतो असे म्हटले जाते."[९] जर आनुवंशिकतेचा घटक भावी अपत्यावर परिणामकारक ठरत असेल तर विवाह जमविताना अगर वरवधू पसंत करताना त्यांच्या कुळाला योग्य ते महत्त्व देण्यात यावे. प्रस्तुत पहाणीमध्ये फक्त नऊ मुलींनी "कुलीन व मान्य घराण्यातला" मुलगा पसंत करावा अशी अट घातली आहे.

विवाह होण्यास हुंडा हा अजूनही एक प्रचंड अडथळा आहे असे दिसून येते आणि तेही हिंदू मुलींच्याच बाबतीत नसून ख्रिश्चन समाजातील मुलींनाही ती पद्धत आड येते. ऐतिहासिक दृष्ट्या पहाता आदिवासी समाजात हुंडा देण्याची पद्धत नव्हती. कुटुंब संघटित होऊ लागले आणि कुटुंबाला आपली खाजगी मालमत्ता राखून ठेवता येऊ लागली, तेव्हापासून निरनिराळ्या समाजांत ह्या पद्धतीचा स्वतंत्रपणे उदय झाला. वरवधूला उभय पक्षांकडून भेटी देण्याची पद्धत होती. आर्य लोक वस्तूंची भेट देत असत. मुलीविषयी स्वाभाविक वाटणारे प्रेम ह्या भेटीतून व्यक्त होई. झालाच तर अडीअडचणीला त्या वस्तूंचा तिला उपयोग व्हावा हाही हेतू असे. ग्रीक व रोमन लोकसुद्धा हुंडा देत असत आणि रोमन कायद्यात असे म्हटले आहे की पतिनिधना-

नंतर विधवेला हुंडा परत देण्यात यावा. "बायबलमध्येही अशाच अर्थाने सूचित केले आहे. पण किंग जेम्सने दिलेल्या आवृत्तीमध्ये कन्यामूल्य ह्या अर्थाने हा शब्द वापरला आहे."[१०] यू. एस्. व यू. के. मध्ये हा शब्द 'डॉवर' म्हणून प्रचलित होता. इंग्लंडमध्ये समाजाच्या वरच्या वर्गात हुंड्याची उघड चर्चा करणे असभ्य समजले जाई.[१०] मुसलमानांच्याविषयी श्री. सिद्दीक म्हणतात : "विवाहानंतर पत्नीचे आर्थिक स्थान सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने पतीने पत्नीला योग्य रक्कम द्यावी असा इस्लाम धर्माने कायदाच केला आहे. ही रक्कम किती असावी हे उभय पक्षांत करार होत असताना ठरविले जाते."[११]

मूळ हेतूंचा विपर्यास होऊन आज भारतीयांमध्ये हुंड्याने राक्षसी स्वरूप धारण केले आहे. सामान्य हिंदूंना जातीय भावनेमुळे वरवधूपसंतीचे क्षेत्र आधीच मर्यादित असते. त्यात ही हुंडा पद्धत! तरी बरे, स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांमध्ये शिक्षणाची वाढ झाली आहे, त्यांचे स्थान उंचावले आहे. शिवाय हिंदू वारसा कायद्याने (१९५६) त्यांना जादा वारसा हक्क मिळाले आहेत. सर्वांत कळस म्हणजे १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायद्याने हुंडा देणे घेणे हा गुन्हा ठरविला आहे, तरीसुद्धा सदरहू पहाणी-नुसार हिंदूंतच नव्हे तर केरळ ख्रिश्चनांमध्येही ही पद्धत चिकटून राहिली आहे!

प्रश्नपत्रिकेत हुंड्याविषयी प्रश्न विचारला नव्हता. तरीसुद्धा स्वतःहून अकरा-जणींनी हुंडा हेच लग्न न जमण्याचे कारण सांगितले. कोणतीही व्यक्ती आपणच सांगावयास लागते तेव्हा ती गोष्ट तिच्या मनाला किती डाचत असावी हे उघड दिसून येते. गट अ मधील अविवाहितांचे २६.८ मध्यम वय व ब गटातील मुलींचे २३ हे मध्यम वय, आणि विवाहाच्या मार्गातील अडथळे ह्यावर झालेल्या चर्चेतून वरील अकराजणींच्या विधानाला पुष्टीच मिळते. जितका मुलगा अधिक शिकलेला व हुद्देदार आणि मुलगी जितकी दिसण्यात कमी आकर्षक, तितकी हुंड्याची रक्कम अधिक. काही अपवाद सोडल्यास हीच सर्वत्र रीत आढळते. काही सुशिक्षित व उदार मनाचे तरुण आपल्या वडिलांचा विरोध सहन करतात व हुंडा घेत नाहीत. वेळेला मनपसंत मुलीबरोबर स्वतःच लग्न जमवितात व करतातही. पण असे तरुण विरळाच. सामान्यतः पुरुषवर्गाने ह्या पद्धतीला कवटाळून धरले आहे.

हिंदुस्थानच्या झालेल्या फाळणीमुळे आपली हजारो वर्षांची भूमी मालमत्तेसह सोडून भारताकडे अनेक सिंधी कुटुंबांना धाव घ्यावी लागली ही इतिहासात नोंद होऊन गेलेली घटना आहे. ते भारतात विखुरलेले असले तरी आपले वैशिष्टच राखून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. ह्याची कारणे पुढीलप्रमाणे देता येतील : ". . . नगरे व उपनगरे ह्यांतून सिंध्यांच्या झालेल्या वसाहतींमध्ये आपले परंपरागत जीवन ते घालवू शकत आहेत हे पहिले कारण. दुसरे कारण त्यांची सिंधी भाषा आणि तिसरे म्हणजे सद्यः पिढीवर असलेला परंपरेचा प्रभाव. ही पिढी अजून नष्ट झालेली नाही."[१२] अशा तऱ्हेने त्यांच्या समाजरचनेला पूर्वी केव्हाही न बसलेल्या धक्क्यातून ते सही-

सलामत बचावले आहेत. सिंध्यांच्या समाजात "जातीतच विवाह करण्याची पद्धत रूढ आहे."[१३] भरीला हुंडा घेण्याची चाल असून हुंड्याची रक्कम वाढत चालली आहे. जवळ जवळ सर्वच सिंधी मुलींनी—एकंदरीने एकोणसत्तर—ह्या वस्तुस्थितीचा उल्लेख केला. दलालीच्या अपेक्षेने मध्यस्थी लग्नें जमवितात. कमीत कमी रु. २००० पासून पुढे ही रक्कम किती वाढेल ह्याचा नेम नाही. तोंडी निवेदन केलेल्या ह्या हकीगतीला डॉ. ठाकूर ह्यांनी पुष्टी दिली आहे. ". . . हुंड्याची रक्कम म्हणजे एक पैशाचाच व्यवहार असून त्या रक्कमेच्या अनुषंगाने सामाजिक स्थान निश्चित ठरते."[१४] हुंड्याच्या चालीच्या अनुषंगाने हिंदुंव्यतिरिक्त इतर समाजांतील मुलींची उदाहरणे पाहू.

पाश्चात्य समाजात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या अधिक असल्यामुळे तेथे कुमारिका जास्त संख्येने असण्याचे एक कारण असावे. पण अखिल भारतासंबंधाने तसे म्हणता येणार नाही आणि महाराष्ट्राबद्दल[१५] तर तशी शक्यताच नाही. केरळराज्याची मात्र उलट परिस्थिती आहे. तेथे दर हजारी पुरुषांमागे बावीस स्त्रिया जास्त आहेत.[१६] आणि "त्या लोकांची अधिक देशांतरगतिक्षमता" लक्षात घेता परिचारिकेचा व्यवसाय करणाऱ्या अनेक केरळातील स्त्रिया प्रस्तुत पहाणी करीत असताना लेखिकेला आढळल्या असल्यास नवल नाही.बहुतेकजणी ख्रिश्चन आहेत. त्यांतील काहीजणींची एकत्र बैठक घेऊन चर्चा केली असता त्यांनी सांगितले की त्यांच्या समाजात जाती-व्यवस्था आहे, जातीतच लग्न करण्याची पद्धत आहे आणि रोख रक्कम देऊनही वर दागिन्यांच्या रूपात हुंडा द्यावा लागतो. म्हणूनच त्या महाराष्ट्रात आल्या. आपल्या पगारांतील एकही पैसा खर्च न करता त्या सर्व पैसे केरळमधील आपल्या आईवडिलांकडे पाठवून देतात हे त्यांना भूषणावह आहे. अशा तऱ्हेने जपानी भगिनींप्रमाणे ह्या केरळ भगिनी आपल्या हुंड्याची तरतूद करीत असतात.[१७]

हुंड्याच्या रूपाने विवाहाच्या मार्गात येणारा प्रचंड अडथळा 'विवाहेच्छु' अशा ५४६ मुलींचा विचार केला असता प्रामुख्याने लक्षात येतो. त्यांतील चौदा जणींनी सांगितले की "हुंडा घेण्याची चाल नसती तर एव्हाना आमची लग्ने होऊन गेली असती."

ह्या कुमारिकांनी विवाहाकरिता स्वतःच्या म्हणून ज्या अटी सांगितल्या आहेत त्यांना त्यांच्या इच्छेपलीकडे अधिक महत्त्व नाही! फक्त वरील माहितीवरून त्यांच्या मनाचा कल तेवढा लक्षात येतो. ५४१ कुमारिकांपैकी १०८ किंवा २० टक्के मुलींनी "आमची काहीच अट नाही" असे सांगितले. सातजणी विवाहाच्या बाबतीत इतक्या अगतिक आढळल्या की वयाने, शिक्षणाने वगैरे आमच्यापेक्षा कमी दर्जाचा वर असला तरी चालेल असे म्हणाल्या! उलटपक्षी ७२ टक्के कुमारिकांनी आपल्यापेक्षा वय, शिक्षण, उत्पन्न वगैरे बाबतींत वरचढ असाच मुलगा पाहिजे म्हणून लिहून दिले आहे. त्यातल्या त्यात ह्या मुलींनी थोडा फरक केला आहे. वयाने व शिक्षणाने तो जास्त असावा इतकेच नव्हे तर ९० जणींनी आपल्यापेक्षा मुलाचे उत्पन्न वा पगार अधिक

असावा व त्याच्याजवळ थोडी पुंजीही असावी असे सांगितले. तेवीस कुमारिकांना ही उत्पन्नाची अट आवश्यक वाटत नाही. बासष्ट मुलींना आकर्षक व्यक्तिमत्व असलेला वर हवा तर ५२ जणींनी चांगल्या शीलावर जोर दिला आहे. येवढ्या अल्पसंख्यांक मुलींनीच चांगल्या वर्तनाची-स्वभावाची अट घालावी ह्याबद्दल थोडे सखेदाश्चर्य वाटते! सहाजणींचे असे म्हणणे पडले की आमच्या भावी पतींनी आम्हाला नोकरी चालू ठेवण्याची परवानगी द्यावी. ह्याच्या उलट हा नोकरी चालू ठेवण्याचा प्रश्न काहीजणींनी आपले भावी यजमान व त्यांचे कुटुंब ह्यांवर सोपविला आहे. अशा तऱ्हेने ह्या 'विवाहेच्छु' कुमारिका आपल्या वराची पसंती करू इच्छितात. पण त्यांच्या हातांत सद्यःपरिस्थितीत ते कितपत आहे बरे?

अविवाहितांच्या पसंतीचा येथवर विचार केल्यानंतर ज्यांचे विवाह स्वपसंती-नुसार झाले आहेत त्यांनी आपली पसंती कोणत्या भूमिकेवरून केली हे पहाणे योग्य ठरेल. त्याचबरोबर विवाहित स्त्रियांच्या वैवाहिक जीवनाच्या इतर अंगांचा विचार करणे समर्पक ठरेल. तक्ता १० मध्ये धर्माप्रमाणे विवाहितांची वर्गवारी केली असून त्यांचे विवाहसमयी असलेले मध्यम वय, वैवाहिक जीवनातील कालाची सरासरी, विवाहाचा प्रकार आणि पतिपत्नीसंबंध दिलेले आहेत.

ह्या तक्त्याच्या निरीक्षणानंतर पुढील गोष्टी लक्षात येतात : नमुन्यादाखल घेतलेल्या सर्व स्त्रियांपैकी ५९.८९ टक्के विवाहित आहेत. १९६१ च्या खानेसुमारी-नुसार २० ते २४ च्या वयोमान गटात—नमुन्यातील विवाहितांचे मध्यम वय तितकेच आहे—महाराष्ट्रामध्ये ७७ टक्के विवाहित स्त्रिया आढळतात. अ गटातील १,३६८ हिंदू स्त्रियांपैकी ८२४ किंवा ६० टक्के विवाहित आहेत. तर हेच प्रमाण ब गटात ७८ टक्के आढळते. हे प्रमाण ब गटात अधिक असण्याचे कारण त्यात अर्थार्जन न करणाऱ्या व वृद्ध स्त्रियाही आहेत. ब गटात सर्वांत अधिक वय ८२ वर्षांचे आढळले. त्याचप्रमाणे अठरा वर्षांवरील सर्व स्त्रिया त्यात घेतल्या आहेत. ख्रिश्चन विवाहित स्त्रियांचे अ गटात ३६ टक्के प्रमाण आहे तर मुसलमान स्त्रियांचे प्रमाण २६टक्के आहे. उच्च शिक्षण घेऊन अर्थार्जन करणाऱ्या मुसलमान स्त्रिया फक्त ४६ असल्यामुळे हे प्रमाण इतके कमी असावे. "एकंदरीत इस्लामी जीवनपद्धत अशी आहे की स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र घरापुरते मर्यादित असावे."[१८]

पहाणीतील सर्व जमातींच्या विवाहित स्त्रियांचे विवाहाच्या वेळी मध्यम वय २२.१७ इतके होते. सोलापूर येथील एका बाईचे लग्न कमीतकमी तिसऱ्या वर्षी झाले असून जास्तीतजास्त एकोणचाळीसाव्या वर्षी मुंबईच्या एका स्त्रीने लग्न केले होते. जमातीनुसार पाहिले असता ख्रिश्चनांत सर्वांत अधिक २७.९३, त्याच्या खालोखाल मुसलमान स्त्रीचे २४.०८ (अ) व १९.५ (ब) सापडले. हिंदू अ गटातील स्त्रीचे २२.७४ व ब गटात १८.८३ आढळून आले. ह्या सर्व आकड्यांवरून मध्यम-वर्गीय स्त्रीचे व त्यातल्या त्यात मिळवित्या स्त्रीचे वयोमान वाढले आहे. वीस वर्षा-

पूर्वीच्या हिंदू स्त्रियांच्या केलेल्या पहाणीनुसार ते २१ वर्षे होते.[१९] लग्नाच्या वेळी मुली वयात आलेल्या असल्यामुळे विवाहपूर्ती तावडतोब होते.

वरील चर्चेवरून शारीरिक, मानसिक व सामाजिक दृष्टचा मुलामुलींचे कोणते वय विवाहासाठी योग्य समजावे? निसर्गाच्या आदेशानुसार वयात आल्याबरोबर स्त्रीपुरुष संयोग व्हावा. परंतु त्या वयापर्यंत भावी पिढीची योग्य जोपासना करण्याइतपत उभयतांची शारीरिक व मानसिक वाढ झालेली नसते. शिवाय पाश्चिमात्य व पौर्वात्य देशांतीलही शिक्षित वर्गात असा सर्वसंमत प्रघात आहे की नव्या कुटुंबाच्या आर्थिक पोषणाची पात्रता आल्याशिवाय पुरुषाने लग्न करू नये. तसेच भावी पिढीचे कल्याण होण्याच्या दृष्टीने प्रा. घुर्ये म्हणतात, "मुलांचे योग्य संगोपन, शिक्षण आणि समाजरचनेमध्ये योग्य स्थान मिळण्याकरिता . . . मातेच्या व बालकांच्या प्रकृतीमानानुसार दांपत्याच्या पूर्वार्धात अपत्यांचा जन्म व्हावा . . . ह्याचाच अर्थ असा की मुलाचे विवाहसमयी वय पंचवीसपेक्षा अधिक नसावे. आणि ज्याअर्थी पुरुषांच्या मानाने स्त्रियांची शारीरिक व मानसिक वाढ तीनचार वर्षांनी अगोदर होत असते त्याअर्थी मुलीचे जास्तीतजास्त विवाहाचे वय बावीस वर्षांपेक्षा अधिक नसावे."[२०]

सप्टेंबर १९६७ मध्ये मुंबई दक्षिण विभाग स्त्री संयुक्त समितीने डॉक्टर, वकील, धर्मशास्त्रज्ञ, समाजसेवक, समाजशास्त्रज्ञ, मानवविज्ञानतज्ञ वगैरेंचा एक परिसंवाद घडवून आणला होता. त्यात असा ठराव पास झाला की विवाहाचे मुलीचे वय अठरा वर्षांपर्यंत वाढवावे. काही दिवसांनी प्रस्तुत लेखिकेने त्यातील सुविख्यात स्त्रीरोगचिकित्सकांची भेट घेतली व काही मुद्यांचा खुलासा करून घेतला. ते म्हणाले, "बारा ते चौदा वर्षांच्या आतबाहेर रजोदर्शनाची सुरुवात होते. नंतर पंधरा वयोमानापर्यंत पाळीपाळीने विटाळ जाऊ लागतो. परंतु अठराव्या वर्षी बीजोद्भव होऊ लागतो तेव्हाच ती खरी वयात येते. तत्पूर्वी गर्भधारणा होण्याचा संभव असतो पण प्रसूती कठीण होते, जन्मतः मृत बालकांचे प्रमाण अधिक असते, बालकाची वाढही अपुरी असते आणि मातेची मानसिक वाढ झालेली नसल्यामुळे प्रसूतीसमयी त्रास होतो. दुसरे टोक म्हणजे २५. चोवीसच्या पुढे जसजसे वय पुढे जाते तसतसे पहिले बाळंतपण जड जाते. म्हणूनच १८ ते २४ हा पहिल्या व नंतरच्या प्रसूतीच्या दृष्टीने योग्य काळ होय."

१९३१ पर्यंत हिंदुस्थानात सर्रास बालविवाहाची प्रथा होती. परंतु ह्या प्रथेच्या दुष्परिणामांकडे समाजसुधारकांचे लक्ष केव्हाच गेले होते. १९०० मध्ये अखिल भारतीय सामाजिक परिषदेने नमूद केले की, "मुलीचे विवाहाचे वय १२ ते १४ व मुलाचे १५ ते २१ पर्यंत वर नेल्याशिवाय बरीचशी सुधारणा होणार नाही हे उघड आहे." अशा ह्या सतत मागणीमुळे व अखिल भारतीय महिला परिषदेच्या प्रयत्नांनी १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा पास करण्यात आला. ह्या कायद्याची अंमलबजावणी १९३१ पासून सुरू झाली व १९३८ मध्ये त्यात थोडी सुधारणा

तक्ता १०

धर्माप्रमाणे, विवाहित स्त्रिया, त्यांचे विवाहसमयीचे मध्यम वय, वैवाहिक जीवनाची सरासरी कालमर्यादा, विवाहाचे प्रकार आणि पतिपत्नीसंबंध

| धर्म | गट | एकंदरीत संख्या | विवाहितांची संख्या | विवाहसमयीचे मध्यम वय | वैवाहिक जीवनाची सरासरी कालमर्यादा | जमविलेले विवाह: संख्या व टक्केवारी | स्त्रियांची अनुमती: हो | स्त्रियांची अनुमती: नाही | पतिपत्नी संबंध: पूर्णपणे समाधानकारक | काही अंशी समाधानकारक | असमाधानकारक | उत्तरे दिली नाहीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंदू | अ | १,३६८ | ८२४ | २२.७४ | १०.४ | ६७० | ६२९ | ४१ | | | | |
| | | १००% | ६४% | | | ५२% | ४८% | ३.१३ | | | | |
| | | | १००% | | | ८१% | | | | | | |
| | | | | | | १००% | ९३.५% | ६.५% | | | | |
| | ब | २५६ | २०१ | १८.८३ | १७.२ | १८६ | १८६ | — | | | | |
| | | १००% | ७८% | | | ७३% | ७३% | | | | | |
| ख्रिश्चन | | ७९ | २९ | २७.९३ | १०.४ | २२ | २२ | — | | | | |
| | | १००% | ३६% | | | २७% | २७% | | | | | |
| मुसलमान | अ | ४५ | १२ | २४.०८ | १०.४ | १० | १० | — | | | | |
| | | १००% | २६.६% | | | २२.५% | २२.५% | | | | | |
| | ब | २ | २ | १९.५० | १७.०२ | २ | | २ | | | | |
| इतर | | ४३ | ४ | २५.०० | १०.४ | ३ | ३ | — | | | | |
| | | १००% | ९.९% | | | | | | | | | |
| | | १,७९३ | १,०७२ | २२.१७ | ११.६५ | ८९३ | ८५० | ४३ | ७८६ | २७ | ३० | ५० |
| | | १००% | ६०% | | | ५०% | ४८% | २% | | | | |
| | | | १००% | | | ८३% | | | | | | |
| | | | | | | १००% | ९५% | | ८६.९% | ३.१% | ३.३% | ६.९% |

## तक्ता १० (पुढे चालू)

| | | | पसंतीं विवाह आईवडिलांचीं अनुमती | | परिचय | | | | पसंतीचीं भूमिका | | | | | | | पतिपत्नीसंबंध समाधानकारक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | हो | नाहीं | बालपणापासून | कॉलेजात | कचेरीत | नातेवाईकामार्फत | प्रेम | स्वभाव | शिक्षण | मैत्री | व्यक्तिमत्त्व | शील | दिले नाही | पूर्णपणे | काही अंशीं | नाहीत |
| हिंदू | अ | १५४ १९% | | | ३ | १७ | १५ | ६ | २७ | ९ | १० | ५ | ६ | १५ | ४६ | १४७ | ४ | ३ |
| | ब | १५ | | | | | | | | | | | | | १५ | १५ | ० | ० |
| ख्रिश्चन | | ७ | | | १ | | | | १ | | | २ | १ | | २ | ७ | ० | ० |
| मुसलमान | अ | २ | | | १ | | | १ | | | | | | | | | | |
| | | १७% | | | | | | | | | | | | | | २ | ० | ० |
| | ब | — | | | | | | | | | | | | | | | | |
| इतर | | १ | | | | | | | | | | | | | १ | १ | ० | ० |
| | | १७९ | १३५ | ४४ | ५ | १७ | १५ | ७ | २८ | ९ | १० | ७ | ७ | १५ | ६४ | १७२ | ४ | ३ |
| | | १००% | ७३.४% | २३.७% | | | | | | | | | | | | ९३.५% | | ४.९% |

करण्यात आली. ह्या कायद्यानुसार १४ वर्षांच्या खालील मुलीचे व १८ वर्षांखालील मुलाचे लग्न करणे हा गुन्हा ठरतो. १९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने मुलीचे वय १५ व मुलाचे वय १८ ठरविले. स्पेशल मॅरेज कायद्यानुसार अनुक्रमे १८ व २१ आहे; पारशी विवाह कायद्याप्रमाणे वधूवराचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास पालकांची संमती अवश्य असते. मुसलमानांच्या बाबतीत: "वयात येण्यापूर्वी आपल्या मुलीचे लग्न पालकाला करवून देण्याचा अधिकार आहे.परंतु अशा परिस्थितीत आपल्या हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने आपला जोडीदार अयोग्य आहे असे वयात आल्यावर तिला वाटल्यास विवाह रद्द करून घेता येतो."[२१] हे झाले कायद्याच्या दृष्टीने. प्रत्यक्ष वस्तुस्थिती भिन्न आहे हे अगोदरच स्पष्ट केले आहे. तरीसुद्धा १९६१च्या खानेसुमारीतील माहिती तक्ता ११ मध्ये दिली आहे.

### तक्ता ११

*१९६१च्या खानेसुमारीनुसार सौभाग्यवती, विधवा व घटस्फोटित स्त्रियांची १०-१९ वयोमान गटातील संख्या

| वयोमान गट | व्याप्ती | संख्या | सौभाग्यवती |
|---|---|---|---|
| १०—१४ | अखिल भारत | २३,०३२,००० | ४,४२६,००० |
| | | (१००%) | (१९.२१%) |
| | महाराष्ट्र | २,०८३,०२० | ३७२,२०५ |
| | | (१००%) | (१७.८६%) |
| १५—१९ | अखिल भारत | १७,२८४,००० | १२,०२४,००० |
| | | (१००%) | (६९.५६%) |
| | महाराष्ट्र | १,५३२,४५५ | १,१०५,७६४ |
| | | (१००%) | (७२.१५%) |

| वयोमान गट | विधवा | घटस्फोटित व परित्यक्ता | विशेष उल्लेख न केलेला |
|---|---|---|---|
| १०—१४ | ३०,००० | २९,००० | — |
| | (.१३%) | (.१२५%) | |
| | ३,१६९ | २,९९५ | ७,५८६ |
| | (.१५%) | (.१४%) | (.३६%) |
| १५—१९ | ९१,००० | १११,००० | — |
| | (.५३%) | (.६४%) | |
| | ९,७१५ | १६,१९८ | ९६६ |
| | (.६३%) | (१.०५%) | (.०६%) |

*१९७१च्या खानेसुमारीनुसार असे आकडे अजून उपलब्ध झाले नाहीत.

दहा ते चौदा ह्या वयोमानातील जवळजवळ १९.४६ टक्के स्त्रिया विवाहित आहेत आणि ७०.७३ टक्के एकोणीस वर्षांच्या आत विवाहबद्ध होतात. शिवाय नऊ वर्षांखालील सर्वच मुली अविवाहित आहेत असा भलताच समज वाचकांनी करून घेऊ नये. खानेसुमारी अधिकारीवर्गाच्या आदेशानुसार त्यांची नोंद झाली नाही इतकेच. फक्त पश्चिम बंगालने ही नोंद केली आणि नऊ वर्षांच्या खालील मुलींच्या संख्येपैकी २.१ टक्के मुली लग्न झालेल्या आढळल्या.[२२] ह्यावरून बालविवाहाच्या रूढीला कायद्याने कितपत प्रतिबंध घालता येतो हे उघड दिसून येते.

भारताला विवाहाचे वय वाढविण्याची तीव्र आवश्यकता वाटते. परंतु अमेरिकन संयुक्त संस्थानांत ते वय दुसऱ्या महायुद्धापासून खाली उतरत आहे. "विवाहाची नोंद ठेवल्यावेळेपासून पहिल्या विवाहाचे सरासरी वयोमान घटत आहे. विवाहयोग्य अशा निम्म्या मुलींची लग्ने विसाव्या वाढदिवसाच्या आतच झालेली असतात."[२३] परंतु तेथे विभक्त व घटस्फोटितांची संख्या बरीच आहे. बालविवाहाव्यतिरिक्त त्याला इतर कारणे आहेत.

भारतातील सध्याच्या गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळे व भिन्न भिन्न समाजरचने-मुळे विवाहाचे अचूक वय ठरविणे कठीणच आहे. बरेचसे व्यक्तिगत परिस्थितीवर अवलंबून असते. तथापि मुलीचा दुय्यम शालेय शिक्षणक्रम पुरा झाला आणि ती किमान अठरा वर्षांची तरी झाली की तिच्या विवाहाचा विषय गंभीरपणे विचारात घेतला जावा. तसे करीत असताना तिचा कल, तिची बौद्धिक पात्रता वगैरे इतर गोष्टी लक्षात घ्याव्या.

प्रस्तुत पहाणीतील १,०७२ विवाहांपैकी ८८९ अगर ८३ टक्के विवाह हे पालकांनी जमवून आणले आहेत. विवाहाच्या बाबतीत पालक जरी पुढाकार घेत असले तरी अलिकडेस मुलामुलींची पसंती विचारात घेतली जाते. नव्हे, ही प्रथा मान्य झाली आहे. परस्परांचा परिचय घडवून आणून त्यांना एकमेकांचे विचार समजून घेण्याची संधी दिली जाते. जर दोघांचे एकमत झाले तरच विवाह नक्की करण्यात येतो. पूर्वी अर्थातच मुलीच्या पसंतीचा प्रश्नच नसे. हल्ली मुलगा जर मुलीला पसंत नसेल तर वरच्या व मध्यम वर्गात तरी आईवडील तिच्यावर सक्ती करीत नाहीत. वर उल्लेखिलेल्या ८८९ जमवून आणलेल्या विवाहांपैकी ८५८ अगर ९६ टक्के विवाह मुलींच्या संमतीनुसार झाले आहेत. फक्त ४ टक्क्यांच्या बाबतीत मुलींना विचारण्यात आले नाही.

आश्चर्याची गोष्ट अशी की ख्रिश्चन जमातीतही अजून विवाह जमविले जातात. ते हिंदूंचे अनुकरण करतात असे दिसते.

सतरा टक्के विवाह स्वतःच निवड करून झाले आहेत. मात्र ही टक्केवारी जमातीजमातीप्रमाणे कमीअधिक आढळते. उदाहरणार्थ ख्रिश्चनांत २४ टक्के. त्याचप्रमाणे अ गट हिंदू व ब गट हिंदू ह्यांत फरक आढळतो. पहिल्या गटात १९ टक्के

तर दुसऱ्यात अवघे ७ टक्के. कॉलेजात अगर कचेऱ्यांमध्ये मुलामुलींची ओळख होते आणि हा परिचय वेळेस वाढीस लागतो आणि त्याचे पर्यवसान विवाहात होण्याचा संभव असतो.

एकंदरीने विवाहाच्या १,०७२ संख्येपैकी १७९ विवाहच फक्त स्वतः मुला-मुलींनी ठरविले आहेत. टक्केवारी पहाता ही १६.६९ इतकीच येते. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे अशा विवाहांपैकी ७३ टक्के विवाहांना आईवडिलांनी आपली संमती दिली आहे. बाकीच्या २७ टक्क्यांनी दिली नसली तरी पुढेमागे आईवडील व नवदांपत्य ह्यांत दिलजमाई घडून येते. काही काळ निघून जावा लागतो इतकेच. अशा प्रकारचा सलोखा झाल्याची चार उदाहरणे आढळली.

"पसंती कोणत्या भूमिकेवरून तुम्ही केलीत?" असा एक सवाल प्रश्नपत्रिकेत विचारला होता. ह्या प्रश्नाला ५९ जणींनी उत्तर दिले नाही. ह्याचा अर्थ असा की एकतर उत्तर देण्याची त्यांची इच्छा नसावी किंवा आपली पसंतीची भूमिका त्यांना निश्चित शब्दांत सांगता येत नसावी. एकशे पस्तीस स्त्रियांनी ह्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे पण काही जणींनी उत्तर देताना घोटाळा केला आहे. आपल्या प्रियकराची निवड कशी केली ह्याची गल्लत कुठे भेट झाली ह्याच्याशी केली आहे. त्यांची उत्तरे तक्ता १२ मध्ये दिली आहेत.

### तक्ता १२

विवाहित स्त्रियांच्या पसंती भूमिका
अविवाहितांच्या पसंतीच्या भूमिकेशी तुलना

| | विवाहितांच्या बाबतीत | अविवाहितांच्या बाबतीत |
|---|---|---|
| प्रेम | ४८ | — |
| स्वभाव | १९ | ६ |
| ध्येय, संस्कृती व विचारांची समानता वगैरे | १८ | — |
| व्यक्तिमत्व | १२ | ६२ |
| आर्थिक स्थैर्य | ८ | ९० |
| मैत्री | ८ | — |
| शील | ५ | ५२ |
| **कुठे व कशी ओळख झाली** | | |
| कचेरीमध्ये | १५ | |
| मित्र अगर नातेवाईकामार्फत | १२ | |
| कॉलेजात | ११ | |

| कुठे व कशी ओळख झाली | |
|---|---|
| धंद्यात किंवा एकाच राजकीय अगर सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना | ९ |
| प्रत्यक्ष ओळख करून | १० |
| उत्तरे न दिलेल्या | ५९ |

वरील तक्त्यावरून मदनाचा प्रभाव चांगलाच दिसून येतो. कारण अठ्ठेचाळीस जणींना त्याच्या शरांनी विद्ध करून टाकले! शेवटी दिलेल्या एकोणसाठ जणींच्या बाबतीतही कदाचित हीच वस्तुस्थिती झाली असावी. पण सहजसुलभ विनयामुळे त्यांनी ते शब्दांत व्यक्त केले नसावे. एकोणीस जणींना स्वभाव पसंत पडला तर अठरा स्त्रियांना समविचार, समान ध्येयें ह्यांमुळे परस्परांबद्दल आकर्षण वाटले. आपल्या प्रियकराच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने त्याच्याशी विवाहबद्ध व्हावे असे बारा जणींच्या मनात आले. फक्त आठच स्त्रियांनी भावी पतीच्या आर्थिक व सामाजिक स्थैर्याला महत्त्व दिले.

वरील तक्त्याच्या दुसऱ्या बाजूला कुमारिका आपली पसंती कशी करणार हे दिले आहे. त्यावरून उभयतांच्या भूमिकेत जमीनअस्मानाचा फरक दिसून येतो! ९० म्हणजे १६ टक्के कुमारिका स्थिर उत्पन्न व थोडी पुंजी जवळ असेल असाच पती निवडणार आहेत. अलिकडील पिढीमधल्या मुली ह्या जास्त व्यवहारी व आरामशीर जीवन पसंत करतात असे म्हणावे काय? असे विधान करण्याचे एक कारण म्हणजे बऱ्याच कुमारिकांनी विवाहोत्तर नोकरी सोडण्याची आपली इच्छा प्रस्तुत लेखिकेकडे प्रदर्शित केली. हे प्रमाण १७.७५ टक्के होते. उलटपक्षी ५६.०७ टक्के म्हणजे १०७ विवाहित स्त्रियांनी आपण आपली नोकरी अगर व्यवसाय चालू ठेवू असे उत्तर दिले होते. २२.४३ टक्के कुमारिकांनी अर्थार्जन करणे न करणे हे वरपक्षावर अवलंबून राहील असे उत्तर दिले, आणि ३.७५ टक्के अविवाहितांनी आपला नक्की विचार ठरला नाही असे सांगितले.

परस्पर परिचय वाढण्यास कचेरी व महाविद्यालये ही स्थाने अनुकूल ठरतात आणि ह्या परिचयाचे पर्यवसान विवाहात होऊ शकते असे प्रस्तुत पहाणीवरून दिसून येते. हे स्वाभाविकच आहे. मित्रांकरवी अगर नातेवाईकांमार्फत ओळख करून दिली गेली असे काही जणींनी सांगितले. सामाजिक संस्थाही लग्न जुळविण्याच्या बाबतीत पुढाकार घेतात असे दिसते. पण अशा संस्था थोड्याच आहेत.

पालकांनी जमविलेल्या विवाहांपैकी ८६ टक्के विवाहांच्या बाबतीत पतिपत्नी-संबंध समाधानकारक आहेत. ११ टक्के उदाहरणांत थोडासा बेबनाव आढळतो तर ३ टक्के विवाह भग्न झाले आहेत. स्वपसंतीने केलेले विवाह आणि पालकांनी जमविलेले विवाह ह्या दोहोंमध्ये यशस्वी विवाहाचे पारडे पसंतीच्या विवाहाकडे

झुकते असे दिसून येते. त्याचे कारण वधूवर प्रौढ असून नंतर स्वतः निवड करीत असतात हे असावे.

ह्यापुढे विधवा स्त्रिया आणि त्यांच्या समस्या ह्यांचा विचार करावयाचा आहे. पण तसे करण्यापूर्वी 'मॅरेज् ईस्ट ॲन्ड वेस्ट' ह्या ग्रंथात डॉ. डेव्हिड व व्हिरामेस ह्यांनी प्रगट केलेल्या विचारांचा सारांश येथे द्यावा असे मला वाटते. प्रथम ते विचारतात, "मुलामुलींना दिलेले स्वातंत्र्य आणि त्यांची प्रणयविलासाची पाश्चात्य पद्धत आमच्या पौर्वात्य मित्रांनी योग्य म्हणून अनुकरण करावी असे आम्ही त्यांना सांगू शकतो का?"[२४] नंतर यू. एस्. मधील कौटुंबिक जीवनावरील दोन अधिकारी व्यक्ती बरजेस् व लॉक्– ह्यांच्या ग्रंथातील उतारा देतात : "यू. एस्. मध्येच कदाचित विवाहाची नांदी आणि सूत्र म्हणून प्रणयविलासाचा संपूर्ण आविष्कार झालेला दिसत असावा. ह्याचे कारण प्रियाराधनास आईवडील पूर्ण मोकळीक देतात."[२५] ते पुढे लिहितात, "आता-पर्यंत झालेल्या संशोधनातून विवाहोत्तर सुख अचूक अजमावणे ही फार अवघड गोष्ट आहे असे दिसून येते. तथापि जे विवाह उघडउघड विजोड होतात व उभयता पतिपत्नी आपण दुःखी आहोत अशी कबुली देतात त्यावरून विवाहाचे यश स्थूलमानाने अजमावणे शक्य आहे. यू. एस्.मध्ये आज निम्मे विवाह तरी अयशस्वी होतात. . . . आणि खरी वस्तुस्थिती इतपतच नाही." वधूवरपसंतीच्या स्वातंत्र्यातून "डेटिंग–भेटण्याची तारीख ठरविणे" हा जो प्रकार तेथे सुरू झाला आहे त्याचे पर्यवसान बऱ्याच जणांच्या बाबतीत सुखी विवाहात होते हे जरी खरे असले तरी त्यातून काही इतर परिणाम होतात त्याचेही वर्णन डॉ. डेव्हिड व व्हिरामेस ह्यांनी केले आहे. ज्याअर्थी कौमार्यावस्थेतील हे विवाह फार मोठ्या प्रमाणात अयशस्वी ठरतात त्याअर्थी ते उभयता पुढील निर्णय देतात : "आमच्या मते तरुणांनी व आईवडिलांनी परस्पर विचारविनिमयाने वधूवरपसंती निर्णय घ्यावा हे सर्वांत आदर्श ध्येय ठरेल."[२६] ह्या बाबतीत संशोधन आणि सल्लागार समितीही त्या उभयतांनी सुचविली आहे. त्याचप्रमाणे डॉ. फॉन्सिका ह्यांनीही आपल्या प्रबंधात विवाह-सल्लागार मंडळे सुरू करावी असे ठामपणे मांडले आहे.

विवाहविषयक आधुनिक पाश्चात्य विचारसरणीमुळे कुटुंबसंस्थत झालेल्या 'सखोल क्रांती'विषयी तत्त्वज्ञ डेनिस डी. रुगमॉन्ट म्हणतात : "केवळ वैयक्तिक हेतूने प्रेरित होऊन केलेल्या खुल्या पसंतीवर अधिकाधिक प्रमाणात विवाहसंस्था आधारित होत आहे." पुढे ते जास्त स्पष्ट करतात: "निरोगी समाजव्यवस्थेमध्ये प्रेम व प्रणयाचे विशिष्ट स्थान आहे ह्याबद्दल कोणाचेही एक क्षणभरसुद्धा दुमत होणार नाही. परंतु प्रेमाचे मध्यस्थ म्हणून गौण आणि अंतिम कार्य असल्यामुळे त्यायोगे मिलनाचा कार्यभाग साध्य झाल्यावर प्रणय भाव नष्ट झाला तरी काही बिघडत नाही."[२७]

प्रा. हॅलन ह्यांनी भारतीय सुशिक्षित तरुणांच्या प्रवृत्तींचा अभ्यास केला

आहे. ते म्हणतात : "पंचाऐंशी टक्के तरुण व ७९ टक्के तरुणींचे एकमत आहे की ज्याच्याशी विवाहबद्ध व्हावयाचे ती व्यक्ती विशुद्ध असली पाहिजे. तसेच ६६ टक्के तरुण व ५४ टक्के तरुणींचे एकमत, उलट २२ टक्के तरुण व २६ टक्के तरुणींनी प्रतिकूल मत दिले की विवाहोत्तर पतिपत्नी संबंधाव्यतिरिक्त कुणा एकाकडून नैतिक गैरवर्तन होत असल्याचे आढळल्यास त्यांना एकमेकांजवळ रहाण्यास आवडणार नाही. ह्या सर्व उत्तरांवरून आम्ही निष्कर्ष काढतो तो असा : लैंगिक नीतिमत्तेचे परंपरागत मूलभूत दंडक अजूनही सर्वमान्य आहेत."[२८]

एकंदरीत १,०७२ विवाहित स्त्रियांपैकी ५१ अगर ४.७५ टक्के स्त्रिया विधवा आहेत. हे तक्ता १३ वरून लक्षात येईल. ह्याच वयोमान गटात १९६१ च्या खानेसुमारीनुसार २२ टक्केवारी येते. शिवाय खानेसुमारीप्रमाणे महाराष्ट्रात १० ते १४ ह्या वयोमान गटात ३,१६९, अगर ०.१ टक्के आणि १५ ते १९ च्या गटात २९०, किंवा ०.२ टक्के ८ स्त्रिया विधवा आहेत ! ०–९ गटातल्या विधवांचे आकडे नमूद नाहीत ही गोष्ट निराळी. परंतु त्यांचीही संख्या थोडीतरी असावीच. बालविधवांच्या दैन्यावस्थेची कल्पनाच करवत नाही. पण त्यांची संख्या कमी होत आहे आणि समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टिकोनही निवळत आहे. तसेच सेवासदन, हिंगणे स्त्रीसंस्थांसारख्या संस्था त्यांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

विधवा स्त्रियांचे मध्यम वय जवळजवळ २६ वर्षांचे आहे. म्हणजे त्यांना सरासरी ३.७८ वर्षेच वैवाहिक सुख लाभले. अ गटातील हिंदू विधवांचे मध्यम वय २६.८ असून सर्वांत कमी १५ व सर्वांत जास्त ५० वर्षांचे आढळले. ब गटात मध्यम वय १९.३ वर्षे. म्हणजे त्यांना दांपत्य जीवन फक्त ४.७ वर्षे घालवावयास मिळाले. ही परिस्थिती दुर्दैवी तर खरीच. असे असूनही ह्या मध्यम वर्गातील ५३ स्त्रिया पुनर्विवाह करण्यास राजी नाहीत. तरी बरे समाजाची पुनर्विवाहास आडकाठी नाही आणि कायद्याची तर मुळीच नाही! पंचेचाळीस जणींनी नक्कीच नाही म्हटले तर आठ जणींनी 'तुम्ही पुनर्विवाह करण्याची शक्यता आहे का?' ह्या प्रश्नावर मौन स्वीकारले.

पतिनिधनामुळे सोळा विधवांना आर्थिक असहायता सोसावी लागते तर सतरा जणींना आयुष्याच्या जोडीदाराची हानी विशेष तीव्रतेने भासते. पाच जणींनी दोन्ही प्रकारचे दुःख व्यक्त केले. उरलेल्या सोळा स्त्रिया काहीच म्हणाल्या नाहीत. अधिक चौकशी करणे गैर वाटले म्हणून तेथेच विचारणा पुरी करण्यात आली.

सर्व पहाणीमध्ये एकच पुनर्विवाहित स्त्रीचे उदाहरण आढळून आले, त्यांची हकीगत पुढीलप्रमाणे : पंधराव्या वर्षी लग्न होऊन त्या बाईंना सोळाव्या वर्षी वैधव्य आले. नंतर शिक्षण घेऊन त्या शिक्षिका झाल्या. पुढे त्यांच्या अडतिसाव्या वर्षी एका विधुराबरोबर त्यांचे लग्न झाले. उभयता सुखी जीवन घालवीत आहेत.

दोन विधवा स्त्रियांनी आपल्या श्वशुरांची कृतज्ञतापूर्वक स्तुती केली. त्या म्हणाल्या श्वशुरांनी आपणास शिक्षण देऊन आर्थिक स्वावलंबन मिळवून दिले. अर्थातच त्या आता सासरीच आपली कालक्रमणा करीत असतात.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांना घटस्फोट निषिद्ध होता. विवाहबंधन हे ह्या जन्मापुरतेच नसून जन्मोजन्मी बंधनकारक आहे अशी समजूत होती. म्हणूनच पुतळाबाई, रमाबाई ह्यांच्यासारख्या स्त्रिया स्वखुषीने सती गेल्या. 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि' ही विवाहसमयीची शपथही शिवाजी महाराज व थोरले माधवराव ह्यांनी पाळली होती. पण सर्वच व्यक्ती इतक्या उच्च नैतिक भूमिकेवरून आपले जीवन कंठीत नाहीत. ह्याकरिता शूद्रांना व हरिजनांना जातपंचायतीमार्फत काडीमोड मिळविता येई.

पूर्वीचा दृष्टिकोनच वेगळा होता. पतिपत्नीची गाठ ब्रह्मदेवाने आधीच मारलेली असते अशी समजूत होती. विधिलिखित ज्या जोडीदाराशी अगर जोडीदारीणीशी लग्नगाठ बसली असेल त्याच्याशी अगर तिच्याशी जमवून घेण्याची वृत्ती असे. त्यातच समाधानाने रहाण्याकडे कल असे. तथापि मानवी स्वभावात रजोगुण व तमोगुणही असल्यामुळे वेळेला उभयपक्षी कुणाचा तरी त्याग केला जाई. परंतु अशा परिस्थितीत फक्त पुरुषालाच दुसरे लग्न करता येई आणि स्त्रीला मात्र कुठेतरी आश्रय घ्यावा लागे. स्त्रीविरुद्ध होणाऱ्या ह्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी १९३१ मध्ये बडोदा संस्थानात हिंदू विवाहविच्छेद कायदा पास करण्यात आला. नंतर म्हैसूर संस्थानात १९३३ मध्ये आणि १९४७ मध्ये मुंबई राज्यात व पुढे मद्रास राज्यात १९४९मध्ये, १९५२ साली सौराष्ट्रात आणि शेवटी १९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने घटस्फोटाचे कलम अखिल भारताला लागू करण्यात आले आहे. ह्या शेवटच्या कायद्याचा विशेष असा आहे की विवाहविच्छेद शक्य तो टाळावा. ह्याच्या उलट पाश्चिमात्य देशात घटस्फोट होईल तितका सुलभ करण्याकडे कल आहे. इंग्लंडच्या बाबतीत, "दुसऱ्या महायुद्धापर्यंत फार थोड्या सधन लोकांनाच घटस्फोट घेता येई... कारण त्याकरिता हायकोर्टाकडे जावे लागे आणि बराच खर्च करावा लागे."[२९] अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या बाबतीत निरनिराळ्या राज्यांत घटस्फोटविषयक वेगवेगळे कायदे आहेत. रशियामध्ये १९१७ च्या क्रांतीनंतर विवाहाची अगर घटस्फोटाची नोंद करणे अवश्य नसे. परंतु आता कायद्यानुसार दोन्ही घटना नोंदाव्या लागतात. डॉ. कु. फॉन्सिका ह्यांनी बृहन्मुंबईतील घटस्फोटित उदाहरणांचा अभ्यास केला आहे. ८९४ उदाहरणांत ७१ टक्के हिंदू, १४ टक्के मुसलमान व ७ टक्के ख्रिश्चन उदाहरणे आहेत.

हिंदू विवाह कायद्यानुसार घरस्फोट पुढील कारणाकरिता घेता येतो : १) व्यभिचार २) धर्मांतर ३) दुःसाध्य व सतत वेड ४) संसर्गजन्य गुप्तरोग ५) दुर्धर महारोग ६) संन्यास. ३, ४ आणि ५ ह्या कारणांसाठी लग्नानंतर तीन वर्षे लोटल्याशिवाय घटस्फोटाचा अर्ज करता येत नाही. ७) सात वर्षे बेपत्ता ८) कोर्टामार्फत

## तक्ता १३

विधवा, घटस्फोटिता व विभक्ता स्त्रियांची संख्या, त्यांचे मध्यम वय आणि वैवाहिक जीवनाचा काल, त्यांच्या समस्या, पुनर्विवाह / पुनर्मिलनाची शक्यता, घटस्फोटाची व विभक्तपणाची कारणे

| | एकंदर संख्या | विवाहितांची एकंदर संख्या | मध्यम वय व किमान मर्यादा | वैवाहिक जीवनाचा काल | पुनर्मीलन पुनर्विवाह हो | नाही | (विभक्तांच्या बाबतीत) (विधवा व घटस्फोटितांच्या बाबतीत) उ. दिले नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विधवा | ५१ ४.५१% | १,०७२ | २५.९५ वर्षे १५/५० | ७.८७ | ० | ४३ | ८ |
| घटस्फोटिता | ८ ०.७५% | १००% | २६.२२ | ४.४० | १ | ७ | ० |
| विभक्ता | २६ २.४२% | | २८.९२ | ४.९० | १ | ० | २५ |

| विधवांच्या समस्या | आर्थिक हानी | वैयक्तिक हानी | दोन्ही | उत्तर दिले नाही |
|---|---|---|---|---|
| एकंदर संख्या ५१ | १४ | १७ | ५ | १५ |

तक्ता १३ (पुढे चालू)

घटस्फोट घेण्याची आणि विभक्त होण्याची कारणे

| वर्ग | संख्या | उत्तर दिले नाही | नपुं-सकत्व | उतार वय | क्रौर्य/ त्रास | गुप्त रोग | फसवणूक दारू, जुगार व व्यभिचार | रागीष्ट स्वभाव/ बेपत्ता | आर्थिक आपत्ती | शिक्षणाचा अभाव/ मूल होण्याची इच्छा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घटस्फोटिता | ८ | २ | | १ | | १ | १+१ | १ | १ | १ १ |
| विभक्ता | २६ | ९ | १ | | ५ | | ७ | २ | | |
| | ३४ | ११ | १ | १ | ५ | १ | ९ | १ २ | १ | १ १ |

विभक्त झाल्यानंतर दोन वर्षांनी अर्ज करता येतो. ९) कोर्टामार्फत नांदण्याचा हुकूम झाला असताना तो अमान्य केल्यास. शिवाय पत्नीला आणखी दोन कारणांसाठी घटस्फोट घेता येतो: १) द्विभार्याविवाह २) बलात्कार किंवा गुदमैथुन करणारा अगर पशुतुल्य पती असल्यास. स्पेशल मॅरेज कायद्यानुसार ८ व ९ कलम सोडून त्याच कारणाकरिता घटस्फोट घेता येतो. परंतु परस्पर संमतीनेही विवाहविच्छेद करून घेण्याची ह्या कायद्यात तरतूद आहे.

१८६९ सालचा ख्रिश्चन जमातीकरिता जो इंडिअन डिव्होर्स ॲक्ट आहे तदनुसार पत्नीने व्यभिचार केल्यास पतीला काडीमोड करून घेता येते. उलट पत्नीला व्यभिचार, द्विभार्या, बलात्कार, गुदमैथुन व पशुत्व ह्या कारणांकरिता विवाहविच्छेद मिळू शकतो.

"मुसलमानांच्या वैयक्तिक कायद्यानुसार पतीला घटस्फोट घेण्याचा अमर्याद अधिकार दिला आहे. . . १९३९ मध्ये डिसोल्युशन ऑफ मुस्लीम मॅरेज ॲक्ट पास करण्यात आला. त्यामुळे मात्र पत्नीला पुढील कारणाकरिता काडीमोड मागता येतो :"[३०] (१) चार वर्षे पती बेपत्ता असल्यास (२) चार वर्षे पोटगी न दिल्यास (३) सात वर्षांची सजा झाल्यास (४) तीन वर्षे वैवाहिक जबाबदारी पार पाडता न आल्यास (५) नपुसकत्व (६) वेड, महारोग अथवा उपदंशाने पछाडल्यास (७) अज्ञानावस्थेत लग्न झाले असून विवाहपूर्ती झाली नसल्यास (८) क्रौर्य (९) तल्लक वगैरे इतर कारणे. ह्यावरून असे दिसून येते की इतरांपेक्षा मुसलमानांना घटस्फोट घेणे सुलभ आहे.

अ गटातील ८२४ विवाहित स्त्रियांमध्ये घटस्फोट घेतलेल्या स्त्रियांची आठ उदाहरणे आढळली. त्याचे प्रमाण शंभरात एक येते. परंतु ब गटातील एकाही स्त्रीने घटस्फोट घेतलेला नाही. म्हणजे काय की शंभरात एकीलाच घटस्फोटासाठी पुरेशी कारणे होती आणि ती कोर्टापर्यंत जाऊन दाद घेऊ शकत होती. पण ह्या स्त्रिया कमावत्या आहेत. त्यांना फक्त ४.४० वर्षांचे वैवाहिक सुख लाभले. डॉ. फॉन्सिका[३१] ह्यांनीही आपल्या अभ्यासानुसार घटस्फोटित स्त्रियांचे मध्यम वय पाच वर्षेच दाखविले आहे. घटस्फोटाच्या कारणांचा विचार केल्यास फक्त सहा जणींनी भिन्नभिन्न कारणांचा उल्लेख केला असून तिघीजणींनी ती दिली नाहीत. एकीने गुप्तरोग आणि तीन स्त्रियांनी पतीचा व्यभिचार ह्यामुळे आम्ही हिंदू विवाह कायद्यांतील घटस्फोटाच्या तरतुदीनुसार घटस्फोट घेतला असे सांगितले. पतीच्या गुप्तरोगामुळे घटस्फोट घेतलेल्या पत्नीची कहाणी विशेष उल्लेखनीय आहे. त्या पुरुषाने हुंड्याच्या लोभानेच हे लग्न केले असावे. मीलनाच्या पहिल्याच रात्री त्याने तिला सांगितले की 'मला तुझ्याशी काही कर्तव्य नाही !' हा आघात किती विदारक असावा ही कल्पनाच करणे बरे. भरीला तिच्या लक्षात आले की त्याला उपदंशाची बाधा आहे. दुसऱ्याच दिवशी आईवडिलांकडे तिला कायमचे परतावे लागले.

फसवेगिरीचे दुसरे उदाहरण असेच अभ्यासनीय आहे. आईवडिलांची ती सर्वात धाकटी मुलगी. तिचे लग्नाचे वय होईतोपर्यंत वडील वृद्ध झाले होते. तेव्हा त्यांनी वरसंशोधनाचे हे अवघड व त्रासदायक काम आपल्या एका विश्वासू मित्रावर सोपविले. हा मित्र घरचाच एक समजला जाई. तो अविवाहित होता. त्याने असा कट जमवून आणिला की तिचे लग्न एका वृद्धाबरोबर लावून दिले. हेतू हा की मित्र ह्या नात्याने त्या मुलीशी आपल्याला संबंध ठेवता यावा. हा कट त्या मुलीच्या लक्षात आला पण फार उशीरा. तोपर्यंत विवाहविधी पार पडला होता. पुढे घटस्फोट घेतला. ती आता शिक्षिका असून स्वावलंबी आहे. पण आयुष्यातल्या उधळलेल्या या डावाची स्मृती आणि त्याच्या अनुषंगाने ज्या सामाजिक वर्तुळात ती वावरत आहे तेथील सहानुभूतीशून्य वागणूक ही छातीवर सतत धोंड आहे. अशी ही घटस्फोटितांची कथा आहे. आश्चर्य नाही की त्यांनी पुनर्विवाहाची इच्छा प्रदर्शित केली नसावी. वैवाहिक जीवनाचा आनंद त्यांना कायमचा पारखा झाला आहे.

पतीचे वृद्धत्व किंवा त्याची आर्थिक विपन्नावस्थाही घटस्फोट घेण्यास पुरेशी कारणे होऊ शकत नाहीत. परंतु ह्याच कारणास्तव दोघांनी घटस्फोट घेतला. किंबहुना आपणास आर्थिक विपन्नावस्था आलेली आहे हे लक्षात घेऊन पत्नीला घटस्फोट घेण्यास पतीने सांगितले.

वर उल्लेखिलेल्या आठ घटस्फोटितांच्या उदाहरणांमध्ये जर विभक्त झालेल्या सव्वीस जणींची उदाहरणे जमा केली तर भग्नकुटुंबांचे प्रमाण ३.१७ इतके होते ह्या पतीपासून विभक्त रहाणाऱ्या सर्वच स्त्रियांनी कोर्टामार्फत विभक्तीकरण घेतलेले नाही. दूर रहाण्याच्या कारणांपैकी सात जणींच्या बाबतीत पतीचे क्रौर्य हे एक आहे. शिक्षित मध्यमवर्गातील पत्नीच्या अंगावर हात उगारल्याची दोन उदाहरणे आहेत (गट ब). येथे असे करण्यास त्यांच्या सास्वांनी मुलांना प्रवृत्त केले. दोघेही व्यापारी असून त्याकरिता ते मुंबई सोडून गेले होते. आपण आपल्या स्वकीयांपासून दूर आहोत तेव्हा पत्नी आपल्या पूर्णतया ताब्यात आहे तिला कसेही वागविता येईल, म्हणून मारहाणीपर्यंत मजल गेली. परंतु ही वागणूक त्या स्त्रियांना सहन झाली नाही आणि त्या आपल्या माहेरी परतल्या. तेथे त्या शिक्षिका होण्याच्या मार्गावर आहेत. ह्या सातजणींच्या भरीला तिघीजणी पतीची छळणूक म्हणून दूर रहात आहेत.

दुसऱ्या सात जणींनी पतीने दुसऱ्या स्त्रीबरोबर विवाह केला हे विभक्त रहाण्याचे कारण सांगितले. हिंदू, स्पेशल किंवा ख्रिश्चन ह्या तिन्ही कायद्यांनी द्विभार्या करण्यास परवानगी नाही! वैताग येऊन त्या घर सोडून बाहेर पडल्या. ह्याच्या उलट एका सुसंस्कृत व शिक्षित घराण्यातील स्त्रीचे उदाहरण आहे. ती दिसण्यात नाकीडोळी नीटस आहे. लग्न होऊन दोन वर्षे लोटण्याच्या आतच एके दिवशी अचानकपणे तो एका स्त्रीला घेऊन आला आणि तिला सांगितले, "ही तुझी सवत !" तिची काय स्थिती झाली असेल ह्याची कल्पनाच करणे बरे ! पण ती बाई आपल्या सधन माहेरी

परतली नाही. कॉलेजात जाऊन शिक्षण घेतले आणि आता शिक्षिका म्हणून काम करीत आहे. शिक्षण पुरे झाल्यावर सासूच्या सांगण्यावरून पतीच्या घरी रहात आहे. वैवाहिक सुखास मात्र अंतरली आहे. उरलेल्या नऊ जणींनी विभक्त रहाण्याची कारणे नमूद केली नाहीत.

"कादंबरीव्यतिरिक्त आवडनिवड, स्वभाव, ध्येये आणि उद्देश अशा हरएक बाबतीत पतिपत्नीचे एकमत झाले आहे असे क्वचितच घडून येते. न बदलता येण्यासारखी काही स्वभाववैशिष्टचे रहाणारच आणि वैशिष्टचांचा उपयोग सुसंगत जीवन घालविण्याकरिता करणे हे विवाहसंस्थेचे कार्य आहे. आपला जोडीदार निवडण्याचे थोडे स्वातंत्र्य असले तरी अत्यंत विचारपूर्वक जमवून आणलेल्या विवाहांतही योगायोगाचा बराचसा भाग असतो. अत्यंत विभिन्न व्यक्तींना एकच सामान्य ध्येय एकत्रित बांधून ठेवू शकते."[३२] असे डॉ. राधाकृष्णन् म्हणतात.

सदरहू माहिती गोळा करीत असताना लेखिकेने एका महिलाश्रमास भेट दिली व तेथील स्त्रियांच्या २२ प्रश्नपत्रिका भरून घेतल्या. ज्याअर्थी ह्या स्त्रियांची उदाहरणे असाधारण आहेत त्याअर्थी त्यांचा समावेश इतर स्वाभाविक जीवन घालविणाऱ्या १७९३ स्त्रियांमध्ये केलेला नाही. तथापि त्यांच्या जीवनेतिहासावरून सामाजिक परिस्थितीवर वेगळाच प्रकाश पडतो. म्हणून त्यांची माहिती थोडक्यात पुढे दिली आहे.

शारीरिक व्यंग असलेल्या दोन मुलींनी आश्रमाचा आश्रय घेतला होता. सावत्र आईचा छळ टाळण्याकरिता आपल्या दोन मुलींना एका पित्याने आश्रमात ठेविले होते. फौजदारी गुन्हा शाबीत झालेल्या दोन स्त्रियांना त्या सुधाराव्यात म्हणून कोर्टाने आश्रमात पाठविले होते. एक अनाथ आहे. चारजणींच्यावर बलात्कार झाला होता. तिघीजणींना जुलुमाने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात होते. त्यातून सुटका करून आश्रमाकडे रवानगी करण्यात आली होती. वेश्येचे जीवन हे अत्यंत लाजिरवाणे आहे. स्त्रीवर व समाजावरही हा एक कलंक आहे. परंतु वेश्याव्यवसाय हा विषय प्रस्तुत संशोधनाबाहेरील असल्यामुळे त्याची अधिक चर्चा करता येत नाही.

पतीसमवेत आयुष्य कंठणे अशक्य झाल्यामुळे दोन स्त्रियांना आश्रमाचा आधार घ्यावा लागला; कारण परस्त्रीबरोबर त्यांचे पती संबंध ठेवीत होते. एका नवऱ्याने तर बायकोला बाहेर काम करून सवतीचे पोट भरण्यास फर्माविले ! एका उदाहरणात तर कुटुंबावर आर्थिक आपत्ती आली म्हणून मुलीने बाहेर काम करण्याचे ठरविले. बाप अंथरुणाला खिळला असल्यामुळे बापाच्या तथाकथित शेजारी मित्राने तिला आपल्या दुकानात काम देण्याचे कबूल केले. त्या मुसलमान मित्राने हळूहळू तिला घरी बोलावण्यास सुरवात केली. एके दिवशी तिला घरात कोंडले, तिचा विनयभंग केला, केस कापले आणि मुसलमान म्हणून तिला बाटविण्याच्या विचारात होता. ह्या खडतर प्रसंगातून तिने पळून जाण्याचा प्रयत्न केला असताना तिच्या अंगा-

वर घासलेट ओतले. त्यातून तिने मोठ्या शिताफीने सुटका करून घेतली आणि जवळच्याच आश्रमाचा आधार घेतला. हे प्रकरण पुढे बरेच चिघळले आणि संस्थेला तिच्यासाठी बरीच खटपट करावी लागली.

जवळजवळ अशाच कारणाकरिता दुसऱ्या पाचजणी आश्रमात रहात होत्या. अशावेळी आश्रमाचे अधिकारी शक्य असेल त्या ठिकाणी घटस्फोट घ्यावयास लावून पुनर्विवाह करून देतात. अशी ही बावीस जणींची कहाणी आहे.

वरील बावीस जणींची प्रत्यक्ष माहिती घेतल्यावर महिलाश्रमाच्या सन्माननीय चिटणिसांची भेट घेतली, ते म्हणाले की, पतीने वाईट रीतीने वागविल्याने, वेळेला मारल्यामुळे सर्वसाधारणपणे तीन चार स्त्रिया दर महिन्याला आश्रमात दाखल होतात. पुढे ते आणखी म्हणाले की कायद्याने जरी द्विभार्या प्रतिबंध घातला असला तरी पुरुष त्यातून वाट काढतात. एक बाई 'ठेवतात', घरात आणूनसुद्धा. चिटणिसांच्या मते विवाहाचे वाढते वय आणि मुलामुलींना एकत्र मिसळण्याची वाढती संधी ह्यांतून विवाहपूर्व स्त्रीपुरुष संबंध निर्माण होतात आणि त्याचा कौटुंबिक जीवनावर दुष्परिणाम घडून येतो.

आश्रमविषयक स्त्रियांचा प्रश्न येथेच पुरा करून पहाणीतील स्त्रियांच्या वैवाहिक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेऊ या. एकंदरीने पहाता चित्र तर बरेच समाधानकारक आहे. मानवी दुर्बलता, त्यातच प्रतिकूल अगर अनपेक्षित परिस्थिती असल्यास काही गैर प्रकार पूर्वीही निर्माण होत असत आणि आताही होताहेत. त्याचे पर्यवसान पतिपत्नी विभक्त होणे अगर घटस्फोट घेणे, असे झाल्यास आश्चर्य नाही. पूर्वी नसलेले असे दोन नवे मार्ग आज स्त्रीला उपलब्ध झाले आहेत. लग्नाची बेडी तोडून टाकणे आणि दुसरे म्हणजे शिक्षण घेऊन नोकरी, व्यवसाय करून स्वाभिमानी जीवन जगणे हे आज आधुनिक स्त्रीला शक्य झाले आहे.

ह्या चित्रणात एक गोष्ट खटकते आणि ती म्हणजे कुमारिकांची फार मोठी संख्या (४० टक्के). ह्यांपैकी काही जणींचे विवाह होतीलही. पण इतरांपैकी काहींनी आजीव कौमार्यावस्था पत्करण्याचे ठरविले आहे तर काहींच्यावर ते लादले गेले आहे. त्यांच्यावर सक्तीचे कौमार्य रहाण्याचे कारण म्हणजे आमच्या चालीरीती व दृष्टिकोन फारसा बदलला नाही. ह्याला उपाय, केवळ कायद्याची कास धरून होणार नाही तर स्त्रियांनीच स्वावलंबन व स्वसंयम करून सांस्कृतिक पातळी उंचावण्यामध्ये आहे. तथापि आणखी जे काही गैर प्रकार व प्रवृत्ती दिसून येत आहेत त्यांचा विचार पुढे करण्यात येईल.

प्राध्यापक घुर्ये यांच्या मते भारतीय संस्कृतीने विवाहाचे जे उद्दिष्ट घालून दिले आहे ते अखिल जगाने आपल्या डोळ्यांसमोर ठेवून आचरण्याचा प्रयत्न करावा. वाटल्यास त्यातील विधीचा भाग गाळून टाकावा. ते म्हणतात, "मुलीचा पिता अगर त्याच्यासमान इतर वडीलधारी व्यक्ती कन्येचे विधिपूर्वक मुलाला दान देते. हे दान

देण्यात मानवी जीवनाचे जे चार पुरुषार्थ सांगितले आहेत त्यांतील धर्म, अर्थ आणि काम हे उभयतांनी मिळून साध्य करावयाचे आणि ज्याअर्थी धर्म म्हणजे 'धार्मिक कर्तव्य'–त्यातून मोक्ष प्राप्त होतो–त्याअर्थी मानवी जीवनाचे आदर्श हेतू साध्य करून घेण्याकरिता वरवधू एकमेकांशी संलग्न होत असतात असा भारतीय विवाहाचा उद्देश आहे."[३३]

### संदर्भ


१. वेस्टरमार्क, दि ओरिजिन अॅन्ड डेव्हलपमेंट ऑफ मॉरल आयडियाज्, व्हॉल्युम ii पा. ३६४.

२. मुल्ला, दि हिंदू लॉ, विभाग ७, पा. ६३८.

३. एल्. टी. हॉबहाऊस, मॉरलस् इन् एव्होल्युशन (१९५१), पा. १७८.

४. 'हिंदू वुमन् अॅन्ड हर फ्यूचर' मधील परिशिष्ट ड, पा. २८६.

५. एल्. टी. हॉबहाऊस्, उपरोक्त ग्रंथ, पा. २३२.

६. डॉ. पां. वा. काणे, हिस्ट्री ऑफ् धर्मशास्त्र, खं. ii, भा. i, पा. ४३६.

७. पी. के. मोकाशी, सम् सोशल आस्पेक्टस् ऑफ् मॅरेज्–पूना डिस्ट्रीक्ट (१९५५-५६), पा. १४०.

८. जे. एम्. फुस्टर, एस्. जे. सायकॉलॉजिकल् कौन्सेलिंग इन् इंडिया (१९६४), पा. १२१.

९. सायन्स रिपोर्टर, मे १९६६, पा. २२४.

१०. एनसायक्लोपिडीया ऑफ् सोशल सायन्सेस् (१९५४), व्हॉल्युम 'डावरी', पा. २३१.

११. एम्. एम्. सिद्दीक्, वुइमेन इन् इस्लाम्, पा. ५३.

१२. यू. टी. ठाकूर, सिंधी कल्चर (१९५९), पा. १९९.

१३. ,, ,, पा. ९४.

१४. ,, ,, पा. ९३.

१५. तक्ता ३ पहा.

१६. ,, ,,

१७. टी. व्ही. स्वामीनाथन्, दि फायनॅन्शियल एक्सप्रेस, २० जून १९६६.

१८. एम्. एम्. सिद्दीक, उपरोक्त ग्रंथ, पा. १०२.

१९. हिंदू वुमन् अॅन्ड हर् फ्यूचर, तक्ता ५, पा. २८२.

२०. जी. एस्. घुर्ये, अॅन्थरोपो-सोशलॉजिकल पेपरस् (दि एज् अॅट् मॅरेज्, १९३५), पा. ६६-६७.

२१. ज्योती त्रिभुवन, लॉ रिलेटिंग टु वुइमेन् इन् इंडिया (१९६५), पा. १२.
२२. "ऑल् इंडिया टेबलस् व बहुतेक सर्व राज्यांतील टेबलस्करिता ०-९ ह्या वयोमान गटातील लोकसंख्या 'केव्हाही विवाहित नाही' अशी गणली गेली आहे. परंतु काही राज्यांनी ह्या गटाची वास्तव वैवाहिक स्थिती नमूद केली आहे, ती त्या राज्यांच्या टेबलस्‌मध्ये दिली आहे."
—ऑल् इंडिया सेन्सस् रिपोर्ट १९६१, पार्ट iic, पा. १७.
२३. डेव्हिड ॲन्ड व्हिरा मेस, मॅरेज् ईस्ट ॲन्ड वेस्ट (१९६७), पा. २९७.
२४. " " " " पा. २९३.
२५. " " " " पा. २९५.
२६. " " " " पा. २९५-३००.
२७. डेनिस् डी रुगमॉन्ट्, 'दि क्रायसिस् ऑफ् दि मॉडर्न कपल', इन् रूथ नन्दा ॲन्शेन् (संपादित), दि फॅमेली (१९५९), पा. ४५०-५२.
२८. जी. सी. हॅलन्, 'ॲटिटयूडस् ऑफ् एज्युकेटेड् यूथ टोवर्डस् मॅरेज्', सोशल वेलफेअर, फेब्रुआरी १९६६, व्हॉल्युम् xii, नं. ११ पा. ९-१०.
२९. मिचेल् बेन्सन्, मॅरेज् ॲट् रिस्क (१९५८), पा. २२.
३०. ज्योती त्रिभुवन, उपरोक्त ग्रंथ, पा. ३५-३६.
३१. मॅबेल् फॉन्सिका, कौन्सिलिंग फॉर् मॅरिटल् हॅपिनेस् (१९६६), पान ५३.
३२. एस्. राधाकृष्णन्, दि हिंदू व्हयू ऑफ् लाइफ्, पा. ८५.
३३. जी. एस्. घुर्ये, फॅमेली ॲन्ड किन् (१९५५), पा. ९२.

# प्रकरण ३ रे

# कुटुंब

कुटुंब ह्या संस्थेशी सर्वसाधारण मानवप्राणी इतके परिचित आहेत की त्यांना कुटुंबाची व्याख्या करण्याची आवश्यकता वाटत नाही. तथापि एक सामाजिक संस्था म्हणून तिचे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. निरनिराळ्या समाजशास्त्रज्ञांनी त्या संस्थेच्या एखाद्या पैलूवर जोर देण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. अशा सर्व व्याख्यांचे प्रा. बर्नार्ड फार्बर आपल्या 'किन्शिप् अॅन्ड फॅमिली ऑरगनायझेशन्' ह्या अलिकडील ग्रंथात पुढीलप्रमाणे समालोचन करितात : "जन्म व विवाह ह्यांनी निश्चित केलेल्या नात्यावर आधारलेले सामुदायिक अंगीकृत साहस म्हणजे कुटुंब होय."[१] हे सामुदायिक साहस यशस्वीरीत्या कार्यरत रहाण्यासाठी योग्य प्रकारच्या विवाहावर कसे अवलंबून असते हे गेल्या प्रकरणात अगदी स्पष्ट झाले आहे.

मॅक्आयव्हर आणि पेज ह्या दोन अधिकारी व्यक्तींनी ह्या संस्थेचे महत्त्व पुढील-प्रमाणे दाखवून दिले आहे: "ही संस्था समाजाच्या सर्वांगीण जीवनावर विविध प्रकारे परिणाम करते इतकेच नव्हे तर त्या संस्थेत झालेल्या बदलांचे पडसाद अखिल समाज-रचनेत उठत असतात. आधुनिक कुटुंबाची प्राथमिक कार्ये म्हणजे (१) प्रजोत्पादन, बालसंगोपन, (२) पतिपत्नींच्या लैंगिक गरजांचे एकमार्गी समाधान, (३) ऐहिक, सांस्कृतिक आणि प्रेममय समाधानाचे स्थान अशा गृहाची भागीदारी. यशस्वी कुटुंबातच फक्त ह्या तीन कार्यांचे एकीकरण असे होते की जे परस्परपूरक असून परस्परांना संपन्न करीत असते."[२]

व्यक्तीचा योग्य विकास होण्यास आणि त्याचे सामाजीकरण होण्यास तसेच समाजाच्या स्थैर्यासाठी ह्या संस्थेचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे हे निर्विवाद आहे. काही कुटुंबांतील विस्कळीतपणातून बालगुन्हेगारीस किंवा वेश्याव्यवसायास उत्तेजन मिळते हे कु. हंसा शेठ व डॉ. एस्. डी. पुणेकर ह्यांनी अनुक्रमे 'ज्युव्हिनाइल डेलिक्वंसी इन् अॅन् इंडियन सेटिंग' आणि 'ए स्टडी ऑफ् प्रॉस्टीटयूटस् इन् बॉम्बे' (वुइथ रेफरन्स टू फॅमिली बॅक्ग्राऊंड) ह्या ग्रंथांतून दाखवून दिले आहे.

अविभक्त कुटुंबपद्धती हे एक भारतीय संस्कृतीचे वैशिष्टच समजले जाते. वर वर्णिलेले मूळ कुटुंबापासून होणारे फायदे अविभक्त कुटुंबापासून अधिक प्रमाणात होण्याचा संभव असतो. मुल्लांच्या मते, "संयुक्त आणि अविभक्त हिंदू कुटुंब हे हिंदू समाजातील स्वाभाविक कुटुंब आहे आणि एका पूर्वजापासून पुरुष वंशजांतून ते चालू

रहाणे ही त्यातील मूलभूत कल्पना आहे."[३] प्रा. घुर्ये म्हणतात, "अशा तऱ्हेने मूळ पुरुषापासून दोन पिढयांच्या भावी वारसदारांचा एक गट म्हणजे अविभक्त कुटुंब; कारण ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात बौद्धायनाने घालून दिल्याप्रमाणे तीन पिढयांपर्यंत वारसा अविभक्त असल्यामुळे प्रत्यक्षात ह्यांचेच एक कुटुंब बनत असे."[४]

परंतु ह्या अविभक्त कुटुंबपद्धतीत प्रा. कापडीयांच्या मते, "स्त्रीशिक्षणामुळे हिंदू विवाह व कुटुंबाच्या उद्दिष्टात आणि व्यवहारात आमूलाग्र बदल झाला आहे."[५] शिक्षणाच्या जोडीला घराबाहेरील काम हेही जबाबदार आहे असे मला म्हणावेसे वाटते.

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाकरिता वर उल्लेखिलेल्या कारणांचा जरी अभ्यास करावयाचा असला तरी अविभक्त कुटुंबपद्धतीचा लोप होण्यास केवळ तीच कारणे जबाबदार नाहीत. औद्योगिक क्रांतीपूर्वी कुटुंब हे एक उत्पादनाचे केन्द्र होते. शेती-खेरीज हे उत्पादनाचे कार्य कुटुंबाकडून कारखाने व इतर मोठ्या प्रमाणावरील उत्पादनक्षेत्राकडे गेले आहे. विभाजनकेन्द्र व व्ययकेन्द्र म्हणूनही कुटुंबात थोडा बदल होऊ लागला आहे. लांबून कामासाठी येणारे स्त्रीपुरुष आपले मधल्यावेळचे जेवण बाहेरच घेतात. शिवाय शहरामध्ये तयार पदार्थ इतके उपलब्ध होऊ लागले आहेत की ते घरी करण्याची जरुरी वाटत नाही.

नागरीकरण आणि काम मिळण्याची वाढती संधी म्हणून अनेक लोक आपले मूळ खेडयातील कुटुंब सोडून शहराकडे धाव घेतात. जरी अविभक्त कुटुंब हे भारताचे वैशिष्टय असले तरी "आधुनिक सुधारणेची सर्वांगीण प्रक्रीया" मॅक् आयव्हर आणि पेज ह्यांनी पुढील शब्दांत म्हटल्याप्रमाणे जशी मूळ कुटुंबावर परिणाम करीत आहे तशीच ती अविभक्त कुटुंबावरही करीत आहे : "कुटुंबाच्या कार्यातील घट व त्याकरिता घ्यावे लागणारे कमी श्रम आणि त्यामुळे स्त्रियांना मिळणारी वाढती फुरसद, संततीनियमन अगर दोन अपत्यांत दीर्घकाल वगैरे कारणांमुळे आजच्या व भावी कुटुंबाचे परिवर्तन झाले आहे."[६]

ह्या पहाणीनुसार कोणते बरे नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत? गट अ व ब ह्यांतून तुलनात्मक दिसणारे कुटुंबाचे चित्रण तक्ता १४ मध्ये दिले आहे.

उत्तर देणाऱ्या स्त्रियांचे कुटुंब कशा प्रकारचे आहे हे समजून घेण्याकरिता: "तुमचे अविभक्त कुटुंब आहे काय? असल्यास त्याच्या सदस्यांची संख्या किती व त्याचे तुमच्याशी कोणते नाते आहे?" असा प्रश्न विचारिला होता. त्यांच्यापैकी कोणी सासू व सासरे, दीर व जाऊ आणि त्यांची मुले तसेच नणंदा ह्यांच्यासहित किंवा ह्यांच्यापैकी कुणा एकाजवळही त्या रहातात. उत्तरे लिहिताना सर्वांनीच आपले नाते सांगितले नाही. त्यामुळे वर दिलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे अविभक्त कुटुंबात त्या रहातात की नवीन उपयोगात येत असलेल्या समाजशास्त्रीय शब्दप्रयोगाप्रमाणे 'विस्तारित' कुटुंबात रहातात हे निश्चितपणे ठरविणे कठीण आहे; म्हणून त्या कायदेशीर अर्थाने

## तक्ता १४

कुटुंबांची संख्या, व्याप्ती, प्रकार–विस्तारित, मूळ, भग्न–
कुटुंबसदस्यांची प्रतिक्रिया आणि असंतोषाची कारणे

| गट | कुटुंबांची संख्या | स्त्रियांची संख्या | हिंदू | अहिंदू | विस्तारित कुटुंबांतील संख्या | मूल कुटुंबांतील संख्या | भग्न कुटुंबांतील संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | .. १५३४ | १५३४ | १३९१ | | ४६१ | ९२० | १० |
| | | | | १४३ | | १३६ | ७ |
| | १५३४ | १५३४ = | १३९१ + | १४३ = | ४६१ + | १०५६ + | १७ |
| ब | .. १४३ | २५९ | १४१ कुटुंबे | | ४३ | ९३ | ५ |
| | | | — | | — | — | |
| | | — | २५६ स्त्रिया | | १३१* | १३१ | |
| | | | २/३ | | | २/३ | |
| | १४३ | २५९ | | १४१+२ | ४३ | ९५ | ५ |
| | | | | २५६+३ | १३१ | १२३ | ५ |
| अ+ब | .. १६७७ | | = १५३२ + | १४५ = | ५०४ + | १,१५१ + | २२ (स्त्रियांची कुटुंबे) |
| | | १,७९३ = | १६४७ + | १४६ = | ५९२ + | १,१७९ + | २२संख्या |

| गट | विस्तारित कुटुंबातील संख्या | | संबंध | | | वितुष्टाची कारणे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | समाधानकारक | असमाधानकारक | दिले नाहीत | छळ | वाईट वागणूक | आर्थिक कारणे व हुंडा | दिली नाहीत | बेरीज |
| | वि[1] | अ[2] | | | | | | | | |
| अ | ४६१ | | | | | | | | | |
| | २८९ | १७२ | =३७७ | ६५ | १९ | १२ | ९ | ११ | ३३ | =६५ |
| ब | १३१ | | | | | | | | | |
| | १०३ | २८ | =१२२ | ५ | ४ | | | | ५ | =५ |
| अ+ब | ३९२ | २०० | =४९९ | ७० | २३ | १२ | ९ | ११ | ३८ | =७० |

[1] विवाहित [2] अविवाहित

**तक्ता १४** (पुढे चालू)

| गट | हिंदू विवाहित स्त्रियांची संख्या: विस्तारित कुटुंबात | मूळ कुटुंबात | मूळ कुटुंबातील अहिंदू स्त्रियांची संख्या | बेरीज | पतिपत्नी संबंध: पूर्णपणे समाधानकारक | काही अंशी समाधानकारक | उत्तर दिले नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | २८९ | ४६९ | ९४ | ८५२ | | | |
| ब | १०३ | ९३ | २ | १९८ | | | |
| | | | | १,०५० | | | |
| विधवा व घटस्फोटिता वगैरे वगळून | | | ५७ + ६ = ६३ | | | | |
| | | | | ९८७ | ९५७ | १२ | १८ |

| कुटुंबाची व्याप्ती | गट | मर्यादा | सदस्यांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|
| | अ | ३/२२ | ५.१६ |
| | ब | ५/१४ | ७.९४ |

अविभक्त कुटुंबात रहात असल्या तरी विस्तारित कुटुंब असाच अधिक व्यापक अर्थी शब्दप्रयोग येथे वापरण्यात आला आहे.

अ गटातील १,५३४ स्त्रियांपैकी १,३९१ हिंदू असून त्यांतील ४६१, किंवा ३२.६६ टक्के विस्तारित कुटुंबात रहात आहेत. सदस्यांची संख्या ३ पासून २२ आहे. दुसऱ्या गटातील १४१ कुटुंबांपैकी ४३, किंवा ३० टक्के अशा प्रकारची कुटुंबे असून ५ पासून १४ पर्यंत सर्व नातेवाईक एकत्र रहातात. अ गटातील कुटुंबाची सरासरी व्याप्ती ५.१६ व ब गटाची ७.९४ आहे. ह्यावरून शिक्षित भगिनींचा कल मर्यादित कुटुंबाकडे आहे असे दिसून येते.

पन्नाशीच्या वयाला मनुष्य वृद्धावस्थेकडे झुकू लागला असे म्हणावयास हरकत नाही. पन्नाशीच्या वर व ५८ च्या आत–५८च्या आसपास सामान्यतः सेवानिवृत्त होत असतात–अ गटात १७.१ टक्के स्त्रिया आहेत तर पन्नाशीच्या वर ब गटात

२७.४१ टक्के आहेत. ह्या बहुतेक स्त्रियांना कुणा ना कुणा मिळवित्या नातेवाईकावर अवलंबून रहावे लागणार आहे. उलटपक्षी अ गटातील १७ टक्के स्त्रियांना काहीतरी वृद्धापकाळाची तरतूद करता आली आहे. ज्या सरकारी कर्मचारी आहेत त्यांना पेन्शन मिळेल तर इतरांना प्रॉव्हीडंट फंडाची सोय आहे. स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्यांनाही थोडेफार बचत केल्याचे समाधान असावे. अशा तऱ्हेने ह्या स्त्रिया कुणाला भार म्हणून वाटणार नाहीत.

"अविभक्त कुटुंबातील मंडळींबरोबर तुमचे संबंध समाधानकारक आहेत की असमाधानकारक? तसे असल्यास कोणती कारणे आहेत?" अ गटातील ८२ टक्के व ब गटातील ७९ टक्के स्त्रियांनी ते समाधानकारक आहेत असे कळविले तर अनुक्रमे १४ व ११.६३ टक्के महिलांनी उलट उत्तर दिले आहे आणि उरलेल्या स्त्रियांनी काहीच म्हटले नाही. मिळवित्या स्त्रिया सासरच्या इतर मंडळींबरोबर जमवून घेतात हे त्यांना एका दृष्टीने भूषणावह आहे. त्याबरोबरच त्यांनाही अनेक फायदे असतात. घरच्या सूनेने गृहकृत्ये करावी अशी सामान्यत: अपेक्षा असते. परंतु घरात वडीलधारी व्यक्ती असल्यास कामाचा भार हलका होतो. तसेच मुलांना संभाळण्याकरिता मिळवत्या बाईला नोकर ठेवता आला तरी नोकरावर देखरेख करण्यास घरचे माणूस असले म्हणजे तितकी ती निश्चित असते. ह्या बाबतीत एका स्त्रीरोगचिकित्सक डॉक्टरने केलेल्या विधानाची आठवण येते. ह्या डॉक्टर पाश्चात्य लोकशाही देशांतून पाचसहा वेळा हिंडून आल्या आहेत. "नोकरी अगर व्यवसाय ह्याची आणि मातृत्वाची अशी दुहेरी जबाबदारी स्त्री कितपत उचलू शकते?" असा प्रश्न विचारला असताना त्या म्हणाल्या: "ही दुहेरी जबाबदारी पेलण्यास भारत हा आदर्श देश आहे. कारण येथे अविभक्त कुटुंब आहे आणि नोकर मनुष्यांची कमतरता नाही." त्या पुढे म्हणाल्या: "पाश्चात्य देशांत पहिली गोष्ट नजरेस येते ती म्हणजे वृद्धांची आबाळ! त्यांना फार एकाकी वाटते आणि दिवसेंदिवस आयुर्मान तर वाढत आहे. आमच्यापेक्षा तेथील वृद्धांचे जीवन अधिक स्वास्थ्याचे असेल परंतु त्यात मायेचा ओलावा नसतो. अविवाहित मुलगीसुद्धा आपल्या आईला वृद्धाश्रमाकडे पाठवून देईल."

ज्याअर्थी ह्या पहाणीतील एकतृतियांश कुटुंबे विस्तारित आहेत आणि त्यांतील ८२ टक्के स्त्रियांचे संबंध समाधानकारक आहेत त्याअर्थी अशा प्रकारचे कुटुंब नागरीकरणाचे आणि व्यक्तिवादी विचारसरणीचे आघात सहन करू शकते असे म्हणावयास हरकत नाही. इतकेच नव्हे तर स्त्रीशिक्षण आणि तिचे नियमितपणे कामासाठी घराबाहेर जाणे ह्याचाही परिणाम विस्तारित कुटुंबावर झालेला नाही हे पुढील उत्स्फूर्त विधानांवरून लक्षात येईल: "अविभक्त कुटुंबात अत्यंत सुखी आहे"; "हे एक मला वरदानच आहे"; "अविभक्त कुटुंबामुळे मला नोकरी पुढे चालू ठेवता आली. त्यामुळे मला स्वस्थपणे माझे काम करता येते"; "केवळ अविभक्त कुटुंबामुळे

नोकरीची जबाबदारी उचलणे शक्य झाले आहे"; "मी माझ्या कुटुंबातील मंडळींना मदत करते"; "सासऱ्यांनी मला उच्च शिक्षण घ्यावयास लावले, नोकरी मिळवून दिली आणि ती करणे केवळ अविभक्त कुटुंबामुळे शक्य झाले आहे"—एक विधवा.

ह्या मनोहर चित्रणाची दुसरीही बाजू आहे. ६५ अविभक्त कुटुंबांत परस्पर संघर्ष दिसून येतो. ह्या कुटुंबांत विवाहिताप्रमाणे अविवाहितही उत्तर देणाऱ्या स्त्रिया आहेत. ह्या संघर्षाची कारणे विचारिता अ गटातील ३३ जणींनी व ब गटातील ५ जणींनी उत्तरे दिली नाहीत. बारा स्त्रियांनी आपला छळ होतो असे म्हटले आहे.

घरात आलेल्या नववधूचे दोष काढून व तिचे उणेदुणे काय असेल त्याचा बोभाटा करून, तिला टोमणे मारीत रहाणे, हे सास्वानणंदांचे काम असे आमच्या अनेक म्हणींत* विधान सापडते. असे हे घालूनपाडून बोलणे सुनेने मुकाट्याने सहन केले पाहिजे असा दंडक आहे. त्या व्यक्तींच्या अपरोक्ष स्वाभाविकपणे त्या स्त्रिया आपला "छळ" होतो किंवा "आपणास वाईट रीत्या वागविले जाते" असे सहज बोलून गेल्या. वरील बारा जणींच्या जोडीला दुसऱ्या नऊ जणींनी निराळ्या शब्दांत तेच सांगितले असून दोघी जणी म्हणतात की छळ करण्यात त्यांचे पतिराजही सामील असतात!

आर्थिक ताणामुळे नऊ स्त्रियांच्या कुटुंबांत संघर्ष चालतो. विवाहप्रसंगी हुंडा न दिल्याचा राग सूनेवर काढला जातो. तसेच हुंडा पद्धती कशी स्त्रियांना घातक ठरते हे पूर्वीच[७] विस्तृतपणे दाखवून दिले आहे त्यात ह्या दोन उदाहरणांची भर पडते.

मोठ्या कुटुंबातील असमाधानकारक संबंधांच्या जोडीला काही थोडी उदाहरणे सापडतात की जेथे पतिपत्नी संबंध असावे तसे नाहीत. तरी बरे की ९८७ विवाहित स्त्रियांपैकी ९५७, किंवा ९७.९८ टक्के जोडपी सुखासमाधानाने नांदत आहेत. ह्या विधानाच्या सत्यतेबद्दल कुणी शंका घेईल. पतिपत्नी नाते हे जितके पवित्र तितकेच सलगीचे. त्याबद्दल परक्याजवळ उघड चर्चा करण्यास स्त्रिया नाखूष असतात. त्यामुळे काही जणींनी आमचे सर्व ठीक (?) आहे असे उत्तर दिले असेल. ह्या आक्षेपाला

---

* "आधी करते सून सून, मग करते फूणफूण."
"सासूची झाली होळी, सून वाजवे टाळी."
"उतरंडीला नसावी केळी, घरात नसावी नणंद खेळी."

ह्या म्हणींतून व्यक्त केलेल्या सासू-सून व नणंद-भावजय ह्यांच्यातील विरोधी संबंधाच्या उलट मध्यमवर्गीय मराठी भाषिक स्त्रियांमध्ये सासू-सून, नणंद-भावजय ह्यांनी परस्परांना उद्देशून वापरण्याच्या शब्दप्रयोगात फरक झाला आहे. पूर्वी सासूचा उल्लेख सूनबाई 'सासूबाई' म्हणून करी. आता तिलाही 'आई' म्हणते. उलट सासू पण 'सूनबाई' म्हणून हाक मारीत असे, त्याऐवजी नावाने हाक मारते. नणंदेला 'वन्स' म्हणण्याऐवजी भावजय टोपण नावाने हाक मारीत असते. तसे पाहिले तर नात्यासंबंधी पारिभाषिक शब्द फार दिवस टिकून रहात असतात.

उत्तर इतकेच कीं असे उत्तर देणाऱ्या बऱ्याच स्त्रिया सुखी—निदान वरवर पहाता तरी—दिसल्या. परंतु बारा जणींनी 'काही अंशी असमाधानकारक', व अठरा जणींनी 'असमाधानकारक' अशी उत्तरे दिली आहेत. त्याची टक्केवारी पहाता ती २.०२ इतकी येते. ही टक्केवारी मागील पहाणीच्या[८] टक्केवारी—१३—पेक्षा कमीच आहे.

आपापसातील बेबनावाची कारणे देण्यास मात्र ह्या स्त्रिया नाखूष दिसल्या. एकंदरीने त्या बावीस जणी असून थोड्याच स्त्रियांनी आपले अंतःकरण उघड केले. त्यांपैकी दोघींनी पतीला दारूची सवय असल्याची तक्रार केली. दुसऱ्या दोघी आपले यजमान आपणाबरोबर नीट वागत नाहीत इतकेच म्हणाल्या. मूल होत नाही म्हणून पतिराज नाराज असतात असे गाऱ्हाणे एकीने मांडले. तिघी जणींनी अनुक्रमे पती अहंमन्य, तापट आणि "पागल" आहेत असे नमूद केले. आठ जणींनी दिलेली ही कारणे साधार वाटतात.

आपल्या जीवनविषयक अपेक्षा पतीच्या बाबतीत अपुऱ्या राहिल्या अगर भग्न झाल्या तरीसुद्धा ह्या वर उल्लेखिलेल्या तीस स्त्रिया आपले वैवाहिक जीवन कंठीत आहेत. कदाचित ह्या असंतोषाचा पर्याय घटस्फोटातही होण्याची शक्यता आहे. अलिकडेस प्राप्त परिस्थितीत जमवून घेण्याची प्रवृत्ती कमी झाली असून एकमेकांचे पटत नाही तर विभक्त होणे किंवा घटस्फोट घेणे बरे असे हल्लीच्या पिढीला वाटत असते. तेव्हा ह्या तीसजणी घटस्फोट घेतील असे गृहीत धरल्यास आणि त्या बिसांत विभक्त झालेल्या व घटस्फोट घेतलेल्या चौतीस जणी मिळविल्यास भग्न कुटुंबांचे प्रमाण एकंदरीत विवाहित स्त्रियांमध्ये ६.४६ टक्के येते. उलटपक्षी, ९३.५४ टक्के कुटुंबे यथाक्रम जीवन कंठीत आहेत. समाधानी कुटुंबांचे इतके मोठे प्रमाण पुढील निष्कर्षास पुष्टी देत आहे: "गोळा केलेल्या माहितीवरून असे सूचित होते की (पत्नीच्या) नोकरी/व्यवसायामुळे वैवाहिक समायोजनावर सामाजिक-आर्थिक दृष्ट्या खालच्या पातळीवरील कुटुंबांपेक्षा वरच्या पातळीवरील कुटुंबांवर कमी प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो."[९] वरील टक्केवारीकडे लक्ष दिल्यास समाजशास्त्रीय विचारवंताला फारसे काळजी करण्याचे कारण नाहीं असे म्हणावयास हरकत नाही. त्याचबरोबर मात्र महिलाश्रमातून मिळालेली अल्पशी माहिती नजरेआड करून चालणार नाही. तसेच कुटुंबसंस्थेला हादरा देण्यास ज्या आधुनिक संभाव्य शक्ती आहेत त्या विचारात घेतल्यास ह्या प्रश्नाचा अधिक खोलवर अभ्यास करणे आवश्यक आहे.

दोन महायुद्धे आणि त्यातून झालेले राजकीय-आर्थिक बदल, ह्यांमुळे कुटुंबसंस्थेच्या मुळावरच घाव घातलेला आहे. आश्चर्यकारक द्रुतगतीने हरएक दिशेकडून होत असलेल्या फेरबदलात व त्यातील वादळात सापडलेल्या आधुनिक पिढीला अधिक अस्थिरता वाटत आहे आणि तिची वृत्ती जे सहजी हाती येईल त्याचा सुखोपभोग घेण्याकडे वळत असून पूर्वापार चालत आलेल्या कुटुंबाच्या परंपरेकडे व त्याच्या मूल्यांकडे ती दुर्लक्ष करू लागली आहे. मुलांनाही दिवसेंदिवस कुटुंबावर कमी प्रमाणात अवलंबून

रहावे लागत आहे; कारण कुटुंबाची बरीचशी कार्ये कल्याणकारी संस्थांनी उचलली आहेत. शिवाय कायदाही स्त्रीला अनुकूल आहे. अधिकाधिक प्रमाणात मातेला पित्या-समान मुलांवर अधिकार प्राप्त होऊ लागले आहेत. कुटुंबप्रमुख आणि पालक म्हणून पित्याचा अधिकार कमी होऊ लागल्यामुळे कुटुंबाची जणू परीक्षाच पाहिली जात आहे! पूर्वीसारखा आज्ञाधारकपणा मुलांच्यापासून अपेक्षणे कठीण आहे.

भारतातील काही विशिष्ट शिक्षित वर्गाची प्रवृत्ती पाश्चात्यांचे अंधानुकरण करण्याकडे दिसून येते. पाश्चात्य कुटुंबांपुढील समस्यांबद्दल डेनिस डी. रुगमॉन्ट पुढील विधानापासून सुरवात करतात: ". . . प्रत्यक्ष विचार केला तर पति-पत्नीतील समस्यांपुढे कुटुंबाच्या समस्या दुय्यम ठरतात." १९४७ मध्ये केलेल्या पहाणीनुसार यू. एस्. ए. मध्ये पाच विवाहांत दोन घटस्फोट हे प्रमाण आणि (१९६७ च्या वर्ल्ड आलमानॅक ॲन्ड बुक ऑफ् फॅक्टस्मध्ये १९६५ साली चार विवाहांस एक घटस्फोट हे प्रमाण दिले आहे, पा. ६८३) इतके प्रमाण असल्याने ते पुढे म्हणतात: "अशा तऱ्हेने ख्रिस्ती काळात पहिल्यांदाच कुटुंबाला गंभीर अशी भीती निर्माण झाला आहे." ह्याचे कारण "पाश्चात्य संस्कृती पूर्वीपेक्षा प्रेमाला अधिकाधिक प्रमाणात मोहक वेष देऊ लागली आहे. प्रेमाचा हा नवनवा रंग म्हणजे आमच्या वैवाहिक संस्थांचा शपथपूर्वक शत्रू आणि सर्व ललित साहित्यातील सतत प्रचाराचा आणि सध्याच्या चित्रपटांचा अन्नदाता. आणि दुसरे असे की जीवन असेच आहे हे गृहीत धरले तर असेच पुढे चालेल की नाही हा प्रश्नच आहे. कारण ज्या समाजात सारख्याच प्रमाणात विवाह व घटस्फोट चालू रहातात तो समाज हे फार दिवस सहन करू शकणार नाही."[१०]

१९६७ च्या डेमोग्रॅफिक इयर बुकप्रमाणे एकाच विभागातील दर हजारी लोक-संख्येतील सहा राष्ट्रांचे व सध्याच्या पहाणीचे घटस्फोटाचे कच्चे आकडे पुढे दिले आहेत.

| राष्ट्र | | वर्ष | प्रमाण |
|---|---|---|---|
| यू. एस्. ए. | . . | १९६६ | २.५२ |
| यू. एस्. एस्. आर. | . . | १९६७ | २.८० |
| यू. के. | . . | १९६५ | ०.८० |
| स्वीडन | . . | १९६६ | १.३२ |
| जपान | . . | १९६६ | ०.८० |
| इस्राएल | . . | १९६६ | ०.८५ |
| "अ" गट | . . | १९६५/६६ | ०.२१ |
| "ब" गट | . . | ,, | ०.२४ |
| "अ" व "ब" मिळून | . . | ,, | ०.२२ |

वरील आकडे स्वतः सिद्धच आहेत.

'दी फॅमिली' ग्रंथाच्या संपादिका रूथ नंदा अॅन्शेन ह्या शेवटी निष्कर्ष काढतात: "कुटुंब हे समाजाचे पहिले नैतिक मूळ असून त्या कुटुंबातच व्यक्तिवैशिष्टय आणि वस्तुनिष्ठ सर्वसामान्यत्व ह्यांचा मिलाफ मूर्तिमंत ऐक्यात झालेला आढळतो. आणि पूर्ण परिणत व्यक्ती ही पूर्ण परिणत समाजाची पूर्ती आणि परिपाक आहे. तथापि त्यामुळे समाजापासून व्यक्तीच्या स्वातंत्र्याला उत्तेजन येत नसून जेव्हा धर्मातीतता, समाजस्वामित्ववाद, लोकसंस्कृती ह्या प्रभावी शक्ती समाजावर सतत आघात करीत आहेत तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या परमाणू अवस्थेतून–क्षुद्रपणातून व अनामीत्वातून-अस्तित्वशून्यत्वातून–समाजाची मुक्तता करीत आहे."[११] थोडक्यात कुटुंबाच्या भक्कम आधारामुळेच समाज सावरला जात आहे.

कुटुंबावर सर्व बाजूंनी धक्के बसत असताना आधुनिक स्त्री–कुटुंबाचा जणू कणाच–परस्परविरोधी कार्यात–गृहिणी, माता, यजमानीण, व्यवसायिका, आकर्षक पत्नी, 'संस्कृती'बद्दल उत्साही, सखी शयनेषु रंभा–पकडली गेली आहे. ह्या भूमिकांपैकी काहींचा तिने त्याग केला पाहिजे किंवा काहींना दुय्यम लेखले पाहिजे अथवा त्या अशा रीतीने एकत्रित केल्या पाहिजेत की जेणेकरून तिला सुसंबद्ध व्यक्तिजीवन कंठिता येईल."[१२]

वर वर्णिलेल्या भोवऱ्यात जशी पाश्चात्य स्त्री सापडली आहे तशीच, कमी प्रमाणात का होईना, मध्यमवर्गीय शिक्षित भारतीय स्त्री सापडली आहे. शिवाय अ गटातील १,५३४ महिलांनी अर्थार्जन करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याचा पत्कर घेतला आहे, त्यांपैकी ६६४ माता आहेत. त्यांच्या कुटुंबांची व्याप्ती, आपल्या मुलांची व्यवस्था त्या कशी ठेवतात, आणि त्याचे परिणाम भावी पिढीवर कशा प्रकारचे होतात ह्याचा आता विचार करावयाचा आहे. पंधराव्या तक्त्यावरून त्याची कल्पना येऊ शकते.

अ गटामध्ये ८६९ विवाहित स्त्रिया आहेत असे तक्ता १५ वरून दिसून येते. ह्यांपैकी २०५, किंवा २३.६ टक्के स्त्रियांना अपत्य नाही तर ६६४, किंवा ७६.४ टक्के स्त्रियांना मुले आहेत. अ गटातील स्त्रियांची ब गटातील स्त्रियांबरोबर तुलना केल्यास ह्या दुसऱ्या गटात २०३ विवाहित, त्यांतील २३, किंवा ११.३३ टक्के अपत्य-विरहित असून १८०, किंवा ८८.६७ टक्के स्त्रियांना मुले आहेत. दोन गटांतील मुले असणाऱ्या स्त्रियांची तुलना केल्यास ब गटाची टक्केवारी १२.२७ अधिक भरते. ह्याचे एक कारण म्हणजे ब गटात ४१ वर्षे वयावरील स्त्रिया अ गटातील स्त्रियांपेक्षा अधिक प्रमाणात–२७.४ टक्के व १७.३५ टक्के[१३]–आहेत. दुसरे कारण असे की अ गटातील स्त्रिया मुलांची जबाबदारी पुढे ढकलण्याकरिता जास्त प्रमाणात कुटुंब-नियोजन करीत असाव्या.[१४] तिसरे कारण शोधण्याकरिता जननक्षमता व जननसंख्या ह्यांचा विचार करावयास पाहिजे. जननक्षमता जीवशास्त्रीय नियमांनुसार असते तर जननसंख्या कॉक्सच्या म्हणण्याप्रमाणे : " . . . . स्त्रीचा दृष्टिकोन,

**तक्ता १५**

अपत्यविरहित व अपत्यसहित स्त्रियांची संख्या, वैवाहिक जीवनाची कालमर्यादा, मुलांच्या संख्येची सरासरी, त्यांचे सरासरी वयोमान व त्यांची देखरेख

| गट | संख्या | कुटुंबे | विवाहितांची संख्या | अपत्यविरहित स्त्रियांची संख्या | अपत्यांसहित स्त्रियांची संख्या | वैवाहिक जीवनाची सरासरी कालमर्यादा | एकंदर अपत्यांची संख्या | अपत्यांची संख्या* सरासरी | अपत्यांची संख्या* जास्तीत जास्त | अपत्यांच्या वयाची सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | १,५३४ | १,५३४ | ८६९ | २०५ | ६६४ | १०.४ वर्षे | १,०९६ | १.६५ | ६ | ९.९५ वर्षे |
| | १००% | १००% | ५६.६५% | १३.३६% | ४३.२९% | | | | | |
| | | | १००% | २३.६% | ७६.४०% | | | | | |
| ब | २५९ | १४३ | २०३ | २३ | १८० | १७.२ वर्षे | ७०५ | ३.९२ | ८ | २१.२० वर्षे |
| | | | ७८% | ९% | ६९% | | | | | |
| | १००% | | १००% | ११.३३% | ८८.६७% | | | | | |
| अ+ब | १,७९३ | १,६७७ | १,०७२ | – २२८% | = ८४४ | ११.६५ वर्षे | १,८०१ | २.१४ | ६/८ | १८.३४ वर्षे |

| | अपत्यांची देखरेख: कुटुंब सदस्यांकडून फक्त | अपत्यांची देखरेख: कुटुंब सदस्य व पगारी व्यक्ती | अपत्यांची देखरेख: पगारी व्यक्ती | अपत्यांची देखरेख: संस्था | प्रश्न: मदतीची जरुरी नाही कारण मुले मोठी झाली आहेत | प्रश्न: शिशुसंगोपन गृहाची आवश्यकता भासणाऱ्या स्त्रियांची संख्या | प्रश्न: माता व व्यवसायिका ह्या दोन भूमिकांतील संघर्ष दाखविणाऱ्या स्त्रियांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| फक्त गट अ | २४९ | ५१ | १९६ | ८ | १०९ | ९४ | ७६ |
| | ३०० (२४९ + ५१) | २४७ (५१ + १९६) | | | | | |

*यू. के. संबंधी प्रा. केलसाल म्हणतात : मध्यम व लहान वयाच्या बौद्धिक कर्मचारी गटांत मुलांची संख्या फार कमी असते (१.२९ .. १.२०).

आकांक्षा, बुद्धी व शिक्षण ह्यांवर काही प्रमाणात अवलंबून असते व त्याचप्रमाणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या सरकारचे धोरण आणि आर्थिक परिस्थितीचाही जनन-संख्येवर परिणाम होतो. तसेच व्यवसाय, सामाजिक दर्जा आणि प्रदेश ह्याप्रमाणे पण ती कमी अधिक होत असते."[१५]

वरील कारणपरंपरा मान्य होण्यास अ गटातील मुलांची सरासरी १.६५ तर ब गटातील ३.९१ व वैवाहिक सरासरी कालमर्यादा अनुक्रमे १०.४ व १७.२ वर्षे आहे ही वस्तुस्थितीही पुष्टी देते. जर अ गटातील स्त्रियांची वैवाहिक जीवनाची कालमर्यादा ब गटाइतकी व इतर घटक तेच आहेत असे गृहीत धरले तर त्यांच्या अपत्यांची सरासरी २.७ येते. बरे, अ गटातील स्त्रीला जास्तीत जास्त मुले ६ तर ब गटात ८ आहेत. तेव्हा समान सरासरी वैवाहिक जीवनात ब गटातील स्त्रियांच्या मुलांची सरासरी टक्केवारी ४४ ने जास्त आहे.

कुटुंबांची पहाणी करण्याकरिता काढलेल्या प्रश्नपत्रिकेनुसार कुटुंबातील वयात आलेल्या सर्व स्त्रियांची नोंद घेतली आहे. त्यामुळे ब गटातील वृद्ध स्त्रीची मुले-मुली प्रौढ झाली असून सूना येऊन नातवंडेही झालेली आहेत. म्हणूनच मुलांच्या वयाची सरासरी २१.२ ब गटात येते तर अ गटातील मुलांच्या वयाची सरासरी १०.४ वर्षे आहे. त्याचे कारण अ गटात तरुण स्त्रियांची संख्या अधिक आहे.

मध्यमवर्गीय माता बहुसंख्येने अर्थार्जन करू लागल्या आहेत हो साधारणपणे गेल्या पंचवीस वर्षांतील घटना असल्यामुळे तिची विशेष दखल सरकारने अगर समाजाने घेतलेली दिसत नाही. इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशासंबंधीही असे विधान केले जाते: "सध्याची परिस्थिती धोक्याची आहे अशी आमची खात्री झाली आहे. मातांच्या माथी दोष मारणे ठीक आहे. परंतु उद्योगसंस्था आणि समाज ह्यांनी कर्मचारी स्त्रियांच्या मुलांची देखरेख करण्याबाबत जवळजवळ मुळीच विचार केलेला दिसत नाही." तथापि, फॅक्टरी कायद्याप्रमाणे कारखान्यांत अगर गिरण्यांत जेथे पन्नासच्यावर स्त्रिया काम करतात तेथे शिशुसंगोपनगृहाची तरतूद केली पाहिजे अशी भारतात, यु. के. व इतर पुढारलेल्या देशांत सक्ती आहे. सबंध दिवस काम करणाऱ्या मातांच्या गैरहजेरीत मुलांची व्यवस्थित देखरेख करणे व त्यांचे काळजीपूर्वक संगोपन करणे म्हणजे एक महत्त्वाचा प्रश्न आहे. लंडन कौन्सिल फॉर चिल्ड्रनस् वेलफेअर ह्या संस्थेने या प्रश्नाचा १९६ मध्ये अभ्यास केला व त्यातीलच उतारा वर दिला आहे.त्याचप्रमाणे एफ्.इव्हॅन् नी ह्यांनीही दी एम्प्लॉइड मदर इन् अमेरिका असा विचारप्रवर्तक ग्रंथ लिहिला आहे. अशा ग्रंथांमुळे श्रमजीवी मातांच्या प्रश्नांवर थोडाबहुत प्रकाश पडू शकतो. त्याचप्रमाणे इझ्राएलमधील एक अलिकडील प्रयोगसुद्धा अर्थपूर्ण वाटतो. "'किबुत्झिम्' म्हणजे शेतकऱ्यांच्या सामुदायिक वसाहतीतील एक स्थान असून तेथे मूल जन्मल्यापासून रहाते, झोपते आणि त्याची काळजी घेतली जाते. अशी ती 'शिशुगृहे' आहेत. . . .

काही मातापित्यांना आपल्या मुलांसमवेत घालविण्यास जो वेळ दिला जातो त्याबद्दल ते असंतुष्ट असून त्यांची अधिक वेळाची मागणी आहे. शिवाय दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाच्या मुलांनाही हा वेळ अपुरा वाटतो. विशेषत: रात्रीच्या वेळी ती मुले आपल्या आईबापांपासून दूर होण्यास खुषी नसतात."[१७]

लंडन कौन्सिलने केलेल्या अभ्यासात सबंध दिवस काम करणाऱ्या आणि अर्धा दिवस काम करणाऱ्या माता असे दोन वर्ग पाडले आहेत. त्या ग्रंथात अर्धा दिवस कामाबद्दलच्या मुद्यांची पुढील नोंद केली आहे : "शिवाय बेकारीपेक्षा सबंध दिवस अथवा अर्धा दिवस काम करण्यात स्त्रीच्या दृष्टीने पुढील फायदे आहेत :

(अ) मुलीच्या दृष्टीने अधिक विधायक आदर्श,

(आ) तिचे जीवन अधिक सार्थकी लागते की जेणेकरून आपली मातृत्वाची कर्तव्ये ती चांगल्या रीतीने पार पाडू शकते."

दुसरा एक फरक ह्या ग्रंथात दाखविला असून मुलांच्या वयानुसार कुटुंबांचे त्यात "तीन वर्ग केले आहेत : फक्त कुमार अवस्थेतील मुले असलेली कुटुंबे, ६ ते १२ वर्षांची मुले असलेली कुटुंबे, आणि इतर मोठ्या मुलांबरोबर शाळेत न जाणारी मुले ज्या कुटुंबात आहेत ती." अहवालात म्हटले आहे : "आपल्या मुलांबरोबर संवेदनाक्षम आणि प्रेमाचे नाते संवर्धन करण्यास–ज्यातून त्यांना स्वत:ला आनंद होईल व जे नाते मुले मोठी होऊन स्वत:ची कुटुंबे स्थापन केल्यावरही अवश्य आहे–मातांना संधी (व वेळही) सापडत नाही."

"आपल्या अपत्याबरोबर निकटचे आणि परस्पर समाधानकारक नाते मातेने विकसित करणे, आमच्या मते, एक मूलभूत महत्वाची गरज आहे म्हणून तीन वर्षाखालील मुलांच्या मातेने काम करण्याला आमचा पूर्ण विरोध आहे. . . . तीन ते पाच वर्षांतील बालकांची देखरेख दररोज बराच वेळ आईव्यतिरिक्त दुसऱ्या कोणीही करण्यास हरकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम दृगोचर होत नाहीत उलट झालाच तर फायदाच होतो."

दी चाइल्ड स्टडी सेन्टर रिपोर्ट अगदी स्वच्छपणे सांगून टाकतो की, "एकीच्याकडून दुसरीच्याकडे अशी देखरेख करणारी व्यक्ती बदलत गेल्यास मुलांमध्ये गंभीर स्वरूपाचे बिघाड निर्माण होतात."[१८]

एफ्. इव्हॅन् नी म्हणतात : "शाळेत जाण्याच्या वयापूर्वीच्या बालकांच्या माता अर्थार्जन करीत असल्या तरी केवळ तेवढ्यानेच मुलांचे नुकसान होत नाही असे शोधाअंती दिसून येते."[१९] कौमार्यावस्थेतील मुलींसंबंधी म्हटले आहे : "मध्यमवर्गीय कर्मचारी मातांच्या मुली . . . तुलनात्मक दृष्ट्या पहाता अधिक उद्योगी, स्वावलंबी असून आपल्या मातांकडे आदराने पहातात परंतु सामान्यत: कुटुंबाशी फारशा निगडित नसतात . . . अर्थार्जन न करणाऱ्या मातांच्या मुलींपेक्षा ह्या मुली आपल्या आयांना आदर्श म्हणून पसंत करतात."[२०] मुलांच्याबद्दल : "कुमारांच्या जीवनात

आईचे बाहेरील काम हा कमी महत्त्वाचा घटक आहे."[२१] आणखी "आईच्या बाहेरील कामामुळे मुलांमुलींच्या अभ्यासाची प्रगती अगर आकांक्षा सामान्यत: खालच्या पातळीवर आणिली जात नाही."[२२]

कर्मचारी स्त्रीच्या दृष्टीने भारतापेक्षा यू. के. अगर यू. एस्. ए. येथील जीवनक्रम अधिक अनुकूल आहे. तेथे शिशुसंगोपनगृहे, बालगृहे, बालशाळा आणि लहान मुलांचे क्लब व वाचनालये अशा अनेक तऱ्हेच्या संस्था आहेत. परंतु त्या पुरेशा नाहीत अशी लंडन कौन्सिल फॉर चिल्ड्रन्स् वेलफेअरची तक्रार आहे. आम्हीही अशा संस्था काढू लागलो आहोत. परंतु त्या फार थोड्या व अगदीच अपुऱ्या आहेत. आता पहाणीतल्या मातांच्या मुलांची व्यवस्था कोण पहाते ते पाहू. तक्ता १५ मध्ये दिल्याप्रमाणे २४९ स्त्रियांची मुले घरच्यापैकीच कुणीतरी–बहुधा आजी–संभाळीत असते. आईच्या गैरहजेरीत आजी ही घरातच असते व तितक्याच प्रेमाने नातवंडांना संभाळते असे गृहीत धरण्यास हरकत नाही. दुसऱ्या ५१ स्त्रिया खास मुलांसाठी नोकर ठेवतात पण तो अगर ती ही घरातल्या माणसाच्या देखरेखीखाली असते. तेव्हा लंडन कौन्सिलच्या अभ्यासानुसार ह्या ३०० मातांच्या मुलांची काळजी करण्याचे कारण नाही. "जेव्हा आई कामाला जाते तेव्हा शाळेत जाण्याइतके वय न झालेल्या मुलांची काळजी घेण्यात अजूनही आजीचा पहिला क्रमांक लागतो असे आम्ही म्हणू शकतो."[२३] म्हणूनच की काय, पहाणीतल्या अनेक स्त्रियांच्या तोंडून अविभक्त अगर विस्तारित कुटुंबाबद्दल प्रशंसोद्गार निघाले असल्यास नवल नाही.[२४]

आठ स्त्रियांनी आपली मुले 'माझी आई' अगर शिशुसंगोपनगृहे येथे ठेवतो असे नमूद केले आहे.

ज्या १९६ माता आपली मुले पगारी नोकरांच्या स्वाधीन करून जातात त्यांच्या मुलांचा प्रश्न विचारात घेण्यासारखा आहे. आधीच भारतात 'आयां'ची संख्या कमी. ज्या मिळतात त्या शिकलेल्या नसतात आणि मुलांसंबंधी आपल्या कर्तव्याची त्यांना तितकी जाणीव नसते. अशा परिस्थितीत आईचे लक्ष धड ना कामाकडे ना मुलांकडे. "कामाकरिता बाहेर जाणाऱ्या आईऐवजी जी व्यक्ती मुलाची काळजी घेण्यास ठेवली जाते, ती व्यक्ती ज्या गुणावगुणांची असेल त्यावर त्या मुलाचे कल्याण आणि भावी विकास फार मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो."[२५] म्हणूनच ह्या पहाणीतल्या ९४ स्त्रियांनी शिशुगृहांसाठी फार जोरदार मागणी केली. ही आपली मागणी मांडताना ही गृहे मुंबईसारख्या शहरी मध्यवर्ती ठिकाणी असावी, कचेरी-जवळ असू नयेत असेही सुचविले. कचेरीस जातायेता लोकल गाडी किंवा बस ह्यातून प्रवास करणे म्हणजे एक दिव्यच असते असे त्यांचे म्हणणे पडले. हरएक दिवस म्हणजे त्यांच्याच शब्दांत 'जिंकू किंवा मरू' असा जीवनमरणाचा असतो! आईचीच जर अशी धडपड चालते तर त्यात लहान बाळ आणि त्याची अंगडी टोपडी घेऊन कचेरीला कसे पळावे बरे?

मुलांच्या शिक्षणाबद्दल अगर शिस्तीबद्दल कोणताच प्रश्न विचारिला नव्हता. फक्त "तुम्ही अर्थार्जन करीत असाल तर मुलांची काय व्यवस्था करिता?" येवढीच चौकशी केली होती. त्यावरून वर दिलेली माहिती तर मिळालीच, त्याव्यतिरिक्त दोन्ही गटांतील स्त्रियांबरोबर अनौपचारिक संभाषण चालू असता जे काही समजले तेही लक्षात घेण्यासारखे आहे.

अ गटातील ९ स्त्रियांना मूल नसल्याचे दुःख वरेच जाणवत आहे. स्त्रीमधली मातृत्वाची भावना इतकी जबरदस्त आहे की तिची परिपूर्ती झाली नाही तर तिच्या जीवनात एक मोठीच पोकळी निर्माण होते. काही प्रमाणात ती भरून काढण्यासाठी आम्ही नोकरी/व्यवसाय करतो असे त्या म्हणाल्या. परंतु कामापासून मिळणारे समाधान आणि मातृत्वाचे सुख ह्या दोहोंच्या संघर्षातून काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात ते पाहू. दोन आयांना आपल्या मोठ्या झालेल्या मुलींच्या लग्नाची काळजी लागली आहे. अ गटातील दहा व ब गटातील दोन माता आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल फार चिंतेत असलेल्या आढळल्या. आपल्या मुलांमुलींना–विशेषतः मुलांना–योग्य वेळी उत्तम शिक्षण मिळण्याची संधी द्यावी असे त्यांना फार वाटत असते. उत्तम शिक्षण मिळाले तर ते वरच्या दर्जाचे व्यवसाय करू शकतील असे आशेचे अंकुर निर्माण झाल्यास नवल नाही. कुटुंबाच्या उदरपोषणासाठी आर्थिक मदत मिळण्याकरिता धडपडावयाचे आणि आहे त्या परिस्थितीत मुलांची शक्य तितकी काळजी घ्यावयाची असे कष्टाचे जीवन व्यतीत करीत असताना जीवनाच्या मध्यावर आपल्या अपेक्षा अपुऱ्या राहिल्या अगर भंग पावल्या आणि त्याबद्दल आपणच–म्हणजे आपले घराबाहेर काम करणेच–जबाबदार आहे असे नाही, ही वस्तुस्थिती लक्षात आल्यावर आयुष्यात निराशेचे दाट वलय जमल्यास आश्चर्य नाही. म्हणूनच काही स्त्रियांनी अकालिक सेवानिवृत्तीची इच्छा प्रगट केली तर काही असमाधानी दिसल्या.

आपल्यापासून मुलांना दूर ठेवावे लागते ह्याचेच दुःख दोन मातांना होत आहे. कौमार्यावस्थेतील व काही लहान मुलांच्याही बेशिस्त वागण्याबद्दल अ गटातील बारा व ब गटातील आठ जणींनी तक्रार केली. तसेच ब गटातील एका अविभक्त कुटुंबात रहाणाऱ्या स्त्रीने आपला पुतण्या व पुतणे ह्यांच्या अयोग्य वर्तनाबद्दल माहिती सांगितली. आपल्या मुलांनी शिक्षण सोडून देऊन भटकेगिरी पत्करली आहे हे शल्य सारखे बोचत रहाते असे दोघा मातांनी कळवळून निवेदन केले, तर 'आपल्या मुलीने फॅशनचा नवनवा ढंग सुरू केला आहे त्याला कोणता उपाय करावा सांगा' अशी एकीने पृच्छा केली. ८४४ मातांपैकी २८ जणींनी म्हणजे ३.४३ टक्के मातांनी अशा तऱ्हेने अंतःकरणातले दुःख वशीवर टांगले.

तरुण पिढीचे प्रश्न कसे हाताळावे ही एक राष्ट्रीय पातळीवरची समस्या आहे. येथे गोळा केलेल्या थोड्याशा माहितीवरून आईच्या बाहेरील कामामुळे मुलांच्यात बेशिस्त वाढते असे सर्वसामान्य विधान करणे धोक्याचे ठरेल. तरुण पिढीच्या

असमा धानाचे वगैर वागणुकीचे हे कारण असो वा नसो, जागतिक आणि विशेषत: भारतीय सामाजिक-आर्थिक परिस्थितीत झपाट्याने होत असलेल्या बदलामुळे मार्गदर्शन तरुणांच्या मनातसंभ्रम उत्पन्न झाला आहे. ह्या संभ्रमातून योग्य वाट काढून त्यांना करणे सोपे नाही पण तितकेच ते निकडीचे आहे. ह्या ग्रंथाचा तो विषय नसल्यामुळे येथेच आटोपते घेणे बरे.

कौटुंबिक ऐक्याची भावना अप्रत्यक्षपणे अजमावण्याकरिता : "तुम्ही सर्वजण रात्री एकदमच जेवावयास बसता का?" असा प्रश्न विचारिला होता. ह्या प्रश्नाला १४३ कुटुंबांतील ९०, अगर ६३ टक्के स्त्रियांनी होकारार्थी, १६ कुटुंबांतील स्त्रियांनी नकारार्थी आणि ३४ कुटुंबांतील स्त्रियांनी काहीच उत्तर दिले नाही. पूर्वीची रूढ पद्धत अशी की मुलांना प्रथम अगर मुलांमुलींची आणि पुरुषांची पहिली पंगत व नंतर घरातील बायकांनी, विशेषत: सर्वांत वडील बाईने मागाहून जेवावयाचे. परंतु अलिकडेस ह्या पद्धतीत चांगलाच बदल झाला असून बहुतेक सर्वजण एका पंक्तीला खेळीमेळीने सहभोजन करतात. मग ते वाढत्या महागाईत आणि शिधावाटप पद्धतीमुळे कसेका असेना!

मध्यमवर्गातील कुटुंबांची पहाणी करीत हिंडत असताना माहिती गोळा करणाऱ्या स्त्रियांच्या व लेखिकेच्याही एक गोष्ट ठळकपणे नजरेत भरली. ती म्हणजे ह्या मध्यमवर्गीयांची घरे स्वच्छ व टापटीपीची आढळली. आम्ही गेलो ते काही आगाऊ भेटीची वेळ ठरवून रीतसर गेलो नव्हतो. म्हणूनच जे सहजी नजरेत आले त्याला महत्त्व आहे. शिवाय ३००० कुटुंबांसाठी नेमलेल्या व म्हणूनच त्यांना अनौपचारिकरीत्या भेट देणाऱ्या एका समाजकल्याणकारी अधिकारी बाईने म्हटले की, "मध्यमवर्गीय कुटुंबात स्वच्छता व नीटनेटकेपणा दिसून येतो. सारखेच उत्पन्न असणाऱ्या चवथ्या श्रेणीतील लोकांपेक्षा तिसऱ्या श्रेणीतील लोक अधिक सुसंस्कृत आढळतात."

त्रेसष्ट कुटुंबांना भेट देऊन माहिती गोळा करणाऱ्या बाईंनी आणखी एक नोंद घेतली आहे. एक-दोन-तीन खोल्या अगर ब्लॉकमध्ये रहाणाऱ्या तेवीस कुटुंबांत देवघर असून तेथे गणपती, विष्णु, दत्त वगैरे मूर्तींची अगर फोटोंची स्थापना केलेली आहे. त्यांची रोज पूजा होत असते. नऊ कुटुंबांत साईबाबांच्या फोटोची भर पडली आहे. आणि एका घरात फक्त त्याच फोटोची पूजा चालते. तीस कुटुंबांत असे देवघर त्यांना दिसले नाही.

ह्या पहाणीतून आविष्कृत झालेल्या कुटुंबांच्या चित्रणाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास, आधुनिक काळातील "धर्मातीतता, सामुदायीकरण आणि आम संस्कृती" ह्या शक्तींच्या आघातांनी ही मूलभूत संस्था, जरी मध्यमवर्गीय स्त्री अर्थार्जन करण्यासाठी घराबाहेर पडू लागली तरी, फारशी हादरलेली दिसत नाही. गृहिणीचा दिवसातील बराच काळ बाहेर जात असल्यामुळे कुटुंबातील मंडळींना ऐहिक सुखसोई मिळत नसतील किंवा प्रणयाचे अगर प्रेमाचे पडसाद तितके उठत नसतील. परंतु अधिक उत्पन्नामुळे

जीवनमान सुधारत असावे आणि घरकामाव्यतिरिक्त निराळे कार्यक्षेत्र मिळाल्यामुळे तिचेही समाधान होत असावे. निदान विस्तारित कुटुंब तरी तग धरून आहे. त्याच बरोबर दोन बाजूंचा सखोल विचार व्हावयास हवा. एक, कुटुंबाच्या संस्कृती रक्षणाच्या व परस्पर त्यागमय प्रेमाच्या मूल्यापेक्षा अलिकडेस अर्थोत्पादनास दिलेले महत्त्व आणि जीवनमान उंचावण्यासाठी चालत असलेली धडपड. दुसरी, मध्यमवर्गीय कुटुंबाच्या सदस्यांची संख्या कमी झाली असून ती पुढील पिढीत भरून येणार नाही. ज्या विचारवंतांना आनुवंशिक घटकाचे महत्त्व वाटते त्यांना ही चिंतेची बाब आहे असे निश्चित वाटेल. म्हणूनच पुढील पिढीचे योग्य संगोपन होणे व कुटुंबसंस्थेचे रक्षण करणे अत्यंत अगत्याचे आहे.

## संदर्भ


१. बर्नार्ड फार्बर, किनशिप् अॅन्ड फॅमिली ऑरगनायझेशन (१९६६), पा. ८.
२. मॅक आयव्हर अॅन्ड पेज्, सोसायटी, पा. २४०-६४.
३. ए. एन्. मुल्ला, प्रिन्सिपल्स् ऑफ् हिंदू लॉ, "इंट्रोडक्टरी नोट" बाय एस्. टी. देसाई (१९६६), पा. ५३७.
४. जी. एस्. घुर्ये, फॅमिली अॅन्ड किन् इन इन्डो-युरोपियन कल्चर (१९६२), पा. ८१.
५. के. एम्. कापडीया, मॅरेज् अॅन्ड फॅमिली इन् इंडिया (१९६८), पा. २५३.
६. मॅक आयव्हर अॅन्ड पेज्, सोसायटी, पा. २५८.
७. दुसरे प्रकरण पहा.
८. हिंदू वुमन् अॅन्ड हर फ्युचर (१९४८), पा. ४७.
९. एस्. युड्किन् अॅन्ड होम, वर्किंग मदरस् अॅन्ड देअर चिल्ड्रन् (१९६३), पा. २८०, ए स्टडी फॉर् दी कौन्सिल फॉर चिल्ड्रन्स् वेलफेअर, लंडन.
१०. डेनिस् डी. रुगमॉन्ट, "दी क्रायसिस् ऑफ् द मॉडर्न कपल" रूथ नंदा अॅन्शेन (एडि.), दी फॅमिली (१९५९), पा. ४४९, ४५६.
११. रूथ नंदा अॅन्शेन्, दी फॅमिली, पा. ५१७.
१२. चार्लस् अॅब्रॅम्स् अॅन्ड जॉन् पी. डीन, वरील ग्रंथ, पा. ४८३.
१३. तक्ता २ पहा.
१४. तक्ता १९ पहा.
१५. कॉक्स्, डेमोग्रॅफी (१९५९).
१६. एस्. युड्किन् अॅन्ड होम, वर्किंग मदरस् अॅन्ड देअर चिल्ड्रन्, पा. १५९.

१७. एस्. युड्किन अँन्ड होम, वर्किंग मदरस् अँन्ड देअर चिल्ड्रन्, पा. ८९.
१८. ,, ,, ,, पा. १३०-३६.
१९. एफ्. इव्हॅन नी, दी एम्प्लॉइड मदर इन् अमेरिका (१९६३), पा. ९२.
२०. ,, ,, ,, पा. १५१.
२१. ,, ,, ,, पा. १६१.
२२. ,, ,, ,, पा. १०९.
२३. एस्. युड्किन् अँन्ड ए. होम, वर्किंग मदरस् अँन्ड देअर चिल्ड्रन्, पा. ६७.
२४. प्रकरण ६ पहा.
२५. वर्किंग मदरस् अँन्ड देअर चिल्ड्रन, पा. ५२.
२६. प्रकरण ६ पहा.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र ९२/१
मंत्रालय.

प्रकरण ४ थे

# कुटुंबनियोजन

भारताने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कल्याणकारी राज्य असे ध्येय आपल्यापुढे ठेविले आहे. हे ध्येय साध्य होण्याच्या दृष्टीने लोकसंख्येच्या प्रश्नाला अग्रस्थान द्यावे लागते आणि तो सोडविणे तितकेच अवघड होऊन बसले आहे. १९५१ मध्ये मृत्यूचे दर हजारी प्रमाण २७ होते ते १९६१ मध्ये १७.८ पर्यंत उतरले आहे. तसेच १९०१ मध्ये बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी बालकांमध्ये २३२ होते ते १९६१ मध्ये १११.८ पर्यंत घटले आहे. बरे, जननाच्या प्रमाणात दर हजारी–४०/४२–फारशी घट न झाल्यामुळे आम्ही लोकसंख्येत दर वर्षी १ कोटी लोकांची भर घालीत आहोत! जेथे आम्ही हयात असलेल्या बालकांच्या अन्न, वस्त्र, आसरा आणि शिक्षण ह्यांची तरतूद करू शकत नाही तेथे दर वर्षी भर पडत असलेल्यांची कशी व्यवस्था करणार? तीन पंचवार्षिक योजना कितीही सदोष असल्या तरी तेणेकरून आमच्या राष्ट्रीय उत्पन्नात भर पडली आहे. पण त्या वाढत्या उत्पन्नाला वाढत्या संख्येचा सारखा छेद जात आहे!

लोकसंख्येची वाढ हा फक्त भारताचाच प्रश्न नाही तर तो अखिल मानवतेपुढील प्रश्न आहे; तथापि भारताच्या बाबतीत केवळ संख्यावाढ ही एक गंभीर वास्तवता होऊन बसली आहे. जागतिक पार्श्वभूमीवर भारतीय लोकसंख्येचे चित्रण कसे चितारले जाते हे युनायटेड् नेशन्स् डेमोग्रॅफिक इयरबुक १९६५ व १९६७ ह्यांतून घेतलेल्या आकड्यांनुसार तक्ता १६ मध्ये पुढे दिले आहे :

पुढील तक्त्याकडे पहाता, जन्म-मृत्यूचे कच्चे आकडे, जननसंख्या व बालमृत्यूचे प्रमाण आणि त्याबरोबरच वाढीच्या प्रमाणात जगातील सहा पुढारलेल्या देशांपेक्षा–यू.एस्., यू.के., यू.एस्.एस्.आर्., जपान, स्वीडन, इस्राएल–भारत फार वरचा क्रमांक पटकावित आहे, असे दिसते. १९६०-६४[१] मध्ये अखिल जगतात वार्षिक वाढ १८ टक्के झाली तर भारतात २५ टक्के झाली. सुधारणेच्या विकासानुसार जगातील देशांचे तीन गट केले जातात: "अधिक विकसित", "कमी विकसित", आणि दोहोंच्या मधले देश. ह्या तीन गटांच्या जननप्रमाणावर टीका करताना डेमोग्रॅफिक इयर बुकमध्ये म्हटले आहे, "१९६० च्या आसपास जागतिक लोकसंख्येमध्ये कच्चे जनन-प्रमाण सरासरी १००० स ४० होते परंतु कमी विकसित देशांत सरासरी १००० स ४० व अधिक विकसित देशांत सरासरी १००० स २१ होते. अधिक जननप्रमाण व कमी जननप्रमाणाच्या प्रदेशांचो तुलना केल्यास सामाजिक व आर्थिक हरएक

## तक्ता १६

जीवसंख्याशास्त्रीय आकडयांचा सारांश : विशिष्ट देश, अद्यावत वर्ष

| देश | वर्ष | जनन | | मृत्यू | | स्वाभाविक वाढीचे प्रमाण | जन्मतः आयुर्मानाची अपेक्षा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कच्चे आकडे | जननप्रमाण × | कच्चे आकडे | बालमृत्यू | | वर्ष | पुरुष | स्त्रिया |
| यू.एस्.ए. | १९६७ | १७.९ | ७५.६ | ९.४ | २४.७ | १०.० | १९६४-६६ | ६६.७ | ७३.८ |
| यू.के. | १९६७ | १७.४ | ६९.८ | ११.५ | १९.६ | ६.९ | —— | —— | —— |
| इं. व. वेल्स | १९६७ | १७.१ | ६९.१ | ११.५ | १९.० | ६.६ | १९६३-६५ | ६८.३० | ७४.४० |
| उ. आयर्लंड | १९६७ | २२.४ | ८४.९ | १०.६ | २५.१ | १२.५ | १९६४–६६ | ६७.७९.. | ७२.९८ |
| स्कॉटलंड | १९६७ | १८.६ | ७२.१ | १२.१ | २३.१ | ७.३ | ,, | ६६.६० | ६७.३८ |
| यू.एस्. एस्.आर्. | १९६७ | १७.५ | ८३.२ | ७.३ | २८.० | ११.२ | १९६५-६६ | ६६.०० | ७४.०० |
| स्वीडन | १९६७ | १५.५ | —— | १०.१ | १२.६ | .९ | १९६१-६५ | ७१.६० | ७५.७० |
| इस्राएल | १९६७ | २४.८ | —— | ६.६ | २५.३ | १.० | १९६६ | ७०.९१ | ७३.७३ |
| जपान | १९६७ | १९.३ | ५३.४ | ७.१ | १८.५ | ११.५ | १९६४-६६ | ६८.३५ | ७३.६१ |
| भारत | १९६३-६४ | ३८.४ | १३६.७+ | १२.९ | १३९.०ф | २५.५ | १९५१-६० | ४१.८९ | ४०.५५ |
| भारत | १९६६ | ४१.० | —— | १६.० | —— | २६.० | —— | —— | —— |
| सरासरी | १९६५-६७ | □४०.४ | १८४.४ | १७.८ | १११.८ | २२.६ | १९६५–६७⇒ | ४९.२ | ४८.३ |

गणना प्रमाण : × जननाचे प्रमाण म्हणजे १० ते ४९ वर्षांच्या १,००० स्त्रियांना त्यावर्षी (१९६५) झालेल्या जिवंत अपत्यांच्या नोंदीनुसार संख्या. + अंदाजी. ф १९५८-५९ ग्रामीण भारताचे अंदाजी, नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या निष्कर्षाधारे. □ अगरवाल बी. एल्. सॅम्पल रजिस्ट्रेशन इन इंडिया-पॉप्युलेशन स्टडीज् व्हॉ. xxiii लंडन, नो. १९६९, पा. ३७९-३९४. ⇒ रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया सॅम्पल रजिस्ट्रेशन बुलेटिन नं. २८ न्यू दिल्ली ऑफिस ऑफ् दी रजिस्ट्रार जनरल ऑफ् इंडिया, ए. १९६९, पा. १. –युनायटेड् नेशन्स डेमोग्रॅफिक इयरबुक १९६५ व १९६७.

दर्शकसूचीनुसार त्यांच्या सरासरी पातळीत महदंतर दिसून येते . . . उदाहरणार्थ, दर माणशी सरासरी राष्ट्रीय उत्पन्न, शक्तिव्ययाचे प्रमाण, शिक्षण, शेतीव्यतिरिक्त रोजगारी, आरोग्यविषयक सोई, वृत्त प्रसार वगैरे."[२] स्त्रियांच्या बाबतीत हे आर्थिक व सामाजिक घटक कशाप्रकारे परिणाम करीत आहेत हे प्रस्तुत पहाणीच्या अनुषंगाने पुढे सांगण्यात येईल.

प्रत्येक विचारवंत नागरिकाला लोकसंख्येच्या प्रश्नाचा गंभीरपणा व व्याप्ती ह्याची जाणीव आहे. व्यक्तिशः अथवा संस्थांमार्फत, विशेषतः स्त्रियांच्या संस्थांमार्फत स्वातंत्र्यपूर्व काळातही कुटुंबनियोजनाच्या प्रचाराचे प्रयत्न चालू होते. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पंचवार्षिक नियोजन आखणाऱ्या तज्ञांच्या लक्षात आलेच की वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण घातले नाही तर कोणताही आर्थिक आणि औद्योगिक विकास तर शक्य नाही परंतु अन्नधान्याचाही प्रश्न सुटावयास दीर्घकाल लागेल. ह्या पेच-प्रसंगामुळेच कुटुंबनियोजन हे योजनासमितीने राष्ट्रीय पातळीवरील धोरण म्हणून त्याला मान्यता दिली.

सरकारी दस्तपत्रकांवरून व अहवालांवरून ह्या बाबतीत सरकारकडून होत असलेल्या प्रयत्नांचे कालानुक्रमे तीन टप्पे दिसून येतात असे स्थूलमानाने म्हणता येईल.

१९५६-६१ च्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये निरनिराळ्या ठिकाणी कुटुंब-नियोजन केन्द्रे उघडण्यात आली.

तदनंतर स्वयंसेवक-सेविकांना जरूर ते शिक्षण देण्याची आवश्यकता तसेच संशोधनाची जरुरी ह्यालाही योग्य ते महत्त्व देण्यात आले.

ह्यापुढील पाऊल म्हणजे खेड्यांतील लोकांशी संपर्क साधून आमजनतेला लोकसंख्येच्या समस्येचे गांभीर्य पटवून कुटुंबनियोजनाच्या पद्धतीची माहिती पुरविण्यात येऊ लागली. त्याबरोबर संशोधनही चालू ठेवण्यात आले आहे. शेवटी कुटुंबनियोजनाबाबत लोकांशी कितपत संपर्क साधता येतो व त्यांना कितपत प्रवृत्त करता येते ह्याविषयी काही सशास्त्र सूचक पहाणीही करण्यात आली. १९५६ मध्ये आमजनतेपुढे नसबंदीचा उपाय मांडण्यात आला आणि त्याकरिता शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यास पैसेही देण्यात येऊ लागले.

वरील उपायांव्यतिरिक्त १९६५ मध्ये इंडियन कौन्सिल ऑन् मेडिकल रीसर्च तर्फे मान्य झालेल्या लूप पद्धतीचा प्रथमतःच फार मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्यात येऊ लागला. त्यात निरोध व संततीप्रतिबंधक गोळ्या ह्यांची भर घालण्यात आली आहे.

कुटुंबनियोजनाचा पुरस्कार सरकारतर्फे होऊ लागल्याला पंधरा-सोळा वर्षांचा अल्पकाळ लोटला आहे. ह्या अल्पकाळात म्हणावी तितकी प्रगती झाली नाही; तथापि काही राज्यांनी बरीच आघाडी मारली आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रराज्याला कुटुंब-नियोजनात पहिल्या प्रतीचे राज्य म्हणून दोनदा मान मिळाला आहे. चौथ्या

पंचवार्षिक योजनेत ३१५ कोटी रु. मंजूर केले होते.

कुटुंबनियोजन हमखास यशस्वी होण्याच्या दृष्टीने भारताच्या मार्गात बरेच अडथळे आहेत. मुले ही देवाची देणगी ही एक समजूत, तसेच कितीही मुली झाल्या तरी घराण्याचे नाव चालविण्यास मुलगा पाहिजे ही दुसरी समजूत. त्याचप्रमाणे धार्मिक विरोध. परंतु ह्या सर्वांपेक्षाही जनतेचे अज्ञान आणि दारिद्रय ह्यांमुळे राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराचे पूर्णतया अवलंबन होत नाही असे तक्ता १७ वरून दिसून येईल.

१९६६ च्या एप्रिलमध्ये भारत सरकारने कुटुंबनियोजन खाते सुरू केले. त्याची पुनर्रचना झाली असून सेक्रेटरिएट बाजू व तांत्रिक बाजू अशा दोन शाखा आहेत. पहिली बाजू कारभार पहाते व दुसरी अंमलबजावणी करते. मध्यवर्ती कु. नि. दल उभारलेले असून पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमलेली आहे. ह्या कार्याकरिता परराष्ट्रीय मदतही आहे. असे हे वाढते कार्य चालू आहे. तथापि दुसरी बाजूही लक्षात घेऊया.

१९६३ साली डॉ. चंद्रशेखर आणि कॅथराइन कूडर ह्या उभयतांनी बृहन्मुंबईतील कुटुंबनियोजन केन्द्रात चालत असलेल्या कामकाजाची पहाणी केली. ते म्हणतात : "बृहन्मुंबईतील फक्त पाच टक्के विवाहित स्त्रियांनी कुटुंबनियोजन केन्द्रांना भेट दिली."[३]

दर हजारी लोकसंख्येत जननाचे प्रमाण २० ते २५ वर आणणे हे ध्येयसुद्धा तसे म्हटले तर फार दूरगामी आहे. लोकसंख्याविषयक सद्य:परिस्थिती चिंताजनकच आहे! डॉ. राएनांच्या शब्दांत : "आपल्या काळातील सर्व प्रश्नांवर मात करणारा हा प्रश्न आहे, त्यामुळेच सध्याची वरीचशी राजकीय अस्थिरता निर्माण होत असून मानवाच्या अधिक चांगल्या जीवनाचा अपेक्षाभंग करणाऱ्या प्रश्नाला आपल्याला तोंड द्यावयाचे आहे. म्हणूनच अत्यंत निकडीच्या, सखोल निष्ठेच्या आणि दीर्घ कल्पकतेच्या प्रयत्नांची आपणांकडून पराकाष्ठा झाली पाहिजे."[४]

लोकसंख्येच्या प्रश्नाची अस्वस्थता निर्माण करणारी दुसरी बाजू मध्यवर्ती सरकारचे आरोग्यमंत्री पुढील शब्दांत दाखवून देतात : "तेव्हा निकटच्या काळात जसजसा भारताचा ऐहिक विकास होत जाईल तसतशी लोकसंख्येत भर पडेल. लोकसंख्येच्या प्रश्नाची सर्वसामान्य चर्चा करीत असताना ही बाजू दृष्टीआड होण्याचा संभव आहे."[५] भारताला जर स्वतंत्र राष्ट्र म्हणून मानाने जगावयाचे असेल तर ऐहिक विकासाची आवश्यकता कोणीही नाकारणार नाही. परंतु लोकसंख्येच्या वाढीची ही चढती लाट आपण कशी थोपवून धरू शकू?

ह्या प्रश्नाला एकमेव अगर सुटसुटीत असे उत्तर देणे कठीणच. अशा समस्येला तोंड देण्याकरिता धाडसी उपाययोजना आणि तीही अखिल राष्ट्रीय पातळीवर त्वरित गतीने झाली पाहिजे. ह्या उपाययोजनांच्या गुणदोषांची चर्चा करण्यापूर्वी

तक्ता १७

भारत सरकारची कुटुंबनियोजनविषयक कामगिरी

| वर्ष | मंजूर रक्कम रु. (लक्ष) | मंजूर रक्कम % | खर्चित रक्कम रु. (लक्ष) | खर्चित रक्कम % | कु. नि. केंद्रांची संख्या | नसबंदी संख्या (लक्ष) | लूप बसविल्याची संख्या (लक्ष) | निरोध वापरणाऱ्यांची संख्या (लक्ष) | इतर साधने वापरणाऱ्यांची संख्या (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५२ | ६५ | १०० | ३० | ४६.१५ | | | | | |
| १९६१ | १३८ | | | | १,५०० | | | | |
| १९६४ | | १०० | | ४८ | ३,१९५ | | १.३० | | |
| १९६५ | ५०० | | | | ४,९४० | स्त्रीबीज-वाहिकाबंदी ८.६० शुक्रजन्तु-वाहिकाबंदी १६.०० | ९.००× | | २०.०० |
| ३१-१२-६५ | | | | | (शहरात) १,९०७ (खे.) १३,००१ | २४.४४ | १७.७५ | | |
| १९६६ | ९५० | | | | १७,००० | | | | |
| १९६८ | ३७०० | | | | | १२.०७⊖ | ३.०५ | २२.०० | ५.०७ |
| १९६९ | ४२०० | | | | | ९.०८ | ३.०७ | २२.०६ | ९.०६ |
| १९७० अखेर | | | | | ७५० | ८२.०५ | ३३.४० | — | — |
| १९७१ ऑगस्ट | | | | | | ९१.१ | ३९.४०* | | |

× टाइम्स ऑफ इंडिया – १२-८-६७. ⊖ रिपोर्ट – १९६९-७० मिनिस्ट्री ऑफ् हेल्थ अॅन्ड फॅमिली प्लानिंग, पा. १६७. * ए. चंद्रशेखर–द पॉप्युलेशन प्रॉब्लेम् अॅन्ड फॅमिली प्लानिंग एफर्ट–जर्नल ऑफ् द इंडियन मेडिकल असोसिएशन, ऑक्टोबर १९७२.

कुटुंबनियोजनाच्या अनुषंगाने प्रस्तुत पहाणीमध्ये मिळालेल्या माहितीचे समालोचन करूया, आणि नंतर ह्या समस्येवर कोणता तोडगा सापडतो ते पाहू.

कुटुंबनियोजन ह्या शब्दप्रयोगाचा सर्वसंमत अर्थ म्हणजे जननसंख्येवर नियंत्रण आणि दोन बालकांमध्ये योग्य ते अंतर ठेवणे.पूर्वी काही धार्मिक नियमांमुळे–व्रते उपवास वगैरे–आणि विधवा विवाहास बंदी अशा सामाजिक रूढीमुळे जननसंख्या नियंत्रित होत असे. "संततीनियमनाच्या पद्धती, संस्कृती-संस्कृतीनुसार व उपलब्ध असलेल्या ज्ञानानुसार बदलत आल्या आहेत."[६] पोटात घ्यावयाच्या गोळ्या, लूप, निरोध, समगतिक पद्धत आणि निर्बीजीकरण वगैरे संततिनिरोधक उपाय हे मानवी इतिहासातील अलिकडील मार्ग आहेत. तसे पाहिल्यास पहिल्या महायुद्धानंतरच संततिनियमनाचा प्रचार उघडपणे करण्यात येऊ लागला.

कुटुंबनियोजनविषयक अभ्यास अगर पहाणी करीत असताना मुख्य उद्देश लोकसंख्यानियंत्रण हा असतो. "ह्यापुढे कुटुंबनियोजनाचा मुख्य हेतू म्हणजे १९७३ पर्यंत भारतात दर हजारी जननसंख्येचे प्रमाण २५ वर उतरवित आणावयाचे."[७] परंतु "१९६५ च्या मध्यकाळात भारताची लोकसंख्या ४७.५ कोटी असावी असा अंदाज होता... २१.५ टक्के वाढ म्हणजे काही कमी नव्हे आणि ७-८ कोटींची भर अगदी अनपेक्षित होती."[८] कुटुंबनियोजनाचे धोरण संख्यानियंत्रणाच्या दृष्टीने कितपत यशस्वी अगर अयशस्वी होत आहे हा मुद्दा बाजूला ठेवून त्यायोगे घडलेल्या निराळ्याच परिवर्तनाचा विचार करू : गरोदरपण आणि बाळंतपण ह्या वरचेवर येणाऱ्या नैसर्गिक अवस्थांतून सुटका झाल्याने आणि त्या सुटकेमुळे मिळालेल्या स्वातंत्र्याने स्त्रीच्या जीवनात क्रांतीच घडवून आणली आहे आणि अप्रत्यक्षपणे समाजजीवनही आमूलाग्र पालटले आहे. स्त्रीला आपला व्यवसाय चालविण्यासाठी किंवा येरवीसुद्धा स्वतःच्या सामाजिक/आर्थिक परिस्थितीनुसार आपले कुटुंब मर्यादित करता येते, तसे तिला वाटल्यास मातृत्वही तिला अजिबात डावलून देता येते ! ह्या सर्व बाजू प्रस्तुत पहाणीत निदर्शनास आल्या आहेत.

अ ब ब गटातील स्त्रियांचा कुटुंबनियोजनाबद्दल कशा प्रकारचा कल आहे हे अजमाविण्याकरिता व तद्विषयक निरनिराळ्या बाजू पहाण्याकरिता कुटुंबनियोजनावर एक प्रश्नसमुच्चयच विचारण्यात आला होता. जरी स्त्रियांची व विशेषतः कुटुंबांची संख्या फार मोठी नसली तरी त्यांनी मोकळेपणाने दिलेल्या उत्तरांवरून मध्यमवर्गीय मिळवत्या वा न मिळवत्या शिक्षित स्त्रियांचा कल येथे कितपत आहे ते दिसून येते आणि त्यांच्या जीवनात झालेला बदलही लक्षात येतो. कुटुंबनियोजनाच्या बाबतीत आणखी माहिती मिळविण्यासाठी बृहन्मुंबई आणि सोलापूर येथील तेरा सार्वजनिक व खाजगी सूतिकागृहांतून जानेवारी ते जून १९६६ ह्या सहा महिन्यांत स्त्रीबीजवाहिका बंदी केलेल्यांचे आकडे पण गोळा केले. ते तक्ता १८ व १९ मध्ये दिले आहेत.

## तक्ता १८

### अपत्यरहित विवाहित उत्तरदायी स्त्रियांचे पृथक्करण

| | ब गट | अ गट | अ गटाची उपबेरीज | बेरीज अ + ब |
|---|---|---|---|---|
| **कुटुंबनियोजन करीत नाहीत :** | | | | |
| (अ) सध्याचे वय ४३ आणि त्याहून अधिक व सरासरी वैवाहिक जीवन १६.७ वर्षे | | २२ | | २२ |
| (ब) ४३ खाली सध्याचे वय व सरासरी वैवाहिक जीवन ९ वर्षे .. | १६ | | | १६ |
| ७.१ वर्षे .. | | ७६ | १७३ | ७६ } ९२ |
| (क) ४३ खाली सध्याचे वय व सरासरी वैवाहिक जीवन १.३ वर्षे .. | ७ | | | ७ |
| १.७ वर्षे .. | | ७५ | | ७५ } ८२ |
| **कुटुंबनियोजन करीत आहेत :** | | | | |
| (ब) ४३ खाली सध्याचे वय, सरासरी वैवाहिक जीवन ७.४ वर्षे .. | | २१ | २८ | २१ |
| (क) ४३ खाली सध्याचे वय, सरासरी वैवाहिक जीवन १.८५ वर्षे .. | | ७ | | ७ |
| | २३ | २०१ | | = २२४ |

पूर्वी सांगितल्याप्रमाणे ह्या पहाणीत १,५३४ अर्थार्जन करणाऱ्या शिक्षित स्त्रिया व मध्यमवर्गीय २५९ स्त्रियांचा अभ्यास आलेला आहे. ह्यांपैकी अ गटातील ७९५, किंवा ५१.८२ टक्के विवाहित असून त्यांचे वैवाहिक कालमान बारा वर्षांचे आहे.

तर ब गटातील २०३, किंवा ७८.३५ टक्के स्त्रिया विवाहित असून त्यांचे वैवाहिक कालमान १३.७५ वर्षे आहे.[९] विधवा, घटस्फोटिता आणि परित्यक्ता ह्यातून वगळल्या आहेत. कारण उघड आहे, हे प्रकरण कुटुंबनियोजनाविषयी आहे. अ गटापेक्षा ब गटात अधिक विवाहित स्त्रिया असून सरासरी वैवाहिक कालमानसुद्धा जास्त आहे. ह्या बाबतीत स्थानिक फरकही काही प्रमाणात दिसून येतो.

अ गटातील ७९५ विवाहित स्त्रियांपैकी २०१, किंवा २५.५८ टक्के स्त्रिया आणि ब गटातील २३, किंवा ११.३ टक्के स्त्रिया अपत्यरहित आहेत. ह्या अपत्यरहित स्त्रियांचा खास विचार करणे अवश्य आहे.

अपत्यरहितांपैकी ज्या कुटुंबनियोजन करीत नाहीत व ज्या करीत आहेत असे त्यांचे दोन वर्ग करू या. ह्या पहिल्या वर्गापैकी अ गटातील २२ स्त्रिया ४३ वर्षांवरील असून त्यांनी वैवाहिक जीवन १६.७ वर्षे घालविले आहे. ब गटात अशी एकही स्त्री नाही. येथे कोणी असा मुद्दा उपस्थित करील की स्त्रीची रजोनिवृत्ती ४९ व्या वर्षी किंवा लौकरात लौकर ४५ व्या वर्षी होते. परंतु बाविसांपैकी बरोबर ४३ वर्षांच्या १५ जणी व ४३ च्या वर ७ जणी आहेत. ज्याअर्थी १६ वर्षांच्या दीर्घ वैवाहिक काळात त्यांना अपत्य झाले नाही त्याअर्थी त्यांना ह्यापुढे होण्याचा संभव दिसत नाही. ह्यांच्या-खेरीज अ गटात ४३ वर्षांखालील व ७.१ वर्षे वैवाहिक कालमान असलेल्या ७६ स्त्रिया व ब गटात ९ वर्षे सरासरी वैवाहिक जीवन घालविलेल्या व तेच वयोमान असलेल्या १६ स्त्रिया अपत्यविहीन आहेत. मात्र हे कुटुंबनियोजनाचे फल नव्हे. ह्या ब्याण्णव भगिनी वांझ आहेत असे म्हणण्याचे जरी धाडस करणे बरोबर नसले तरी मातृत्वाचा लाभ ह्यापुढे त्यांना होईल असे शक्य वाटत नाही.

पंचाहत्तर अगर ८ टक्के स्त्रियांची गोष्ट अगदी स्पष्ट आहे. त्यांचे सरासरी वैवाहिक जीवन फक्त १.७ वर्षांचेच आहे. त्या कुटुंबनियोजन करीत नसल्यास नवल नाही. मुले व्हावी ही त्यांना स्वाभाविक इच्छा दिसते. तक्ता १८ कडे लक्ष देऊन ह्या ७५ जणींची तुलना पुढील कुटुंबनियोजन करणाऱ्या २८ स्त्रियांबरोबर करूया. ह्या २८ पैकी २१ जणींनी ७ वर्षांपर्यंत कुटुंबनियोजनाच्या मदतीने मातृत्व पुढे ढकलले आहे आणि दुसऱ्या ७ जणींचे वैवाहिक जीवन फक्त १.८ वर्षांचे आहे. ब गटात अपत्य-रहित असून संततिनियमन करीत आहे अशी एकही स्त्री नाही! ह्या सर्व २८ स्त्रियांचा विस्तृत अभ्यास पुढे केला आहे.

सदोष प्रकृती व प्रतिकूल आर्थिक परिस्थिती म्हणून ३ स्त्रिया संततिनियमन करीत आहेत. ह्या तिघींच्या शिवाय २१ जणी एकंदरीने सुस्थितीत आहेत. पती, कुटुंबातील इतर व्यक्ती–मग ते कुटुंब अविभक्तही असेल–ह्यांच्याबरोबर ह्या स्त्रियांचे संबंधही चांगले आहेत. सर्वांत ताण म्हणजे वैयक्तिक जीवनातही त्या पूर्ण समाधानी आहेत ! ह्याला एकच अपवाद आहे. आपणास मूल नाही म्हणून एक बाई काहीशी असमाधानी आहे. वरील दिग्दर्शनातून असा अभिप्राय निघतो की ह्या वीस जणींच्या

यजमानांनाही पितृत्वाचा आनंद नको आहे म्हणून त्यांची संततिनियमनाला मूक संमती आहे ! ह्या वीस जणींत एका स्त्रीअधिकाऱ्याला काहीतरी निर्मायिक स्वरूपाचे काम नाही म्हणून खेद होत आहे. जणू बाळाला जन्म देणे व वाढविणे हे पुरेसे निर्मायिक कार्य नाही ! शिवाय ह्या सर्व मिळवत्या व्यवसायी स्त्रिया आहेत; अकरा जणी तर प्राप्तीवरील कर भरीत असतात, १८ जणी पदवीधर असून त्यांतील २ डॉक्टर आहेत. त्यांचे वयोमान २५ ते ४० च्या दरम्यान अथवा सरासरी ३०.२१ वय म्हणजेच संततिकाल आहे. जीवनातील हरएक बाजू त्यांना अनुकूल आहे. बरे सर्वचजणी नैसर्गिकरीत्या वांझ असतील असेही म्हणता येत नाही. हेच तर लेखिकेला म्हणावयाचे आहे की संततिनियमनाने स्त्रीच्या जीवनात अशी ही क्रांती घडविली आहे. ह्या २१ जणी म्हणजे एकंदर अ नमुन्यातील विवाहित स्त्रियांपैकी २.६४ टक्के महिला सहजसुलभ मातृत्वाचा आनंद गमावतात. कदाचित त्यांना आपला व्यवसाय अथवा नोकरीमध्ये अधिक आनंद वा पूर्ती मिळत असेल; कदाचित डॉक्टरला कराव्या लागणाऱ्या कामासारखे कामाचे दडपण असेल. काही का असेना, सदरहू निष्कर्ष वर सांगितल्याप्रमाणे इतर घटक वगळून अखेरीस काढला आहे.

एकंदरीने अ गटात २०१ आणि ब गटात २३ स्त्रिया अपत्यरहित आहेत. अशी परिस्थिती निर्माण होण्यास बरीच कारणे आहेत. आईवडिलांचे शिक्षण, सामाजिक-आर्थिक दर्जा वगैरे तसेच इतर काही जैविक घटक आणि अ गटातील स्त्रियांचे व्यवसाय आणि विशेषत: खास व्यासंग व तेणेकरून येणारा नैसर्गिक वांझपणा आणि/किंवा कुटुंब-नियोजनाचा रिवाज ह्या सर्वांचा परिपाक म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणावर संतति-न्यूनता दिसून येते. हीच गोष्ट युनायटेड नेशन्स् डेमोग्रॅफिक ईयरबुक १९६५ च्या तक्ता ९[१०] वरून दिसून येईल (तक्ता २०). त्यामध्ये १५ वर्षांवरील अपत्यरहित अशा यू. एस्., यू. के., जपान ह्या देशांतील स्त्रियांचे आकडे दिले आहेत. यू. एस्. एस्. आर्. व भारत ह्यांचे आकडे उपलब्ध नाहीत. यू. एस्., यू. के. व जपान ह्यांतील अपत्यरहित स्त्रियांचे शेकडेवारी आकडे अनुक्रमे १६.८, १६ आणि १२ असे आहेत. प्रस्तुत पहाणीनुसार अ गटात १३.१ आणि ब गटात ११.३ अशी शेकडेवारी येते. अशा तऱ्हेने येथील शिक्षित अपत्यरहित स्त्रियांचे प्रमाण जवळजवळ पुढारलेल्या देशांइतके येते. मात्र तेथे ते प्रमाण लोकसंख्येतील सर्व वर्ग जमेस धरून अखिल राष्ट्रीय पातळीवरून काढलेले आहे.

तक्ता १९ कडे पुन: वळल्यास असे दिसून येते की अ गटात ५९४ किंवा एकंदर संख्येच्या ३८.७२ टक्के व विवाहित स्त्रियांच्या ७४.७२ टक्के, आणि ब गटात १८० व एकंदर संख्येच्या ६९.५० टक्के व विवाहितांच्या ८८.६७ टक्के स्त्रिया माता आहेत. अ गटापेक्षा ब गटाचे प्रमाण अधिक आहे हे उघडच दिसून येते. हाच फरक कुटुंब-नियोजन करणाऱ्यांच्या संख्येत व टक्केवारीत दिसून येतो. अ गटात २८६ किंवा ३६.० टक्के आणि ब गटात ६६ किंवा ३.२५ टक्के विवाहित स्त्रिया कुटुंबनियोजन

### तक्ता १९

### शिक्षित मध्यमवर्गीय मिळवित्या स्त्रिया आणि कुटुंबनियोजन

| अनुक्रम | स्थान | अभ्यासिलेल्या स्त्रियांची संख्या | पैकी विवाहित | विवाहितां-पैकी अपत्यरहित | अपत्यरहितां-पैकी कुटुंबनियोजन करणाऱ्या | विवाहितां-पैकी सापत्य | सापत्यांपैकी कुटुंबनियोजन करणाऱ्या | ह्यापैकी कुटुंब नियोजन यशस्वी झाले म्हणणाऱ्या | स्त्रीबीज/ शुक्रजन्तु वाहिकाबंदीची उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | अ गट | | | | | | | | |
| १ | मुंबई .. | १,१३९ | ६२५ | १५७ | २३ | ४६८ | २२७ | २२१ | ३९(१७.६%) २२१ पैकी |
| | | १००% | ५४.८७% | १३.७८% | २.०% | ४१.०९% | २०.०% | | |
| | | | १००% | २५.१२% | ३.८०% | ७४.८८% | ३६.३२% | | |
| | | | | १००% | १४.६५% | १००% | ४८.५०% | ९७.३५% | ८(२४.२४%) |
| २ | पुणे .. | १९८ | ८१ | २१ | २ | ६० | ३३ | ३३ | ३३ पैकी |
| | | १००% | ४०.९०% | १०.६०% | १.०% | ३०.३०% | १६.६६% | | |
| | | | १००% | २५.९२% | २.४७% | ७४.०८% | ४०.७४% | | |
| | | | | १००% | ९.५२% | १००% | ५५.००% | १००% | |
| ३ | नागपूर .. | १०४ | ४४ | १० | — | ३४ | १४ | १४ | ७(५०%) १४ पैकी |
| | | १००% | ४२.३१% | ९.६२% | — | ३२.६९% | १३.४६% | | |
| | | | १००% | २२.७३% | — | ७७.२७% | ३१.८२% | | |
| | | | | १००% | — | १००% | ३१.१८% | | |
| | | | | | | | १०००% | १००% | |

तक्ता १९ (पुढे चालू)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सोलापूर .. | ९३ | ४५ | १३ | ३ | ३२ | १२ | १२ | ९(७५%) |
| | | १००% | ३८.३९% | १३.९८% | ३.२२% | ३४.४०% | १२.९०% | | १२ पैकी |
| | | | १००% | २८.८८% | ६.६% | ७१.१२% | २६.६% | | |
| | | | | १००% | २३.०८% | १००% | २७.५०% | १००% | |
| ५ | पोटबेरीज .. | १५३४ | ७९५ | २०१ | २८ | ५९४ | २८६ | २८० | ६३(२२.५%) |
| | | | | | | | | | २८० पैकी |
| | | १००% | ५१.८२% | १३.१०% | १.८२% | ३८.७२% | १८.६४% | | |
| | | | १००% | २५.२८% | ३.५२% | ७४.७२% | ३६.०% | | |
| | | | | १००% | १३.९३% | १००% | ४८.१५% | ९७.९% | ३३(५२.३८%) |
| | | | | | | | | | ६३ पैकी |
| | ब गट .. | २५९ | २०३ | २३ | — | १८० | ६६ | ६३ | |
| | | १००% | ७८.३८% | ८.८८% | | ६९.५०% | २.५५% | २.४३% | |
| | | | १००% | ११.३३% | | ८८.६७% | ३.२५% | ३.१०% | |
| | एकूण बेरीज .. | १७९३ | — | २२४ | २८ | — | ३५२ | ३४३ | ९६(२८%) |
| | | | | | | | | | ३४३ पैकी |

करीत आहेत. ही एक गोष्ट खरी की टक्केवारीत इतका फरक पडण्याचे एक कारण वयस्कर स्त्रियांची संख्या ब गटात अधिक आहे. परंतु ह्या एकाच कारणामुळे इतके अंतर पडले नसते. शिवाय कुटुंबनियोजनात आपण यशस्वी झालो आहोत असे अ गटातील २८६ पैकी २८० स्त्रियांनी व ब गटातील ६६ पैकी ६३ जणींनी नमूद केले असून ह्यांपैकी अनुक्रमे, त्यांनी किंवा त्यांच्या यजमानांनी शस्त्रक्रिया करवून स्वतःचे निर्बीजीकरण केले आहे! असे करण्याने ही कुटुंबे संख्या मर्यादित करतात इतकेच नव्हे तर अधिक भर पुढेही पडणार नाही अशी खबरदारी घेतात. ही सर्व आकडेवारी लक्षात घेतल्यावर कोणीही ह्या सुशिक्षित मध्यमवर्गीय भगिनींचे अभिनंदनच करील की आधुनिक उपाययोजनांचा यशस्वी अवलंब करून राष्ट्राची एक गंभीर समस्या सोडविण्यास त्यांनी आपणांकडून अल्पसा हातभार लावला आहे. परंतु तसे करताना त्यांनी स्वतःचे व एकंदर समाजाचे नुकसानच केले आहे. कारण त्यांचीच पुढील पिढी ह्या सुसंस्कृत व शिकलेल्या वर्गाची तितक्याच संख्येने आपली जागा भरून काढणार नाही.

१९६५ च्या डेमोग्रॅफिक इयरबुकमधून यू. एस्., यू. के. आणि जपान ह्या देशांतील जननसंख्येचे स्थूल प्रमाण घेतले असून ते तक्ता २० मध्ये पहाणीतील स्त्रियांच्या अपत्यांच्या प्रमाणासहित उद्धृत केले आहे. एक हजार स्त्रियांनी जन्म दिलेल्या जिवंत अपत्यांचे प्रमाण जपानमध्ये सर्वांत अधिक आहे (३,२०४). दुसरा नंबर यू. के.चा (२,९६९) आणि नंतर यू. एस्. ए. (२,५०५). प्रस्तुत पहाणीनुसार अ गटात हे प्रमाण ७१४.५–वरील देशांपेक्षा फारच कमी–असून ब गटात २७२२ म्हणजे यू. एस्. ए. पेक्षा जास्त पण यू. के. पेक्षा कमी आहे. दोन्ही गटांचे प्रमाण सर्व देशांपेक्षा कमीच आहे. भारताचे हे प्रमाण मिळाले असते तर फार बरे झाले असते. त्यामुळे आपली जननसंख्येविषयीची माहिती अधिक व्यापक झाली असती. अ गटात हे प्रमाण ७१४.५ इतके कमी असल्यास आश्चर्य नाही. ह्या स्त्रिया उशीरा लग्न करतात (सरासरी २३ व्या वर्षी) आणि बऱ्याचजणी (४८ टक्के) कुटुंबनियोजन करीत आहेत. अ व ब गटाचे मध्यम प्रमाण १९१६ येते. ह्याच आकड्यांचे अधिक पृथक्करण केल्यास, उदाहरणार्थ ४३ वर्षांच्या वरील आधीच्या पिढीतील व ४३ च्या खालील स्त्रिया असे दोन गट केले तरीही मुलांच्या प्रमाणात फरक पडतो. हाच फरक दोन गटांची तुलना केल्यावरही दिसून येतो. तक्ता २१ पहावा.

वय आणि मुलांची संख्या ह्यांच्या अनुषंगाने अ व ब गटांतील स्त्रियांचे वर्ग केल्यास असे दिसून येते की, ४३ वर्षांच्या वर असलेल्या अ गटात ८२ स्त्रिया असून त्यांना २२६ मुले म्हणजे सरासरी प्रत्येकीस २.७६ मुले असे प्रमाण पडते, तर ब गटात ५६ स्त्रियांना २२३ मुले म्हणजे सरासरी ४.०० हे प्रमाण आधीच्या पिढीतील स्त्रियांच्या बाबतीत दिसून येते. ४३ वर्षांखालील म्हणजे अलिकडील पिढीच्या अ गटात ५१२ स्त्रियांना ८७० म्हणजे सरासरी १.७० मुले हे प्रमाण अ गटात येते.

## तक्ता २०

वयानुसार स्त्रियांची संख्या आणि जिवंत जन्मास आलेल्या एकूण मुलांची संख्या : १९६०–१९६७ खानेसुमारी* (ह्यामध्ये १५ वर्षांवरील सर्व स्त्रिया व ज्यांचे वय माहीत नाही अशा वयात आलेल्या सर्व स्त्रियांची संख्या घेतलेली आहे. एकाही सजीव मुलास जन्म न दिलेल्या स्त्रियांत, गुप्तपणे जन्म दिलेल्या स्त्रियाही अंतर्भूत आहेत.)

| देश | जिवंत मुलास जन्म न दिलेल्या स्त्रियांची टक्केवारीϕ | जिवंत मुलांचे प्रमाण∓ | वय | वर्ष |
|---|---|---|---|---|
| यू. एस्. ए. | १६.७ | २,५०५ | १५ व त्यावरील | १-४-६० |
| यू. के. | १९.९ | १,९९१ | १६ व त्यावरील | २३-४-६१ |
| यू. एस्. एस्. आर्. | आकडे उपलब्ध नाहीत | | | |
| जपान | १२.५ | ३,२०४ | १५ व त्यावरील | १-१०-६० |
| भारत | आकडे उपलब्ध नाहीत | | | |
| अ नमुना | १३.१ | ७१४.५ | १८ व त्यावरील | १-६-६५ ते ३१-१२-६६ |
| ब नमुना | ११.३ | २,१६२ | १८ व त्यावरील | १-६-६५ ते ३१-१२-६६ |
| अ + ब | १२.४६ | ९२३.६ | १८ व त्यावरील | |

* डेमोग्रॅफिक इयरबुक १९६९ पा. २२२-२३४.

ϕ डे. इ. बु. मध्ये दिलेल्या स्त्रियांच्या संख्येवरून ही टक्केवारी लेखिकेने काढली आहे.

∓ जननसंख्येचे स्थूल प्रमाण : १००० स्त्रियांस झालेली जिवंत अपत्ये.

ब गटामध्ये १२४ स्त्रियांना ३३७ मुले असल्यामुळे हे प्रमाण दर स्त्रीस २.७२ मुले असे येते. अ व ब गटांतील मुलांच्या सरासरी प्रमाणात असे अंतर पडण्याचे कारण पहिल्या गटातल्या स्त्रिया मिळवत्या असून दुसऱ्या अर्थार्जन करीत नाहीत, तथापि दोन्ही गट मध्यमवर्गातीलच आहेत हे निराळे सांगावयास नको.

१९६१ च्या खानेसुमारीतील आकड्यांनुसार: ". . . प्रजोत्पत्तीचा काल संपेतोपर्यंत एक भारतीय स्त्री सरासरी ६.६ मुलांना जन्म देते. ग्रामीण व नागरी जननसंख्येच्या प्रमाणात फरक पडत नाही असे दिसून येते."[११]

खानेसुमारीच्या सरासरीपेक्षा प्रस्तुत पहाणीतील (अ गटात १.८४ व ब गटात ३.११, तक्ता २१) सरासरी बरीच कमी आहे. एज्युकेशन कमिशनच्या अहवालात म्हटल्याप्रमाणे : ". . . जननसंख्येचे प्रमाण स्त्रीशिक्षणामुळे बरेच कमी होण्यास मदत होते."[१२] केवळ शिक्षणच नव्हे तर बाहेरील बौद्धिक कामाचाही जननसंख्येवर फार मोठा परिणाम घडून येतो.

डॉ. अगरवालांच्या मते : "१९६५ मध्ये भारतात ८२० लक्ष जोडपी होती. ह्यांपैकी ३२० लक्ष जोडप्यांना चार अगर त्यांपेक्षा अधिक मुले असून त्यांना जास्त मुले व्हावी अशी इच्छा नाही. उरलेल्या ५ कोटी लोकांना तीन अगर त्यांपेक्षा कमी मुले आहेत."[१३] ह्या आकड्यांवरून असा निष्कर्ष निघतो की ३९ टक्के जोडप्यांना चार किंवा अधिक मुले आहेत तर ६१ टक्के लोकांना चारांपेक्षा कमी आहेत. पहाणी-तील आकड्यांची वरील आकड्यांबरोबर तुलना केल्यास अ गटात अनुक्रमे १० व ९० टक्के आणि ब गटात २८ व ७२ टक्के असे प्रमाण पडते. लोकसंख्येच्या वाढीवर नियंत्रण घालण्याच्या दृष्टीने मध्यमवर्गाचा हा लहान कुटुंबाचा आदर्श फार विलोभनीय व आकर्षक वाटतो.

लोकसंख्येच्या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. संख्येची व दर्जाची. महाराष्ट्रातील ह्या मध्यमवर्गाच्या पहाणीनुसार बुद्धिजीवी वर्गामध्ये कुटुंबाच्या संख्येला मर्यादा घालण्याच्या दृष्टीने जैविक घटक अगोदरच परिणामकारक ठरत आहेत, हे तक्ता २० वरून दिसून येते. इतर प्रगत देशांतील अपत्यरहित स्त्रियांच्या प्रमाणाइतकेच ह्या पहाणीतील स्त्रियांचे प्रमाण आहे. तसेच पहाणीमध्ये १५ वर्षांवरील १००० स्त्रियांत मुलांचे प्रमाण बरेच कमी आढळून येते. ह्यातच भर म्हणजे प्रस्तुत नमुन्यात अविवाहितांची संख्या बरीच आहे. ज्या विवाह करतात त्याही बऱ्याच उशीरा करतात. विवाहितांपैकी काहीजणी 'दो या तीन बच्चे' ह्या आदर्श संख्येपेक्षाही कमी संख्या करण्याच्या दृष्टीने कुटुंबनियोजन करीत आहेत. ह्या सर्व गोष्टी साकल्याने विचारात घेतल्यास ह्या वर्गाची पुढील पिढी संख्येने तितकीच भरणार नाही. दोनापेक्षाही (१.८४) कमी मुले होऊ देण्याचा हेतू सामाजिक नसून वैयक्तिक आहे हे त्यातल्या त्यात विशेष ! ह्या विधानास पुष्टी मिळते ती पुढीलप्रमाणे : अ गटातील अपत्यरहित काही स्त्रिया कुटुंबनियोजन करितात तर तसे ब गटात एकही

**तक्ता २१**

वय, गट व अपत्यांची संख्या ह्यांनुसार उत्तरदायी स्त्रिया

| अ गट | | | | ब गट | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | | | | संख्या | | | |
| मुले | स्त्रिया | एकूण मुलांची संख्या | प्रत्येक स्त्रीस सरासरी मुलांची संख्या | मुले | स्त्रिया | एकूण मुलांची संख्या | प्रत्येक स्त्रीस सरासरी मुलांची संख्या |
| | | | ४३ वर्षांवरील वयातील स्त्रिया | | | | |
| १–३ | ५७ | ११५ | २.०० | १–३ | २९ | ६९ | २.४ |
| ४ व अधिक | २५ | १११ | ४.४४ | ४ व अधिक | २७ | १५४ | ५.७ |
| | ८२ | २२६ | २.७६ | | ५६ | २२३ | ४.० |
| | | | ४३ वर्षांखालील तरुण स्त्रिया | | | | |
| १–३ | ४७८ | ७१९ | १.४० | १–३ | १०१ | २२२ | २.२ |
| ४ व अधिक | ३४ | १५१ | ४.३१ | ४ व अधिक | २३ | ११५ | ३.० |
| | ५१२ | ८७० | १.७० | | १२४ | २३७ | २.७२ |
| एकूण | ५९४ | १०९६ | १.८४ | | १८० | ५६० | ३.११ |

## तक्ता २२

चार किंवा अधिक मुलांच्या संख्येचे जास्त पृथक्करण

| | अ गट | | | ब गट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुलांची संख्या | स्त्रियांची संख्या | मुलांची एकूण संख्या | मुलांची संख्या | स्त्रियांची संख्या | मुलांची एकूण संख्या |
| १३ वर्षांखालील | ४ | २५ | १०० | ४ | ७ | २८ |
| | ५ | ३ | १५ | ५ | ९ | ४५ |
| | ६ | ६ | ३६ | ६ | ७ | ४२ |
| | | ३४ | १५१ | | २३ | ११५ |
| १३ वर्षांवरील | ४ | १७ | ६८ | ४ | १५ | ६० |
| | ५ | ५ | २५ | ५ | ४ | २० |
| | ६ | ३ | १८ | ६ | १ | ६ |
| | | | | ६ पेक्षा जास्त | ७ | ६८ |
| | | २५ | १११ | | २७ | १५४ |

उदाहरण सापडत नाही.

वरील विवेचनावरून वाचकांना कदाचित असे वाटेल की समाजात सध्या असलेले वर्ग तसेच पुढे चालू रहावे ह्या उद्देशानेच ही पहाणी हाती घेतली असावी ! पण तसे नव्हे. स्वतंत्र भारताने लोकशाही स्वरूपाची समाजवादी समाजरचना हे ध्येय आपल्यापुढे ठेविले आहे; त्या ध्येयाशी लेखिका पूर्णपणे संमत आहे. समता, न्याय व बंधुभाव ही तत्त्वे वरील ध्येयपूर्तीच्या पायऱ्या आहेत. शक्य तो सर्वांना समान संधी व न्याय देण्याचा प्रयत्न चालू आहे. मागासलेल्या वर्गांना अनेक खास सवलती आहेत.[१४] तथापि जन्मतःच निसर्ग मनुष्यामनुष्यात फरक करीत असतो. सर्वजण एकजिनसी जन्माला येत नाहीत. पूर्वी म्हटल्याप्रमाणे[१५] सांस्कृतिक व बौद्धिक आनुवंशिकता काही प्रमाणात परिणामकारक ठरते. ज्याअर्थी भारत विकासाच्या मार्गावर पाऊलवाट चालू इच्छितो त्याअर्थी त्याला उच्च दर्जाच्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे. म्हणून ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. त्याचबरोबर आमजनतेला शिक्षण देऊन व हरएक क्षेत्रात समान संधी देऊन त्यांचीही पातळी उंचाविली पाहिजे.

राष्ट्राचे कुटुंबनियोजनाचे धोरण मध्यमवर्गाने केवळ मान्य केले आहे इतकेच नव्हे तर ते समाजहिताच्या दृष्टीने प्रत्यक्षात उतरविले आहे. ही प्रवृत्ती कितीही स्तुत्य असली तरी आमजनतेला लोकसंख्येच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले नाही व द्यावा तितका प्रतिसाद बहुसंख्य लोक देत नाहीत हे तक्ता २३ वरून दिसून येईल. १९६६/६७ मध्ये ही माहिती गोळा केली. तदनंतरच्या पाच वर्षांच्या काळात परिस्थितीत थोडाबहुत चांगल्या प्रकारचा बदल झाला आहे हे लेखिकेला मान्य आहे. तथापि प्रश्नाचा व्यापकपणा व गांभीर्य लक्षात घेता ही पाऊले फार सावकाश पडत आहेत असे म्हणावे लागते.

तेविसाव्या तक्त्यात अ व ब मधील दाम्पत्यांपैकी कोणा एकावरही निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया झाली आहे त्यांचेही आकडे घेतले आहेत. शिवाय त्यात $क_१$ व $क_२$ असे नवे गट घेतले आहेत. जानेवारी ते जून १९६६ मध्ये मुंबई व सोलापूर येथील साधारण खालच्या मध्यमवर्गातील चार खाजगी प्रसूतिगृहे आणि नऊ सार्वजनिक प्रसूतिगृहे येथील स्त्रियांवर कोणत्या बाळंतपणाच्या खेपेनंतर शस्त्रक्रिया केली गेली ते आकडे घेतले आहेत. हे आकडे सहा महिन्यांतील असून त्यांत धर्मानुसार केलेली नोंदही विचारात घेतली आहे. तक्त्यातील शेवटच्या कलमात कितव्या बाळंतपणानंतर निर्बीजीकरण केले गेले ते दिले आहे. अ गटातील शस्त्रक्रिया करून घेतलेल्या ६३ जणींपैकी २९, किंवा ४६.०३ टक्के स्त्रियांनी तीन मुलांच्या नंतर ती करून घेतली आहे. ही संख्या सर्वांत अधिक आहे. चौदा जणींनी दोन मुलांनंतर व दोघींनी एक बाळंतपण झाल्यावर शस्त्रक्रिया करविली. ह्या दोघीजणींची प्रकृती नीट रहात नसल्यामुळे त्यांना एकच मूल पुरे वाटले व डॉक्टरी सल्ल्यावरून शस्त्रक्रिया करवून घेतली. एकंदरीने ६३ जणींना१९६ मुले म्हणजे सरासरी ३.११ मुले

असून वयाच्या ३१.५ वर्षी प्रजोत्पादनाला त्यांनी पूर्णविराम दिला–गट अ.

ब गटात ३३ जणींपैकी १५ जणींनी म्हणजे ४६.४५ टक्के स्त्रियांनीही तीन मुलांच्यानंतर शस्त्रक्रिया करवून घेतली. परंतु ब गटात एका मुलानंतर प्रजोत्पादनाला टाळा दिल्याचे एकही उदाहरण नाही. एकंदरीने ३३ जणींना १३० मुले म्हणजे सरासरी ३.९३ मुलांच्यानंतर वयाच्या ३१ व्या वर्षी हा प्रयोग साधला आहे.

$क_1$ गटात १६० स्त्रियांना ६६६ मुले म्हणजे सरासरी ४.२ मुले असून वयाच्या २७.३३ व्या वर्षी शस्त्रक्रिया करवून घेतली. १ ते ६ मुलांपर्यंत शस्त्रक्रिया करवून घेणाऱ्यांची संख्या सम दिसून येते. ही माहिती मुंबईतील चार खाजगी प्रसूतिगृहांतील आहे.

$क_2$ गटात मुंबई व सोलापूर येथील सार्वजनिक नऊ प्रसूतिगृहांतील माहिती दिली आहे. ८५० स्त्रियांना ४,३६२ मुले म्हणजे सरासरी प्रत्येकीस ५.१३ मुले असून सरासरी वयाच्या २७.७१ व्या वर्षी शस्त्रक्रिया करवून घेतली आहे. ही वयाची सरासरी फक्त ४२ टक्के स्त्रियांच्या वयावरून काढली आहे. कारण ह्या सार्वजनिक प्रसूतिगृहात सर्वच स्त्रियांच्या वयांची नोंद सापडली नाही. पाचव्या बाळंतपणानंतर शस्त्रक्रिया करविल्याची सर्वांत अधिक संख्या आढळते.

लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे अ गटात सहाव्या बाळंतपणानंतर आणि ब गटात सातव्या बाळंतपणानंतर शस्त्रक्रिया करून घेतल्याचे एकही उदाहरण नाही. उलटपक्षी $क_1$ गटात म्हणजे खाजगी प्रसूतिगृहांतील उदाहरणांमध्ये आठव्या, अकराव्या आणि तेराव्या खेपेनंतर प्रत्येकी एक उदाहरण असून $क_2$ गटात बाराव्या, चौदाव्या, पंधराव्या आणि सोळाव्यासुद्धा बाळंतपणानंतर प्रत्येकी एक असे उदाहरण सापडते ! इतक्या उशीरा शस्त्रक्रिया करवून घेण्यात काय साध्य होते ह्याचे आश्चर्यच वाटते ! समाजाच्या अगदी खालच्या थरातील लोकांना एका मुलाची योग्य जोपासना करणे जेथे कठीण तेथे त्यांनी आठ, नऊ, दहा, इतकेच काय पण सोळा मुले होऊ द्यावी? निरनिराळ्या अहवालांतून शस्त्रक्रियेचे आकडे पाहून कुटुंबनियोजनाच्या यशाबद्दल अनुकूल पण चुकीचे मत बनण्याचा संभव आहे. अशा एका सार्वजनिक प्रसूतिगृहातील एका स्त्रीरोगचिकित्सक डॉक्टरने पुढील टीका केली: "बहुतेक स्त्रिया झोपडपट्टीतून येतात. तिसऱ्या बाळंतपणानंतर शस्त्रक्रिया करवून घ्या म्हणून आम्ही त्यांना परोपरीने सांगतो. परंतु तितक्याच कटाक्षाने तसे करण्याचे त्या टाळतात! प्रत्येक खेपेस बहुतेक जणींना त्यांचे व मुलांचे प्राण वाचावे म्हणून रक्त देणे व इतर उपचार करावे लागतात. नव्हे, डॉक्टर ह्या नात्याने आमचे ते कर्तव्यच असते. परंतु दैवदुर्विलास असा की अशा बेपर्वाई लोकांसाठी सार्वजनिक पैसा व मेहनत ही खर्ची पडतात!"

लार्सन अॅन्ड टोब्रो ह्या मुंबईतील एका मोठ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी मे १९६७ मध्ये कुटुंबनियोजन सप्ताह साजरा करण्यात आला. "एकंदरीने २,५०३

## तक्ता २३

अ, ब, क$_1$ व क$_2$ (४ खाजगी व ९ सार्वजनिक प्रसूतिगृहे) गटांतील वेगवेगळ्या खेपेच्या वेळी निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेचे आकडे

| खेप | संख्या | % | वर्धमान % | मुलांची संख्या | मुलांची सरासरी संख्या / शस्त्रक्रियेच्या वेळचे वय |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ गट | | |
| १. | २ | ३.१७ | ३.१७ | २ | ३.११ / ३१.५० |
| २. | १४ | २२.२२ | २६.३९ | २८ | |
| ३. | २९ | ४६.०३ | ७१.४२ | ८७ | |
| ४. | १२ | १९.०४ | ९०.४६ | ४८ | |
| ५. | ५ | ७.९३ | ९८.३९ | २५ | |
| ६. | १ | १.६१ | १००.०० | ६ | |
| एकूण | ६३ | १००.०० | | १९६ | ३.११ / ३१.५ |
| | | | ब गट | | |
| १. | — | — | — | — | ३.९३ / ३१.०० |
| २. | २ | ६.०६ | ६.०६ | ४ | |
| ३. | १५ | ४६.४५ | ५२.५१ | ४५ | |
| ४. | ५ | १५.४८ | ६७.९९ | २० | |
| ५. | ६ | १६.८६ | ८४.८५ | ३० | |
| ६. | ४ | १२.१२ | ९६.९७ | २४ | |
| ७. | १ | ३.०३ | १००.०० | ७ | |
| एकूण | ३३ | १००.०० | | १३० | ३.९३ / ३१.०० |
| | | | क$_1$ गट | | |
| १. | १९ | ११.९२ | ११.९२ | १९ | |
| २. | २१ | १३.११ | २५.०३ | ४२ | |
| ३. | २९ | १८.११ | ४३.१४ | ८७ | |
| ४. | २२ | १३.७५ | ५६.८९ | ८८ | |
| ५. | २५ | १५.६२ | ७२.५१ | १२५ | |
| ६. | २२ | १३.७५ | ८६.२६ | १३२ | |

(पुढे चालू)

| खेप | संख्या | % | वर्धमान % | मुलांची संख्या | मुलांची सरासरी संख्या / शस्त्रक्रियेच्या वेळचे वय |
|---|---|---|---|---|---|
| ७. | ११ | ६.८८ | ९३.१४ | ७७ | |
| ८. | ९ | ५.६२ | ९८.७६ | ७२ | |
| ९. | | | | | ४.२० / २७.३३ |
| १०. | | | | | |
| ११. | १ | ०.६२ | ९९.३८ | ११ | |
| १२. | | | | | |
| १३. | १ | ९.६२ | १००.०० | १३ | |
| एकूण | १६० | १००.०० | | ६६६ | |

क$_2$ गट

| खेप | संख्या | % | वर्धमान % | मुलांची संख्या | मुलांची सरासरी संख्या / शस्त्रक्रियेच्या वेळचे वय |
|---|---|---|---|---|---|
| १. | १२ | १.४० | १.४० | १२ | |
| २. | ६ | ०.७० | २.१० | १२ | |
| ३. | १९७ | २३.१७ | २५.२७ | ५९१ | |
| ४. | १४० | १६.४६ | ४१.७३ | ५६० | |
| ५. | १८० | २१.०० | ६२.७३ | ९०० | |
| ६. | १२६ | १४.८० | ७७.५३ | ७५६ | |
| ७. | ८२ | ९.९५ | ७९.४८ | ५७४ | ५.१३ |
| ८. | ५४ | ६.३५ | ९४.८३ | ४३२ | |
| ९. | ३१ | ३.११ | ९७.९४ | २७९ | |
| १०. | ९ | १.०१ | ९८.९५ | ९० | |
| ११. | ९ | १.०१ | ९९.९६ | ९९ | |
| १२. | १ | ०.०१ | ९९.९७ | १२ | |
| १३. | ० | — | — | ० | |
| १४. | १ | ०.०१ | ९९.९८ | १४ | |
| १५. | १ | ०.०१ | ९९.९९ | १५ | |
| १६. | १ | ०.०१ | १००.०० | १६ | |
| एकूण | ८५० | १००.०० | | ४,३६२ | ५.१३ / २७.७१* |

* ह्या गटातील सर्व स्त्रियांचे वय नोंदलेले नसल्यामुळे फक्त ४२ टक्के स्त्रियांच्या वयावरून ही सरासरी काढली आहे.

कर्मचाऱ्यांची मुलाखत घेण्यात आली; त्याचप्रमाणे विवाहित कर्मचाऱ्यांकडून गुप्तपणे माहिती गोळा केली गेली व त्याबरोबर प्रत्येकास डॉक्टरांच्या सूचनाही देण्यात आल्या. ह्या सर्व माहितीवरून डॉ. उषा कृष्ण ह्यांनी एक अहवाल तयार केला. ". . . एकंदरीने ३७९ कर्मचारी कुटुंबनियोजन करतात परंतु त्यांपैकी फक्त १९२ (१७ टक्के) योग्य व परिणामकारक कुटुंबनियोजनाची साधने वापरतात. . . . अज्ञान व निष्क्रियता ही . . . ८३ टक्के लोकांनी कुटुंबनियोजन न करण्याची कारणे . . . फक्त १० टक्के लोकांच्या बाबतीत धार्मिक कारणे आड येतात. देशात सामान्यतः आढळून येणारी प्रवृत्ती येथेही दिसून आली. अधिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना जास्त मुले असतात. तसेच कमी शिक्षितांना अधिक शिक्षितांपेक्षा तिप्पट मुले होतात. ज्या कुटुंबात मुलांची संख्या फार असते तेथे गर्भपाताचे व बालमृत्यूचे प्रमाण अधिक असते."[१६]

नसबंदीच्या शस्त्रक्रियेसंबंधी मिळालेल्या माहितीचे एकत्र समालोचन केल्यावर असे दिसून येते की अ पासून ब, व तदनंतर $क_१$ व $क_२$ ह्या गटांतील सरासरी मुलांची संख्या अनुक्रमे वाढत जाते. ह्यावरून समाजातील निरनिराळ्या थरांतील लोकांचा कुटुंबनियोजनाबाबतचा दृष्टिकोन कसा भिन्न आहे हे दिसून येते आणि लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याचे प्रयत्न कुठे केंद्रित केले पाहिजेत हे निःसंशयपणे दिग्दर्शित होते! मात्र ह्या चारही गटांत शस्त्रक्रियेच्या वेळचे स्त्रीचे वय कमी होत गेले आहे असे दिसून येते. ह्याचे कारण मध्यमवर्गातील ब गटातल्या व त्याच वर्गातील शिक्षित व अर्थार्जन करणाऱ्या अ गटातल्या स्त्रियांपेक्षा $क_१$ व $क_२$ गटांतल्या स्त्रियांचे विवाह लौकर झाले असावेत. विवाहसमयीचे क गटातल्या भगिनींचे वय समजण्यास मार्ग नसल्यामुळे वरील विधान अनुमानाने केले आहे. अ गटाच्या स्त्रियांचे विवाहाचे सरासरी वय २३ व ब गटाचे १८.८३ येते. शस्त्रक्रिया अनुक्रमे ३१.५ व ३१ वयाला करून घेतल्यामुळे प्रजोत्पादनाचा काळ मर्यादित होतो आणि खालच्या थरात प्रजोत्पादन २७ व्या वर्षी थांबविले जाते ही काही अंशी लोकसंख्या वाढीच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट आहे. पण ह्याची काही निराळी प्रतिक्रिया होण्याचाही संभव आहे!

भारतातल्या तीन मोठ्या धर्मीयांचा कुटुंबनियोजनाविषयी व शस्त्रक्रियेसंबंधी कोणत्या दिशेने कल आहे हे अजमाविण्याकरिता त्या त्या जमातीनुसार गोळा केलेल्या माहितीवरून आलेल्या प्रमाणास नमुन्याकरिता घेतलेल्या चार शहरांतील जमातीच्या प्रमाणाने गुणिले व पुनः चार शहरांतील स्त्रियांच्या प्रमाणा–८३३–ने गुणून पुढील आकडे काढले आहेत:—

| | अनुकूल | तटस्थ किंवा प्रतिकूल |
|---|---|---|
| हिंदू .. | ५०.३१ | ४९.६९ |
| ख्रिश्चन .. | ३५.६८ | ६४.३२ |
| मुसलमान .. | २८.३६ | ७१.६४ |

वरील आकड्यांवरून असे दिसून येते की हिंदू जमातीतील निम्म्यापेक्षा किंचित अधिक स्त्रिया कुटुंबनियोजन व शस्त्रक्रिया करवून घेण्यास अनुकूल आहेत, तर ख्रिश्चनांपैकी एक तृतियांश व मुसलमानांपैकी एक चतुर्थांश अनुकूल आहेत. निखालस आकडे कदाचित चुकीची दिशा दाखवतील परंतु वर हिशेब केलेल्या आकड्यांवरून त्यांचा दृष्टिकोन तरी दिसून येईल.

धर्मानुसार जननसंख्याविषयक माहिती ही फक्त स्थानिक पहाणीपुरती मर्यादित असल्यामुळे अखिल भारताचे चित्र रेखाटता येत नाही. तथापि ह्या सर्व पहाणीवरून असे दिसून येते की हिंदूंच्यापेक्षा मुसलमानांचे जननसंख्येचे प्रमाण अधिक आहे. उदाहरणार्थ कानपूरच्या पहाणीनुसार मुजुमदारांना आढळून आले की मुसलमान स्त्रियांच्या जननसंख्येचे प्रमाण ८.० असून हिंदू स्त्रीचे ७.० आहे.[१७] ड्रायव्हरना अशी माहिती मिळाली की मध्य भारतातील मुसलमान स्त्री सरासरी ४.६ अपत्यांना जन्म देते तर हिंदू स्त्रीच्या बाबतीत ही सरासरी ४.५ असते.[१८]

कुटुंबनियोजनाची मोहीम जी काही अंशी यशस्वी झाली आहे तिचे श्रेय मिशनरी धर्तीची सेवावृत्ती ज्या कार्यकर्त्यांत–ते पगारी असोत की बिनपगारी असोत–आहे अशा लोकांच्या श्रमाचे फल आहे. अशा तिघाजणांची ह्या पहाणीमध्ये लेखिकेशी भेट झाली. दोघेजण हॉस्पिटलमधूनच कार्य चालवित आहेत. सोलापूर येथील एक महाराष्ट्रीय वृद्ध परिचारिका व दुसरे गृहस्थ मुंबईच्या एका सार्वजनिक सूतिकागृहातील कुटुंबनियोजन केंद्राचे पर्यवेक्षक आहेत. तिसरी व्यक्ती म्हणजे एका उद्योगपतींची सुविद्य पत्नी. ह्यांच्याखेरीज अनेकांनी ह्या कार्यास वाहून घेतलेले आहे. परंतु ह्या तिघांचेच कार्य पहाण्याची लेखिकेला संधी मिळाली. त्यांना शतशः धन्यवाद!

माहिती गोळा करीत असताना काही अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांबरोबर व समाज-सेवकांबरोबर कुटुंबनियोजनाची मोहीम कशी अधिक यशस्वी होईल ह्याची चर्चा करण्याची संधी लेखिकेला मिळाली. त्यांनी प्रकट केलेले विचार पुढे दिले आहेत :

१. "स्त्रीचा दर्जा सुधारण्यासाठी भारतात कुटुंबनियोजन सक्तीचे करा"–एक डॉक्टर भगिनी.

२. "प्रत्येकाने कुटुंबनियोजन केले पाहिजे"–दुसऱ्या डॉक्टर भगिनी.

३. "जितकी आवश्यकता आहे तितक्या प्रमाणात कुटुंबनियोजनाचा अवलंब केला जात नाही"–डॉक्टरी व्यवसाय करणारी भगिनी.

४. "यशस्वी राष्ट्र होणे हे केवळ कुटुंबनियोजनावर अवलंबून आहे"–एक डॉक्टर भगिनी.

५. "कॅथलिक पंथीय म्हणून मला ह्या बाबतीत काही मत देता येत नाही"–एक स्त्रीप्राध्यापक.

६. "स्व-संयमन"–एका मेडिकल कॉलेजचे मुख्याधिकारी.

७. "कुटुंबनियोजनाचे उद्दिष्ट निश्चित करा. नंतर ते साध्य करण्याचा शंभर टक्के प्रयत्न करा"–दुसऱ्या एका मेडिकल कॉलेजचे मुख्याधिकारी. पुढे ते व्यंगोक्तीने म्हणाले, "कुटुंबनियोजन म्हणजे व्यभिचाराचा परवाना."

८. एका रुग्णालयातील सोळा डॉक्टरांची एकत्र बैठक लेखिकेने घेतली व तेथे ह्या प्रश्नाची चर्चा केली. सोळा जणींपैकी दहा जणींनी म्हटले, "तीन मुलांनंतर सक्तीने नसबंदी केली पाहिजे." ही बैठक सप्टेंबर १९६६ मध्ये घेतली होती. त्यांना आणखी एक प्रश्न विचारला–"गर्भपाताला कायदेशीर मान्यता दिल्यास लोकसंख्येची समस्या सुटण्यास मदत होईल का?" अकरा जणींनी ठामपणे नकार दिला. उरलेल्या पाच जणींनी खास परिस्थितीत परवानगी असावी असे उत्तर दिले.

९. "मुंबई शहरात जननाचे प्रमाण दर हजारी २७ आहे. इतके कमी प्रमाण असण्याचे कारण नागरी वातावरण, कुटुंबनियोजन नव्हे"–एका ट्रस्टचे मुख्य वैद्यकीय अधिकारी.

१०. "सर्व वर्ग कुटुंबनियोजन करीत आहेत"–एक डॉक्टर भगिनी.

११. "सध्याच्या गर्भपाताच्या कायद्यात सुधारणा झाली पाहिजे. काही खास परिस्थितीत, उदाहरणार्थ (१) बलात्कार, (२) वेडी आई, (३) आईच्या प्रकृतीला धोका असल्यास गर्भपाताला परवानगी असावी. सरसहा गर्भपाताला परवानगी दिल्याने लोकसंख्येचा प्रश्न सुटणार नाही ! तिसऱ्या अपत्यानंतर हरएक प्रकारची मोफत वैद्यकीय मदत, शिक्षण, नोकरी वगैरे देण्याचे बंद करा"–एका सुप्रसिद्ध स्त्रीरोगचिकित्सक बाईंनी जोरात उत्तर दिले. त्या जपानला दोनदा गेल्या होत्या. तेथे गर्भपात व गर्भधारणा आलटून पालटून चाले आणि त्यामुळे मातांची प्रकृती कशी खालावते हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. आता त्या देशाने डॉ. कोया ह्यांच्या विनामूल्य अविरत प्रयत्नांमुळे गर्भपाताऐवजी स्वखुषीने कुटुंबनियोजनाचा अवलंब केला आहे.[१९]

१२. "तिसऱ्या श्रेणीतील कर्मचारी स्त्रियांनी कुटुंबनियोजनाचा अवलंब केला आहे. परंतु बऱ्याच हिंदूंना मुलगा हवा असतो. पुष्कळ मुली असल्या तरी ते साधने वापरण्यास अगर शस्त्रक्रिया करून घेण्यास खुषी नसतात"–एक समाजकल्याण स्त्रीअधिकारी.

१३. "कारकुनी पेशातल्या स्त्रियांना कुटुंबनियोजन हवे असते पण श्रमजीवी वर्गातल्या फक्त पाच टक्के लोकांची हा सल्ला घेण्याची तयारी असते. शस्त्रक्रियेची त्यांना भीती वाटते. कारण त्यांना वाटते नपुंसकत्व येईल. चौथ्या श्रेणीतील काही

पुरुष अगदी मूर्ख किंवा ऐदी आहेत''—एक समाजकल्याण स्त्रीतपासनीस.

ह्याच बाईंना लूपसंबंधी विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, ''भारतीय परिस्थितीत लूप योग्य नाही. कारण मलविसर्जन करताना जोर केल्यास लूप पडून जाण्याचा संभव असतो. आपल्याकडे थोडेच कमोडस् आहेत?'' ज्या संस्थेत त्या काम करतात तेथल्या तिसऱ्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांना मुलांची व गर्भपाताची संख्या, आईचे बाळंतपणाच्या वेळचे वय, कुटुंबनियोजन अगर शस्त्रक्रिया करविली असल्यास वगैरे माहिती विचारणारी पत्रके वाटण्यात आली होती. ही पत्रके उत्तरांसहित भरून देण्यात येतील अशी अपेक्षा होती. परंतु सर्वांनी ती कचऱ्याच्या टोपलीत टाकली असे त्या बाईंनी सांगितले.

एक वयातीत सर्जन म्हणाले, ''लूपमुळे योनीच्या भागात घर्षण होते, त्यामुळे कॅन्सर होण्याचा संभव असतो. ह्याचे संशोधन चालू आहे.''

कुटुंबनियोजनाच्या पुरस्कारार्थ सरकारी व इतर संस्थांनी चालविलेल्या प्रयत्नांचा आपण थोडक्यात आढावा घेतलाच आहे. हे प्रयत्न अधिक कसोशीने ह्यापुढे चालविले जातील हे निश्चित. शिवाय पूरक म्हणून खालील सूचना करण्यात आल्या :

१. प्रौढ साक्षरता आणि सर्वांगीण कुटुंबकल्याण योजना.

२. उत्तेजनार्थ आर्थिक विलोभने.

३. गर्भपातास कायदेशीर मान्यता.

४. विवाहाचे व सम्मतीचे वय विसापर्यंत वाढविणे.

५. तीन अपत्यांनंतर सक्तीने नसबंदी.

ह्या प्रत्येक सूचनेचा थोडाफार उहापोह करू या. प्रौढ साक्षरता व कुटुंबकल्याण ह्याबद्दल कुणाचेच दुमत असणे शक्य नाही. परंतु भारतात सध्या ६५ टक्के (१९७१) लोक निरक्षर आहेत तेथे हा उपाय दीर्घकालीन असल्यामुळे तादृश लोकसंख्येची समस्या तातडीने सोडविण्यास अपुरा ठरेल. तथापि कुटुंबनियोजनाबरोबरच साक्षरतेचा प्रसार करण्याचे हरएक प्रयत्न चालू ठेवलेच पाहिजेत.

१. कुटुंबनियोजनाच्या जोडीने सध्या चालू आहेत त्यापेक्षा अधिक व्यापक अशा कुटुंबकल्याणाच्या योजना हाती घेतल्या तर मुलांची संख्या मर्यादित करण्याची आवश्यकता सामान्य जनतेला लौकर पटेल. आपल्या मुलांची शारीरिक व बौद्धिक काळजी घेतली जाते व तेणेकरून आपली जबाबदारी हलकी होते हे कोणत्या आईबापांच्या हृदयाला जाऊन भिडणार नाही? अर्थातच ते दुसरी सूचना झटदिशी मान्य करतील. परंतु अखिल राष्ट्रातील कुटुंबांच्या कल्याणासाठी पैसा खर्च करणे तूर्त तरी सरकारला भारी पडणार आहे. त्यामुळे हा उपायसुद्धा पुढे ढकलावा लागेल.

२. नसबंदी करणाऱ्या डॉक्टरांना व करवून घेणाऱ्या व्यक्तीला आर्थिक

विलोभन म्हणून रोख रक्कम देणे हा मार्ग सध्या सरकारने अवलंबिला आहे. परंतु स्वयंस्फूर्तीने नसबंदी करवून घेण्यास तयार होणे अधिक योग्य हे कोणीही मान्य करील. म्हणून लोकांचे मन वळविण्यावर अधिक भर असावा.

३. गर्भपाताला कायदेशीर मान्यता देणे हा फार वादाचा प्रश्न आहे. तथापि कृत्रिम गर्भपाताने आईच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. शिवाय वर उल्लेखिलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुख्याधिकाऱ्यांच्या मताप्रमाणे दुष्प्रवृत्त व्यक्तींच्या हातांत हे कायदेशीर कोलीत दिल्यासारखे होईल ! पण ह्या व्यतिरिक्त गर्भपातानंतर लौकर गर्भधारणा होते व दोन जिवंत मुलांना जन्म देण्यास जितका काळ लागतो त्यापेक्षा ह्या दोन गर्भधारणेत कमी काळ लोटतो.[२०] शिवाय गर्भपाताची व्यवस्था करण्यास जितक्या डॉक्टरांची व इतर साधनसामुग्रीची आवश्यकता लागेल तितकी करणे सध्या ह्या देशास शक्य नाही. ज्या प्रगत जपानने सरसहा गर्भपाताचा प्रयोग करून पाहिला त्यावरून तरी आपल्याला शहाणपणा घेता येईल. जरी गर्भपातामुळे जननसंख्येचे प्रमाण कमी झाले तरी त्याच जपानने आता अधिक सुरक्षित असा कुटुंबनियोजनाचा मार्ग अवलंबिला आहे. पीनल कोडमध्ये गर्भपातासंबंधी ज्या अटी आहेत त्या ढिल्या करण्याच्या दृष्टीने १९७१ साली दी मेडिकल टर्मिनेशन ऑफ् प्रेग्नन्सी अॅक्ट पास करण्यात आला आहे.

४. जननाचे प्रमाण कमी करण्याकरिता मुलीचे विवाहसमयीचे वय वीस करण्यात यावे हा एक उपाय सुचविला जातो. विवाहाचे वय वाढल्यास अपत्यसंख्या कमी होते हे तर प्रस्तुत पहाणीतून सिद्धच झाले आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने विवाहाचे वय वाढविणे इष्ट असले–डॉ अगरवालांच्या मते १९६१ मध्ये मध्यम वय १६ (?) होते[२१]–तरी वय वाढल्यामुळे जे इतर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे ते विचारात घेणे जरूर आहे. विवाहसमयीचे आदर्श वय कोणते हा मुद्दा आपण विवाहाच्या प्रकरणात चर्चिला आहे. तथापि वादाकरिता म्हणून २० हे वय योग्य आहे असे गृहीत धरल्यास वर मिळविण्याची चुरस वाढेल आणि आतापेक्षाही आईबापांना मुलीचे लग्न जुळविणे कठीण पडेल. त्यातच भारतासारख्या विस्तीर्ण देशात अशा सामाजिक कायद्याची अंमलबजावणी करणे दुरापास्त होईल. कारण धार्मिक आणि सामाजिक रूढींची बंधने कायद्यापेक्षा लोक अधिक तत्परतेने पाळीत असतात. १९६१ च्या खाने-सुमारीप्रमाणे १९ वर्षांखाली असलेल्या स्त्रियांच्या सर्व संख्येपैकी २० टक्के मुली विवाहित आहेत[२२] आणि हेसुद्धा सर्व जमातींना लागू असलेला १९२९ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा व शीख, जैन, बुद्ध ह्या सर्वांना लागू पडणारा १९३५ चा हिंदू विवाह कायदा अंमलात असताना !

आणखी एक बाजू लक्षात घेतली पाहिजे. सध्याच्या अस्वस्थ परिस्थितीत अशा कायद्यांचे पालन होण्याऐवजी ते धाब्यावर बसविण्याचा संभव अधिक. शिवाय अशा विवाहविषयक कायद्यांत आणखी एक पळवाट असते. कायद्याने घालून दिलेल्या

विवाहविषयक वयोमर्यादेपूर्वी लग्न झाल्यास ते लग्न रद्द होत नाही. फक्त ज्या कोणी हे लग्न जमवून आणले असेल त्यांना कायद्याने शिक्षा होते. पण तीसुद्धा कोणीतरी कोर्टात तक्रार केल्यास ! ह्या सर्व अडचणींचा विचार केल्यानंतर असा कायदा पास करणे निरुपयोगी ठरेल. आहेत कायदे त्यांचीच अंमलबजावणी कडकपणे करावी.

जे विवाहविषयक कायद्याच्या बाबतीत खरे आहे तेच सम्मती वय वाढविण्या-बाबतही तितकेच खरे ठरेल.

५. तीन अपत्ये जिवंत असल्यास नसबंदी करवून घेणे. अशी सक्ती कदाचित योग्य ठरेल. नव्हे महाराष्ट्र सरकारने भारत सरकारकडे अशी सूचना पाठविली पण होती. परंतु आपल्या राज्यात विनासक्ती कुटुंबनियोजनाचे कार्य समाधानकारक-रीत्या चालू आहे असे लक्षात आल्यावर ही सूचना मागे घेतली. यदाकदाचित असा कायदा झाला तरी तो पुरुषांवर शस्त्रक्रिया करण्यापुरता मर्यादित ठेवू नये. स्त्रियांनाही लागू असावा. कारण त्यांनाच गरोदरपण व बाळंतपण ह्यांचा त्रास सोसावा लागतो; त्यामुळे त्या शस्त्रक्रिया करवून घेण्यास तयार असतात व त्यांचा मागोवा काढणे सुलभ असते. शिवाय शस्त्रक्रिया करवून घेण्यास पतिपत्नी ह्या उभयतांच्या अनुमतीची आवश्यकता असते. ज्याप्रमाणे महाराष्ट्रराज्याने ही अट काढून टाकली आहे त्याप्रमाणे इतर राज्यांनीही ती रद्द करावी आणि ज्या व्यक्तीला तीन जिवंत अपत्ये आहेत त्याने वा तिने दुसऱ्याच्या अनुमतीची वाट पाहू नये. अर्थात येणेकरून पतिपत्नी-संबंधात वितुष्ट येण्याचा संभव आहे ही बाजू लक्षात घेऊनच.

तीन अपत्यांनंतर नसबंदी सक्तीने करण्याच्या प्रश्नाला दोन बाजू आहेत. असे करण्याने व्यक्तिस्वातंत्र्याचा भंग होतो किंवा नाही? नकारार्थी बाजू पुढीलप्रमाणे मांडता येईल : मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याने विवाह करण्याचा व कुटुंब स्थापन करण्याचा हक्क मान्य केला आहे (कलम १६) आणि तीन मुले होऊ देण्याने ह्या हक्काला मंजुरी मिळते. परंतु आपल्या सरकारमार्फत आपल्या नागरिकांच्या केवळ पालनपोषणाचीच जबाबदारी समाज उचलत नाही तर त्यांच्या कल्याणाचीही काळजी घेतो. भारत सध्याच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमध्ये, असलेल्या लोकसंख्येचे भरणपोषण करू शकत नाही तेथे संख्येवर नियंत्रण घालणे अगत्य आहे. अखेरीस व्यक्तीचे सर्व हक्क समाजमान्यतेतूनच निर्माण होतात. "समाजाने व्यक्तीला इतर बंधनांतून मुक्त केले आहे परंतु सामाजिक जीवनाला अवश्य असलेल्या बंधनातून मोकळे केले नाही. आधुनिक नैतिक व्यवस्थेचे व्यक्ती हे एक टोक तर समाज हे विरुद्ध दिशेचे दुसरे टोक आहे."[२३]

शिवाय, प्रचलित समाजरचनेमध्ये कुटुंबसंस्था ही मूलभूत संस्था समजली जाते–नव्हे तशी ती मान्य केलीच पाहिजे, कारण मानवतेच्या युगांतरीच्या इति-हासाने दाखवून दिले आहे की ही संस्था किती महत्त्वाची आहे ते! अशी परि-स्थिती असताना राष्ट्राचे उत्तम नागरिक होतील ह्याच दृष्टीने आपल्या मुलांचे

संगोपन त्यांनी केले पाहिजे. आईबाप आर्थिक अथवा सुप्रजाजननशास्त्रीयदृष्टचा आदर्श नसतील त्यांना अपत्यांना जन्म देण्याचा कोणता अधिकार पोहोचतो? ". . . ज्या दाम्पत्यांना सुप्रजाजननदृष्टचा अनुकूल देणगी आहे त्यांनी अधिक अपत्यांना जन्म दिल्यास आणि सर्वसामान्य व तितकी अनुकूलता नसणाऱ्यांनी कमी मुलांना जन्म दिल्यास समाजातील लोकसंख्येचा दर्जा सामान्यतः लौकर उंचावेल ह्यात शंका नाही."[२४]

तीन जिवंत मुले असताना सक्तीने नसबंदी करावी ह्या दृष्टीने केलेले वरील विवेचन लक्षात घेतल्यास सहज कोणीही त्या मतास अनुमती देईल. परंतु असे करण्यात अधिक महत्त्वाचा व मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला कितपत हात घालता येईल?

सरकारला व्यक्तिस्वातंत्र्य मर्यादित करण्याचा कितपत अधिकार आहे? व्यक्तीच्या स्वातंत्र्याची अंतिम हद्द कोणती व मानव म्हणून त्याचे हक्क कोठपर्यंत विस्तृत होऊ शकतात? हा मुद्दा कुटुंब नियोजनापुरताच मर्यादित नाही. "पुढील वीस वर्षांत शास्त्रज्ञ, मनुष्याच्या नैसर्गिक प्रेरणा, भावना व सहज प्रवृत्तींवर नियंत्रण करतील, तसेच मातेच्या उदरातील अपत्याचे लिंग बदलतील आणि व्यक्तीचे आयुर्मान कमी अधिक करू शकतील" अशी भीती स्टॅन्फोर्ड विद्यापीठात एकत्र आलेल्या अमेरिकन जीवशास्त्रज्ञांनी व्यक्त केली. ह्या परिषदेस अमेरिकेतील कायदेपंडित व न्यायशास्त्रज्ञ हजर होते. सर्वांच्या मते शास्त्रज्ञांच्या ह्या अफाट आघाडीला तोंड देण्याकरिता अमेरिकेची घटना बदलली पाहिजे व व्यक्तिस्वातंत्र्याला जरूर ते संरक्षण मिळाले पाहिजे असे ठरले.[२५] व्यक्तिस्वातंत्र्याच्या मर्यादांचा मुद्दा किती महत्त्वाचा आहे ते पहा.

ह्यावरून सक्तीने शस्त्रक्रिया करण्याचा विचार रद्द करावा लागतो आणि लोकमत कसे वळवून घ्यावे हा मुद्दा रहातो. पहिली तीन मुले झाल्यावर चौथ्या बाळंतपणास मोफत वैद्यकीय मदत न देणे तसेच वेतनवाढ न करणे वगैरे अनेक उपायांनी सरकारला अप्रत्यक्ष दडपण आणता येईल. सरकारने आपले धोरण निश्चित करावे व ते व्यवस्थित-पणे व निक्षून अंमलात आणावे.

लोकसंख्या मर्यादित करण्यास नसबंदीसारखे दुसरे ऐच्छिक साधन नाही. डॉ. अंक्लेसरिआ म्हणतात: "४,००० शस्त्रक्रिया करवून घेतलेल्या लोकांपैकी १,२१४ लोकांची प्रश्नपत्रिकेद्वारा व ७११ लोकांची प्रत्यक्ष तपासणी केल्यावर असे आढळून आले की ९४ टक्के लोकांच्या लैंगिक जीवनात कोणताही फरक झाला नाही, १ टक्के लोकांना त्रास झाला व ५ टक्के लोकांच्या बाबतीत शस्त्रक्रिया अयशस्वी झाली. हे प्रमाण १,२१४ उदाहरणांवरून काढले आहे."[२६] हाच उपाय निश्चित करावा आणि तीन वर्षांचा काल ठरवावा. मग त्या मोहिमेला "शंभर टक्के गती द्यावी", वर दिलेल्या मुख्याधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे.

परंतु ही गती येण्यास ह्या मोहिमेचें महत्त्व लोकांच्या अंतःकरणास जाऊन भिडले पाहिजे. राजकीय वा आर्थिक मते काहीही असोत, प्रत्येक नागरिकाने ह्या मोहिमेची जबाबदारी ओळखून तीत भाग घेतला पाहिजे. डॉक्टर, परिचारिका व इतर साहित्यासहित फिरत्या गाड्या खेडोपाडी हिंडून त्यात स्थानिक लोकांची मदत घेतली पाहिजे. "ये बच्चे बंद करनेवाले आये" असे म्हणून लोकांनी तुच्छतेने आपली दारे बंद करून घेता कामा नये. म्हणूनच इतर बालकांची व प्रौढांची आरोग्य-विषयक उपाययोजना जोडीजोडीने झाली पाहिजे.

प्रस्तुत पहाणीतून कुटुंबनियोजनविषयक जी बाजू प्रगट झाली आहे त्यासंबंधी एक दक्षतेची सूचना लेखिकेला कराविशी वाटते. सर्वत्र हा प्रचार चालू असताना एक काळजी घेतली पाहिजे. समाजात शिकलेला, सुसंस्कृत व सुप्रजाजननाच्या दृष्टीने आदर्श असलेला भाग फार अल्प आहे व असतो. अशा दाम्पत्यांनी तीन अपत्ये झाल्या-शिवाय शस्त्रक्रिया करवून घेऊ नये. ही दक्षता घेणे अर्थात डॉक्टरवर्गाच्या हातात आहे. तात्कालिक आर्थिक फायद्याकडे लक्ष न देता समाजाच्या विकासास अशा लोकांची किती जरुरी आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. आणि नेमका हाच वर्ग अद्यावत शोधांचा फायदा सर्वप्रथम घेत असतो !

## संदर्भ

१. यू. एन्. डेमोग्रॅफिक इयरबुक १९६५, पा. ३.
२. उपरोक्त ग्रंथ, पा. १-२.
३. सी. चंद्रशेखरन् ॲन्ड कॅथरिन कूडर, फॅमिली प्लानिंग थ्रू क्लिनिकस्, पा. ३३.
४. बी. एल्. राएना, फॅमिली प्लानिंग ॲन्ड पॉप्युलेशन प्रोग्रामस्–इंडिया, पा. १२१.
५. एस्. चंद्रशेखर (एडि), एशिआई पॉप्युलेशन प्रॉब्लेम्स (१९६७), पा. ८६-८७.
६. एन्सायक्लोपीडिआ ऑफ सोशल सायन्सेस्, व्हॉल्युम II (१९५५), पा. ५५९.
७. बी. एल्. राएना, उपरोक्त ग्रंथ, रीपोर्ट फॉर १९६२-६३, डायरेक्टोरेट जनरल ऑफ् हेल्थ सर्व्हिसिस, मिनिस्ट्री ऑफ् हेल्थ, न्यू दिल्ली.
८. एस्. चंद्रशेखर, उपरोक्त ग्रंथ, पा. ७४.
९. प्रकरण दुसरे पहावे.
१०. डेमोग्रॅफिक इयर बुक १९६५ पहावे.

११. एस्. एन्. अगरवाल, पॉप्युलेशन (१९६७), पा. १८.
१२. रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन, पा. १३५.
१३. एस्. एन्. अगरवाल, उपरोक्त ग्रंथ, पा. ११४.
१४. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांपैकी एकशष्ठांश विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व वेतन मिळते–दी टाइम्स ऑफ् इंडिया, ऑगस्ट १५, १९६७.
१५. प्रकरण तिसरे पहावे.
१६. "फॅमिली प्लानिंग सर्व्हे ऑफ् एल्. अॅन्ड टी. एम्लॉइझ्", लार्सन अॅन्ड टोब्रो लिमिटेड न्यूज लेटर, व्हॉल्युम ८, ऑक्टोबर ३, १९६७.
१७. डी. एन्. मुजुमदार, सोशल कन्टूरस् ऑफ अॅन् इंडस्ट्रिअल सिटी, पान १७४.
१८. ई. डी. ड्रायव्हर, डिफरेंशिअल फर्टिलिटी इन सेंट्रल इंडिया, पा. ३८.
१९. क्लेरेन्स हॉल, "पॉप्यूलेशन कन्ट्रोल, जपानीज् स्टाइल" इन, रीडरस् डायजेस्ट, एप्रिल १९६६.
२०. एस्. एन्. अगरवाल, उपरोक्त ग्रंथ, पा. ८२.
२१. एस्. एन्. अगरवाल, उपरोक्त ग्रंथ, पा. २६.
२२. प्रकरण दुसरे पहावे.
२३. एल्. टी. हॉबहाऊस, मॉरलस् इन एव्होल्युशन, पा. ३५३.
२४. दी टाइम्स ऑफ इंडिया, नोव्हेंबर २६, १९६९ पहावे.
२५. एफ्. ए. ई. क्रयू, "दी फर्टिलिटी अॅन्ड पॉप्युलेशन प्रॉब्लेम्स्", फॅमिली प्लानिंग वेलफेअर जर्नल, मार्च १९६७.
२६. एस्. बी. अंक्लेसरिआ, "लॉंग टर्म फॉलोअप स्टरलाइज्ड वुइमेन", फिफ्थ वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ गायनाकॉलजी अॅन्ड ऑब्स्टेट्रिक्स (१९६७), पा. ८६७.

## प्रकरण ५ वे

# शिक्षणविषयक यथार्थदर्शन

"जीवनाचे स्वरूप हे तत्त्वतः सामाजिक आहे आणि ह्या जीवनाच्या दाराची किल्ली शिक्षण ही आहे."[१] किल्ली तर खरीच! परंतु मुली व स्त्रियांच्या बाबतीत विद्यामंदिराची द्वारे ह्या किल्लीने गेल्या शतकातच त्यांना खुली झाली. शिक्षणाचा व्यापक अर्थ घेतल्यास मुलाच्या पहिल्या काही वर्षांत, नव्हे महिन्यांतच त्याच्यावर भलेबुरे संस्कार होतात व त्याला वळण लागते. ह्या संस्कारांचे ठसे पुढील आयुष्यात कदाचित अखेरपर्यंत टिकून रहातात. डॉ. जे. सी. मार्फतिया, प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ, इंडियन सायकिआट्रिक सोसायटीच्या एकोणिसाव्या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले : "मातापिता व मूल ह्यांच्यांतील निरोगी परस्परसंबंधावर योग्य व संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास अवलंबून असतो. पहिल्या सहा घडणीच्या वर्षांमध्ये काही मूलभूत कर, करू नको अशी शिस्त लावली पाहिजे. . . हे सर्व समजुतीने व प्रेमाने त्याचबरोबर खंबीरपणे करावे."[२] आणि येथेच आईला महत्त्वाचा कार्यभाग उचलावा लागतो. तितका वडिलांना अगर कुटुंबातल्या दुसऱ्या कुणालाही नाही. जितकी आई अधिक सुसंस्कृत, उदात्त आणि शिक्षित तितके मुलांच्या दृष्टीने अधिक चांगले. ह्याचा अर्थ पुरुषाच्या विशेषतः पित्याच्या भूमिकेला कमी लेखावयाचे नाही; मुलांच्या पुढे विशेषेकरून मुलग्यापुढे पित्याचाच आदर्श असतो.

मातेच्या उदात्ततेचे महत्त्व आमच्या आर्य पूर्वजांनी आपल्या संस्कृतीच्या सुरवातीपासूनच ओळखिले होते. केवळ माता म्हणूनच नव्हे तर एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून आर्यसंस्कृतीच्या सुरवातीस स्त्रियांनी किती हातभार लावला व पुढे तिचे स्थान कसे खालावत गेले, शिक्षण घेण्यास कशी बंदी झाली ही हकीगत अनेक लेखकांनी, स्वतः लेखिकेनेसुद्धा, पुनःपुनः सांगितली आहे. स्त्रियांना शिक्षणाची संधी मात्र गेल्या शतकाच्या काळापासून मिळाली आहे. ही संधी देण्याचे श्रेय अनेक उदार विचारसरणीच्या सुधारकांना दिले पाहिजे. ब्रिटिश अमदानीत व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री शिक्षणाची प्रगती कसकशी होत गेली हे तक्ता २४ मध्ये दिले आहे.

अखिल भारतीय पातळीवर स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचा काल ८४ वर्षांचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळाचे, वीस वर्षांचा एक, असे तीन टप्पे पाडले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळाचे मात्र, दहा दहा वर्षांचे विभाग केले आहेत. १९५१ मध्ये प्रथमतः भारताने नियोजनाचा अवलंब केला आणि १९६६ पर्यंत तीन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्या. भारतीय घटनेमध्ये पंधरा वर्षांत सर्वत्र मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची

## तक्ता २४

### स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचे सिंहावलोकन

गेल्या ८४ वर्षांतील निरनिराळ्या पातळ्यांवर शिक्षण घेत असलेल्या मुलींची संख्या

| तपशील | टप्पा | १८८२ | १९०१-२ | १९२१-२२ | १९४६-४७ | १९५६-५७ | १९६५-६६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राथमिक | | | | | | |
| १. केवळ संख्या .. | | १,२४,४९१ | ३,४४,७१२ | ११,८६,२२४ | ३४,७५,१६५ | ६५,४३,०८८ | १,८१,४५,००० |
| २. टक्के वाढ/घट : १९४६-४७ = | १०० | ४% | १०% | ३४% | १००% | १८८% | ५२२% |
| ३. दर १०० मुलांस मुलींची संख्या | | * | * | * | ३६ | ४२ | ५५ |
| | दुय्यम | | | | | | |
| १. केवळ संख्या .. | | २,०५४ | ९,०७५ | २६,१६३ | ६,०२,२८० | १८,८९,१०९ | ३९,०८,००० |
| २. टक्के वाढ/घट .. | | ३३% | १.५% | ४.३२% | १००% | ३१३.७८६% | ६४९% |
| ३. दर १०० मुलांस मुलींची संख्या | | * | * | * | १८ | २७.६ | ३०.५ |
| | महाविद्यालयीन व विद्यापीठीय (सर्वसामान्य आणि व्यावसायिक) | | | | | | |
| १. केवळ संख्या .. | | ६ | २५६ | ९०५ | २३,२०७ | १,०१,१०१ | ३२१,००० |
| २. टक्के वाढ/घट .. | | उपेक्षणीय | १.१% | ३.९४% | १००% | ४३९.१३% | ३९५.६५% |
| ३. दर १०० मुलांस मुलींची संख्या | | * | * | * | ९.५ | १६.६ | १९ |
| | शिक्षा व व्यवसायाच्या खास संस्था | | | | | | |
| १. केवळ संख्या .. | | ५१५ | २,३७० | १०,८३६ | ५६,०९० | २,३४,६२२ | १,२०,००० |
| २. टक्के वाढ/घट .. | | १% | ४.२२% | १९.३% | १००% | ४१८% | २१३.९७% |
| ३. दर १०० मुलांस मुलींची संख्या | | * | * | * | १२ | १६ | २३ |
| एकुण : १. .. | | १,२७,०६६ | ३,५६,४१३ | १२,२४,१२८ | ४१,५६,७४२ | ८७,६७,९१२ | २,२४,९४,००० |
| २. .. | | ३.०५% | ८.५५% | २९.४% | १००% | २१०.९% | ५४१.१५% |

*संबंधित आकडे उपलब्ध नाहीत.

आधारग्रंथ : रिपोर्ट ऑफ् दी नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स एज्युकेशन, १९५९ व रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन १९६६, पा. १३६.

सोय करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले होते त्याप्रमाणे शाळांची व अध्यापनमंदिरांची संख्या बरीच वाढविण्यात आली. शिवाय हरएक पातळीवर संशोधनासही उत्तेजन देण्यात आले. ह्याचा परिणाम म्हणजे तक्ता २४ कडे नजर टाकल्यास निरनिराळ्या पातळ्यांवर स्त्रीशिक्षणाची वाढ झालेली दिसून येते. १८८२ मध्ये प्राथमिक शाळांत १.२ लक्ष मुली शिकत होत्या. ही संख्या १९४६-४७ मध्ये ३० लक्षांवर व १९६५-६६ मध्ये १.८ कोटीवर वाढत गेली. तसेच दर १०० मुलांमागे मुलींच्या संख्येचे प्रमाण ३६ वरून ५५ वर गेले. परंतु ह्या प्राथमिक पातळीवरही मुलांइतकीच मुलींची संख्या गेली नाही हे लक्षात घेतले पाहिजे. तीच परिस्थिती दुय्यम शिक्षणाच्या पातळीवरही आढळते. तुलनात्मकदृष्टया पाहिल्यास पूर्वीपेक्षा अधिक मुली शिक्षण घेत आहेत. परंतु मुले व मुली ह्यांच्या संख्येत बरेच अंतर असलेले दिसून येते. जीवनाची पूर्वतयारी व आपल्या निरनिराळ्या भूमिका–नागरिकाचीसुद्धा–कार्यक्षमतेने पार पाडण्यास प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची मुलींनाही तितकीच आवश्यकता आहे हे कोणीही नाकबूल करणार नाही.

महाविद्यालयीन व विद्यापीठांच्या पातळीवरील १८८२ मधल्या एकम् स्थानी असलेल्या मुलींच्या आकडयाकडे कुणाचेही सहज लक्ष जाईल. तोच आकडा १९६५-६६ मध्ये लक्षस्थानी पोहोचला आहे, असे एज्युकेशन कमिशनच्या अहवालावरून दिसून येते. ही प्रगती कुणालाही नाकबूल करता येणार नाही. परंतु मुलींचे मुलांना प्रमाण विद्यापीठीय पातळीवर १ : ४ येते (सर्वसामान्य शिक्षण).[३] तेच प्रमाण १ : ५ महाविद्यालयीन व अध्यापनीय पातळीवर कमी होते. कमिशनच्या मते : "हे (१ :४ ) प्रमाण आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने योग्य नव्हे. आम्हाला असे वाटते की ही (देशाची) गरज लक्षात घेता पुढील दहा वर्षांत ह्या पातळीवर ३३ टक्के तरी मुलींची नावे नोंदवली गेली पाहिजेत तरच निरनिराळ्या क्षेत्रांतील शिक्षित स्त्रियांची पुरेशी जागा भरून निघेल."[४]

मुलांच्या बरोबरीने येण्यास लगतच्या भावी काळात मुलींना आपली गती त्वरेने वाढवावी लागेल. उपरोक्त ध्येय साध्य होण्याच्या दृष्टीने एज्युकेशन कमिशनने दोन मार्ग सुचविले आहेत : (१) महाविद्यालयात व विद्यापीठात स्त्रीविद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्त्या व आर्थिक मदत ह्यांची उदार स्वरूपाची योजना आखणे (२) स्त्रीविद्यार्थ्यांकरिता योग्य परंतु काटकसरीच्या वसतीगृहांची व्यवस्था **करणे**.

शिक्षणामध्ये मुलांच्या मानाने मुली संख्येने मागे रहात असल्या तरी स्त्रीलोकसंख्येच्या प्रमाणात स्त्रीविद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे हे तक्ता २५ वरून दिसून येईल. खानेसुमारीच्या माहितीप्रमाणे[५] १९५१-६१ च्या दरम्यान ०-४ वयोमान गटात स्त्रीसंख्या १.८ टक्क्यांनी वाढली. १९५१ साली ज्या मुली ह्या वयोमान गटात होत्या त्या १९५६-५७ मध्ये प्राथमिक शाळेत असण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे १९६१ च्या खानेसुमारीतील ०-४ गटामधल्या १९६६-६७ मध्ये प्राथमिक

शाळेत असल्या पाहिजेत, तत्सम काळात प्राथमिक शाळेत मुलींची ४२२ टक्के वाढ झाली आहे; त्याचप्रमाणे दुय्यम शिक्षणाच्या पातळीवरही ५४ टक्क्यांची वाढ दिसून येते. वास्तविक १९५७ ते १९६१ च्या दरम्यान ४-५ वयोमान गटात ०.५ टक्क्याची स्त्रीलोकसंख्येत घट झालेली दिसून येते. तसेच १९५१-६१ मध्ये ज्या मुली जन्माला आल्या त्यांनी १९५६-५७ व १९६५-६६ मध्ये दुय्यम शाळेत प्रवेश करून घेतला असला पाहिजे. ह्याच पद्धतीने आकडेमोड केल्यास ११४ टक्क्यांची वाढ महाविद्यालये व विद्यापीठे ह्यांत झालेली दिसते. हरएक पातळीवरील अशा प्रकारच्या ह्या प्रचंड वाढीवरून असे दिसून येते की मुलींना व त्यांच्या पालकांना अधिकाधिक शिक्षण घेऊन आपली स्थिती सुधारावी असे वाटते. हाच निष्कर्ष तक्ता २५ मधील स्त्रीशिक्षिकांच्या संख्येवरून दिसून येईल.

एकूण शिक्षकांच्या संख्येत सर्वत्र वाढ झालेली दिसून येते व त्याचबरोबर पुरुषांच्या मानाने स्त्रीशिक्षकांची संख्याही वाढली आहे. इतकेच नव्हे तर नॅशनल कमिटी ऑन वुइमेनस् एज्युकेशन १९६५[६] मध्ये पुऱ्या होणाऱ्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस जे उद्दिष्ट म्हणून ठरविले होते त्यापेक्षा १९६५-६६ मध्ये स्त्रीशिक्षकांची वाढ अधिक झाली आहे. तक्ता २५ कडे पुनः एकदा दृष्टिक्षेप केल्यास रेखांकित केलेले आकडे दर शिक्षकास–स्त्री वा पुरुष–मिश्र विद्यार्थ्यांचे प्रमाण दाखवितात. १९४९-५० साली प्राथमिक शिक्षक सरासरी ३३ विद्यार्थ्यांना शिकवीत असे. तीच संख्या १९६५-६६ साली ४८ झाली आहे. एका शिक्षकाने छोटया मुलांच्या एवढया मोठया संख्येस शिकवावयाचे म्हणजे शिक्षकाची परीक्षाच म्हणावयाची. ह्यामुळे एकतर शिक्षणाचा दर्जा खालावतो व दुसरे असे की पुरेसे शिक्षक मिळत नसावे. "संख्या वाढली तरी शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. शिकवण्याची व शिकण्याची पातळी खाली गेली आहे. ह्याला प्रत्यक्ष पुरावा देता येत नाही तथापि शिक्षणाशी संबंधित असलेल्या व्यक्तींचे हे मत आहे."[७]

दुय्यम व उच्च शिक्षणाचा विचार केल्यास दर शिक्षकामागे विद्यार्थ्यांची संख्या अधिक वाटते. शिवाय शिक्षकाला नेमलेल्या अभ्यासाबाहेर इतरही गोष्टी कराव्या लागतात. पुढील व्यवसायविषयक प्रकरणात शिक्षकाचे चित्र आपणास अधिक जवळून पहावयास मिळेल.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवर शिक्षकांची संख्या वाढलेली दिसून येत असली तरी विद्यार्थ्यांचे प्रमाण तेच राहिले आहे. जर ह्या उच्च पातळीवर वर्गात कमी विद्यार्थी असले तर त्याला व्यक्तिशः विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देता येईल व स्वतःलाही काही निर्मायिक ग्रंथनिर्मिती करता येईल. त्यातल्या त्यात जी अपेक्षा नॅशनल कमिटीची होती त्यापेक्षा येथेही स्त्रीशिक्षकांची संख्या बरीच वाढली आहे असे दिसून येते. अशी प्रगती असली तरीसुद्धा पुरुषशिक्षकांच्या मानाने स्त्रीशिक्षिका अल्पसंख्याकच आहेत – प्राथमिक पातळीवरसुद्धा एकतृतियांश.

## तक्ता २५

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीशिक्षिकांची संख्या (कंसात त्यांचे पुरुषशिक्षकांशी प्रमाण, स्त्रीपुरुष शिक्षक मिळून विद्यार्थ्यांचे दर शिक्षकास प्रमाण, तसेच तिसऱ्या योजनेतील संकल्पित संख्या दिली आहे.)

| | | १९४९-५० | १९५६-५७ | १९६५-६६ |
|---|---|---|---|---|
| १. पूर्व-प्राथमिक .. | प्राथमिक | ५१५(३६.९)२६ | १७६७(५१०.०)१४ | |
| प्राथमिक .. | | ७९३३९(१८.०)३३ | १२१२६५(२०.६)३१ | |
| | | ७९८५४(१९.०)३३ | १२३०३२(२१.०)३० | १४०००० (३७.०)४८* |
| २. मिडल स्कूल .. | दुय्यम | १२०७८(१८.०)२५ | ३१०८०(२३.०)२४ १/४ | |
| हायस्कूल .. | | १८६५६(१९.०)२४ | ३९१३३(२३.५)२३ | |
| | | ३०७३४(१८.५)२४ | ७०२१३(२३.२६)२४ | ९५०००(२८.०)३७ |
| ३. विद्यापीठे व महाविद्यालये | उच्च | १७७२(१०.२५)१९ | ४६०८(१२.३)१७ | ११२६२(१५.०)२० |
| ४. व्यावसायिक, तांत्रिक वगैरे | विशेष | ४२४२(१७.०)५२ | ५११९(१३.०)३८ | ६२००(१७.०)१५ |
| एकूण .. | | ११६६०२(१८.०) | २०२९७२(२०.०) | २५२४६२(३०.४५) |

*'एज्युकेशन कमिशनच्या अहवाला'तील तक्ता ९.१, पा. २३३ मधील आकड्यांवरून हे प्रमाण काढले आहे.

ह्याच अनुषंगाने कमिटी ऑन् दी लीगल अॅन्ड एकॉनॉमिक स्टेटस ऑफ वुइमेन ऑफ दी इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वुइमेन व कल्चरल रिलेशन्स कमिटी ह्यांनी दहा (१९५६-६५) वर्षांतील स्त्रीपदवीधरांची चौकशी करून काढलेल्या माहितीचा मुख्य गोषवारा थोडक्यात दिल्यास उपयुक्त ठरेल.

कमिटीने टीका केली आहे: ". . . बऱ्याच देशांत (एकंदरीने ४५) मुलींना दुय्यम शिक्षण पुरे करणे, नव्हे सुरू करणेसुद्धा अशक्य असते." त्यांच्या मार्गातील अडचणी पुढीलप्रमाणे :

"(अ) . . . घर व शाळा ह्यांत असलेले बरेच अंतर.

(ब) . . . योग्य शालागृहे बांधण्यास आणि जरूर तितके शिक्षक नेमण्यास पुरेसा पैसा नसणे; . . . घरात व शेतीवर मुलींची मदत.

(क) तपासणी अधिकाऱ्यांची कमतरता.

(ड) सामाजिक परिस्थिती व रूढी."

उच्च शिक्षणाच्या बाबतीत त्याच अहवालात पुढील टक्केवारी दिली आहे.

आय् एल् ओ अहवालात म्हटले आहे : "बाळंतपण आणि मातृत्व ह्यांमुळे व्यवसायात अडथळे येतील ह्या कल्पनेने ज्या शिक्षणासाठी बराच काल व पैसा लागेल व त्यातून कौशल्याची व जबाबदारीची रोजगारी पत्करावी लागेल असे शिक्षण मुलींना देण्यास मुलांशी तुलना करता नाखुषी दिसून येते. आज जरी ह्यात बदल झालेला दिसून येत असला, आणि व्यवसायात दीर्घ कालाचे व वरचेवर येणारे व्यत्यय कमी होत असलेले–आणि निर्वेध काम वा व्यवसाय करणारींची संख्या वाढत आहे–दिसून येत असले तरीसुद्धा मुलींच्या भावी कामाविषयींच्या कल्पना व वास्तवता ह्यांत महदंतर दिसून येते."[८]

वरीलपैकी पहिल्या अहवालात पुढील उपाय सुचविले आहेत :

"(अ) मुलींना अधिक शिष्यवृत्त्या;

(ब) स्त्रीविद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थीकुटुंबांसाठी वसतिगृहांची व्यवस्था व तेथे शिशुसंगोपनगृहे वगैरे;

(क) पत्रद्वारे प्राथमिक अभ्यासक्रमाची व्यवस्था;

(ड) मुलींचा दुय्यम अभ्यासक्रम मुलांसारखाच आखणे म्हणजे मुलींना उच्च शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळण्याची समान संधी मिळेल;

(इ) ज्या देशात मुलामुलींची फारकत करण्याचे सरकारी धोरण आहे तेथे सर्व पातळ्यांवर अधिक सहशिक्षणाच्या संस्था स्थापणे;

(फ) शिक्षकवर्गाचा दर्जा सुधारणे व संख्या वाढविणे;

(ग) दुय्यम शाळांत अगर समाजात सल्लागार पद्धती सुरू करणे.

वरील यादी ही संपूर्ण नाही हे उघडच आहे."[९]

स्त्रीशिक्षणाची प्रगती आणि शिक्षाविषयक अंगे ह्यांचे येथवर सिंहावलोकन

तक्ता २६*

| | आर्टस् | लॉ | फार्म. | मेडिसिन | सायन्स | टेक्नॉलॉजी |
|---|---|---|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिआ १९६५ | | | | | | |
| बी.ए./बी.एस्.सी. .. | ४७ | ११ | ४१ | १७ | २० | २ |
| बेल्जिअम, १९६४ .. | ४२.७१ | १५.८० | ४२.६२ | १४.९४ | २५.५२ | ०.८३ |
| कॅनडा १९६२-६३ .. | ३३.४० | ५.२० | २८.५० | १०.४० | १५.८० | उपेक्षणीय |
| लंका .. | ५० | | | ३३ | ५ (फि.) | १ पेक्षा कमी |
| डेन्मार्क १९६२-६३.. | ५२.४० | २६.८० | ५२.५० | २४.२० | २२.४० | ४ |
| फिन्लंड १९६०-६१ . | ७७ | १९ | ८६ | ३६ | ३८ | "फक्त मुले" |
| ग्रेट ब्रिटन १९६१-६२ | ४२ | अंदाजे ४० | | २२ | २२ | ३ |
| आयलंड (उ. व द.) . | ४३ | २१ | ४० | २६ | ३० | फक्त १ |
| जपान (महाविद्यालय व विद्यापीठ). | ४३.८० | १.८० | ५६.७० | ९.८० | २.१० | (सायन्स व इंजिनिअरिंग मिळून) |
| हॉलंड १९५४-५५ .. | ४२ | ३० | | २० | १६ | १ |
| न्यूझीलंड .. | १७ | ४ | | १.९० | २० | ० |
| दक्षिण आफ्रिका .. | ५२.१० | ४.२० | | १९.८० | २८ | ०.१४ |
| नॉर्वे १९६१ .. | ५१.८० | १७ | ६२.५० | २३ | २६.६५ | ४.४० |
| स्वित्झर्लंड १९६१-६२ | | | ५० | १७.३० | | |

*आयएफयूडब्ल्यू, दी पोझीशन ऑफ दी वुमन ग्रॅज्युएट टुडे–ए सर्वे (१९५६-६५), पा. ६.

केले. ह्यापुढे त्यांनी शारदेच्या उपासनेत कायकाय संपादित केले आहे ते पहावयाचे आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये शालान्त परीक्षेपासून मुलींची मुलांबरोबर चढाओढ

चालू असते. १९६६ व १९६७ सालाचे महाराष्ट्र बोर्डाचे शालान्त परीक्षांचे निकाल पाहिल्यास मुली प्रमाणतः अधिक संख्येने उत्तीर्ण होतात. तीच वस्तुस्थिती विद्यापीठीय परीक्षांतून दिसून येते.

तक्ता २७ कडे नजर टाकल्यास पुण्याच्या एस्. एस्. सी. बोर्डाच्या परीक्षेस ६२.५ टक्के मुले व ३७.५ टक्के मुली, तसेच १९६७ साली ७६.३९ टक्के मुले आणि २३.६१ टक्के मुली परीक्षेस बसल्या होत्या. ह्यावरून मुलांच्या निम्मे मुली हजर होत्या असे दिसून येते. म्हणजे दुय्यम शिक्षण घेण्यात मुलामुलींत बरीच तफावत पडते. परंतु परीक्षेस बसलेल्या मुलींपैकी ५०.१५ टक्के १९६६ साली यशस्वी झाल्या तर त्याच वर्षी शालान्त परीक्षेला बसलेल्या मुलांपैकी ४३.८५ टक्केच उत्तीर्ण झाले. तोच निष्कर्ष १९६७ च्या सर्व तिन्ही बोर्डांच्या परीक्षांच्या निकालांतून निघतो. मुली ५४.७२ टक्के व मुले ४४.२१ टक्के उत्तीर्ण झाली.

तसेच तक्ता २८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या १९६७ मधील सर्व परीक्षांचे निकाल दिले आहेत. बी.ए. परीक्षेला मुली मुलांच्यापेक्षा संख्येने अधिक बसतात. परंतु एम्.ए. व पी.एच्.डी. परीक्षेला त्यांची टक्केवारी कमी असते. यशाची माळ मात्र मुलींच्या बाबतीत सर्वत्र अधिक प्रमाणात पडते. फक्त शिक्षाप्रमाणपत्र व ग्रंथालयशास्त्र परीक्षांमध्ये मुलामुलींची टक्केवारी सारखीच येते. पी.एच्.डी ह्या उच्चतम परीक्षेची टक्केवारी देता येत नाही कारण ह्या पदवी परीक्षेकरिता वेळ निश्चित केलेली नसते. अधिकृत त्या त्या शाखेच्या मुख्याध्यापकांच्या हाताखाली ठरलेल्या नियमाप्रमाणे संशोधन करावयाचे असल्यामुळे तो प्रबंध सामान्यतः मान्य केला जातो. अशा रीतीने हे व्यक्तिशः कार्य करावयाचे असते.

विज्ञानशास्त्रे, व्यापार, कायदा व वैद्यकीय शाखांना बसलेल्या व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे आकडे दिले आहेत. जे आर्टस् शाखेच्या बाबतीत खरे आहे तेच ह्याही शाखांतून दिसून येते. विद्यार्थिनी संख्येने कमी बसलेल्या असल्या तरी यशस्वी होण्यात अधिक क्रमांक लावतात. फक्त एल्.एल्.एम्. (कायदा) परीक्षेत मात्र उलट झाले आहे. ८.३ टक्के मुली तर मुले २२.४ टक्क्यांनी यशस्वी झाली आहेत.

वरील शाखांतील निरनिराळ्या परीक्षांमध्ये सुवर्णपदके, पारितोषिके वगैरे मिळवण्यामध्येही मुलांच्यापेक्षा मुलींचा क्रमांक अधिक लागतो. अशा तऱ्हेने विद्या संपादन करीत असताना मुली आपले बुद्धिसामर्थ्य विशेषत्वाने प्रगट करितात.

तंत्रशास्त्र उर्फ टेक्नॉलॉजी म्हणजे आधुनिक युगात अत्यंत प्रगत पण तितकेच अवघड शास्त्र आहे. ह्याही क्षेत्रात मुलींचे गुण मुलांच्या इतकेच किंवहुना थोडे अधिकच दिसून येतात. मात्र बी.फार्म आणि बी.एस्सी. (टेक्) परीक्षा सोडल्यास इतर शाखांत उत्कृष्टता मिळविण्यात मुलांचा क्रमांक वर लागतो. कदाचित ह्याचे

**तक्ता २७**

निकालांचे मूल्यमापन

महाराष्ट्रातील पुणे, नागपूर आणि औरंगाबाद बोर्डातर्फे
१९६६ व १९६७ मधील शालान्त परीक्षा

| | पुणे | नागपूर | औरंगाबाद | एकूण |
|---|---|---|---|---|
| मार्च १९६६ | | | | |
| उपस्थित एकूण | १,०८,९७७ | | | |
| टक्के | १००% | | | |
| मुले | ६८,११० | | | |
| टक्के | ६२.५% | | | |
| मुली | ४०,८६७ | | | |
| टक्के | ३७.५% | | | |
| यशस्वी एकूण | ४४,१४७ | | | |
| टक्के | ४०.५१% | | | |
| मुले | २७,८२४ | | | |
| टक्के | ४०.८५% | ४७.४१% | ४३.२९% | ४३.८५% |
| मुली | १६,३२३ | | | |
| टक्के | ४९.७३% | ५२.१२% | ४८.६२% | ५०.१५% |
| मार्च १९६७ | | | | |
| उपस्थित एकूण | १,५०,२८४ | ५२,५२५ | १९,६६६ | २,२२,४७५ |
| टक्के | १००% | १००% | १००% | १००% |
| मुले | १,०९,५९८ | ४२,४९७ | १७,८६७ | १,६९,९६२ |
| टक्के | ७२.२६% | ८०.९०% | ९०.८५% | ७६.३९% |
| मुली | ४०,६८६ | १०,०२८ | १,७९९ | ५२,५१३ |
| टक्के | २७.७४% | १९.१०% | ९.१५% | २३.६१% |
| यशस्वी एकूण | ७१,१३७ | २४,१९९ | ८,५३२ | १,०३,८६८ |
| टक्के | ४७.३४% | ४६.०९% | ४३.३८% | ४६.६८% |
| मुले | ४८,११३ | १९,३५३ | ७,६६७ | ७५,१३३ |
| टक्के | ४३.९०% | ४५.५४% | ४२.९१% | ४४.२१% |
| मुली | २३,०२४ | ४,८४६ | ८६५ | २८,७३५ |
| टक्के | ५६.५९% | ४८.३२% | ४८.०८% | ५४.७२% |

संदर्भ : १९६६–लोकसत्ता ३० जानेवारी १९६७–पत्र नं. एस्.डी.आर्./स्टेटस्/९८२९ एम.एस्. बोर्ड ऑफ् सेकंडरी एज्युकेशन, ५ ऑक्टोबर १९६७.

कारण मुली अत्यल्प संख्येने–१, २, ६, १७ किंवा अजिबात नाही–ह्या अवघड शाखांच्या परीक्षेस बसल्या आहेत. त्यात विशेष हे की टेक्स्टाईल व इंडस्ट्रिअल मॅनेजमेंट ह्या विषयांकडे मुली अजून वळलेल्या दिसत नाहीत.

वास्तव परिस्थिती आणि वरील आकडे म्हणजे स्त्रियांच्या बौद्धिक कामगिरीची साक्षच होय. १९६७ चे निकाल अपवादात्मक म्हणता येणार नाहीत. हीच वस्तुस्थिती १९६६ साली होती. स्त्रियांच्या बौद्धिक उत्कृष्टतेचा रोख शिक्षणतज्ञ व सर्वसामान्य लोक ह्यांच्याही लक्षात आला होता. ह्या घटनेची फोड करण्याकरिता विविध प्रकारची स्पष्टीकरणे पुढे मांडली जात आहेत. त्यातल्या त्यात अशी बाजू मांडली जाते की सध्याच्या परीक्षा म्हणजे बुद्धीमत्तेची खरी कसोटीच नव्हे तर त्यात यश मिळविणे हे केवळ "निर्बुद्ध पाठांतरावर" अवलंबून असते. शिवाय असे म्हटले जाते की "मुली ह्या सुशिक्षणीय असतात. लहानपणापासूनच त्यांना आज्ञाधारकपणा व कंटाळवाणे आणि तेच तेच काम करावयास शिकविले जाते. त्या सनातनी वृत्तीच्या व रूढीप्रिय असतात. बहुतेक ह्याच गोष्टीमुळे आमच्या विद्यापीठांत–ती पीठे म्हणजे अफाट अशी विद्याविषयक नोकरशाही–मुलींना फायदा उठवता येतो, असे खात्रीने कुणाला म्हणता येणार नाही. परंतु तसे असण्याचा संभव आहे."[१०] वादाकरिता आपण गृहीत धरले की, आमची परीक्षा पद्धत सदोष आहे तसेच त्यात बरीचशी पुनरुक्ती असते आणि मुली अधिक सुशिक्षणीय असतात तरीसुद्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या पात्रतेच्या अंदाजी का होईना पण आयत्या कसोट्या असतात. जर त्यात मुली अधिक पात्रता दाखवित असल्या तर त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. शिवाय, हेही ध्यानात घ्यावयास पाहिजे की आपले बहुतेक पुढारी हे शालेय व विद्यापीठीय फार हुशार विद्यार्थी असत.

सांख्यकी खात्याचे एक अधिकारी लेखिकेला म्हणाले, "काही वेळेला केवळ आकडे दिशाभूल करतात आणि मुली शालान्त व विद्यापीठीय परीक्षांत उच्चांक मिळवितात हे त्यांच्या श्रेष्ठतर बुद्धिमत्तेचे लक्षण नव्हे. ह्या घटनेची सखोल कारणे शोधली पाहिजेत. ज्या मुली उच्च शिक्षणाकडे वळतात त्या आर्थिकदृष्ट्या सुखवस्तू व सुसंस्कृत थरातून येत असतात." ह्या विधानात थोडेबहुत सत्य आहे. आपल्या मुलांना विशेषत: मुलींना सुखवस्तू लोकच उच्च शिक्षण देऊ शकतात. महाराष्ट्र सरकार आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना शिक्षणाच्या सवलती देते हे जरी खरे असले तरी सर्वसामान्य परिस्थिती वरीलप्रमाणेच आहे. सामान्यत: आईबाप मुलीकडे आर्थिक साधन म्हणून पहात नाहीत. कारण कण्वऋषींनी म्हटल्याप्रमाणे मुली ह्या 'अर्थो हि कन्या परकीय एव'। त्यांचे एकूण लग्न व्हावयाचे हे ठरलेलेच. आपल्या शालेय शिक्षणात मुली जर विशेष गुण मिळवित असल्या तर पुढील शिक्षणास परवानगी मिळते. पुढेही आपल्या कन्या जर प्रगती दाखवू लागल्या तर आईबापांना धन्यता वाटते. परंतु मागील प्रकरणात[११] पाहिल्याप्रमाणे मुलींची लग्ने

मुंबई विद्यापीठाच्या

| | शाखा (आर्टस्) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बी.ए. जनरल | बी.ए. स्पेशल | एम्.ए. | डिप्लोमा इन एज्युकेशन, लायब्ररी, फ्रेंच, रशियन, एकूण | बी. लायब्ररी | बी. एज्युकेशन |
| **उपस्थित :** | | | | | | |
| विद्यार्थी .. | १३ | १४०८ | ३८६ | १०७ | ९ | १४३ |
| | २४.५ | ४५.९ | ६१.० | ३५.० | २७.३ | ४२.२ |
| विद्यार्थिनी .. | ४० | १६६१ | २४७ | १९८ | २४ | १९६ |
| | ७५.५ | ५४.१ | ३९.० | ६५.० | ७२.७ | ५७.८ |
| एकूण .. .. | ५३ | ३०६९ | ६३३ | ३०५ | ३३ | ३३९ |
| | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |
| **यशस्वी :** | | | | | | |
| विद्यार्थी .. .. | ११ | ८२३ | २२३ | १०४ | ५ | १४१ |
| | ८४.६ | ५८.५ | ५८.० | ९७.२ | ५५.६ | ९८.६ |
| विद्यार्थिनी .. .. | ४० | १३३७ | १९८ | १९२ | १४ | १९३ |
| | १००.० | ८०.५ | ८०.२ | ९७.० | ५८.३ | ९८.५ |
| एकूण .. .. | ५१ | २१६० | ४२१ | २९६ | १९ | ३३४ |
| | ९६.० | ७०.४ | ६६.५ | ९७.१ | ५७.६ | ९८.५ |
| **उत्कृष्ट :** | | | | | | |
| विद्यार्थी .. .. | — | ४ | १० | २ | — | ८ |
| | | ०.५ | ४.५ | १.९ | | ५.८ |
| विद्यार्थिनी .. .. | — | १६ | १९ | १७ | २ | २७ |
| | | १.२ | ९.६ | ८.९ | १४.३ | १३.६ |
| एकूण .. .. | — | २० | २९ | १९ | २ | ३५ |
| | | ०.९ | ६.९ | ६.४ | १०.५ | १०.५ |

निकालांचा गोषवारा–मार्च १९६७

| शाखा | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (आर्टस्) | | (सायन्स) विज्ञानशास्त्रे | | | (कॉमर्स) वाणिज्य | | |
| एम्. एज्यु-केशन | पीएच्. डी. | बी. एस्.सी. | एम्. एस्.सी. | पीएच्. डी. | बी.कॉम्. | एम्.कॉम्. | डिप्लोमा इन् बी.एम्., एल्.डब्ल्यू. एकूण |
| ९ | | १७२१ | २७८ | | ९७८ | ११६ | ७५ |
| ३६.० | | ७२.५ | ७८.३ | | ९१.० | ९५.० | ९७.४ |
| १६ | | ६५४ | ७७ | | ९७ | ६ | २ |
| ६४.० | | २७.५ | २१.७ | | ९.० | ५.० | २.६ |
| २५ | | २३७५ | ३५५ | | १०७५ | १२२ | ७७ |
| १००.० | | १००.० | १००.० | | १००.० | १००.० | १००.० |
| ६ | २९ | ११५१ | १४१ | ६१ | ४३० | ५१ | ५० |
| ६६.७ | | ६६.९ | ५०.७ | | ४३.९ | ४४.० | ६६.६ |
| १४ | १२ | ५३७ | ५८ | ११ | ६३ | ३ | २ |
| ८७.५ | | ८३.६ | ७५.३ | | ६५.० | ५०.० | १००.० |
| २० | ४१ | १६८८ | १९९ | ७२ | ४९३ | ५४ | ५२ |
| ८०.० | | ७१.१ | ५६.० | | ४६.० | ४४.३ | ६७.५ |
| — | — | १०१ | २९ | | ३७ | ८ | ४ |
| | | ८.७७ | २०.६ | | ८.९ | १५.८ | ८.० |
| — | — | ६१ | १३ | | ८ | — | — |
| | | ११.३६ | २२.४ | | १२.७ | | |
| — | — | १६२ | ४२ | | ४५ | ८ | ४ |
| | | ९.५३ | २१.१ | | ९.१३ | १४.८ | ७.७ |

| | शाखा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (लॉ) कायदा | | (मेडिसिन) वैद्यशास्त्र | | | | (टेक्नॉलॉजी) उद्यमशास्त्र |
| | एल्.एल्. बी. | एल्.एल्. एम्. | एम्.बी. बी.एस्. बी.डी.एस् बी.एस. सी. (मेडिसिन). | एम्.डी. एम्.एस्. एम्.डी. एस्. एम्.एस्. सी. फि.पी. एम्. एम्.आर.ई. एम्.एल्. टी. | डिप्लोमा इन् ए.व्ही. ॲन्ड डी.हाय. | बी. एस्सी. नर्सिंग | बी.ई. सिव्हिल, मेक्., इले., के. इंजिनि. |
| उपस्थित : | | | | | | | |
| विद्यार्थी .. | ८३९ | १३४ | २५३ | २३६ | ४२ | — | ३३३ |
| | ९०.६ | ९१.८ | ७०.५ | ८५.० | ६४.५ | | ९९.४ |
| विद्यार्थिनी .. | ८७ | १२ | १०६ | ४२ | २० | ७ | २ |
| | ९.४ | ८.२ | २९.५ | १५.० | ३५.५ | १००.० | ०.६ |
| एकूण .. | ९२६ | १४६ | ३५९ | २७८ | ६२ | ७ | ३३५ |
| | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |
| यशस्वी : | | | | | | | |
| विद्यार्थी .. | ४२९ | ३० | १५३ | ६७ | ३० | — | २४१ |
| | ५१.१ | २२.४ | ६०.५ | २८.४ | ७१.४ | | ७२.४ |
| विद्यार्थिनी .. | ६१ | १ | ७२ | २० | १८ | ७ | २ |
| | ७०.० | ८.३ | ६७.९ | ४७.६ | ९०.० | १००.० | १००.० |
| एकूण .. | ४९० | ३१ | २२५ | ८७ | ४८ | ७ | २४३ |
| | ५२.९ | २१.२ | ६२.७ | ३१.३ | ७७.४ | १००.० | ७२.५ |
| विद्यार्थी .. | २ | १ | ९ | — | — | — | ६३ |
| | ०.५ | ३.५ | ४.० | | | | २६.२ |
| विद्यार्थिनी .. | २ | — | — | — | — | — | — |
| | ३.३ | | | | | | |
| एकूण .. | ४ | १ | ९ | — | — | — | ६३ |
| | ०.८ | ३.३ | ४.० | | | | २५.९ |

| शाखा | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (टेक्नॉलॉजी) उद्यमशास्त्र | | | | | | | | |
| एम्.ई. सिव्हिल मेक्. ऑटो. | बी.व्ही. सायन्स | एम्.व्ही. सायन्स | बी. फार्म. | बी. टेक्स्ट. | बी.एस्सी. टेक्. | बी. आर्क. | डिप्लोमा आय्. एम्. | पीएच्. डी. |
| १० | ३२ | १५ | १९ | १७ | १०५ | ११६ | २६ | |
| १००.० | ९६.० | १००.० | ७६.० | १००.० | ९८.१ | ८७.२ | १००.० | |
| — | १ | — | ६ | — | २ | १७ | — | |
| | ४.० | | २४.० | | १.९ | १२.८ | | |
| १० | ३३ | १५ | २५ | १७ | १०७ | १३३ | २६ | |
| १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | |
| ८ | २० | ११ | १६ | १६ | ९३ | ४४ | २० | ६ |
| ८०.० | ६२.५ | ७३.३ | ८४.२ | ९३.५ | ८८.६ | ३८.० | ७७.० | |
| — | १ | — | ६ | — | २ | ३ | — | १ |
| | १००.० | | १००.० | | १००.० | १७.७ | | |
| ८ | २१ | ११ | २२ | १६ | ९५ | ४७ | २० | ७ |
| ८०.० | ६३.० | ७३.३ | ८८.० | ९३.५ | ८८.८ | ३५.३ | ७७.० | |
| — | — | ५ | १ | ९ | ४० | — | ७ | |
| | | ४५.५ | ६.३ | ५६.३ | ४३.० | | ३५.० | |
| — | — | — | ३ | — | २ | — | — | |
| | | | ५०.० | | १००.० | | | |
| — | — | ५ | ४ | ९ | ४२ | — | ७ | |
| | | ४५.५ | १९.२ | ५६.३ | ४४.२ | | ३५.० | |

लांबणीवर पडतात, कारण त्यांच्या शिक्षणामुळे त्या एका कुटुंबाला आर्थिक आधार होऊन बसतात. ह्यावरून आपल्याला असे म्हणता येईल की बहुसंख्य मुली जरी सधन कुटुंबांतून येत असल्या तरी काहीजणी कमी उत्पन्नाच्या मध्यमवर्गातील गटातूनही व्यावसायिक शिक्षणाकरिता पुढे येतात. काही असो, प्रस्तुत मुद्दा जर मान्य केला तर त्यावरून आमच्या आनुवंशिक घटकाच्या महत्त्वाला पुष्टी मिळते. अमान्य केला तर मुलींचा विद्याभ्यासातील वरचढपणा कबूल करावा लागेल. एकूण आपल्याला ह्यातून असा निष्कर्ष काढता येतो की अनुकूल सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा घटक आणि "मुलींची तीन ते चार वर्षांनी मुलांच्या पूर्वी होणारी वाढ"[१२] ह्यामुळे त्या काही प्रमाणात वरचा क्रमांक मिळवत असतील, शिवाय त्या अभ्यास अधिक लक्षपूर्वक व मनापासून करीत असतील. परंतु त्यावरोबरच ही गोष्ट कबूल करावीच लागते की बुद्धिमत्तेच्या बाबतीत मुलांपेक्षा मुली अधिक श्रेष्ठ नसल्या तरी बरोबरीच्या आहेत. ह्याच अनुषंगाने डॉ. मॅकोबी ह्यांनी केलेले विधान लक्षात घेण्यासारखे आहे. त्या म्हणतात: "एखाद्या स्त्रीला योग्य अशी बुद्धिमत्तेची देणगी असली आणि त्याला अनुकूल व पूरक अशा मन:प्रवृत्तींचा व विचारांच्या सवयींचा तिच्यात विकास झाला असला तरीसुद्धा समाजाने निर्माण केलेल्या अडथळ्यांना तोंड देऊन सर्वांगीण व सुखी व्यक्तिमत्व वाढीस लावून आपल्या बौद्धिक प्रवृत्तीची जोपासना करण्यास ती बाई फार चलाख व शीघ्रगामी असली पाहिजे."[१३]

वरील तात्त्विक चर्चा बाजूला ठेवली तरीसुद्धा एक मुद्दा उरतोच आणि तो म्हणजे ह्या विद्येतील प्राविण्याचा उपयोग स्वतःच्या आणि एकंदरीत समाजाच्या सुधारणेसाठी कसा करता येईल. उच्च शिक्षण हेच एक साध्य आणि शिक्षणाकडे भौतिक उपयुक्ततेच्या दृष्टीने पहाणे, विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत, योग्य नव्हे अशी बाजू कोणी पुढे मांडण्याचा संभव आहे. हे म्हणणे आर्टस् शाखेपुरते ठीक आहे. परंतु ज्या शिक्षणाकरिता मुख्यत्वे सरकार खर्च करते आणि जेथे ठराविक संख्येने विद्यार्थी घेतले जातात, उदाहरणार्थ वैद्यकी, तंत्रशास्त्र, त्या शिक्षणाचा उपयोग करून घेतलाच पाहिजे.

म्हणूनच प्रथम ह्या पहाणीत आलेल्या अ गटातील १,५३४ आणि ब गटातील २५९ स्त्रियांची शैक्षणिक पातळीप्रमाणे विभागणी करू (तक्ता २९) आणि त्यांनी आपल्या शिक्षणाचा कोणता उपयोग केला आहे हे पुढे तक्ता ३० मध्ये पाहू.

उत्तरदायी स्त्रियांचे सहा मुख्य गट पाडले आहेत: (१) पदवीपूर्व; (२) पदवीधर आणि मिळविलेली अधिक प्रशस्तिपत्रके वगैरे. उ.–एम्.बी.बी.एस्.,जी.डी.ओ.; (३) मास्टर पदवी किंवा दोन बॅचलरस् पदव्या व शिवाय काही विशेष उ.–बी.ए., एल्.एल्.बी., एम्.ए., सी. ए.आय्.आय्.बी.; (४) एका शाखेत बॅचलरस् पदवी व दुसऱ्या शाखेत मास्टरस् पदवी किंवा उलट अथवा तीन निरनिराळ्या शाखांत

बॅचलरस् पदवी; (५) दोन शाखांत मास्टरस् पदवी आणि डॉक्टोरेट तसेच परदेशी विद्यापीठातील डॉक्टोरेट पदवी; (६) शेवटच्या भागात, चढाओढीच्या स्वरूपाच्या अखिल भारतीय लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांची संख्या नमूद केली आहे. असे सहा गट केले आहेत.

वरील वर्गीकरणानुसार अ गटाच्या ३३८ अगर २२.०४ टक्के स्त्रियांनी फक्त शालान्त परीक्षा दिली आहे. ब गटात ह्याच सदरात ७१ किंवा २७.४१ टक्के स्त्रिया असून ५१ टक्के भगिनी तेथपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. मध्यमवर्गातील मागील पिढीतील ह्या भगिनी आहेत. साधारणपणे चाळीस वर्षांपूर्वी मुलींच्या शिक्षणाची विशेष प्रगती झाली नव्हती. ही वस्तुस्थिती तक्ता २४ वरून लक्षात येण्यासारखी आहे. १९२१-२२ साली अखिल भारतात दहा लक्ष मुलीसुद्धा प्राथमिक शिक्षण घेत नव्हत्या आणि साक्षरतेचे प्रमाण अवघे ८ टक्के होते. तक्ता २९ मधील तिसऱ्या रकान्यात अ गटातील ३७७ किंवा २४.५८ टक्के व ब गटातील ७ किंवा ३.२४ टक्के स्त्रियांनी शालान्त परीक्षेव्यतिरिक्त बी.पी.एन्.ए. (परिचारिका प्रशस्ती) किंवा राष्ट्रभाषा विशारद वगैरे परीक्षा यशस्वीरीत्या दिल्या आहेत.

पदवीपरीक्षा दिली नाही परंतु काही वर्षे महाविद्यालयांत घालविली आहेत अशा अ गटात ११५ किंवा ७.५ टक्के व ब मध्ये ६ अगर २.३१ टक्के स्त्रिया आहेत. शिवाय दुसरे काही शिक्षण घेतलेल्या अ मध्ये २० अगर १.३ टक्के आहेत. एकंदरीने पदवीपूर्व वर्गीकरणात आपल्या नमुन्यातील अ पैकी ५५.४१ टक्के व ब पैकी ८३.४० टक्के भगिनी येतात. ह्यावरून असे दिसून येते की अ पैकी निम्म्याहून अधिक स्त्रिया शालान्त अगर पदवीपूर्व पायरीपर्यंत जाऊन नोकरी अगर व्यवसाय करू लागतात आणि ब पैकी चार-पंचमांशापेक्षा अधिक स्त्रिया शिक्षणाची इतकीच मजल गाठतात.

दुसऱ्या वर्गामध्ये २२५ स्त्रियांनी आर्टस् शाखेत पदवी घेतली असून ११ जणींनी पदवीनंतर आणखी काही शिक्षण घेतले आहे (अ गट). ब गटातील २८ जणी हीच पदवी घेतलेल्या आढळल्या. सायन्स ह्या विषयात पदवी घेतलेल्या अ मध्ये २५, ब मध्ये ५; होमसायन्समध्ये ४ (अ); आर्कि-टेक्चरमध्ये पदवी घेतलेल्या ३ व डिप्लोमा घेतलेल्या ३; इंजिनिअरिंगमध्ये ६; मेडिसिन ४० शिवाय डि.जी.ओ. सारखा त्याच शाखेतला डिप्लोमा घेतलेल्या १७ जणी; २० स्त्रियांनी परिचारिकेची पदवी (B.Sc. नर्सिंग) व एकीने आणखी डिप्लोमा घेतला आहे; ६ लॉची पदवी आणि ५ जणी कॉमर्स विषयाच्या पदवीधर आहेत. ह्या सर्वच अर्थोत्पादन करीत असल्यामुळे अ गटात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. एकंदरीने २२.५५ टक्के अ गटातल्या, व १२.७४ टक्के ब गटातल्या, स्त्रिया निरनिराळ्या विषयांच्या पदवीधर आहेत.

तक्ता

अ आणि ब गटातील

| | | एस्.एस्.सी. | | | पदवीपूर्व | | | डिप्लोमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खाली | फक्त | अधिक | फक्त | अधिक | | फक्त |
| गट अ व ब | | | | | | | | |
| टक्केवारी | | | ५५.४१% | | | २२.५५% | | |
| गट अ | | | | | | | | |
| केवळ संख्या | | – | ३३८ | ३७७ | ११५ | २० | | |
| गट ब | | | | | | | | |
| केवळ संख्या | | १३२ | ७१ | ७ | ६ | – | | |
| आर्टस् | अ | | | | | | | २२५ |
| | ब | | | | | | | २८ |
| सायन्स | | | | | | | | |
| जनरल | अ | | | | | | | २५ |
| | ब | | | | | | | ५ |
| होम | अ | | | | | | ३ | ४ |
| आर्किटेक्चर | अ | | | | | | | ३ |
| इंजिनिअरिंग | अ | | | | | | | ६ |
| मेडिसिन | अ | | | | | | | ४० |
| नर्सिंग | अ | | | | | | | २० |
| लॉ | अ | | | | | | | ६ |
| कॉमर्स | अ | | | | | | | ५ |
| एकूण गट अ | | – | ३३८ | ३७७ | ११५ | २० | ३ | ३३४ |
| एकूण गट ब | | १३२ | ७१ | ७ | ६ | – | – | ३३ |
| टक्के | अ | – | २२.०४ | २४.५ | ७.५ | १.३ | ०.१९ | २३.७ |
| टक्के | ब | ५०.४४ | २७.२४ | ३.२४ | २.३१ | – | – | १२.७४ |

स्त्रियांची शैक्षणिक पात्रता

| किंवा पदवी | | | पदव्योत्तर आणि दुहेरी पदवी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अधिक | | | पदव्योत्तर | | | | | | | दुहेरी पदवी | |
| डिप्लोमा | | फक्त | अधिक डिप्लोमा | | दुसरी पदवी : शाखा | | | | | अधिक डिप्लोमा | |
| संबं-धित | असंबं-धित | | संबं-धित | असंबंधित | एज्यु. | टी. | लॉ | मेडि. | कॉम. | संबंधित | असंबंधित |
| | | | | | १८ ९१ | | | | | | |
| १० | १ | ५२ | १ | ८ | १८ | १९ | १० | – | २ | १ | १ |
| | | १० | – | – | – | – | – | – | – | – | – |
| | | ७ | | | ७ | ४ | २ | २ | | | |
| | १७ | ३ | १ | | | | | | | | |
| | १ | | | | | | | | | | |
| | | १ | | | | | | | | | |
| १० | १९ | ६३ | २ | ८ | २५ | २३ | १२ | २ | २ | १ | १ |
| – | – | १० | – | – | – | – | – | – | – | – | – |
| ०.६५ | १.१ | ४.४३ | ०.१३ | ०.५२ | १.९५ | १.५ | ०.७८ | ०.१३ | ०.१३ | ०.०६ | ०.०६ |
| – | – | ३.८६ | – | – | – | – | – | – | – | – | – |

अ आणि ब गटातील

शिवाय म्हणजे (१) दुसऱ्या शाखेत मास्टरची पदवी; (२) मास्टरच्या पदवीनंतर दुसऱ्या शाखेत बॅचलरची पदवी; (३) तीन शाखांत बॅचलरची पदवी.

| | | बॅचलरस्+मास्टरस् | मास्टरस्+बॅचलरस् | | | | | ३ बॅचलरच्या | शिवाय डिप्लोमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एज्युके. | सायन्स | टी. | एज्यु. | लॉ. | लिब.सायन्स | पदव्या | संबंधित | असंबंधित |
| गट अ व ब | | | | | | | | | | |
| टक्के | | | २.४१% | | | | | | | |
| गट अ | | | | | | | | | | |
| एकूण संख्या | | | | | | | | | | |
| गट ब | | | | | | | | | | |
| एकूण संख्या | | | | | | | | | | |
| आर्टस् | अ | १० | १ | ७ | ४ | ३ | १ | १ | १ | ४ |
| | ब | | | | | | | | | |
| सायन्स | | | | | | | | | | |
| जनरल | अ | | | १ | | | | | १ | |
| | ब | | | | | | | | | |
| होम | अ | | | | | | | | | |
| आर्किटेक्ट | अ | | | | | | | | | |
| इंजिनिअरिंग | अ | | १ | | | | | | | |
| मेडिसिन | अ | | | | | | | | | |
| नर्सिंग | अ | | | | | | | | | |
| लॉ | अ | | | | | | | | | |
| कॉमर्स | अ | | | | | | | | | |
| एकूण | अ | १० | २ | ८ | ४ | ३ | १ | १ | २ | ४ |
| एकूण | ब | – | – | – | – | – | – | – | – | – |
| गट अ टक्के | | .६५ | .१३ | .५२ | .२६ | १.९५ | ०.०६ | ०.०६ | .१३ | .२६ |
| गट ब टक्के | | – | – | – | – | – | – | – | – | – |

स्त्रियांची शैक्षणिक योग्यता

| स्पेशल | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| डबल मास्टरस् | | | डॉक्टोरेट | | | | | |
| डिग्री अधिक | | डिप्लोमा | आर्टस् | सायन्स | मेडिसिन | परदेशीय पदवी | ऑल इंडिया सर्व्हिसिस् | एकूण संख्या अ + ब |
| आर्टस् | सायन्स | असंबंधित | | | | | | |
| | | | | | | | | ८५० |
| | | | | | | | ०.२६% | |
| | | | | | | २ | ३ | २१६ |
| | | | | | | | | ३८९ |
| | | – | ४ | | | | १ | ३८ |
| | १ | – | | | | | | ५१ |
| | | | | | | | | ५ |
| | | | | | | | | ४ |
| | | | | | | | | ६ |
| | | | | | | | | ७ |
| १ | | | | | ३ | | | ६५ |
| | | | | | | | | २१ |
| | | | | | | | | ६ |
| | | | | | | | | ६ |
| १ | १ | – | ४ | – | ३ | २ | ४ | १५३४ |
| – | | | | | | | | २५९ |
| ०.०६ | ०.०६ | – | ०.२६ | – | ०.१९ | ०.१३ | ०.२६ | |
| – | – | – | – | – | – | – | – | |

तिसऱ्या वर्गाकडे वळल्यावर टक्केवारी बरीच कमी झालेली दिसते. अ मध्ये ८.९३ व ब मध्ये ३.८६; असे होणे अपरिहार्यच आहे. मुलींना बुद्धीची देणगी कमी म्हणून नव्हे तर सामाजिक वातावरण तितकेसे अनुकूल नाही हेच खरे. मुलींच्या मार्गात अधिक अडथळे असतात.[१४] आर्टस्मध्ये मास्टरची पदवी घेतलेल्या आणि दोन पदव्या घेतलेल्या ११० अ मध्ये आणि १० ब मध्ये असून सायन्स शाखेत २, मेडिसिनमध्ये ४ आणि कॉमर्समध्ये एक अशा सर्व अ गटातल्या भगिनी आहेत.

चौथ्या वर्गात एका शाखेत मास्टरची परीक्षा देऊन दुसऱ्या शाखेतील बॅचलर पदवी घेतलल्या २६ जणी असून एकीने तर तीन शाखांत बॅचलरची पदवी घेतली आहे. बी.ए.,बी.कॉम्., व बी.लिब्. तीन परीक्षा ह्या बाईंनी कशासाठी दिल्या असाव्या? बी.ए. झाल्यावर कॉमर्सकडे वळल्या असतील. तेथे काही जम न बसल्यामुळे ग्रंथ-पालाचे काम घ्यावेसे वाटले असावे.

पाचव्या विभागणीमध्ये फारच थोड्या स्त्रिया येतात. त्यांची टक्केवारी ०.७२ आहे. सहा जणींनी आर्टस् शाखेत डॉक्टोरेट पदवी मिळविली असून दोघी जणींची ही पदवी परदेशी विद्यापीठाची आहे. एकीने सायन्समध्ये व तिघी जणींनी मेडिसिन-मध्ये ही उच्चतम पदवी संपादन केली आहे. परदेशात जाऊन हा उच्चतम मान शैक्षणिक क्षेत्रामध्ये दोघी जणींनी का होईना, पण मिळविणे म्हणजे प्रशंसनीय नव्हे काय ?

शेवटच्या वर्गात ज्यांनी अखिल भारतीय लोकसेवा परीक्षा दिल्या आहेत अशा चौघी जणी येतात. एका आय्.पी.एस्. आणि तीन आय्.ए.एस्. अधिकाऱ्यांची भेट घेण्याची संधी लेखिकेला लाभली होती. तेव्हा एकंदरीने पहाता प्रस्तुत नमुन्यातील स्त्रियांच्या शैक्षणिक योग्यतेचे आणि त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे परि-शीलन करता येते. पुढील यादीत वरील शिक्षणाच्या जोडीला त्याच शाखेत–शिक्षक, वैद्यशास्त्र वगैरे–किंवा इतरही घेतलेला डिप्लोमा नमूद केला आहे. असा डिप्लोमा घेण्यात आपणास बढती वगैरे मिळावी असा हेतू असावा.

तसे जर पाहिले तर शिक्षणाचा मुलांनाच आर्थिकदृष्टचा उपयोग असतो असे नाही तर काही वेळा तो मुलींनाही होतो. उत्तरदायी स्त्रियांचे शिक्षण आणि त्यांनी पत्करलेला व्यवसाय अगर नोकरी ह्यांच्या परस्परसंबंधातून असा उपयोग पहाण्यापूर्वी प्रथम १९६१ च्या खानेसुमारीमध्ये दिलेल्या माहितीनुसार ह्या बाबतीत काही प्रकाश पडतो का पाहूया. तक्ता ३० मध्ये स्त्रीपुरुष असे वेगळे वर्गीकरण करून नंतर महाराष्ट्र राज्यातील लोकांचे शिक्षण आणि शेतीव्यवसाय वगळून बाकीचे व्यवसाय ह्यांचा परस्परसंबंध दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

सुरवातीसच हे स्पष्ट करावेसे वाटते की खानेसुमारीच्या अहवालात वर उल्लेखिलेला परस्परसंबंध दाखविलेला नाही. शिक्षण व व्यवसाय हे वेगळे वर्गीकरण केलेले आहे. त्यामुळे आकड्यांच्या माहितीत फरक पडतो. एज्युकेशन कमिशनच्या

उत्तरदायी स्त्रियांच्या पुढील प्रयत्नांचे निवेदन

| | त्रुटित स्वरूप | केवळ संबंधित |
|---|---|---|
| १. | पी.टी.सी./एस्.टी.सी. | टीचिंग–प्राथमिक/दुय्यम |
| २. | डि.म्युझिक/क्राफ्ट/शिवण किंवा सर्टिफिकेट | टीचिंग खास विषय |
| ३. | डि.पी.टी. .. | टीचिंग–शारीरिक शिक्षण |
| ४. | डि.एड्. .. | टीचिंग–सर्वसामान्य |
| ५. | राष्ट्रभाषा (पंडित) .. | टीचिंग हिंदी व सर्वसामान्य |
| ६. | राष्ट्रभाषा (कोविद्) .. | |
| ७. | राष्ट्रभाषा (रत्न) .. | |
| ८. | साहित्य रत्न .. | |
| ९. | डि.एस्.डब्ल्यू. .. | समाज कल्याण |
| १०. | बी.पी.एन्.ए./रजिस्टर्ड नर्स .. | परिचारिका |
| ११. | डि. नर्सिंग .. | |
| १२. | डि. इन् नर्सिंग अॅन्ड टीचिंग अॅडमिनिस्ट्रेशन | परिचारिका व तद्विषयक शिक्षिका |
| १३. | डि. इन् कमर्शिअल आर्ट .. | कमर्शिअल आर्ट |
| १४. | डि.इन् लिब्. .. | ग्रंथपालन |
| १५. | डि.इन् अकाऊंटस् .. | हिशेब तपासनीस |
| १६. | डि. इन् कोऑपरेशन .. | अॅडमिनिस्ट्रेशन जनरल |
| १७. | डि. इन् बँकिंग सी.ए.आय्.आय्.बी. .. | बँक सर्व्हिस |
| १८. | डि.इन् गायनॉकॉलॉजी अॅन्ड ऑब्स्टेट्रिक्स् | मेडिसिन प्रोफेशन टीचिंग सर्व्हिस |
| १९. | डि. इन् चाइल्ड हेल्थ/हायजीन .. | |
| २०. | डि. इन् चाइल्ड सायकॉलॉजी .. | |
| २१. | डि. इन् पब्लिक हेल्थ .. | |
| २२. | डि. इन् मेडिकल रेडिऑलॉजी अॅन्ड इलेक्ट्रोथेरपी | |
| २३. | डि. इन् ऑप्थॅमॉलॉजी .. | |
| २४. | ज्योतिर्विद .. | ज्योतिषशास्त्र |

अहवालाच्या चौथ्या मुखपृष्ठावर १९६१ मध्ये काम करणाऱ्या लोकांचे शिक्षण व उद्योग–व्यवसाय नव्हे–ह्यांचे संबंध दाखविले आहेत. तक्ता ३० मध्ये शिक्षण व व्यवसाय एकत्र दर्शवून जेथे आकडे खानेसुमारीप्रमाणे जमत नाहीत तेथे खानेसुमारी

महाराष्ट्र राज्यातील शिक्षण, व शेती सोडून

दाखविणारे स्त्रीपुरुष

| खानेसुमारी गटरचना | मॅट्रिक | पदवीसमान नसलेली तंत्र पदविका | पदवीसमान नसलेली तंत्रेतर पदविका | विद्यापीठीय तंत्रेतर ग्रॅज्युएट पोस्ट ग्रॅज्यु. पदवी |
|---|---|---|---|---|
| प्रस्तुत तक्त्यानुसार | शालान्त | शालान्त व अधिक | शालान्त व अधिक, अंडर ग्रॅज्युएट, अंडर ग्रॅ. व अधिक | ग्रॅज्युएटस् ग्रॅ. व अधिक आणि स्पेशल |
| एकूण | ६,४३,८३४ (१००%) | १४,९६३ (१००%) | ११,५६२ (१००%) | १,०२,५०६ (१००%) |
| पुरुष | ४,९६,६८६ | १२,९१५ | ७,२७३ | ८०,३३४ |
| स्त्रिया | १,४७,१४८ | २,०४८ | ४,२८९ | २२,१७२ |
| | २२% | १४% | ३७% | २१.६३% |

नोंद केलेले व्यवसाय

१. लघुटंक / टंक लेखक
एकूण– ५,८१८
नागरी– ५,७९७ } ९%

२. कारकून
एकूण– १७,०९६
नागरी– १६,१५० } २६%

३. तत्सम इतर
एकूण– ४,५७४
नागरी– ३,९३८ } ७%

(१ ते ३) } ४२%

४. दूरध्वनी/ तारायंत्र
एकूण– १,८००
नागरी– १,७८७ } ३%

५. पूर्व प्राथमिक, प्राथमिक व विविध शिक्षक
एकूण– २२,०१४
नागरी– १४,७५३ } ३३%

शासकीय वर्ग

४.७८% { राज्य आणि मध्यवर्ती सरकार — ए.–८२७, ना.–६२३; स्थानिक संस्था शिक्षक — ए.–२३४, ना.–१४७ }

{ दुय्यम शाळा — ए.–६४०८, ना.–५४०८; महाविद्यालये व विद्यापीठे — ए.–१८७६, ना.–१८६६ }

३२.८६%

३७.६४%

६२.३६% ज्यांचा संबंध दाखविता येत नाही

इतर व्यवसायांचा संबंध, एकूण/नागरी स्थानांत

वर्गीकरण

| | | तंत्र पदवी–पदवीसमान पदविका व पोस्ट ग्रॅज्युएटस् | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| टीचिंग | मेडिसिन | इंजि-निअरिंग | टेक्नॉ-लॉजी | ॲग्री-कल्चर | व्हेटरिनरी व डेअरिंग | इतर |
| १०,७८४ | १०,२९९ | ९,७०५ | ९१८ | १,२२३ | ३१० | २८,०१६ (१००%) |
| ६,०२० | ८,२९९ | ९,६६५ | ८८४ | १,२१८ | ३०९ | २५,११६ |
| ४,७६४ | २,००० | ४० | ३४ | ५ | १ | २,९०० |
| | | | | | | १०.३५% |

मेडिकल

ए.––२५६६
ना.–२३२२

ए.–ना.

सिव्हिल ए.–१८
ना.–१७
मेकॅ. ए.–११
ना.–११
इले. ए.–१८
ना.–१७

१२६–१२०
३०२–२९१
१२३६–९१६

१०४६४
४७६४

लीगल,
अकॉन्टटस् ॲन्ड
ऑडिटरस्
लेबर ॲन्ड सोशल
वेलफेअर

महाराष्ट्र राज्यातील शिक्षण, व शेती सोडून

दाखविणारे स्त्रीपुरुष

| खानेसुमारी गटरचना | मॅट्रिक | पदवीसमान नसलेली तंत्र पदविका | पदवीसमान नसलेली तंत्रेतर पदविका | विद्यापीठीय तंत्रेतर ग्रॅज्युएट पोस्ट ग्रॅज्यु. पदवी |
|---|---|---|---|---|
| प्रस्तुत तक्त्यानुसार | शालान्त | शालान्त व अधिक | शालान्त व अधिक, अंडर ग्रज्युएट, अंडर ग्रॅ. व अधिक | ग्रॅज्युएटस ग्रॅ. व अधिक आणि स्पेशल |
| ६. परिचारिका/ औषधीविषयक आरोग्यविषयक तंत्रज्ञ | | | | |
| एकूण– १४,०८० नागरी– १०,३३८ | | २१% | | |
| एकूण– ६५,३८२ नागरी– ५२,७६३ | | १००% | | ८,३४५ ८०,४४ |
| स्त्रियांशी एकूण | | ४४.४३% | | ३७.६४% |

इतर व्यवसायांचा संबंध, एकूण/नागरी स्थानांत,

वर्गीकरण

| | | तंत्र पदवी–पदवीसमान पदविका व पोस्ट ग्रज्युएटस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| टीचिंग | मेडिसिन | इंजि-निअरिंग | टेक्नॉ-लॉजो | ॲग्री-कल्चर | व्हेटरिनरी व डेअरिंग | इतर |
| १०,४६४ | २,५६६ | | ४७ | १,६६४ | | |
| ४,७६४ | २,३२२ | | ४५ | १,३३१ | | |
| १००% | १२३% | | ६३.५% | ५७% | | ७०.९३ |

अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून जे स्पष्टीकरण करता येईल तसे केले आहे.

भारतातील मॅट्रिक्युलेशन परीक्षा ही महाराष्ट्रराज्यातील शालान्त परीक्षेसम धरली आहे. १९६१ मध्ये ६,४३,८३४ मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांपैकी १,४७,१४८ किंवा फक्त २२ टक्के मुली आहेत. परंतु १९६५-६६ साली हे प्रमाण ३०.५ टक्के इतके वाढलेले दिसून येते.[१५] काहीही असो १९६१ मध्ये मुलींची संख्या मुलांच्या चतुर्थांशापेक्षा कमी होती आणि पुढील पाच वर्षांत ती एक चतुर्थांशापेक्षा थोडी अधिक झाली आहे. ह्या मॅट्रिक्युलेट झालेल्या मुलींपैकी ४४.४३ टक्के मुली महाराष्ट्र राज्यात अर्थार्जन करू लागल्या आणि त्याही बहुतांशी शहरांमध्ये. एस्.एस्.सी. परीक्षा दिल्यानंतर एकतृतियांशापेक्षा अधिक मुली कारकुनी किंवा तत्सम नोकरी अथवा लघुटंकलेखकाची नोकरी पत्करतात (४२ टक्के); उरलेल्यांपैकी पूर्वप्राथमिक, प्राथमिक आणि उपदुय्यम शिक्षिकेचा व्यवसाय पत्करतात (३३ टक्के); परिचारिका व आरोग्यसहायक म्हणून काम मिळवितात (२१ टक्के); दूरध्वनी-तारायंत्र चालक (३ टक्के). अशा तऱ्हेने महाराष्ट्रातील ज्या मुली शालान्त परीक्षा देऊन पुढील शिक्षण न घेता व्यवसाय करू लागतात त्यांचे हे असे दर्शन आहे.

ह्याच राज्यात २,०४८ तंत्र पदवी नव्हे परंतु तंत्र पदविका घेतलेल्या आणि ४,२८९ तंत्रेतर क्षेत्रात पदविका घेतलेल्या स्त्रिया आहेत. त्या कुठे आणि कितीजणी नोकरीस लागल्या आहेत हे सांगणे कठीण आहे. तथापि तंत्र पदविका घेतलेल्यांपैकी १४ टक्के आणि तंत्रेतरांपैकी ३७ टक्के अर्थार्जन करीत आहेत. शिवणकाम, टंकलेखक वगैरे थोड्या मुदतीचे तांत्रिक शिक्षण घेऊन काही मुलींना नोकरी करणे पसंत पडते असे दिसते.

ह्यानंतर तक्ता ३० मध्ये २२,१७२ स्त्रीपदवीधर स्त्रिया आढळतात. ह्या स्त्रियांनी पदवीखेरीज आणखी काही पदविका संपादन केल्या आहेत परंतु त्या तंत्रेतर आहेत. ह्या बावीस हजारांवरील स्त्रियांपैकी १,०६१, किंवा ४.७ टक्के शासकीय विभागात—केंद्रीय, राज्य व स्थानिक संस्थांत—काम करीत आहेत. अंदाजे ३२.८ टक्के शाळा, महाविद्यालये अगर विद्यापीठे व तत्सम क्षेत्रांत काम करीत आहेत. उरलेल्या ६२.३ टक्के स्त्रियांपैकी अगदी संख्येने थोड्या अशा उच्च शिक्षण घेण्यात गुंतल्या असतील. परंतु बहुतांशी पदवी घेऊनही नोकरी/व्यवसाय न करणाऱ्याच संख्येने अधिक. जरी अचूक टक्केवारी देता येत नसली तरी १९६१ मध्ये अर्थार्जन न करणाऱ्या ६० टक्के तरी खऱ्याच असाव्या. ह्याच्या अनुषंगाने शिक्षण क्षेत्रातील एका अधिकारी व्यक्तीने केलेले निवेदन द्यावेसे वाटते: ''ग्रामीण भागातील स्थानिक पदवीधर स्त्रियांच्या शिक्षणाचा उपयोग अंशकालिका शिक्षिका म्हणून करून घेता येईल. शिक्षण क्षेत्राशी काही वर्षे त्यांचा संबंध दुरावला असल्यास त्यांच्याकरिता छोटासा अद्यावत पुनर्चालना देणारा शिक्षणक्रम आखता येईल. येणेकरून पुरेशा शिक्षकांची उणीव ही शिक्षण खात्याची समस्या आहे तीही सोडविता

येईल व ग्रामीण भागांतील बुद्धिमत्ता व शक्षणिक पात्रता उत्तम रीतीने खर्ची पडेल."

महाराष्ट्र राज्यामध्ये एकंदरीने १०,२९९ डॉक्टरस् असून त्यांपैकी ८,२९९ पुरुष आणि २,००० स्त्री डॉक्टरस् आहेत. म्हणजे ३,९२२ लोकांना एक डॉक्टर असे प्रमाण पडते. भारतात डॉक्टरवर्गाची संख्या फार कमी आहे हे सर्वांना मान्य आहे व तेच खानेसुमारीच्या आकडयांतून निदर्शनास येते. स्टॅटिस्टिकल इयर बुक ह्या आंतरराष्ट्रीय ग्रंथातील माहितीनुसार भारतात १९६५ मध्ये ४,६१० लोकांना एक डॉक्टर असे प्रमाण होते तर त्या वर्षी तेच प्रमाण जपानमध्ये ८९८ लोकांना १ डॉक्टर, इंग्लंड व वेल्स ८४० : १, यू.एस्. ६६९ : १, आणि १९६९ मध्ये यू. एस्. आर्. मध्ये ४३३ लोकांना एक डॉक्टर.[१६] ह्या पार्श्वभूमीवर भारताचे चित्र लक्षात घ्यावे.

दुसरा व्यवसाय इंजिनिअरिंगचा. अखिल भारतात अवघ्या ४० स्त्रीइंजिनिअरस् तर पुरुष ९,६६५. आर्किटेक्टसहित टेक्नॉलॉजिस्ट स्त्रिया ३४ तर पुरुष ८८४. शेतीविषयक पदवी घेतलेल्या स्त्रिया ५ तर पुरुष १,२१८. व्हेटरनरी किंवा डेअरीविषयक पदवी घेतलेली एक स्त्री तर पुरुष ३०९. ह्या आकडयांवरून असे दिसून येते की फार थोडया स्त्रिया अशा तांत्रिक शिक्षणक्रमाकडे वळतात. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट अशी की जी क्षेत्रे आजवर पुरुषांची मक्तेदारी म्हणून समजली जात असत त्यांतसुद्धा आता स्त्रिया प्रवेश करू लागल्या आहेत. जसजसा काळ लोटत आहे तसतशी प्रमाणतः स्त्रियांची संख्या वाढत आहे हे तक्ता २८ वरून लक्षात येईल. १९६७ मध्ये मुंबई विद्यापीठातून पंधरा स्त्रियांनी टेक्नॉलॉजी शाखेत पदव्या घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे सहा पुरुषांबरोबर त्याच शाखेत पी.एच्.डी. पदवी घेतलेली एक स्त्रीही आहे.

शेवटच्या रकान्यात "इतर" ह्या सदराखाली पदवीधरांची संख्या दिली आहे. एकंदरीने ह्या सदरात २,९०० स्त्रीपदवीधर असून त्यांपैकी १,६६४ अथवा ५७ टक्के स्त्रिया वकील, हिशेब तपासनीस म्हणून अगर मजूर कल्याण संघटना ह्यांमध्ये काम करीत आहेत. त्रेचाळीस टक्के पदवीधर स्त्रिया अर्थार्जन करीत नाहीत हा निष्कर्ष अपरोक्षरीत्या काढला आहे.

ह्या त्रेचाळीस टक्के काम न करणाऱ्यांच्या उलट २,५६६ अगर १२३ टक्के स्त्रिया डॉक्टर म्हणून नोकरी अगर खाजगी व्यवसाय करीत आहेत. आणि त्यांपैकी २,३२२ फक्त शहरांत. ह्यावरून स्त्रीडॉक्टरस् ग्रामीण भागात जाण्यास नाखूष दिसतात. आश्चर्याची गोष्ट अशी की आपण वर पाहिल्याप्रमाणे फक्त २,००० स्त्रियांनीच डॉक्टरची पदवी घेतली आहे. पुरुषांच्या बाबतीतही जरूर ते शिक्षण घेतलेल्यांच्यापेक्षा डॉक्टर म्हणून व्यवसाय करणारे संख्येने अधिक आहेत. हे कसे होत असावे? जुजबी माहिती गोळा करून, थोडाफार अनुभव घेऊन, डॉक्टर म्हणवून घेऊन ते औषधे देऊ लागतात; कारण लोकांना त्यांची जरुरी आहे आणि असे अपात्र

वैद्य स्वस्तात दवापाणी करून गब्बर होऊ शकतात. शिक्षित डॉक्टर व अपात्र डॉक्टर ह्यांच्यात सरमिसळ झाल्यामुळे खानेसुमारीचे आकडे व यू. एन्. ओ.चे आकडे ह्यांत तफावत आढळते. युनोचे आकडे दर डॉक्टरी अधिक लोकसंख्या दाखवितात. कारण प्रमाण काढताना त्यानी डॉक्टर ही पदवी घेतलेल्यांचीच संख्या जमेस धरली असावी, अपात्र डॉक्टरांना वगळून. कदाचित असेही झाले असेल की ज्यांनी पॅथॉलॉजिस्ट किंवा सायन्समध्ये डॉक्टरेट पदवी घेतली असेल तेही खानेसुमारीच्या वेळेस 'डॉक्टर' सदराखाली घातले गेले असतील. त्याहीपेक्षा असा संभव दिसतो की 'डॉक्टर' म्हणून व्यवसाय करणाऱ्या सर्वांनीच जरूर ती पदवी घेतली आहे की नाही हे पहाण्याची तसदी नोंदणी करणारांनी घेतली नसावी. वास्तविक पहाता वैद्यकीय व्यवसायावर लोकांच्या आरोग्यरक्षणाची जबाबदारी असते. म्हणूनक लायक लोकांनीच तो व्यवसाय करावा. इतरांना करण्याचा अधिकार असू नये. वरील आकड्यांतील १०० डॉक्टरी पदवी घेतलेल्या तर १२३ व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया! ही विसंवादी गती टाळण्यासाठी पुढील खानेसुमारीच्या वेळी–१९७१–नोंदणी करणाऱ्यांना असे सांगण्यात आले की जे डॉक्टरी व्यवसाय करणारे आहेत त्यांनी कोणती पदवी अगर पदविका घेतली आहे हे नमूद करावे. पण अशी सूचना लक्षात घेतली नाही!

प्रस्तुत संशोधन चालू असताना महाराष्ट्रातील चार शहरांमधल्या सेवायोजन कार्यालयांकडून काही माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. नागपूर सोडून बाकीच्या तीन शहरांतील कार्यालयातून तत्परतेने माहिती देण्यात आली. ३० जून १९६६ ते ३१ डिसेंबर १९६६ च्या दरम्यान ज्या लोकांनी त्यांच्याकडे नावे नोंदविली व ज्यांना ते नोकरी मिळवून देऊ शकले त्याबद्दल ही माहिती होती.

निरनिराळ्या शाखांत शिक्षण घेतलेल्या लोकांना तत्सम नोकरी मिळवून देण्याचे फार महत्त्वाचे काम ही सेवायोजन कार्यालये करीत असतात. ब्रिटिश राजवटीच्या अखेर त्यांची स्थापना झाली परंतु स्वातंत्र्यानंतरच त्याना खरे उत्तेजन मिळाले. सुरवातीस फक्त राजधानीच्या शहरात ही कार्यालये असत परंतु आता जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणी शाखा उघडल्यामुळे त्यांचे जाळे निदान महाराष्ट्रापुरते तरी सर्वत्र पसरले आहे. केन्द्रीय आणि राज्य सरकारला जेव्हा जागा भरावयाच्या असतात तेव्हा ह्या कार्यालयातून नावे मागवितात परंतु खाजगी मालकांना ही सक्ती नाही. कायम नोकऱ्यांच्या बाबतीत चाचणी परीक्षाही असतात. शिवाय स्थलांतर करण्याचा प्रश्न उद्भवतो. ह्या अनुषंगाने मराठी भाषिक लोकांच्या बाबतीत दोन अधिकाऱ्यांनी केलेली टीका विचारात घेण्यासारखी आहे: "महाराष्ट्रीय, विशेषतः स्त्रिया स्थलांतर करण्यास व आपल्या सामाजिक वर्तुळापासून दूर होण्यास नाखूष असतात."

स्त्रीउमेदवारांविषयी अधिक चर्चा करीत असताना वरीलपैकी एक अधिकारी म्हणाले की "त्यांना मुलाखतीतून यशस्वीरीत्या कसे पार पडावे ते समजत नाही.

काहींची अशी समजूत असते की आपण स्त्रिया म्हणून आपल्याला अधिक सवलत देण्यात येईल. ही त्यांची चुकीची अपेक्षा असते." वरील टीकेच्या विरुद्ध महाराष्ट्रीय स्त्रियांचे एक स्तुत्य वैशिष्टय़ सांगण्यात आले : "त्यांना संस्थेची सेवा करावयाची असते. व्यक्तीची नव्हे." शिवाय, "विवाहित स्त्री आपली नोकरी व कौटुंबिक जबाबदारी ह्यांचा योग्य समन्वय घालू शकते." त्या अधिकाऱ्यांच्या मते अर्थाजन करणाऱ्या महिलांसाठी औद्योगिक गृहे व शिशुसंगोपन केंद्रे काढणे ही आजची गरज आहे. हा मुद्दा तूर्त बाजूला ठेवू आणि तक्ता ३१ व ३२ ह्यांतील आकडयांचा अभ्यास करू या.

तक्ता ३१ मध्ये शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन ज्यांनी आपली नावे सेवा-योजन कार्यालयात नोंदविली आहेत त्यांची संख्या दिली आहे. पहिल्या रकान्यात तीन शहरांतील कार्यालयांच्या चालू नोंदणी पुस्तकांतील आकडे आहेत. ही संख्या ३० जून १९६६ ला एकूण ३४,०१५ होती. पुढील सहा महिन्यांत कार्यालये वरील संख्ये-पैकी ४,७४९ लोकांना म्हणजे १३.९१ टक्क्यांना नोकऱ्या देऊ शकली. जर आपण नोकऱ्या मिळालेल्या स्त्रीपुरुषांची तुलना केली तर ते प्रमाण २७.७ टक्के येते. ह्याचा अर्थ असा की पुरुषांपेक्षा स्त्रियांना गेल्या सहा महिन्यांत अधिक जागा मिळाल्या. असे का व्हावे म्हणून काही अधिकाऱ्यांना विचारल्यानंतर एका अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर विचारात घेण्यासारखे आहे : "जे पुरुष व स्त्रिया अर्ज पाठवितात त्यांत स्त्रियांना अधिक गुण मिळालेले असल्यामुळे चाचणी परीक्षेत त्या संख्येने अधिक उत्तीर्ण होतात. त्यामुळे आमचे हात बांधले जातात आणि आम्हाला त्यांनाच घ्यावे लागते." स्त्रियांना प्रथमतः पसंत करावे लागते ही गोष्ट बाजूला ठेवली तरी उभय स्त्रीपुरुषांपैकी ८६ टक्के लोकांना सेवायोजन कार्यालये नोकऱ्या देऊ शकत नाही असे दिसते. कदाचित ह्यांपैकी काहींना स्वतंत्रपणे नोकरी मिळविता आली असेल आणि काही मुलींनी जन्माचा जोडीदार पटकावल्यामुळे त्यांना नोकरीची आवश्यकता उरली नसेल. ही वस्तुस्थिती काही नुकत्याच लागलेल्या अविवाहित मुलींनी दिलेल्या उत्तरावरून दिसून येते. 'लग्नानंतर नोकरी कराल का ?' ह्या प्रश्नास "हे वरपक्षावर अवलंबून राहील", असे त्या म्हणाल्या.

वर आढळून आलेली बेकारी ३१ डिसेंबर १९६६ मध्ये ८९५ नी कमी झाली असे त्या वेळच्या आकडयांवरून दिसून येते. त्यानंतरच्या काळात औद्योगिक क्षेत्रात थोडी मंदाईची लाट आली होती. अखिल भारतात दर महिना एक लाख लोक बेकार होतात असा अंदाज होता.[१७] ही मधली मंदाईची लाट आज (१९७२ अखेरी) थोडी ओसरली असली तरी त्या वेळीसुद्धा महाराष्ट्रातल्या तीन शहरांत तेहतीस हजार सुशिक्षित लोक बेकार का असावे ? १९६६ ची परिस्थिती १९७३ मध्ये सुधारेल अशी आशा करावयास जागा नाही. असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी श्री. जे. आर्. डी. टाटांनी असे उद्गार काढले की, "१९६० मध्ये अन्नधान्याच्या प्रश्नाला जसे भारताला तोंड द्यावे लागले तसेच

## तक्ता ३१

तीन शहरांमधील सेवायोजन कार्यालयांतील ३०-६-६६ व ३१-१२-६६च्या नोंदणी पुस्तकांतील चालू आकडेवारी व त्यांना मिळालेल्या नोकऱ्यांच्या अनुमानाने काढलेले आकडे आणि नवी नोंद

| | ३०-६-६६ मध्ये नोंदणी पुस्तकातील चालू प्रत्यक्ष आकडे | जुलै ते डिसेंबर १९६६ मध्ये भरलेल्या जागा | ३१-१२-६६ मध्ये नोंदणी पुस्तकातील चालू आकडे | जुलै ते डिसेंबर १९६६ मधील अनुमानित नवी नोंदणी |
|---|---|---|---|---|
| | पु. + स्त्री = एकूण | पु. + स्त्री = एकूण | पु. + स्त्री = एकूण | पु. + स्त्री = एकूण |
| | १ | २ | ३ | ४ |
| पुणे .. | ४४०५+१४६०= ५८६५ | १०६६+ २६४=१३३० | ४२६५+१६४७= ५९१२ | ९२६+ ४५१=१३७७ |
| मुंबई . | १५०७१+४७०९=१९७८० | १५३६+ ६९७=२२३३ | १४१३७+४८८२=१९०१९ | ६०२+ ८७०=१४७२ |
| सोलापूर. | ७७६६+ ६०४= ८३७० | ८२७+ ३५९=११८६ | ७६२१+ ५६८= ८१८९ | ६८२+ ३२३=१००५ |
| एकूण .. | २७२४२+६७७३=३४०१५ | ३४२९+१३२०=४७४९ | २६०२३+७०९७=३३१२० | २२१०+१६४४=३८५४ |
| | ८०.०९%+१९.९१%=१००% | ७२.३%+२७.७%=१००% | | |

## तक्ता ३२

### शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीची अपेक्षा

| ३१-१२-६६ | इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी | मेडिसीन | नर्सिंग | सर्वपातळ्यांवरील शिक्षक | मॅट्रिक | इंटर-मीजिएट | ग्रॅज्युएटस् ऑफ प्युअर सायन्सिस् व ह्युमॅनिटीज् | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री | पु. + स्त्री |
| पुणे .. | ५९९+ ४ | —+— | १+५५ | ४०+४२२ | ३५६१+१३५७ | २४०+— | ३१२+२८२ | ११२३+१२४४ |
| मुंबई .. | ३१४+१० | ४+५ | —+ — | ४५+११३ | ८९०१+२५१४ | —+— | ७९७+३६५ | ४०७६+१८७५ |
| सोलापूर. | ६३+ — | २+२ | ६+२२ | २०+४७ | ११७ + १०९ | —+— | १०+ १६ | ७४०५+ ३७२ |
| ३०-६-६६ | | | | | | | | |
| पुणे .. | ६०२+ — | —+— | —+४० | ६९+३०२ | ३६५८+१२४८ | २२९+२० | ३३७+१३९ | १२४६+११६० |
| मुंबई .. | २६८+११ | ३+७ | —+ — | ३९+१५० | ८९५९+२८०९ | —+— | ८६५+२७८ | ४९३७+१४५४ |
| सोलापूर. | ६५+ — | २+२ | ६+२३ | ९५+१०३ | २०९+ ३०४ | —+— | १८+ २६ | ७३७१+ १४६ |

आव्हान १९७० मध्ये बेकारीचा प्रश्न टाकणार आहे. भारताने माल्थसवर विजय मिळविला पण मार्क्सला भारत बळी पडणार आहे का ?"[१८]

बरे, सर्वच नोकरीच्या शोधार्थ असलेले लोक सेवायोजन कार्यालयात नाव नोंदवतात असे नाही. ह्याचा अर्थ असा की वरील तक्त्यात दिलेल्यांपेक्षा बरेच अधिक लोक बेकार असावे. शिवाय अनेकांना बाहेरगावी जाण्यास नको वाटते. त्यामुळे बदली होणाऱ्या नोकऱ्या घेण्यास ते नाखूष असतात. शारीरिक श्रम करण्याचीही तयारी नसते. त्यांना टेबल-खुर्चीवर बसून करावयाचे काम आवडते. दुसरी अडचण म्हणजे इंग्रजी भाषेचे अज्ञान. महाराष्ट्र शालान्त परीक्षेस इंग्रजी हा आवश्यक विषय नव्हता. ह्याखेरीज विशेष उच्च शिक्षण घेतलेले असे थोडे पदवीधर आहेत की त्यांना योग्य असे काम येथे मिळत नाही. परदेशात उच्च शिक्षणाकरिता गेलेले लोक तेथेच स्थाईक होतात. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की समाजाला ज्या प्रकारची गरज आहे तसा शिक्षणक्रम आखला जात नाही. एका अधिकाऱ्यांनी अशी टीका केली की, "भारतातील नियोजन भौतिक साधनानुसार आखले आहे. आमचे नियोजनाचे सूत्र 'मानवी साधनानुसार नियोजन' हे असावे."

तक्ता ३२ मध्ये नोकरीकरिता नोंदविलेल्या स्त्रीपुरुषांची तपशीलवार माहिती दिली आहे. जून १९६६ मध्ये ११ स्त्रीइंजिनिअरस् व टेक्नॉलॉजिस्ट नोकरीच्या शोधात होत्या. ही संख्या डिसेंबर १९६६ मध्ये १४ झाली तर स्त्रीडॉक्टरांची संख्या २ ने घटली. उलटपक्षी परिचारिकांची संख्या वाढली. हीच परिस्थिती शिक्षकपेशात दिसून येते. मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांची संख्या सहा महिन्यांत घटली असली तरी ती मुळातच मोठी आहे. डिसेंबर अखेरी ३,९८० मॅट्रिक्युलेट स्त्रिया, ६६३ ह्यूमॅनिटिझ व प्युअर सायन्सिस शाखेतील पदवीधर आणि ३,४९१ 'इतर'. अशाच वर्गीकरणात पुरुषांची संख्या अर्थात बरीच मोठी आहे. सेवायोजन कार्यालये आपापल्यापरी नोकरी मिळवून देण्याची शिकस्त करतात, तरीसुद्धा बेकारी नष्ट होत नाही. वर उल्लेखिलेली कारणे ह्या बेकारीला जबाबदार असतील परंतु ह्या कारणांचा अधिक सखोल अभ्यास व्हावयास पाहिजे. त्याकरिता सेवायोजन कार्यालयात नावे नोंदविल्यांची शैक्षणिक पात्रता, त्यांना देऊ केलेल्या नोकऱ्या, त्यांच्या त्या न स्वीकारण्याबाबतच्या हरकती व अडचणी तसेच कामावर रुजू झालेल्यांचा मागोवा वगैरे गोष्टींचा अभ्यास करावा लागेल. येथे इतर देशांतील बेकारीचे आकडे दिल्यास अप्रस्तुत होणार नाही. १९७० मध्ये :[१९]

| | | |
|---|---|---|
| जपान | .. | १.२ टक्के |
| यू. के. | .. | २.६ टक्के |
| यू. एस्. | .. | ४.९ टक्के |
| भारत | .. | ३७.५ टक्के (१९६९) |

यू. एन्. च्या स्टॅटिस्टिकल इयर बुकमध्ये भारताचे आकडे अनुमानाने दिले आहेत असे म्हटले आहे. जपानची बेकारी गेल्या आठ वर्षांत कमी होत गेली आहे. १९५६ मध्ये एकंदरीत श्रमजीवी लोकांपैकी १.७ टक्के बेकार होते; तर यू. के. व यू. एस्. मध्ये बेकारी वाढत आहे. कारण १९५६ मध्ये अनुक्रमे हे प्रमाण १.३ व ४.२ टक्के असे होते. काहीहि असो १५ वर्षांवरील १०० लोकांत चारपाच कामाशिवाय असणे म्हणजे फार महत्त्वाची बाब नव्हे. भारताच्या बाबतीत बेकारी नष्ट होणे हे तूर्त तरी स्वप्नच आहे.

सेवायोजन कार्यालयातील आकड्यांवरून शिक्षणसहित-नोकरी ह्याचा विचार केल्यानंतर प्रस्तुत पहाणीतील अ गटाच्या उत्तरदायी स्त्रियांचे शिक्षण व त्या सध्या करीत असलेल्या नोकऱ्या ह्यांचा एकत्र अभ्यास करू या.

तक्ता ३३ मध्ये शैक्षणिक पात्रतेनुसार केलेले पहिले मुख्य वर्गीकरण म्हणजे ३३८ फक्त शालान्त परीक्षा दिलेल्या, ३७७ शालान्त परीक्षा देऊन आणखी पदविका घेतलेल्या, ११५ अंडर ग्रॅज्युएटस् आणि २० अंडर ग्रॅज्युएटस् विशेष शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे आहे. शालान्त परीक्षा दिलेल्यांपैकी १३६, किंवा ४०.२४ टक्के स्त्रिया कारकून म्हणून काम करीत आहेत; ९०, किंवा २६.६२ टक्के दूरध्वनीवर किंवा तारायंत्रावर काम करितात; १०५ किंवा ३१, टक्के प्राथमिक शिक्षिका असून ७ किंवा २ टक्के इतर प्रकारची नोकरी करतात.

वरच्यापेक्षा संख्येने अधिक म्हणजे ३७७ शालान्त परीक्षा अधिक तांत्रिक अगर तांत्रिकेतर पदविका घेतलेल्यांचा दुसरा वर्ग आहे. ह्यांपैकी १४६, किंवा ३८.७३ टक्के कारकुनी पेशात गुंतलेल्या असून १३७, किंवा ३६.२८ टक्के परिचारिका म्हणून काम करीत आहेत; ९४, किंवा २४.९९ टक्के प्राथमिक शिक्षिका आहेत.

अंडर ग्रॅज्युएटस् व आणखी काही पदविका घेतलेल्या स्त्रिया अनुक्रमे ११५ व २० आहेत. व्यवसायाच्या बाबतीत त्यांचा वरीलप्रमाणेच कल दिसत आहे.

मात्र ग्रॅज्युएट व पोस्टग्रॅज्युएट पातळीवरील स्त्रियांचा विचार करू लागल्यावर एक निराळेच पण लक्षवेधक चित्र साकारू लागते. सहा जणी आर्किटेक्ट ही पदवी घेतलेल्या असून त्यांपैकी पाच जणींनी खाजगी व्यवसाय सुरू केला आहे. एक जण स्कूल ऑफ आर्किटेक्टमध्ये शिक्षिका आहे. सात इंजिनिअर स्त्रियांपैकी एक प्रशासन अधिकारी असून दोघीजणी खाजगी व्यवसाय करीत आहेत व एकजण इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून नुकत्याच लागल्या होत्या. उरलेल्या तिघी इंजिनिअरस् नोकरीच्या शोधात होत्या. टेक्नॉलॉजिस्ट पैकी एकाच बाईची गाठ घेता आली. आपल्या विषयाची परदेशातील पदवी घेऊन इंडिअन इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी-मध्ये प्राध्यापिका म्हणून त्या काम करीत आहेत. मेडिसिन ह्या विषयात काही ग्रॅज्युएटस् व काही पोस्ट ग्रॅज्युएटस्–एकंदरीने सदुसष्ट–ह्या पहाणीमध्ये घेतल्या आहेत. त्यांपैकी ३१, किंवा ४६.२७ टक्के प्रशासन-नि-चिकित्सालयीन बाजूकडे रुग्णालयातून

तक्ता

अ गटातील उत्तरदायी स्त्रियांचे शिक्षण व

| शिक्षण | एस्.एस्.सी. फक्त | एस्.एस्.सी. अधिक टे. अगर नॉन् टे.डिप्लोमा | अंडर ग्रॅज्युएटस् फक्त | अंडर ग्रॅज्युएटस् अधिक टे. अगर नॉन् टे.डिप्लोमा | आर्टस् | नॉन टेक्निकल सायन्स जनरल | होम | नर्सिंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३३८ | ३७७ | ११५ | २० | ३७४ | २५ | २० | ४ |
| | १००% | १००% | १००% | १००% | १००% | १००% | १००% | १००% |
| **व्यवसाय :** | | | | | | | | |
| कारभारविषयक : | | | | | | | | |
| अ. ऑल इंडिया सर्व्हिस | | | | | ३ | १ | | |
| ब. अधिकारी/कार्यकारी | | | | | १९ | १ | | |
| क. मध्यम श्रेणी | | | | | ३९ | | | |
| | | | | | १% | | | |
| ड. कारकुनी/लघुटंक | १३६ | १४६ | ९३ | ११ | १३२ | १२ | | |
| लेखन | ४०.२४% | ३८.७३% | ८०.८७% | ५५% | ३७.९५% | | | |
| इ. स्वागतकार | | | | | १ | | | |
| टेक्निकल : | | | | | | | | |
| i. परिचारिका | | १३७ | ५ | २ | | | | |
| | | ३६.२८% | ४.३३% | १०% | | | | |
| ii. दूरध्वनी/तारायंत्र | ९० | | २ | २ | ६ | | | |
| | २६.६२% | | १.८१% | १०% | | | | |
| iii. खाजगी व्यवसाय | | | | | ५ | १ | | |
| शिक्षिका : | | | | | | | | |
| अ. महाविद्यालये/विद्यापीठे | | | | | ४३ | ६ | | २० |
| | | | | | ११.२% | | | |
| ब. दुय्यम शिक्षिका | | | | | ७४ | | | |
| | | | | | १९% | | | |
| क. प्राथमिक शिक्षिका | १०५ | ९४ | १५ | ५ | १० | | | |
| | ३१.०९% | २४.९९% | १२.९९% | २५% | २.५६% | | | |
| ड. संबंधित | | | | | ३३ | १ | | |
| | | | | | ८.४६% | १ | | |
| नॉन् टेक्निकल : | | | | | | | | |
| १. समाजसेवा | | | | | ४ | १ | | |
| २. वृत्तपत्र व्यवसाय | | | | | ४ | २ | | |
| ३. शिक्षण देणे | | | | | १ | | | |
| ४. इतर | ७ | | | | | | | |
| | २.०५% | | | | | | | |
| एकूण | ३३८ | ३७७ | ११५ | २० | ३७४ | २५ | २० | ४ |

व्यवसाय ह्यांचा परस्पर संबंध दाखविणारे वर्गीकरण

| ग्रॅज्युएटस्, पोस्ट-ग्रॅज्युएटस् व त्याच्याहीपेक्षा अधिक (टेक्निकल) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आर्किटेक्चर | इंजिनिअरिंग | टेक्नॉलॉजी | मेडिसिन | टीचिंग | कॉमर्स | लॉ |
| ६<br>१००% | ७<br>१००% | १<br>१००% | ६७<br>१००% | १६८<br>१००% | ६<br>१००% | ६<br>१००% |
| | १<br>१४.२८% | | ३१<br>४६.२६% | | | २<br>३३.३% |
| | | | | | ५<br>८३.३४% | |
| ५<br>८३.३४% | २<br>२८.५६% | | ९<br>१३.४३% | | | ४<br>६६.७% |
| १<br>१६.६६% | १<br>१४.५६% | १ | २७<br>४०.३% | ८९<br>५२.९७% | १<br>१६.६५% | |
| | | | | ६९<br>४१.०७% | | |
| | | | | १०<br>५.९६% | | |
| | ३<br>४३.१२ | | | | | |
| ६ | ७ | १ | ६७ | १६८ | ६ | ६ |

काम करीत आहेत; ९, किंवा १३.४३ टक्के स्वतंत्र व्यवसाय करतात; आणि २७, किंवा ४०.३ टक्के तत्सम महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत.

एकशे अडुसष्ट उत्तरदायी स्त्रियांनी शिक्षक व्यवसायाचे खास शिक्षण घेतले आहे. ह्यांपैकी ८९, किंवा ५०.९७ टक्के महाविद्यालयात शिकवितात; ६९, किंवा ४१ टक्के दुय्यम शिक्षिका; आणि १०, किंवा ५ टक्के प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करीत आहेत. कॉमर्स विषयात पदवी घेतलेल्या फक्त ६ स्त्रियांकडून प्रश्नपत्रिका भरवून घेता आल्या. त्यांपैकी पाच जणी मध्यम श्रेणीच्या प्रशासक आहेत. लॉ विषयाच्या सहा पदवीधर ह्यांत समाविष्ट झाल्या असून दोघी प्रशासन अधिकारी असून ४ वकिली करीत आहेत.

तीनशे नव्वद स्त्रिया आर्टस् शाखेच्या पदवीधर असून त्यांपैकी बहुतेकजणी प्रशासन विभागात–केवळ सरकारी नव्हे–सामावून गेल्या आहेत. एकशे अठ्ठेचाळीस तृतीय श्रेणीच्या पातळीवर, ३९ द्वितीय श्रेणीच्या, १९ पहिल्या श्रेणीत आणि तिघीजणी ऑल इंडिया सर्व्हिसमध्ये आहेत. एकच स्वागतकार म्हणून काम करीत आहे. वास्तविक स्वागतकाराचे काम स्त्रियांकडेच सोपविले जाते. कारण लोकांचे हास्यवदनाने स्वागत करून मृदु आवाजात स्त्रियाच उत्तर देऊ शकतात, म्हणून त्यांना हे काम दिले जाते. प्रस्तुत पहाणीच्या वेळी अनेक स्वागतकारांची भेट लेखिकेला घ्यावी लागली. परंतु वर उल्लेखिलेला एक अपवाद सोडल्यास बाकीच्या स्वागतकार, अधिकारी ह्या श्रेणीत मोडतात म्हणून त्यांना तेथे जमा केले आहे. सहा जणी दूरध्वनी नियंत्रक म्हणून काम करीत आहेत. आर्टस्कडे वळून पदवी घेतलेल्या बहुतेकजणी शिक्षिकेचा पेशा उचलतात. त्रेचाळीस, किंवा ११.०२ टक्के स्त्रिया प्राध्यापिका; ७४, किंवा १९ टक्के दुय्यम शिक्षिका; तथापि ह्या ७४ जणींनी शिक्षिकेचे खास शिक्षण घेतलेले नाही; १०, किंवा २.१६ टक्के प्राथमिक शिक्षिका; आणि ३३, किंवा ८.४६ टक्के ह्या शिक्षणविषयक इतर क्षेत्रांत काम करतात. उदाहरणार्थ, कोणी संशोधन-सहायक तर कुणी लेखिका म्हणून काम करीत आहेत. चौघीजणींनी पगारी समाज-सेविकेचे म्हणजे कुटुंबनियोजनाचे वगैरे काम अंगावर घेतले आहे. वृत्तपत्रव्यवसाय फक्त चौघीजणींनी पसंत केला आहे.

प्युअर सायन्सेसमध्ये पदवी घेतलेल्या व काही पोस्ट ग्रॅज्युएटस् झालेल्या २५ स्त्रिया असून ह्यांपैकी एकीने आय्.ए.एस्. ही परीक्षा देऊन त्या अधिकारी पदावर विराजमान झाल्या आहेत. दुसऱ्याही एक अधिकारी म्हणूनच काम पहातात परंतु वरील परीक्षा त्यांनी दिलेली नाही; १२ कारकून; १ रुग्णालयाच्या प्रयोगशाळेच्या प्रमुख आहेत; ६ महाविद्यालयात प्राध्यापिका; एक तत्सम क्षेत्रामध्ये. दोघीजणी समाजसेविका व एक वृत्तव्यवसायात गुंतल्या आहेत. होम सायन्स शाखेतल्या सर्व पदवीधर होम सायन्स महाविद्यालयात सामावल्या आहेत. चार बी.एस्.सी. नर्सिंग ह्या सिस्टर-टयूटर म्हणून काम पहातात.

येथे स्त्रियांच्या दृष्टीने विचार करण्यासारखा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. स्त्रियांसाठी होमसायन्स सारखा एक वेगळा शिक्षणक्रम असावा का? अर्थातच आधुनिक काळाची पाऊले परत वळविणे शक्य नाही आणि स्त्रियांचे शिक्षण काही विशेष व खास शिक्षणक्रम आखून संकुचित करता येणार नाही. ह्याचा अर्थ असा नव्हे की होमसायन्ससारखी एखादी उच्च शिक्षणाची शाखा असू नये ! "तेहतीस विद्यापीठांतून होमसायन्सची सुरवात झाली असून हळूहळू ह्या विषयाला शिक्षण क्षेत्रात मान्यता मिळू लागली आहे. होमसायन्समधून सर्वसाधारण चांगले शिक्षण देऊन आहारतज्ञ, अन्न तंत्रज्ञ, कुटुंबकल्याण कार्य, सामूहिक विकास व कल्याण विकास योजना आणि आय्.सी.एम्.आर. व आय्.सी.ए.आर्. व कौंसिल ऑफ चाइल्ड वेलफेअर ह्यांमधील संशोधनाच्या योजना सशास्त्र पद्धतीने हाती घेण्यास विद्यार्थिनी तयार कराव्या."[२०]

जर परिस्थिती अनुकूल असली तर स्त्रिया उच्च शिक्षणाकरिता कष्टपूर्वक प्रयत्न करीत असतात ही गोष्ट इतिहासजमा झाली आहे. परंतु शिक्षणाचा उपयोग आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता स्त्रियांनी करणे ही अलिकडील घटना आहे. ह्याचे प्रत्यंतर ब गटातील माहितीचे पृथक्करण केल्यानंतर येईल. ह्या गटातल्या शालान्त परीक्षा न दिलेल्या १३२ पोक्त स्त्रिया सोडून दिल्यास, उरलेल्या १२७ पैकी १९, किंवा १५ टक्के (फक्त शालान्त उत्तीर्ण झालेल्या), ह्या कारकून व प्राथमिक शिक्षिका म्हणून, ६ आर्टस् व १ सायन्स पदवीधर कारकूनपेशा, आणि ५ आर्टस् पदवीधर पुनः प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करीत आहेत. अशा तऱ्हेने मध्यमवर्गाचे कुटुंब हे एकांक धरून पहाणी केली असतानाही ह्या वर्गातील जवळजवळ १५ टक्के स्त्रिया अर्थार्जन करीत आहेत.

आधुनिक पिढीतील स्त्रियांचा उच्च शिक्षण घेण्यात अर्थार्जनाचे ते एक साधन असा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हेतू असतो की काय हे साधारणपणे अजमावून पहाण्याकरिता श्रीं. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या एम्.ए. ला बसणाऱ्या विद्यार्थिनींसाठी एक निराळीच प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली व त्यांच्यातील काहीजणींच्या मुलाखती घेण्यात आल्या. हल्लीच्या विद्यार्थिनींचा कल कुणीकडे आहे ह्याचे ओझरते दर्शन तक्ता ३४ मध्ये दिले आहे.

महिला विद्यापीठाच्या मुंबईतील महाविद्यालयांत १९६६-६८ मध्ये एम्.ए. च्या वर्गात एकंदरीत १५१ विद्यार्थिनी होत्या, ५६ सिनिअर व ९५ ज्युनिअर एम्.ए. वर्गामध्ये. ह्या १५१ विद्यार्थिनींपैकी २५, किंवा १६ टक्के विद्यार्थिनींची प्रत्यक्ष मुलाखत वेगवेगळी घेण्यात आली. सर्व सिनिअर विद्यार्थिनींचे सरासरी वय २५.७ व ज्युनिअर मुलींचे वय २३.६ होते. बी.ए. ची पदवी घेण्याच्या वेळी दोन्ही वर्गातील विद्यार्थिनींचे वय जवळजवळ सारखे म्हणजे अनुक्रमे २३.३४ व २३.६९ असताना एम्.ए. च्या वेळी अंतर का पडावे ? ह्याचे कारण काही सिनिअर विद्यार्थिनींनी

श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या (१९६७-६८ महाविद्यालयीन वर्ष) एम्.ए. (ज्युनिअर

| एकूण संख्या | वर्ग | सरासरी वय | शालान्त परीक्षेतील सरासरी गुण | शालान्त परीक्षेस केलेले प्रयत्न फक्त एकदा | पदवी घेण्यावेळचे वय | पदवी श्रेणी I | II | III | प्रयत्न १ | २ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | सि. | २५.७ | | | २३.३४ | | | | | |
| ९५ | ज्यु. | २३.६ | | | २३.६९ | | | | | |
| १५१ | | | | | | | | | | |
| नमुना | | | | | | | | | | |
| १० | सि. | २४.४४ | ५६.२% | २५ | | ० | +१७ | +८ | =२३ | +२ |
| १५ | ज्यु | २४.४४ | ६३% जास्तीतजास्त ४७% कमीतकमी | | | | | | | |

शिक्षणाचा

| | शालान्त परीक्षेनंतर पदवीची अपेक्षा | आईवडिलांची इच्छा | स्वतःस गुंतविणे | इतर |
|---|---|---|---|---|
| एकच निवड | १३ | १ | ३ | — |
| दुहेरी निवड | ४अ | ४ब+१अ+१अ | १ब | १ब |
| तिहेरी निवड | १अ+१ब | १अ+१ब | १क+१क | — |
| एकूण | १८ | ३ | ३ | १ |

व सिनिअर) विद्यार्थिनी त्यांचे वय, सामाजिक दर्जा, मातृभाषा, संपादित गुण व आकांक्षा

| पदवी घेतल्याचे विद्यापीठ | | वैवाहिक दर्जा | | मातृभाषा | एम्.ए. चे विषय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री. ना. दा. ठा. महिला | इतर | अ. | वि. | म. गु. इतर | समाज शास्त्र | गायन | ड्रॉइंग | केवळ भाषा आणि दोन भाषा |
| ५६ | ० | ४७ | ९ | १२+३९+५ | ३२ | १ | | २३ |
| ९० | ५ | ७९ | १६ | २१+६०+१४ | ३७ | ३ | १ | ५४ |
| १४६ | ५ | १२६ | २५ | ३३+९९+१९ | ६९ | ४ | १ | ७७ |
| २५–० | | २१ | ४ | १३+१०+२ | १७ | – | – | ८ |

उद्देश

| पदवी नंतर | | | एम्.ए. चा अभ्यास करताना | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्ञानार्जन | व्यवसाय | इतर | नोकरी | | | समाज सेवा | इतर |
| | | | शिक्षिका | कारकून | समाज सेवा | | |
| १४ | १ | – | ८ | ५ | ३ | ६ | ३ |
| ३ | ३ | – | | | | | |
| २ | – | २ | | | | | |
| १९ | ४ | २ | ८ | ५ | ३ | ६ | ३ |

बी.ए. ची पदवी घेतल्यावर मध्ये काही वर्षे शिक्षण सोडून देऊन पुन: महाविद्यालयाच्या पायऱ्या त्या चढल्या होत्या. काहीही असो, बी.ए. च्या वेळचे सरासरी वयसुद्धा थोडे अधिकच वाटते. सामान्यत: शालान्त परीक्षा देताना वय १६ किंवा १७ किंवा वेळेला १८ असते. सारखे उत्तीर्ण होत गेल्यास बी.ए. पदवी बाविसाव्या वर्षी घेता यावी. तेव्हा २३.३९ हे सरासरी वय वर्षा-सव्वावर्षाने अधिकच आहे.

सिनिअर एम्.ए. वर्गातल्या सर्व विद्यार्थिनींनी आपली बी.ए. पदवी श्री. ना. दा. ठा. विद्यापीठातूनच घेतली आहे. परंतु ज्युनिअर विद्यार्थिनींपैकी पाचजणी दुसऱ्या विद्यापीठातून महिला विद्यापीठाकडे आल्या आहेत. त्यांच्या वैवाहिक दर्जाचा विचार करता २५, अगर १६.५६ टक्के विवाहित असून १२६, किंवा ८३.४४ टक्के अविवाहित आहेत. ह्या त्यांच्या वैवाहिक दर्जावरून मागे काढलेल्या निष्कर्षास पुष्टी मिळते की सुशिक्षित मुलींचे विवाहाचे वय प्रमाणाबाहेर वाढत आहे. भाषेनुसार वर्गीकरण केल्यास, ३३ मराठी भाषिक, ९९ गुजराती आणि १९ इतर. ह्या विद्यापीठाने सुरवातीपासूनच म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी, मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम ठेवल्यामुळे निरनिराळ्या भाषिक मुलींना येथे येऊन शिक्षणाचा फायदा घेता आला आहे. एम्.ए. करिता विषयाची निवड करताना ७७ किंवा निम्म्या विद्यार्थिनींनी कोणतीतरी एक भाषा आपला मुख्य विषय म्हणून निवडली आहे. ह्यांमध्ये ८ जणींनी इंग्लिश भाषेला हा मान दिला आहे. भाषेच्या खालोखाल त्यांचा कल समाजशास्त्राकडे दिसून येतो. तूर्त ह्या महाविद्यालयात दुसरे कोणतेही सामाजिक शास्त्र–अर्थशास्त्र, राज्यशास्त्र वगैरे–शिकविण्याची व्यवस्था नाही. हाताच्या बोटावर मोजता येण्यासारख्या–४ आणि १–गायन व चित्रकला ह्या ललित कलांच्या उपासक दिसताहेत.

पंचवीस विद्यार्थिनींच्या घेतलेल्या मुलाखतींवरून असे दिसून येते की शालान्त परीक्षा त्या पहिल्या प्रयत्नानंतरच पास झाल्या असून गुणांची सरासरी ५६.२ टक्के इतकी आहे. सर्वांत कमी गुण ४७ व सर्वांत अधिक गुण ६३. बी.ए. परीक्षा १७ जणी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या असून ८ जणी तृतीय श्रेणीमध्ये. ह्यांपैकी २३ जणींना प्रथमत:च व दोघींना दुसऱ्यांदा परीक्षेस बसावे लागले. ह्या सर्व माहितीवरून ह्या विद्यापीठांत येणाऱ्या विद्यार्थिनी सर्वसाधारण पातळीवरील असतात.

जरी सदरहू २५ विद्यार्थिनींचा नमुना फार अल्प असला आणि त्यावरून काढलेले निष्कर्ष सर्व–१५१–विद्यार्थिनींच्या माहितीवरून काढलेल्या निष्कर्षापेक्षा कदाचित भिन्न निघाले असते तरी त्यावरून त्यांची प्रवृत्ती कुणीकडे आहे हे दिसून येते. त्यातल्यात्यात शिक्षणाच्या उद्देशाविषयी विचारलेल्या तिहेरी स्वरूपाच्या प्रश्नाचे उत्तर विशेष उद्बोधक आहे.

शालान्त परीक्षेच्या वेळी ७२ टक्के मुलींना 'पदवी मिळविणे' हे एकच ध्येय नजरेसमोर होते तर १२ टक्के विद्यार्थिनी 'वेळ जावा' म्हणून किंवा आईवडील

अगर इतर नातेवाईकांची इच्छा म्हणून उच्च शिक्षणाकडे वळल्या होत्या. कदाचित असे करण्यात त्यांचा हेतू आपल्या मुलीच्या लग्नाची संभवनीयता अधिक सुलभ करण्याचा असावा.

पदवी घेतल्यानंतर विद्यार्थिनींच्या शैक्षणिक ध्येयात फारसा फरक झालेला दिसत नाही, कारण ७६ टक्के विद्यार्थिनींनी ज्ञानार्जन हेच ध्येय असे नमूद केले आहे. सोळा टक्के मुलींच्या मनात शिक्षणाचा उपयोग अर्थार्जनासाठी करावा अशी दूरगामी इच्छा डोकावत आहे. म्हणजे २४ टक्के विद्यार्थिनींना पदवी घेतल्यानंतर काहीतरी नोकरी वा व्यवसाय करावा असे वाटणे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

एम्.ए. च्या पातळीवर ६४ टक्के विद्यार्थिनींना नोकरी करावीशी वाटू लागते. ह्यांपैकी ३२ टक्के जणींना शिक्षिका व्हावेसे वाटते, २० टक्केंना कारकून वगैरे शासनविषयक नोकरी हवी तर १२ टक्केंना पगारी समाजसेवा करावीशी वाटते. एम्.ए. पर्यंत ज्ञानाची पातळी गाठल्यावर २४ टक्के विद्यार्थिनींना समाजकार्याला वाहून घ्यावेसे वाटणे ही फार अभिनंदनीय प्रवृत्ती आहे. फक्त १२ टक्केंना काही निश्चित सांगता येत नाही. खरोखर अशी अनिश्चितता वाढत्या संख्येने दिसून येते. शालान्त परीक्षेच्या वेळेस ४ टक्के, बी.ए. च्या पातळीवर ८ टक्के तर एम्.ए. ला १२ टक्के हे वाढते प्रमाण कशाचे द्योतक असावे बरे ? एक तर विचारांची अपरिपक्वता असावी किंवा लग्न होत नाही म्हणून शिकत रहावयाचे ह्या प्रवाहपतित जीवन परिस्थितीचे ते निदर्शक असावे.

मात्र २० टक्के विद्यार्थिनींना आपण उच्च शिक्षणाकरिता समाजाचे ऋणी आहोत आणि हे ऋण फेडणे आपले कर्तव्य आहे असे मनापासून वाटताना दिसले.

एकंदरीने ह्या छोटया गटाला ज्ञानार्जन करून त्याचा काहीतरी उपयोग व्हावा अशी इच्छा असावी ही स्तुत्य गोष्ट आहे.

त्याचबरोबर लग्नाची इच्छा कोणी उघडपणे प्रगट केली नाही ह्यावरून 'स्त्रीच्या जीवनात लग्न करणे हेच साध्य' ह्या पुरातन उद्दिष्टापासून हल्लीची तरुणी दूरावत आहे की काय असा प्रश्न उपस्थित होतो. परंतु प्रस्तुत प्रश्नाला होकारार्थी उत्तर देणे चुकीचे ठरेल. लग्न व्हावे ही स्वाभाविक इच्छा आहे. पण मध्यमवर्गात ते लांबणीवर पडू लागले आहे हीसुद्धा घटना तितकीच सत्य आहे. त्यांच्या उत्तरावरून असा निष्कर्ष काढता येईल की आधुनिक मुलींना विविधांगी जीवन जगावेसे वाटते.

सदरहू पहाणीतील व इतर गोळा केलेल्या स्त्रियांच्या शैक्षणिक माहितीचा सारांश काढावयाचा झाल्यास पहिली घटना लक्षात येते ती म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात सर्व पातळींवरील स्त्रियांची झालेली शीघ्र प्रगती. ह्या प्रगतीमुळे समाधानाचा निश्वास टाकता आला असता, परंतु प्राथमिक, दुय्यम आणि उच्च पातळींवरील विशेषत: प्राथमिक शाळेत जाण्यास योग्य वय असलेल्या मुलामुलींच्या संख्येच्या मानाने त्याचप्रमाणे मुलांच्या संख्येच्या मानाने प्रत्यक्ष शिक्षण घेत असलेल्या

मुलींची संख्या कमी आहे. नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स एज्युकेशनच्या मते ज्या मुली पहिल्या इयत्तेत दाखल होतात त्यांचे शिक्षण पुढे चालू रहात नाही व "अपव्यय"[२१] होतो. ह्या कमिटीने मुलींची हजेरी झपाट्याने वाढण्याच्या दृष्टीने आणि मंदगती सुधारण्याच्या हेतूने अनेक सूचना केल्या आहेत.[२२] ह्या सूचना एज्युकेशन कमिशनने मान्य केल्या आहेत.[२३] हा मंदगतीचा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. आईवडील–विशेषत: खेड्यातील–मुलीला शाळेत घालण्यास नाखूष असतात. कारण घरकामात, शेतीसाठी अगर लहान भावंडे संभाळण्यास तिचा उपयोग असतो. त्यातून शाळेत नाव घातलेच तर नियमितपणे तिला पाठविले जात नाही. पास अगर नापास होवो, लौकरच तिची शाळा बंद केली जाते. कारण चांगल्या प्रकारचे जीवन जगण्यास शिक्षण किती अवश्य आहे हे अजून आमच्या लोकांच्या लक्षात आलेले नाही. "शाळा आणि इतर शिक्षण किंवा तुम्हाला वाटल्यास, शाळा आणि जीवन ह्यांच्या परस्पर संबंधात घडून आलेले परिवर्तन ही आजची फार मोठी घटना आहे."[२४]

शालान्त परीक्षेनंतर उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचा नमुना ह्या पहाणीत असल्यामुळे दुय्यम शिक्षणाचा येथे विचार न करणे बरे. शालान्त अगर अधिक शिक्षित स्त्रिया आपल्या ज्ञानाचा उपयोग कसा करतात हे आपण पाहिले आहे.

एकंदरीने पहाता, जर वैयक्तिक परिस्थिती अनुकूल असेल तर स्त्रिया उच्च शिक्षण घेण्याकरिता बराच प्रयत्न करताना दिसून येतात. लग्न झाले तरी त्या आपले शिक्षण पुढे चालू ठेवतात. मध्येच सोडावे लागले तर काही वर्षे लोटल्यावरही पुन: शिकू लागतात. सुरवातीस कदाचित काहीच ध्येय डोळ्यांसमोर नसते. परंतु महाविद्यालयीन शिक्षण पुरे होण्याची वेळ आली की आपण मिळविलेल्या विद्येचा उपयोग, विशेषत: ऐहिक फायद्याच्या दृष्टीने करावा असे त्यांना हळूहळू वाटू लागते. कारणे काहीही असोत शिक्षणाच्या चढाओढीत मुलांच्यापेक्षा मुली वरचढ आढळून येतात. " . . . माझ्या मुंबईच्या विद्यापीठात पुरुषांपेक्षा अधिक स्त्रिया प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात."[२५]

आधुनिक काळातील स्त्रियांची जागृती व उच्च शिक्षणाची तळमळ जरी बरीच दिसून येत असली तरी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांची संख्या फार अत्यल्प आहे. ह्या अल्पसंख्याकांपैकी ७१ टक्के स्त्रिया महाराष्ट्रात अर्थार्जन करतात असे अनुमान १९६१ च्या खानेसुमारीवरून काढता येते. उरलेल्या २९ टक्क्यांपैकी संख्येने अत्यल्प अशा, पुढील शिक्षण घेत आहेत परंतु बहुतांशी स्त्रिया आपला परंपरागत गृहिणीचा व्यवसाय करीत आहेत. "१९६१ च्या खानेसुमारीनुसार २४ वर्षांखालील दहा लक्ष तरुण स्त्रिया शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असून केवळ घर संभाळण्याचे काम करीत आहेत. ही दहा लक्षांची संख्या १९७१ च्या खानेसुमारीत बरीच वाढलेली दिसेल. ह्या स्त्रियांचा राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यक्रमात उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने अंशकालिक व्यवसायाची संधी त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे."[२६]

व्यवसाय पसंतीच्या बाबतीत प्रस्तुत पहाणीवरून असे दिसून येते की शिक्षिकेच्या व्यवसायाला त्या पहिले स्थान देतात. त्यांची दुसरी पसंती परिचारिकेच्या व्यवसायाची असते. त्यानंतर दूरध्वनी अगर तारायंत्र चालिकेचे काम पसंत पडते. चौथ्या प्रकारची पसंती कारकुनी, टंकलेखिका, कार्यवाहिका वगैरे शासनविभागी कामाची दिसून येते. काही थोड्या स्त्रिया अधिकारी पदावरही आहेत. त्याचप्रमाणे विशेष शिक्षण घेतलेल्या स्त्रिया वैद्यकीय, वकिली वगैरे स्वतंत्र धंदा करू इच्छितात. ह्याव्यतिरिक्त तांत्रिक क्षेत्रात काहीजणी शिरल्या असून हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या अखिल भारतीय सेवाधिकारीही आहेत. अशा तऱ्हेने हळूहळू स्त्रिया जबाबदारीच्या जागा घेऊ लागल्या आहेत. एज्युकेशन कमिशनने म्हटले आहे : "शिक्षिका, परिचारिका व समाजसेविका ह्या क्षेत्रांत स्त्रियांना उपयुक्त काम करता येते हे सर्वमान्य आहे. ह्या क्षेत्रांत स्त्रियांना व्यापक प्रमाणात संधी दिली पाहिजे आणि निरनिराळी नवनवी क्षेत्रे, जवळजवळ जीवनाची सर्वच क्षेत्रे त्यांना खुली करून दिली पाहिजेत."[२७]

जर आधुनिक जागृत झालेल्या स्त्रीला शिक्षण घेण्यात व नोकरीव्यवसाय करण्यात सार्थकता वाटत असेल तर ही लाट परतविणे अशक्य आहे आणि तसा प्रयत्नही करू नये. विकसित राष्ट्राला पुढे येत असलेल्या हातांची आणि बुद्धीची गरज आहे. "आधुनिक जगात स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल व मूल ह्या पलीकडे बरेच विस्तृत झाले आहे. ती आता स्वतःचे स्वतंत्र कार्यक्षेत्र–नोकरी वा व्यवसाय–निवडीत असून पुरुषांच्या बरोबरीने समाजाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी वहात आहे. ह्याच दिशेने आपल्याला पुढील पाऊल टाकले पाहिजे."[२८] पूर्वीच्या नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स एज्युकेशनच्या अहवालात म्हटले आहे : "नियोजन समितीने असे दर्शविले आहे की तिसऱ्या योजनेच्या (आता पाचवी योजना) विविध प्रकल्पांकरिता स्त्रीकर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडणार आहे. तरी आतापासूनच ही तूट भरून काढण्याकरिता पाऊले टाकली पाहिजेत."[२९] लेबर ब्यूरोच्या पत्रिकेत आणखी एक पुस्ती जोडली आहे: "अधिक कौशल्याची व जास्त पगाराची कामे मुलींना व स्त्रियांना न मिळण्यास मुख्य अडचण म्हणजे व्यावसायिक शिक्षणाचा अभाव. दुसऱ्या टोकाला उच्च शिक्षण घेतलेल्या परंतु तांत्रिक बाजू नसलेल्याही स्त्रिया आहेत. आय्.एल्.ओ. च्या अलिकडील अहवालात म्हटले आहे की "(विकसित देशांत) कोणत्याही प्रकारची व्यावसायिक पात्रता नसताना आणि पुष्कळ वेळा सर्वसाधारण अल्पज्ञान असलेल्यांना, तसेच राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या तात्कालिक गरजांशी निगडित नसलेल्या उच्च महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या तरुण मुलींनी व स्त्रियांनी रोजगारी पत्करल्यावर त्यांना बेकार होण्याची वेळ येते. . . . आपणाला भावी काळात कोणत्या क्षेत्रात वाव आहे ह्याची अधिक वास्तव कल्पना देण्याची उपाययोजना करावी आणि काही प्रमाणात कौशल्य व जबाबदारीचे काम उचलता येईल अशी पूर्वतयारी

करण्यास त्यांना उत्तेजन देण्यात यावे."[३०]

वर उल्लेखिलेल्या कमिटीने व कमिशनने विस्तृत शिफारशी केल्या आहेत त्या येथे पुन: देणे अप्रस्तुत होईल. ह्या शिफारशी आणि त्या अमलात आणण्यास लागणारे जरूर ते अनुदान शक्य तितक्या लौकर अमलात आणावे आणि ते अनुदान दुसरीकडे खर्चिले जाऊ नये हे येथे सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. टाइम्स ऑफ इंडियाच्या संपादकियात पुढील टीका केलेली आढळून येते : "स्त्रियांच्या शिक्षणासाठी जो वार्षिक फंड नियोजित केला होता तो दुसरीकडे कसा निष्काळजीपणे खर्चिला ह्याचे हे एक महत्त्वाचे उदाहरण आहे."[३१]

स्त्रीशिक्षणाची प्रगती योग्य दिशेने व्हावी ह्या दृष्टीने लेखिकेला हे प्रकरण पुरे करण्यापूर्वी दोन तीन महत्त्वाच्या मुद्यांवर भर द्यावासा वाटतो.

१. **दहाव्या अथवा अकराव्या इयत्तेमध्ये उभय मुलामुलींचा स्वाभाविक कल व बुद्धिमत्ता ह्यांची चाचणी घेऊन व्यावसायिक मार्गदर्शन करावे.** ज्यांची पुरेशी बुद्धिमत्ता चाचणीतून दिसून येईल आणि ज्यांच्यात चिकाटी, कष्टाची तयारी वगैरेसारखे गुण आढळून येतील त्यांनाच उच्च शिक्षणास जाण्याचा सल्ला द्यावा. लायक विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात शिष्यवृत्त्या देण्यात याव्या. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये प्राथमिक शाळेपासून तो वयात येईपर्यंत व्यावसायिक मार्गदर्शन चालू असते. "मार्गदर्शन व शिक्षण ह्यांचे ध्येय एकच असते : व्यक्तीचा अधिकात अधिक विकास."[३२] सिन्सिनाटी व्होकेशन ब्यूरोच्या डायरेक्टरने म्हटले आहे, "व्यावसायिक मार्गदर्शनामुळे मार्ग सापडण्याची आशा असते . . . जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला वाढते समाधान, पूर्तीची आशा निर्माण होईल आणि जीवनाच्या कठोरतम नियमांना आणि भग्न करणाऱ्या घटनांना तोंड देऊन समतोलपणा राखण्याचे सामर्थ्य येईल."[३३]

महाराष्ट्र राज्यात व्यावसायिक मार्गदर्शन व निवड अशी संस्था आहे. तिच्या (१९६६-६७) च्या अहवालाप्रमाणे जे व्यक्तिश: त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी येतात व पोस्टाने माहिती मागवितात त्यांना मार्गदर्शन केले जाते व माहिती पाठविली जाते. त्याकरिता व्यावसायिक परिषदा भरवितात. अहवालाच्या वर्षी राज्यातील निरनिराळ्या ठिकाणी अशा चव्वेचाळीस परिषदा भरविल्या होत्या. त्याचप्रमाणे शिक्षकांना चाचणी घेण्याचे व मार्गदर्शन करण्याचे शिक्षण दिले जाते. जे विद्यार्थी आपली चाचणी घ्यावी अशी इच्छा प्रगट करतात त्यांची चाचणी घेतली जाते. त्या वर्षी तेरा हजारांना मार्गदर्शन करण्यात आले. तथापि तेथील अधिकाऱ्यांच्या मते राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता ही व्यवस्था अपुरी आहे. शिवाय पालकांना ह्या व्यवस्थेची माहिती तरी नसते किंवा असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या अगर राष्ट्राच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे व जे आज मोफत मिळू शकते ह्याची जाणीव नसते. अगदी जेमतेम पास होणाऱ्या मुलांचे महाविद्यालयात नाव दाखल

केले जाते आणि तेही सायन्स शाखेकडे. नंतर पस्तावण्याची वेळ येते.

२. **मानवरुपी साधनांच्या पायावर आणि व्यवसायांच्या अनुषंगाने शिक्षण-क्रमाची आखणी करणे.** असे केल्याने सुशिक्षितांच्या बेकारीला आळा बसेल. दिवसें-दिवस हे प्रमाण वाढत आहे आणि त्यात शिक्षित स्त्रियांची भर पडत आहे, ह्याची सेवायोजन कार्यालयांच्या आकड्यांवरून आणि प्रस्तुत पहाणी करीत असताना स्त्रीइंजिनियरांच्या उदाहरणांवरून थोडीबहुत कल्पना येऊ शकते. १९६५ साली इन्स्टीटयूट ऑफ् अप्लाइड् मॅनपॉवर रीसर्च ह्या संस्थेने इंजिनियर लोकांची पहाणी केली. इंजिनियर्स व टेक्नॉलॉजिस्ट ह्यांच्या शिक्षणविषयक सर्व अंगांचा अभ्यास केला. शिक्षणक्रम सुधारण्यासाठी आणि वरच्या थरावरील विद्यार्थ्यांचा अपव्यय नाहीसा करण्याकरिता इतर उपायांबरोबर पुढील योजना सुचविली आहे : महाविद्यालये आणि संभवनीय उद्योगपती ह्यांनी परस्पर सहकार्याने शिक्षणक्रम आयोजित करावा.[३४] डॉ. व्ही. के. आर्. व्ही. राव म्हणतात : "राष्ट्राचे मानवरुपी साधन अजमावण्याच्या दृष्टीने नियोजन केले पाहिजे, राष्ट्राच्या विकासाकरिता किती प्रमाणात आणि कोणत्या प्रकारच्या नैपुण्यांची मागणी उद्भवेल ह्याचा अंदाज काढणे आणि उत्पादन वाढविण्यासाठी व आर्थिक भरभराट द्रुतगतीने होण्यासाठी कच्च्या मानवी साधनाचे तांत्रिक व इतर नैपुण्यकुशल असे कारागीर बनविण्यासाठी जरूर ती मंजुरी घेतली पाहिजे."[३५] शिवाय उच्च शिक्षणावरील आपल्या प्रकरणाच्या शेवटी डॉ. किंग पुढीलप्रमाणे लिहितात : "जसे इतर क्षेत्रांत तसेच उच्च शिक्षणाच्या बाबतीत नियोजन हे क्रमप्राप्त आहे. पण सुधारणेचे पाऊल पुढे पडावयाचे असेल तर हे नियोजन खरोखरी बंदी घालणारे अगर नियामक असता कामा नये. सर्व थोर संस्कृतींचे एक आवश्यक वैशिष्टय म्हणजे व्यक्तींच्या परस्पर पूरकतेला कमी महत्त्व देऊन त्यांना स्वतंत्र वाढीस व स्वयंप्रकटीकरणास वाव देणे. ह्या दोन गुणांना स्थान व वळण देण्याचे कार्य इतरत्र नव्हे पण सर्वप्रकारच्या उच्च शिक्षणाचे आवश्यक वैशिष्टय असले पाहिजे. म्हणूनच पुढील उच्च शिक्षणाचे नियोजन दोन पातळ्यांवर झाले पाहिजे. ऐहिक आधार म्हणून, शाळांचे शासकीय आणि अध्यापनशास्त्राच्या दृष्टीने ज्ञानाची मुक्तगंगा म्हणून आणि विद्येची संधी मिळावी ह्या हेतूनेही सार्वजनिक नियोजन झाले पाहिजे. हा शेवटचा हेतू साध्य होण्यासाठी उच्च शिक्षणाकडे मोकळेपणाने मुले व वित्तादी साधने ओढली जातील आणि शिक्षण पुरे झाल्यावर ज्या सार्वजनिक जीवनाचे ते अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत त्यामध्ये त्या सर्वांची उत्तम विभागणी होईल."[३६]

३. **शिक्षण, विशेषतः उच्च शिक्षण समाजाच्या सांस्कृतिक, शास्त्रीय आणि इतर अपेक्षा पूर्ण करणारे असले पाहिजे.** द्रुत गतीने बदलणाऱ्या परिस्थितीनुसार शिक्षणाची आखणी केली पाहिजे. "उच्च शिक्षणाची मागणी आणि संभाव्यता ह्यांविषयी व्यापक शब्दांत आपणास खरोखरी काय सांगता येईल ? . . . उच्च शिक्षण म्हणजे क्रमाक्रमाने विद्येची प्राप्ती अगर विद्येचे क्षेत्र ह्या दृष्टीने उद्भवणारे

महत्त्वाचे व आवश्यक प्रश्न तर लक्षात घेतलेच पाहिजेत पण शिवाय त्यांच्या आनुषंगिक सामाजिक घटकांचाही विचार करावयास पाहिजे. ते घटक म्हणजे : विद्यार्थ्यांचा लांबत चाललेला तारुण्याचा काळ, विशेषतः नोकरी, व्यवसाय मिळणे, कुटुंब स्थापन करणे वगैरे बाबतीत; सहशिक्षण आणि तरुण स्त्रियांच्या खास गरजा, 'पिढीपिढीतील अंतर' आणि पसंत झालेले व नापसंत ह्यांत निर्माण होणारा दुरावा . . . ज्या जगात विद्यापीठे आहेत त्या जीवनक्रमाला योग्य अशी भूमिका त्यांनी पटवून दिली पाहिजे."[३७] आणखी पुढे श्री. एम्.सी. छगला म्हणतात : "आमचा समाज हा विकसित देश आहे हे त्याचे एक वैशिष्टच. शिवाय त्याची संस्कृती फार पुरातन आहे. अशा आमच्या भारताची दोन अंगे आहेत, पुराण परंतु श्रेष्ठ असा भूतकाळ, थोर सांस्कृतिक परंपरा आणि आर्थिक दारिद्रय . . . आमच्या सुशिक्षित तरुण तरुणींनी, आपल्या घटनेने व सरकारने राष्ट्रापुढे जी उद्दिष्टे मांडली आहेत ती मिळविण्यास मदत केली पाहिजे."[३८]

उपकुलगुरूंची परिषद ११-१३ सप्टेंबर १९६७ मध्ये भरली होती, त्यावेळी विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ. कोठारी ह्यांनी आपल्या भाषणात म्हटले : "आपल्या देशात उच्च शिक्षणाचे मूलभूत कार्य म्हणजे (एज्युकेशन कमिशनने व्यक्त केल्याप्रमाणे) आपण एकराष्ट्रीयत्वाची व एक संस्कृतीची भावना वाढविणे; राष्ट्रीय एकात्मतेस पुष्टी देणे; देशाच्या उत्पादनाला प्रत्यक्ष हातभार लावणे; आणि (कितीही अल्प प्रमाणात का होईना) द्रुतगतीने वाढणाऱ्या जागतिक ज्ञानात आणि तंत्रशास्त्रात भर घालणे." येथे यूनेस्कोने 'ॲक्सेस टू हायर एज्युकेशन' ह्याचा अभ्यास केल्यावर जो महत्त्वाचा मुद्दा विशद केला आहे तो सांगावासा वाटतो, तो असा की ह्यापुढे राष्ट्रीय मर्यादेपुरतेच मानवी साधनाचे नियोजन म्हणून ज्ञानाची कक्षा आखता येणार नाही.

निरनिराळ्या थोर शिक्षणतज्ञांनी वर जे उच्च शिक्षणाचे व्यापक उद्देश मांडले आहेत ते साध्य होण्याकरिता दुय्यम आणि उच्च शिक्षणाच्या वेळी मानसशास्त्रीय व व्यावसायिक मार्गदर्शन असावे आणि त्याच बरोबर पुणे विद्यापीठाप्रमाणे विद्यार्थ्यांची व विशेषतः विद्यार्थिनींची–कारण त्या भावी माता असून पुढील पिढीच्या बरोबर त्यांचे जीवन विशेष निगडित असते म्हणून–आरोग्य विषयक पूर्ण तपासणी करण्यात यावी.

शिवाय 'सुशिक्षित स्त्रियांच्या जीवनक्रमाचा मागोवा' अर्थार्जन करण्याची संधी ह्या दृष्टीने करून तदनुसार स्त्रीशिक्षणात बदल व सुधारणा घडवून आणाव्या.

## संदर्भ


१. नॅशनल कमिटी ऑन वुइमेन्स् एज्युकेशन, पा. ६.
२. दी टाइम्स ऑफ् इंडिया, ४ एप्रिल १९६७.
३. रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन, तक्ते ६ व ७, पा. १३६.
४. वरील ग्रंथ, पा. ३१३.
५. सेन्सस् ऑफ् इंडिया, नं. २, १९६३.
६. रिपोर्ट ऑफ् दी नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स् एज्युकेशन, पाने ९९, २६४.
७. लक्ष्मी मिश्र, एज्युकेशन ऑफ् वुइमेन् इन इंडिया, १९२१-६६ (१९६६), पा. २०५-६.
८. दी आय्एल्ओ रिपोर्ट, १९६३, पा. ३९-४०.
९. दी पोझीशन ऑफ् दी वुमन ग्रॅज्युएट टुडे, पा. ७.
१०. "अ महाराष्ट्र लेटर", दी टाइम्स ऑफ् इंडिया २ जुलै १९६७.
११. प्रकरण २रे पहा.
१२. प्रकरण ३रे पहा.
१३. ई. ई. मॅकोबी, दी एक्सपेरिमेंटल स्टडी ऑफ् दी फीमेल, इन फार्मर ॲन्ड वुल्सन, दी पोटेंशिअल् ऑफ् वुमन, पा. ३७.
१४. आय्. एफ्. यू. डब्ल्यू. स्टॅटिस्टिकस् पहा.
१५. तक्ता २४ पहा.
१६. यूएन्ओस्टॅटिस्टिकल इयर बुक १९७१, तक्ता २०१, पा. ७१४.
१७. दी टाइम्स् ऑफ् इंडिया, ११ सप्टेंबर १९६७.
१८. ,, ,, ९ डिसेंबर १९६९.
१९. यूएन्ओस्टॅटिस्टिकल इयर बुक १९७१, तक्ता २२, पा. ८६.
२०. रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन पान ३१४.
२१. रिपोर्ट ऑफ् दी नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स् एज्युकेशन (१९५९), पा. २२३.
२२. वरील रिपोर्ट, पा. २०८.
२३. रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन, पा. १३८.
२४. एडमंड जे. किंग, एज्युकेशन ॲन्ड सोशल चेन्ज (१९६६), पा. ५.
२५. एम्. सी. छगला, एज्युकेशन ॲन्ड दी नेशन, पा. ५८.
२६. रिपोर्ट ऑफ् दी एज्युकेशन कमिशन, पा. १३८.
२७. वरील रिपोर्ट, पा. १३९.
२८. एज्युकेशन ॲन्ड नॅशनल डेव्हलपमेंट, पा. १३५.
२९. रिपोर्ट ऑफ् दी नॅशनल कमिटी ऑन् वुइमेन्स् एज्युकेशन, पा. २१८-१९.

३०. गव्हर्मेंट ऑफ् इंडिया, मिनिस्ट्री ऑफ् लेबर ॲन्ड एम्लॉयमेंट, लेबर ब्यूरो, वुइमेन् इन् एम्लॉयमेंट, सिरीज ८, पा. ६४.
३१. दी टाइम्स् ऑफ् इंडिया, १० जुलै १९६६.
३२. मारगराइट डब्ल्यू. झॅपोलिऑन्, ऑक्युपेशनल प्लानिंग फॉर् वुइमेन (१९६१), पा. ४३.
३३. कॅम्बेल एम्. एडिथ, व्होकेशनल गायडन्स (१९२३), पा. ४१८.
३४. टाइम्स् ऑफ् इंडिया, ११ ऑक्टोबर १९६७.
३५. व्हो. के. आर्. व्हीं. राव, एज्युकेशन ॲन्ड ह्यूमन रिसोर्सिस् डेव्हलपमेंट, पा. ३.
३६. एडमंड जे. किंग, एज्युकेशन ॲन्ड सोशल चेन्ज (१९६६), पा. १९०.
३७. वरील ग्रंथ, पा. ८६.
३८. एम्. सी. छगला, एज्युकेशन ॲन्ड दी नेशन, पा. ४५.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रं/९२/१
मंत्रालय.

## प्रकरण ६ वे

# व्यवसायांची गुंतागुंत

कमीत कमी दुय्यम शिक्षण, तर काही स्त्रियांनी पदवी, मास्टर पदवी किंवा त्याहूनही जास्त शिक्षण घेतल्यावर त्यांतील काही जणींना ह्या शिक्षणाचा उपयोग व्यवसाय शोधण्याकरिता करावा अशी इच्छा होते. अशी ही प्रवृत्ती १९६१ च्या खानेसुमारीतील माहितीचे पृथक्करण केल्यावर व प्रस्तुत पहाणीनंतरही दिसून आली. अर्थार्जन करणाऱ्या आणि मध्यमवर्गातील कुटुंबामधील स्त्रियांच्यावरून ही प्रवृत्ती अधिकच स्पष्ट झाली. तसेच एम्.ए. चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थिनींतही ती दिसून आली. सुशिक्षित स्त्रियांनी अर्थोत्पादनात्मक व्यवसाय करण्याची प्रवृत्ती स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झाली परंतु युद्धोत्तर व स्वातंत्र्योत्तर काळात तिला जोराने चालना मिळाली ही गोष्ट खरी.

समानता हा एक मूलभूत मानवी हक्क आहे, त्यात स्त्रीपुरुष अगर वांशिक वगैरे भेद नाही हे १९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या जाहीरनाम्याने मान्य केल्यावर अखिल जगतातील स्त्रीजातीला स्वातंत्र्याचे दरवाजे खुले झाले, भारत त्याला अपवाद नाही. शतकानुशतके निर्माण झालेल्या स्त्रीपुरुषांच्या भिन्न कार्यक्षेत्रांतील अंतर तोडण्याचा तिचा प्रयत्न चालू आहे. ह्या तिच्या आगेकूच वाटचालीला, सशास्त्रपद्धतीने प्रजोत्पादनावर नियंत्रण घालता येते ह्या शोधामुळे स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जीवन जगण्यास फार मोठी मदत झाली आहे. आपणापुढ वाढून आलेल्या नव्या संधींचा उपयोग करून घेणे आणि त्याकरिता जरूर तेथे व तसे जमवून घेणे ही स्त्रीची प्रक्रिया सुरू आहे. ह्याच्या अनुषंगाने प्रा. घुर्ये म्हणतात : "एका नव्या तांत्रिक क्रांतीच्या प्रारंभाच्या काळातून जग आज जात आहे; ह्या क्रांतीची वैशिष्टये म्हणजे स्वयंचलन आणि उष्णता-अणुशक्ती. भारताच्या बाबतीत राज्याने सेवानियोजन करणे ह्या दृष्टीने आपण बरेच पुढे गेलो आहोत; अशा व्यवस्थेत रूढ आणि साचेबंद अशी शासनयंत्रणा तर असते शिवाय कल्याणकारी राज्याच्या नवनव्या सेवायोजनांचा समावेश त्यात असतो आणि राज्यामार्फत नेमलेल्या व खाजगी पगारी नोकरवर्गामार्फत बरेचसे उद्योगधंदे चालविले जातात."[१] ह्यालाच पूरक असे प्लानिंग कमिशनचे माजी उपाध्यक्ष प्रा. ध. रा. गाडगीळ म्हणाले : "बौद्धिक, कारकुनी, शासकीय आणि धंद्यांच्या क्षेत्रांतच स्त्रियांना नोकऱ्यांची संधी वाढत्या प्रमाणात मिळणार आहे."[२] हा कल सर्वत्र आढळत आहे.

यू. एस्. मधील एक लेखक मि. हण्ट ह्यांनी 'पोटेंशिअल ऑफ् वुमन' ह्या

विषयावरील चर्चेत असे सांगितले की : "समायोजनाची अधिक कार्यवाही दिशा म्हणजे भूतकालातील कोणत्याही स्त्रीला कराव्या लागल्या नाहीत अशा विविध भूमिका बठवणारी एक अत्यंत संमिश्र व्यक्ती म्हणून आधुनिक स्त्रीने आपले चित्रण करावे असे मी सुचविते."[३] एक समाजाची कार्यकर्ती सदस्य म्हणून तिने निरनिराळ्या भूमिकांतून भाग घ्यावयास पाहिजे इतकेच नव्हे तर "गुंतागुंतीचे जीवन आणि भूमिका पसंतीचे वाढते क्षेत्र ह्यांमुळे तिला अनेक प्रकारे जुळवून घ्यावे लागेल व युक्त्या योजाव्या लागतील परंतु त्यामुळे सुशिक्षित मध्यमवर्गीय बहुसंख्य पुरुषांच्या गरजा भागविण्यात ती अधिक यशस्वी ठरू पहात आहे."[४] कै. राष्ट्राध्यक्ष केनेडी ह्यांनी प्रेसिडेन्टस् कमिशन नेमून खाजगी उद्योगधंद्यात स्त्रियांची भरती करण्याच्या मार्गात असलेली विघ्ने दूर करण्याच्या दृष्टीने एक निर्णायक पाऊल टाकले–ही विघ्ने बहुतांशी पूर्वग्रहदूषितपणामुळे निर्माण झाली होती. हे झाले लोकशाही आणि जगातील दोन नेत्या राष्ट्रांपैकी एकाच्या बाबतीत.

दुसरे नेते राष्ट्र म्हणजे सर्वांना परिचित असलेले समाजवादी अगर साम्यवादी यू. एस्. एस्. आर्. तेथे स्त्रियांना तक्रार करण्यास जागाच नाही असे दिसते. कारण "सोव्हिएट युनियनची घटना इतर गोष्टींबरोबर असेही ध्वनित करते की : 'यू. एस्. एस्. आर्. मधील स्त्रियांना आर्थिक, सरकारी, सांस्कृतिक, राजकीय आणि इतर सामाजिक कार्यात म्हणजे सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने सर्व समान हक्क दिले आहेत'."[५] ही समानता कोठवर गेली आहे? पत्नीला आपले नावच काय पण आडनावही लग्नानंतर बदलावे लागत नाही. पुढील उतारा पहा : "उदाहरणार्थ, आपल्या विवाहाची नोंद करताना आपल्या कुटुंबाचे नाव कोणते असावे हे पतिपत्नीच्या इच्छेवर अवलंबून असते. त्यांना कोणतेही सर्वसामान्य नाव पसंत करता येते (प्रसंगोपात ते पतीचे नाव असेल किंवा पत्नीचेही असेल), किंवा त्यांना आपली पूर्वाश्रमीची नावेही पुढे चालविता येतात."[६] पितृप्रधान कुटुंब असलेल्या इतर समाजात उलट परिस्थिती असते. तिला आपले आडनावच बदलावे लागते असे नव्हे तर पूर्वीच्या काळी ज्या कुटुंबात तिने प्रवेश केला असेल किंवा करावा लागला असेल त्या कुटुंबात आपले सर्व व्यक्तिमत्व तिला विलीन करावे लागे. यू. एस्. एस्. आर्. मधील दुसरी गोष्ट म्हणजे मेडिसिनसारख्या महत्त्वाच्या धंद्यात यू. के. मधील एक प्राध्यापक डॉ. किंग ह्यांच्या मते स्त्रीडॉक्टरांची संख्या अधिक आहे.[७]

"जागतिक लक्ष वेधून घेणारे" दुसरे युरोपातील राष्ट्र म्हणजे स्वीडन. "स्कॅन्डेनेव्हियाइतके कल्याणकारी फायदे मिळण्याचे विस्तृत क्षेत्र जगात इतरत्र कुठेही नाही." आणखी : "इतर देशांतील समाजशास्त्रज्ञांनी आधुनिक स्वीडनच्या समाजपद्धतीला जीवनाची सुवर्णमध्य पद्धत म्हणजे समाजवादी व भांडवलशाहीतील मध्यरेषा असे नाव दिले आहे. किंवा अधिक समर्पक अर्थाने नियोजनात्मक अर्थव्यवस्था व खाजगी उद्योगव्यवस्थेतील सुवर्णमध्य. खाजगी उद्योगधंद्यांना उत्पादनाचे स्वातंत्र्य आहे,

ते उत्पादन समाजवादी सरकार वाटून देते व अशा तऱ्हेने प्रत्येकास मूलभूत आर्थिक सुरक्षिततेचे नियोजन करते." आणि "आर्थिक धोरणाचा मुख्य हेतू सर्वांना व्यवसाय मिळवून देणे हा आहे."[८] शिवाय "मालक आणि कामगार ह्या दोन गटांनी स्नेहाने आणि शांततेने मिळून काम करणे हे कदाचित सर्वांत अधिक उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे."[९]

एकोणिसाव्या शतकातील इंग्लंडमधील स्त्रियांनी समानतेकरिता प्रथमतः झेंडा फडकविला. परंतु आता ज्याअर्थी तेथे हरएक क्षेत्रात त्यांनी समानता मिळविली आहे त्याअर्थी असा प्रश्न उपस्थित होतो की अखिल राष्ट्रोन्नतीकरिता आणि स्वतःचे व्यक्तिमत्व उंचावण्याकरिता त्यांनी त्यानंतर काय केले आहे? त्याचे उत्तर: "संधी दिल्यास स्त्रिया आपल्या कृत्यांनी अखिल जगतामध्ये उपयुक्त आणि परिणामकारक कार्य करू शकतात."[१०]

आशियातील बऱ्याच पुढारलेल्या पण आमच्या जवळच्या अशा जपानविषयी बोलावयाचे तर: "जपानी स्त्री ही बदलत आहे हे जवळजवळ निःसंशयपणे म्हणता येईल. ती मुक्त होत आहे, कवडी मोलाचे जीवन तिला घालवावयाचे नाही, तेसुद्धा तिच्या धन्याने–पतीने–सांगितले तरी."[११]

आशियातील दुसरे राष्ट्र आज पुढे येत आहे ते इस्राएल. ह्याच देशात स्त्रिया पोलीसाचे काम करतात इतकेच नव्हे तर संरक्षक दलातही त्या आहेत. "स्वतंत्र राज्य स्थापनेनंतर सैन्यात सक्तीने भरती करण्याचा नियम मुलांप्रमाणेच मुलींनाही लागू करण्यात आला, मात्र आघाडीवरील युद्धाचे शिक्षण त्यांना दिले जात नाही तर संरक्षणाकरिता हलकी शस्त्रास्त्रे वापरण्याचे शिक्षण त्यांना देण्यात येते."[१२]

भारतीय परिस्थितीबद्दल लिहावयाचे तर तत्त्वतः व प्रत्यक्षातही स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात मज्जाव नाही. बऱ्याच वरच्या जागा स्त्रियांनी भूषविल्या आहेत. परंतु सर्वसाधारण स्त्रियांचीच काय पण आम जनतेची स्थिती असावी तशी नाही. एज्युकेशन कमिशनच्या अहवालात म्हटले आहे: "ज्या व्यवसायांच्या विशिष्ट क्षेत्रात प्रशिक्षित व सुशिक्षित स्त्रियांची तातडीची आवश्यकता आहे त्याच व्यवसायांच्या दृष्टीने बऱ्याच स्त्रीविद्यार्थिनींचे उच्च शिक्षण आखण्याची जरुरी आहे."[१३] सद्यःस्थिती मात्र काही आदर्श नाही. खानेसुमारीतील महाराष्ट्राच्या व प्रस्तुत पहाणीतील माहितीच्या अनुषंगाने शिक्षण आणि व्यवसाय ह्यांची सांगड घालून गेल्या प्रकरणात प्रत्यक्षात काय आहे हे पहाण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याअर्थी निरनिराळ्या क्षेत्रांत प्रवेश करण्याची स्त्रियांना इच्छा आहे त्याअर्थी अखिल भारत व महाराष्ट्र आणि इतर पुढारलेले देश ह्यांचे तुलनात्मक चित्रण, शिवाय स्त्रीपुरुष श्रमिक अशी विभागणी केल्यास येथे अप्रयोजक ठरणार नाही.

पुढील तक्त्यात जगातील इतर सहा देशांबरोबर भारत व महाराष्ट्रातील श्रमिक स्त्रीपुरुषांची तुलना केली आहे. भारताची लोकसंख्या यू. एस्. किंवा यू. एस्. एस्.

## तक्ता ३५

सहा इतर देशांतील सर्व संभवनीय आणि प्रत्यक्ष श्रमिक लोकसंख्या

स्त्रीपुरुष – विभागणी आणि हजारी प्रमाण : (१) एक हजार पुरुषांस स्त्रियांचे प्रमाण. (२) एक हजार पुरुषांतील आणि स्त्रियांतील संभाव्य श्रमिक. (३) एक हजारी प्रत्यक्ष श्रमिक, आणि (४) एका श्रमिक पुरुषास स्त्रीचे प्रमाण.

(हजारी लोकसंख्या).

| देश | वर्ष* | एकूण | | संभाव्य श्रमिक | | प्रत्यक्ष श्रमिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| यू. एस्. ए. .. .. | १९६० | ८८,३३१ | ९०,९९२ | ५७,८३८ | ६१,५७६ | ४४,१८३ | २२,६४१ |
| | | १,००० | १,०३० | १,००० | १,०६५ | १,००० | ५१२ |
| | | १,००० | १,००० | ६५५ | ६७६ | ५०० | २४८ |
| | | | | १,००० | १,००० | ७६३ | ३६६ |
| | | | | | | १.०० | ०.४८ |
| यू. एस्. एस्. आर्. .. .. | १९५९* | ९४,०५० | १,१४,७७६ | ५८,४५० | ८०,८१६ | | |
| | | १,००० | १,२२० | १,००० | १३८३ | | |
| | | १,००० | १,००० | ६२१ | ७०४ | | |
| | | | | १,००० | १,००० | | |

तक्ता ३५ (पुढे चालू)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| यू. के. .. .. | १९६१ | २५,४८१ | २७,२२८ | १९,६७४ | २१,५०५ | १४,४६७ | ८,५०० |
| | | १,००० | १,०६९ | १,००० | १,०९३ | १,००० | ५८७ |
| | | १,००० | १,००० | ७६८ | ७९० | ५६८ | ३१२ |
| | | | | १,००० | १,००० | ७३५ | ३९९ |
| | | | | | | १.०० | ०.५४ |
| स्वीडन .. .. | १९६० | ३,७३९ | ३,७५६ | २,९०८ | २,९७१ | २,३८९ | १,४४८ |
| | | १,००० | १,००५ | १,००० | १,०२२ | १,००० | ६०६ |
| | | १,००० | १,००० | ७७७ | ७९१ | ६३८ | ३८६ |
| | | | | १,००० | १,००० | ८२१ | ४८७ |
| | | | | | | १.०० | ०.५९ |
| जपान .. .. | १९६५ | ४८,२८७ | ४९,९९५ | ३५,२०२ | ३७,४८८ | + | |
| | | १,००० | १,०३५ | १,००० | १,०६५ | १,००० | ५९३ |
| | | १,००० | १,००० | ७२९ | ७५० | १.०० | ०.५९ |
| इस्राएल .. .. | १९६१ | १,१०६ | १,०७३ | ६५९ | ६५० | ६३७ | २४२ |
| | | १,००० | ९७० | १,००० | ९८६ | १,००० | ६८२ |
| | | १,००० | १,००० | ५९५ | ६०१ | ५७६ | २२५ |
| | | | | १,००० | १,००० | ९६६ | ३७३ |
| | | | | | | १.०० | ०.३९ |

+ संपूर्ण आकडे उपलब्ध नाहीत. म्हणून एक हजारी पुरुषांशी स्त्रियांचे प्रमाण दिले आहे.

## तक्ता ३५ (पुढे चालू)

(हजारी लोकसंख्या)

| देश | | वर्ष | एकूण | | संभाव्य श्रमिक | | प्रत्यक्ष श्रमिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| भारत | .. | .. १९६१ | २२४,३११ | २११,२०० | १३१,८०८ | १२३,६८५ | १२९,०१५ | ५९,४०१ |
| | | | १,००० | ९४१ | १,००० | ९३८ | १,००० | ४६४ |
| | | | १,००० | १,००० | ५८८ | ५८५ | ५७४ | २८१ |
| | | | | | १,००० | १,००० | ९७८ | ४८० |
| | | | | | | | १.०० | ०.४९φ |
| महाराष्ट्र | .. | .. १९६१ | २०,४२९ | १९,१२५ | १२,२५४ | ११,२६४ | ११,६६२ | ७,२८६ |
| | | | १,००० | ९३६ | १,००० | ९१९ | १,००० | ६२५ |
| | | | १,००० | १,००० | ६०० | ५८८ | ५७० | ३८१ |
| | | | | | १,००० | १,००० | ९५१ | ६४७ |
| | | | | | | | १.०० | ०.६८ |

*अद्यावत वर्षाचे आकडे एकूण लोकसंख्या स्त्रीपुरुष विभागणीनुसार उपलब्ध असले आणि ते पूर्वीच्या प्रकरणात दिलेले असले, तरी वरील तक्त्यात मागल्या वर्षाचे आकडे दिले आहेत, कारण अलिकडील श्रमिक लोकसंख्येचे आकडे उपलब्ध नाहीत.

φ १९७१ च्या खानेसुमारीनुसार हे प्रमाण अनुक्रमे ४६० व .४६ येत आहे !

आर्. च्या लोकसंख्येपेक्षा अडीच पटीने अधिक आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येपेक्षा एक कोटी तीस लक्षांनीच अधिक आहे. भारत जपानपेक्षा लोकसंख्येने पाचपट आहे. अशा तऱ्हेने जरी क्षेत्रफळाने नव्हे तरी संख्येने तक्त्यात दिलेल्या सहाही देशांपेक्षा भारत अधिक मोठा आहे. ह्या प्रचंड लोकसंख्येमध्ये तुलनात्मक दृष्टचा स्त्रियांची संख्या कमी आहे आणि महाराष्ट्रात तर ती आणखीच कमी आहे. इस्राएल ह्या नवोदित राष्ट्रास वगळल्यास बाकीच्या सर्व देशांत स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे. दुर्दैवाने इस्राएलपेक्षाही भारतातील स्त्रिया संख्येने कमी भरतात. भारतातच हे प्रमाण इतके प्रतिकूल का असावे ह्याची सविस्तर चर्चा पहिल्या प्रकरणात केली आहे.

ह्यानंतरची तुलना १४ वर्षांवरील स्त्रीपुरुषांची–संभाव्य श्रमिकांची–केली आहे. चौदा वर्षांखालील मुलामुलींनी अर्थार्जन करू नये अशी वहिवाट सर्वमान्य आहे. तरीसुद्धा महाराष्ट्रात[१४] २ टक्के आणि भारतात ३ टक्के चौदा वर्षांखालील मुलेमुली शहरांतून कामे करून पैसे मिळवितात असे खानेसुमारीत नमूद केले आहे.[१५] ह्यावरून आर्थिक गरजेकरिता मुलांच्या श्रमांचा गैरफायदा घेतला जातो असे दिसून येते. ही गोष्ट बाजूला ठेवल्यास संभाव्य श्रमिक गटात ज्या देशांमध्ये अधिक संख्या आहे ते देश अशी संख्या कमी असलेल्यांच्यापेक्षा अधिक संपन्न आहेत. स्वीडन, यू. के. व जपान ह्या तीन देशांत तीनचतुर्थांशापेक्षा थोडी अधिक संख्या असून त्यापेक्षा कमी परंतु निम्म्यापेक्षा बरीच अधिक यू. एस्. ए. आणि यू. एस्. एस्. आर्. मध्ये आहे. इस्राएल, महाराष्ट्र आणि भारत ह्या देशांची निम्म्यापेक्षा थोडी अधिक इतकीच संभाव्य श्रमिक लोकसंख्या आहे. ह्याच्याच जोडीला आयुर्मानाच्या अपेक्षेचाही विचार करावयास हवा (चौथ्या प्रकरणातील जीवनसंख्या विषयक प्रतिपादन पहा). भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान वाढत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. सरकारी व स्थानिक संस्थांचे प्रयत्न, व्हू ह्या जागतिक आरोग्यसंघटनेची मदत आणि रहाणीचे वाढते मान ह्या सर्वांमुळे आयुर्मान उंचावण्यास मदत झाली आहे. परंतु इतर देशांशी तुलना केल्यास ते बरेच कमी आहे. दुसरा विचारात घेण्यासारखा मुद्दा असा की दुसऱ्या देशांत स्त्रियांचे आयुर्मान पुरुषांपेक्षा अधिक असते पण भारतात त्याच्या उलट परिस्थिती आहे. आणि ज्या कारणांमुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी त्याच कारणांमुळे स्त्रियांचे सरासरी आयुर्मानही पुरुषांपेक्षा कमी असते.

तक्ता ३५ मधील पहिल्या दोन स्तंभातील आकडे यू. एन्. डेमोग्रॅफिक इयर बुक मधून घेतले आहेत. श्रमिक लोकसंख्येचे आकडे यू. एस्. एस्. आर्. खेरीज दुसऱ्या देशांतील वकिलातींकडून पाठविलेल्या माहितीवरून अगर त्यांच्याकडून आलेल्या वाङ्मयावरून काढले आहेत. तेव्हा यू. एस्. एस्. आर्. मध्ये विद्यार्थी वर्गा-खेरीज इतर सुदृढ लोक श्रमिक असतात असे येथे गृहीत धरून चाललो आहोत.

चौदा वर्षांवरील हरएक व्यक्ती अर्थार्जन करीत असेल हे तितकेसे संभवनीय वाटत नाही. अगदी अल्प प्रमाणात थोडे लोक शिक्षण घेत असतील. वार्धक्य, शारीरिक वा मानसिक अपंगता ह्यामुळे काहींना काम करता येत नसेल तर काहीजणांना काम न मिळाल्यामुळे बेकार रहावे लागत असेल. बहुजन वर्गाला उदरभरणासाठी काम करावेच लागते अगर समाजवादी तत्त्वाप्रमाणे, "प्रत्येकाने आपल्या सामर्थ्यानुसार" उत्पादन केलेच पाहिजे. आणि ह्याकरिता प्रत्येकाला त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक सामर्थ्यानुसार काम करण्याची व तेणेकरून राष्ट्रीय संपत्तीत भर घालण्याची संधी मिळवून देणे हे सरकारचे पहाणे आहे. व्यक्तीच्या दृष्टिकोनातूनही विचार केल्यास आपल्या जीवनाच्या योग्य समयी काम करण्याची अनुरूप संधी मिळाल्यास स्वकृतार्थता लाभत असते.

ह्यानंतर फक्त संभाव्य श्रमिक पुरुषांशी प्रत्यक्ष श्रमिक पुरुषांचेच प्रमाण काढल्यास यू. एस्. ए. व यू. के. येथे अंदाजे तीनचतुर्थांश, स्वीडनमध्ये अंदाजे चारपंचमांश आणि इस्राएल व भारतात नऊ दशांशापेक्षा अधिक असे प्रमाण येते. भारतात १५ व्या वर्षीच किंवा आधी लिहिल्याप्रमाणे त्याच्यापूर्वीही कामाला लागावे लागते. अगदी अल्पसंख्याक भारतीयांनाच शिक्षणाकरिता काही वर्षे घालविता येतात. लोकसंख्येच्या दुसऱ्या टोकाकडे लक्ष दिल्यास भारतामध्ये प्रमाणतः वृद्धांची संख्या कमी आहे कारण पुरुषांचे सरासरी अपेक्षित आयुर्मान, वाढीस लागले असले तरी सध्या ५३.२ आहे. ह्यावरून असे म्हणता येईल की संख्येने बऱ्याच लोकांनी कौमार्यावस्थेतच अर्थार्जन करण्यास सुरुवात करणे हे तितकेसे इष्ट नाही.

शिवाय, भारतासारख्या विकासेच्छु देशाला प्रशिक्षित लोकांची गरज किती आहे हे वर्ल्ड एकॉनॉमिक सर्व्हेने पुढील शब्दात दाखवून दिले आहे : "एकीकडून उत्पादनाचा उच्चांक गाठण्यासाठी श्रमजीवी वर्गाचा, विशेषतः प्रशिक्षित लोकांचा पुरवठा हे एक प्रमुख साधन असले तरी, मुख्यत्वे योजनांच्याच योगाने बेकारीचा किंवा थोड्या लोकांनाच काम मिळण्याचा प्रश्न नियोजनाच्या काळात कमी होईल."[१६]

सर्व लोकांना पुरेसे काम मिळण्याच्या समस्येचा विचार बाजूला ठेवून स्त्रीपुरुष श्रमिकांची तुलना केल्यास, श्रमिक महिलांची सर्वांत अधिक संख्या महाराष्ट्रात आहे. जर १००० पुरुष श्रमिक असल्यास स्त्रिया ६२५ आहेत. महाराष्ट्राच्या खालोखाल हे प्रमाण स्वीडन (६०६), जपान (५९३), यू. के. (५८७),[१७] यू. एस्. ए. (५१२), भारत (४६४), (४६०-१९७१), इस्राएल (३८२) असे आहे; ह्याचाच अर्थ असा की आठ स्त्रियांत तीन अर्थोत्पादन करीत नाहीत. किंवा दुसऱ्या शब्दांत, प्रत्येक श्रमिक पुरुषामागे महाराष्ट्रात ०.६८, स्वीडनमध्ये व जपानमध्ये अनुक्रमे ०.५९, ०.५४, यू.के.त व भारतात ०.४९, (४६-१९७०), यू. एस्. ए.मध्ये ०.४८ आणि इस्राएलमध्ये ०.३९ स्त्रीश्रमिकांचे प्रमाण पडते. मात्र एका पुरुषास पाचअष्टमांश स्त्रिया ह्यापेक्षा ते कुठेही जास्त नाही.

आर्थिक विनिमयाचे पैसा हे साधन होण्याइतपत समाज जोपर्यंत सुधारलेला

नव्हता तेव्हा पुरुषवर्ग उदरपोषणाकरिता भक्ष्य मिळविणे, शत्रूला तोंड देणे व स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे संरक्षण करणे हे काम करीत असे आणि स्त्रिया, पुरुषांनी आणलेले भक्ष्य शिजविणे व मुलांना वाढविणे ही कामे करीत असत. जसजशी सुधारणा होत गेली तसतशी स्त्री ही पुरुषाच्या उत्पादनकार्यात मदतनीस म्हणून काम करू लागली. अशी ही पूर्वीची श्रमविभागणी होती. पण स्वतंत्रपणे अर्थोत्पादन करणे, कुटुंबापासून दूर जाऊन काम करणे आणि आपण मिळविलेले वेतन स्वतःच्या मालकीचे म्हणून ठेवता येणे ही अलिकडील घटना आहे आणि त्याची सुरुवात औद्योगिक क्रांतीपासूनच झाली. स्त्रियांना अनुकूल असा हा काल वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. म्हणूनच आपणास वरील तक्त्यात द्रव्यार्जन करणाऱ्या पुरुषस्त्रियांचे प्रमाण ३ : २ असे आढळते.

निरनिराळ्या देशांतील सर्व क्षेत्रांत काम करणाऱ्या पुरुषस्त्रियांची सर्वसामान्य तुलना करून वरील प्रमाण निघू शकते. ह्याखेरीज व्यवसायानुसार आणखी वर्गीकरण केल्यास विशेष उपयुक्त ठरेल. परंतु येथे एक दीर्घ प्रश्नमालिका उभी रहाते: उदाहरणार्थ, काही विशिष्ट व्यवसाय स्त्रिया पसंत करतात का? किंवा स्त्री आणि पुरुष म्हणून पूर्वीप्रमाणे भिन्न श्रमविभागणी आहे का ? असे असल्यास अशी ही प्रवृत्ती काही देशांपुरतीच मर्यादित आहे का काही जणांचे ते वैशिष्टच आहे ? शिवाय, पगारी म्हणून जे व्यवसाय म्हटले जातात त्यांत समान कामाला समान वेतन अशी वस्तुस्थिती आहे काय ? वगैरे. कारण, प्रस्तुत पहाणीतील नमुना हा बहुतांशी पगारी व्यवसायी लोकांचा आहे.

अशीही तुलना करून त्यातून निष्कर्ष काढणे ही सर्वांत अवघड गोष्ट होती; कारण विविध देशांविषयी जी माहिती मागविली ती एकाच धर्तीची असावी अशी विनंती करूनसुद्धा तशी ती मिळाली नाही. त्यामुळे दोन ठळक प्रकारचे वर्गीकरण मात्र लेखिकेला करता आले: एक शारीरिक श्रमजीवी किंवा बौद्धिक श्रमजीवी आणि पगारी उलट मजुरी श्रमिक असे दोन भाग करण्यात आले. परंतु ह्यानंतर आणखी एक अडचण उपस्थित झाली. आधुनिक कालातील स्वयंचलित यंत्रसाधने चालविण्यास थोडीफार तरी बुद्धिमत्ता व शिक्षण अवश्य असते. अगदीच थोडी कामे केवळ शारीरिक श्रमांची असतात. शिवाय शहरसाफसफाई सारखी कामे करणारे पगारी नोकर असतात आणि त्यांना प्रशिक्षणाची जरुरी असते. पण प्रस्तुत पहाणी करताना मॅट्रिक अगर तत्सम शालान्त परीक्षा ही किमान शिक्षणाची मर्यादा असे गृहीत धरले आहे. तर तुलनेसाठी घेतलेल्या सहाही देशांत दुय्यम शिक्षण अगर त्यापेक्षाही जास्त शिक्षण सक्तीचे आहे. वर्गीकरण करताना आणि त्यातून तुलना करताना वरील अडचणी आल्या तरीसुद्धा तक्ता ३६ तयार करण्यात आला आहे.

तक्ता ३६ मध्ये द्रव्यार्जन करणाऱ्या सर्व लोकांचे अकरा प्रकारच्या व्यवसायांत वर्गीकरण केले आहे. पुरुषस्त्री श्रमिकांची फक्त टक्केवारी दिली आहे. खानेसुमारीच्या

सहा इतर देशांतील अकरा प्रकारच्या

| | वर्ष | प्रत्यक्ष श्रमिक संपूर्ण आंकडे | शेती व तत्सम | खाणी व शिकार | कला, उत्पादन क्रिया | विक्री |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | % | % | % | % |
| यू. एस्. ए. | पुरुष १९६० | ४,४१,८३,००० | १५.१ | ५.७ | १५.४ | १४.७ |
| | स्त्रिया | २,२६,४१,००० | ३.० | १.० | १९.० | ७.० |
| यू.एस्.एस्.आर्.* | पुरुष १९६६ | — | १०० | १०० | १०० | — |
| | स्त्रिया | — | ४० | ३९ | ३९ | — |
| यू. के. | पुरुष १९६० | १,५७,००,००० | ४.४५ | ४.० | २६.७५ | १५.० |
| | स्त्रिया | ८५,००,००० | १.१९ | उ | २५.० | ११.० |
| स्वीडन | पुरुष १९६५ | २३,८९,००० | १.२ | उ | १२.७ | — |
| | स्त्रिया | १४,४८,००० | ०.५ | उ | ०.८ | — |
| जपान | पुरुष १९५८ | २,५८,९३,६८६ | ३३.० | १.४ | २९.० | १०.७ |
| | स्त्रिया | १,५३,६८,२६५ | ५१.८ | १.२ | १६.२ | १९.८ |
| इस्राएल+ | पुरुष १९६५ | ६,३७,३०० | १३.० | ६.९ | २५.४ | — |
| | स्त्रिया | २,४१,९०० | | | | |
| भारत | पुरुष १९६१ | १२,९०,१५,६५३ | ५६.० | ३.१ | ५.५५ | — |
| | स्त्रिया | ५,९४,०१,७०९ | ७९.५ | २.० | १.५ | — |
| महाराष्ट्र | पुरुष १९६१ | १,१६,६२,२६४ | ६८.७५ | ३.२ | १०.० | — |
| | स्त्रिया | ७२,८६,२१७ | ८७.६५ | ०.३ | १.५ | — |

उ : उपेक्षणीय

* प्रमाण

व्यवसायानुसार श्रमिकांची टक्केवारी तुलना

| सेवा | वाहतूक दळणवळण | मॅनेजेरि-अल | तांत्रिक | कारकुनी व तत्सम | गृहोपयोगी | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| % | % | % | % | % | % | % |
| १६.२ | उ | १३.३ | १०.२ | ७.५ | उ | १.९ |
| १५.० | ४.० | ५.० | ३.९९ | ३१.० | उ | ११.०१ |
| — | १०० | १०० | १०० | १०० | — | — |
| — | ३३ | २५ | ६३ | २५ | — | — |
| २.५ | ७.८ | २.५ | उ | २०.५ | उ | १६.५ |
| — | उ | १.२ | ७.६४ | २.७५ | २.९५ | ४९.२७ |
| — | — | ३.० | ५०.२ | ३२.९ | — | — |
| — | — | ०.५ | ८.४ | ८९.८ | — | — |
| ४.२ | ३.४ | ३.३ | ५.६ | ९.४ | — | — |
| ९.४ | ०.२ | ०.२ | ३.९ | ७.५ | — | — |
| — | १२.३ | — | २२.६ | ७.३ | — | १२.५ |
| — | ३.४ | १.४ | १.९८ | ५.३ | ५.७ | ११.६५ |
| — | ०.८१ | ०.०८ | ०.८२ | १.० | ७.८५ | ७.३४ |
| — | २.५ | १.८३ | ३.८५ | ६.६४ | २.० | १०.२३ |
| — | ०.२ | ०.२ | १.५५ | ३.०० | १.४ | ४.२ |

+ पुरुष व स्त्रिया मिळून

अहवालाप्रमाणे : "कोणत्याही आर्थिक कार्यक्षेत्रात स्वतःला गुंतवून घेऊन श्रमिक जे कार्य करतो तो त्याचा व्यवसाय आणि उद्योगधंदा होय. श्रमिक आपला 'व्यवसाय' एका 'उद्योगात' करीत असतो."[१८] व्यवसायाची हीच व्याख्या येथे घेतली आहे. ह्याही तक्त्यात ३५ व्या तक्यातील देश त्याच अनुक्रमाने घेतले आहेत. यू. एस्. एस्. आर्. खेरीज इतर देशांतल्या प्रत्यक्ष श्रमिकांची पूर्ण संख्या दिली आहे. यू. एस्. एस्. आर्. मध्ये निरनिराळ्या क्षेत्रांत किती लोक काम करतात हे अज्ञात आहे. त्यामुळे टक्केवारी देता आली नाही तर शंभर पुरुष काम करीत असले तर किती स्त्रिया काम करतात हे प्रमाण देण्यात आले आहे. जी माहिती उपलब्ध झाली त्यावरून हे प्रमाण काढले.[१९] ह्या देशात एक हजारी पुरुषांस १,२९० असे स्त्रियांच्या लोकसंख्येचे प्रमाण पडते आणि सोव्हिएट स्त्री "साम्यवाद प्रस्थापित करणारी समान कार्यकर्ती आहे"[२०] अशी वल्गना केली जाते, तरीसुद्धा अकरांपैकी कोणत्याही उद्योगक्षेत्रात श्रमिक स्त्रिया संख्येने पुरुषांची बरोबरी करीत नाहीत. उदाहरणार्थ, धंदे आणि तांत्रिक कामे–विशेष कौशल्याचे उद्योग–स्त्रियांचे प्रमाण शंभर पुरुषांस ६३ इतकेच पडते. उलटपक्षी, मॅनेजरच्या व कारकुनीच्या व्यवसायांत त्या पुरुषांच्या एकचतुर्थांशच आहेत. शेती व खाणी आणि कला वगैरेमध्ये अनुक्रमे ४० व ३९ हे शंभरामागे प्रमाण येते. ह्या कामाला बुद्धीच्या बळापेक्षा शारीरिक बळ अधिक लागते.

नवोदित इस्राएल राष्ट्र श्रमिक म्हणून स्त्रीपुरुषात कोणताही भेद करीत नाही असे लेखिकेला सांगण्यात आले.[२१] त्यामुळे स्त्रीपुरुष श्रमिकांची तुलना करिता आली नाही. इतकेच म्हणता येईल की एकंदरीत प्रमाण २१ पुरुषांस ८ स्त्रिया असे पडते. तरीसुद्धा प्रस्तुत पहाणीच्या अनुषंगाने महत्त्वाच्या व्यवसायांची अशी तुलना पुढील तक्त्यात–तक्ता ३७ मध्ये–दिली आहे.

भारत–आणि भारताचा अविभाज्य घटक असा महाराष्ट्र–मुख्यत्वे शेतीप्रधान देश आहे. भारतात ६५ टक्के व महाराष्ट्रात ६९ टक्के पुरुष शेती हा व्यवसाय करितात. पुरुषांपेक्षा संख्येने अधिक स्त्रिया–भारतात ८० टक्के व महाराष्ट्रात ८८ टक्के–शेती हा आपला व्यवसाय आहे असे नमूद करितात. जपानमध्ये हाच व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया ५२ टक्के तर पुरुष ३३ टक्के. त्यात विशेष हे की अखिल लोकसंख्येत स्त्रिया कमी आहेत तेव्हा ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर भारतीय शेती करणाऱ्या स्त्रीश्रमिकांची संख्या वरील प्रमाणावरून अधिक भरेल. यू. एस्. ए., यू. के. व स्वीडनमध्ये उलट परिस्थिती आहे. ह्याच व्यवसायात यू. एस्. ए. मध्ये १५.१ टक्के पुरुष तर ३ टक्के स्त्रिया, यू. के. मध्ये ४.४५ टक्के पुरुष तर १.१९ टक्के स्त्रिया आणि स्वीडनमध्ये १.२ टक्के पुरुष व ०.५ टक्के स्त्रिया काम करतात. खाणीत व शिकारी व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण फार अल्प आहे. यू. एस्. ए. मध्ये ५.७ टक्के पुरुष व १ टक्के स्त्रिया, यू. के. मध्ये ४.० टक्के पुरुष व स्त्रिया नाहीतच म्हटले तरी चालेल, जपानात १.४ व १.२ टक्के, अखिल भारतात ३.१ व २ टक्के आणि

महाराष्ट्रात ३.२ व ०.३ टक्के. स्वीडनमध्ये ही संख्या उपेक्षणीय आहे.

ह्यापुढील वर्गीकरण कला व उत्पादनक्रिया अशा प्रकारचे आहे. जपानमध्ये २९ टक्के पुरुष व १६.२ टक्के स्त्रिया, यू. के.त २६.७५ टक्के (पु.) व २५ टक्के (स्त्रिया), यू. एस्. ए.त १५.४ टक्के (पु.) आणि १९ टक्के (स्त्रिया), स्वीडन १२.७ टक्के (पु.) व ०.८ टक्के (स्त्रिया), महाराष्ट्रात १०.० टक्के (पु.) व १.५ टक्के (स्त्रिया), भारतात ५.५ टक्के (पु.) व १.५ टक्के स्त्रिया हा व्यवसाय करतात. पहिले तीन देश हे प्रामुख्याने उद्योगप्रधान देश आहेत हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे पुरुषस्त्री श्रमिकांचे ह्या व्यवसायातले प्रमाण पहिल्या दोन देशांत जवळजवळ सम आहे तर जपानमध्ये तीनपंचमांश, महाराष्ट्रात एकषष्ठांश व एकसप्तमांशच्या दरम्यान आणि अखिल भारतात तीनअकरांश असे आहे.

विक्रेते श्रमिक हे ह्यानंतरचे वर्गीकरण. ज्या समाजात खाजगी उत्पादनास परवानगी आहे तेथे विक्रेत्याचा व्यवसाय फार महत्त्वाचा समजला जातो. ग्राहकांना कसे ओढून घ्यावे ही एक कलाच आहे. त्याच बरोबर ग्राहकांना पसंत पडेल असा माल तयार करणे व तो लक्षवेधी पद्धतीने बांधणे हीपण एक कला आहे. ही कलात्मक बाजू जपानने लक्षात घेऊन स्त्रियांना तो एक गृहोद्योग म्हणून उपलब्ध करून दिला आहे. "निर्माते व दलाल वर्ग वस्तू तयार करणे, त्यांचा अनुक्रम लावणे व दुरुस्त करणे अशा स्वरूपाची कामे स्त्रियांच्या काही गटांना घरी करण्याकरिता देतात आणि तेणेकरून मिळणाऱ्या मोबदल्याची कुटुंबाच्या उत्पन्नात फार महत्त्वाची भर पडते . . . सध्या अशा गृहश्रमिकांची संख्या १५,००,००० पेक्षा जास्त असून कपडा, वैयक्तिक उपयोगाच्या वस्तू, किरकोळ जिनसा, खेळणी, लेखनसाहित्य वगैरे ७०० प्रकारचे जिन्नस त्या तयार करतात. जवळजवळ जीवनावश्यक सर्व वस्तू त्यांच्या हातांतून जातात असे म्हणता येईल."[२२] ह्या सर्व स्त्रीश्रमिकांना ह्याच सदरात घातले आहे. ह्या जपानी भगिनींच्यापासून आमच्या महिला काही योग्य बोध घेतील काय? तेथे १०.८ स्त्रिया व १०.७ पुरुष अशा प्रकारचे काम करीत आहेत. यू. के. मध्ये १५ टक्के पुरुष व ११.० टक्के स्त्रिया, यू. एस्. ए. मध्ये १४.७ टक्के (पु.), ७ टक्के (स्त्रिया) असा अनुक्रम लागतो. आमच्या देशासहित इतर देशांनी "इतर" ह्या सदराखाली त्यांची नोंद केली आहे अगर कदाचित त्यांना जमेस धरलेही नसावे.

"सेवा" ह्या शब्दाचा उपयोग शारीरिक नि तांत्रिक पगारी नोकरी ह्या अर्थाने केला आहे. यू. एस्. ए. मध्ये १६.२ टक्के पुरुष आणि १५ टक्के स्त्रिया असे काम करतात. यू. के. मध्ये फक्त २.५ टक्के पुरुष आहेत. जपानमध्ये ४.२ टक्के (पु.) व ९.४ टक्के (स्त्रिया). वाढपी व आया ह्याच सदराखाली येतात. भारताने हे अगर वरील प्रकारचे वर्गीकरण केले नाही.

"वाहतूक व दळणवळण" ह्या मथळ्याखाली जे कोणी तशा प्रकारचे काम करतात ते सर्व येतात. ह्या कामाला शारीरिक बलाची जास्त जरुरी असल्यामुळे

यू. के., जपान आणि महाराष्ट्रासहित भारत ह्या देशांत मुख्यत्वे पुरुषच कामाला असतात. यू. एस्. ए.ने असे काम करणाऱ्यांना "व्यावसायिक व तांत्रिक" ह्या वर्गात टाकले आहे. टेलिफोन/टेलिग्राफ चालक अशा फक्त ४ टक्केच स्त्रिया यू. एस्. ए. मध्ये काम करतात म्हणून त्यांची नोंद ह्या सदरात झाली आहे. भारत व महाराष्ट्रानेही हेच वर्गीकरण मान्य केले असून अनुक्रमे ०.८१ टक्के व ०.२ टक्के स्त्रिया ह्या वर्गात मोडतात.

प्रत्येक उद्योगधंद्यात एक मॅनेजर किंवा मॅनेजेरिअल नोकरवर्ग असतो. "अ" वर्गात मोडणाऱ्या बँकांत हजारोंनी काम करणारा नोकरवर्ग तो तहहयात लहानसे दुकान चालविणारा दुकानदार "मॅनेजेरिअल" सदराखाली गणले जातात. मोठमोठ्या उद्योगधंद्यांच्या मॅनेजरच्या जागी असणाऱ्यांना केवळ वरच्या दर्जाची बुद्धिमत्ता लागते इतकेच नव्हे तर उद्योगधंदा यशस्वी होण्यास त्याला सर्वस्वी वाहून घ्यावे लागते. म्हणूनच ह्या सदरात स्त्रियांची संख्या कमी आढळते कारण त्यांचे लक्ष घर, मुले व काम ह्यांत विभागले जाते. तरीसुद्धा यू. एस. ए. मध्ये १३.३ टक्के (पु.) व ५ टक्के (स्त्रिया) आढळतात. दुसरा क्रमांक जपानचा, ३.३ टक्के (पु.) व ०.५ टक्के (स्त्रिया); नंतर स्वीडन, ३.० टक्के (पु.) व ०.५ टक्के (स्त्रिया); यू. के., २.५ टक्के (पु.) व १.२ टक्के (स्त्रिया); भारत, १.४ टक्के (पु.) व ०.०८ टक्के (स्त्रिया); आणि शेवटी महाराष्ट्र, १.८ टक्के (पु.) व ०.२ टक्के (स्त्रिया).

उद्योगधंद्यात व तांत्रिक काम करणाऱ्यांत सर्वात अधिक संख्या ५०.२ टक्के (पु.) व ८.४ टक्के (स्त्रिया) स्वीडनमध्ये आढळून येते. ह्याचे कारण त्या देशाने विक्रेते, सेवक आणि वाहतूक, दळणवळण असे सर्व श्रमिक एकाच सदराखाली घातले आहेत. यू. एस्. ए. मध्ये १०.२ टक्के (पु.) व ३.९९ टक्के (स्त्रिया); यू. के.त ७.६ टक्के (स्त्रिया)[२३]; जपानात ५.६ टक्के (पु.) व ३.९ टक्के (स्त्रिया); भारतात १.९ टक्के (पु.) व ०.८२ टक्के (स्त्रिया); आणि शेवटी महाराष्ट्रात ३.८५ टक्के (पु.) व १.५५ टक्के (स्त्रिया) असे प्रमाण पडते.

"व्हाइट कॉलर" किंवा "ब्लॅक कोटेड" ह्या टोपण नावाने कारकून अगर तत्सम श्रमिक ओळखले जातात. स्वीडन व यू. एस्. ए. मध्ये कारकून व लघुटंकलेखक म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. ह्याच्या उलट भारत व महाराष्ट्र आणि इतर देश येथील परिस्थिती आहे. स्वीडनमध्ये ३२.९ टक्के (पु.) व ८९.८ टक्के (स्त्रिया); यू. एस्. ए. मध्ये ७.५ टक्के (पु.) व ३१ टक्के (स्त्रिया); यू. के., २०.५ टक्के (पु.) व २.७५ टक्के (स्त्रिया); जपान, ९.४ टक्के (पु.) व ७.५ टक्के (स्त्रिया); महाराष्ट्र, ६.६४ टक्के (पु.) व ३.० टक्के (स्त्रिया); आणि भारत, ५.३ टक्के (पु.) व १.० टक्के (स्त्रिया). अशा प्रकारच्या कामात महाराष्ट्रातील स्त्री व पुरुष ह्या उभयतांची संख्या भारतापेक्षा अधिक आहे.

यू. के. आणि महाराष्ट्रासहित भारत ह्या देशांना आपल्याकडे घरकामाचे नोकर

मिळतात म्हणून अभिमानाने सांगता येईल ! यू. एस्. ए. मध्ये विशेषतः गृहिणी व श्रमिक स्त्रियांच्या मदतीला निरनिराळी यांत्रिक उपकरणे असल्यामुळे घरकामाच्या नोकरांची गरज बरीचशी भागविता येते. ह्याच्या उलट भारतात अशा नोकरांची जागा स्त्रियाच बहुतांशी भरून काढतात आणि सर्वांत अधिक संख्या अखिल भारतात आहे ती येणेप्रमाणे ५.७ टक्के (पु.) व ७.८५ टक्के (स्त्रिया); महाराष्ट्र, २.० टक्के (पु.) व १.४ टक्के (स्त्रिया); आणि यू.के. २.९५ टक्के फक्त स्त्रियाच आहेत कारण घरकामाचे नोकर म्हणून पुरुषांची संख्या उपेक्षणीय आहे.

दुसरे विविध प्रकारचे व्यवसाय "इतर" ह्या सदराखाली घातले आहेत. त्यांचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही. तुलना करणेही चुकीचे ठरेल कारण गटवारी भिन्न आहे.

अशा तऱ्हेने वरील तक्त्यानुसार पुरुषस्त्री श्रमिकांचे सर्वसामान्य वर्गीकरण करून त्यांची तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या नंतर अशीच तुलना, परंतु प्रस्तुत पहाणीतील स्त्रियांचे जे व्यवसाय आहेत त्यांच्या अनुषंगाने केली आहे. स्त्रीश्रमिकांचे संपूर्ण आकडे देऊन त्या त्या व्यवसायात पुरुष श्रमिकांशी स्त्रीश्रमिकांची टक्केवारी दिली आहे. तसेच प्रत्येक व्यवसायांत स्त्रियांची टक्केवारी किती आहे तेही नमूद केले आहे. परिचारिका व टेलिफोन चालक ह्या व्यवसायांत मुख्यत्वे स्त्रियांचाच भरणा इतर देशांत दिसून येतो. महाराष्ट्रातही तीच परिस्थिती आहे व प्रस्तुत पहाणीतही तेच आढळून आले पण अखिल भारतात तशीच वस्तुस्थिती सापडत नाही. तक्ता ३७ वरून हे दिसून येईल.

पुढील तक्त्यातील माहिती खरोखरच अपूर्ण आहे. उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचा संपूर्ण उपयोग करून पहाणीच्या अनुषंगाने हा तक्ता तयार केला. ज्या व्यवसायात शारीरिक बलाची[२४] आवश्यकता असते ते व्यवसाय पुरुषच संभाळतात व एकंदरीने श्रमिकांच्या एकतृतियांश संख्येने स्त्रिया काम करतात असे सर्वसामान्य विधान करता येईल परंतु ह्याला जपान व भारत हे दोन अपवाद आहेत. (तक्ता ३६).

तथाकथित बौद्धिक अगर पगारी व्यवसायांपैकी काही क्षेत्रे संपूर्णपणे स्त्रियांनी काबीज केलेली दिसतात. उदाहरणार्थ, परिचारिका, टेलिफोन चालक; किंवा संख्येने निम्म्या–शिक्षकपेशा–अथवा कारकुनी व तत्सम क्षेत्र, शिक्षण व त्याच्या अनुषंगाने असलेली खाती येथे स्त्रियांचे प्रमाण एकचतुर्थांश इतके पडते. ह्यापुढे प्रत्येक व्यवसायाचा तपशीलवार अभ्यास केला जाईल.

शासकीय सेवावर्गाचे दोन भाग केले आहेत: अधिकारीवर्ग आणि कारकून व तत्सम. भारतामध्ये गॅझेटेड् सरकारी नोकर, पोलीस सब-इन्स्पेक्टरस्, निमसरकारी, जवळजवळ सरकारी अधिकारी, आणि बँका व इतर व्यापारी आणि औद्योगिक संस्थांतील त्याच दर्जाचे अधिकारी हे सर्व पहिल्या विभागात येतात. काही सरकारी

नमुन्याच्या अनुषंगाने व्यवसायानुसार

| | | शासकीय | | शिक्षकविषयक | |
|---|---|---|---|---|---|
| देश | तपशील | अधिकारी | कारकुनी व तत्सम | एकूण | प्राथमिक |
| यू. एस्. ए. | १. स्त्री एकूण संख्या | ११,४८,००० | ४७,०८,०१३ | १२,५८,००० | ८,६०,४१३ |
| | २. स्त्री व्यवसायाची% | उ.ना. | ८४% | – | ८६% |
| | ३. पु.: स्त्री% | उ.ना. | ५२५% | – | ६१४% |
| यू. एस्. एस्.आर्. | | | | | |
| | | २०% | २०% | ४१.१८% | उ.ना. |
| | | २५% | २५% | ७०% | |
| यू. के. | .. | २,३३,००० | | ३,६०,००० | उ.ना. |
| | | २% | २८.५% | ५५% | ८०% |
| | | २.०४% | ४०% | १२२% | ४००% |
| स्वीडन | .. | ७,२४० | २,७८,३४० | १,८५,००० | |
| | | १०% | १२.५% | ४५% | उ.ना. |
| | | ११.११% | ७५% | ८२% | |
| जपान | .. | ३०,७३६ | १,५२,६२० | २,६४,२०० | |
| | | ५.७% | ३३% | उ.ना. | उ.ना. |
| | | ३.९५% | ५०% | | |
| इस्राएल | .. | | ६५,७५० | ३९,७८१ | २३,४२३ |
| | | | ४०% | | |
| | | | ६३% | उ.ना. | |
| भारत | .. | २८,५३० | १७,४७४ | ३,१७,००७ | २,४५,७८४ |
| | | १.९३२% | ३.३७३% | २०.०% | १९.९८५% |
| | | १.९७०% | ३.४९०% | २५.०% | २४.८७५% |
| महाराष्ट्र | .. | ५,६४२ | २६,९९८ | २६,७९१ | १४,७५३ |
| | | २.५४% | २२% | ३६.२८% | ६७% |
| | | २.६१% | २८.२% | ५७% | २०३.२५% |
| नमुना | .. | ४४ | ६२९+८ | ४२४ | १५९ |
| | | २.०७% | ५.६८% | ५२.५२% | – |
| | | २.७०% | ६.००% | ११०.६% | – |

उ.ना. — उपलब्ध नाहीत

निरनिराळ्या देशांतील स्त्रीश्रमिकांची तुलना

| शिक्षकविषयक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुय्यम | उच्च | मेडिसिन | परिचारिकांसंबंधी | दूरध्वनी चालक | इतर |
| २,४३,४५२ | १,५४,१३५ | ७,७६,००० | ७६,४९९ | ३,४१,७९७ | – |
| ४७% | उ.ना. | उ.ना. | ९८% | ९६% | – |
| ८८.६८% | उ.ना. | उ.ना. | ४९००% | २४००% | – |
| उ.ना. | ३७.११% | ४२.५३% | उ.ना. | उ.ना. | |
| | ५९% | ७४% | उ.ना. | उ.ना. | |
| उ.ना. | उ.ना. | १७,००० | २,८४,००० | उ.ना. | |
| | | २५% | ९८% | | |
| | | ३३% | ४९००% | उ.ना. | |
| उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १,३५,५९७ | १४,१७९ | |
| | | | ९६% | ९७.२% | |
| | | | २४००% | ३४७५% | |
| उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ३,४५,००० | ३,२३,००० | |
| | | | उ.ना. | उ.ना. | |
| १४,९५८ | २,४०० | १,४०५ | ८,८३० | १,२४० | |
| | | २२% | ८०% | ५६% | |
| | | ३५% | ४२५% | १३५% | – |
| ६२,४४१ | ८,७८२ | १३,२९४ | १,१९,५४८ | ५,३८८ | – |
| २२.६८६% | १४.२२२% | ५.४८७% | ७०.७३२% | १९.९३% | – |
| २९.३४०% | १६.५८०% | ५.८००% | २४१.६७०% | २५.००% | – |
| १०,१७२ | १,८६६ | २,००० | १०,३३८ | १,७८७ | |
| ३१.३५% | २२.५६% | २०% | ९६% | ९५% | |
| ४५.६०% | २९% | २५% | २४००% | १९००% | |
| १५४ | १११ | १०४ | १४२ | ९६ | ८७ |
| – | – | १५.३५% | ९८.५% | ९४.५% | |
| – | – | १८.१३% | ६५७% | १७१८% | |

**तक्ता**

नमुन्याच्या अनुषंगाने व्यवसायानुसार

| देश | ग्रंथपाल | शिक्षण आणि तत्सम | वृत्तपत्र व्यवसाय | समाज सेवा | उद्योग धंदा | टेक्नॉलॉजी | कायदे विषयक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| यू. एस्. ए. | – | – | – | – | – | – | – |
| यू. एस्. एस्. आर्. | – | – | ४,०६० | – | – | – | – |
| यू. के. | ३२५७० | – | १,६५० | – | – | – | ७९७ |
| स्वीडन | – | – | | – | – | – | |
| जपान | – | – | | – | – | – | |
| इस्राएल | – | – | | – | – | – | |
| भारत | ८८६ | – | ३२२ | ६,७५२ | – | – | ६५४ |
| | ७.७२% | – | ३.०१% | २२.३८३% | | | ०.८२% |
| | ८.३७% | – | ३.११% | २८.८४% | | | ०.८२४% |
| महाराष्ट्र | | – | | १,२३६ | – | – | १२६ |
| | | | | २३.६४% | | | १.७% |
| | | | | ३१.०% | | | १.७% |
| नमुना | २० | १८ | १० | १० | ७ | १ | ६ |

निरनिराळ्या देशांतील स्त्रीश्रमिकांची तुलना

| आर्किटेक्चर | नटी | इंजिनिअरिंग | लेखिका | गवई व कवी | जाहिराती व आकाशवाणी वरून | कलाकार |
|---|---|---|---|---|---|---|
| – | – | – | – | – | – | – |
| ५००० | – | – | ७,००० | २०० | – | – |
| | | ३३% | | | | |
| – | – | १४९ | – | – | ७२८० | – |
| | | | | | | २१,२०० |
| ५३ | उ.ना. | २४५ | ३६३ | – | – | |
| १.९८५% | उ.ना. | ०.२४% | ७.१०५% | | | |
| २.०००% | उ.ना. | ०.२४५% | ६.६५% | | | |
| ३४ | | २९ | – | – | – | २,६८३ |
| ०.६७% | | ०.२२% | | | | १०.५% |
| ०.६८% | | ०.२२% | | | | ११.७% |
| ४ | ४ | ७ | | | | |
| | १८.५% | | | | | |
| | २२.६% | | | | | |

नोकऱ्यांमध्ये जे आधी लागलेले ते वर चढत जातात परंतु विशिष्ट मर्यादेपर्यंतच. उदाहरणार्थ, राज्य सरकारच्या नोकरीमध्ये 'असिस्टंट' म्हणून सुरुवात केल्यास तो 'डेप्युटी-सेक्रेटरी'पर्यंत जाऊ शकतो पण सेक्रेटरी होऊ शकत नाही. ही जागा आय्.ए.एस्. ही परीक्षा ज्यांनी दिली आहे त्यांना गुणानुक्रमे दिली जाते.

यू. एस्. ए. मध्ये अकरा लक्ष अठ्ठेचाळीस हजार स्त्रिया 'अधिकारी' ह्या सदराखाली येतात. तर यू. एस्. एस्. आर्. मध्ये हे प्रमाण २० टक्के किंवा दुसऱ्या शब्दांत १०० पुरुष अधिकारी असल्यास २५ अधिकारी स्त्रिया आहेत; स्वीडनमध्ये व्यवसायाच्या १० टक्के व पुरुषांच्या ११ टक्के आहेत; जपानमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ५.७ टक्के व ३.९५ टक्के. भारताच्या खानेसुमारीप्रमाणे अखिल भारतात १.९३ टक्के व १.९७ टक्के, आणि महाराष्ट्रात २.५ टक्के व २.६ टक्के आहे. प्रस्तुत नमुन्यानुसार संख्येने ४४ आणि प्रमाणत: २.०७ व २.७ अशा स्त्री अधिकाऱ्यांची माहिती मिळाली.

वरील प्रकारची तुलना केल्यावर अधिकारी वर्गातील स्त्रियांची संख्या तसेच कारकुनी करणाऱ्या स्त्रियांची संख्या भारतात सर्वांत कमी आहे. महाराष्ट्राविषयी लिहावयाचे तर कारकुनी व्यवसायात त्यांचे प्रमाण एकपंशमांश आहे.

समाजवादी देशांत जबाबदारीच्या जागांवर स्त्रियांची संख्या बरीच आहे. त्यावरून स्त्रियांची कर्तृत्वशक्ती दिसून येते. यू. के., जपान व भारत ह्या लोकशाही देशांत वरच्या हुद्यांवर काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे. ह्या दोन गटांतल्या देशांच्या समाजरचनेत मूलत: फरक असल्यामुळे अशी वस्तुस्थिती निर्माण होते, हे कारण पुढे करण्याचा उघड मोह सहज कोणालाही होईल. समाजवादी देशांत स्त्रीपुरुष भेद व्यवहारातही दिसत नाही उलट स्त्रियांना अधिक संधी असते. उलटपक्षी दुसऱ्या गटातल्या देशांतील स्त्रियांना पुढे येण्यास विरोध आहे आणि त्या स्वत: अगर पुरुषवर्गसुद्धा त्यांना पुढे येऊ देत नाही, ह्या विधानात थोडेफार सत्य आहे. हे सत्य मान्य करूनही लेखिकेला त्याचे स्पष्टीकरण निराळ्या रीतीने देता येईल. उच्च दर्जाचे शासकीय काम आणि उद्योगधंद्यात यश संपादन करण्यास तसेच संशोधन कार्यास अगर शास्त्रज्ञ म्हणून काम करण्यास स्वत:ला जवळजवळ सर्वस्वी वाहून घ्यावे लागते. शिवाय अनेक ओळखीपाळखी, द्रुतगतीने निर्णय घेण्याचे सामर्थ्य तसेच विस्तृत व विविध प्रकारच्या माहितीची पण आवश्यकता असते. स्त्रीला निसर्गाने आणि रूढीने घराला बांधून टाकले असल्यामुळे स्वाभाविकपणे तिचे लक्ष घर आणि बाहेरील काम ह्यांत विभागले जाते. म्हणून ती उच्च दर्जाची कामे बहुसंख्येने पार पाडू शकत नाही !

शासकीय विभागातील दुसऱ्या पोटगटामध्ये यू. एस्. ए.त मुख्यत्वे स्त्रियाच आढळतात. व्यवसायात स्त्रियांचे प्रमाण ८४ टक्के व पुरुषांशी त्याच व्यवसायात स्त्रियांचे प्रमाण ५२५ टक्के, यू. एस्. एस्. आर्. मध्ये अनुक्रमे २० व २५ टक्के—

"अधिकारी" वर्गाइतकेच–, यू. के.त २८.५ टक्के आणि ४० टक्के; स्वीडनमध्ये १२.५ टक्के व ७५ टक्के; जपान ३३ टक्के आणि ५० टक्के; भारतात ३.३७ टक्के व ३.४९ टक्के; महाराष्ट्रात २२ टक्के आणि २८ टक्के; आणि नमुन्यामध्ये ५.६ टक्के व ६ टक्के असे हे कारकुनी व तत्सम स्त्रीश्रमिकांचे प्रमाण पडते. खानेसुमारीचे आकडे आणि येथे घेतलेल्या नमुन्याचे आकडे ह्यांत फरक आहे असे दिसते. खानेसुमारीच्या आकड्यांची टक्केवारी बरीच आहे ह्याचे कारण त्यांनी ग्रामीण कचेऱ्यांतील श्रमिकांनासुद्धा समाविष्ट केले असावे. शिवाय एकूण स्त्रीश्रमिकांचे प्रमाण सर्वांत अधिक महाराष्ट्रातच आहे ! (तक्ता ३५ पहा.)

स्त्रिया ह्या उत्तम शिक्षिका, विशेषतः पूर्व-प्राथमिक व प्राथमिक क्षेत्रात, असे गृहीत धरले जाते. स्त्रियांमध्ये मातृत्वाची सहजप्रवृत्ती असल्यामुळे बालकांना त्या मार्दवतेने व कार्यक्षमतेने हाताळू शकतात. म्हणूनच की काय यू. एस्. ए. मध्ये ८६ टक्के, यू. के. मध्ये ८० टक्के व महाराष्ट्रात ६७ टक्के प्राथमिक शिक्षिका आहेत. नमुन्यासंबंधी ह्या पातळीवरील स्त्रीशिक्षकांची टक्केवारी देता येत नाही. कारण जी शिक्षकांची माहिती मिळाली त्यात प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षक अशी वर्गवारी न करता तिहींचे मिळून एकत्रित आकडे मिळाले आहेत.

प्राथमिक स्त्रीशिक्षकांबद्दल वर जे गृहीत धरले आहे ते वास्तव परिस्थितीत ही पहाणी करताना तितकेसे प्रत्ययास आले नाही. स्वतः लेखिकेस आणि माहिती गोळा करणाऱ्या स्त्रियांनाही असे दिसून आले की फार मोठ्या संख्येच्या मुलांच्या वर्गांवर एक तरुण शिक्षिका असते. साधारणपणे वयाच्या १७ व्या वर्षी शालान्त परीक्षा देऊन प्राथमिक शिक्षिकेचा एका वर्षाचा अभ्यासक्रम पुरा केल्यावर तिची शिक्षिका म्हणून नेमणूक होते. इतक्या पूर्ववयात तिच्यातील मातृत्वाची सहजप्रवृत्ती जागृत झालेली नसते. त्यात ह्या परकीय वातावरणाची भर. शिवाय शाळेचे वातावरण तितकेसे अनुकूल नसते. शाळेत पुरेसा उजेड व हवा नसते. मुले लहान व पुष्कळ, त्यामुळे त्यांना गप्प करण्यास कठीण. सर्वांत ताण म्हणजे अभ्यासक्रम विविध व खच्चून भरलेला. सोलापुरास जेव्हा लेखिकेने एका प्राथमिक शाळेस भेट दिली तेव्हा तेथे शिक्षिकांसाठी अगर विद्यार्थ्यांसाठी संडास मुतीची काहीच व्यवस्था नव्हती ! अशा परिस्थितीत स्त्रीमधील सुप्त मातृत्वाची भावना उदय पावणे कठीण व जागृत झाल्यास टिकणेही कठीण. योग्य शालागृहे, पुरेसे शिक्षक आणि समतोल अभ्यासक्रम ह्यांची व्यवस्था तातडीने स्थानिक अधिकाऱ्यांनी करावयास पाहिजे.

दुय्यम शिक्षकांच्या बाबतीत प्राथमिक स्त्रीशिक्षकांच्यापेक्षा एकूण दुय्यम स्त्रीशिक्षिकांची टक्केवारी बरीच कमी आहे–यू. एस्. ए. ४७ टक्के, भारत २२.६ टक्के आणि महाराष्ट्र ३१.३५ टक्के. असे दिसते की फक्त एकतृतियांशच स्त्रीशिक्षिका आहेत. एका स्त्रीनिरीक्षणाधिकारी–इन्स्पेक्ट्रेस–बरोबर स्त्रीशिक्षिकांच्या कार्यक्षमतेचा मुद्दा चर्चित असताना त्या म्हणाल्या, "स्त्रीशिक्षिका ह्या पुरुषशिक्षकांपेक्षा अधिक

प्रामाणिकपणे काम करतात. शिक्षक हे अलिकडेस शिकवण्यांच्या मागे असतात. शिकवण्यांचे उत्पन्न हे त्यांच्या पगारापेक्षा अधिक असते. त्यामुळे शाळेतील कामाविषयी तितकेसे ते दक्ष नसतात. स्त्रीशिक्षिकेला शिकवणी पत्करणे जमत नाही कारण तिला गृहकृत्ये करावयाची असतात." थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आदर्श शिक्षक–स्त्री वा पुरुष–ही गतकाळातील घटना आहे. शिक्षकाच्या पेशाला आज व्यापारी स्वरूप आले आहे.

कोणत्याही विषयाचा उच्च शिक्षक होण्याकरिता खास पात्रता लागत असते. ते क्षेत्र अजूनही मुख्यत: पुरुषांच्याच हातात आहे. यू. एस्. एस्. आर्. मध्ये ३७.११ टक्के, भारतात १४.२२ टक्के आणि महाराष्ट्रात २२.३६ टक्के स्त्रिया प्राध्यापिका आहेत. प्राध्यापकांना आपल्या विषयाचे अद्यावत ज्ञान तर हवेच असते परंतु त्यांनी आपल्या विषयात काही नवीन मौलिक भर टाकावी अशी अपेक्षा असते. त्यांचा पेशा हा पूर्ण अर्थाने जीवनपेशा बनतो. स्त्रीला जेव्हा मातृत्वाची जबाबदारी उचलावी लागते तेव्हा मेडिसिनसारख्या विषयात व इतरही विषयांत तिला अद्यावत रहाणे कठीण जाते. शिवाय ह्या जागा घेण्याइतपत फारच थोड्या स्त्रियांची शैक्षणिक पात्रता आढळून येते. ह्या मुद्याचा विचार आपण शैक्षणिक बाजूचा उहापोह करताना आगाऊच केला आहे.

मागल्याच प्रकरणात ह्या देशात डॉक्टरवर्गाची फार आणि तातडीची आवश्यकता आहे हे लक्षात आले. अखिल भारतात १९६१ साली डॉक्टरांची संख्या फक्त ७७,१०,५२० येवढीच होती. त्यात स्त्रीडॉक्टर १३,२९४ आहेत. महाराष्ट्रात १०,२९९ डॉक्टर असून २,००० स्त्री डॉक्टर आहेत. त्यांची टक्केवारी २० येते तर यू.एस्. एस्. आर्. मध्ये ४२.५३, यू. के. त २५ टक्के हा व्यवसाय स्त्रियांच्या हातात आहे. हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे. मात्र जो त्या वृत्तीने करील त्याच्याच बाबतीत. दुर्दैवाने काही डॉक्टर गडगंज संपत्ती मिळविण्याचे साधन म्हणून ह्या व्यवसायाकडे वळतात !

परिचारिकेचा आणि दूरध्वनिचालकाचा व्यवसाय सर्वस्वी स्त्रियांच्याच हातात आहे. तरीसुद्धा यू. एस्. ए. व यू. के. मध्ये २ टक्के, आणि स्वीडन, भारत व महाराष्ट्रात ४ टक्के पुरुष परिचारक आहेत. परिचारक म्हणून पुरुषांची का आणि कोणाला जरुरी लागते ? हा प्रश्न महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या मुख्य अधिकाऱ्यांना विचारिला असता त्यांनी उत्तर दिले की काही पुरुष रोग्यांचा, पुरुष परिचारकांकडूनच सेवा करून घेण्याचा आग्रह असतो म्हणून हे थोडे परिचारक आढळतात. ह्यापेक्षाही अनेकांना ह्या व्यवसायात शिरण्याची इच्छा असते परंतु फार थोड्याच वॉर्डांत त्यांचा उपयोग असतो, असेही सांगण्यात आले.

"टेलिफोनच्या ग्राहकांना टेलिफोनवर बाईचा मृदु, गोड आवाज ऐकावयास आवडतो", दूरध्वनिचालक म्हणून स्त्रियांचीच निवड करण्याचे हे कारण एका टेलिफोन

एक्स्चेंजच्या सुपरिटेंडन्टनी सांगितले, "परंतु जेव्हा त्या तत्परतेने काम करीत नाहीत तेव्हा ग्राहक त्यांना अपशब्द वापरतात, ते आम्हाला आवडत नाही. पण त्या वरचेवर गैरहजर रहातात आणि काहीवेळ आगाऊ कळविल्याशिवाय ! हीच एक स्त्रीचालकांची लंगडी बाजू आहे. मग जरूर ती व्यवस्था करून काम चालू ठेवणे आम्हाला जड जाते !" मॉनिटरस् म्हणून किंवा काही सबटेलिफोन एक्स्चेंजच्या ठिकाणी थोड्याच चालकांची जरुरी असते आणि जेथे "स्त्रियांना धोका असतो" तेथे पुरुषांना ठेवण्यात येते, अशीही माहिती त्या सुपरिटेंडन्टनी पुरविली. इस्राएलमध्ये सर्व चालक स्त्रियाच आहेत.

आणखी एक स्त्रियांचा खास व्यवसाय म्हणजे ग्रंथपालाचा. सरकार वाचनालये व ग्रंथसंग्रहालये उघडण्यास व चालविण्यास अनुदान देऊन उत्तेजन देत आहे. शैक्षणिक संस्थेची ती एक आवश्यक बाजू असल्यामुळे आजकाल ग्रंथपालशास्त्र निर्माण झाले असून ते विकसित होत आहे. हे काम तत्परतेने आणि हुशारीने करावे लागते. लेखिकेचा स्वतःचा अनुभव फार चांगला आहे. परंतु एका सुप्रसिद्ध प्राध्यापकांच्या मते, "स्त्रिया आल्यापासून सगळी अव्यवस्था झाली आहे", एका विद्यापीठाच्या मुख्य ग्रंथपालाने आणखी एक अडचण पुढे मांडली : "स्त्रिया उशीरा थांबावयास अगर लौकर येण्यास नाखूष असतात. सर्वांनाच दिवसाचे काम देणे शक्य नाही आणि ह्या कामावर जर सर्वच स्त्रिया असल्या तर आम्हाला व्यवस्था करणे कठीण जाते." ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती होती. ग्रंथालये सकाळी ८॥-९ पासून रात्रौ ९-१० वाजेपर्यंत उघडी असावी असे अपेक्षिले जाते. यू. के. मध्ये ३२५० स्त्रिया ग्रंथपालाचे काम करितात. ह्या पहाणीतील नमुना फक्त २० जणींचाच आहे. काहीही असले तरी ह्या क्षेत्रात स्त्रियांना बराच वाव आहे. ग्रंथपालाखेरीज १८ जणी भाषांतरकार अगर लेखिका म्हणून शैक्षणिक संस्थांत काम करताना आढळल्या.

वृत्तपत्रव्यवसाय हा एक आस्थेवाईक व्यवसाय आहे. प्रचलित घडामोडींची अद्यावत माहिती मिळविणे, त्यावर समतोलपणाने टीका करणे इ. अशी एक विशेष वृत्ती ह्या व्यवसायाला लागत असते. ह्यात रात्री अगर अवेळीसुद्धा काम करावे लागते. म्हणूनच फार थोड्या स्त्रिया हा व्यवसाय पत्करतात. दहा स्त्रियांच्याकडून माहिती गोळा केली त्यांपैकी नऊजणी स्त्रियांच्या मासिकाचे काम पहातात. फक्त एकच स्त्री दैनिक वर्तमानपत्राच्या संपादकवर्गात काम करीत आहे. त्या वर्गाचे सर्वसामान्य काम तर त्या बाईंना उचलावेच लागते पण रविवारच्या पत्रात स्त्रियांसाठी असलेल्या खास विषयावर लेख लिहावा लागतो. यू. एस्. एस्. आर्. मध्ये ४,०६० व यू. के. मध्ये १,६५० स्त्रिया वृत्तपत्रव्यवसाय चालवीत आहेत. भारतीय स्त्रियांनी मनात आणले तर हेही क्षेत्र त्यांना अधिक प्रमाणात काबीज करता येईल.

समाजसेवा हा शब्दप्रयोग फार संदिग्ध आहे. समाजसेवा करता यावी म्हणून ह्या

शतकाच्या सुरुवातीस विविध हेतुसाध्यासाठी जातीय आणि जातीय नसलेल्या अशा अनेक संस्था स्थापन झाल्या. त्यांतल्या हिंगणे स्त्रीसंस्था व श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमासारख्या संस्था अनाथ, गरजू स्त्रियांच्यासाठी खरोखरीच फार महत्त्वाचे कार्य करीत आहेत. जर अशा संस्थांना आजीव निःस्वार्थीपणाने समाजसेवेला वाहून घेतलेले स्त्रीपुरुष लाभले नसते तर त्या संस्थांकडून सध्या चालू आहे तसे उपयुक्त कार्य झाले नसते. ज्यांना समाजकार्याची आवड आहे व त्याकरिता खर्चण्यास फुरसद व साधने आहेत अशाही स्त्रिया ह्या संस्था चालवीत आहेत. अर्थातच काही अपवादात्मक भगिनी केवळ नावासाठी संस्थांच्या कार्यवाहक होतात ही गोष्ट निराळी. 'तुझं आहे तुजपाशी' ह्या सुप्रसिद्ध नाटकात लेखक श्री. पु. ल. देशपांडे ह्यांनी 'अतिविशाल महिला' म्हणून अशा स्त्रियांची चांगलीच टर उडविली आहे हे मराठी वाचकांना सांगण्याची जरुरी नाही. पण सर्वच समाजसेविका 'एका माळेचे मणी' नसतात. काहीही असो, प्रस्तुत ठिकाणी आपल्याला पगारी समाजसेविकांचाच विचार करावयाचा आहे. कुटुंब-नियोजन, समाजकल्याण वगैरे क्षेत्रांत त्यांचा तो व्यवसाय बनतो. अशा दहा जणींची माहिती मिळाली आहे. स्त्रियांच्या संस्था आणि समाजकार्य ह्यांचा स्वतंत्रपणे पुढील प्रकरणात विचार केला आहे.

सात स्त्रियांनी आपल्याला धंद्यांची आवड आहे असे सांगितले. इतकेच नव्हे, तर प्रत्यक्ष त्या निरनिराळ्या धंद्यांत गुंतल्या आहेत ही फार अभिमानाची गोष्ट आहे. दोघी जणी स्वतःचे दुकान चालवितात, एक मिठाईचे व दुसरे स्टोअर. दुसऱ्या दोघी जणींनी आपल्या गत पतींचा धंदा पुढे चालविला आहे. शिवाय दोन स्त्रिया स्टोअरस्च्या भागिदार असून ते स्टोअर चालवीत असतात. एकजण विमा एजन्ट आहे. जेव्हा लाइफ इन्शुअरन्स् कॉर्पोरेशनच्या कचेऱ्यांना भेट दिली तेव्हा असे एजन्टाचे काम बऱ्याच स्त्रिया करतात असे आढळून आले. परंतु त्यांचा परिचय करून घेऊन माहिती मिळविणे शक्य झाले नाही. ज्या तथाकथित एजन्टची प्रश्नपत्रिका भरून मिळाली त्या हे काम नाममात्र करतात. ग्राहक मिळविण्याची जबाबदारी त्यांचे यजमानच उचलतात. तथापि ज्या स्त्रियांना ही लकब आहे, ओळखी करून घेता येतात आणि पुरेशी चिकाटी आहे त्यांनी हा व्यवसाय उचलावा. परदेशातील स्त्रीएजंटांचे आकडे व माहिती उपलब्ध झाली नाही.

इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी ही दोन क्षेत्रे एकत्र घेता येतील. सात स्त्रीइंजिनिअरस् व एक स्त्रीटेक्नॉलॉजिस्ट ह्यांची गाठ घेता आली. ह्या सात जणींपैकी तिघी जणी नोक-रीच्या शोधात आहेत. त्या नुकत्याच इंजिनिअरिंगच्या परीक्षेतून उत्तीर्ण झाल्या आहेत. माहिती गोळा करताना त्यांचा परिचय झाला व खास उदाहरणे म्हणून ती समाविष्ट केली आहेत. बेकारीच्या समस्येचा विचार मागल्या प्रकरणात केला आहे. तसे पाहिले तर इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी ही क्षेत्रे स्त्रियांना नवीनच आहेत. भारताने जेव्हा पंचवार्षिक योजना हाती घेतल्या व त्याचबरोबर औद्योगीकरणाचा वाढता विकास होऊ

लागला तेव्हा ही क्षेत्रे व त्यांचे शिक्षण देणाऱ्या खास संस्था उदयास आल्या. इंडियन इन्स्टिटयूटस् ऑफ् टेक्नॉलॉजी स्थापन झाल्या. केंद्र सरकार ह्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे बराच खर्च करीत आहे. हा शिक्षणक्रम घेण्याचा विचार मुली करावयास लागतील अशी अपेक्षा नव्हती. तूर्त पुरेशा विद्यार्थिनी आल्यामुळे त्यांच्याकरिता पवई येथे मुलांप्रमाणेच एक वेगळे वसतिगृह बांधण्यात आले आहे. ह्या व्यवसायात बरेच परिश्रम घ्यावे लागतात आणि बाहेर हिंडून फिरूनही काम करावे लागते. असे काम करण्याची ज्या मुलींची तयारी असेल आणि शिक्षण पुरे झाल्यावर त्या व्यवसायात पडण्याची ज्यांची इच्छा असेल त्याच मुलींना अशा संस्थांत प्रवेश देण्यात यावा. राष्ट्रीय विकासासाठी जे राष्ट्र तुटीच्या अंदाजपत्रकावर आणि परराष्ट्रीय आर्थिक मदतीवर अवलंबून आहे त्या देशाला निष्कारण खर्च करावरास लावणे योग्य नाही. ज्याप्रमाणे वैद्यकीय शाखेची पदवी घेतल्यावर काही वर्षे पदवीधरांना सक्तीने नोकरी करावी लागते त्याप्रमाणे ह्या तांत्रिक शाखेच्या पदवीधरांवरही तशी सक्ती असावी. शिवाय ह्या खास शिक्षण घेतलेल्या पदवीधरांचा पाच वर्षांपर्यंत कसा जीवनक्रम असतो ह्याची अधूनमधून पहाणी करण्यात यावी. डॉ. चिं. द्वा. देशमुख ह्यांनी आय्. आय्. टी. च्या १९६६ साली झालेल्या पदवीदानप्रसंगी आपल्या भाषणात ह्या मुद्यावर जोर दिला होता.

वर उल्लेखिलेल्या खास शिक्षणक्रमात स्त्रियांना समान संधी देण्यात यावी—भारतात ती दिली जात आहे—ह्या मुद्याची चर्चा मागील प्रकरणात, "दी पोटेंशिअल ऑफ् वुमन" ह्या विषयावर कॅलिफोर्निया विद्यापीठापुढे झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने केली आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे : 'जेथे गुणोत्कर्ष आढळून येईल त्याला मान्यता दिलीच पाहिजे, मग ते गुण कुणामध्येही का दिसेनात !' हे विधान कोणत्याही सत्य-प्रेमी व्यक्तीला नाकारिता येणार नाही. इतकेच की आपल्या बुद्धिमत्तेमुळे प्राप्त करून घेतलेली विद्या सार्थकी लावावी.

यू. एस्. एस्. आर्. मध्ये ५००० आर्किटेक्ट स्त्रिया आहेत; भारतीय स्त्री ह्या क्षेत्राचा नुकताच उंबरठा ओलांडीत आहे. ज्या चार आर्किटेक्टस्‌ची भेट घेतली त्या फार उत्साही दिसून आल्या. त्यांपैकी एकजण म्हणाल्या की, "मी स्वतः बांधकामा-वर देखरेख करीत असते." काँट्रॅक्टरस् सिमेंट वगैरेचे मिश्रण बरोबर करीत नाहीत तेव्हा स्वतः लक्ष घालणे अवश्य असते." दुसऱ्या म्हणाल्या, "ही शाखा स्त्रियांना उपयुक्त आहे. प्लानिंगचे काम त्या आपल्या सवडीनुसार करू शकतात."

यू. के. मध्ये ७९७ स्त्रिया कायदेनिष्णात आहेत. मुंबईत ९,६२९ पुरुष तर ३१२ स्त्रिया कायद्याच्या पदवीधर आहेत. ह्यांपैकी सहा जणींची गाठ घेतली. दोघी वकिलीचा धंदा करतात तर चौघी तत्सम नोकरीमध्ये आहेत. ह्या सहा जणी व्यतिरिक्त दुसऱ्या एक न्यायाधिशाच्या पदावर असून एकजण मॅजिस्ट्रेट आहेत. पण ह्या उभयता शासकीय अधिकारी असल्यामुळे त्या विभागात त्यांना जमा केल्या आहेत. कायद्याच्या धंद्यात

पडावयाचे असेल तर ती व्यक्ती कणखर स्वभावाची असली पाहिजे. शिवाय कायद्याचे सखोल ज्ञान लागते. हा धंदा चालविताना निगरगट्ट लोकांशी गाठ पडते आणि बराचसा व्यवहार आतबट्ट्याचा असतो. वकिलीचा धंदा करणाऱ्या चौघी जणींपैकी एकजण फार उत्साही आहेत. पतिपत्नी उभयता हायकोर्टात वकिली चालवीत असतात. दुसऱ्या दोघी बरेच वर्षे ह्या व्यवसायात पडल्या असल्यामुळे त्यांच्यात थोडी पुरुषीपणाची झाक आढळून आली. ह्यावरून असे उघड दिसून येते की जीवनामध्ये आपण जो व्यवसाय करतो त्याचा परिणाम आपल्यावर होत असतो.

चार सिनेनटींचीही माहिती मिळविली. नटी कितीही लोकप्रिय असल्या तरी त्या व्यवसायाकडे समाजाची दृष्टी साशंकतेनेच पहात असते. प्रत्यक्ष भेटीने ह्या लोक-मताला पुष्टीच मिळाली.

आपल्याकडे किती गवई अगर कलाकार आहेत ह्याची आकडेवारी उपलब्ध नाही. म्हणून ती देता येत नाही. इतर देशांत अनेक स्त्रिया ह्या व्यवसायात आढळतात. जपानमध्ये तर २१,२०० स्त्रिया कलाकार आहेत. तो देश कलाप्रिय आहे हे सर्वश्रुत आहे. जाहिरात करणे हीसुद्धा कलाच समजली जाते. यू. एस्. मध्ये ७,२८० स्त्रिया ह्या व्यवसायात पडल्या आहेत कारण त्यापासून दरमहा प्राप्तीही बरीच असते. भारतीय भगिनीपण पुढे येत आहेत परंतु नमुना म्हणून एकाही स्त्रीची गाठ घेता आली नाही.

आतापर्यंत स्त्रिया जे निरनिराळे व्यवसाय करीत आहेत त्यांचा विचार केला. ह्यानंतर वर्गीकरण न करता आलेल्या नमुन्यातील "इतर" ह्या सदराखाली दिलेल्या व्यवसायांकडे लक्ष देऊ या. ह्यामध्ये लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनमध्ये व रिझर्व बँकेत 'पंच ऑपरेटरस्' म्हणून काम करीत असलेल्या व ज्यांना फक्त नोटा मोजावयाच्या व तपासावयाच्या असतात अशा ३३ स्त्रिया समाविष्ट करण्यात आल्या आहेत. हे काम केवळ यांत्रिक असते व स्त्रियांची बोटे अधिक कुशलतेने काम करू शकतात म्हणून त्यांना अधिक प्रमाणात पसंत केले जाते. ज्याअर्थी पंचिंग आणि कॉम्प्युटरस् ह्या नव्या शोधांचा वाढता वापर केला जाईल त्याअर्थी ह्या व्यवसायात स्त्रियांना अधिक वाव मिळेल असे वाटते.

"इतर" ह्या सदरात मे ॲन्ड बेकर व ग्लॅक्सो लॅबोरेटरीज् ह्या दोन कंपन्यांतून 'पॅकर्स' म्हणून काम करीत असलेल्या चौदा स्त्रिया घातल्या आहेत. त्यांना फॅक्टरीच्या वेळांप्रमाणे काम करावे लागते. फॅक्टरी कायद्यानुसार पगारी बाळंतपणाची रजा वगैरे ज्या सवलती स्त्रियांना असतात त्या ह्यांनाही मिळतात. त्याचबरोबर काही तोटेही आहेत. कामाची वेळ बहुधा सकाळी आठाला सुरू होते. आणि आठवड्यात कामाचे तासही अधिक असतात. त्याचप्रमाणे स्त्रियांना बाळंतपणाची पगारी रजा द्यावी लागते, म्हणजे तितके कंपनीचे नुकसान म्हणून लग्नानंतर कामावरून काढून टाकण्याचाही प्रयत्न करण्यात आला होता. परंतु स्त्रियांनी विरोध केला. एक चाचणी खटला भरण्यात आला व हा खटला वरिष्ठ न्यायालयापर्यंत लढविण्यात

आला. न्यायालयाने स्त्रियांच्या बाजूने निकाल दिला.* हे विशेष म्हणून येथे नमूद करावेसे वाटते.

हिंदुस्थान लिव्हर ह्या गृहोपयोगी वस्तू तयार करणाऱ्या कंपनीमधून चौदा स्त्रियांची माहिती मिळाली. त्या बाजार-संशोधक, माल-प्रचारक म्हणून काम करतात. त्या स्त्रियांची कोणतीच तक्रार नाही.

उरलेल्यांपैकी पंधरा जणी तारायंत्रावरून 'टेलिग्राफिस्टस्' म्हणून काम करीत असतात व दहा जणी रेल्वेतून जाणाऱ्या पत्रांचे वर्गीकरण करीत असतात. तारा-यंत्राचे काम करणाऱ्या स्त्रियांनी आपले काम यांत्रिक म्हणून कंटाळवाणे असते अशी तक्रार केली. ह्या पंधरा जणींची नोकरी बरेच वर्षांची झाली असून केवळ कुटुंबाला पैशाची मदत व्हावी म्हणून त्यांनी आपली नोकरी पुढे चालविली आहे. 'रेल्वे मेल सॉर्टरच्या' कामाबद्दल तेथील अधिकाऱ्यानी सांगितले की सायंकाळी सहा ते दुसऱ्या दिवशी सहा वाजेपर्यंत आठवड्यातून चार रात्री काम करावे लागते परंतु त्यांना मध्ये ३६ तासांची सुटी मिळते. असे हे काम स्त्रियांना गैरसोईचे आहे असे लेखिकेला वाटते. ह्या लेखिकेच्या निष्कर्षाला त्या अधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की स्त्रिया वाढत्या संख्येने ह्या नोकरीसाठी अर्ज करतात आणि शालान्त परीक्षेत त्यांना अधिक गुण मिळत असल्यामुळे त्या घेतल्या जातात. शिवाय स्त्रिया अधिक मन लावून काम करतात असेही त्या अधिकाऱ्यांनी सांगितले. काही मुलींनी तर 'आगगाडीच्या टपालाच्या डब्यातून पत्रांचे वर्गीकरण करण्याचे काम द्या' अशी अधिकारीवर्गाकडे मागणी केली पण ती नाकारण्यात आली, आणि ते बरोबरच आहे ! पोस्टात काम करणाऱ्यांना मोफत वैद्यकीय मदत मिळते. ह्या सवलतीचा काहीजण दुरुपयोगही करतात असेही सांगण्यात आले. ह्यावरून काही स्त्रीडॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे भारताच्या सद्यःपरिस्थितीत वैद्यकीय व्यवसायाचे समाजीकरण करणे हितकारक होणार नाही असे लेखिकेला वाटते.

ह्या पहाणीमध्ये घेतलेल्या नमुन्यासहित भारतातील व्यवसायी स्त्रीपुरुषांची तुलना इतर देशांतील–काही विकसित तर इतर विकासाच्या मार्गावरील–तत्सम स्त्रीपुरुषांबरोबर केल्यानंतर आपण सध्या कोणत्या परिस्थितीत आहोत ह्याचे थोडक्यात दिग्दर्शन होते. सर्वसामान्य विधान करावयाचे तर व्यवसाय पसंतीची दिशा कुणीकडे झुकते ह्यात देशादेशात फारसा फरक आढळत नाही. ह्यानंतर प्रस्तुत नमुन्यातील श्रमिक स्त्रियांचा अधिक सखोल विचार करू या. त्यांच्या कामाच्या परिस्थितीची पुरी माहिती मिळावी म्हणून प्रश्नपत्रिकेत अनेक प्रश्न विचारण्यात आले होते. त्या माहितीची चर्चा करण्यापूर्वी एक महत्त्वाचा मुद्दा प्रसंगोपात उपस्थित होतो त्याची चर्चा करणे अवश्य आहे. आजवर मध्यमवर्गातील स्त्री गृहकृत्यात

* बॉम्बे लेबर युनियन विरुद्ध इंटरनॅशनल फँचाइझ् (प्रायव्हेट) लि., ए. आय्. आर्. १९६६ एस्. सी. ९४२ पहा.

मग्न राहून आपल्या संसारात रममाण होत असे ती घराबाहेर पडून द्रव्यार्जन का करू लागली ? त्यामागे कोणते हेतू असावे ? का केवळ द्रव्यार्जन करण्याच्या सुलभ संधी उपलब्ध होत आहेत म्हणून ? आधुनिक काळात पैसे मिळविण्याचे मार्ग जवळजवळ समान पातळीवर स्त्रियांना मोकळे झाले आहेत ही गोष्ट नाकारता येणार नाही. व्यवसायात गुंतवून घेणे हे त्यांना सहजसुलभ झाले असेल, तरीसुद्धा गृहिणीचा तुलनात्मकरीत्या सुखावह जीवनक्रम सोडून तिने पुरुषाची बरोबरी करण्यात आणि त्याचबरोबर चढाओढ, स्पर्धा, वाहतुकीच्या वगैरे अडचणी असलेल्या धकाधकीच्या जीवनात का बरे उडी घ्यावी ?

एफ्. इव्हॅन नी 'एम्प्लॉइड मदर इन् अमेरिका' ह्या विषयावर एकोणीस समाजशास्त्रज्ञांनी काढलेल्या निष्कर्षांचे सार पुढीलप्रमाणे मांडतात : "शिक्षणामुळे रोजगारी मिळविणे सुलभ झाले आहे. परंतु त्याचबरोबर साफल्याच्या प्रेरणेचा आविष्कार आणि उत्तेजन ही रोजगारीत (स्त्रीला) मिळत असते." ह्या अखेरीच्या निर्णयापूर्वी एके ठिकाणी त्याच ग्रंथात त्या म्हणतात : "बऱ्याचजणींनी पैसा मिळविणे हा उद्देश सांगितला आहे. काहीजणींच्यावर अवलंबित असे कुणी ना कुणी तरी असते. त्यांचा उदरनिर्वाह त्यांना चालवावा लागतो." "इतरही वैयक्तिक कारणे आहेतच : मोकळेपणाची आणि स्वतंत्र होण्याची जरुरी, जगाशी संबंध यावा ही इच्छा. . . . काही वेळा आपले वैफल्य कुटुंबात प्रकट होण्याचा संभव असतो, ते वैफल्य उद्योगधंद्यात मन गुंतविल्यामुळे बाहेर पडत नाही अगर त्याला निराळे वळण लागते."[२५]

वरील उताऱ्यांवरून असे दिसून येते की विविध हेतूंनी प्रेरित होऊन स्त्रिया कामाला बाहेर पडतात. ह्या नमुन्यामध्ये अविवाहित त्याचप्रमाणे विवाहित स्त्रियाही आहेत. त्या निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत आहेत. ज्या स्त्रियांनी वैद्यकीय, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर सारख्या खास शाखांचे शिक्षण घेतले असेल त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग केलाच पाहिजे. अशा स्त्रियांचे प्रमाण ४२.३ टक्के पडते (तक्ता २ पहा) उरलेल्या ५७.७ टक्के स्त्रियांनी अर्थार्जन करावे असे अपेक्षिले जात नाही. तथापि पहाणीच्या वेळी तरी त्या व्यवसायात गुंतलेल्या आढळल्या ते का ? दुसरी गोष्ट अशी की बहुसंख्य मिळवित्या स्त्रिया (७२.२ टक्के, तक्ता २) प्राप्तीवरील कर भरीत नव्हत्या. फक्त २७.८ टक्के स्त्रियांचे उत्पन्न प्राप्तीवरील कर आकारण्याइतपत आहे. ह्याचा अर्थ असा की जवळजवळ तीनचतुर्थांश स्त्रिया कमी-मध्य उत्पन्न गटात समाविष्ट होतात. हाच एक पुरेसा पुरावा आहे की गेल्या दहा वर्षांतल्या वाढत्या महागाईमुळे मध्यमवर्गाचे उत्पन्न कुटुंबपोषणास अपुरे पडते व त्यात स्त्रीला द्रव्यार्जन करून भर घालावी लागते. त्याचबरोबर तसे करण्यास समाजानेही संधी दिली आहे.

ह्या प्रतिसादी स्त्रिया कुटुंबाच्या उदरनिर्वाहास हातभार लावतात हे निःसंशय खरे आहे. कारण ७८.७३ टक्के स्त्रिया कुटुंबाच्या काही प्रमाणात—इतर मिळविते

कुटुंबसदस्य असल्यामुळे–आर्थिक आधारस्तंभ आहेत तर ९.७ टक्के स्त्रिया सर्वस्वी कुटुंबाचा भार वहातात. विधवा आणि घटस्फोटिता ह्यामध्ये येतात. फक्त ११.६७ टक्के स्त्रिया स्वतःसाठीच नोकरी-व्यवसाय करीत असतात. घेतलेल्या शिक्षणाचा व मिळालेल्या अनुकूल संधींचा उपयोग करून घ्यावा हा जरी प्रमुख हेतू असला तरी कुटुंबाला हातभार लावावा हाही हेतू दिसून येतो.

वरील कारणांखेरीज इतरही काही दुय्यम हेतू अर्थार्जन करण्यामध्ये असू शकतात. त्यांचा विचार पुढील प्रकरणात केला आहे. कारण येथे फक्त व्यवसाय व तदनुषंगिक अंगांचीच चर्चा करावयाची आहे. तर मग कामाची आनुषंगिक स्थिती कशी आहे ? ती समाधानकारक आहे की नाही ?

**तक्ता ३८**

कामाची परिस्थिती दिग्दर्शित करणारी माहिती व असमाधानाची कारणे

| संख्या | कामाची परिस्थिती | | | |
|---|---|---|---|---|
| | समाधान-कारक | असमाधान-कारक | अंशतः समाधान-कारक | नमूद केले नाही |
| १,५३४ | १,२६८ | २०३ | ९ | २४ |
| १००% | ८४.६२% | १३.२३% | ०.५९% | १.५६% |

| | | | |
|---|---|---|---|
| स्थिती : | असमाधानकारक : | | |
| | अती श्रमाचे | १० | (बहुतेक परिचारिका) |
| | रात्रपाळी | ८ | |
| | कमी पगार | ३ | |
| | बदली | ३ | |
| | बढती नाही | २ | |
| | पुढे वाव नाही | २ | (वृत्तपत्र व्यवसायी) |
| | यांत्रिक काम | २ | |
| | उपस्थितीचा प्रश्न | २ | |
| | कामाच्या वेळेपेक्षा उशीरा बसणे अवश्य | १ | (समाजसेविका) |
| | | ३३ | |

प्रतिसादी स्त्रियांपैकी १,२९८, किंवा ८४.६२ टक्के स्त्रियांची कोणतीच तक्रार नाही. हे उत्तर जरा विचारपूर्वकच मान्य करावे लागेल. स्त्रीला आजवर रूढीने मूकवृत्तीने आहे ती परिस्थिती मान्य करण्यास शिकविले असल्यामुळे व्यवसायाची जी परिस्थिती आहे ती निमूटपणे ती स्वीकारीत असावी. शिवाय बाह्य जगात वावरण्याचे आकर्षण व 'कमावती' म्हणून मिळणारे समाधान हे तिला नव्यानेच लाभत आहे. अशा परिस्थितीत स्वतःच्या हक्कांचे प्रतिपादन करण्याचा संभव कमी म्हणूनच फक्त २०३, किंवा १३.२३ टक्के स्त्रियांनी आपण ज्या परिस्थितीत काम करीत आहोत ती असमाधानकारक आहे असे सांगितले. ह्या असमाधानाची कारणे मात्र सांगण्याचे बऱ्याच जणींनी टाळले. परंतु तेहतीस जणींनी मात्र निरनिराळी कारणे नमूद केली आहेत.

दहा जणींनी आपणांस फार काम पडते अशी तक्रार केली. ह्या बहुतेक परिचारिका आहेत. ही संख्या इतकी कमी नाही. लेखिकेने व्यक्तिशः रुग्णालयांस भेट देऊन बऱ्याच जणींची गाठ घेतली व अनौपचारिकरीत्या चर्चा केली. सार्वजनिक रुग्णालयांतील परिचारिकांना, विशेषतः मुंबईतील, खरोखरीच फार काम पडते. पहिली गोष्ट त्यांनी नजरेस आणून दिली ती ही की वॉर्डमध्ये जितक्या रोग्यांची व्यवस्था असते त्यापेक्षा त्यांची संख्या अधिक असते आणि रुग्णांना प्रवेश तर नाकारिता येत नाही ! त्यांची शुश्रुषा करावीच लागते. त्यामुळे ठराविक तासांपेक्षा एकदोन तास त्यांना जास्तच थांबावे लागते. परिचारिकेचा हा व्यवसाय सेवेसारख्या उदात्त हेतूने प्रेरित झालेला असला तरी शुश्रूषेचे काम कंटाळवाणे आणि कष्टदायक असते. आठ अगर अधिक तास त्यांना दोन पायांवर उभे राहून काम करावे लागते, रुग्णांशी प्रेमाने वागावे लागते व डॉक्टरांकडे लक्ष पुरवावे लागते. हे सर्व त्या चिकाटीने व शांतपणाने करीत असतील, नव्हे त्या करतातच, आणि त्यांना ठराविक वेळेपेक्षा अधिक तास काम करावे लागले तर त्या थकून जात असल्यास नवल नाही. तेव्हा त्यांची तक्रार खरीखुरी आहे आणि तिकडे तांतडीने लक्ष देणे अगत्याचे आहे. शिवाय पाळीपाळीने त्यांना रात्रपाळी करावी लागते.*

परिचारिकांमध्ये ज्या माता असतात त्यांना रुग्णालयांच्या आसपास रहाण्याची

* असे सागण्यात येते की, "देशाला ८०,००० अधिक परिचारिकांची जरुरी आहे. जर तरुण मुलींनी पुरेश्या संख्येने ह्या उदात्त व्यवसायाकडे वळावे व आज मागणी-पुरवठ्यातील ३०,००० संख्येचे अंतर भरून काढावयाचे असेल तर रुग्णालयांच्या कारभाराचे धोरण सुधारले पाहिजे. ..... रहाण्याची स्थिती अव्यवस्थित व घाणेरडी असली तर अगतिकपणा उत्पन्न होतो. रुग्णालयाच्या शासनव्यवस्थेने सर्व देशात अगदी कमी वेतनाच्या नोकरांना जशा खोल्या दिल्या त्यापेक्षा परिचारिकांना अधिक चांगली सोय करू नये ह्याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे."—दि टाइम्स ऑफ इंडिया १५ एप्रिल १९६८ (दिल्लीच्या रुग्णालयांतील तीन परिचारिकांनी आत्महत्या केली त्याच्या अनुषंगाने).

सोय नाही ही त्यांची दुसरी तक्रार. आपले काम, रात्रपाळीसुद्धा संपवून त्यांना घरी परतण्यास बराच वेळ लागतो व त्यांची ताकदही खलास होते. अशा स्थितीत परतल्यावर त्यांनी गृहकृत्ये कशी उरकावी व मुलांकडे कुठून लक्ष द्यावे ?

आणखी एक त्यांची तक्रार म्हणजे चौथ्या वर्गाच्या सेवकांकडून जसे परिचारिकांना सहकार्य मिळावयास हवे तसे हल्ली मिळत नाही. त्या परिचारिकांपैकी काहीजणी म्हणाल्या, "अलिकडेस हा वर्ग आमचे ऐकेनासाच झाला आहे. रुग्णांचे हाल होतात आणि डॉक्टर्स आमच्यावर रागावतात. आम्हाला दोन्ही आघाडींना तोंड द्यावे लागते." आजाऱ्यांची आणि अपंगांची सेवा करण्याचा पत्कर घेतला आहे त्यांची अशी ही सद्यःस्थिती आहे. ह्या व्यवसायाविषयी इतर सर्वसामान्य समस्यांचा विचार ह्या प्रकरणाच्या अखेरीस केला जाईल.

परिचारिकेखेरीज इतर काही व्यवसाय केवळ स्त्रियांकडे असून त्यांत रात्रपाळीचेही काम करावे लागते. जागतिक प्रवृत्तीनुसार दूरध्वनी चालकांचे काम भारतही स्त्रियांकडेच सोपवू लागला आहे. म्हणूनच लेखिकेने ह्या व्यवसायाविषयी खास माहिती मिळविण्याकरिता चालक स्त्रियांची व सुपरिंटेंडन्ट ह्यांची भेट घेऊन चर्चा केली. ह्या अनौपचारिक संभाषणात अनेक गोष्टी समजल्या. तूर्त रात्रपाळीविषयी जी स्त्रियांची तक्रार आहे त्याचाच येथे प्रथम विचार करू. रात्रपाळी ही त्यांना करावीच लागते. ही नोकरी पत्करण्यापूर्वी उमेदवारांना रात्रपाळीची पूर्ण कल्पना दिली जाते, त्याकरिता शयनमंदिरे व इतर सुखसोई दूरध्वनी खात्यामार्फत दिल्या जातात. असे असूनही काहीवेळा ह्या चालक-भगिनी डुलक्या देताना आढळतात. ही तक्रार तेथील मॉनिटरने केली. कामाच्या वेळी डुलक्या केवळ आळसाने अगर कामाची टाळाटाळ करण्याच्या हेतूने दिल्या जात नसाव्या. जी बाई रात्रपाळीचे काम करते तिला दिवसा घरी थोडीच विश्रांती मिळू शकते. आमच्या समाजाचा दृष्टिकोन, विशेषत: घरच्या मंडळींची वागणूक व घरात येऊन तिच्यापासून तांतडीने कामास लागण्याची अपेक्षा ह्या सर्व गोष्टी तिला प्रतिकूल आहेत. जरूर ती विश्रांती न मिळाल्यामुळे तिच्याकडून स्वाभाविकपणे काम नीट केले जात नाही. अर्थातच वरिष्ठ त्यांच्याबद्दल तक्रार करितात.

रेल्वे टपालाचे वर्गीकरण करणाऱ्या काही स्त्रिया वा मुली, शांतपणे आपले काम पुणे स्टेशनवरच्या रेल्वे मेलच्या कचेरीत करीत होत्या. अशा त्या स्तब्धतेच्या समयी त्या एकत्र आपले काम चालवीत आहेत आणि त्यांना कसलाही उपसर्ग पोहोचत नाही अशी दक्षता वरिष्ठांकडून घेतली जात होती.

प्रतिसादी स्त्रियांपैकी "कमी पगाराची" तक्रार वसतिगृहात रहाणाऱ्या डॉक्टरवर्गाकडून करण्यात आली. त्यांना विनाशुल्क रहावयास जागा—बहुधा स्वतंत्र खोल्या नसून एकत्र एका मोठ्या दालनात झोपणे—व विनाशुल्क जेवणखाण असले तरी त्यांचे पगार फार अल्प असतात. म्हणूनच १९६९ साली डॉक्टरवर्गाने विधान-

सभेवर मोर्चा नेला व सरकारने त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला आहे. आपल्या देशात आधीच डॉक्टरवर्गाची कमतरता आहे ही वस्तुस्थिती वाचकांच्या लक्षात आगाऊच आणून दिली आहे, तेव्हा जो डॉक्टरवर्ग आहे त्यास पुरेसे वेतन द्यावे हे कोणीही मान्य करील.

फारच थोडया जणींनी वाहतुकीची अडचण पुढे मांडली. म्हणून तिचा विचार करू नये असे कुणी म्हणेल. परंतु ही अडचण हरएक जणाला–मग तो पुरुष वा स्त्री कुणीही असो–भासत आहे. आगगाडया व बसेस् कशा कचेरीच्यावेळी भरभरून येतात हे स्थानिक लोकांना चांगलेच परिचित आहे. प्रवाशांचे हाल वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. मुंबईत तर सारखी लोकांची भर पडत आहे आणि हा वाहतुकीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करीत आहे. स्त्रियांच्या दृष्टीने तर तो प्रश्न अधिकच बिकट आहे. त्यांना सर्व गृहकृत्ये उरकून व इतर किरकोळ कामे पुरी करून वेळेवर कामासाठी पोहोचण्याकरिता आगगाडी अगर बस पकडावी लागते. म्हणूनच बऱ्याच जणींनी ही अडचण व हजेरीपत्रक गाठण्याची कशी धडपड होते हे अगदी रंगवून सांगितले. 'जिंकू किंवा मरू' असा हा दैनंदिन झगडा असतो असेही त्या म्हणाल्या. म्हणूनच ही वाहतुकीची समस्या बऱ्याच जणींनी माझ्या निदर्शनास आणून दिली.

फारच थोडया स्त्रिया वृत्तपत्र व्यवसायात पडतात. कोणीही स्त्रियांच्या मासिकाची–इंग्रजी 'फेमिना' व मराठी 'स्त्री'ची–संपादिका नव्हती. ज्या स्त्रिया ह्या व्यवसायात पडल्या आहेत त्या खालच्याच जागांवर आहेत आणि आपणांस बढती मिळत नाही ही त्यांची तक्रार आहे.

एकशेसत्तर स्त्रियांनी कोणत्या कारणांमुळे आपली व्यवसायविषयक परिस्थिती असमाधानकारक आहे ती कारणे दिली नाहीत. कदाचित काय सांगावे व काय न सांगावे ह्याबद्दल त्या गोंधळून गेल्या असतील, किंवा 'वेशीवर दुःख टांगल्याने' काही उपयोग नाही असेही त्यांना वाटले असेल.

आपले मालक व सहकारी ह्यांच्याबरोबर कशा प्रकारचे संबंध आहेत ही ह्यापुढील विचारणा होती. जवळजवळ ९५ टक्के स्त्रियांचे संबंध समाधानकारक आहेत. फक्त तीन टक्के स्त्रियांचे तसे नाहीत. दोन टक्के स्त्रियांनी ह्या प्रश्नाला उत्तर दिले नाही. तेव्हा ह्या आघाडीवर सर्व काही समाधानकारक आहे असे दिसते.

वरील चित्रणाची दुसरी बाजू आहे आणि ती, स्त्रीश्रमिक ज्या वरिष्ठांच्या हाताखाली काम करीत होत्या त्यांच्याकडून प्रश्नपत्रिकेच्या द्वारा माहिती गोळा करून तक्ता ३९ मध्ये दिली आहे. प्रथमतः प्रतिसादी स्त्रियांनी आपले वरिष्ठ व सहश्रमिक ह्यांच्याबरोबर कसे संबंध आहेत ते व्यक्त केले असून नंतर निरनिराळ्या कार्यालयांतील वरिष्ठांचे स्त्रीश्रमिकांविषयी मत त्यांनी जे लिहून दिले ते नमूद केले आहे.

स्वतःच स्वतःचे मूल्यमापन करण्यापेक्षा इतरांनी, आणि तेही आपणांपेक्षा शिक्षण व सुसंस्कृतपणात वरचढ असणाऱ्यांनी मूल्यमापन केलेले अधिक महत्वाचे

तक्ता ३९

प्रतिसादी स्त्रियांच्या दृष्टिकोनातून
वरिष्ठ आणि सहकारी ह्यांच्याबरोबरचे संबंध

| समाधानकारक | असमाधानकारक | अंशतः समाधान-कारक | उत्तर दिले नाही |
|---|---|---|---|
| १,४५१ | ४५ | ४ | ३४ |
| ९४.३९% | २.९३% | ०.२६% | २.२२% |

स्त्रीश्रमिकांच्या कार्यक्षमतेबद्दल वगैरे वरिष्ठांच्या दृष्टिकोनातून.
शासकीय अधिकारी–प्रश्नपत्रिकांच्या उत्तरावरून

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण संख्या ७८ | | | |
| जबाबदार ६८, तशा नाहीत १० | ८७.२८% | १२.८२% | |
| कार्यक्षम ७०, तशा नाहीत ८ | ८९.७५% | १०.२५% | |
| गैरहजेरी–अधिक ४१, कमी ४, सारखी २४ | ५३.१०% | ५.०५% | ३०.७५% |
| विवाहित स्त्रीश्रमिका नाहीत ८, उत्तर नाही १ | ९.८५% | १.२५% | |
| गैरहजेरीची कारणे–कौटुंबिक ४३ | ५५.१३% | | |
| स्त्रीपक्षपातीपणा–हो १९, नाही ३८, ह्यांपैकी एकही नाही २१ | २४.३६% | ४८.७२% | २६.९२% |
| व्यक्तिमत्वाचा विकास–हो ६०, नाही–६ | ७७% | ७.७% | |
| खात्री नाही–२, उत्तर नाही १० | २.५% | १२.८% | |

स्त्रिया वरच्या जागेवर नसण्याची कारणे

| | |
|---|---|
| पात्रता नाही | २८ |
| उशीरा क्षेत्रात प्रवेश केला | १६ |
| समाजाचा विरोध | ५ |
| कौटुंबिक जबाबदारी | ५ |
| उत्तेजन नाही | २ |
| शारीरिक दौर्बल्य | ५ |
| प्रशिक्षण–शिक्षण नाही | ९ |
| संधी नाही | २ |
| व्यवसायी वृत्ती नाही | ८ |
| उत्तर नाही | १० |
| वरच्या जागेवर आहेत | १० |

महत्वाची माहिती गुप्त ठेवण्याची पात्रता : सर्व होकार ५–टक्के १००%

ह्यात शंका नाही. अर्थात वैयक्तिक पूर्वग्रह आणि पुरुषी दृष्टिकोन असण्याचा संभव आहे. (ह्या ७८ मध्ये ७ स्त्रिया वरिष्ठ जागांवर असल्यामुळे त्यांची ही मते असून उरलेली पुरुष वरिष्ठांची आहेत.) हा धोका पत्करूनही बहुतेक वरिष्ठांनी–६८, अगर ८७.२८ टक्के वरिष्ठांनी–स्त्रीश्रमिक "जबाबदार" आणि ७०, अगर ८९ टक्के वरिष्ठांनी "कार्यक्षम श्रमिक" आहेत अशी कबुली द्यावी हे खरोखरच श्रमिक महिलांना भूषणास्पद आहे. त्यांनी आणखी पुस्ती जोडली की स्त्रियांना बाहेरील आकर्षण कमी असते म्हणून त्या अधिक सचोटीने काम करतात. मागील तक्त्यात शेवटी केलेला उल्लेख "महत्त्वाची माहिती गुप्त ठेवण्याची पात्रता" हा जमेस धरला तर स्त्रियांच्या बाजूने पारडे बरेच कलते होते. एक दूरध्वनी निरीक्षक म्हणाले, "पुष्कळ वेळा दिल्लीहून महत्त्वाचे निर्णायक बोलणे स्थानिक अधिकाऱ्यांबरोबर चालू असते. ह्या स्त्रीदूरध्वनी चालकांकडून त्या संभाषणाचा एकही शब्द बाहेरील जगास कळत नाही !" खरेच हे त्यांना फार भूषणावह आहे ! कदाचित ह्या भगिनी तितक्या शिकलेल्या नसल्यामुळे ह्या संभाषणाचे पूर्ण मर्म त्यांच्या लक्षात येत नसावे.

गैरहजेरीचा प्रश्न व त्याचे उत्तर ह्यावरून स्त्रियांची विशेषत: मातांची दैन्यावस्था लक्षात येते. एकेचाळीस, अगर ५३ टक्के वरिष्ठांनी, श्रमिक महिलांची पुरुषांपेक्षा गैरहजेरी अधिक असते असे म्हटले आहे. किंबहुना दोघांनी तर असे विधान केले की आपली सर्व रजा त्या संपवून टाकतात. वास्तविक दीर्घ मुदतीची रजा ही विश्रांतीसाठी अगर बाहेरगावी जाण्यात घालवावयाची असते परंतु घरात कुणीही आजारी पडले की ह्यांना गैरहजर राहून त्याची शुश्रूषा करावी लागते. उलटपक्षी, २४ वरिष्ठांनी म्हटले की स्त्रिया वा पुरुष सारखेच गैरहजर रहातात. पुरुषांनाही आपली नैमित्तिक रजा, कारण असो वा नसो, संपवून टाकाविशी वाटते. स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा कमी प्रमाणात गैरहजर असतात असेही चौघाजणांनी नमूद केले. (ही विधाने करताना काही जणांनी वार्षिक हजेरी पत्रकाचे आकडे आधाराकरिता दिले होते.) आठ जणांनी लिहून दिले की त्यांच्याकडे विवाहित स्त्रियाच काम करीत नाहीत तेव्हा हा प्रश्न फारसा उपस्थित होत नाही.

अडतीस वरिष्ठांच्या मते विरुद्ध पक्षाकडून "सुंदर जातीच्या" बाबतीत पक्षपात केला जात नाही. खास वागवणूक अगर निष्कारण विरोध होत नाही. फक्त १९, अगर एकचतुर्थांश जणांनीच फक्त पक्षपात केला जातो असे म्हटले. भारतीय संस्कृतीनुसार मातेला फार मोठा मान आहे. वडील मंडळींना वंदन करताना प्रथम 'मातृदेवो भव' म्हणून आईला नमस्कार करावयाचा असतो. पाश्चात्य रिवाजानुसारही स्त्रियांना पहिला मान द्यावयाचा असतो. ही वृत्ती परस्पर संबंधात आल्याशिवाय कशी राहील ? त्यातून जर का मुलींनी स्वत:ला अधिक सवलती घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांचेच नाव वाईट होते. एक लेडी वेल्फेअर ऑफिसर म्हणाल्या, "एका जातीच्या मुली इतक्या वाईट रीतीने वागतात की

अगदी तापदायक होते." ह्याला काहीतरी आळा घालणे अवश्य आहे.

"बाहेरील काम आणि त्याच्या अनुषंगाने मिळणारे आर्थिक स्वातंत्र्य येणेकरून स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो काय ?" असा प्रश्न विचारला असताना ६०, अगर ७७ टक्के अधिकाऱ्यांनी होकारार्थी, सहा जणांनी नकारार्थी तर दोघांनी "खात्रीने सांगता येत नाही", अशी उत्तरे दिली. जर ह्या उत्तरांच्या जोडीला ६७ टक्के श्रमिक महिलांना जीवनातील समाधान लाभते ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर विविध प्रकारच्या येणाऱ्या अडचणी व धोके पत्करूनही बाहेरील काम करणे योग्य ठरेल.

कायद्याने काय अगर रूढीने काय कोणतीही जागा स्त्रियांना मिळण्यास हरकत नाही. असे असूनही फारच थोड्या भगिनी वरच्या अधिकाराच्या जागा भूषविताना आढळतात. असे का असावे ही शंका कोणत्याही अभ्यासूला आल्याशिवाय रहाणार नाही. दहा जणांनी अगर १२ टक्के अधिकाऱ्यांनी "स्त्रिया वरच्या जागांवरही आहेत" असे उत्तर दिले आहे. सरकारी व लाइफ इन्शुअरन्स् कॉर्पोरेशनस्सारख्या निम-सरकारी व्यवस्थेमध्ये पूर्वनियुक्तीने मनुष्य वर चढत जातो. व्यापारी व औद्योगिक संस्थांत अशी पद्धत नाही. शैक्षणिक पात्रता, औद्योगिक धडाडी, उद्योगप्रियता वगैरे काही विशेष गुण असले तर तो मनुष्य अधिकाराच्या जागांवर जाऊ शकतो. असे गुण व अवश्य ते प्रशिक्षण स्त्रियांना मिळत नाही ही कारणे अनुक्रमे २८ व ९ जणांनी दिली आहेत. प्रशिक्षणाची व्यवस्था करता येईल परंतु गुण काही बाहेरून ओतावयाचे नसतात ! स्त्रियांच्यात स्वयंकर्तृत्व, स्वतंत्रपणे व जलद निर्णय घेण्याचे सामर्थ्य, व्यवसायास पुरे वाहून घेणे इत्यादी गुणांच्या अभावामुळे खरोखरीच उज्ज्वल यश त्यांना मिळत नाही काय ? कार्यक्षमतेमध्ये स्वयंकर्तृत्व व निर्णय घेण्याचे सामर्थ्य अंतर्भूत होत नाही काय ? ८९ टक्के वरिष्ठांनी श्रमिक महिला कार्यक्षम आहेत असे उत्तर दिले असताना ३६ टक्के लोकांनी त्यांच्यात वरील गुण नाहीत हे विधान करणे म्हणजे एक तर ते काल्पनिक किंवा पूर्वग्रहदूषित असावे. तूर्त तरी वरील प्रश्नाचे उत्तर अनिश्चितच राहील; कारण स्त्रियांनी उशीरा प्रवेश केला आहे (१६), आणि समाजाचा विरोध (५), कौटुंबिक जबाबदारी व त्याच्या अनुषंगाने होणारे द्विधा मन, उत्तेजनाचा अभाव (२), आणि संधी नसणे (२), हे मुद्दे विचारात घेतले पाहिजेत. काळच ह्याचा निर्णय देईल. मात्र समानतेचे तत्त्व पूर्णतया प्रत्यक्षात उतरले पाहिजे.

दुसऱ्या विकसित देशांतील परिस्थिती लक्षात घेता जास्तीतजास्त २० टक्क्यांनी अधिकारांच्या जागावर स्त्रिया आहेत असे तक्ता ३७ वरून दिसून येते. बाहेरील क्षेत्रात त्या नव्यानेच पदार्पण करीत आहेत—अवघी पन्नास वर्षे लोटली आहेत—ही गोष्ट ध्यानात धरता स्त्रियांना हे खरोखरच भूषणावह ठरते.

तीनशे एकोणनव्वद प्रतिसादी स्त्रिया—ह्यामध्ये खाजगी प्रॅक्टिस करणाऱ्याही येतात—ज्यांनी आपण किती वर्षे नोकरी अगर व्यवसाय करीत आहोत हे नमूद केले नाही अशा वगळल्यास, ११४५, किंवा ७४ टक्के जणींनी आपण अर्थार्जनात

तक्ता ४०

व्यवसायाचा व नोकरीचा काळ

| एकूण | नोकरीचा काळ दिला नाही | नोकरीचा काळ दिला आहे | नोकरीच्या काळाची सरासरी | जास्तीत जास्त | कमीत कमी | पुढे चालू ठेवणार | | | सवलतीसह अगर विना अकालिक सेवानिवृत्तीस पसंती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | हो | वर अवलंबून | नाही | |
| १५३४ | ३८९ | ११४५ | ७-११$\frac{३}{४}$ | ३८ | १ | १०७९ | ९० | ६१ | १७१ |
| | २६% | ७४% | व.–महिने | वर्षे | महिना | ७०% | ५.८% | ३.९% | ११.१५% |

किती काळ घालविला आहे ती माहिती दिली आहे. अडतीस वर्षे एका बाईने जास्तीत जास्त नोकरी केली आहे, तर सरासरी जवळजवळ आठ वर्षे व कमीतकमी एक महिना, असे दिसून येते; ह्याच्याच बरोबर १०७९, अगर ७० टक्के स्त्रियांनी आपला व्यवसाय अगर नोकरी पुढे चालू ठेवणार असे म्हटले आहे; ९०, अगर ५.८ टक्के जणींनी ही गोष्ट वरपक्षावर अवलंबून राहील–कारण त्या अविवाहित आहेत– असे नमूद केले असून फक्त ६१, किंवा ३.९ टक्के निश्चितपणे नोकरी सोडणार असे म्हणतात. मात्र कधी सोडणार ते बरीक सांगितले नाही ! १७१, अगर ११.१५ टक्के जणींनी नोकरीतून अकालिक सेवानिवृत्त होण्याची इच्छा प्रगट केली, मात्र पेन्शन वगैरे प्रमाणतः मिळाल्यास, ह्या सर्व माहितीवरून असे दिसून येते की सामान्यतः एकदा स्त्रियांनी नोकरीस अगर व्यवसायास सुरुवात केली की त्या पुढे चालू ठेवतात. अर्थातच असे घडून येण्यास घरच्या मंडळींची, विशेषतः यजमान व सासूसासरे इत्यादींची अनुमती आहे असे गृहीत धरले आहे हे अविवाहित स्त्रियांच्या उत्तरांवरून दिसून येते. 'ज्या कुटुंबात आपण प्रवेश करणार त्या कुटुंबियांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणे नोकरी चालू ठेवणार अगर सोडणार', असे त्यांनी म्हटले आहे.* ज्यांना सोडावयाची इच्छा परंतु सोडवत तर नाही अशा फार थोड्या जणी आहेत. काहींचे मन द्विधा मनःस्थितीत आहे; त्यांना सेवानिवृत्त तर व्हावयाचे आहे पण मध्येच नोकरी सोडल्यास काही अंशी तरी सेवानिवृत्तीच्या फायद्यांना मुकावे लागेल, त्यास त्यांची तयारी नाही. ह्यानंतर त्यांच्या समस्यांचा विचार करू या.

"जोडा घालणाऱ्यालाच तो कुठे टोचतो हे समजते", अशी एक इंग्रजी म्हण आहे. अर्थार्जन करण्याची आणि गृहिणीची ह्या दोन भूमिका एकाच वेळी वठविणे म्हणजे सोपे काम नव्हे. लेखिकेला हे सहजी पटते. तेव्हा ह्या स्त्रियांच्या अडचणी सर्वप्रकारे समजून घेण्याची शिकस्त करण्यात आली आणि जेथे शक्य झाले तेथे त्यांना आपल्या समस्या लिहून देण्यास विनंती केली. सत्त्याणव स्त्रियांनी नोकरीचे अगर व्यवसायाचे काम आणि गृहिणीचे वा मातेचे काम ह्या दोहोंत संघर्ष उत्पन्न होतो असे म्हटले आहे. तसे पाहिले तर ९७ ही संख्या फार अल्प वाटते. परंतु इतरांनाही ही समस्या कमी अधिक प्रमाणात पडत असली पाहिजे, परंतु त्यांनी ती शब्दांत व्यक्त केली नाही इतकेच. शिवाय ह्या संख्येची सर्व नमुन्याबरोबर तुलना करता कामा नये. लग्न झाल्यावर आणि विशेषतः मातृपद आल्यावर हा संघर्ष सुरू होतो. त्यातल्या त्यात जेव्हा मुलाला पहाण्यास घरात घरच्यापैकी कोणी नसते तेव्हा ह्या संघर्षाला अधिक

---

* पुण्याच्या डॉ. वाय्. दामले ह्यांनी त्या शहरातील पंचवीस तैलबुद्धीच्या विद्यार्थ्यांची सखोल पहाणी केली. त्यात सात स्त्रिया आहेत. त्यांपैकी एक प्रथम वर्गात उत्तीर्ण झालेली पधवीधर विद्यार्थिनी असून इतर क्षेत्रांतही ती चमकली होती. परंतु लग्न जमताच सासरच्या मंडळींनी घातलेल्या अटींमुळे तिने पुढील शिक्षण अगर इतर कार्यक्रम सोडून दिले.

तक्ता ४१

नमुन्यांतील प्रतिसादी स्त्रियांच्या समस्यांचे निवेदनपत्रक

| समस्यांचा सारांश : सर्वसामान्य आणि विशिष्ट | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमिकांचा संघर्ष | वाहतुकीचा प्रश्न | आरोग्य | पाळणागृह अगर शिशुगृहाची आवश्यकता | बदली | अतिश्रम | बिऱ्हाडाची सोय | रात्रपाळी आळीपाळी | पसंती | |
| | | | | | | | | | | अकालिक सेवा-निवृत्ती |
| विशेषतः | | | | | | | | | | |
| काम करीत असताना .. | ९७ | ५४ | १४ | ८८ | २७ | ४८ | ५० | ७० | १४० | १३८ |
| दूरध्वनी .. | | ८ | | | | ८ | | ४३ | | |
| परिचारिकेविषयी .. | | ७ | | | | २२ | | २७ | | |
| मेडिकल .. | | | | | ८ | १८ | | | २९ | |
| शिक्षकाविषयी .. | | | | | ११ | | | | ६२ | |
| शासकीय व कारकुनीविषयक | | २९ | | | | | | | २० | १३८ |

तीव्र स्वरूप प्राप्त होते. नुकतेच एका मेट्रनने अनौपचारिकरीत्या काढलेले उद्‌गार विचारात घेण्यासारखे आहेत. बाळंतपणाच्या रजेनंतर रात्रपाळीवर त्या प्रथमच आल्या होत्या. त्यांनी आपली एक शंका लेखिकेला विदित केली: "खरेच कोहो बाळाच्या टाळूला मांजराने चाटू नये ?" माझ्याकडून उत्तर येण्यापूर्वीच दुसरीने उत्तर दिले, "घाबरता कशाला ? त्याचे वडील आहेतच की जवळ त्याला बघायला !" मेट्रन उद्‌गारल्या, "हे ! त्यांची काय ग्वाही द्यावी ? झोपून जातील झाले. माझे मन अर्धे बाळाकडे अन् अर्धे कामाकडे अशी स्थिती आहे माझी." मुलाचे प्रत्यक्ष वडील घरात असूनही ही परिस्थिती !

अर्थार्जन करणाऱ्या मातांच्या दृष्टीने अविभक्त कुटुंब हे एक वरदानच म्हटले पाहिजे आणि 'कुटुंब' ह्या प्रकरणात पाहिल्याप्रमाणे त्यांनी हे स्वतःच कबूल केले आहे. आप्तस्वकीय हे मुलाकडे अधिक आपुलकीने पाहतात. परंतु ह्या नमुन्यातील २०३ माता विभक्तपणे रहात असल्यामुळे त्यांना मुलांची काळजी वाटणे स्वाभाविक आहे. नोकर अगर आया ठेवून–विश्वसनीय माणूस मिळणे कठीणच–अथवा दुसरी काही व्यवस्था करून मुलाला संभाळण्याची सोय करतात. एका श्रमिक महिलेने नुकत्याच ठेवलेल्या बाईची हकीगत सांगितली. आठ दिवसांपूर्वीच त्यांनी रेडिओ खरेदी केला होता. कचेरीतून घरी येऊन पहातात तो रेडिओचे यंत्र चालू पण तो मात्र जळून गेलेला ! नव्या नोकराची करामत ! अशा तऱ्हेने विविध प्रसंगांना तोंड देत देत श्रमिक महिला दोन आघाड्या काही काळ संभाळीत असते. अनेक कारणांकरिता तिला नोकरी सोडता येत नाही. त्याचबरोबर ती सुशिक्षित असल्यामुळे आपल्या मुलाच्या शारीरिक व मानसिक गरजांकडे पुरे लक्ष देता येत नाही ह्याची तिला खंत वाटते व तिचे मन तिला सारखे टोचत असते ! स्वाभाविकच आहे, की ८८ प्रतिसादी स्त्रियांनी पाळणागृहे किंवा शिशुगृहांची मागणी करावी.

सरकारी कायद्यानुसार ज्या कारखान्यात ५० किंवा अधिक स्त्रिया काम करतात तेथे पाळणागृह असलेच पाहिजे, परंतु अशा प्रकारची व्यवस्था कचेऱ्यांतून काम करणाऱ्या स्त्रियांसाठी नाही. ग्लॅक्सो लॅबोरेटरीज ह्या औषधांच्या कारखान्याला जेव्हा लेखिकेने स्वतः भेट दिली तेव्हा लहान बाळे पाळणागृहात मजेने बागडताना पाहून फार आनंद वाटला. परंतु हा कारखाना कोणत्याही रेल्वे स्टेशनापासून दूर असल्यामुळे बऱ्याचशा उपनगरात रहाणाऱ्या मातांना लहान मुलाला सकाळी आठाच्या अगोदर इतक्या लांब घेऊन येणे गैरसोईचे वाटत असल्यामुळे त्या घरीच काही-तरी व्यवस्था करतात. श्रमिक महिलांवरील ताण कमी करण्याकरिता आणि तेणेकरून अधिक कार्यक्षम श्रमिक बनण्यास, स्थानिक मोठ्या रेल्वे स्टेशनजवळ पाळणागृहे व शिशुगृहे उघडली जातील अशी स्थानिक अगर महिला संस्थांनी तरतूद करावी.

तीन महिला संस्थांनी अशी पाळणागृहे चालविली आहेत. परंतु ती नेहमीच इतकी भरलेली असतात की प्रवेश नाकारण्यात येतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन

लेखिकेने मुंबई महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांच्या बरोबर अनौपचारिक चर्चा केली. त्यांनी सांगितले की महानगरपालिका एक दोन पाळणागृहांना अनुदान देते आणि लोकांची तशी जोरात मागणी आल्यास तिचा सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल.

वाहतुकीच्या अपुऱ्या साधनांची व आरोग्याची समस्या, अल्पकालिक काम आणि/किंवा प्रमाणतः सवलतीसहित अकालिक सेवानिवृत्ती हे सर्व प्रश्न, भूमिकांचा संघर्ष ह्या मुख्य समस्येशी निगडित आहेत. वाहतुकीच्या समस्येचा मागेच विचार केला आहे. चौदा स्त्रियांनी किरकोळ तक्रारी केल्या, त्या बहुतेक व्यक्तिगत परिस्थितीमुळे असाव्या. ही संख्या इतकी अल्प आहे की त्यांना तितकेसे महत्त्व देता येत नाही.

एकशेचाळीस, अगर ९ टक्के प्रतिसादी स्त्रियांनी अंशकालिक कामाची मागणी केली. ही मागणी करणाऱ्यांमध्ये डॉक्टर व शिक्षिका होत्या. एकशेअडतीस शासकीय विभागात काम करणाऱ्या भगिनींना सेवानिवृत्तीची वेळ येण्यापूर्वीच नोकरी सोडाविशी वाटते. आयुष्याच्या उत्तर काळात–आणि ह्यांपैकी २३ अगर १७ टक्के भगिनी ४० वर्षांवरील आहेत–स्त्रीच्या लक्षात येऊ लागते की दोन्ही आघाडीवर परिश्रमाचे जीवन कंठण्यात आपली शक्ती शोषली जाते. अधिकाऱ्याच्या जागेवर असलेल्या एका बाईने म्हटले, "माझ्या दोघा भावांना मी वाढविले आणि त्यांना शिस्त लावली. आता ते यशस्वी आयुष्यक्रम घालवीत आहेत. परंतु माझ्याच मुलांच्याकडे मी तितके लक्ष आणि वेळ देऊ शकले नाही !" उलटपक्षी शिक्षणखात्यातील शासकीय विभागात काम करीत असलेल्या बाई म्हणाल्या, "मला दोन्ही आघाड्या चांगल्या रीतीने संभाळता आल्या. माझी मुले पूर्ण स्वावलंबी झाली आहेत. एक तांत्रिक शाखेत पदवीधर झाला आहे व दुसरा त्या मार्गावर आहे."

पुरुषस्त्रियांना समानतेचे तत्त्व लागू असल्यामुळे अकालिक सेवानिवृत्तीची मागणी अधिकारीवर्गाकडून फेटाळली जाण्याचा संभव आहे. ह्यावर पुढील प्रकरणात अधिक विचार केला जाईल.

सत्तावीस प्रतिसादी स्त्रिया बदली होणारी नोकरी आहे म्हणून तक्रार करतात. बदली झाली की स्त्रीच्या कौटुंबिक जीवनात कसा गोंधळ उडत असेल त्याची कल्पना करणे वाचकांवरच सोपविते. पुरुष बदलीच्या ठिकाणी पत्नीसहित मुलांना घेऊन जाऊ शकतो. पण स्त्रीबरोबर तिचा पती कसा जाईल ? एकतर तिला नोकरी सोडावी लागते किंवा कौटुंबिक स्वास्थ्याचा त्याग करावा लागतो. 'इकडे आड तिकडे विहीर!'

अशी ही व्यवसायांची आणि भूमिकांची गुंतागुंत आहे. परंतु स्त्री ही प्रांगणात उतरली आहे आणि आता घड्याळाचे काटे मागे फिरविता येत नाहीत त्याप्रमाणे ती माघारी परतू शकत नाही. टागोर म्हणतात, "बदल हा निसर्गाचा नियम आहे", पण पुढे ते म्हणतात, "परंतु काही गोष्टी शाश्वत आहेत." व्यवसाय हा "शाश्वतात" जमा होत नाही.

## संदर्भ


१. जी. एस्. घुर्ये, कास्ट, क्लास ॲण्ड ऑक्युपेशन (१९६२), पा. २९३.
२. डी. आर्. गाडगीळ, वुइमेन् इन द वर्किंग फोर्स इन इंडिया, (१९६५), पा. २७.
३. मॉर्टन एम्. हण्ट, "दी डायरेक्शन ऑफ् फेमिनाइन एव्होल्युशन्", एस्. एम्. फार्बर ॲन्ड आर्. एच्. एल्. वुइल्सन, दी पोटेंशिअल ऑफ् वुमन (१९६६), पा. २६६.
४. फार्बर ॲन्ड वुइल्सन्, वरील ग्रंथ, पा. २६८.
५. सोव्हिएत रिव्ह्यू, ७ मार्च १९६७, पा. २७.
६. वरील पुस्तिका, पा. ३६.
७. एडमन्ड जे. किंग, 'एज्युकेशन ॲन्ड सोशल चेन्ज्' (१९६८), पा. १६८.
८. लाइफ्: वर्ल्ड लायब्ररी, स्कॅन्डिनेव्हिया, पा. ८९.
९. ॲना-लिझा कॅल्हेस्टन, स्वीडन टुडे, पा. ८०-८१.
१०. ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिस, वुइमेन इन् ब्रिटन, पा. २.
११. जे. ब्रॅव्हेल व्यूरो, दि जपानीज् वुइमेन् (१९५७).
१२. इस्राएल् टुडे, "वुइमेन् इन् इस्राएल्" इन् इस्राएल् डायजेस्ट (१९६४), पा. ११.
१३. रिपोर्ट आफ् दी एज्युकेशन कमिशन (१९६६), पा. ३१४.
१४. सेन्सस् ऑफ् इंडिया १९६१, "महाराष्ट्र" व्हॉल्यूम्X, पार्ट II-बी (ii), पा. ५०६.
१५. सेन्सस् ऑफ् इंडिया १९६१, व्हाल्युम्X.
१६. युनायटेड् नेशन्स् वर्ल्ड एकॉनॉमिक् सर्व्हे (१९६५), पा. ४८.
१७. "श्रमिक वयोमानातील अर्थार्जनाचे काम करण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण बरेच कमी आहे–अंदाजे ५० टक्के–इतक्या गृहिणींना बाहेर काम करण्याची इच्छा नाही किंवा बाहेरील व्यवसाय त्या घेऊ शकत नाहीत."–ब्रिटन १९६६, पा. ४२५.
१८. सेन्सस् ऑफ् इंडिया १९६१, "महाराष्ट्र" व्हॉल्युम्X, पार्ट II-बी (ii), पा. ३.
१९. "इंटरनॅशनल् वुइमेन्स् डे", सोव्हिएट रिव्ह्यू, व्हॉल्युम्IV, नं. १८, मार्च १९६७.
२०. वरील मासिक, पा. ५.
२१. "पूर्वेकडील स्त्रियांचा दर्जा दलित होण्याची तीन मुख्य कारणे नेसेटने (इस्राएलची लोकसभा) राज्याच्या सुरवातीच्याच काळात

कायद्याने दूर केली; सतरा हे विवाहाचे किमान वय ठरविण्यात आले–जर कोणी ह्या कायद्याचा भंग केला तर जबरदस्त शिक्षा केली जाई; द्विभार्या हा फौजदारी गुन्हा ठरविण्यात आला–हा कायदा मुसलमान व सेफॅर्डिक ज्यूंनाही लागू; आणि पाच ते चौदा वर्षांपर्यंत मुलामुलींना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण–पूर्वेतील क्रांतीकारक सुधारणा."–इस्राएल् टुडे, "वुइमेन् इन इस्राएल्", पा. १४-१५.

२२. युनेस्को, दी चेंजिंग सोशल पोझिशन ऑफ् वुमन इन् जपान (१९६१), पा. १२६-२७.

२३. व्यवसाय व धंदा ह्यांच्या अनुषंगाने विविध देशांत निरनिराळ्या प्रकारे वर्गवारी केली आहे, हे आगाऊच नमूद केले आहे. उदाहरणार्थ यू. के. ने धंदा ह्या सदराखाली पुरुषांची नोंदच केली नाही.

२४. प्रा. आर्. एल्. व आय्. एच्. सिम्पसनस् ह्यांनी "बौद्धिक" व "शारीरिक" ह्यांत पुढील भेद केला आहे: "दुसऱ्या प्रकारच्या व्यवसायात कारागीर वगैरे, यंत्रकलाभिज्ञ, धातूंचे काम करणारे कारागीर, यंत्रचालक आणि तत्सम श्रमिक, 'सर्व्हिस' देणारे श्रमिक, शेतीवर काम करणारे, शेतकरी व शेतीची व्यवस्था पहाणारे, शेतीवरील मजूर आणि मुकादम".–आर्. एल्. सिम्पसन अ‍ॅन्ड् आय्. एच्. सिम्पसन, सोशल ऑक्युपेशन अ‍ॅन्ड् बिहेव्हिअर (१९६४), पा. ६९.

२५. एफ्. इव्हॅन् नी, दी एम्प्लॉइड मदर इन् अमेरिका (१९६३), पा. १९, ३१, ३३.

## प्रकरण ७ वे

# अन्य भूमिका आणि मूल्ये

आधुनिक काळातील स्त्रीला फार गुंतागुंतीच्या जीवनाला तोंड द्यावे लागते कारण तिला विविध प्रकारच्या भूमिका घ्याव्या लागतात. मातृत्वाचे तिचे प्राथमिक व जैविक कार्य हळूहळू मागे पडू लागले असून ती जागा निरनिराळ्या उद्योगांनी भरून काढली जात आहे. पूर्वीच्या काळातील आदर्श स्त्रीचे चित्रण कालिदासाने कसे केले आहे पहा :

गृहिणी सचिवः सखी मिथः ।
प्रियशिष्या ललिते कलाविधौ ॥[1]

पत्नी ही कार्ये करिते : ती गृहिणी तर असतेच, सल्लागार पण असते. तिच्यासारखी दुसरी कोणी मैत्रिण नाही. घरातल्या विविध कला पण ती पतीपासून शिकून घेते.

पण ही तिची कर्तव्ये आपला पती आणि त्याचे कुटुंब इतपतच मर्यादित होती. सध्या विविध पैलू असलेल्या मानवाचे स्थान तिला लाभत आहे—पुरुषाची, व्यक्तिशःच नव्हे तर सामाजिक रीत्या, सर्व क्षेत्रांतील समान जोडीदारीण ती बनू पहात आहे. तिची ही जीवनपद्धती विविध क्षेत्रांत कशी विकसित होत आहे हे मागल्या प्रकरणांतून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. व्यवसायाची भूमिका, त्यातील गुंतागुंत व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या हा मागल्याच प्रकरणाचा विषय आहे. ह्या प्रकरणात तिच्या उरलेल्या भूमिकांची पहाणी करून शेवटी त्यांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

तुलना करण्याकरिता घेतलेल्या सर्व देशांमध्ये स्त्रीपुरुष हा भेद न करता सर्वांना प्रौढ मतदानाचा हक्क आहे. परंतु फार पूर्वीपासून लोकशाही व्यवस्था असलेल्या स्वित्झर्लंडमध्ये अजूनही स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आला आहे.[2] यू. एन्. कमिशन ऑन् दी स्टेटस् ऑफ् वुइमेनच्या* एकोणिसाव्या बैठकीच्या अहवालात म्हटले आहे : "स्त्रियांच्या राजकीय हक्कांविषयी घटना, निवडणुकीचे कायदे व इतर कायदेशीर साधने ह्यांत दिलेल्या माहिती संबंधाने जनरल असेंब्लीच्या विसाव्या बैठकीस सादर केलेल्या निवेदनपत्रकावरून (ए/६०३६) दिसून येते की ८ ऑक्टोबर १९६५ पर्यंत ११२ देशांत सर्व निवडणुकीस मतदान करण्याचा व उमेदवार म्हणून उभे रहाण्याचा स्त्रियांना हक्क आहे; ५ देशांत मतदानाच्या व निवडून येण्याच्या हक्कांवर मर्यादा आहेत पण तशा मर्यादा पुरुषांना नाहीत; आणि ९ देशांत स्त्रियांना मतदानाचा व निवडून येण्याचा हक्क नाही."[3]

---

* भारतानेही १९७१ साली नॅशनल कमिटी ऑन दी स्टेटस् आफ वुइमेन नेमली आहे.

स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत स्त्रियांना मतदानाचा हक्क सर्वप्रथम यू. के. मध्ये १८६९ साली देण्यात आला. परंतु जवळजवळ अर्ध्या शतकानंतर म्हणजे १९१८ साली ब्रिटिश स्त्रीला पार्लमेंटच्या निवडणुकीत मतदान करता येऊ लागले. यू. के. चे अनुकरण इतर लोकशाही राष्ट्रांनी केले. यू. एस्. एस्. आर्. विषयी लिहावयाचे म्हणजे १९१९ मध्ये जी साम्यवादी राजवट स्थापन झाली तिने राजकीय हक्कांच्याच काय परंतु इतर क्षेत्रांतही स्त्रियांना समान संधी दिली आहे. तथापि तेथली राजवट म्हणजे पक्षहुकूमशाहीच आहे हे निराळे सांगावयास नकोच. भारत, जपान व इस्राएल ह्या राज्यांनी लोकशाही व स्वतंत्र राज्य स्थापनेनंतर समानतेचे तत्त्व मान्य करून स्त्रियांना मतदानाचा व निवडून येण्याचा हक्क दिला.

व्यक्तिस्वातंत्र्याकडे आज मानवता झुकत आहे, निदान ते ध्येय तरी आहे. त्याचबरोबर व्यक्तीचे सामाजिक जीवन, विश्वास बसणार नाही इतके गुंतागुंतीचे होत आहे. ज्या राजकीय वातावरणात तो आज वावरत आहे त्याबाबतीत तर ते अधिकच खरे आहे. राज्याच्या उच्चतम पातळीवर जे निर्णय घेतले जातात व जे धोरण अमलात आणले जाते तेणेकरून व्यक्तीचे अंतर्बाह्य जीवन घडविले जात आहे. शिवाय सरकारचे कायदे बंधनकारक असतात ते निराळेच. अशा तऱ्हेने जर राजकारण इतके दूरगामी व महत्त्वाचे परिणामकारक ठरत आहे तर, लोकसंख्येचा जवळजवळ निम्मा भाग असलेल्या व मतदानाची संधी मिळालेल्या स्त्रीने सांघिकरीत्या प्रभावी कार्यभाग का उचलू नये ? युनायटेड् नेशन्स् कमिशन ऑन् दी स्टेटस् ऑफ् वुइमेन ह्या संस्थेने स्त्रीचे हे महत्त्व लक्षात घेऊन १९५२ व १९५३ साली युनेस्कोच्या डिपार्टमेंट ऑफ् सोशल सायन्सिस्ला एक पहाणी करण्याकरिता पुढील प्रश्नांची उत्तरे देण्याचे पाचारण केले : "कायद्याने मान्य केलेली स्त्रीपुरुष समानता ही प्रत्यक्षात कितपत उतरली आहे ? मान्य झालेल्या राजकीय विशेषाधिकारांचा स्त्रिया प्रत्यक्षात कितपत उपयोग करीत आहेत?" युनेस्को डिपार्टमेंटने फ्रान्स, दी जर्मन फेडरल रिपब्लिक, नॉर्वे आणि युगोस्लेव्हिया ह्या चार राष्ट्रांनी पाठविलेल्या अहवालावर तपशीलवार संशोधन केले. त्यावर केलेले स्पष्टीकरण आणि काढलेले निर्णय विचारात घेण्यासारखे आहेत. ते येथे देण्यापूर्वी, युनेस्कोने केलेल्या पहाणीला जवळजवळ वीस वर्षे उलटली असल्यामुळे परिस्थितीत काही सुधारणा झाली आहे का ते पाहूया.

स्त्री ही आपली राजकीय भूमिका कशी वठविते ह्याचा तपशीलवार अभ्यास करणे प्रस्तुत लेखिकेला अशक्य झाले, कारण उघडच आहे की सध्याच्या अभ्यासाचा हा मुख्य विषय नाही. म्हणून निरनिराळ्या देशांतील जी आकडेवार माहिती उपलब्ध आहे तिच्या भरीला युनेस्कोचा अहवाल आणि ह्या पहाणीत प्रतिसादी स्त्रियांनी, "राजकीय हक्कांची जाणीव कितपत आहे आणि त्यांचा वापर केला की नाही" ह्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून जे चित्रण दिसून येईल त्यावर समाधान मानावे लागेल. तक्ता ४२ मध्ये मागल्या प्रकरणात तुलना करण्याकरिता जे देश निवडले आहेत

त्यांमध्ये स्त्री-पुरुषांनी मतदान कितपत केले, त्या प्रत्येक देशात विधिमंडळाचे सभासद किती व त्यात स्त्रिया किती आणि अधिकारपदावर किती स्त्रिया आहेत ती सर्व माहिती दिली आहे.

आपण तुलनेकरिता जे देश निवडले आहेत त्यांपेक्षा युनेस्कोने निवडलेले देश भिन्न आहेत. तेव्हा 'अधिकस्याधिकं फलम्' असे आपणास म्हणता येईल. तक्ता ४२ कडे दृष्टिक्षेप केल्यास वाचकांच्या लक्षात पहिली गोष्ट येते ती ही की स्त्रियांना मतदानाचा प्रथमतः हक्क १९१८ साली यू. के. व यू.एस्. एस्. आर्. मध्ये देण्यात आला. १९१८ हे वर्ष खरोखरीच महत्त्वाचे आहे कारण त्या वर्षी पहिले महायुद्ध संपले. तसे पाहिले तर युद्धकाळात स्त्रियांनी केलेल्या मदतीचे मानचिन्ह म्हणूनच यू. के. मध्ये मतदान करण्याचा हक्क त्यांना मिळाला.

मालमत्ता अगर वर्ग ह्यावर अवलंबून नसणारा, हरएक वयात आलेल्या स्त्री-पुरुषाला मतदानाचा अधिकार प्राप्त होणे म्हणजे समानतेच्या तत्त्वाचा विजय असून त्याचे महत्त्व अखिल जगाच्या दृष्टीने आहे. जर्मनीमध्ये पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस सम्राट कैसरने राज्यत्याग केला आणि त्यानंतर १९१९ मध्ये तेथे लोकशाही राजवट प्रस्थापित झाली. पुढे थोड्याच वर्षांत हिटलरने आपल्या हातात सत्ता घेतली वगैरे ऐतिहासिक घटना सर्वपरिचित आहेत. पश्चिम जर्मनीमध्ये ५ मे १९५५ त जर्मन फेडरल रिपब्लिक अस्तित्वात येऊन लोकशाहीचा उदय पुनः झाला. दुसऱ्या महा-युद्धाचा शेवट झाल्यावर दुसऱ्याही काही देशांत लोकशाही प्रस्थापित झाली. उदाहरणार्थ, "३ मे १९४७ मध्ये अमलात आलेल्या घटनेने . . . सम्राटाच्या हातून सर्व राजकीय सत्ता काढून घेण्यात आली, सरदारकी रद्द केली, स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यात आला, लष्करात सक्तीने भरती केली जात होती ती काढून टाकली, खडे सैन्य ठेवले जाणार नाही आणि आंतरराष्ट्रीय कलह मिटविण्यास युद्धाचा मार्ग अवलंबावयाचा नाही, तसेच संपूर्ण विद्यास्वातंत्र्य व पाश्चात्त्य धर्तीवर 'बिल ऑफ् राइटस्' तयार करावयाचे"[४] असे जपानमध्ये जाहीर करण्यात आले.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर लोकप्रतिनिधींनी घटना तयार केली व ती २६ जानेवारी १९५० पासून अमलात आली. ह्या घटनेने वंश, पंथ अगर स्त्रीपुरुष निरपेक्ष सर्व २१ वर्षांवरील प्रौढांना मतदानाचा हक्क दिला.

तिसरा देश म्हणजे इस्त्राएल. १४ मे १९४८ मध्ये तेथे स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यसत्ता स्थापन झाली. तेथील नेसेट–पार्लमेंट–ने १९५१ मध्ये वुइमेन्स् इक्वल राइटस् लॉ पास करून स्त्रियांना मतदान दिले.

यू.एस्.एस्.आर्. व यू.के.सोडून बाकी सर्व देशांत २१ वर्षे पुरी झाल्यावर तो अथवा ती मतदानाच्या दृष्टीने प्रौढ होते.यू.एस्.एस्.आर्. व यू.के.मध्ये १८ हे कमीतकमी वय मान्य झाले आहे. उच्चतम विधीमंडळांना प्रत्येक देशांत वेगवेगळे नामाभिधान आहे.

अकरा राज्यांतील पुरुषांच्या राजकीय भूमिकेशी

| राज्ये | चार देशांतील–फ्रान्स, फेडरल जर्मन रिपब्लिक, नॉर्वे व युगोस्लेव्हीया–युनेस्कोने काढलेली माहिती | यू. के. | |
|---|---|---|---|
| कायदेमंडळांची नावे | | पार्लमेंट | |
| विधीमंडळांची नावे | | हाऊस ऑफ् कॉमन्स | हाऊस ऑफ् लॉर्डस् |
| १. स्त्रियांना मतदानाचा हक्क | | | |
| वर्ष | *१९१९,१९४५ | १९१८ | |
| मतदाराचे वय | २१ | १८ | |
| २. अलिकडील निवडणूक | | | |
| तारीख, महिना, वर्ष | ←१९४५ व १९५३ | २९-६-७० | |
| ३. विधीमंडळाच्या सभासदांची संख्या | | | |
| एकूण | | ६३० | १००० |
| स्त्री सदस्य | | २६ | ४० |
| % स्त्रिया : पुरुष | ५.०६ | ४.१ | ४ |
| ४. अलिकडील निवणुकीतील मतदारसंघ | | ३,५८,८४,७६० | |
| ५. अलिकडील निवडणुकीतील एकूण मतदान | | ७२-०० | |
| ६. मतदारांच्या प्रमाणात मतदान % | | | |
| ७. पुरुषांचे मतदान % | ८९.०७ | | |
| ८. स्त्रियांचे पतदान % | ८४.३० | | |
| ९. स्त्री-पुरुष मतदानातील फरक % | ५.८१ | | |
| १०. निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील व्यक्ती–पुरुष, स्त्रिया | | | ४४/४ |
| अ. मंत्रीमंडळातील मंत्री | | | १७/१ |
| ब. राज्यमंत्री | | | २३/३ |
| क. उपमंत्री | | | ४/- |
| ११. नियुक्त अधिकारपदावरील स्त्रिया | | | – |
| निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील स्त्रियांचे प्रमाण % | | | |
| निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील पुरुषांचे प्रमाण % | | | |

*फेडरल रिपब्लिक ऑफ् जर्मनीकरिता ←नॉर्वे व युगोस्लेव्हिया–दोघांसाठी १९४५

स्त्रियांच्या राजकीय भूमिकेची तुलना

| यू. एस्. ए. | | यू. एस्. एस्. आर्. | जपान | |
|---|---|---|---|---|
| कॉंग्रेस | | सुप्रीम सोव्हिएट | डाएट | |
| अ हाऊस ऑफ् रिप्रेझेन्टेटीव्हज् | सेनेट | | हाऊस ऑफ् रिप्रेझेंटेटिव्हज् | कौन्सिलस |
| १९२० | | १९१८ | १९१९ | १९१९ |
| २१ | | १८ | २० | |
| ३-६५ | १८-३-६६ | १४-६.७० | २७-१२-६९ | २०-९-६४ |
| ४३५ | १०० | १५१७ | ४८६ | २५० |
| १० | २ | ४६३ | १० | ११ |
| २.३ | २ | ३०.५ | २.३ | ४.४ |
| १००% | | १३,९९,५७,८०९ | | |
| ७८% | | १५,३१,७२,२१३ | | |
| ७८% | | | | |
| | १२/१ | | | |
| | १२/१ | | | २२/१ |
| | | १ | | २२/१ |

आधारग्रंथ : (अ) चार देशांतील युनेस्कोचे संशोधन. (ब) : स्टेटस्‌मन् इयरबुक १९७२.

| | राज्ये: | स्वीडन | भारत | |
|---|---|---|---|---|
| | कायदेमंडळाची नावे | डाएट | संसद | |
| | विधीमंडळांची नावे | | लोकसभा | राज्यसभा |
| १. | स्त्रियांना मतदानाचा हक्क | | | |
| | वर्ष | १९५० | १९५० | १९५० |
| | मतदानाचे वय | २१ | २१ | २५ |
| २. | अलिकडील निवडणूक | | | |
| | तारीख, महिना, वर्ष | २०-९-७० | २-७१ | |
| ३. | विधिमंडळातील सभासदांची संख्या: | | | |
| | एकूण सदस्य | ३५० | ५२४ | २४३ |
| | स्त्री सदस्य | | २२ | १६ |
| | % स्त्रिया : पुरुष | १३.७३ | ४.२ | ६.६ |
| ४. | अलिकडील निवडणुकीत एकूण मतदार संघ | | २४,९०,०३,३३४ | |
| ५. | अलिकडील निवडणुकीत एकूण मतदान | | १५,२७,२४,६११ | |
| ६. | मतदाराच्या प्रमाणात मतदान % | | ६१.३३ | |
| ७. | पुरुषांचे मतदान % | | ६६.७२ | |
| ८. | स्त्रियांचे मतदान % | | ५५.४६ | |
| ९. | स्त्री-पुरुष मतदानातील फरक % | | ११.२६ | |
| १०. | निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील | | | |
| | व्यक्ती–पुरुष, स्त्रिया | | | ५५/३ |
| | अ. मंत्रीमंडळातील मंत्री | १९/२ | | १७/१ |
| | ब. राज्यमंत्री | | | २१/१ |
| | क. उपमंत्री | | | १७/१ |
| ११. | नियुक्त अधिकारपदावरील स्त्रिया | | | |
| | निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील | | | |
| | स्त्रियांचे प्रमाण % | | | |
| | निवडून आलेल्यांतील अधिकारपदावरील | | | ४.८ |
| | पुरुषांचे प्रमाण % | | | ५.४ |

आधारग्रंथ : (चालू) : (क) टाइम्स् ऑफ् इंडिया डिरेक्टरी ( आँध्र व ओरिसा येथे

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/९२/१
मंडळ



| इस्राएल | भारत सर्व राज्ये मिळून | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| नेसेट | विधान | | विधान | |
| | सभा | परिषद | सभा | परिषद |
| १९५१ | १९५० | १९५० | १९५० | १९५० |
| २१ | २१ | २५ | २१ | २५ |
| ४-७१ | | | | ३-७२ |
| १२० | ३३१६ | ४४३ | २७० | ७८ |
| ११ | १२३ | १७ | २६ | २ |
| ९.१७ | ३.७ | ३.९ | ९.६ | २.६ |
| | २४,७१,०४,२१३ | | २,२१,४७,३१३ | |
| | १५,१७,९३,११७ | | १,४३,५९,५७७ | |
| | ६१.४३ | | ६४.८४ | |
| | ६७.२० | | ६९.२० | |
| | ५५.५१ | | ६०.१० | |
| | ७.६९ | | ९.१० | |
| | ३५११७ | | | |
| १४/१ | | | | २१/२ |
| १४/१ | | २ | | १ |
| | | २ | | १ |
| | | ३ | | – |
| | | ३.६१ | | ७.७ |
| | | २.०० | | ३.७ |

(मार्च १९७३ मध्ये राष्ट्रपती अंमल चालू झाला म्हणून प्रतिनिधींची संख्या जमेस धरली नाही)

यू. एस्. एस्.आर. व इस्राएल खेरीज सर्व देशांत दोन मंडळे आहेत.

युनेस्कोच्या अहवालानुसार वर उल्लेखिलेल्या चार देशांत शंभर पुरुषसदस्यांच्या प्रमाणात स्त्रीसदस्यांचे सरासरी प्रमाण ५.०६ हे आहे. १९५२-५३ मध्ये ही परिस्थिती होती. ह्या चार देशांची आकडेवार अद्यावत माहिती लेखिकेला मिळाली नाही. आज सतरा वर्षे उलटल्यानंतर वरील स्त्रीसदस्यांच्या प्रमाणात थोडी वाढ झाली आहे खरी परंतु इतर देशांमध्ये स्त्रीलोकसंख्येच्या अगर स्त्रीमतदारांच्या प्रमाणात ती वाढ झालेली नाही.

ब्रिटिश संसदेला संसदांची जननी असे संबोधिले जाते आणि ते खरेच आहे. ह्या दोन विधीमंडळांत कायदे करण्याबाबत अंतिम अधिकार चौदाव्या शतकाच्या मध्यकाळापासून प्राप्त झाले. आपल्या राष्ट्राच्या धोरणाला वळण देण्याची आणि ते अमलात आणण्याच्या ह्या ऐतिहासिक अधिकाराबद्दल प्रत्येक इंग्रजी नागरिकाला अभिमान वाटतो. असे असल्यामुळे त्या देशातील स्त्रियांना ह्या जबाबदारीची भागिदारी आपणासही मिळावी असे वाटणे स्वाभाविक आहे. १८६७ मध्ये स्त्रियांना मतदान करता यावे ह्या प्रश्नाने एका प्रमुख राजकीय समस्येचे रूप धारण केले. अनेक प्रकारचे शांततामय प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर आणि उदार पक्षाने फसविल्या-नंतर स्त्रियांच्या ह्या चळवळीने १९०५ मध्ये लढाऊ स्वरूप धारण केले. स्त्रियांनी सत्याग्रह सुरु केला व दोनशे महिलांनी वरचेवर उपोषणास प्रारंभ केला. एमिली डेव्हिसन व एलेन पिटफिल्ड ह्यांनी मृत्यूला आलिंगन दिले !

मागल्या पिढीतील ब्रिटिश स्त्रियांनी मताधिकार मिळविण्यासाठी केलेल्या ह्या चिकाटीच्या प्रयत्नांच्या मानाने आणि वर किंचित वर्णिलेल्या थरारक चळवळ करणाऱ्या स्त्रियांच्या मानाने गेल्या अर्धशतकात ब्रिटिश लोकसभेच्या अवघ्या ८१ स्त्रीसदस्य आणि २१ स्त्रीसदस्य राज्यसभेत असाव्या ह्याचे खरोखरच सखेदाश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही. शिवाय, "एक आजीव स्त्री सरदार व वंशपरंपरा सरदारकीचा मान मिळालेल्या बारा स्त्रियांपैकी फक्त तीनच स्त्रियांनी आपणांस हाऊस ऑफ् लॉर्डस्च्या बैठकीस बोलाविण्याचा लेखी हुकूम पाठवावा असा अर्ज केला आहे."[५] तसे पाहिले तर ह्या वरिष्ठ कायदेमंडळाच्या सभासदांची संख्या १००० आहे ! हाऊस ऑफ् कॉमन्सच्या सभासदांची संख्या ६३० आहे आणि २९ जून १९७० च्या निवणुकीनंतर ह्या मंडळात अवघ्या २६ अगर ४.१ टक्के स्त्रिया निवडून आल्या आहेत. एका सर्वात जुन्या प्रातिनिधिक सभेमध्ये स्त्रिया इतक्या अल्प संख्येने का असाव्या हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. तेव्हा उरलेल्या देशांतील एतद्विषयक परिस्थितीची पहाणी केल्यावर ह्या घटनेच्या कारणपरंपरेचा विचार करू.

युनायटेड् स्टेटस्मधली वास्तव परिस्थिती ह्यापेक्षा जास्त सुधारलेली नाही. आपल्या इंग्लीश भगिनींप्रमाणे अमेरिकन स्त्रियांनीही "डिक्लरेशन ऑफ् राइटस् ऑफ् मॅन्" ह्या जाहीरनाम्याच्या धर्तीवर १८४८ मध्ये "डिक्लेरेशन ऑफ् सेंटिमेंटस्"

मधून आपले विचार प्रगट केले होते. परंतु जेव्हा बहात्तर वर्षांचा काळ लोटला तेव्हा कुठे अमेरिकन स्त्रियांना आपले उद्दिष्ट प्राप्त करून घेता आले. असे असूनही जानेवारी १९६९ च्या निवडणुकीमध्ये फक्त १० किंवा २.३ टक्के स्त्रिया हाउस ऑफ् रिप्रेझेंटेटिव्हज् ( कनिष्ठ विधीमंडळ ) च्या जागा काबीज करू शकल्या. सेनेट (वरिष्ठ विधीमंडळ)च्या एकूण शंभर जागांपैकी दोन किंवा २ टक्के स्त्रीसदस्य आहेत.

रशियाने १९१८ साली समाजसत्तावादी राजवट सुरू केली. तदनुसार अठरा वर्षांवरील सर्व स्त्रीपुरुषांना मतदानाचा हक्क आहे. १९७० च्या निवडणुकीनंतर एकूण १,५१७ सभासदांपैकी ४६३, किंवा ३०.५ टक्के स्त्रीसभासद आहेत. इतर देशांशी तुलना करिता हे स्त्रीसभासदांचे प्रमाण सर्वांत अधिक आहे. त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की तेथे स्त्रियांचे प्रमाण सर्वांत अधिक व मतदानाचा हक्क अठरा वर्षांनंतर प्राप्त होतो. ह्या कारणामुळेही काही अंशी स्त्रियांचे प्रमाण अधिक असू शकेल. तथापि तेथील स्त्रिया राजकारणात अधिक संख्येने भाग घेतात व व्यवसायामध्येही जास्त प्रमाणात[६] आढळतात हे त्या देशास भूषणावह आहे.* परंतु स्त्रिया काय आणि पुरुष काय ह्यांना मतस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य कितपत आहे हे न बोलणेच इष्ट आणि असे स्वातंत्र्य असणे हे तर लोकशाहीचे प्राणच आहेत.

१९६९ च्या निवडणुकीनंतर जपानच्या कनिष्ठ विधीमंडळात १०, किंवा २.३ टक्के व वरिष्ठ मंडळात ११, किंवा ४.४ टक्के स्त्रीसभासद आहेत. इस्राएलच्या नेसेटमध्ये १९७१ च्या निवडणुकीनंतर १२० सभासदांपैकी ११, किंवा ९.१७ टक्के स्त्रिया असून त्या अभिमानाने सांगतात की "त्या सुसंगत रीतीने कार्य करीत आल्या आहेत."[७] तूर्त त्यांच्या पंतप्रधानकीचा मानही एका महिलेला त्यांनी दिला आहे.

इस्राएलच्या बाबतीत एक मुद्दा लक्षपूर्वक विचारात घेण्यासारखा आहे. १९५१ सालापासून जी मंत्रीमंडळे उदयास आली ती सर्व संयुक्त मंत्रीमंडळे असून आतापर्यंत त्यांचे कार्य व्यवस्थित व यशस्वीरीत्या चालू आहे. राष्ट्रीय हितसंबंधापुढे पक्षाचे राजकारण हे दुय्यम गणले जाते आणि आपल्या नवोदित राष्ट्राची झपाट्याने प्रगती होण्यासाठी ते एकजुटीने झटत आहेत. ह्या कार्यात स्त्रियाही आपापल्या परीने हातभार लावीत आहेत, अर्थात अल्पांशाने.

स्वीडनमध्ये एक विधीमंडळ असून मंडळाचे ३५० सभासद आहेत व त्यांत ५६स्त्रीसभासद आहेत. कायदे मंडळात हे प्रमाण अधिक म्हणजे १६ टक्के आहे. यू.एस्.एस्.आर्.च्या खालोखाल स्विस लोकांनाही अभिमानाने सांगता येईल की आम्ही राज्यकारभारात स्त्रियांना जास्त प्रमाणात भाग घेऊ देतो.

---

* विज्ञान व तंत्रशास्त्र ह्यांत ४५%, डॉक्टरीव्यवसायात ८०%, इंजिनिअर्स ३६% व वकील ३५% म्हणून स्त्रिया काम करतात. शिवाय अवकाशात उड्डाण करणारी एकमेव स्त्री रशियनच आहे.[६अ]

सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक राज्य म्हणून २६ जानेवारी १९५० मध्ये नवभारताचा जन्म झाला. आमजनता साक्षर नसूनही सुरवातीपासूनच भारताने प्रौढ मतदान मान्य केले आहे. राष्ट्रीय चळवळीमुळे एक प्रकारची राजकीय जागृती अगोदरच निर्माण झाली होती. तथापि १९५५ मध्ये युनेस्कोच्या अहवालाशी भारतीय मतदानाच्या प्रमाणाची तुलना करिता ते बरेच कमी आहे. त्यावेळी ८९.०७टक्के पुरुषांनी व ८४.३० टक्के स्त्रियांनी मतदान केले तर १९६७ मध्ये ६६.७२ टक्के भारतीय पुरुषांनी व ५५.४६ टक्के स्त्रियांनी मतदान केले. तसेच त्या देशांच्या बाबतीत स्त्रीपुरुष मतदानांतील अंतर ५.८१ टक्के होते तर भारताच्या बाबतीत हेच अंतर ११.२६ टक्के होते. यू. एस्. ए. मध्ये १९६६ साली ७८ टक्के पुरुषांनी मतदान केले होते. तेथील स्त्रीमतदानाचे प्रमाण तसेच इतर देशांतीलही स्त्रीपुरुष मतदानाचे आकडे उपलब्ध नसल्यामुळे अधिक तुलना करणे शक्य झाले नाही. ह्या सर्व आकड्या-वरून व तुलनेवरून इतके मात्र लक्षात येते की निरनिराळ्या राजकीय पक्षांचा प्रचार चालू असूनही भारतीय नागरिकांना आपल्या राजकीय हक्कांची पूर्ण जाणीव झाली नाही आणि त्यातल्यात्यात भारतीय महिलांना !

वरील निराशजनक वस्तुस्थितीच्या दिग्दर्शनानंतर सध्याच्या पहाणीतून उघडकीस आलेल्या आकड्यानी थोडेतरी समाधान निर्माण होते. अ गटातील १५३४ स्त्रियां-पैकी १,२६१ किंवा ८२ टक्के स्त्रियांना आपल्या राजकीय हक्कांची जाणीव होती. परंतु केवळ जाणीव अगर माहिती असणे म्हणजे ते हक्क बजावणे असा अर्थ होत नाही. त्याच गटातील १,०७० महिला एकवीस वर्षांवरील असल्यामुळे मतदानाचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होता. त्यांच्यापैकी ९८७ जणींनी मागील निवडणुकीत मतदान केले. म्हणजे मतदानाची टक्केवारी ९२.२४ इतके पडते. ब गटातील २५९ महिलांपैकी २१३ मतदानास पात्र होत्या आणि त्यांपैकी १६७ म्हणजे ७८.४ टक्के महिलांनी आपला हा हक्क बजाविला. अर्थातच अखिल भारतांतील स्त्रियांच्या मतदानाच्या प्रमाणापेक्षा (५५.४६ टक्के) आणि महाराष्ट्रातील प्रमाणापेक्षा (६०.१) ते निश्चितच अधिक आहे. ह्यावरून, नागरीकरण, मध्यमवर्गीय बौद्धिक वातावरण आणि शिक्षण ह्यांचा कसा परिणाम होतो ते दिसून येते. अ गटाच्या बाबतीत त्या स्त्रियांचा बाहेरील जगाशी अधिक संबंध येत असल्यामुळे राजकीय घडामोडीविषयी व आपल्या हक्कांविषयी त्या अधिक जागरूक बनतात असे म्हणता येईल.

मतदानाच्या बाबतीत स्त्रिया एकंदरीने पुरुषांच्या मानाने मागे पडतात आणि विशेषत: भारतीय स्त्रिया, हे वरील आकड्यांवरून दिसून येते. भारतीय स्त्रियांच्या बाबतीत त्यांची निरक्षरता, सार्वजनिक घडामोडींविषयीचे अज्ञान आणि परंपरागत मागासलेपणा ही कारणे असावी. अर्थात हे अनुमान आहे. तथापि यू. एन्. कमिशन ऑन् द स्टेटस् ऑफ् वुइमेन् ह्यांनी केलेल्या सर्वसामान्य विधानाचा आधार घेता येईल. ते विधान पुढीलप्रमाणे :"स्त्रियांच्या राजकीय हक्कांची संपूर्ण अंमलबजावणी होण्याच्या

आड ज्या कारणांचा निर्देश करता येईल ती येणेप्रमाणे–स्त्रियांमध्ये राजकीय जागृतीचा अभाव आणि आपल्या हक्कांचा वापर करण्याबाबतची उदासीनता आणि नाखुषी ही जबाबदार आहेत. शिवाय असाही उल्लेख आढळतो की स्त्रीउमेदवारालासुद्धा स्त्रिया मतदान करीत नाहीत."[८]

स्त्रियांच्या मतदानाचा राजकारणावर कितपत परिणाम होतो ह्याचासुद्धा युनेस्कोच्या अहवालात सविस्तर अभ्यास केलेला आढळतो. त्यांनी काढलेल्या निष्कर्षावरून अधिक प्रकाश पडू शकेल: "स्त्रियांच्या मतदानाविषयी केलेल्या ह्या अभ्यासावरून असे दिसून येते की स्त्रीमतदानाच्या हक्कापूर्वी जी परिस्थिती होती तिच्यामध्ये स्त्रीच्या मतदानाने फारसा बदल होत नाही. एकंदरीने पुरुष जसे मतदान करतात तसेच स्त्रिया करतात." तथापि "दोन महत्त्वाच्या वास्तव गोष्टींवर जोर दिलाच पाहिजे. एक, राजकीय चढाओढीत स्त्रियांच्या प्रवेशामुळे राजकीय पक्षांच्या धोरणावर दूरगामी परिणाम झाला असून त्यांच्या प्रचाराचा कल झुकला आहे . . . दुसरे, निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या सामर्थ्यात फारच थोडी तफावत असते, त्यामुळे मतदानात किंचित बदल झाला तरी कोणत्याही एका पक्षाचे बहुमत होत असते. काही विशिष्ट परिस्थितीत कोणते मंत्रीमंडळ स्थापन व्हावे ह्याचा निर्णय लावण्यास स्त्रियाच खरोखरी कारणीभूत होण्याचा संभव असतो."[९] तेव्हा युनेस्कोच्या अहवालानुसार स्त्रियांचे मतदान सार्थ ठरते तर !

१९७१च्या निवडणुकीनंतर भारतीय संसदेविषयी असे दिसून येते की लोकसभेच्या ५२४ सदस्यांपैकी २२ स्त्रिया असून राज्यसभेच्या २४३ एकूण सभासदांपैकी १६ महिला आहेत. ह्याचे टक्केवारी प्रमाण पहिल्यात ४.२ आणि दुसऱ्यात ६.६ असे येते. हे टक्केवारी प्रमाण युनेस्कोच्या अहवालातील आकड्यांपेक्षा, यु. के., यु. एस्. ए. व जपान ह्याही देशांतील प्रमाणापेक्षा निश्चित अधिक आहे; परंतु यू.एस्. एस्. आर्., इस्राएल व स्वीडनपेक्षा कमी आहे. तसेच संसदेतील स्त्रीसदस्यांच्या प्रमाणापेक्षा घटकराज्यांतील विधीमंडळांतील, त्यातल्या त्यात महाराष्ट्र सोडून, स्त्रीसदस्यांचे प्रमाण आणखीच कमी आहे. सभासदत्व किंवा लोकांचे प्रतिनिधित्व म्हणजे युनेस्कोच्या मते समाजशास्त्रीय अर्थाने "राजकीय नेतृत्व" आहे.[१०] युनेस्कोच्या अहवालात पुढील प्रकारची टीका आली आहे: "राजकीय नेतृत्वात स्त्रियांनी घेण्याच्या प्रत्यक्ष भागाबद्दल लिहावयाचे तर–तो अत्यंत अल्प आहे. निवडणुकीच्या बाबतीत पुरुषांच्या मानाने स्त्रिया संख्येने कमी मतदान करतात, तथापि दोघांच्या मतदानात अंतर फारच अल्प असते म्हणून स्त्रीपुरुष समानता प्रत्यक्षात उतरली आहे असे म्हणता येईल. उलटपक्षी नेतृत्वात खराखुरा भाग घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण उपहासास्पद अल्प आहे. उलट, बऱ्याच मोठ्या प्रमाणात मंत्री, विधीमंडळाचे सदस्य, उच्च श्रेणीचे अधिकारी, राजकीय पक्षांचे नेते व अत्यंत वजनदार गटाचे पुढारी पुरुषच असतात. राजकीय निर्णय घेणाऱ्या आणि राज्याचे धुरिणत्व चालविणाऱ्या ज्या समित्या असतात त्यात

क्वचितच स्त्रिया आढळतात. त्या फक्त मतदानाच्या योगे किंवा स्त्रियांच्या खास वजनदार संस्थांमार्फत अप्रत्यक्ष दडपण आणू शकतात. ह्या बाबतीत तरी स्त्रीपुरुष समानता निश्चितच प्रस्थापित झालेली नाही; उलट अजूनही बरीच विषमता आढळते."[११] वरील अहवालात १९५५ साली जे निष्कर्ष काढण्यात आले तेच निष्कर्ष भारतासहित इतर देशांच्या बाबतीत १९७० सालीसुद्धा खरे आहेत.

सध्या उच्च श्रेणीतील अधिकारपदावर स्त्रियांची संख्या किती आहे ते पाहू. यू. के. मधील १९७० च्या निवडणुकीनंतर "एक मंत्रीमंडळातील मंत्री आणि तीन राज्यमंत्रीपदावर आहेत." यू. एस्. एस्. आर्. मध्ये "१९६६ मध्ये प्रेसिडिअम् ऑफ् द सुप्रीम सोव्हिएटच्या उपाध्यक्ष आणि प्रेसिडिअम् ऑफ् द सुप्रीम सोव्हिएट ऑफ् दी उझबेक रिपब्लिकच्या अध्यक्ष एक स्त्री आहेत." स्वीडनमध्ये एकही स्त्री मंत्री-पदावर नाही. इस्राएल व भारत ह्यांनी मात्र पंतप्रधानकीचा मान स्त्रीला दिला आहे. गेली सात वर्षे राष्ट्राचे धुरीणत्व चालवित असताना श्रीमती गांधींनी स्त्री-सुलभहृदयतेने बांगलातील निर्वासितांना आश्रय दिला; भारत-पाक युद्धात यश मिळविले; सर्वांत कळस म्हणजे भारताचे धोरण शांतताप्रियतेचे आहे हे सिद्ध करण्याकरिता डाक्का जिंकताच आपणहून दोन्ही आघाडीवर युद्ध थांबविले, अशा भारतीय स्त्रियांना अभिमानास्पद झालेल्या स्त्री पंतप्रधानांना लंडनच्या सन्डे "टाइम्स मॅगझिनने नवभारताची निर्माती, लोकशाहीची रक्षणकर्ती व पाकसैन्याचे निर्दालन करणारी स्त्रीमूर्ती" म्हटले आहे. दोन्ही नवोदित राष्ट्रे एकाच वर्षी जन्मास आलेली. दोन्ही राज्यांनी लोकशाही राज्यव्यवस्था मान्य केलेली. पण एक विस्ताराने अती लहान पण धडाडीने फार पुढे तर दुसरे आकाराने मोठे परंतु धडपडणारे असा दोहोंत फरक आहे. पंतप्रधानकीच्या खालोखाल केंद्रीय सरकारात एक राज्यमंत्री व राज्य सरकारात एक मंत्री व एक राज्यमंत्री आहेत. शिवाय मध्यवर्ती व राज्यांच्या पातळीवर प्रत्येकी तीन उपमंत्री आहेत. महाराष्ट्रात दोन महिलांना हे पद मिळाले आहे. उच्च पदावर फक्त भारतातच स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. परंतु स्त्रीपुरुष प्रमाण फार कमी आहे. "स्त्रियांना राजकीय हक्क देण्याबाबत कायद्याच्या दृष्टीने जरी बरेचसे साध्य झालेले असले तरी कायद्याची अंमलबजावणी करणाच्या बाबतीत पुष्कळच करावयाचे उरले आहे हे मान्य झाले आहे. उच्च पदावर स्त्रियांची संख्या किती कमी आहे हे आपल्या देशातील परिस्थितीवरून अनेक प्रतिनिधींनी सांगितले आहे. त्याचबरोबर हेही ध्यानात घेण्यात आले आहे की पंतप्रधानकीची जागा आशियामध्ये दुसऱ्यांदा (सध्या तिसऱ्यांदा) स्त्रीने विभूषित केली आहे. सार्वजनिक हुद्याच्या अधिकारपदाच्या बाबतीत कायदा आणि वास्तवता ह्यांमध्ये बराच भेदभाव आढळतो असे सदस्यांचे मत पडले. परंपरा आणि पूर्वग्रह ह्यांच्या विरुद्ध स्त्रियांना अजूनही झगडावे लागते व तेच त्यांच्या राजकीय व इतर हक्कांच्या आड येते हेही त्यांनी मान्य केले."[१४]

भारत व इस्राएल ह्यांच्यासारख्या नवोदित राष्ट्रांतच नव्हे तर यू. के. व यू. एस्. ए. सारख्या विकसित व पुरातन लोकशाही देशांतसुद्धा, की जेथे राजकीय हक्क मिळविण्याकरिता सतत लढा द्यावा लागला, तेथेही स्त्रियांची अशी स्थिती वर वर्णिल्याप्रमाणे का असावी ? युनेस्कोच्या अहवालात गुणात्मक व संख्यात्मक बाजूंचे मूल्यमापन करून आणि प्रस्तुत प्रश्नाच्या अंगोपांगांचे पृथक्करण करून दोन कारणे जबाबदार धरली आहेत. "व्यापक अर्थाने सरकार ह्या शब्दाचा अर्थ लाविल्यास, परिस्थिती अजिबात वेगळीच आढळून येते. येथे स्त्रियांची भूमिका अत्यंत अल्प असून त्याहीपेक्षा जसजसे राजकीय नेतृत्वाच्या 'मध्यबिंदू'कडे आपण वळतो तसतशी ही भूमिका आणखीनच कमी होत जाते . . . संख्येने तर अल्पच परंतु राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने, तसे म्हणावयाचे तर, स्त्रियांचा ओढा गुणात्मक दृष्टचा खास वेगळाच आढळतो. येथे स्त्रीपुरुषांच्या वागण्यात तीव्र स्वरूपाचा फरक दिसून येतो पक्षनेतृत्वात, उच्च श्रेणीच्या अधिकारपदावर, संसदेत व राज्यकारभारात ज्या स्त्रिया आहेत त्या, आरोग्य, शिक्षण, मातृत्व, कुटुंबकल्याण, गृहनिर्मिती वगैरेसारख्या, प्रश्नांवर म्हणजे सर्वसाधारणपणे जे स्त्रियांच्याच आवडीचे विषय आहेत त्यांवर आपले लक्ष केंद्रित करतात. प्रथमदर्शनी, इतक्या मर्यादेपर्यंतच राजकीय जीवनात स्त्रियांनी भाग घेण्याची ही पहिली लाट आहे आणि हळूहळू ती ओसरू लागेल व त्या आपले क्षेत्र व्यापक करतील असे वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिती हे आशावादी स्पष्टीकरण खोटे ठरविते; आतापर्यंत ही विशिष्ट प्रवृत्ती निश्चितपणे वाढल्याची चिन्हे दिसत आहेत.

"राज्याच्या खऱ्या नेतृत्वात (राज्यव्यवस्थेत), म्हणजे राजकीय निर्णयाच्या प्रत्यक्ष परिश्रमपूर्वक अंमलबजावणीत स्त्रियांचे फारच थोडे परिणामकारक वजन पडते ह्याचे पहिले कारण, पुरुषांचा विरोध . . . पूर्वीप्रमाणेच आताही राजकीय नेतृत्वाच्या बाबतीत नेहमीच फार मोठी चुरस चालू असते. उदाहरणार्थ, स्थानिक पक्षाच्या सभासदांतून नेत्याची निवड, ह्या नेत्यांतून निवडणुकीकरिता उमेदवाराची पसंती, संसदेच्या सभासदांतून मंत्रीपदाकरिता किंवा संसद समितीकरिता सभासदाची निवड", येथे स्त्रियांपेक्षा पुरुषांचीच वर्णी लागते. "स्त्रियांना ह्या निवडीत न घेण्याच्या कारणांवर फार परिणामकारक समर्थनाचे पांघरूण घातले जाते. असे प्रतिपादिले जाते की, राजकारण हे निसर्गतःच पुरुषांना अनुरूप क्षेत्र आहे. त्या क्षेत्रात अगदी अपवादात्मक परिस्थितीत आणि स्पष्ट निश्चित मर्यादेतच फक्त स्त्रियांना प्रवेश देण्यात यावा."[१५]

"तीव्र चुरस" हेच नेमके कारण महाराष्ट्रराज्याच्या विधानसभेच्या स्त्रीसभासदांनी स्वतंत्रपणे पुढे मांडले हे खरोखरच लक्षात घेण्यासारखे आहे. लेखिकेने ह्या सभासदांची मुलाखत घेतली त्यावेळी राजकीय नेतृत्व व त्यांत स्त्रियांचा अभाव ह्या मुद्याची चर्चा केली होती. १९६७ च्या निवडणुकीनंतर विधानसभेच्या २७०

सभासदांपैकी अवघ्या ९ स्त्रिया निवडून आल्या. मंत्रीपदाविषयी त्या म्हणाल्या : "गटांमध्ये गट असतात. महाराष्ट्रराज्यात सत्तावीस जिल्हे आहेत. हरएक जिल्ह्यातील प्रत्येक गट आपल्या उमेदवारास मंत्रीपदापर्यंत ढकलण्याचा प्रयत्न करतो. ह्या रस्सीखेचीमध्ये स्त्रिया कुठल्याकुठे जातात !" थोडा वेळ गेल्यानंतर लेखिकेचा प्रश्नविषयक आग्रह पाहून त्यांपैकी एकजण उत्तरल्या : "आणि तुम्हाला माहीतच आहे की राजकारण हा चित्तवेधक खेळ असला तरी घाणेरडा खेळ आहे !"

ठीक आहे. पण ह्या परिस्थितीला स्त्रिया स्वतःच जबाबदार आहेत. "राजकीय जीवनात स्त्रियांनी भाग घेण्याच्या विरुद्ध पुरुषांचे कितीही धूर्त समर्थन असले तरी स्त्रियांनी जर त्या विरोधाचा कसून प्रतिकार केला असता तर पुरुषांना यश आले नसते. परंतु सर्वसाधारणपणे हा प्रतिकार सौम्य असतो आणि तो अल्पसंख्याक गटातर्फे केला जात असल्यामुळे त्याला भरघोस यश येत नाही. राज्यकारभाराच्या नेतृत्वात स्त्रियांचा थोडाच भाग असतो ह्याला मुख्यत्वे त्यांचेच निष्क्रियत्व जबाबदार आहे."[१६] स्त्रियांनी इतर राजकीय पक्षांपासून स्वतंत्र तथापि राष्ट्रीय एकीकरण, तरुणांतील असंतोष, लोकसंख्येची समस्या, कुटुंबनियोजन, आमजनतेतील निरक्षरता वगैरे, अशा महत्त्वाच्या आवश्यक प्रश्नांवर आपले स्वतंत्र पण निःपक्षपाती मत तयार करून ते सरकार व जनता ह्यांच्यापुढे मांडण्याकरिता एक स्त्रीदल–पक्ष–का स्थापन करू नये ?

ह्याच्याच अनुषंगाने जागतिक शांतता आणि स्वातंत्र्याच्या कार्यासाठी आंतर्‌-राष्ट्रीय पातळीवर स्त्रिया काय करीत आहेत ह्याचा वाचकांना थोडक्यात परिचय करून दिल्यास अप्रस्तुत ठरणार नाही.

दी वुइमेन्स्‌ इंटरनॅशनल लीग फॉर्‌ पीस अॅन्ड फ्रीडम्‌ ह्या संस्थेची स्थापना १९१५ साली झाली. तेव्हा १९६५ मध्ये ह्या संस्थेने सुवर्णमहोत्सव साजरा केला. त्यावेळी संस्थेच्या पन्नास वर्षांच्या कामाचा आढावा घेणारा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला. त्यात म्हटले आहे: " . . . ऐतिहासिक घडामोडीतून निर्माण होणाऱ्या बदलत्या समस्यांच्या बाबतीत लीगचे धोरण सुसूत्रपणाचे होते. . . . वुइमेन्स्‌ इंटरनॅशनल लीग फॉर्‌ पीस अॅंड फ्रीडम्‌ संस्थेच्या दोन पुढारी, जेन अॅडॅम्स्‌ आणि एमिली ग्रीन बाल्च –यू. एस्‌. ए. मधल्याच दोघीही–ह्यांना नोबल शांतता पारितोषक लाभले ह्यावरूनच संस्थेची उच्च ध्येये व कार्यक्षमता दिसून येते. आणि ह्या कार्याला बाहेरूनही मान्यता मिळाली आहे."

पुढे म्हटले आहे : ". . . आंतर्‌राष्ट्रीय आणि राष्ट्रीय शाखेतून अशा समस्या सोडविण्यासाठी मदत करण्याचे काम ह्या संस्थेने हाती घेतले आहे आणि संस्थेचा त्या बाबतीतला विक्रम वाईट नाही. परंतु आंतर्‌राष्ट्रीय 'शांततेचे धोरण' साध्य करण्याचा जो आमचा महत्त्वाचा उद्देश आहे त्यात प्रत्यक्ष फलप्राप्ती होणे कठीण आहे हे अमान्य करता येत नाही. तथापि अशी आमची खात्री आहे की, वुइमेन्स्‌ इंटरनॅशनल लीग

फॉर पीस अ‍ॅन्ड फ्रीडम् ह्यासारख्या संस्थांमार्फत आणि दुसऱ्या मार्गांनीही प्रयत्न झाल्याशिवाय नव्या व शांतताप्रधान जगाचा विकास होण्यासारखे वातावरण निर्माण होणार नाही अशी आमची पूर्ण खात्री झाली आहे."[१७]

इतर देशांतील कार्याबरोबरच १९२९ पासून वरील स्त्रियांच्या संस्थेने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत लक्ष घातले. "डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. च्या कार्यकारी मंडळाने मे १९३२ मध्ये 'मातृभूमीला स्वातंत्र्य मिळावे अशी इच्छा असणे हाच गुन्हा केल्याबद्दल' पन्नास हजार भारतीयांना तुरुंगात टाकण्यात आले ह्याचा जोराने निषेध केला. ज्यांनी फौजदारी गुन्हा केला नाही त्या राजकीय कैद्यांना तात्काळ सोडून देण्यात यावे; वटहुकूम रद्द करावे आणि नेहमीच्या कायद्यानुसार कारभार चालवावा; तसेच तुरुंगात असलेल्या भारतीय प्रतिनिधींबरोबर पुनः समेटाची बोलणी सुरू करावी. डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. च्या सभासद मिसेस् मार्गारेट कझिन्सनी पुढाकार घेऊन ऑक्टोबर १९३२ मध्ये जिनिव्हा येथे भारताच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली, त्यामध्ये १५ देशांतून २६ संस्थांचे प्रतिनिधी हजर होते. भारतासाठी एक कायम समिती नेमण्यात आली आणि डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. च्या प्रतिनिधी एमिलाइन पेथिक लॉरेन्स् व मॅडेलाइन रोलंड हजर होत्या. मिसेस् कझिन्स् भारतात परतल्यावर वटहुकूमांच्या खाली त्यावेळी जो राज्यकारभार चालू होता त्याविरुद्ध सार्वजनिक भाषण करण्याची बंदी नाकारल्यावरून त्यांना एक वर्षाच्या कारागृहवासाची शिक्षा सुनावण्यात आली . . . ". "ऑगस्ट १९३३ मध्ये डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. च्या ब्रिटिश शाखेने–विशेषतः निःशस्त्रीकरण परिषदेने हवेतून बॉम्ब टाकण्यास मनाई केली असताना व त्या परिषदेचे तसे प्रयत्न चालू असतानाही–एका भारतीय खेड्यावर ब्रिटिश फौजेने बॉम्ब टाकल्याबद्दल आपला तीव्र निषेध प्रगट केला."[१८]

शांततेचे वातावरण निर्माण करण्याचे साधन म्हणून, "डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्.च्या कार्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे मुळापासून–बालपणापासून–(योग्य) शिक्षण देणे; 'जिवंत प्राण्याबद्दल आदर' हा लहानपणापासून उत्पन्न केला पाहिजे आणि हा उत्पन्न करण्याचे काम स्त्रियांच्याच हातात मुख्यत्वे आहे हे उघडच आहे. 'जागतिक मैत्रीकरिता कला' ही आंतरराष्ट्रीय चळवळ राजकीय मर्यादा व ध्येय उल्लंघून लौकरच जोरात वाढीस लागली. १९५३ च्या सुमारास (पोलादी पडद्याच्या दोन्ही बाजूंकडे) ३२ देशांतून २०,००० चित्रे फिरविण्यात आली . . . प्रौढांच्या पातळीवर 'जिवंत प्राण्याबद्दल आदर' उत्पन्न करण्याकरिता युद्धातच नव्हे तर फाशीची शिक्षा देण्याचा राज्याचा परंपरागत हक्क विसंगत आहे; तसेच जगणे इतका प्रत्येकाला किमान न्याय हक्क आहे हे मान्य झाले पाहिजे . . . शिवाय, अण्वयुगात 'सुरक्षिततेचे' एकमेव वास्तव साधन म्हणून संपूर्ण व सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाच्या दृष्टीने अण्वस्त्रे व अस्त्रकसोटी रद्द करण्याची आवश्यकता प्रतिपादन करणारी

डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. ही कदाचित एकमेव संस्था असावी."[१९]

"तिसरे महायुद्ध टाळणे ह्यापेक्षाही उच्चतर ध्येय डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. ने आपल्या पुढे ठेविले आहे. मानवी कल्याण वास्तवतेत उतरविणे आणि शांतता प्रस्थापित करणे म्हणजे युद्ध न होऊ देणे इतकेच नव्हे तर न्याय, स्वातंत्र्य आणि सर्वांनाच समृद्ध जीवन लाभणे हा आमचा हेतू आहे."[२०]

"१९६३ च्या कार्यकारी मंडळाने व्यक्त केल्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघ ही खरीखुरी जागतिक राजकीय संघटना म्हणून विकसित व्हावी ही डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. ची सध्याची विचारसरणी आहे : राजकीय तसेच कायद्याचे तंटे मिटविण्यासाठी आणि जेथे शक्य तेथे जबरदस्तीशिवाय, आमूलाग्र सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यास परिणामकारक अशी संयुक्त राष्ट्रसंघ ही आंतर्राष्ट्रीय यंत्रणा झाली पाहिजे."[२१]

"सर्व राष्ट्रांची सर्वसामान्य हितसंबंधींची भूमिका अजून निश्चित व्हावयाची आहे आणि ती मान्य होण्याची शक्यता दूरच आहे. ह्या शतकाचे ते विशिष्ट कार्य आहे. ह्या मोठ्या शैक्षणिक व सामाजिक शांतताप्रधान क्रांतीमध्ये, वुइमेन्स् इंटर-नॅशनल लीग फॉर पीस ॲन्ड फ्रीडमचा आवाज गेल्या अर्धशतकाप्रमाणेच दुसऱ्या अर्धशतकातही खात्रीने ऐकला जाईल."[२२]

ह्या संस्थेच्या भारतीय शाखेपासून काही भरीव कामगिरी अपेक्षू नये का ?

राजकीय क्षेत्रात अवघ्या पन्नास वर्षांपूर्वी स्त्रीने पाऊल टाकले. ती बरोबरीने भाग घेत नाही हे वर दिसून आलेच आहे. तथापि राज्याच्या व आंतर्राष्ट्रीय पातळीवर ज्या स्त्रिया जागृत झाल्या आहेत त्या अल्पसंख्याक का असेनात परंतु भरीव काम करीत आहेत. डब्ल्यू. आय्. एल्. पी. एफ्. च्या पाऊलावर जर बहुसंख्य स्त्रियांनी पाऊल टाकले तर शांतता साध्य होण्यास नक्कीच परिणामकारक हातभार त्या लावू शकतील.

कोणत्याही क्षेत्रांत स्त्रियांची श्रेष्ठ पद गाठण्याची पात्रता पहावयाची असल्यास बौद्धिक व धार्मिक क्षेत्रांत ती पुरुषाची बरोबरी करू शकते हे जरी खरे तरी अलि-कडेसच तिला पुढे येण्याची संधी मिळाल्यामुळे प्रमाणतः ती बरोबरी करू शकलेली नाही.

नोबल पारितोषक म्हणजे व्यक्तीच्या कर्तृत्वाचा श्रेष्ठतम सत्कार असे समजले जाते आणि ते पारितोषिक देण्याची सुरवात झाल्यापासून असा बहुमान दोनदा मिळविण्याचा योग एकदाच एका व्यक्तीला लाभला आणि तोही एका स्त्रीला.

| | | | |
|---|---|---|---|
| १९०३ | पदार्थविज्ञानशास्त्र | .. | मेरी क्यूरी व पेरी क्यूरी. |
| १९११ | रसायनशास्त्र | .. | मेरी क्यूरी. |
| १९३१ | शांतता | .. | जेन ॲडॅमस्. |
| १९३८ | वाङमय | .. | पर्ल बक |

१९४६ शांतता .. एमिली ग्रीन बाल्च्.
१९६३ पदार्थविज्ञानशास्त्र .. मरिआ जिओपार्ट माया.
१९६४ रसायन शास्त्र .. डोरोथी क्रॉफूट हॉजकिन.

रॉयल सोसायटीची फेलो मेम्बरशिप मिळविण्याची चुरस बुद्धिमान लोकांमध्ये चाललेली असते आणि येथेसुद्धा ६३२ सदस्यांमध्ये १६ स्त्रियांना हा मान मिळाला आहे.

'राणीचे सल्लागार' हाही एक बहुमान समजला जातो आणि तो मिळण्यास कायदेज्ञानाची व विद्वत्तेची आवश्यकता असते. तीन स्त्रियांनी हा मान मिळविला आहे.

ऐहिक क्षेत्रातील बहुमानापेक्षा अगदीच वेगळ्या क्षेत्रांतील म्हणजे ख्रिस्ती धर्मक्षेत्रात १९६७ साली पोप पॉलनीं पहिल्यांदाच दोन स्त्रियांना—सेंट टेरेझा व सेंट कॅथराइन— डॉक्टरस् ऑफ् चर्च ही पदवी बहाल केली.

∴

राजकीय समान हक्क तत्त्वतः मान्य झाले असले तरी प्रत्यक्षात ते कसे विरळ होत जातात हे आपण पाहिले. राजकीय हक्कांबरोबरच सामाजिक व कायद्यांच्या दृष्टीने स्त्रियांनी समानतेची मागणी केली होती. भारतासंबंधी लिहावयाचे तर हे हक्क मिळविण्यासाठी समाजसुधारकांचे व स्त्रियांच्या संस्थांचे प्रयत्न चालू होते. भारतातील लोकसंख्येत ८३ टक्के हिंदू आहेत.[२३] हिंदू कायद्यात स्त्रियांच्या दृष्टीने अनेक प्रतिकूल कलमे होती. ती फटक्यासरशी १९५५ च्या हिंदू विवाह कायदा व १९५६ च्या हिंदू वारसा कायद्याने दूर केली. मुसलमान व ख्रिश्चन जमाती-व्यतिरिक्त इतरांना हे कायदे लागू आहेत. त्यांच्यामुळे समाजरचनेत आमूलाग्र बदल झाला आहे. तथापि त्यांचे दूरगामी परिणाम एकदोन पिढ्यांनंतरच अजमाविता येतील. तरीसुद्धा हिंदू विवाह कायद्याची प्रतिसादी स्त्रियांवर कशा प्रकारची प्रतिक्रिया झाली आहे हे "विवाहविषयक परिस्थिती" ह्या प्रकरणात पडताळण्याचा काहीसा प्रयत्न केला आहे तेव्हा वारसा कायद्याबद्दलचे प्रतिसाद येथे पाहूया.

जर एखादा हिंदू मृत्युपत्र न करता मरण पावला तर त्याची मालमत्ता त्याची विधवा, आई, मुलगे व मुली—मग त्या अविवाहित अगर विवाहित असोत—ह्या सर्वांमध्ये सारखी विभागली जाते. ह्यामुळे मुलगा व मुलगी ह्यांना समान पातळीवर आणण्यात आले. "मात्र हे लक्षात घेण्यासारखे आहे की कलम ६ नुसार स्त्रीवारस प्रत्यक्ष विभागणी मागू शकत नाही", न्यायाधीश मुल्ला अधिक स्पष्टीकरण करतात : "हिंदू वारसा कायदा १७ जून १९५६ पासून अमलात आला. हिंदूंच्या विनामृत्युपत्र वारसाहक्का-विषयीच्या कायद्यांत येणेकरून दुरुस्ती करण्यात आली असून तो क्रमवार संग्रहित करण्यात आला आहे. त्यामुळे वारसापद्धतीत आमूलाग्र सुधारणा झाली आहे. जरी त्यायोगे परंपरेचा जबरदस्त भंग झालेला असला तरी ज्या युगात थोर ध्येये प्रवर्तित होत आहेत आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय सिद्धांतात झपाट्याने बदल होत

आहे त्या युगाला शोभेसा आहे . . . वारसा मिळण्याच्या हक्काविषयीच्या कायद्याला प्रस्तुत कायद्याने एकजिनसी व व्यापकपणा आणला असून दायाभाग व मिताक्षर शाखा तसेच दक्षिणेकडील काही भागातील मरू मख्खट्टयम्, अलीयसंतन आणि नंबुद्री हिंदू पद्धतींनाही लागू पडतो."[२४] पूर्वीच्या कायद्यानुसार जर मुलगा नसेल तरच मुलीला बापाची मालमत्ता मिळत असे. ह्या कायद्याने समान वारसाहक्क मिळवून दिला आहे.[२५] परंतु आपल्याला पितृसत्ताक पद्धतीची सवय आहे आणि ह्या पहाणीनुसार ३० टक्के कुटुंबे अविभक्त आहेत त्याअर्थी असे वाटत होते की ह्या पद्धतीला हिंदू वारसा कायद्याने अप्रत्यक्ष हादराच बसेल. आजकाल उद्योगधंद्यासाठी स्थलांतर, व्यक्तिवाद, धर्मातीतता, स्त्रियांचे स्वातंत्र्य हे घटक अविभक्त कुटुंब पद्धतीवर हल्ले चढवीतच आहेत. अशा परिस्थितीत वरील कायद्याची भर कितपत पडत असेल हे अजमावणे कठीण आहे. तरीपण "मालमत्तेचा वारसा हक्क मुलगी, पत्नी व आई ह्यांना नुकताच मिळाला आहे तो तुम्हाला माहीत आहे का ?" असा प्रश्न पहाणी करीत असताना विचारिला होता. त्याचे उत्तर ९८१, किंवा ६३ टक्के अ गटातील स्त्रियांनी आपल्याला ह्या कायदेशीर हक्कांची माहिती आहे असे सांगितले. १८९, किंवा १२ टक्के महिलांनी 'काहीशी' माहिती आहे असे सांगितले तर ५ टक्के स्त्रियांनी माहिती नाही असे उत्तर दिले. उरलेल्या २० टक्के जणींनी प्रश्न तसाच ठेवून दिला. पहाणीच्या बाबतीत ज्या मदतनीस भगिनी होत्या त्यांनी ह्या कायद्यांतील सवलतींचे स्पष्टीकरण करण्याची खास काळजी घेतली होती.

ह्या स्त्रियांना आपल्या हक्कांची केवळ जाणीवच आहे असे नव्हे तर २१७, किंवा १४ टक्के महिलांनी कन्येचा हक्क बजाविलाही आहे. ह्याच्या उलट ८५८, किंवा ५६ टक्के महिलांच्या बाबतीत एक तर मालमत्ता नसावी किंवा त्यांचे वडील आणि /अगर पती हयात असल्यामुळे मालमत्तेची वाटणी करण्याचा प्रसंगच आला नसावा. ह्या व्यतिरिक्त ३३ कन्यांचा खास उल्लेख करणे अवश्य आहे. ह्या मुलींनी वडिलांच्या मालमत्तेतील आपणाला मिळणारा भलामोठा हिस्सा घेण्याचे नाकारिले. त्याचबरोबर ही पण वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे की अवघ्या २८ टक्के[२६] प्रतिसादी स्त्रिया उत्पन्नावरील कर भरीत आहेत म्हणजे वरच्या उत्पन्नाच्या गटात समाविष्ट होतात. तेव्हा आपला हिस्सा नाकारणाऱ्या स्त्रियांनी केलेल्या स्पष्टीकरणाचा उल्लेख दिल्यास अप्रस्तुत ठरणार नाही :

"माझ्या वडिलांनी माझ्यासाठी शक्य तितके केले आहे. मी हा हक्क बजावणार नाही."–दोन दुय्यम शिक्षिका.

"मी माझा हक्क खुषीने सोडून दिला."–एक प्राथमिक शिक्षिका आणि टेलिफोन ऑपरेटर.

"आम्ही आमचा हिस्सा मागितला नाही."–एक घटस्फोटित दुय्यम शिक्षिका.

"वडिलांच्या जमिनीचा हिस्सा मागण्याची इच्छा नाही."–एक विधवा प्राथमिक

शिक्षिका.

"वडिलांनी मला पुरेसे दिले आहे आणि ह्या पुढे ते जे काही देतील त्यात मला समाधान आहे. माझा हक्क बजाविण्याची माझी इच्छा नाही."– बँकेतील एक सॉर्टर. दुसऱ्या एका स्त्रीने जवळजवळ असेच म्हटले आहे.

"मला तशी आवश्यकता नाही."–एक दुय्यम शिक्षिका व कारकून.

"जीवन हे देवाणघेवाणीवर आधारलेले आहे. तुम्ही फार ओढून धरू नये व आपला हक्क काटेकोरपणे बजावू नये. आयुष्यात सुखी व्हावयाचे असेल तर तडजोड करावयास शिकले पाहिजे आणि असाच माझा विश्वास आहे."–बँकेतील एक अधिकारी.

"मी आईवडिलांचा संबंध तोडला आहे."–एक आंतर्धर्मीय विवाहित अधिकारी.

"कन्या म्हणून मला घेण्यापेक्षा देणेच अधिक आहे."–वकिलीचा व्यवसाय करणारी एक विवाहित स्त्री.

"आवश्यकता नाही."–दोन प्राध्यापिका.

"माझ्या हिश्याची मागणी केली नाही."–एक डॉक्टर.

"इच्छा नाही."–दुसऱ्या एक डॉक्टर व एक प्राध्यापिका.

"आईवडील माझी वाटणी मला देत होते परंतु मी ती घेतली नाही."–एक प्राथमिक शिक्षिका.

ज्या तेहतीस स्त्रियांनी आपला हक्क सोडला त्यांपैकी वरील एकोणीस महिलांनी वरीलप्रमाणे उत्तरे दिली आहेत. उरलेल्या चौदा जणींनी कोणतीही कारणे सांगितली नाहीत.

कन्येला समान वारसा हक्कासंबंधाचा प्रश्न ब गटातल्या स्त्रियांना निराळ्या शब्दांत विचारला होता: "मुलीला समान हक्क देण्यासंबंधाचा हिंदू वारसा कायदा तुम्हाला पसंत आहे का ?" दोनशे एकोणसाठांपैकी एकशेसत्त्याण्णव, किंवा ७६ टक्के स्त्रियांनी हा हक्क पसंत आहे असे म्हटले तर २५, अगर १० टक्के स्त्रियांनी नापसंती दर्शविली. ब गटातल्या उरलेल्या स्त्रियांनी उत्तर दिले नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की नवप्राप्त हक्कांची माहिती स्त्रियांना तत्त्वतः झाली आहे परंतु थोड्याच जणींच्या बाबतीत हिस्सा मागण्याइतपत मालमत्ता, विशेषतः वडिलांची मालमत्ता असू शकते. ज्या तितक्या नशिबवान आहेत त्यांतील काही आपला हिस्सा नाकारीत असतात.

ख्रिश्चन जमातीला १९२५ चा इंडियन सक्सेशन कायदा लागू पडतो. त्याप्रमाणे: "एखादा ख्रिश्चन मृत्युपत्र केल्याशिवाय मरण पावला व त्याच्या मागे त्याची विधवा व मुले अगर त्याचे वंशज असल्यास, विधवेला मृताच्या मालमत्तेचा एकतृतियांश वाटा मिळतो व उरलेला दोनतृतियांश मुले अगर त्यांचे वंशज ह्यांच्यात वाटला जातो . . . कायदा मुलगे आणि मुली असा भेद करीत नाही."

मुसलमान मुलींच्या बाबतीत : "कन्या ही वाटेकरी अगर शेषाधिकारी असते. जर मुलगा नसेल तर हिस्सेदार म्हणून तिला निम्मा वाटा मिळतो आणि एकापेक्षा अधिक मुली असल्यास सर्वांना मिळून दोनतृतियांश मिळतो . . . जर सुनी मुसलमानास एक मुलगा व एक मुलगी असेल तर पुढीलप्रमाणे मालमत्ता विभागली जाते : मुलाला दोनतृतियांश, मुलीला एकतृतियांश शेषाधिकारी म्हणून."[२७] ज्याअर्थी ९ टक्के अहिंदूंपैकी कुणीही आपल्या हक्कासंबंधी प्रश्नाला उत्तर दिले नाही त्याअर्थी त्यांची प्रतिक्रिया कशी झाली असावी हे सांगणे कठीण आहे.

सर्व अ गटातील १,५३४ स्त्रिया ह्या श्रमिक महिला आहेत हे वाचकांना अवगत आहे. त्यांचा दिवसाचा बहुतेक वेळ त्यांनी पत्करलेल्या कामात जातो. सद्यःपरिस्थितीत मध्यमवर्गीय गृहिणीला तसेच कुमारिकेलाही नोकरी अगर व्यवसाय संभाळण्या-व्यतिरिक्त स्वयंपाकच नव्हे तर इतर गृहकृत्येही उरकावी लागतात. दोन पिढ्यांपूर्वी मध्यमवर्गीय स्त्री, बरोबर कोणी घेऊन आणि तेसुद्धा धार्मिक अगर लग्नमुंजीसारख्या प्रसंगानिमित्त बाहेर पडत असे. आता परिस्थिती बदलली आहे. मुलीला शाळा, कॉलेज आणि तदनंतर नोकरी अगर व्यवसाय हा सर्वसाधारण तिचा जीवनक्रम, असे सरसहा समजण्यात येते. घराबाहेर पडून अर्थार्जन करण्याच्या संधीची किंमत मात्र गृहिणीला फार मोठी द्यावी लागते आणि ती फार महागात पडते हे तिला जाणवते ! उदाहरणार्थ, नोकरमाणूस नसल्यास पहाटे रांगेत उभे राहून तिला दूध आणावे लागते. रेशन आणण्याची पाळीही बहुधा तिच्यावरच येते. कारण, विविध प्रकारच्या धान्यात निवड करावयाची हे यजमानांना जमणे कठीण. तीच गोष्ट भाजीपाल्याची. त्यातच आपली मुले पुढे यावी ह्याची तिलाच सदा तगमग. म्हणून ती वेळेवर शाळेत जातात की नाही, त्यांचा अभ्यास होतो की नाही इकडेही तीच लक्ष देते. हा तिचा दैनंदिन जीवनक्रम. त्यात वेळेवर ऑफिसला जावयाचे. म्हणूनच ८४०, किंवा ५५ टक्के प्रतिसादी श्रमिक स्त्रियांनी आपला बाहेरील कामाव्यतिरिक्त सर्व वेळ गृहकृत्यात खर्च होतो असे म्हटले आहे. ४३.३ टक्के[२८] भगिनी अविवाहित आहेत ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे विवाहित गृहिणीला फुरसदच नसते हे समजून येईल. कमावत्या मुलीला तितका ताण पडत नाही. कारण आई अगर घरांतील वडीलधारी मंडळी तिच्याबद्दल सहानुभूती बाळगत असल्यामुळे तिच्यापासून गृहकृत्यांतील मदत थोडीच अपेक्षिली जाते. आधुनिक काळातील संधीचा काही मुली भलताच फायदा घेण्यास 'शिकल्या आहेत' आणि अभ्यास वा काम ह्या गोंडस नावाखाली बाहेर वेळ काढीत असतात ह्याची जाणीव लेखिकेला आहे. तरी बरे, शॉपस् असिस्टंटस् ॲक्ट आणि सरकारी नियम ह्यांमुळे सायंकाळी ७ वाजल्यानंतर स्त्रियांना उद्योगधंद्याच्या ठिकाणी अगर कचेरीत रहाता येत नाही.

अविवाहित मुलींच्या विरुद्ध विवाहित स्त्रियांची परिस्थिती असते. घरकाम तर आहेच परंतु त्यात पाहुणे आल्यास त्यांची बडदास्त ठेवावी लागते. एक अधिकारी

बाई म्हणाल्या भेटी देणे घेणे आणि सामाजिक समारंभास हजर रहाणे ह्यांत इतका वेळ जातो की स्वतःची अशी घटकाही मिळत नाही.

रिकामपण मिळो वा न मिळो १,०४२, किंवा ६८ टक्के स्त्रियांना वाचनाचा छंद आहे. अनेक स्त्रीपुरुषांना वाचनाची आवड असते. ही आवड कुठेही आणि केव्हाही पुरवून घेता येते. परंतु बऱ्याच जणांचे वाचन निरर्थक, केवळ वेळ घालविण्यासाठी असते, हेतुपुरःसर नसते. एखादी कादंबरी अगर नाटक माणसाने वाचू नये असे नव्हे. परंतु गुप्तपोलिसांच्या अगर शृंगारिक कथा सतत वाचल्याने विपर्यस्त मनोवृत्ती निर्माण होण्याचा संभव असतो, विशेषतः संस्कारक्षम वयात.

आधुनिक मराठी वाङमयात स्त्रीचे चित्रण कसे केले जाते ते पाहू या. डॉ. संत : "आजच्या स्त्रीपुढील विविध समस्यांचे चित्रण आजच्या वाङमयात होत आहे काय ? हा या संदर्भात विचारात घेण्यासारखा प्रश्न आहे. त्याचे उत्तर पूर्णपणे होकारार्थी देता येणे अशक्य आहे. असे का व्हावे, हे शोधावयास गेले तर त्याचे उत्तर आज सर्वत्र रूढ असलेल्या विशिष्ट वाङमयीन ध्येयवादात, तसेच बहुसंख्य लेखक-लेखिकांच्या विविक्षित आत्मकेंद्रित व अतिरिक्त व्यक्तिवादी प्रवृत्तीत सापडेल. आजचे साहित्य हे लेखकांकडून प्रामुख्याने साहित्य म्हणूनच निर्माण होत आहे, व तसेच ते निर्माण व्हावे असा विचार आज चांगलाच बद्धमूल झाला आहे, आणि त्यास तसा विरोध करण्याचे कारण नाही. पण साहित्याचे साहित्यत्व कशात असते ? ते घडवीत असलेल्या जीवनदर्शनात असते, का लेखकास प्रतीत होत असलेल्या मानसिक कोलाहलात असते ? आजच्या बहुसंख्य लेखकांचे मत दुसऱ्या बाजूने पडेल. आज व्यक्तिवादाला व त्यातही आत्मकेंद्रित व्यक्तिवादाला उधाण आले आहे. हा व्यक्तिवादही आमच्या जीवनातून निर्माण झालेला नाही तर परकीय वाङमयाच्या अनुकृतीत त्याची बीजे आहेत. तो समाजविन्मुखच आहे. राजसंस्थेने समाजवादी समाजरचनेचे ध्येय पुढे ठेवलेले आहे, पण बहुसंख्य लेखकांना त्याचे आवाहन पोचत नाही. त्याऐवजी आत्म-केंद्रित व्यक्तिवादच त्यांना जवळचा वाटतो. कारण त्यांच्यापुढे ठेवल्या जाणाऱ्या वाङमयीन ध्येयवादाला तो जवळचा आहे."[२९]

एका पोक्त दुय्यम शिक्षिकेने प्रश्न टाकला, "काहो, हरएक मासिकावरील मुख-पृष्ठाचे चित्र एखाद्या मोहक स्त्रीचेच का असावे?" बाजूला असलेल्या दुसऱ्या शिक्षिकेने तत्परतेने उत्तर दिले, "वाचकांचे लक्ष वेधून मासिकाचा खप व्हावा हा व्यापारी हेतू. दुसरे काय ?" धंद्याचा दृष्टिकोन असो की काहीही असो, वस्तुस्थिती अशी आहे की लोकांची अभिरुची हिणकस होत जाते !

"शिक्षणतज्ञांनी तसेच लोकमत बनविणाऱ्यांनी भाषेला—विशेषतः वाङमयीन भाषेला—लोकमत वळविण्याचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून फार महत्त्व दिले आहे. बीभत्स वाङमय, वेश्यावृत्तीसंबंधी साहित्य तर सोडूनच द्या, कौमार्यावस्थेमध्ये सतत डोळ्यांसमोर असल्यास लैंगिक बाबतीत एक प्रकारची अनुदारवृत्ती निर्माण होते.

आणि भावी जीवनात त्याची प्रतिक्रिया म्हणजे स्त्रीपुरुष संबंधाविषयी कोमल अगर उत्कृष्ट भावना निर्माण होऊ शकत नाहीत. तेव्हा कुणालाही इतकेच म्हणता येईल की बालकांच्या ग्रंथसंग्रहात उत्तेजक तसेच परपीडनात्मक वाङमय असू नये." शिवाय प्रा. शहा म्हणतात: "म्हणून तरुणांचे शिक्षणतज्ञ (शिक्षक नव्हेत), मानसशास्त्रज्ञ, समाजसेवक आणि तरुणांचे प्रतिनिधी ह्यांनाच, व न्यायाधिशांना नव्हे, अशा प्रश्नां-संबंधी (बीभत्स वाङमय) निर्णय देण्याचा अधिकार असावा."[३०]

शिवाय, इंग्रजी वाङमयाच्या वाचकांच्या सवयीविषयी विचार करता हल्लीची पिढी ज्या प्रकारचे वाङमय सध्या वाचीत असते ते पाहून आश्चर्यच वाटते. जर आपण अधिक लक्षपूर्वक विचार केला तर असे दिसून येते की ही प्रवृत्ती सर्वत्र आढळून येते. नैतिक मूल्ये आणि जीवनविषयक मूलभूत तत्त्वे ज्यात ध्वनित केली आहेत असे उत्कृष्ट कलात्मक वाङमय तितक्या झपाट्याने खपत नाही. ह्याच्या उलट, ज्या वाङमयात मारामारी, रक्तपात आणि रहस्य आहे असे वाङमय झटदिशी खपत असते. हीच प्रवृत्ती भारतातही अलिकडेस पसरू लागली आहे. म्हणूनच शिक्षणतज्ञांनी व मानस-शास्त्रज्ञांनी येथे लक्ष देणे अवश्य आहे.

'टाईम' ह्या साप्ताहिकात ह्या विषयावर पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे: प्रकाशित झालेल्या पुस्तकांचे दोन भाग केले आहेत, एक कथेतर व दुसरा कथा. पहिल्या पैकी १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेले 'दि पॉकिट बुक ऑफ् बेबी अ‍ॅन्ड चाइल्ड केअर' ह्याचा सर्वांत जास्त खप १,९०,७६,८२२ आणि शेवटचा क्रमांक (२५) 'दि स्टोरी ऑफ् द बायबल' १९०४ मध्ये बाहेर पडलेले, त्याचा खप ३०,००,००० होता. कथांच्या यादीत पहिला क्रमांक १९५६ च्या पीटन प्लेसला मिळाला. त्याचा खप ९९,१९,७८५ व १९४७-५२ च्या दरम्यान मिकी स्पिलेनची सात पुस्तके व एकंदर प्रती ३,४५,७०,९५८. त्यानंतर अर्स्किन कोल्डवेलची १९३३-३५ मधली तीन पुस्तके व त्यांच्या एकंदर प्रती १,६७,८२,५८५ काढल्या गेल्या. 'लेडी चॅटरलिज् लव्हर' ह्या १९३२ च्या शृंगारिक पुस्तकाचा पाचवा क्रमांक व त्याच्या प्रती ६३,२६,४७०.[३१]

इंग्रजी भाषेव्यतिरिक्त इतर देशी वा परदेशी भाषेतील वाङमयासंबंधी लेखिका काही अधिकृतरीत्या लिहू शकत नाही. मराठी मातृभाषेचा विचार केल्यास वरच्या-सारखीच परिस्थिती आहे. विचार परिप्लुत ग्रंथ हाताच्या बोटांवर मोजण्याइतके बाहेर पडत असतील वा नसतील. बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांवर मात्र वाचकांच्या उड्या पडतात. आतापर्यंत त्या लेखकाने ५३६ रहस्यकथा लिहिल्या आहेत व प्रसिद्ध केल्या आहेत.

या पहाणीतील प्रतिसादी स्त्रियांचा छंद वाचन हा असावा ह्यात नवल नाही. त्याच्या खालोखाल, शिवण, भरतकाम, विणकाम वगैरेमध्ये तीनशे, अगर १९ टक्के स्त्रियांचा फुरसदीचा वेळ जातो. अठ्ठ्यांशी स्त्रियांना क्लबात जाणे आवडते. मित्र-

मैत्रिणींना भेटी देण्यात ६९ स्त्रियांचा वेळ जातो. एकसष्ट स्त्रिया चित्रपट व नाटके पहाण्यात वेळ घालवितात. ही संख्या अगर ४ टक्केवारी फार अल्प वाटते. प्रत्यक्षात अनेकजणी चित्रपट पहात असाव्या, परंतु ज्याअर्थी इतक्या थोडया जणींनी त्याचा नामनिर्देश केला आहे त्याअर्थी त्यांच्या करमणुकीचे मुख्य साधन ते असावे. इतरही पहात असणारच पण तितक्या प्रमाणात नव्हे.

चलत्‌चित्रपट हे मनोरंजनाचे साधन आहे व राहीलही. १९६४ साली १,८२,५०,००,००० भारतीयांनी चित्रपट पाहिले असे 'स्टॅटिस्टीकल इयर बुक' मध्ये म्हटले आहे.[३२] वाचनाच्या अभिरुचीबद्दल वर जे म्हटले आहे ते अधिक प्रकर्षाने चित्रपटांच्या बाबतीत लागू पडते. खरे पहाता रिमांड होमच्या सुपरिटेंडन्सनी एकमताने पुढील मागणी केली आहे. तरी बरे लेखिका त्यांना निरनिराळ्या वेळी व भिन्न स्थळी भेटली होती.

"दिवसातून चार खेळ दाखविण्याची मनाई असावी. विद्यार्थी शालेय वा कॉलेजचे तास बुडवून सिनेमा पहावयास जातात. पाश्चात्य चलत्‌चित्रे आणि नाटकेही नकोत. उलटपक्षी वास्तव, पुरोगामी आणि योग्य अभिरुची वाढवणारे वाङमय व चित्रपट हवे." हे उद्‌गार कुमार कुमारिकांशी नित्य संबंध असलेल्या जबाबदार व्यक्तींच्या तोंडून आले आहेत. तेव्हा त्यांचा गंभीरपणे विचार व्हावयास हवा.

वरील अधिकाऱ्यांनी तरुण पिढीची नीतिमत्ता सुधारण्याच्या दृष्टीने दुसरेही काही उपाय सुचविले :

"बालपणापासून शिस्तीची सुरवात होते . . . आईवडिलांनी फाजील मुभा दिल्यास मूल बिघडण्याचा संभव असतो . . . समानतेची कल्पना हे एक दुसरे कारण आहे."

"बालकांना नागरिकत्वाची जबाबदारी, आरोग्याची माहिती आणि लैंगिक शिक्षण दिले पाहिजे . . . "

"नैतिक शिक्षणाची व्यवस्था पाहिजे."

"घरी तसेच शाळेमध्ये नैतिक व थोडेसे धार्मिक शिक्षण क्रमिक पुस्तकातून द्यावे."

"मुख्य गोष्ट म्हणजे मनोधैर्य कायम राखणे आणि त्या दृष्टीने शिक्षणाची पातळी उंचावणे."

"घरी व शाळेत नैतिक व धार्मिक शिक्षणाची आवश्यकता."

"विद्यार्थ्यांना आपल्यावरील अधिकाऱ्यांना मान देण्यास शिकविले पाहिजे."

"विद्यार्थ्यांनी काय करावे व काय करू नये हे लेखी निश्चित केले पाहिजे. . . ज्याअर्थी विद्यार्थ्यांना शिस्त लावणे अवश्य आहे त्याप्रमाणेच आपणही एक शिस्तीचे राष्ट्र व समाज म्हणून पुढे येण्याचा प्रयत्न केला पाहिजे. . . मुलींना फुरसदीचा वेळ उपयुक्त रीतीने कसा घालवावा हे शिकविले पाहिजे." इति.

पंचावन्न भगिनींना गाण्याची आवड असून ३३ जणी शास्त्रीय संगीताचा अभ्यास

करीत आहेत. दहा जणी नृत्यकलेत प्राविण्य मिळवू पहात आहेत. एकंदरीने शंभर जणी, अगर ६ टक्के स्त्रिया कलेच्या उपासक आहेत. "केवळ नृत्य अगर संगीत ह्यांचाच विचार करावयाचा नाही. जेव्हा आपण कलांचा उल्लेख करतो तेव्हा काव्य, चित्रकला, नक्षीकाम आणि शिल्पशास्त्र हे सर्व जितके निंदेला तितकेच स्तुतीला पात्र आहेत. ह्या सर्व कलांना नैतिक तशीच अनैतिक बाजूही आहे. अनैतिक प्रवृत्तींना आळा घातला पाहिजे आणि नैतिक प्रवृत्तींचा विकास करावयास हवा . . . कामदेवाची सेवा करणे हा कलांचा उद्देश असावा असेच केवळ नाही . . . शौर्य, प्रेम, ईश्वरभक्ती, विनोद, कारुण्य, रौद्रता, आश्चर्य आणि शांतिरस हे सर्व कलांच्या द्वारे प्रगट होऊ शकतात. सर्व कलांचे उच्चतम ध्येय, बेकनच्या शब्दांत, 'ईश्वराचा मोठेपणा गाणे आणि मानवजातीला मदत करणे' . . . ."[३३]

रेडिओवरील कार्यक्रम ऐकण्यात आपला वेळ बऱ्याच जणी घालवितात. मात्र असा उल्लेख अवघ्या ३८ जणींनी केला आहे. एकंदरीने अशा तऱ्हेने आमच्या सुशिक्षित भगिनी आपल्याला जी अल्पशी फुरसद मिळेल ती घालवीत असतात. आता ब्रिटिश भगिनी काय करीत असतात ते पाहू. तेथील पुरुषांप्रमाणेच त्यांचेही छंद असतात. घरी वाचन, मित्रमैत्रिणींना बोलावणे, बागाईत, घराची शोभा वाढविणे, रेडिओ अगर रेकॉर्डस् ऐकणे, टेलिव्हिजन पहाणे; बाहेर जाऊन खेळणे अगर खेळ पहाणे, भेटीगाठी घेणे, खेड्यात अगर समुद्रकाठी जाणे; चित्रपट, नृत्य, उपहारगृहे येथे जाणे; चर्च किंवा मजूर संघटना, राजकारण, समाजकल्याण अगर सुधारणा, सांस्कृतिक मंडळे वगैरेसारख्या सांघिक चळवळीत भाग घेणे वगैरे."[३४] भारतीय भगिनींपेक्षा ब्रिटिश भगिनींना अधिक विविध क्षेत्रे उपलब्ध आहेत.

आधुनिक काळात एखादे कार्य हाती घेणे अगर एखादे सामाजिक गाऱ्हाणे दूर करणे हे व्यक्तिशः जवळजवळ अशक्य आहे. कोणत्या तरी संघटनेचाच त्याला आश्रय करावा लागतो. शिवाय क्लब वगैरेसारख्या ठिकाणी विचारविनिमय होऊ शकतो. ही वाढती समाजशीलता जीवन समृद्ध करते. ब्रिटनमध्ये, "शंभरावर स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटना आहेत. त्यांत हरएक थरांतील स्त्रिया समाविष्ट आहेत. त्यातील काही आंतरराष्ट्रीय संघटनेच्या शाखा आहेत. काहींचा उद्देश राष्ट्रीय अगर जागतिक राजकारण हा असतो तर धर्मविषयक अगर शिक्षणविषयक हितसंबंधासाठी इतर संस्था आहेत, विशिष्ट व्यवसायांच्या व खेळासाठीही संघटना असतात." शिवाय "नॅशनल फेडरेशन ऑफ् वुइमेन्स इन्स्टिटयूटस्, दि नॅशनल युनियन ऑफ् टाऊनस् वुइमेन्स गिल्डस्, आणि स्कॉटिश वुइमेन्स् रूरल इन्स्टिटयूटस् ह्यांच्या शाखा सर्व देशभर पसरल्या आहेत . . . राष्ट्रीय घडामोडींवर ह्या निश्चितपणे परिणाम करू शकतात."[३५]

आमच्या जपानी भगिनींच्या विषयी " . . . (जपानीझ् वुइमेन व्होटर्स लीग, हाऊस वाईव्हझ् फेडरेशन, नॅशनल फ्रेंडशिप असोसिएशन) अशा संस्थांपैकी एकाच्या

ना एकाच्या सभासद असणाऱ्या भगिनींचे प्रमाण ६३ टक्के आहे असे मिनिस्ट्री ऑफ् लेबरने केलेल्या पहाणीनुसार आढळून आले आहे."[३६] टाइम्स ऑफ् इंडियाच्या डिरेक्टरीनुसार (१९६७) बृहन्मुंबईत स्त्रियांच्या हितसंबंधांची काळजी घेण्याकरिता ३५ संस्था आहेत. सेवासदन, रतन टाटा इंडस्ट्रिअल इन्स्टिटयूट, इन्स्टिटयूट ऑफ् सोशल सर्व्हिस, इंटरनॅशनल कॉन्फरन्स् फॉर सोशल वर्क, क्राफ्टस् कौन्सिल ऑफ् इंडिया, बॉम्बे व्हिजिलन्स् असोसिएशन, भगिनी समाज वगैरे अनेक संस्था स्त्रियांच्या हितासाठी उपयुक्त कार्य करीत आहेत. १९४५-४६ मध्ये लेखिकेने केलेल्या पहाणीनुसार सभासद असलेल्या स्त्रियांची संख्या ३३ टक्के होती तर प्रस्तुत पहाणीनुसार हे प्रमाण अवघे १४ टक्के आहे. पहिले प्रमाण अधिक असण्याचे कारण त्या पहाणीत मिळवित्या व न मिळवित्या—पण बहुतांशी न मिळवित्याच अधिक होत्या. सध्याचा अ गट हा केवळ श्रमिक महिलांचाच आहे. ह्या स्त्रियांना संस्थेत भाग घेण्यास वेळच मिळत नसावा. २२१ प्रतिसादी स्त्रियांपैकी २१३८ भगिनी व्यावसायिक—मेडिकल/लीगल/टीचर्स—संस्थांच्या सभासद आहेत. उरलेल्या ८३ ह्या इतर निरनिराळ्या संस्थांच्या पुढीलप्रमाणे सभासद आहेत :

| | | |
|---|---|---|
| स्त्रियांच्या संस्था-मंडळे, समाज वगैरे | .. | ५१ |
| कलामंडळे | .. | १९ |
| वाचनालये | .. | ५ |
| क्लब | .. | ३ |
| समाज-कल्याण संघटना | .. | ३ |
| मजूर संघटना | .. | २ |

शेवटचीच परंतु कमी महत्त्वाची नव्हे, अशी प्रतिसादी स्त्रियांच्या जीवनाची एक बाजू पाहू म्हणजे घेतलेल्या नमुन्याची पहाणी पूर्ण होईल. प्रस्तावनेत उल्लेखिल्याप्रमाणे एक सूचक व समयोचित प्रश्न विचारण्यात आला होता. तो म्हणजे तूर्त ज्या प्रकारचे जीवन ह्या स्त्रिया घालवीत आहेत आणि ज्या वातावरणात त्या रहात आहेत त्यात त्यांना समाधान आहे की नाही ? काही श्रमिक भगिनींनी आपल्या वैयक्तिक समस्या, सामाजिक प्रश्न अगर व्यवसायविषयक अडचणी पुढे मांडल्या आहेत. वरील सर्व प्रश्नांपैकी वैयक्तिक प्रश्नांचा अवश्य तितका उहापोह केला आहे व व्यवसायासंबंधीच्या समस्या मागील 'व्यावसायिक प्रश्न' ह्या प्रकरणात चर्चिल्या आहेत. सामाजिक व नैतिक प्रश्नांसंबंधीची चर्चा, स्त्रीला आधुनिक काळात विविध भूमिका घ्याव्या लागतात ही गोष्ट लक्षात घेऊनच पुढे करण्यात येईल.

ज्याला सुख म्हणतात ते समाधान ह्या शब्दात पूर्णतया व्यक्त होत नाही. पण एकातून दुसरे ध्वनित होऊ शकते. शिवाय, समाधान अगर असमाधान सॉक्रेटिसच्या शब्दांत. ". . . श्रेयस्, मानवी जीवनाचे साध्य, प्रत्येक विचारवंताने आपल्या

जीविताचे ध्येय म्हणून पुढे ठेवण्यास योग्य" म्हणजे काय हे अजून एकमताने ठरले नाही. तथापि वरील प्रश्नाला अ व ब गटाच्या स्त्रियांनी दिलेले उत्तर व त्यातील फरक पुढे दिला आहे.

पूर्ण व अंशत: समाधानी असलेल्या स्त्रियांचे प्रमाण ब गटातल्यापेक्षा अ गटात १५ टक्क्यांनी अधिक आहे. सर्वसामान्यत: दोन्ही गटांचे नमुने हे एकाच आर्थिक व सांस्कृतिक पातळीवरील आहेत. तसेच उभय गटांत अविवाहित, विवाहित, विधवा व घटस्फोटिता स्त्रिया आहेत. तेव्हा विवाह व कुटुंबविषयक परिस्थिती सारखीच आहे. फक्त अ गटाचा विशेष म्हणजे त्या स्त्रियांना बाहेर वाव सापडत आहे. असमाधानी असणाऱ्यांचे प्रमाण ब मध्ये अधिक आहे. तेव्हा निष्कर्ष उघडच आहे आणि वाचकांना तो शब्दांत व्यक्त करून त्यांची मानहानी करू नये ते बरे.

| | | अ | ब |
|---|---|---|---|
| पूर्ण समाधानी | .. | ९१२ | १०६ |
| | | ६०. १ | ४०.९२ |
| अंशत: समाधानी | .. | १६१ | ३७ |
| | | १०.४९ | १४.२८ |
| असमाधानी | .. | २३७ | ५१ |
| | | १५.४४ | १९.४९ |
| उत्तर दिले नाही | .. | २१४ | ६५ |
| | | १३.९७ | २५.०१ |

वरील गोंडस चित्रणाला दुसरी एक बाजू आहे आणि ती उदासवाणी आहे. आज कमावत्या स्त्रिला अधिक समाधान मिळत आहे पण ते कोणते मूल्य देऊन ? सर्वच काही एका माळेचे मणी नव्हेत. परंतु काही जणी तरी पूर्वापार चालत आलेल्या नियंत्रणांना डावलून वागत असतील ! म्हणूनच जबाबदारीच्या स्थानी असणाऱ्या काही व्यक्तींना विचार पडला असावा व त्यांनी पुढील शेरे मारले असावे :

एका अधिकारी बाईंनी श्रमिक महिलांची पहाणी केली होती. त्यांनी काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे : "मूल्ये जतन केलीच पाहिजेत. प्रेम, त्याग, परस्परांना समजून घेऊन वागणे व जरूर तेथे जमवून घेणे—ही मूल्ये हळूहळू नाहिशी होऊ लागली आहेत. त्यामुळे कुटुंबात सासू-सासरे, दीर-जाऊ, नणंदा वगैरे कुणी नसाव्या असे त्यांना वाटते. आईबाप व मुले ह्यांच्यात परकेपणा येऊ लागला आहे. इतकेच नव्हे तर काही अविवाहित मुली एकएकटच्या रहातात आणि त्यांचे विवाहित पुरुषांशी संबंध असतात ! घटस्फोट घेतलेल्या स्त्रियांचीही तशीच उदाहरणे आहेत. मुलांच्या आया असलेल्या काही विवाहित स्त्रियासुद्धा परपुरुषांशी संबंध ठेवतात. त्यांच्या यजमानांना एकतर ते माहीत नसावे किंवा मुद्दामच ते डोळ्यावर कातडे ओढून घेत असावे. कारण त्यांच्या

बायका पैसे मिळवून आणतात ना ? आम्ही कुठे वहावत आहोत ?"

दुसऱ्या एका अधिकारी बाईंनी विधान केले, "काही तरुण मुली आपणाला बढती वा इतर सवलती मिळाव्या म्हणून गैरसंबंधालाही तयार होतात."

तिसऱ्या एक अधिकारी म्हणतात, "स्त्रीतला अहंगंड वाढू लागला आहे. आईवडील व मुले ह्यांच्यातील व्यक्तिगत संबंध नाहिसे होऊ लागले आहेत."

एक पोक्त अधिकारी म्हणाले, "सरकारी व स्थानिक कार्यक्षेत्रात अविवाहित मुलींची संख्या झपाट्याने वाढत आहे. हे धोकादायक आहे. तेव्हा हे नैतिक संकट टाळण्याकरिता तुम्ही कोणते उपाय सुचविता ?"

अठ्ठाविस वर्षे समाजसेविका म्हणून कार्य केलेल्या एक विश्वासू अनुभवी अधिकारी म्हणाल्या, "मध्यमवर्गीय स्त्रियांची ईश्वरावरील धार्मिक श्रद्धा उडाल्यामुळे नैतिक दर्जा खालावू लागला आहे. देवावरील श्रद्धेशिवाय केवळ नैतिक नियम उपयोगाचे नाहीत."

"पैसे मिळविणे व बाह्य भपका ह्यांवर जास्त भर दिला जातो. तत्त्वे व मूल्ये ह्यांना किंमत उरली नाही. तरुण पिढीचा दृष्टिकोन पैसे मिळवून मजा करणे हा आहे ! मागली पिढी गोंधळून गेली आहे. त्यांना कसे जीवन घालवावे ते समजेनासे झाले आहे."

मुलांवर होणाऱ्या विपरीत परिणामासंबंधी :

"बऱ्याच पतिपत्नींना कामाकरिता बाहेर जावे लागते. घरातील मंडळींशी गप्पागोष्टी करण्यास वेळ मिळत नाही. मुलांना शाळेत तर घातलेच जाते पण 'क्लासेस' मध्ये ही पाठवितात अगर शिकवण्या ठेवतात. आईवडील व मुले ह्यांचा परस्परसंबंध उरला नाही. मुले व्यक्तिनिरपेक्ष होऊ लागली आहेत आणि कुटुंबापासून दुरावू लागली आहेत. रस्त्यावर त्यांनी आपला वेळ का घालवावा ? सुसंस्कृत मुले मुली नृत्यासाठी जातात. सर्वच घडी बदलू लागली आहे !"

तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, "मुली अलिकडेस किती भपकेदार आणि आकर्षक पोशाख करीत असतात !"

एक मेडिकल अधिकारी, "गोळी दररोज म्हणजे व्यभिचाराचा परवाना राजरोस."

दुसरे एक स्त्रीरोगचिकित्सक तज्ञ, "आईने सकाळच्या न्याहारीबरोबर मुलीला एक गोळी देण्याची काळजी घ्यावी म्हणजे तरी समाजावरील बेवारशी मुले पोसण्याचा भार कमी होईल."

एका अनाथाश्रमाचे पोक्त आणि अनुभवी चिटणीस आपल्या मुलाखतीत म्हणाले, "आश्रमात येणाऱ्यांपैकी ऐंशी टक्के स्त्रिया मध्यमवर्गातील असतात. दर महिन्याला तीनचार अविवाहित माता आश्रय शोधीत येतात; त्यांपैकी नव्वद टक्के कॉलेजात जाणाऱ्या मुली असतात. त्यांचे प्रियकर(?) लग्न करण्याचे नाकारतात. गेल्या पिढीत जातीय अभिमान, भीती आणि कुटुंबाच्या नावाची काळजी तरी होती. आता

तर तीही नाही. अविभक्त कुटुंबाचे नियंत्रणही उरले नाही. त्यामुळे वृद्धांचा प्रश्न उपस्थित होतो. लग्नाचे वय वाढले आहे. आई बाहेर काम करीत असल्यामुळे तिचा सहवास आणि नियंत्रण नाही. जागेची टंचाई, चित्रपट, ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे विवाहपूर्व अगर विवाहबाह्य संबंध. एकपत्निक विवाहाचा कायदा आपण मंजूर केला आहे परंतु रखेली ठेवण्यास कायदा आड येत नाही !

"एकच सुटकेचा निश्वास टाकणारी घटना म्हणजे, निपुत्रिक आईबाप जात अगर धर्म विचारात न घेता आश्रमातल्या मुलांना दत्तक घेतात. ही एक आश्रमाला मोठीच मदत आहे. ही गोष्ट सोडल्यास, वर सांगितलेल्या कारणांमुळे मध्यमवर्गीय कुटुंब ढासळण्याचा संभव आहे. स्त्रियांच्या उत्साहाला औद्योगिक गृहांच्या अगर अंशिक कामाच्या द्वारा वाव मिळाला पाहिजे."

डॉ. ल. ब. जोशी व श्री. द. ब. सरदेसाई ह्या उभयतांनी १९६३-६४ साली पुणे शहर व पुणे जिल्ह्यामधील ३१ दुय्यम शाळांतून २,५९० विद्यार्थिनी व ९,५३९ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. "प्रस्तुत पहाणीचे वैशिष्टच म्हणजे पुणे शहर व जिल्है येथील विद्यार्थ्यांची लघ्वी, हिमोग्लोबिन, सिस्टॉलिक व डायेस्टोलिक ब्लड प्रेशरस् आणि सीरम ह्या सर्वांची व्ही.डी.आर्.एल्. चाचणी घेण्याचा हा नम्र प्रयत्न आहे"

त्यांनी काढलेले निष्कर्ष कोणत्याही विचारवंताला गंभीर मनःस्थितीत नेऊन सोडल्याखेरीज रहाणार नाहीत. "पुणे शहर व जिल्हा येथील विद्यार्थ्यांचे आरोग्य असमाधानकारक आहे . . . एकंदरीने विद्यार्थी रक्तक्षीण आढळले, मुलांपेक्षा मुलींच्यामध्ये कमी रक्त. शहरातल्यापेक्षा खेड्यातील मुलांचे आरोग्य अधिक चांगले. परंतु खेड्यातील मुलींचे आरोग्य शहरातील मुलींप्रमाणेच कमी दर्जाचे . . . दुय्यम शाळेतील विद्यार्थीविद्यार्थिनींमध्ये उपदंशाचे प्रमाण लोकसंख्येतील सर्व सामान्य प्रमाणाइतकेच आहे. काही विद्यार्थ्यांना विद्यार्थीदशेतच हा रोग झाला असण्याचा संभव आहे . . . काही विभागातील विद्यार्थ्यांमध्ये ह्या रोगाचे प्रमाण बरेच आढळले. शहराच्या निकट असलेल्या शाळांमध्ये विशेषतः ही परिस्थिती का आढळली? . . . रोग होऊ न देणे व झाल्यास त्याला लौकर औषधोपचार करणे ह्याचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर फार अनुकूल परिणाम होईल आणि समाजाचा फायदा होईल."[३८]

कदाचित समाजशास्त्राच्या काही अभ्यासकांचे मत पडेल की वरील विधानांपैकी शेवटचे विधान सोडल्यास बाकीची विधाने वैयक्तिक पूर्वग्रहाने केली गेली असावी व म्हणूनच त्यांचा गंभीर विचार करण्याचे कारण नाही ! ह्याला उत्तर असे की ही शास्त्रीय वैद्यकीय पहाणी आहे व ती गंभीर इषारा देत आहे. बरे आज समाजात आमूलाग्र परिवर्तन होत आहे व ते इतक्या झपाट्याने की दिग्मूढ होण्याची वेळ येते. पण हे परिवर्तन योग्य की अयोग्य दिशेने होत आहे ? जीवनविषयक काही मूलभूत सांस्कृतिक मूल्ये असून ती अमोल असल्यामुळे त्यांचे जतन करावयास व नव्या

परिस्थितीनुसार वळण लावावयास नको का ?

स्त्रीच्या स्थानाचे होणारे परिवर्तन अभ्यासण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नपत्रिकेत नैतिक मूल्यांच्या दृष्टीने प्रश्न न विचारल्यामुळे स्त्रीची आचारविचारविषयक व नैतिक बाजू काही मर्यादित प्रमाणातच पहाता आली. ह्या बाबतीत समाजशास्त्रज्ञ वेस्टर मार्क म्हणतात : "भविष्यकाळात जरी लोकांनी एकमताने अविवाहित मुलांमुलींना लैंगिक स्वातंत्र दिले तरीसुद्धा पुरुष स्त्रियांचा गैरफायदा घेतील; ज्या मुलींचे कौमार्य शुद्ध त्याच पत्नी म्हणून पसंत केल्या जातील आणि बाकीच्यांचा तात्पुरत्या मजेकरिता उपयोग केला जाण्याचा धोका आहे . . . वेश्येशी संबंध ठेवण्यापेक्षा ह्या मार्गाने पुरुषांना अधिक सुखकर रीतीने आपल्या इच्छांची तृप्ती करुन घेता येईल."[३९]

ई.ए म्. व एम्. एपेल म्हणतात: "अगदी अलिकडील काही वर्षांपर्यंत, थोडे अपवाद सोडल्यास, बऱ्याच समाजशास्त्रज्ञांनी आणि सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी नैतिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे हे म्हणणे ठीक आहे . . . परंतु जेव्हा रस्त्यावरील मनुष्य, ध्वनित करण्याच्या दृष्टीने का होईना, वर्तनविषयक चर्चा करीत असताना नैतिक शब्दांत बोलतो त्यामुळे तरी ह्या घटनांचा गंभीर विचार करण्यास प्रोत्साहन मिळावे . . . विशेषत: मागील पिढीतील लोकांचे कुमारकुमारिकांचे नैतिक आचरण हा जरी सतत चर्चेचा विषय असला तरी मुख्य भर लैंगिक वर्तनावर किंवा समाजविरोधक वर्तनावर दिला जातो."[४०]

ब्रिटनमधील कुमारकुमारिकांच्या नीतीमत्तेच्या अनुषंगाने उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर त्यातील एक निष्कर्ष : "ह्या तरुण मंडळीपैकी बहुतेकांच्या बाबतीत स्त्रीपुरुषांचे एकच हितसंबंध असण्यात अगर एकत्र काम करण्यात असणारा आनंद उच्च कोटीचा असतो आणि असा आनंद घेण्यास जर समाजाने नकार दिला अगर तशी संधी दिली नाही तर त्याचा एक परिणाम म्हणजे शारीरिक उपभोग घेण्याची इच्छा बलवत्तर होईल आणि त्यामुळे उच्च दर्जाच्या मानवी संबंधांना ते मुकतील. ह्या परिणामांची त्यांना जाणीव आहे."[४१]

सखोल नागरिक जाणीव असणारे आणि पूर्वापार चालत आलेल्या प्रथा व सत्ता ह्यांना मानणारे ब्रिटन हे राष्ट्र आहे. भारतीय आणि ब्रिटिश चालीरीतीत फरक आहे आणि भारतीय स्त्रियांना नुकताच बाह्य जगात प्रवेश मिळाला आहे. जे तेथे योग्य ठरेल त्याची प्रतिक्रिया येथे निराळी होईल.

क्लाइव्ह बेलच्या मते : "अत्युच्च सुधारलेल्या काळाची वैशिष्टचे पुढीलप्रमाणे : मूल्यांची जाणीव आणि बुद्धिमत्तेचे प्राधान्य . . . सत्य आणि सौंदर्याची जोपासना, बौद्धिक प्रामाणिकतेप्रमाणेच जिज्ञासेचे महत्त्व."[४२]

डॉ. मुन्शी म्हणतात : "मूलभूत मूल्यांनी प्रेरित झालेली विशिष्ट जीवनक्रिया म्हणजे संस्कृती. ज्या वैदिक संस्कृतीवर भारतीय संस्कृती उभारलेली आहे त्यातील

मध्यवर्ती विचार 'ऋत'–केवल, परमश्रेष्ठ विश्वव्यापी सिद्धान्त–हा आहे. आणि ते ऋत एकच व अविभाज्य आहे. ह्या मध्यवर्ती ऋतेभोवती गुंफणारी मूल्ये प्रत्यक्षात उतरविण्याकरिता परंपरा, आचारविषयक नियम व संस्था ह्यांची उभारणी करण्यात आली. सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन असे आखण्यात आले होते की प्रत्येक पिढीतील व्यक्तीला ह्या मध्यवर्ती कल्पनेनुसार रहाण्यात जीवनाची सार्थकता लाभेल . . . धर्म म्हणजे व्यक्तीचे व गटाचे जीवन नियमित करणारे नियम. ह्यावर भारतीय संस्कृतीची उभारणी झाली होती."[४३]

आहारनिद्रा भयमैथुनं च, सामान्यमेतद् पशुभिर्नराणाम्,
धर्मोहि तेषामधिको विशेषः, धर्मेण हीनः पशुभिः समानाः॥

–महाभारत

आहार, निद्रा, भीती व मैथुन ह्या गोष्टी इतर प्राणी व मानव ह्यांच्या बाबतीत सारख्याच असतात. मानवाच्या बाबतीत संयम–धर्म–हा विशेष आहे. ह्या संयमाशिवाय मानव म्हणजे विनापुच्छ पशुच होय.

लोकमान्य टिळकांनी आपल्या गीतारहस्य ग्रंथात धर्म ह्याचा ह्या संदर्भाने संयम असा अर्थ केला आहे.

सर्वसामान्यतः आपल्या इच्छांवर नियमन ठेवावयाचे व फक्त वैवाहिक जीवनाच्या मर्यादेत समाधान मानावयाचे असा हा आचारदंडक भारतीय संस्कृतीने तसेच इतर समाजांनीही घालून दिला आहे. मॅक्आयव्हर व पेज ह्यांचे असे मत आहे की : "आधुनिक कुटुंब . . . आपल्या तीन आवश्यक कार्यांच्या गरजा आणि त्यांतून मिळणाऱ्या समाधानाचा मेळ घालण्याच्या सामर्थ्यावर ते टिकेल अगर कोलमडून पडेल. ती तीन कार्ये पुढीलप्रमाणे: (१) प्रजोत्पादन व प्रजासंगोपन, (२) पतिपत्नींच्या लैंगिक गरजांचे सातत्याने समाधान, (३) ऐहिक, सांस्कृतिक आणि प्रेमाचे मिश्रण असलेल्या गृहात सर्वांना योग्य ते स्थान. विवाहबाह्य संबंधात अगर वेश्यागमनात लैंगिक समाधान ही एकच बाजू असते तसे पतिपत्नीसंबंधात नसून ह्या समाधानाबरोबर ते जीवनाचे प्रश्न जोडीने सोडवीत असतात. आणि अशा गृहात मुलांचे संगोपन होत असते ते संगोपन सरकारी शिशुगृहे, सार्वजनिक अगर खाजगी संस्थांतून होणाऱ्या संगोपनापेक्षा फार अनुकूल परिस्थितीत होत असते असे बऱ्याच पुराव्यांवरून म्हणता येईल."[४५] जगप्रसिद्ध लेखिका म्हणतात : "तेव्हा नव्या नीतिमत्तेचा मुख्य आदेश असा आहे की, ह्या निकटवर्ती स्त्रीपुरुषसंबंधाचा केवळ शारीरिक उपभोगाकरिता गैरफायदा घेऊ नये. जर ही अत्यंत सलगीची कृत्ये दुसरीकडे उरकण्यात आलेली असली आणि म्हणून ह्या सखोल परस्परसंबंधाचा अर्थ नष्ट झाला असेल तर विवाह ही संस्था–अजूनही मानवी परस्परसंबंधातील अत्यंत फलदायी संबंध–संपूर्ण अर्थशून्य ठरेल."[४६]

कुटुंब ही संस्था टिकविण्याकरिता आणि भावी पिढीला आत्मसंयमन व स्वनियमन शिकविण्याकरिता वृद्ध, अपंग व बालके ह्यांची काळजी घेणारे जे पूर्वापार

नियम चालत आले आहेत ते गृहिणीने पाळून आपला आदर्श नव्या पिढीपुढे ठेवला पाहिजे व ज्या पातिव्रत्याकरिता भारतीय स्त्रियांनी जोहार केले व सतीचे वाण घेतले, ते पातिव्रत्य टिकविले पाहिजे.

मनुष्याने आपल्या कामवासनांवर ताबा मिळवावा हे भगवद्गीतेतील दोन श्लोक उद्धृत करून प्रा. रा. द. रानडे ह्यांनी दाखवून दिले आहे:

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
संङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।।
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।

–श्रीमद्भगवद्गीता II ६२-६३

"विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्यांच्याविषयी प्रीति उत्पन्न होते; प्रीतीमुळे काम उत्पन्न होतो. कामापासून क्रोध. क्रोधापासून संमोह, त्यामुळे स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश होतो आणि बुद्धिनाशामळे (तो पुरुष) नाश पावतो." (सार्थ ज्ञानेश्वरी–शं. वा. दांडेकर, पा. ६१.)

"तेव्हा काम हा मनुष्याचा मुख्य शत्रू. त्यालाच प्रथम जिंकले पाहिजे. आधुनिक मानसशास्त्रविश्लेषणानुसार मनुष्यस्वभावातील जबरदस्त घटक काम त्यालाच जिंकले पाहिजे. तेव्हा कुठे नैतिक व आध्यात्मिक प्रगती होईल. मनोविश्लेषण तज्ञ उघडपणे कामासंबंधी चर्चा करतात, अशी चर्चा करणे म्हणजेसुद्धा ते कृत्य करण्यासारखेच आहे. ज्याप्रमाणे आरसा धुळीने माखला जातो, अग्नी धुराने व गर्भाला उल्वोदकाचे वेष्टन असते त्याप्रमाणे आपले आध्यात्मिक जीवन कामवासनेने वेष्टिलेले असते असे भगवद्गीतेला स्पष्ट करण्यास कोणतीच अडचण वाटत नाही (III-३८-३९). आपण कामवासनेला हाकलून दिले पाहिजे तरच आत्म्याचा उदय होईल."[४७]

∴

श्रमिक महिलांनी आपणच केलेल्या विधानांतून रेखाटलेल्या स्वचित्रणाचा अभ्यास केल्यावर त्यांच्या परस्परविरोधी टीकेमुळे त्यांचे मूल्यमापन करून त्यातून निष्कर्ष काढणे कठीण जाते. तथापि साधारणपणे ते चित्रण पुढीलप्रमाणे बोल बोलीत आहेत:

१. स्त्रीला मूळात लग्न करून गृहिणी व्हावेसे वाटते (९६ टक्के) आणि त्याबरोबरच आपल्या कार्याची व्याप्ती वाढवून स्वतःचे व इतरांचे जीवन समृद्ध करावेसे वाटते.
२. स्वतःच ओढवून घेतलेल्या सर्व दिवस गुंतवणाऱ्या (सुरुवात कोणत्याही कारणांनी का होईना) नवनव्या भूमिकांमुळे–नोकरी, व्यवसाय, समाजसेवा वगैरे–कुटुंबात खरोखरीच अव्यवस्थितपणा अगर पोकळी निर्माण होते व ती विशेषतः आई-मुले ह्यांच्या परस्परसंबंधावर परिणाम करते.
३. श्रमिक स्त्रीच्या शरीराची झीज अगर पडलेला ताण हा तिच्या वयाच्या

अथवा नोकरीच्या मध्यकाळात जाणवू लागतो.

४. ती सामान्यत: कुटुंबाला आर्थिक मदत व्हावी म्हणून अर्थार्जन करते.

५. सुशिक्षित श्रमिक महिलेला काही समस्या ह्या अजूनही समस्याच आहेत.

विवाहासंबंधी त्यांनी केलेल्या विधानांची पुढील टाचणे बराच प्रकाशझोत टाकू शकतील :

"घरातील मुलांमुलींत सर्वांत वडील म्हणून जबाबदारी अंगावर घेतली. तेव्हा लग्नाचा विचारसुद्धा मनात आणणे शक्य नव्हते. माझ्या धाकटया तिघी बहिणींची व एका भावाच्या लग्नाची व्यवस्था केली."–एक दुहेरी पदवीधर.

"लग्न करण्याची तयारी नाही कारण माझ्या धाकटया भावाची व वृद्ध वडिलांची जबाबदारी घेण्यास कोणताही तरुण तयार होणार नाही."–एक पदवीधर शिक्षिका.

"श्रमिक महिलेला पसंत करीत नाहीत."–तिहेरी पदवीधर शिक्षिका.

"माझ्या अटी जर मान्य केल्या गेल्या नाहीत तर मी लग्न करणार नाही."–एक पदवीधर लिपिक.

"एकदा मी परिचारिका म्हणून आणि दुसऱ्यांदा माझ्या उंचीवरून मला नाकारण्यात आले."–नववधू परिचारिका.

"जर भावी वराने हरकत घेतली तर पुढे नोकरी करणार नाही."–एक लिपिक.

"हुंडा आणि इतर परिस्थिती ह्यामुळे लग्न लांबणीवर पडले."–एक कारकून.

"आमच्या जमातीत कुळाला अधिक महत्त्व आहे आणि हुंडा आड येत नाही."–.एक अविवाहित कारकून.

"रु. १५,००० चा हुंडा जमविण्याकरिता नोकरी करीत आहे."–एक लिपिक.

"लग्न आणि स्वत:चे घरकुल ह्यासाठी मी आतुर झाले आहे."–एक सहाय्यक.

"आईच्या आजारामुळे लग्न करण्याचा विचार लांबणीवर टाकावा लागला."–एक पदवीधर कारकून.

लहान वयात नोकरी मिळविणे आणि ती करीत रहाणे ह्यात जी मजा वाटते ती हळूहळू नष्ट होऊ लागते. स्वातंत्र्योत्तर काळाच्या सुरुवातीस ज्यांनी अर्थार्जनास आरंभ केला त्यांनी नोकरीचा मध्य गाठला आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतरचे फायदे आणि तेणेकरून वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता पदरात पडत नाही किंवा इतक्या दीर्घकालाच्या कष्टाने शरीर कमकुवत झालेले असते. हे परिणाम त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून दिसून येतात :

"जोपर्यंत प्रकृती टिकून राहील तोपर्यंत चालू ठेवण्याची इच्छा आहे."–१८ वर्षे नोकरी केलेल्या पदवीधर.

"माझा व्यवसाय मला आवडतो परंतु धड नोकरी अगर घर येथे पुरेसे लक्ष द्यावयास जमत नाही."–१५ वर्षांच्या नोकरीतील एक परिचारिका.

"गृहकृत्ये करून दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण पडते."–तिहेरी पदवीधर ग्रंथपालिका.

"पुढे नोकरी करण्याची इच्छा नाही पण करणार काय ? परिस्थिती भाग पाडते ना !"–१७ वर्षांच्या कारकुनीनंतर एक पदवीधर.

"माझी १८ वर्षांची नोकरी झाली आणि सेवानिवृत्तीपर्यंत चालू ठेवावी लागणार !"–एक पदवीधर लिपिक.

काही स्त्रियांना आपला दृष्टिकोन व्यापक करावयाचा होता, ज्ञानार्जन करावयाचे होते म्हणून ज्या कामातून हे शक्य होईल असे व्यवसाय त्यांनी पत्करले. काहींच्या पदरात निराशा आली तर एकदोघींना यशही मिळाले. पुढील उद्‌गार वाचू या :

"माझ्या विषयाचा अभ्यास समाधानकारक रीतीने करण्यास वेळच मिळत नाही. इकडे शिकवायचे आणि इकडे घर संभाळायचे."–२३ वर्षे नोकरी केलेल्या एक डॉक्टरेट प्राध्यापिका.

"मी नोकरी पत्करली, का तर मला पुढे शिकता येईल. पण ते काही शक्य दिसत नाही तेव्हा नोकरी सोडण्याच्या विचारात आहे."–१३ वर्षे नोकरी केलेल्या एक दुहेरी पदवीधर कारकून.

"माझ्या यजमानांनी मला पुढे शिकण्यास मदत केली."–एक पदवीधर शिक्षिका, दहा वर्षे नोकरी.

"मला वाढते ज्ञान पाहिजे, देशाटन करायला हवंय्, कसलेही बंधन नको आणि मोठमोठ्या महत्त्वाकांक्षेच्या उड्या घ्यायच्या आहेत."–एक दुहेरी पदवीधर कुमारिका, २३ वर्षे नोकरी.

"शिक्षण घ्यावे हा उद्देश पण काम आणि अभ्यास दोन्ही करणे कठीण. हे चाकोरीतले काम नकोसे वाटते."–एक पदवीधर सहाय्यक कुमारिका. १४ वर्षे नोकरी.

परिस्थितीशी जमवून कसे घ्यावे आणि आपल्यात काय उणे आहे ह्याचाही विचार आधुनिक स्त्रीने केलेला असतो हे पुढील उताऱ्यांवरून चित्रित होईल :

"एकमेकांनी समजून घेतले म्हणजे अडचणी येत नाहीत . . . दहा वर्षे नोकरी केली आणि जर प्रकृती नीट राहिली आणि वरिष्ठांनी कामावर ठेवले तर करीत रहायचे."

"पहिल्या वर्गात पास होत असलेली मी. पण मला पुढे संधीच मिळेना . . . मला वाटते आम्ही नुसत्या पदवीधर होतो, सुशिक्षित नव्हे."

काही दुःखाचे, वैफल्याचे निश्वास वाचू या :

"मला कोणाची सोबत नाही . . . मला एकटेएकटे वाटते . . . मला स्वतःच्याच पायावर उभे राहिले पाहिजे."–एक २६ वर्षे नोकरी केलेली प्राथमिक

शिक्षिका.

"माझ्या कुटुंबाला वर येण्यास मदत केली. आता माझी मुलगी डॉक्टर झाली आहे."–दुसऱ्या एक प्राथमिक शिक्षिका, ३८ वर्षे नोकरी.

"वडिलांचा धंदा फायदेशीर झाला नाही. मला धाकटी सहा भावंडे आहेत . . . एक पडकी खोली . . . नोकरी न् अभ्यास करून थकून जाते . . . काहीही होवो मी शिकणार ! बघू या शक्य आहे की नाही ते !"–एक तरुण कुमारिका.

"माझी सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा म्हणजे मुलांना शिक्षण द्यावयाचे. पण त्यांनी मला निराश केले. यजमान गेले. सगळीकडून माझ्या वाटयास दुःख आले आहे." –एक प्राथमिक शिक्षिका. २० वर्षे नोकरी.

"अहंमन्य, तिरसट नवरा. माझ्या चारित्र्याविषयी संशयी. त्यामुळे माझा मुलगा लहरी आणि संशयी झालाय्."–एक कॉलेज प्राध्यापिका. १४ वर्षे नोकरी.

तसेच भावी जीवनात आर्थिक दृष्टया आपले हित कसे होईल हाच विचार प्रामुख्याने पुढील स्त्रियांच्या मनात असतो असे ह्या उताऱ्यावरून दिसून येईल :

"ह्या राज्यात पुढे येण्यास जास्त संधी मिळते म्हणून मी तिकडून इकडे आले आणि आता वडील वारले म्हणजे माझ्यावरच सर्व कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली."–एक अविवाहित सहाय्यक पाच वर्षे नोकरीनंतर.

"आम्हाला पेन्शन, ग्रॅच्युइटी आणि चांगले पगार पाहिजेत . . . विवाहित स्त्रियांच्या आर्थिक गरजा अंशकाल नोकऱ्यांच्या योगाने पुरविल्या जातील."–तेहतीस वर्षे नोकरी केलेल्या एक शिक्षिका.

"कुटुंबाचा आधार आहे मी. धाकटया भावांचे सर्व काही करते."– एक अविवाहित लिपिक.

"रहाणीमान टिकवून धरणे आणि उद्योगात मग्न रहाणे."–नऊ वर्षे नोकरी केलेल्या एक अविवाहित सहाय्यक.

"कुटुंबाच्या उत्पन्नाला भरीव हातभार लावावा म्हणून नोकरी करायची. . . मला आता सवय झाली आहे म्हणून मी आणखी पाच वर्षे नोकरी करीन . . . प्रकृती पण माझी त्यामुळे नीट रहाते."–अठरा वर्षे शाळा-तपासनीस म्हणून काम केलेल्या.

"माझा अभ्यासक्रम उत्तम होता, कुटुंब पण सरदारी थाटाचे . . . शारीरिक अगर मानसिक ताण वाटत नाही . . . मला उत्तम गृहिणी आणि उत्तम श्रमिका व्हावेसे वाटते . . . (स्वमतानुसार). श्रमिक महिलांच्या यजमानांना आपली जबाबदारी टाळाविशी वाटते."–सोळा वर्षे नोकरी केलेल्या एक विवाहित भगिनी.

"पाळीची नोकरी असल्यामुळे मुलांच्याकडे पुरेसे लक्ष द्यावयास जमत नाही." –एक दूरध्वनी कार्यवाह.

"जेव्हा मुलाला आपली अत्यंत गरज असते तेव्हा त्याला सोडून येण्याला वाईट वाटते."–सहा वर्षांची नोकरी केलेल्या एक लिपिक.

"वेळ जाण्यासाठी मी काम करते. ह्यापुढे मी नोकरी सोडून देणार."–एक कारकून.

"एम्.बी.बी.एस्. परीक्षा दिली. पण पुढे काय करावे ते समजत नाही."–एक अविवाहित हाऊसमन डॉक्टर.

"घरात आणि रुग्णालयात काम करणे म्हणजे फार त्रास पडतो . . . मुलांची आबाळ होते."–एक विवाहित शस्त्रकिया विशारद.

"अंशकाल काम करणे बरे. मात्र त्यातून उत्पन्न मात्र चांगले पाहिजे."–पाच वर्षे नोकरी केलेल्या एक डॉक्टर.

शेवटी आपल्या समस्यांची पूर्ण कल्पना असलेल्याही काही भगिनी आहेत. त्यांचे उद्‌गार :

"विचारल्याबद्दल आभारी आहे. संशोधनातून काय निष्कर्ष निघतो तो मला वाचायला आवडेल."–एक अविवाहित लिपिक.

"लग्न म्हणजे एक सोडत आहे स्वतःच्या अपेक्षा क्वचितच पुऱ्या होतात. आर्थिक परिस्थितीमुळे तिला काम करण्याची वेळ येते . . . वास्तविक हे कठीण नाही मात्र कुटुंबातील सर्व मंडळींनी समजून घेतले तर. तिने आपणाकडून आनंदी वातावरण निर्माण केले पाहिजे आणि घरात शांतता नांदविण्याचा प्रयत्न केला पाहिजे."–एक विवाहित पदवीधर सहाय्यक.

"भारतीय स्त्रियांना ब्रिटनच्या मानाने अधिक अनुकूल वातावरण आहे हे विधान पक्षपाती नव्हे. स्त्रियांची शारीरिक व मानसिक ताकद कमी मानून त्यांना तेथे कोणी सवलती देत नाहीत. त्यांना कसेही करून आपले काम पुरे करावे लागते. भारतात स्त्रियांना नोकरी चालू ठेवता यावी म्हणून अनेक सवलती दिल्या जातात, मात्र त्यांनी त्या मागितल्या तर! त्यामुळे काम व्हावे तसे व तेवढे होत नाही."–अविवाहित डॉक्टरेट प्राध्यापिका.

"मला आरामशीर जीवन जगावयाचे आहे."–बारा वर्षे नोकरी केलेल्या विवाहित पदवीधर कारकून.

"सुशिक्षित स्त्रीचे मुख्य कर्तव्य म्हणजे मुलांना चांगल्या रीतीने वाढविणे . . . हे तिची पहिली जबाबदारी . . . म्हणून तिला बाहेरचे काम नसावे."–वाग्दत्त पदवीधर शाळा तपासनीस.

"वाढते रहाणीमान, फॅशन आणि समाजाच्या अपेक्षा ह्यांमुळे स्त्रीला नोकरी धरावी लागते . . . मला मात्र नोकरी करायला आवडत नाही . . . मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागतो . . . त्यापेक्षा स्त्रियांनी गृहोद्योग करावे."–पाच वर्षे नोकरी केलेल्या पदवीधर.

"लोकांना वाटते बायका स्वतःच्या मजेसाठी नोकऱ्या करतात. वास्तव परिस्थिती अजिबात वेगळी आहे. तिच्यावरील दुहेरी जबाबदारीमुळे तिची शक्ती लौकर कमी

होते. म्हणून तिला अकालिक सेवानिवृत्त होता यावे."—एक पदवीधर विवाहित लिपिक.

"स्त्रीचे जीवन जळत्या वातीसारखे आहे. आवतीभोवती असणाऱ्यांच्या मोठेपणासाठी तिला आहुती देत रहावे लागते."—अविवाहित पदवीधर दुय्यम शिक्षिका.

"क्षुल्लक गोष्टींसाठी स्त्रीने आपला काळ घालवू नये . . . बाहेरील कामाने व्यक्तीच्या जीवनाची घडण बनते आणि तिला श्रमगौरव पटायला लागतो."—एक पदवीधर वृत्तपत्रकार.

"आर्थिक मदत तर खरीच पण बाहेरील कामामुळे बाह्य जगाची तिला माहिती होते . . . दोनदा मी माझा व्यवसाय बदलला, सध्या मी स्त्रियांच्या निकटवर्ती व्यवसायात काम करीत आहे."—कुटुंबनियोजनाचे काम करणाऱ्या पदवीधर समाजसेविका.

"स्त्रीने मुख्यत: आपले घर आणि घरातील माणसे इथे लक्ष द्यावे."—विवाहित पदवीधर दूरध्वनिचालिका.

"स्त्रियांच्या उपयोगी पडणाऱ्या संस्थांत काम करावयास मला आवडेल."—अविवाहित वकील.

"वृद्धपणी आश्रमात रहावयास मला आवडेल . . . नाहीतर एकटेच . . . देवाच्या चिंतनात."—तीन वर्षे नोकरी केलेल्या अविवाहित अर्थशास्त्रज्ञ.

"बऱ्याच भगिनी आर्थिक गरजेमुळे किंवा काहीतरी करावेसे वाटते म्हणून नोकरी करतात . . . ह्याच गोष्टीवरून दिसून येते की तिचा दृष्टिकोन बदलला आहे."—एक संशोधिका.

एका विधवा दुहेरी मेडिकल पदवीधर शिक्षिकेला वाटते: "अजूनही विधवांना चांगले वागविले जात नाही. हे आमूलाग्र बदलले पाहिजे. स्त्रीच्या बाबतीत दुहेरी जबाबदारी म्हणजे एक ओझेच होय."—दहा वर्षे नोकरी.

एक धीर वृत्तीची अविवाहित कारकून: "जर माणसाचा जमवून घेण्याचा स्वभाव नसेल तर, दुसऱ्याच्या आयुष्याचे मातेरे करण्यापेक्षा अविवाहित राहिलेले पत्करले . . . "

एक विवाहित वकिली करणाऱ्या: "फॅशन्स आणि मेकअप हे सुशिक्षितपणाचे लक्षण नव्हे . . . वागण्याची उत्तम पद्धत, नीतीमत्ता, तरतरीतपणा, धीटपणा ह्यांचा उपयोग होतो . . . खरे पहाता सुशिक्षित स्त्री हा खरा कुटुंबाचा पाया . . . काही स्त्रिया शिक्षणाचा दुरुपयोग करतात त्यामुळे लोकांचे वाईट मत होते. . . "

दुहेरी पदवीधर शिक्षिका: "शिक्षण क्षेत्रात चांगले पगार मिळत नसल्यामुळे सुशिक्षित दुसरीकडे वळतात . . . हल्ली विद्यार्थी शिक्षकांना मान देत नाहीत . . . . शिक्षण घेऊन पैसे मिळविणे हाच विद्यार्थ्यांचा उद्देश असतो. कारण ते पैसे देतात गुरुपाशी ज्ञानार्जन करणे हा हेतू नाही."

बारा वर्षे नोकरी केलेल्या एक विवाहित टंकलेखिका आपली श्रद्धा प्रकट करतात: ". . . आणि देवाच्या मनात असेल आणि यजमानांना सोडत लागली नाही तर सेवानिवृत्तीपर्यंत नोकरी करण्याची इच्छा आहे . . . "

दुसऱ्या एक समाजसेविका तीन वर्षांच्या नोकरीनंतर : ". . . नोकरांच्या स्वाधीन मुलांना करण्यापेक्षा स्वत: लक्ष दिल्यास नैतिक व सांस्कृतिक संस्कार चांगले घडतील . . . "

पंधरा वर्षे दूरध्वनिचालिका म्हणून काम केल्यानंतर: "सर्व शारीरिक व मानसिक त्रास लक्षात घेऊनही काम करणे ही मोठीच गोष्ट होय."

एक नटी: "थोडेसे शिक्षण घेतल्यावर मुलींना ह्या धंद्यात पडावेसे वाटते कारण थोडे दिवस का होईना पण चैन करता येते."

आठ वर्षे काम केलेल्या एक परिचारिका: "कोणत्याही धंद्यात स्त्रीला आपले चारित्र्य शुद्ध ठेवता येते . . . हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे . . . "

एका विवाहित लिपिकेला वाटते : "अजूनही पुरुषाचा पुरुषी दृष्टिकोन उघड आहे."

अविवाहित लिपिकेला तेच वाटते : "तरुण श्रमिक मुलगी म्हणजे लोकांना वाटते 'बिनमालकीची मालमत्ता' . . . "

एका विधवा परिचारिकेचे दीर्घ कालाच्या नोकरीनंतरचे स्वगत : "अगदी एकाकी वाटते मला आणि पुढे कसे होईल हेच विचार मनात येतात . . . "

दुसऱ्या एक विधवा प्राथमिक शिक्षिका उद्गारतात : "मला मूल नाही . . . ही एकाकी अवस्था मी देवाच्या स्मरणाने भरून काढते."

एक खंत करीत असलेल्या पदवीधर: "आज माझे आईवडील ह्यात असते तर . . . त्यांना त्यांच्या श्रमांचे चीज झाल्यासारखे वाटले असते . . . . इतकेच मला वाईट वाटण्याचे कारण . . . "

बारा वर्षे शिक्षिकेचा व्यवसाय केलेल्या एक चार पदव्या धारण करणाऱ्या : "नैतिक मूल्ये, शिस्तीच्या कल्पना, सर्वसामान्य ज्ञान ह्या बाबतींत पूर्वीचे आणि आताचे विद्यार्थी ह्यांत जमीन अस्मानाचा फरक आहे . . . "

एक विधवा शाळातपासनीस उद्गारतात: " . . . अविवाहित श्रमिक मुलगी ही अधिक स्वतंत्रपणे वागू लागते. नंतर ती वराची निवड चुकीची करते किंवा आवतीभोवतीच्या पुरुषांच्या दुष्टपणाला बळी पडते . . . "

आणि शेवटी एक अविवाहित दुहेरी पदवीधर म्हणतात : "स्त्रीचे पूर्वीचे स्थान बदलत आहे. आणि तिला जास्तीजास्ती संधी मिळत आहे. त्याचा तिने पुरेपूर फायदा घेतला पाहिजे . . . तरी पण कुटुंबाची सेवा हे तिचे मुख्य कर्तव्य . . . कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती जबाबदार नागरिक बनेल असा तिने प्रयत्न केला पाहिजे . . . आणि तिने तशी माहिती मिळविली तर ते कसे साध्य करावे हे तिला

समजेलही."

*  *  *

आपल्या समाजातील मध्यमवर्गीय थरातून सुशिक्षित स्त्रींचा नमुना घेऊन स्त्रीच्या जीवनाच्या विविध कडांचा अभ्यास करण्याचा आतापर्यंत प्रयत्न केला. परंतु समाजाच्या खालच्या स्तरातील अशिक्षित भगिनींकडे दुर्लक्ष करणे लेखिकेला योग्य वाटत नाही. निव्वळ पैशाच्या अडचणींमुळे त्यांना कामासाठी बाहेर पडावे लागते. व जे मिळेल ते कष्टाचे काम पत्करावे लागते. ह्या महिलांच्या श्रमांना शारीरिक श्रम असे म्हणावयास हरकत नाही कारण अशा कामाला शिक्षणाची आवश्यकता नसते. अखिल भारतात ६,९४,०१,७०९ श्रमिक महिला आहेत त्यांपैकी २,८१,७५९ ह्यांचे व्यवसाय माहीत असल्यामुळे ती संख्या उणी केल्यास बाकीच्या महिला शारीरिक श्रमिका आहेत असे म्हणावयास हरकत नाही. ह्यांतील बहुतेक शेतकरी किंवा शेतावरील मजूर म्हणून काम करीत असतात १९७० च्या खानेसुमारीप्रमाणे ७४ टक्के. पुरुषांच्या मानाने त्याना कमी वेतन मिळते. त्यांची परिस्थिती आणि प्रश्न ह्यांची अजून कोणी फारशी दखल घेतलेली दिसत नाही. प्रस्तुत लेखिकेलाही इतक्या व्यापक क्षेत्राचा अभ्यास करणे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीत अशक्य होते. ह्या शेतकरी महिला वगळल्यास औद्योगिक श्रमिक महिलांच्यावर एक लहानशी टीप येथे देत आहे.

त्यांच्या मुख्य समस्या थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येतील : श्रमशोषण, पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी मजुरी अगर हलक्या दर्जाचे काम आणि संघटनेचा अभाव. श्रमशोषणाबद्दल पुढीलप्रमाणे उपाय केले जात आहेत : "स्त्रीश्रमिकांचे शोषणास प्रतिबंध करण्याकरिता भारतासहित सर्व राष्ट्रांनी कायदे केले आहेत." ते पुढीलप्रमाणे : "१९१९ सालापासून आंतर्राष्ट्रीय मजूर संघटनेने बाळंतपणाच्या वेळी (पगारी रजा) वगैरे संरक्षण, रात्रीच्या वेळी काम करण्यास मनाई किंवा तत्सम दंडक तसेच विशेष धोक्याचे अगर आरोग्यहानीकारक किंवा ज्यात स्त्रियांना भीती आहे अशा व्यवसायास बंदी. आणि व्यवसायसंधी व त्यासाठी जरूर ते शिक्षण ह्याबाबतीत स्त्रीपुरुष असा भेद न करणे." आंतर्राष्ट्रीय मजूर संघटनेचे बावीस आदेश आहेत. "जरी भारत सरकारने हे सर्व आदेश पूर्णतया मान्य केले नसले किंवा त्यांच्या शिफारशी जशाच्या तशाच प्रत्यक्षात उतरविलेल्या नसल्या तरी त्यांतील तत्त्वांना सर्वसाधारण मान्यता दिली असून स्त्रियांच्या व्यवसायासंबंधीच्या कायद्यात व नियमात त्यांना स्थान दिले आहे."[४८]

बुद्धिजीवी श्रमिकांच्या वेतनात स्त्रीपुरुष असा भेद केला जात नाही. शारीरिक स्त्रीश्रमिकांना कमी वेतन मिळण्याचे कारण त्यांचा गरीब स्वभाव आणि

जे मिळेल ते काम पत्करण्याची तयारी. परंपरागत चालत आलेल्या स्त्रीपुरुष श्रम-विभागणीच्या कल्पनांनुसार तिला कमी वेतन तरी दिले जाते अगर कमी मजुरीचे काम तिच्या वाटयास येते. जेव्हाजेव्हा ही परिस्थिती सुधारण्यासाठी कायद्यांच्या मार्गाने प्रयत्न केला जातो तेव्हा मालकवर्ग स्त्रियांची संख्या कमी करतो.

शारीरिक वा बुद्धिजीवी स्त्रीश्रमिकांच्या बाबतीत कशात साम्य असेल तर ते संघटनेच्या अभावात. मजूर संघटनेच्या फारच थोडया स्त्रिया सभासद आहेत.

आणखी एका बाबतीत दोन्ही वर्गांच्या समस्यांत साम्य आहे. स्त्री ही स्त्रीच. तिला गृहिणी व माता म्हणून आपले कर्तव्य करावयाचे असते आणि सर्व गैरसोईंसहित बाहेरील काम करावे लागते. ह्या उभय भूमिकांत संघर्ष निर्माण होतो.

आधुनिक जगात स्त्रीला कराव्या लागणाऱ्या विविध भूमिकांचे तसेच तदनुषंगाने येणाऱ्या नैतिक बाजूचेही चित्रण येथवर केले आहे.

## संदर्भ


१. रघुवंश, ८-६७.

२. "दी फेडरल कौंसिल व दी फेडरल असेंब्ली ह्यांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यात यावा असा ठराव पास केलेला असतानाही त्यावर सार्वमत घेता ३२३,२७७ विरुद्ध ६५४,९३९ मतांनी नाकारण्यात आला."–दी स्टेटस्मन इयर बुक–१९६६-६७, पा. १४६४. पुनः १९७० साली हा ठराव वरील विधीमंडळांनी पास केला आहे.

३. यू. एन्. कमिशन ऑन दि स्टेटस् ऑफ् वुइमेन्–१९ व्या अधिवेशनाचा अहवाल, पान ४६.

४. दी स्टेट्समन इयर् बुक–१९६६-६७, पा. ११९४.

५. ब्रिटिश इन्फरमेशन सर्व्हिसिस्, वुइमेन इन् ब्रिटन (१९६२), पा. १६.

६. तक्ता २७ आणि २८ पहा.

६ अ, इंपॅक्ट, यूनेस्को, जा.मा. १९७०, पा. १२.

७. वुइमेन् इन् इस्रायल (इझ्रायल टुडे माला), पा. १२.

८. यु.एन्. कमिशन् ऑन दी स्टेटस ऑफ् वुइमेन, १९ व्या अधिवेशनाचा अहवाल, पा. ४७.

९. युनेस्को, दी पोलिटिकल रोल ऑफ् वुइमेन (१९५५), पा. ७२.

१०. वरील ग्रंथ, पा. ७५.

११. वरील ग्रंथ, पा. ७५-७६.

१२. वुइमेन् इन् ब्रिटन, पा. १६.

१३. सोव्हिएट रिव्ह्यू, व्हॉल्युम IV, नंबर १८, ७ मार्च १९६७, पा. ९.

१४. यु. एन्. कमिशन ऑन् दी स्टेटस ऑफ् वुइमेन् १९ व्या अधिवेशनाचा अहवाल, पा. ४६-४७.

१५. युनेस्को, दी पोलिटिकल रोल ऑफ् वुइमेन् (१९५५), पा. १२२-२४.

१६. वरील ग्रंथ, पा. १२६.

१७. जट्रूड बूसी अॅन्ड मार्गारेट टाइम्स्, वुइमेन्स इंटरनॅशनल लीग फॉर पीस अॅन्ड फ्रीडम्, (१९६५), पा. ७-८.

१८. वरील ग्रंथ पा. १११.

१९. वरील ग्रंथ, पा. २१०, २११.

२०. वरील ग्रंथ, पा. २२४.

२१. वरील ग्रंथ, पा. २४६.

२२. वरील ग्रंथ, पा. २४७.

२३. तक्ता २ पहा.

२४. ए. एन्. मुल्ला, दी हिंदू लॉ, पा. ७५८.

२५. ज्योत्स्ना त्रिभुवन, लॉ रिलेटिंग टू वुइमेन इन् इंडिया, पा. ७९.

२६. तक्ता २ पहा.

२७. ज्योत्स्ना त्रिभुवन, लॉ रिलेटिंग टू वुइमेन इन् इंडिया, पा. ८१-८३.

२८. तक्ता २ पहा.

२९. डि. के. सन्त, "आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री"—भारतीय स्त्री पुस्तकातून, पा. १०६.

३०. ए. बी. शहा, दी रूटस् ऑफ् ऑबसिनिटी (१९६८), पा. ७-८.

३१. टाईम, २ फेब्रुवारी १९६८, पा. ५०.

३२. यु. एन्. स्टॅटिस्टिकल् इयर बुक (१९६६), पा. ७६०.

३३. रा. द. रानडे, पाथवे टु गॉड इन् हिंदी लिटरेचर (१९५४), पा. २८८-८९.

३४. वुइमेन इन् ब्रिटन, दी सेंट्रल ऑफिस ऑफ् इनफरमेशन (१९६४), पा. २४.

३५. वरील ग्रंथ, पा. २४-२५.

३६. युनेस्को, दी चेंजिंग सोशल पोझिशन ऑफ् वुमेइन इन् जपान (१९६१), पान. १३७.

३७. हिंदू वुमन अॅन्ड हर् फ्यूचर (१९४८), पा. १९३.

३८. एल्. बी. जोशी आणि डी. बी. सरदेसाई, हेल्थ इन् हायस्कूल (पुणे शहर आणि जिल्हा) (१९६३-६४), पा. १, ७०,७१.

३९. वेस्टरमार्क, फ्यूचर ऑफ मॅरेज इन् वेस्टर्न सिव्हिलायझेशन, पा. १४८.

४०. एम्. एपेल्, अॅडोलेसन्ट अॅन्ड मोरॅलिटी (१९६७), पा. २१८.

४१. वरील ग्रंथ, पा. २५.

४२. वरील ग्रंथ, पा. २१८.
४३. के. एम्. मुनशी, फाउन्डेशन ऑफ् इंडियन कल्चर (१९६५), पा. २६, ५०.
४४. बा. गं. टिळक, गीतारहस्य, पा. ७०.
४५. मॅक्आयव्हर अ‍ॅण्ड पेज्, सोसायटी, पा. २६४.
४६. पर्ल बक्, 'दी पिल् अ‍ॅण्ड टीन् एज् गर्ल', दी रिडरस् डायजेस्ट, जून १९६८.
४७. रा. द. रानडे, दी भगवद्गीता अ‍ॅज् अ फिलॉसॉफी ऑफ् गॉड रिअलायझेशन् (१९५९), पा. २५२.
४८. गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया, मिनिस्ट्री ऑफ् लेबर अ‍ॅन्ड एम्प्लॉयमेंट, लेबर ब्यूरो, वुईमेन इन् एम्प्लॉयमेंट (१९६१) ८ वी माला, पा. २४-२५.

## प्रकरण ८ वे

# समारोप

प्रत्येक काळ्या मेघाला रुपेरी कडा असतेच. दुसऱ्या महायुद्धासारख्या भयंकर अरिष्टातूनही जगात समता स्थापण्याचा प्रयत्न झाला. भारतातीलच नव्हे तर सर्व देशांतील स्त्रीवर्गाला समतारुपी फायदा झाला आणि ती न्यूनगंडातून मुक्त झाली. तसेच एक जागतिक आवश्यकता म्हणून तिच्या मातृत्वाचे कार्य मर्यादित करण्यात आले आणि विशेषत: भारतासारख्या आपल्या देशात. त्यामुळे एका मूलभूत बंधनातून तिला मोकळीक मिळाली. तेव्हा विसाव्या शतकातील उत्तरार्ध म्हणजे तिला मिळालेल्या स्वातंत्र्याची परीक्षाच म्हणावयाची. तिच्या परीक्षेला नुकतीच कुठे सुरुवात झाली आहे. ह्या स्वातंत्र्याचे मूल्यमापन आताच करणे अकाली ठरेल. परंतु 'शितावरून भाताची परीक्षा' ह्या न्यायास अनुसरून महाराष्ट्रीय स्त्रियांच्या दोन नमुन्यांचा अभ्यास करण्यात आला. बुद्धिजीवी वर्ग पसंत करण्याचे कारण म्हणजे कोणत्याही घडामोडीची पहिली प्रतिक्रिया ह्याच वर्गावर होत असते. शिवाय हाच वर्ग राष्ट्राच्या नेतृत्वाचे कार्य करीत असतो. पसंत केलेले नमुने ह्या वर्गाचे शक्य तितके प्रातिनिधिक असतील असाही प्रयत्न करण्यात आला.

ह्यातून स्त्रीचे जे चित्र उठले आहे ते फार गुंतागुंतीचे आहे. एकंदरीने चित्र तर समाधानकारक वाटते पण मध्येच काहीतरी खटकते. ही खटकणारी बाजू कालांतराने नष्ट होईल अशी आशा धरावयाची पण न जाणो सबंध चित्रावर तिची काळी सावलीही पसरण्याचा संभव आहे.

स्त्री ही शारीरिकदृष्ट्या पुरुषापेक्षा भिन्न आहे हे येथे नमूद करण्याचे कारण नाही. परंतु आधुनिक काळात स्त्रीपुरुषांतील भेदापेक्षा साम्यावरच जोर अधिक दिला जातो आणि बरोबरच आहे ते. अलिकडील वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीमुळे मानवाच्या शारीरिक श्रमांचे महत्त्व कमी झाले असून बौद्धिक श्रम अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. ही गोष्ट स्त्रीची समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. शैक्षणिक पारंगता मिळविल्याने ह्या क्रियेला गती प्राप्त होते.

स्त्रीचे जीवन अजूनही असुरक्षित आहे आणि तेही विशेषत: आपल्या देशात व महाराष्ट्राची तर त्यात चढच आहे त्या बाबतीत. बाळंतपणातील मृत्यूंची संख्या बरीच आहे. वास्तविक ही नैसर्गिक गोष्ट. परंतु तेथे आमच्या स्त्रिया दगावतात, शिवाय स्त्रियांना पळवून नेणे किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करणे हेही प्रकार चालूच आहेत. हजारो भगिनींना सक्तीने किंवा फूस लावून पळविले जाते, त्यांपैकी काहींची वर्दी

पोलिसांना देण्यात येते परंतु थोड्याच जणींचा पत्ता लागतो. हेसुद्धा स्त्रिया व मुली ह्यांच्या अनैतिक व्यापारास संयुक्त राष्ट्राने–भारत त्याचा सदस्य आहे– बंदी घातलेली असूनही.

भारतदेशात निरनिराळे धर्म व पंथ आहेत. तथापि त्यात वैशिष्टचपूर्ण आणि सहिष्णु असे हिंदुधर्मीय बहुसंख्येने आहेत. सरकारचे सर्वधर्मसमानित्व–सेक्युलॅरिझम्– धोरण आणि नागरीकरण व आधुनिकता ह्यांचे आक्रमण सर्वत्र हळूहळू होत आहे. त्यामुळे स्त्रियांमध्ये उदार मनोवृत्तींचा फैलाव होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आंतर्-जातीय आणि आंतर्धर्मीय झगडे सारखे चालत असत. स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे एकजुटीची भावना निर्माण झाली होती परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही भावना टिकून राहिली नाही. उलट त्यात आंतर्राज्यीय संघर्षांची भर पडली आहे. ह्या समस्या प्रस्तुत विषयाच्या कक्षेबाहेर आहेत हे मान्य केले तरी जातीय विद्वेष नष्ट करण्यास व राष्ट्रीय ऐक्यात्मतेची भावना वाढीस लावण्यास व तसे करून स्त्रियांना नक्कीच राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावता येईल.

जातीय विभाजन व जातीतच लग्न करण्याची प्रथा बऱ्याच प्रमाणात रूढ आहे. जात आणि वर्ग हे एकमेकांस पुष्टिदायक ठरत आहेत. विवाह व कुटुंब ह्यांच्यासारख्या सामाजिक संस्थांशी स्त्रिया निगडित आहेत. त्यांची काही अनिष्ट वैशिष्टचे दिसून येतात. समाजसुधारकांची चिकाटी आणि बालविवाह प्रतिबंधक कायदे असूनही अखिल भारतातील १० ते १४ वयाच्या गटातील एकपंचमांश मुलींची लग्ने झाली आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण दोन टक्क्यांनी कमी आहे. ह्यावरून असे दिसून येते की विशेषतः ग्रामीण विभागातील मातापित्यांना मुलगी वयात येण्यापूर्वी तिचा विवाह उरकून टाकावा असे वाटते.

शहरातील सुशिक्षित वर्गात ह्याच्या उलट परिस्थिती आहे. ह्या वर्गातील मुलींना 'सावधान' ऐकण्याची वेळ येणे ही सोपी गोष्ट नसते. जात, दर्जा आणि हुंडा ह्यांच्यासारखी विघ्ने आ पसरून उभी असतात. त्याचा परिणाम म्हणजे विवाहाचे वयोमान भलतेच वाढले आहे (सरासरी २३) ! दरम्यान, ज्यांना विवाहबद्ध होण्याची इच्छाच नाही अशा १० टक्के वगळल्यास, ९०टक्के मुली उच्च शिक्षणाकडे आणि तदनंतर किंवा त्याबरोबर नोकरी करू लागतात (३० टक्के), आशा ही की आईवडील लग्न जमवतीलच. काहींच्या बाबतीत ही आशा पुरी होते तर काही प्रौढ कुमारिका होऊन रहातात. नैसर्गिक वृत्तींना वाव देण्यास ह्यांच्यापैकी काहीजणी गैरमार्गाचा अवलंब करतात. मागली पिढी ह्या घटनांच्याकडे भीतियुक्त मनाने पहात असते. ही त्यांची भीती निराधार नाही कारण निरनिराळ्या आश्रमांचे आकडे ती सार्थ आहे असे सिद्ध करतात.

आपले लग्न जमण्याच्या बाबतीत काही कुमारिकांना इतकी असहायता जाणवते की त्या वरनिवडीच्या आपल्या काही आवडी आहेत हेही सांगत नाहीत (२० टक्के)!

आणखी, विवाहोत्तर नोकरी पुढे चालू ठेवण्याची इच्छा आहे की नाही असे विचारल्यास वरपक्षाला पसंत नसल्यास हे आर्थिक स्वातंत्र्य त्या सोडावयास तयार असतात !

एकदा का हा विवाहपेच सुटला की मग बहुतेकजणी सुखी असतात. नैसर्गिक आपत्तीमुळे नव्हे पण अन्य कारणांनी विवाहविच्छेद झाल्याची उदाहरणे क्वचितच (२ टक्के). हे प्रमाण पुढील पिढीत कदाचित वाढण्याचा संभव आहे कारण नवी पिढी ही अधिक स्वतंत्र आणि व्यक्तिवादी वातावरणात वाढविली जात आहे. श्रमिक स्त्रीची घरातील गैरहजेरी वगैरे गोष्टींशी केवळ तिचा जोडीदारच नव्हे तर अविभक्त कुटुंबातील सदस्यही जमवून घेऊ लागले आहेत.

अशा तऱ्हेने ही पूर्वापार चालत आलेली अविभक्त कुटुंबपद्धती कमावत्या महिलेला वरदानच ठरत आहे. कमी जबाबदारी, घरातील कामाची वाटणी अधिक सोईस्कर. पण ही स्थिती प्रत्युत्तरदायी स्त्रियांपैकी एकतृतियांशांच्या बाबतीत खरी आहे. विधवा आणि घटस्फोटिता आपल्या पित्याच्या कुटुंबाच्या आश्रयास जातात. तेव्हा त्यांनी आपण 'एकत्र कुटुंबात' आहोत असे नमूद केले आहे. म्हणूनच भग्न कुटुंबाचे प्रमाण विच्छेदी विवाहाच्या निम्मे आहे (तक्ता २). दोनतृतियांश महिलांना घराच्या आत व बाहेरील जगाला एकटयानेच तोंड द्यावे लागते.

भावी पिढीच्या अनुषंगाने जेव्हा कुटुंबसंस्थेचा विचार करावयास लागतो तेव्हा एक गंभीर स्वरूप नजरेस येते. कुटुंबनियोजनाची आवश्यकता नव्याने सांगण्याची जरुरी नाही. परंतु हे कुटुंबनियोजन कोणत्या पातळीवर आणि केव्हा करावे ? ज्या वर्गाचा नमुना घेतला आहे त्यातील अपत्यरहित असलेल्या श्रमिक महिलांचे प्रमाण अर्थार्जन न करणाऱ्यांच्या (११ टक्के) दुप्पटीपेक्षा अधिक आहे (२४ टक्के). वंध्यत्व नैसर्गिक असेल वा नसेलही. कारण १४ टक्के स्त्रिया आपण कुटुंबनियोजन करीत असतो हे उघडपणे सांगतात.

प्रत्येक विचारी भारतीयाला जननसंख्येचे वाढते प्रमाण आणि मृत्युसंख्येचे घटते प्रमाण हे जाणवत असते. ही लोकसंख्येची वाढ रोखून धरण्यासाठी सरकार पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे. परंतु सर्वसामान्यतः लोकांचा उत्साह कमीच. आर्थिकदृष्टया खालच्या पातळीवरील लोक तितकासा प्रतिसाद देत नाहीत हे महाराष्ट्रातील सार्वजनिक रुग्णालयातील आकडयांवरून दाखविण्यात आले आहे. ह्या बाबतीतील गरीब व अशिक्षित लोकांच्या आणि शिक्षित लोकांच्या वृत्तीत जमीन अस्मानाचे अंतर दिसून येते. हेच अंतर विविध धर्मांनुसारही आढळून येते. अशा परिस्थितीत ह्या अडाणी लोकांचा विरोध मोडून काढण्याकरिता त्यांच्यावर सक्ती करण्यापेक्षा आर्जवून, पटवून, वळवून घेणे हाच उपाय योग्य वाटतो.

अनेक सामाजिक समस्यांवर शिक्षण हाच रामबाण तोडगा आहे असे म्हटले जाते आणि खरे आहे ते ! स्वातंत्र्योत्तर काळात शालेय व उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या

संख्येत अफाट वाढ झालेली असली तरीसुद्धा त्या त्या वयोमान गटातील संख्येशी तुलना केल्यास ही वाढ फार कमी वाटते (ह्या विधानाला २४ टक्के साक्षरता ह्या आकड्याने पुष्टी मिळते). शिवाय, विविध पातळीवर मुलांच्या मानाने मुलींची संख्या कमीच. स्त्रियांच्या दृष्टीने शिक्षकाचा पेशा हा अर्थार्जनाचा योग्य मार्ग असे मानले जाते तरीपण प्राथमिक शिक्षक म्हणून अवघ्या एकतृतियांश स्त्रियाच काम करीत आहेत. आणि शिक्षक अपुरे पडतात ही वस्तुस्थिती असूनही !

मात्र ज्ञानसंपादनाच्या चुरशीमध्ये मुली आघाडीवरच ! शिक्षणाच्या बहुतेक सर्व शाखांत त्या अधिक गुण मिळवितात (तक्ता २९). मुलांचाच खास मक्ता अशा शाखेत जरी त्या नुक्ताच प्रवेश करीत असल्या तरी त्यांचा मुख्य कल भाषा आदी विषयांकडेच दिसतो. १९६१ च्या खानेसुमारीनुसार ६० टक्के पदवीधर स्त्रिया अर्थार्जन करीत नाहीत. ह्यांमध्ये काही आपला अभ्यासक्रम पुढे चालविणाऱ्या असतील तर काहींना नोकरी वगैरे करण्याची इच्छा नसावी.

वैद्यकीय व्यवसाय हा आवश्यक असा महत्त्वाचा व्यवसाय आहे. भारतामध्ये डॉक्टर वर्गाची संख्या अपुरी आहे हे तुलनात्मक आकड्यांवरून स्पष्ट दिसून येते. ज्या स्त्रियांनी डॉक्टरी पदवी मिळविली आहे अशा सर्वजणी आपल्या ज्ञानाचा उपयोग करतात की नाही हे शोधून काढणे शक्य नव्हते व तसा अभ्यासही आजवर झालेला नाही. हे आवश्यक ज्ञान व्यर्थ जाऊ नये म्हणून काही स्त्रीडॉक्टरांनी पाच वर्षांचा करारनामा लिहून द्यावा असे सुचविण्यात आले.

शैक्षणिक योग्यतेनुसार रोजगारी, अशा प्रकारचा सखोल व पूर्ण अभ्यास करणे वेळ आदीकरून मर्यादेमुळे अशक्य होते. आपल्या देशात बेकार लोकांनी आपली नोंद केलीच पाहिजे अशी सक्ती नाही. तथापि सेवायोजन कार्यालये तांत्रिक पात्रता असलेल्या सर्व लोकांना नोकऱ्या देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे (तक्ता ३१). स्त्री असो वा पुरुष असो, शिक्षण व्यर्थ जाऊ नये. किती तंत्रज्ञ अवश्य आहेत हे योजना व शिक्षण ह्यांच्या अनुषंगाने निश्चित केल्याखेरीज परिस्थिती सुधारणार नाही. हे आताशा कोठे अधिकारी वर्गाच्या लक्षात येऊ लागले आहे.[1]

तक्ता ३३ मध्ये प्रतिसादी स्त्रियांच्या रोजगारीचा आराखडा सविस्तररीत्या दिलेला आहे. त्यांच्या पसंतीचा अनुक्रम पुढीलप्रमाणे : शिक्षिका, परिचारिका, तांत्रिक व्यवसाय, शासन आणि धंदे; ह्या धंद्यांत वैद्यकी, वकिली, आर्किटेक्ट, इंजिनियर आणि इतर धंद्यांचा समावेश होतो. श्रमिक म्हणून त्यांच्या वरिष्ठांनी केलेले मूल्यमापन 'समाधानकारक व कार्यक्षम श्रमिक' असेच एकंदरीने ठरविले आहे. घराबाहेरील कामामुळे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो असेही त्यांचे मत आहे.

सात देशांतील स्त्रीपुरुष श्रमिकांची तुलना केल्यावर दोन पुरुषांस एक स्त्री असे प्रमाण दिसून येते. त्यातल्या त्यात महाराष्ट्राचा क्रमांक पहिला लागतो. स्त्रीपुरुष श्रमिकांचे असे विषम प्रमाण का असावे ह्याची कारणपरंपरा दर्शविणे प्रस्तुत पहाणीच्या

क्षेत्राबलीकडे आहे. परंतु पुरुषाने अर्थार्जन करून कुटुंबाचे पोषण करावे व स्त्रीने घर संभाळावे असे श्रमविभाजन स्वाभाविक व जोपर्यंत कुटुंबनियोजन माहीत नव्हते तोपर्यंत सातत्याने स्त्रीला श्रम करणेही अशक्य ही कारणे असावीत. ही परंपरा अजूनही काही प्रमाणात चालू राहिली आहे.

इंटर्नॅशनल् फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेनच्या अहवालानुसार : "आधुनिक समाजात स्त्रीची भूमिका निश्चित करणारी मुख्य कारणे पुढील तीन प्रमुख सदराखाली देता येतील हे उघड आहे :

(अ) शारीरिक घटक आणि तदनुषंगाने निर्माण होणारी सामाजिक कर्तव्ये : मातृत्व, बालसंवर्धन व त्यांचे शिक्षण;

(ब) ऐतिहासिक, नैतिक व धार्मिक घटक : समाजातील स्त्रीपुरुष भूमिकांविषयींच्या फरकाबद्दलच्या अतिरंजीत कल्पना : परंपरा व तिच्यामुळे उत्पन्न झालेले निषेध–'स्त्रीचे गूढ';

(क) आर्थिक घटक : श्रमिकांची बाजारातील मागणी, तज्ञांची जरुरी वगैरे.

जेव्हा आर्थिक गरजा महत्त्वाच्या ठरतात तेव्हा परंपरेचा जोर कमी होतो आणि स्त्रियांवरील मुलांचा भार कोणत्या साधनांनी हलका होईल किंवा एकदा घरातील जबाबदारी कमी झाली की त्या व्यावसायिक जीवनाकडे कशा परततील ह्याचा शोध सुरू होतो. उलट परिस्थितीत म्हणजे जेव्हा आर्थिक मंदी येते तेव्हा काम करण्याच्या–आपल्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास करण्याच्या–हक्कांची बजावणी करणे स्त्रियांना कठीण जाते. भलत्याच कल्पनांनी त्या भारावलेल्या असल्यामुळे त्यांच्या प्रगतीचा मार्गही अडखळतो."[२]

घराबाहेर काम करण्यामागील प्रमुख हेतू कुटुंबाचे पोषण हा असावा. अविवाहित, विधवा व घटस्फोटिता ह्यांना स्वतःसाठी व स्वतःवर अवलंबून असणाऱ्यांसाठी काहीवेळा अर्थार्जन करावेच लागते. इतरजणी कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालतात.

सरकारी व निमसरकारी नोकरीतील श्रमिकांचे वातावरण व परस्परसंबंध एकंदरीने समाधानकारक आहेत. परिचारिकेसारख्या व्यवसायातून अतिश्रम व थकवा, व्यवसायाचे व रहाण्याचे ठिकाण ह्यांतील बरेच अंतर वगैरेंसारख्या काही समस्या निर्माण होतात. तसेच अपुरे वेतन व इतर गैरसोई ही डॉक्टरी व्यवसायातील स्त्रियांची तक्रार आहे.

श्रमजीवी स्त्रीला दुहेरी जबाबदाऱ्या संभाळाव्या लागतात हे अजून समाजाने पूर्णतया लक्षात घेतले नाही. म्हणूनच शिशुगृहे अगर बालशिक्षणकेंद्रे वगैरे व्यवस्था व्हावी तशी केलेली नाही. त्यामुळे श्रमजीवी स्त्रीच्या जीवनात उभय जबाबदाऱ्यात सतत संघर्ष व त्यामुळे आपण काहीतरी अपराध करीत आहोत ही भावना सारखी टोचत असते. ह्यावर प्रतिसादी स्त्रियांनी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत. तूर्त त्या सोयी नसल्यामुळे श्रमजीवी महिलेवर सर्व बाजूंनी दडपण पडते.

तरीसुद्धा ह्या धडपडीत तिला समाधान आहे.

आपल्या खास संघटनांच्या द्वारा, शांततेसाठी व समाजकल्याणासाठी जागतिक रंगमंचकावर स्त्री आपल्यापरीने प्रयत्न करीत आहे. हे प्रयत्न डोळयांत भरण्यासारखे नसतील अगर निराशजनकही असतील ! अशा चळवळीत व राजकीय भूमिकेतही भारतीय स्त्री इतर सुधारलेल्या देशांच्या मानाने सामान्यतः मागेच पण म्हटली तर पुढेच आहे.

आपल्या कायदेशीर हक्कांची बजावणी करणे हे जर गमक मानले तर घटस्फोट न घेता जुळवून घेणे अगर विभक्त रहाणे अशी काही स्त्रियांची उदाहरणे सापडतात. त्यागवृत्ती–मातृवृत्तीचा कळस आणि त्यातून दिसून येणारी विधायक प्रवृत्ती–ही श्रमिक व जन्मजात कुटुंबाच्या जोपासनेसाठी स्वखुषीने ब्रह्मचारी जीवन पत्करणाऱ्या स्त्रियांत तर दिसून येतेच परंतु पित्याच्या कुटुंबाच्या मालमत्तेचा हिस्सा नाकारण्यातही आढळून येते.

"स्त्री ही साहसप्रवृत्त झाली आहे", असे काही म्हणतात ! हे जर खरे असले तर वाटेत अडचणी येणारच. जी काही थोडीशी माहिती मिळाली त्यावरून ह्या नैतिक धोक्यांचा गंभीरपणे विचार करणे भाग पडते. ह्या बाबतीत अनाथ आश्रमाच्या सन्माननीय चिटणिसांची मुलाखत ध्यानात ठेवणे इष्ट.[३]

इतर राष्ट्रातील राष्ट्रीय बांधवांपासून त्यांचा सखोल, जबरदस्त विधायक राष्ट्राभिमान, नागरिक भावना, राष्ट्रीय एकात्मता आणि धाडसी वृत्ती, उचलावयाची का काही नैतिक मूल्यांचा त्यांनी त्याग केला आहे हीच कल्पना उराशी बाळगावयाची ?

ह्या अनुषंगाने 'रिफ्लेक्शनस् अबाउट ॲडोलसन्टस्' ह्या ग्रंथातील समारोपात्मक वाक्य लक्षात घेण्यासारखे आहे : "बहुसंख्य तरुणतरुणींना विवाह व कौटुंबिक जीवनाबद्दल फार आस्था व आदर आहे हे ह्या संशोधनातून सर्वतः स्पष्ट दिसून येते."[४]

स्त्रीची मातेची भूमिका ही फार मोठी विधायक भूमिका आहे. मातेचे पावित्र्य आणि मान हा संशयातीत आहे. माता ह्या शब्दाभोवती अनेक कथा व गीते गुंफण्यात आल्या आहेत. परंतु हे कार्य स्वाभाविक असल्यामुळे गृहीतच धरले जाते. मातेचे महत्त्व पुढील शब्दांत सुंदररीत्या वर्णिले आहे : " . . . अशा तऱ्हेने बालकाचा–किंवा दोन किलकिल्या डोळयांचा व केसांचा–जन्म म्हणजे दैवी कार्य आहे. परंतु ती नित्याचीच गोष्ट आहे. प्रत्येकजण जन्म देण्याचे कार्य करीत असतो. म्हणूनच त्याचे अवमूल्यन होते."[५] किमान आजकालच्या शहरी समाजात तरी त्याचे महत्त्व दिसून येते. गरोदर स्त्रीला जरूर ती मदत केली जाते वगैरे परंतु एवढयावरच थांबून उपयोगी नाही आणि जे करावयाचेते ही त्वरित केले पाहिजे.

आतापर्यंत आधुनिक स्त्रीचे केलेले हे चित्रण आशादायक तर खरेच परंतु पूर्णतया समाधानकारक नाही. श्रमिक महिलेवरील ताण कमी करण्याकरिता काही

त्वरित अमलात आणण्यासारखे उपाय सुचविले गेले आहेत. जर सरकार आणि स्त्रीसंस्था ह्यांचे सहकार्य होईल तर त्या अमलात आणणे कठीण नाही.

**शिशुगृहांची तरतूद**

ज्या कारखान्यांत अगर गिरण्यांत किमान ५० स्त्रिया काम करीत आहेत आणि जेथे फॅक्टरी कायदा लागू झाला आहे तेथे शिशुगृहांची सोय असलीच पाहिजे अशी सक्ती आहे. ह्यातून पळवाट काढण्यासाठी काही ठिकाणी पन्नासापेक्षा कमी स्त्रिया ठेवतात आणि/किंवा त्यांना हंगामी नोकरीवर ठेवले जाते. ज्या थोड्या ठिकाणी शिशुगृहे आहेत त्यांचा फायदा घेणे सर्वच स्त्रियांना जमत नाही. कारण दूर रहात असल्यामुळे लहान बाळाला आगगाडीतून वगैरे घेऊन जाणे कठीण पडते. मुलाला घरीच ठेवणे त्यांना सोईस्कर वाटते आणि तेथेच कशीवशी त्यांची व्यवस्था करतात.

मुंबईसारख्या शहरात, जेथे बहुसंख्येने स्त्रिया कामावर जातात, तेथे शिशुगृहे अगर बालशिक्षणसंस्था निरनिराळ्या ठिकाणी सुरू करणे कठीण नाही. प्रथमतः ही मागणी सचिवालयातील श्रमिक महिलांनी मांडली. पश्चिम रेल्वेच्या डॉक्टर भगिनींनीही ह्या मागणीला पुष्टी दिली. इतरांनी त्याला जोड दिली. अशा किती शिशुगृहांची जरुरी आहे व ती कोठे उघडण्यात यावी हे येथे सुचविणे शक्य नाही. तथापि कोणत्या.ही संस्थेने ह्या कार्यास सुरुवात करण्याचे ठरविले तर सरकार आणि/किंवा महानगरपालिका आर्थिक व इतर मदत देईल असे अनधिकृतरीत्या सांगण्यात आले.

इतरांच्या मानाने औद्योगीकरणात तसा भारत मागेच आहे. परंतु वरील बाबतीत इतर पुढारलेल्या देशांनी विशेष पुढे पाऊल टाकले आहे असे म्हणता येणार नाही. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेनच्या अहवालात काय म्हटले आहे पहा :

"ह्या सर्वांतून एक निष्कर्ष निघतो : श्रमिक मातांना मदत करणाऱ्या पुरेशा संघटना नाहीत. हे युरोप अगर उत्तर अमेरिकेपुरतेच खरे नसून लेबेनॉन आणि जपानातही तीच स्थिती आहे. तेथील नॅशनल असोशिएशनस् 'लज्जास्पद' व 'अनर्थावह' असे वर्णन करतात. आपल्या धंद्यात का खंड पडला असे मातांना विचारले असता, त्या हेच मुख्य कारण सांगतात. उद्बोधक आकडे दिले जातात परंतु दी स्टेटस् ऑफ् वुइमेन ऑफ् दी अमेरिकन प्रेसिडेंशिअल कमिशनच्या अहवालात दिलेले आकडे सर्वांत अधिक आहेत."

"ह्या अहवालात यू. एस. मध्ये १८५,००० इतकी लायसेन्सड् शिशुगृहे आहेत असे म्हटले असून सहा वर्षांखालील मुले असणाऱ्या ३०,००,००० माता बाहेरील कामे करीत आहेत. बऱ्याच जणींना कशीतरी व्यवस्था करावी लागते अगर देखरेखीशिवाय मुलांना ठेवून जावे लागते. ह्या उदासीनतेवरून हल्लीच्या जीवनक्रमाच्या वास्तवतेची समाजाला जाग आलेली नाही असे ह्या अहवालाचे मत आहे. फ्रान्समध्ये

१९६४ साली अवघी ४८१ शिशुगृहे होती आणि त्यात १८,००० मुलांची व्यवस्था होती. ज्या देशात कुटुंबसंस्था भरभक्कम आहे किंवा जेथे घरगुती मदत मिळू शकते अशा देशांना जास्त शिशुगृहांची आवश्यकता नाही."[६]

अध्यक्ष केनेडी ह्यांनी जे कमिशन नेमले त्यामुळे अमेरिकन श्रमिक महिलांची बरीच सोय झाली ह्याबद्दल धन्यवाद.

**वाहतुकीच्या सुखसोई**

मुंबईतील लोकल गाड्यांतून स्त्रियांसाठी एक किंवा दीड डबा राखून ठेवलेला असतो. गर्दीच्या वेळी गाडीत चढणे अगर उतरणे हे किती मुष्किलीचे असते ते अनुभवसिद्धच आहे. म्हणून रेल्वे अधिकाऱ्यांनी स्त्रियांकरता दोन डबे जोडावे. ह्या सवलतीच्या बदली सध्या रात्रौ १० नंतर स्त्रियांच्या डब्यात कुणालाही बसता येते. ती वेळ ९ची करावी.

रहाण्याचे ठिकाण व कामाचे स्थान ह्यांमध्ये मोठ्या शहरात बरेच अंतर असते. आपल्या नोकरवर्गाकरता सरकार अगर इतर खाजगी संस्थाही बसची व्यवस्था करतात. परंतु ही व्यवस्था सर्वत्र नसल्यामुळे अधिक बसची व्यवस्था करण्यात यावी.

**अंशकालिक व्यवसायांची तरतूद**

प्रस्तुत पहाणीनुसार परिचारिका, टेलिफोन ऑपरेशन आणि काही प्रमाणात शिक्षकाचा व्यवसाय हे स्त्रियांच्याच हातात आहेत असे दिसून आले. परिचारिकेच्या व्यवसायात स्त्रियांची संख्या अपुरी असून ज्या काम करतात त्यांच्यावर भलताच ताण पडतो. ही परिस्थिती सुधारण्यासाठी मदतनीस परिचारिका घेण्यात याव्या. तसेच अर्धा वेळ काम करण्यास परवानगी असावी. कामाची आखणी अशी करण्यात यावी की ज्यांची तशी वृत्ती आहे अशांना दोनतीन महिने रात्रपाळी द्यावी व त्याबद्दल जादा पगार देण्यात यावा.

वरील शेवटची सूचना करण्याची कारणे अशी की रात्रपाळीचे काम कंटाळवाणे, ताण पडणारे, तसेच विशेष धीराचे, चिकाटीचे, गांभीर्याचे व समतोल मनाचे असते. एका 'सिस्टर'ने म्हटले की आम्ही पहाटे पहाटे अगदी मरगळून जातो !

रात्रपाळीचे काम टेलिफोन ऑपरेटरस्नाही करावे लागते. त्यांतील काहीजणींनी तक्रारही केली. अर्थात त्यांना विश्रांतीसाठी व्यवस्था केलेली असते. कायद्याने नव्हे, परंतु ह्या कामासाठी अविवाहित मुलीच पसंत कराव्या. स्त्रीला अशा दोन आघाड्या –मातेची व कामाची–योग्य प्रकारे संभाळणे कठीणच जाते. वरील सूचनेमुळे अधिकाऱ्यांचाही प्रश्न सुटेल. शिवाय टेलिफोनचे तांत्रिक शिक्षण घेण्यास फार काळही लागत नाही.

दोन शासकीय अधिकारी, एक प्राथमिक व दुसऱ्या दुय्यम शिक्षणाधिकारी, म्हणाल्या की निम्नकाल शिक्षिका, विशेषतः स्थानिक शिक्षिकांना ठेवले तर त्यांचे

शासकीय प्रश्न सुटतील. अर्थातच शिक्षिका हव्यात म्हणून प्रशिक्षणाशिवाय कोणत्याही स्त्रियांना पसंत करू नये हे कोणीही मान्य करीलच.

टाटा इन्स्टिटच्यूट ऑफ् सोशल सायन्सिस्, मुंबई आणि दिल्ली स्कूल ऑफ् सोशल वर्क ह्या दोन संस्थांनी सरकारसाठी धावती पहाणी केली. निम्नकाल नोकऱ्यांची संधी स्त्रियांना उपलब्ध व्हावी की जास्त चौकशीची आवश्यकता आहे, हा वरील पहाणीचा उद्देश होता. मुंबईतून ४०० व दिल्लीतून १३७८ स्त्रियांचा नमुना घेण्यात आला. "दिल्लीतील प्रतिसादी स्त्रियांपेक्षा मुंबईतील विवाहित स्त्रियांचा कौल निम्नकाल नोकऱ्यांसाठी आढळून आला."[७]

शासकीय आणि वैद्यकीय व्यवसायात निम्नकाल कामाची व्यवस्था करता येईल की नाही हे लेखिकेला सांगता येत नाही. परंतु ४ टक्के भगिनींनी तशी मागणी केली ही गोष्ट खरी. ह्या मागणीची अधिकारीवर्गानी काळजीपूर्वक छाननी करणे जरूर आहे. "अगदी अलिकडेस, भारतसरकारने निम्नकाल व्यवसायांबद्दल स्त्रियांचा प्रतिसाद कसा आहे ह्याची पहाणी करण्यासाठी एक समिती नेमली असून दिल्ली स्कूल ऑफ् सोशल वर्क आणि टाटा इन्स्टिटच्यूट ऑफ् सोशल सायन्सिस् ह्या संस्थांना धावती पहाणी करण्यास सांगून सुरवात झालीच आहे. ग्रामीण व लहानसहान उद्योग-धंदे तसेच हस्तव्यवसाय ह्यांच्या वाढीसाठी सरकार उत्तरोत्तर अधिक लक्ष देत आहे, त्याअर्थी खेड्यापाड्यातून आणि मोठे उद्योगधंदे नसलेल्या भागातून स्त्रियांना निम्नकाल कामे मिळण्याचा संभव अधिक दिसतो."[८] एक मुद्दा मात्र निश्चितपणे पुढे मांडता येईल. अंशकालिक व्यवसायांची काही स्त्रियांची पसंती आहे म्हणून सबंध वेळ काम करू इच्छिणाऱ्या स्त्रियांना आडकाठी होऊ नये. ह्या प्रश्नाच्या अनुकूल प्रतिकूल बाजूंची इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेन् ह्यांनी आपल्या अहवालात संपूर्णपणे चर्चा केली आहे. त्यातील उतारा पुढीलप्रमाणे :

"पूर्णकाल कामापासून जे फायदे होतात तेच अंशकालिक व्यवसायांपासूनही होतात :

(अ) आर्थिक फायदा आहे परंतु तो किती प्रमाणात हे कामाच्या तासांवर अवलंबून राहील; अखेरीस काही झाले तरी त्यातून एकंदरीने फायदा आहेच;

(ब) नैतिक व बौद्धिक फायदे, व्यवसायातील उत्साह आणि इतर व्यक्तींशी येणाऱ्या संबंधामुळे हे फायदे होतात;

(क) मानवी व्यक्तिमत्वाबद्दल, उपयोग म्हणून आणि जबाबदारी म्हणून वाटणारी वाढती भावना;

(ड) काही उदाहरणांत अधिक समतोल कौटुंबिक जीवन.

निम्नकाल कामापासून गैरफायदे मात्र अनेक :

(अ) आर्थिक फायदा मर्यादित;

(ब) थोडेफार झाले तरी सामाजिक फायदे कमीच;

(क) नोकरीतील अस्थैर्य, असुरक्षितता;

(ड) बढतीची शक्यता कमी, विशेषत: उच्च श्रेणीमध्ये;

(इ) निम्नकाल व्यवसायामुळे मंदीची व हौसेखातर पत्करण्याची शक्यता;

(फ) केव्हा केव्हा मालकवर्गाकडून गैरफायदा घेतला जाण्याचा संभव, उदाहरणार्थ, जेव्हा थोड्या अवधीत बरेच काम करून घ्यावयाचे असेल तेव्हा;

(ग) शेवटी, पूर्णकाल काम करणाऱ्या सहकाऱ्यांच्या संबंधात गैरसमज निर्माण होण्याचा संभव."

म्हणूनच ज्या स्त्रियांना काम करण्याची इच्छा आहे त्यांनी अनुकूल-प्रतिकूल बाजू लक्षात घेऊनच निम्नकाल व्यवसाय पत्करावा. इतके मात्र म्हणता येईल की बाहेरील कामावर अजिबात पाणी सोडण्याऐवजी निम्नकाल व्यवसाय पत्करणे बरे.

इंटरनॅशनल लेबर ऑफिसने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे:

"कुटुंबाची जबाबदारी असणाऱ्या अनेक स्त्रियांच्या काही समस्यांना अंशतः उत्तर म्हणून अंशकालिक नोकरी बरी असे म्हणता येईल, परंतु अशा बहुसंख्य स्त्रियांच्या प्रश्नांना हे खरे उत्तर नव्हे."

दी इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेनच्या लीगल आणि एकॉनॉमिक स्टेटस ऑफ् वुइमेन कमिटीने १९६५ च्या परिषदेत एक ठराव पास केला. त्यात म्हटले आहे की, स्त्रियांचे व्यवसाय, विवाहित स्त्रियांचे किंवा लहान बालके असणाऱ्या स्त्रियांचे व्यवसाय म्हणजे निम्नकाल काम, ह्या कल्पनेशी पद्धतशोररीत्या निगडित केल्याने स्त्रियांच्या बाबतीत जो पक्षपाताचा धोका उत्पन्न होईल त्याचा इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेन निषेध करीत आहे.

यद्यपि, हे गैरफायदे असूनही निम्नकालिक कामांपासून काही लोकांना, विशेषतः स्त्रियांना आपल्या व्यवसायांशी संबंध ठेवता येतो व वेळ येईल तेव्हा पूर्णकालिक काम करता येते हे मान्य केले आहे; आणि शेवटी, निम्नकालिक श्रमिकांना पूर्णकालिक श्रमिकांसारखे पण प्रमाणतः सामाजिक व आर्थिक फायदे देण्यात यावे असा आग्रह धरला आहे (XV कॉन्फरन्स्, ठराव १३)."[९]

**अकालिक सेवानिवृत्ती**

सद्यःकाल म्हणजे भारताचा संक्रमणकाल हे आवर्जून सांगण्याची आवश्यकता नाही. सुरुवातीस ज्या महिला श्रमिक म्हणून घराबाहेर पडल्या त्यांच्यावर भलताच ताण पडला आणि त्यांची ओढाताणही झाली. मात्र आपल्या अडचणींना त्यांनी धीराने तोंड दिले. परंतु उत्तरकालात शारीरिक थकवा व काही वेळा आलेले वैफल्य त्यांना जाणवू लागले आहे. म्हणूनच अकालिक सेवानिवृत्तीची मागणी थोड्याजणींनी (११ टक्के, प्रश्न विचारलेला नसतानाही) केली, सर्वांनी नव्हे.

जर ही सवलत देता येण्यासारखी असेल तर ती स्त्रीपुरुष उभयतांना देण्यात यावी, समानतेच्या तत्त्वात तडजोड नको. मात्र त्याचबरोबर सेवानिवृत्तीचे फायदे प्रमाणत: मिळावेत.

आपल्या कष्टांची तीव्रता कमी करण्याकरिता प्रतिसादी स्त्रियांनी केलेल्या सूचनांवर येथवर विचारविनिमय केला. आतापर्यंत केलेल्या स्त्रीजीवनाचे चित्रण आदर्श तर नाहीच परंतु तसे होण्यासाठी व स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा विकास आणि व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने तिच्या सुप्त शक्तीला योग्य वळण देण्यास लेखिकेला ज्या सूचना कराव्याशा वाटतात त्या पुढे दिल्या आहेत.

स्त्रीच्या जीवनाला असलेले धोके शक्य तितके कमी झालेच **पाहिजेत.** प्रसूतीच्या काळी भारतीय स्त्रीच्या व त्या लहान बालकाच्या जीवाला धोका असतो. इतर देशांत हा धोका जर शक्य तितका कमी करण्यात आला आहे तर आमच्या येथे तसे का करता येऊ नये ? तसे पाहिले तर मातृत्व ही नैसर्गिक क्रिया आहे. त्यासाठी मातेला मृत्यूस तोंड देण्याची वेळ का यावी ? ह्याकरिता अधिक सूतिकागृहे व फिरते दवाखाने आणि प्रशिक्षित सुईणींची व्यवस्था व्हावी.

शिवाय, गर्भपातांमुळे ह्या स्त्रियांच्या मृत्युसंख्येत आणखीनच भर पडते. गर्भपातासारख्या वाममार्गाचा अवलंब स्त्रियांनी का करावा ? "गर्भपाताला कायदेशीर मान्यता देणे आणि बुद्धयाच केलेल्या गर्भपातासंबंधीचे नियम सैल करणे" हा उपाय नव्हे. जर एखाद्या मुलीचे पाऊल वाकडे पडले, तर तिच्या पालकांनी उपस्थित झालेल्या परिस्थितीला तोंड द्यावे पण दोन जीव धोक्यात घालू नये. तसेच, सौभाग्यवती स्त्रियांचीही अशी काही उदाहरणे आहेत की, का कुणास ठाऊक, गर्भपाताचा त्या प्रयत्न करतात आणि मृत्यूला बोलावणे पाठवितात ! ह्या बाबतीत कडक उपाययोजना झाली पाहिजे.

जीवनाच्या ह्या धकाधकीमध्ये, जेव्हा स्त्री घराच्या उंबरठ्याबाहेर पाऊल टाकण्याचे ठरविते तेव्हा आपल्या देहाचा अयोग्य फायदा घेतला जाण्याचा धोका असतो ही वस्तुस्थिती तिच्या लक्षात आणून दिली पाहिजे आणि तिनेही ती डोळ्याआड करता कामा नये. समजून उमजून आणि जरूर ती खबरदारी घेऊनच तिने श्रमिक जगात पाऊल टाकावे. त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारांनी "सप्रेशन ऑफ् इम्मॉरल ट्रॅफिक इन् वुइमेन ॲन्ड गर्ल्स्" अशा कायद्यांची कडक अंमलबजावणी करावी.

विवाह, कुटुंब आणि कुटुंबनियोजन ही सर्व परस्पर निगडित आहे. पहिल्या दोन संस्था आपल्याला टिकवून धरावयाच्या आहेत आणि अखिल राष्ट्रभर तिसऱ्याचा अवलंब करावयाचा आहे. विवाहसंस्था व कुटुंबसंस्था ह्या आधारभूत संस्थांना कुठेही तडा जाणार नाही म्हणून अवश्य ती खबरदारी घ्यावयास हवी. सामाजिक संकटांना तोंड देण्याकरिता कायदा करणे ठीक परंतु तो पूर्णतया परिणामकारक ठरत नाही हे आपल्याला दिसून आलेच आहे. जो काही थोडाबहुत त्यांचा उपयोग होतो तितका का

होईना, बालविवाह प्रतिबंधक कायदा व हिंदुविवाह कायदा–हुंडा कायद्याचा उल्लेख न करणे बरे–इस्त्राएल राष्ट्राने ज्याप्रमाणे कडकरीत्या अंमलबजावणी केली आहे,[10] त्याप्रमाणे ह्यांची सक्ती करावयास **पाहिजेच**.

ज्याप्रमाणे वयात येण्यापूर्वी मुलीचे लग्न न करणे बरे त्याप्रमाणे तारुण्य उलटल्यावर–मुलींच्या बाबतीत अंदाजे २५ नंतर–लग्न करण्याचे टाळावे. ह्याचा अर्थ आईवडिलांना मुलीला योग्य वेळी सासरी पाठविण्याची इच्छा नसते असे नव्हे, परंतु मुलांच्या बाजूनेच अडचण येते. ह्याला आर्थिक परिस्थिती जबाबदार आहे. व्यावसायिकदृष्टया मध्यमवर्गीय मुलांचा जीवनक्रम २५ ते ३० वर्षे वयापर्यंत निश्चित होत नाही. त्यामुळे त्यांचा विवाह लांबणीवर पडतो. हा प्रश्न शिक्षणक्रम आणि उपलब्ध मानवबळाच्या अनुषंगाने व्यावसायिक नियोजन करणे ह्याच्याशी निगडित आहे. जन्ममृत्यूप्रमाणे विवाहाची सक्तीने नोंद करणे व समाजसंस्थांनी विवाहसल्लागार मंडळे उघडणे अवश्य आहे. विवाहाची सक्तीने नोंद झाल्यास वरवधूंना किमान वयाखाली लग्न करता येणार नाही आणि अप्रत्यक्षपणे कुटुंबनियोजनास मदत होईल.

ह्याच्याशीच हुंडा पद्धतीचाही संबंध येतो. ह्या पद्धतीच्या निषेधार्थ येथे दोन शब्द लिहिण्याने काही कार्यभाग होणार नाही ! ऐहिक व पारमार्थिक उद्दिष्टांसाठी दोन जीवांचे मीलन आणि जातिनिरपेक्ष दोन कुटुंबांचे ऐक्य असा जोपर्यंत विवाहविषयक दृष्टिकोन निर्माण झालेला नाही तोपर्यंत पैशाची देवाणघेवाण चालूच राहील. हुंडा पद्धतीमुळे संस्कृतीला कमीपणा येतो. आईवडील आणि इतर नातेवाईक वरवधूंवर देणग्यांचा किती का वर्षाव करीनात, पण त्यात सक्ती नसावी.

कुटुंबनियोजनाविषयी लिहावयाचे तर ह्या सुशिक्षित वर्गाने तर ते अवलंबिलेच आहे; परंतु त्यामुळे ह्या वर्गाची संख्या पुढील पिढीत घटण्याचा संभव आहे. नवीन सुशिक्षित वर्गाची ह्या संख्येत भर पडेल ही गोष्ट खरी. काही का असेना, दोनाऐवजी तीनतरी व तीही योग्य वेळी होऊ देणे असा प्रचार ह्या वर्गात करावयास हवा.[11] महाराष्ट्र राज्यात कुटुंबनियोजनाची प्रगती झपाट्याने होत आहे. परंतु ह्यापेक्षा अधिक जलद पाऊल पडलेच पाहिजे. उपाययोजनांचा विचार पूर्वीच केला आहे.[12]

शिक्षणक्षेत्रात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे झालेच पाहिजे. सर्व राज्यात तसे ते नाही.[13] शिवाय त्याची अंमलबजावणी कसून झाली पाहिजे. जपानने १८८५ सालीच धडाडीने पण निश्चित पाऊल टाकले.

दुय्यम शिक्षणाच्या अखेरीला अगर एक वर्ष पूर्वी व्यावसायिक मार्गदर्शन व सल्ला देण्यात यावा. हा सहावा आवश्यक उपाय. माध्यमिक शिक्षण हे घटक राज्याच्या कक्षेत येते. जादा शाळा उघडणे वगैरे सुधारणा राज्यांतून होत आहेत परंतु महाराष्ट्रात थोडीशी तशी व्यवस्था आहे. त्याखेरीज असे व्यवसायमार्गदर्शन सर्वत्र नाही.[14]

मुले आणि मुली ह्या उभयतांनाही हे मार्गदर्शन आवश्यक आहे हे मान्य केले तरी मुलींच्या बाबतीत ते अधिक अवश्य आहे. दुय्यम शालेय शिक्षणाच्या काळातच काही

स्वाभाविक शारीरिक बदल होत असतात. मुलामुलींची हे बदल स्वीकारण्याची तयारी असतेच असे नाही. मुलींच्या बाबतीत ही तयारी करण्याची नाजूक जबाबदारी आईवर येते. ह्याच काळात भावनात्मक बदलही होत असतात. मुलांचा सहवास हवासा वाटू लागतो. मुलीचे मन अस्थिर असते, भावनाविवश व संस्कारक्षम असते. अशावेळी योग्य सल्लागार फार उपयुक्त आहे. लैंगिक पाठ देण्याने कदाचित काही फायदा होईल पण व्यक्तिगत सल्लागाराची जागा ते घेऊ शकणार नाही. लैंगिक शिक्षणाची फादर फुस्टरनी पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे : "लिंगभेदाविषयी तरुण मंडळींची निरोगी प्रवृत्ती बनविणे व त्याचबरोबर आत्मसंयमन व स्वार्थत्यागाच्या सवयी लावून घेणे म्हणजेच लैंगिक शिक्षण." पुढे ते म्हणतात : "लिंगभेदाचे कार्य निर्मायिक स्वरूपाचे आहे. स्त्री आणि पुरुष ह्यांनी मिळून एका मानवी प्राण्याला निर्माण करण्याकरिता परमेश्वराशी सहकार्य करण्याची शक्ती त्याने दिली आहे. देवाच्या हेतूप्रमाणे ह्या शक्तीचा उपयोग केल्यास ती पवित्र आणि आश्चर्यकारक आहे. ह्या अर्थाने लैंगिक शिक्षण हे उत्साहवर्धी आणि उदात्त स्वरूपाचे ठरेल. परंतु ह्या शिक्षणाचा फार आग्रह धरू नये आणि ते वेगळे न देता एकंदरीच्या शिक्षणक्रमात अंतर्भूत करावे."[१५]

लैंगिक शिक्षणाऐवजी किंवा ते समाविष्ट करण्याचे ठरलेच तर धर्माचे–कोणताही विशिष्ट धर्म न घेता, सर्व धर्मांच्या शिकवणुकींचे सार असलेले नैतिक शिक्षण देण्यात यावे. विश्वाचा निर्माता, संरक्षक व मार्गदर्शक त्या सर्वोच्च परमेश्वरावर–श्रेष्ठतम शक्तीवर–अचल श्रद्धा उत्पन्न करणे हीच सर्व धर्मांची शिकवण. कान्टच्या शब्दांत मानव "परमेश्वराच्या सादर भीतियुक्त पण त्याचबरोबर हितकारक मार्गदर्शनाखाली आणि आधाराखाली वावरत आहे व कोणतीही कृत्ये न्याय्य की गर्ह्य हे तोच ठरवीत असतो." ह्या दृष्टीने, "सर्व कर्तव्ये ह्या ईश्वराच्या स्वतः दिलेल्या आज्ञाच ठरतात". कान्ट पुढे म्हणतात : "एकदा का अशी मूलभूत तत्त्वे संस्कारक्षम काळात रुजविली गेली की तो अथवा ती चांगली व्यक्ती आणि म्हणूनच चांगला नागरिक तयार होतो." एज्युकेशन कमिशनने म्हटले आहे: "थोर धर्मांच्या नैतिक शिकवणुकीच्या मदतीने सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे शिक्षण देण्याचा बुद्धचाच व संघटित प्रयत्न केला जावा अशी आम्ही शिफारस करतो."[१६]

शिवाय ह्याच काळात मुलाला अगर मुलीला आपले भवितव्य निश्चित करावयाचे असते. दोघेही अप्रबुद्ध असतात आणि काही पूर्वग्रहित विचारांनी वाहवले जातात. आईवडीलसुद्धा निरपेक्षपणे विचार करून ठरवू शकत नाहीत. म्हणूनच चाचणी वगैरे घेऊन तिऱ्हाईत अचूक मार्गदर्शन करू शकतो. अर्थातच हे सल्लागार आपल्या कामात पूर्णपणे तज्ञ असले पाहिजेत.

स्त्रीपदवीधर उच्च शिक्षणानंतर, विशेषतः तांत्रिक (मेडिसीन, इंजिनिअरिंग वगैरे) उच्च शिक्षणानंतर आपल्या शिक्षणाचा फायदा समाजाला कसकसा देतात

ह्याची अभ्यासपूर्वक पहाणी वरचेवर करण्यात यावी.

ज्या व्यक्तींना तत्सम खास बुद्धिमत्तेचा पाठिंबा असूनही तसा कल आहे त्यांनाच तांत्रिक शिक्षणात प्रवेश देण्यात यावा. त्यात स्त्रीपुरुष असा भेद करू नये व फारसा केलाही जात नाही. स्त्रीडॉक्टरस्, इंजिनिअरस् आदीकरून त्या त्या व्यवसायातील कष्ट व ताण आपल्या मातेच्या व श्रमिकाच्या उभय भूमिकांमुळे सहन करू न शकल्या तर त्यांना त्यांतील शिक्षिकेचे काम करता येईल. भारतात बाळंतपणातील मृत्युसंख्या फार आहे, लोकसंख्येची तर वाढ आहेच. ह्यासाठी पुरेसे डॉक्टरस् नाहीत म्हणून डॉक्टरी शिक्षणाला उत्तेजन देण्यात यावे व स्त्रीरोगशास्त्र, प्रसूतिशास्त्र, वेदना क्षमताशास्त्र वगैरे शाखांचा अभ्यास करण्यास स्त्रियांना उत्तेजन देण्यात यावे. येणेकरून शिक्षणाचा स्त्रियांकडून उपयोग केला जात नाही हा खराखोटा प्रवाद कमी होईल. अपव्ययाबद्दल निश्चितपणे काहीच लिहिता येत नाही कारण तसा अभ्यास झालेला नाही. परतु ह्या पहाणीनुसार निरनिराळ्या क्षेत्रांतील दहा टक्के श्रमिक महिलांनी आपणांस लग्न करण्याची इच्छा नाही परंतु आपण व्यवसायास वाहून घेतले आहे असे म्हटले आहे.* ह्यांपैकी काहींच्यावर ब्रह्मचारित्व लादले गेले असेल तर काहींनी ते खुषीने स्वीकारलेही असेल.

वरच्या दर्जाच्या कामापासून तो खालच्या थरापर्यंत श्रमिक स्त्रीला, केवळ तत्त्वतः नव्हे तर प्रत्यक्षात, मान्यता मिळाली पाहिजे. त्याचबरोबर माता म्हणून तिचे जे कार्य त्याला मान देऊन वर सांगितल्याप्रमाणे सर्व सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. समानसंधीविषयी म्हणावयाचे तर ही समानता फक्त बौद्धिक क्षेत्रातच मान्य झाली आहे. अशिक्षित श्रमिक महिलांची स्थिती चिंताजनकच आहे. त्या कामकरी म्हणून नकोच असतात परंतु परिस्थितीमुळे त्यांना काम करणे भाग पडते. शिवाय त्या अनिष्णात व असंघटित आहेत. त्या कार्यक्षम श्रमिक बनण्याकरिता शिक्षण हाच उपाय आणि त्याचबरोबर त्यांची संघटनाही झाली पाहिजे.

स्त्रीच्या दोन भूमिकांतील संघर्षावर उपाय म्हणून, आणि बुद्धिजीवी श्रमिकाची तिची भूमिका सुखावह करण्यासाठी ती माता होण्याचा संभव दिसू लागताच पाच ते सहा वर्षांची सूट देण्यात यावी. जर शिक्षण, विवाह आणि व्यवसाय ह्यांचे नियोजन केले आणि समाजाने अशा योजनेला सवलत दिली तर श्रमिक महिलेला आपली नोकरी अगर व्यवसाय दोनतीन मुलांचे थोडेबहुत संवर्धन केल्यावर पुढे चालू ठेवता येईल. भारतीय घटनेतील कलम १५ (३) मध्ये म्हटले आहे : "स्त्रिया व मुले ह्यांच्यासाठी खास तरतूद करण्यास राज्याला ह्या कलमाने कोणतीच आडकाठी केलेली नाही."

---

* डॉ. कु. वसुंधरा कालेवार, एम्. एस. ह्या नेत्रशस्त्रक्रियातज्ञ असून त्यांना यू.एस्.मध्ये बोलावणे आले आहे. त्यांनीही सर्वस्वी आपल्या व्यवसायाला वाहून घेतले आहे.

(टाइम्स वीकली, २३-८-७०)

ह्यावर दुर्गादास बसू ह्यांनी पुढील टीका केली आहे: "ह्या कलमाची व्याप्ती फार व्यापक आहे."[१७] पुढे ते म्हणतात: "जरी 'पुरुषांसाठी तशी आवश्यकता नसली' तरी प्रस्तुत कलमामुळे श्रमिक महिलांचे श्रमाचे तास नियंत्रित करता येतील व तसे करणे योग्यही ठरेल." कारण असे की, "स्त्रीशरीररचना आणि तिचे मातृत्वाचे कार्य ह्यामुळे जीवनकलहाच्या झगडचात तिला हार घ्यावी लागते आणि म्हणूनच तिच्या शारीरिक स्वास्थ्याची काळजी घेणे ह्याकडे समाजाचे लक्ष अगत्याचे ठरते, कारण तिच्या स्वास्थ्यावर पुढील पिढीची शक्ती व जोम अवलंबून असतो."आपल्या स्पष्टीकरणाचा शेवट ते पुढीलप्रमाणे करतात : "ह्या भूमिकेवर स्त्रियांसाठी जगातील बहुतेक सर्व सुधारलेल्या देशांत खास सवलती आहेत."[१८]

स्त्रियांच्या संस्थांनी फार महत्त्वाचा कार्यभाग उचलावयास हवा, केवळ कुटुंब-नियोजन अगर स्त्रियांचे प्रश्न हाताळणे येवढचापुरतेच मर्यादित असता कामा नये. राजकारणातही त्या संस्थांनी लक्ष घालून केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतीत विधायक भर घालावी.[१९] ह्या ठिकाणी, पूर्वीच दिलेल्या प्राध्यापिका एरिक्सन ह्यांच्या विचारांची आठवण करून द्यावीशी वाटते: ". . . अर्ध्या मानवतेने आपल्या चुरशीच्या गतीने आणि जलद तांत्रिक प्रगतीने आपल्या सर्व संपन्नतेसह, आपणा सर्वांना एका राक्षसी दरीच्या काठावर आणून सोडले आहे."[२०] ह्या दरीकडे अधिक झुकू नये म्हणून स्त्री आपल्यापरी प्रयत्न करीत असली तरी तिने हा प्रयत्न व्यापकरीत्या आणि परिणामकारकरीत्या करावयास हवा, विशेषत: ज्या राष्ट्राला नुकतीच स्वातंत्र्यप्राप्ती झाली आहे आणि ज्याने लोकशाही समाजवादी समाजरचना करण्याचे ठरविले आहे, अशा राष्ट्रात तर महिलांनी अधिक क्रियाशील झाले पाहिजे.

येथवर समाजाने अगर सरकारने कोणती तात्कालिक व दीर्घकालीन उपाययोजना करावी ह्याचा विचार केला. परंतु ह्या दिशेने कितपत पाऊल टाकले जाईल ह्याबद्दल शंकाच आहे. अर्थात जगात आदर्श स्थिती निर्माण झाली नाही आणि होणार नाही. मानव हा अपूर्ण आहे आणि अपूर्णावस्थेतच त्याला जीवन कंठावे लागते. हे ओळखूनच व्यक्तीने आपल्या जीवनाची आखणी करावी. तेव्हा आयुष्याच्या धकाधकीत व्यक्तीश: स्त्रीने काय करावे ? हरएक मानवाला कोणती तरी निर्णायक भूमिका उचलावी लागते. ही भूमिका कोणती हे "दिग्दर्शक" ठरवितो–मानले तर–अथवा व्यवहारी भाषेत बोलावयाचे तर ज्या परिस्थितीत ती व्यक्ती जन्माला आलेली असेल आणि वाढविलेली असेल त्यावरून तिचा जीवनक्रम ठरत असतो. तथापि आयुष्यात असे काही प्रसंग उद्‌भवतात की ज्यावेळी व्यक्तीला स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा लागतो. मग त्याचा परिणाम काहीही का होईना ! मग आधुनिक स्त्रीने काय ठरवावे ? तिला "अत्यंत संमिश्र भूमिकायुक्त व्यक्ती" झाले पाहिजे. "संमिश्र भूमिकायुक्त"चा अर्थ :

(अ) आपल्या पतीची बौद्धिकदृष्टचा समान आणि अत्यंत जिवलग सखी;

(ब) गृहकृत्यांनी आणि मातृत्वाने आपल्या जीवनाचा किती अल्प भाग व्यापला जातो हे जी स्त्री आगाऊच लक्षात घेते[२१] आणि आपल्यातील इतर गुणांचा विकास करण्याची दक्षता घेते की जेणेकरून मातेचे कार्य संपल्यानंतर अधिक सुखी व अधिक सार्थक जीवन जगता येते.

"परतु जरी स्त्रीला विविध भूमिका गुंफणारी व्यक्ती होणे सोपे नसले तरी ते कठीण नाही. आपल्या निरनिराळ्या कामांतील संघर्ष कमी करावयाचा असेल तर तिला तडजोडीचे निरनिराळे प्रयोग करावे लागतील. एकाच वेळी अनेक कामे हाती घेण्याची आवश्यकता नाही आणि कोणत्या वेळी व स्थानी कोणती भूमिका पार पाडावयाची आणि दुसऱ्या कोणत्या गोष्टी थोडा वेळ बाजूला सारावयाच्या हे तिनेच शोधून काढावयाचे आहे."[२२] आपल्या अमेरिकन भगिनीपासून जी अपेक्षा केली जाते तशीच स्वतः भारतीय स्त्रीने स्वतःच्या जीवनाची आखणी करावयास हवी.

सध्याची आधुनिक सुशिक्षित भारतीय स्त्री–जे महाराष्ट्रीय स्त्रीला लागू पडते तेच सर्वांना–आपल्या आयुष्यात धरसोडीने वागत आहे हे त्यांच्या परस्परविरोधी विधानांवरून लक्षात येते.[२३] तिला नैसर्गिक अशा कौटुंबिक जीवनाची हौस आहे.बऱ्याच जणींना ते मिळतेही. परतु काहींची निराशा होते. आपण घेतलेल्या सर्व देशांतील जवळजवळ निम्म्या स्त्रिया श्रमिक आहेत, काही स्वखुषीने तर काहींना परिस्थितीने भाग पाडल्यामुळे. स्वतःच्या उत्साहाला आणि मिळविलेल्या शिक्षणाला वाव सापडल्यामुळे त्यांना कामामुळे समाधान लाभते. परंतु उत्तर आयुष्यात काहींच्या पदरात वैफल्य येते. ह्या सर्वांची गोळाबेरीज केल्यास असे म्हणता येईल की जीवन म्हणजे तडजोड. पण "उच्च विचार आणि साधी रहाणी" ह्या तत्त्वाला बाध न आणता.

उपलब्ध असलेली आकडेवार माहिती व ह्या पहाणीतील नमुन्यावरून स्वतंत्र मानव म्हणून स्त्रीला समानतेचे स्थान प्राप्त झाले आहे का, की तिच्यातील न्यूनगंड कायम आहे? तत्त्वतः होकारार्थीच उत्तर द्यावे लागेल परंतु दैनंदिन जीवनक्रमात ह्या आदर्श स्थानापासून अजूनही ती दूर आहे. जागतिक पातळीवर कमी प्रमाणात परंतु भारतात अधिक आणि त्यातल्यात्यात खालच्या मध्यम आणि खालच्या सामाजिक थरात. उदाहरणार्थ, दोन प्राथमिक शिक्षिकांनी केलेला उल्लेख पाहू या : "माझा पगार मी त्यांच्या (यजमानांच्या) स्वाधीन करते आणि ते मला पॉकेट मनी देतात." दुसरे : "मला ते पैसे देतात." ह्या उल्लेखावरून उघडउघड दिसते की स्त्री ही स्वतंत्र श्रमिक असली व अर्थार्जन करीत असली तरी ती घरच्या खजिन्याची सहमालकीण झालेली नाही. आदर्श व वास्तवता ह्यांतील बरेच अंतर तिला तोडावयाचे आहे.

तसेच हरएक प्रकारच्या सवलती व संधी व त्यांच्या अनुषंगाने स्वयंनिर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व काही प्रमाणात स्वमुखत्यारीने वागता आल्यामुळे, स्त्रीच्या

व्यक्तिमत्वाचा विकास झाला आहे का ? आणि तसे म्हणावयाचे तर व्यक्तिमत्वाची कल्पना काय दर्शविते ? "व्यक्तिमत्वाचा विकास म्हणजे भूमी आणि बीज ह्या जुन्या उपमेचेच उदाहरण घेता येईल. बीजाचे जे काही सुप्त गुण असतात त्यांची वाढ होणे अगर खुंटणे हे ज्या भूमीत ते रुजेल त्यावर अवलंबून असते. परंतु व्यक्तीच्या विकासाचा विचार करताना केवळ शारीरिक अगर आहारविषयक बाजू म्हणजे 'भूमी' असा अर्थ न करण्याची काळजी घ्यावी. त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे असे नव्हे परंतु वाढत्या व्यक्तिमत्वाला अत्यंत आवश्यक बाजू म्हणजे भावनात्मक वातावरण . . . प्रौढांचे उच्च परस्परसंबंध."[२४] ह्या स्पष्टीकरणानुसार स्त्रीच्याच काय पण कुणाच्याही व्यक्तिमत्वाची योग्य वाढ होण्यास कुटुंबातील व शालेय वातावरण उच्च दर्जाचे, निःपक्षपाती व प्रेमाचे असले पाहिजे; त्यात अनुकूल संधीची भर पडली तर दुधात साखर नाहीपेक्षा ती प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊनही वर येईल.

मुलाखतीच्या प्रश्नपत्रिका ८५ स्त्रीडॉक्टरस्ना आणि १८ प्राध्यापिकांना दिल्या होत्या. त्यांत एक प्रश्न विचारला होता : कुटुंब, समाज आणि कामाचे ठिकाण येथे स्त्रीला समान दर्जा कितपत प्राप्त झाला आहे? ह्याला होकारार्थी उत्तर कुटुंबाच्या बाबतीत ६३ टक्के, समाजाच्या बाबतीत ७० टक्के व कामाच्या ठिकाणी समानता मिळाली आहे असे ८५ टक्के स्त्रियांनी उत्तर दिले. इतरांना तसे वाटत नाही. ह्या प्रश्नाला उत्तर देणाऱ्या सर्व स्त्रिया अर्थार्जन करणाऱ्या व सुस्थितीतल्या आहेत. असे असूनही स्त्रीला समानता मिळाली आहे असे सर्वांना वाटत नाही. ह्यावरून तिच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण विकास व्यवसाय अगर अर्थार्जनाने होऊ शकेल पण होईलच असे नाही. काहींना गृहिणी व सुमाता झाल्यानेही समाधान लाभेल. आपल्याला असे म्हणता येईल की तशी तिची प्रवृत्ती असेल अगर तितकी ती कर्तृत्ववान असेल किंवा विशेष आवश्यकता असेल तर तिने बाहेरील काम, रोजगारी अगर व्यवसाय पत्करावा. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे : ह्यापुढे तिने फक्त स्त्रीविषयक कामातच गुंतवून घेऊ नये अगर त्याच दृष्टिकोनातून विचार करू नये, तर मानवतेच्या, अगर मर्यादित स्वरूपात राष्ट्राच्या प्रगतीला विधायक पद्धतीने पुरेपूर हातभार लावावा. स्त्री म्हणून नव्हे पण मानव म्हणून तिचे हे कर्तव्य ठरते. त्या दृष्टीने तिचे स्थान उंचावले आहे पण पूर्णतया नाही. तिचे चांगल्या दिशेने परिवर्तन होत आहे हे सुचिन्ह.

## संदर्भ

१. भारतसरकारच्या इंस्टिटयूट ऑफ अप्लाइड मॅनपॉवर रीसर्चने हरएक राज्यसरकारला पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये किती पदवीधर श्रमिकांची गरज लागेल हे संशोधण्याकरिता केंद्रे उघडण्यास सांगितली आहेत.—फेब्रुआरी १९७३.

२. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेन, दी पोझीशन ऑफ् दी वुमन ग्रॅज्युएट टुडे—अ सर्व्हे (१९५६-६५), पा. ३०.
३. प्रकरण ७ वे पहावे.
४. ई. एम्. व एम्. एपेल्, ॲडोलसन्टस् ॲन्ड मोरॅलिटी, पा. २१९.
५. दी व्हाइस् ऑफ् अमेरिका, फोरम् लेक्चरस् (१९६५), पा. ६.
६. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेन, दी पोझीशन ऑफ् दी वुमन ग्रॅज्युएट टुडे, पा. ३५.
७. वुइमेन् ऑन् दी मार्च, एप्रिल १९६५ IX, पा. ४.
८. लेबर ब्यूरो, मिनिस्ट्री ऑफ् लेबर ॲन्ड एम्प्लॉयमेंट, गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया, वुइमेन् इन् एम्प्लॉयमेंट, सिरीज् ८, पा. ३७.
९. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ् युनिव्हर्सिटी वुइमेन्, दी पोझीशन ऑफ् वुमन ग्रॅज्युएट टुडे, पा. १३-१४.
१०. प्रकरण ६ वे पहावे.
११. विवाहाचे वय ह्यावरील चर्चा पहा.
१२. प्रकरण ४ थे पहावे.
१३. इंडिया १९६७, पा. ६२.
१४. प्रकरण ५ वे पहावे.
१५. जे. एम्. फुस्टर एस्. जे., सायकॉलॉजिकल कौंसेलिंग इन् इंडिया (१९६४), पा. २२६-२७.
१६. रिपोर्ट ऑफ् एज्युकेशन कमिशन, पा. २०६.
१७. दुर्गादास बसू, कॉमेंटरी ऑन् दी कॉन्स्टिट्यूशन ऑफ् इंडिया (१९६५), व्हाल्युम् I, पा. ५०७.
१८. तोच ग्रंथ, पा. ५१९.
१९. प्रकरण ७ वे पहावे.
२०. प्रस्तावना पहावी.
२१. प्रकरण ७ वे पहावे.
२२. एस्. एम्. फार्बर ॲन्ड आर. एच्. एल्. विल्सन, (एडिटरस्), दी पोटेंशिअल् ऑफ् वुमन्, पा. २६७.
२३. प्रकरण ७ वे पहावे.
२४. टी. ए. रॅटक्लिफ्, दी डेव्हलप्मेंट ऑफ् परसनॅलिटी (१९६७), पा. ११७.

# पारिभाषिक शब्दसूची

## इंग्रजी—मराठी

Abnormal : अपसामान्य
Achieved : अर्जित
Adjustment : समायोजन
Affectability : संवेदनक्षमता
Amniotic membrane : पाणमोटळीचे वेष्टन
Aptitude : प्रवृत्ति
Aspects : अंगोपांगे
Automation : स्वयंचलन

BPNA : परिचारिका पदवी
Behavioural Science : वर्तनशास्त्र
Birth-rate : जननप्रमाण
Biology : जीवशास्त्र
Broken marriage : भग्नविवाह

Career : व्यवसाय
Changing : परिवर्तित
Civilization : सुधारणा
Clerk : लिपिक
Collectivization : समाज स्वामित्ववाद
Community : जमात
Complex : गुंतागुंत, संमिश्र
Conservation : शक्तिपरिग्रहता
Counselling : सल्ला
Creche : शिशुसंगोपनगृह
Cum : नि
DGO : स्त्री रोग/प्रसूतिशास्त्र पदविका

Degeneration : अपकर्ष
Demography : लोकसंख्याशास्त्र
Developed : विकसित
Diploma : पदविका
Disvulnerability : रोगप्रतिकार शक्ति

Economic mobility : आर्थिक गतिशीलता
Emancipation : दास्यविमोचन
Employment exchange : सेवायोजन कार्यालय
Energy consumption : शक्तिव्यय
Escalation : गतिशीलता
Exploitation : पिळवणूक

Family (कुटुंब):
- extended : विस्तारित
- joint : अविभक्त
- nuclear : मूळ

Fecundity : जननक्षमता
Fertility : जननसंख्या

Genetics : सुप्रजाजननशास्त्र
Genius : अलौकिक बुद्धिमत्ता

Hazard : धोका

IAS : अखिल भारतीय शासकीय सेवक
Incentive : विलोभन
Indicator : दर्शकसूची

Industry : उद्योगधंदा
Infantility : शैशवता
Inspectress : स्त्रीनिरीक्षिका
अधिकारी

Kidnapped : अपहृरित

Manual : शारीरिक
Mass culture : लोकसंकृति,
आमसंस्कृति
Mean : मध्यम
Menopause : रजोनिवृत्ति
Morale : मूल्ये मनोधैर्य
Mores : रीतिरिवाज
Motivation : हेतुप्रेरणा

Non-manual : बौद्धिक

Objective : वस्तुनिष्ठ
Occupation : व्यवसाय
Ovulation : डिम्बक्षरण, बीजाण्डक्षरण

Para : खेप, बाळंतपण
Part-time : अंशकालिक, निम्नकालिक
Per capita : दर माणशी
Perspective : यथार्थदर्शन
Potential : संभाव्य
Premature : अकालिक
Profession : धंदा
Public Service examination :
लोकसेवा-आयोग-परीक्षा

Receptionist : स्वागतकार
Reorientation : पुनर्चालना

Respondent : उत्तरदायी, प्रतिसादी
Role : भूमिका

Sample : नमुना
Satisfaction : समाधान, साफल्य
Secularization : धर्मातीतता,
सर्वधर्मसमानित्व
Seniority : पूर्वनियुक्ति
Separation : विभक्तिकरण
Service : सेवा
Sex-bar : लिंगभेद
Sex-ratio : स्त्रीपुरुष प्रमाण
Socialization : समाजीभवम
Statistics : आकडे
Status : स्थान
Sterile : वांझ
Sterilization : निर्बीजीकरण,
नसबंदी
Supervisor : पर्यवेक्षक

Table : तक्ता
Telephone operator : दूरध्वनि-
चालिका
Thermonuclear : उष्णता-अणुशक्ति
Tomboy : हूड (पणा)
Tradition : परंपरा
Tubectomy : स्त्रीबीजवाहिकाबंदी
Typist : टंकलेखिका

UK : युनायटेड किंगडम (इंग्लंड,
वेल्स, स्कॉटलंड, उ. आयर्लंड)
UNESCO : संयुक्त राष्ट्रसंघाची
शिक्षण–सांस्कृतिक–
सामाजिक संघटना

Unit : एकांक
UNO : संयुक्त राष्ट्रसंघ
USA : अमेरिकन संयुक्त संस्थाने
USSR : संयुक्त समाजवादी सोव्हियट रशिया

Value : मूल्य
Variation : विविधता

Vasectomy : शुक्रजन्तुवाहिकाबंदी
Vital Statistics : जीवनसंख्याशास्त्रीय आकडे
Vocational guidance : व्यावसायिक मार्गदर्शन
Wastage : अपव्यय
Worker : कर्मचारी
Working : श्रमिक

---

# पारिभाषिक शब्दसूची

## मराठी–इंग्रजी

अकालिक : Premature
अंगोपांगे : Aspects
अर्जित : Achieved
अपकर्ष : Degeneration
अपव्यय : Wastage
अपहरित : Kidnapped
अपसामान्य : Abnormal
अलौकिक बुद्धिमत्ता Genius
अमेरिकन संयुक्त संस्थाने : U.S.A.
अविभक्त कुटुंब : Joint family
आकडे : Statistics
आर्थिक गतिशीलता : Economic mobility

उत्तरदायी, प्रतिसादी : Respondent
उद्योगधंदा : Industry
उष्णता-अणुशक्ति : Thermonuclear

एकांक : Unit

कर्मचारी : Worker

खेप, बाळंतपण : Para

गुंतागुंत : Complex
गतिशीलता : Escalation

जननप्रमाण : Birth-rate
जननक्षमता : Fecundity
जननसंख्या : Fertility
जमात : Community
जीवशास्त्र : Biology

टंकलेखिका : Typist

डिम्बक्षरण : Ovulation

दरमाणशी : Per capita

दर्शकसूची : Indicator
दास्य विमोचन : Emancipation
दूरध्वनिचालिका : Telephone operator

धर्मातीतता, सर्वधर्मसमानत्व : Secularisation
धोका : Hazard
धंदा : Profession

नमुना : Sample
नि : Cum
निर्बीजीकरण, नसबंदी : Sterilization
निम्नकालिका : Part-time
नैतिक जोम : Morale

पदविका : Diploma
पर्यवेक्षक : Supervisor
परंपरा : Tradition
परिचारिका पदवी : B. P. N. A.
परिवर्तित : Changing
पाणमोटळीचे वेष्टन : Amniotic membrane
पिळवणूक : Exploitation
पुनर्चालना : Reorientation
पूर्वनियुक्ति : Seniority
प्रसूति पदविका : D G. O.
प्रवृत्ति Aptitude

बीजाण्डक्षरण : Ovulation
बौद्धिक : Non-manual

भग्नविवाह : Broken marriage
भावना : विवशता

संवेददनक्षमता : Affectability
भूमिका : Role

मध्यम : Mean
मूल्य : Value
मूळ कुटुंब : Nuclear family

यथार्थदर्शन : Perspective
युनायटेड किंगडम् (इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड, उ. आयर्लंड)
व्यवसाय : Occupation
व्यावसायिक मार्गदर्शन : Vacational guidance

रजोनिवृत्ति : Menopause
रीति रिवाज : Moral
रोग प्रतिकारशक्ति : Disvulnerability

लिपिक : Clerk
लिंगभेद : Sex-bar
लोकसंख्याशास्त्र : Demography
लोकसेवा-आयोग-परीक्षा : Public Service examination
लोकसंस्कृति (आमसंस्कृति) : Mass culture

वर्तनशास्त्र : Behaviorial Science
वस्तुनिष्ठ : Objective
वांझ : Sterile
विकसित : Developed
विभक्तीकरण : Separation
विविधता : Variation
विलोभन : Incentive

विस्तारीत कुटुंब : Extended family

शक्तिव्यय : Energy Consumption
शक्तिपरिग्रहता : Conservation
शारीरिक : Manual
शिशुसंगोपन गृह : Creeche
शुक्रजंतुवाहिकाबंदी : Vasectomy
शैशवता : Infantility

समाजस्वामित्ववाद : Collectivization
समाधान : Sattsfaction
समायोजन : Adjustment
सल्ला : Counselling
समाजीभवन : Socialization
साफल्य : Satisfaction
सुधारणा : Civilization
सुप्रजाजननशास्त्र : Genetics

सेवा : Service
सेवायोजन कार्यालय : Employment exchange
संभाव्य : Potential
संयुक्त राष्ट्रसंघ : UNO
संयुक्त राष्ट्रसंघाची शिक्षण-संस्कृति-सामाजिक संघटणा : UNESCO
संयुक्त समाजवादी सोव्हिएट रशिया : USSR
स्वयंचलन : Automation
स्वागतकार : Receptionist
स्थान : Status
स्त्रीपुरुषप्रमाण : Sex ratio
स्त्रीबीजवाहिकाबंदी : Tubectomy
स्त्रीनिरीक्षकाधिकारी : Inspectress
स्त्रीरोगप्रसूतिशास्त्रपदविका : DGO
श्रमिक : Working
द्वड (पणा) : Tomboy
हेतुप्रेरणा : Motivation

# सूची


अ

अनाथाश्रम–२४१.
महिलाश्रम–७४, ७५.
अनुवंशिकता–१११.
अपव्यय–१६६, १६९, २६८.
अपहरण–४७.
अर्थार्जन–३३, ३७, ४२, ८९, १६१, १७०, १८०, २००, ३११, २४५. २५७, २५८, २५९, २७०.
अस्पृश्यता–४२.

आ

आयुर्मान–१७९.

इ–ई–

इसराएल–९६, १७५, १७७, १८२, १८४, २१७, २२२, २३३, २३६.

उ–ऊ

उद्योगधंदा–१८४, १८६, ८७, १९०.

औ.

औद्योगिकरण–४, ४०.

क.

कर्मचारी–८९, ९०.
कलाकार–१९२, १९८.
कुटुंब–७८, ९०, २००, २४८, २६५.
–अविभक्त–७८, ७९, ८३, ८४, ९०, २३१, २५७.
–मर्यादित–८१.
–मूळ–७८, ७९, ८०, ८४.
–विस्तारित–७९, ८०, ९०.
–चा आधार–३८, ९२, २०० २०७, २४४, २६७.
–ची कार्यें–७९.
–ची व्याख्या–७८.
–त स्थान–६७, १२०.
कुटुंबनियोजन–२३, ८६, ९७, १००, १०२, १०६, १११, ११५, ११६, ११७, १२०, १९२, १९६, २२८, २५–६६, २५७, २५९.
कुटुंबसंस्था–२५७, २६२.
कुमारिका–६६, ७५, ७८, २४२.
कौमार्यावस्था–९१.
क्रांति–१७३.

ख.

खानेसुमारी–५, ४५, १४४, १७५, १८१.

ग.

गर्भपात–११७, ११९, २६५.
गृहकृत्यें–१९९.

घ.

घटना–३, २३७.
घटस्फोट–६९, ७१, ७२, ७३, ७५, ८४, ८५, २६०.
घटस्फोटिता–२१

ज.

जननप्रमाण–९५, ९८, १०८, ११७, ११९.
जननसंख्या–१००, १०८, ११९, १२०,
जपान–९६, १०७, १३०, १७७, १८२, १८८, २५७.
जात–ती–३९, ४०, ४१, ४२, ४६, ५६.
जीवशास्त्र–३३.

त.

तंत्रशास्त्र–१३१.

द.

दर्शकसूची–९७.
द्रव्यार्जन–२००.
द्विभार्याविवाह–७२.

ध

धर्म–
–ख्रिश्चन ३५, ३६, ३७, ३८.
–जैन–३७, ३८.
–ज्यू–३७.
–पार्शी–३७.
–बौद्ध–३७.
–मुसलमान २२, ३५, ३६, ३७, ३८.
–हिंदु–२२, ३४, ३५.

धंदा–
–आर्किटेक्चर–१८, १५९, १९१.
इजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजिकल– १८, १५९, १९१, १९६.
–मेडिकल १८, २३, १५९, १८९, २०३.
–लीगल १८, २३, १५९.
–लेखिका १९१.
–विमाएजंट १६८.
–शिक्षिका २३, १५९, १८९.
–समाजसेविका १५८, २०१.

न

नमुना–७, १८१, १९८, १९९, २१०.
नसबंदी–९७, ९९, ११५, ११८.
नागरिक–२४३.
निम्नकाल–२६३.
नियोजन–३.
–शैक्षणिक–२६८.
–मानवी साधनानुसार–१६९.
निर्बीजीकरण–१११, ११५, १२०.
नीतिमत्ता–२४३.
–लैंगिक–६८, ९९.
नैतिक जोम–२३७.
नोबल पारितोषिक–२३०.
नॉर्वे–२१८.

प

पडदानशीन–३८.
पति–८४, २६९.
परिचारिका–२३, ३८, १९४, २६२.
पर्यवेक्षक–११६.
परित्यक्ता–१०२.
परंपरा–१७०.
पसंती–६२, ६६.
पहाणी–६, ३६, ६४, ७९, १६५, १९९., २२४, २६२.
पुनर्विवाह–६८, ७०.
पूर्ण व्यक्तिमत्व–४.
पंतप्रधान–२२६.

प्रश्नपत्रिका–८,९,११,१२,१६,१८,२०
८८,१६१.
प्राप्तिकर–२३.
प्रेम–६७,८५.

ब

बाजू–
–जीवशास्त्रीय–२७.
–सामाजिक–२७.
बायबल–५७.
बाल मंदिरें–बाल शिक्षण केंद्रे–२५९.
बालविवाह–११९.
बाळंतपण–१११, ११२, १२१, १२९.,
१९८, २५५.
बेकारी–१५६, १६७, १६९.

भ

भारत–३३, ३४, ९६, १७८, १८०,
१८२, १८४, १८६, १८८, २१७,
२२३, २२६.
भाषा–४५.
भूमिका–४, ७, १७४, २१२, २१५,
२६०.
–व्याख्या–४.
–राजकीय–२१६.

म

मतदान–२१७, २२४, २२५.
मध्यमवर्ग–५, ९२, ९३, १०८, ११५,
१९९, २६६.
महाराष्ट्र–१७८, १८२, १८४, १८५,
१८८, १९३, २२१, २२४,
–उत्पत्ति–५.
–राज्य–१५१, १८४, २२७.
माता–८८, २०२, २६८.
मातृत्व–३३, १००, १२९, १९४,
२५५, २६५.
मानवी हक्कांचा जाहीरनामा–२.
मालमत्ता–२३१, २३२.
मुलांची संख्या–१०७, १०८, ११०.
मूल्य–२, ३, ५, ८४.
मूल्यमापन–२६०, २६७.
मृत्युसंख्या–२५७, २६८.

य

यूके–९६, १०७, १८२, १८८, १९२,
१९७, २२५.
यूनेस्को–२१७, २२२.
यू. एस्. ए.–९६, १०७, १७४, १७६,
१८२, १८८, १९२, २२२, २२५.
यू. एस्. एस. आर.–९६, १०७, १७६,
१८२, १८८, १९२, १९७, २१७,
२३६.
यू. एन. कमिशन ऑन स्टेटस ऑफ
वुइमेन–२१५, २१६.
यूनिसेफ–३०.
योजना–
–पंचवार्षिक–१९६.

र

रजोनिवृत्ति–१०२.
राज्यसरकार–२२७.
रोजगारी–१२९,१६७,२५८.

ल

लघुटंकलेखन–१५०.
लोकसभा–२२५.
लोकसंख्या–२७, ९७, ९८, १०८, ११५,
१२१, १७९, २५७, २६८.

–महाराष्ट्राची–१७९.
–ची वाढ–११५.

व

वाहतूक–१८५, २०४, २६२.
विधवा–२२, ५७, ६७, ६८, ७०.
विलोभन–११८, ११९.
विभक्त–७२, ८४, २६०.
विवाह–३८, ५४, ६५, ६९, ७४, ७५, ७९, ११५.
–चा उद्देश–७६.
–चा कायदा–६०, ६१, ६३.
चे वय–५९, ६३.
चे वय कमीत कमी–६८.
चे वय मध्यम–५९.
–चे वय योग्य–६०.
–चे वय जास्तीतजास्ती–६०.
–चे वय सरासरी–६८.
–चे वय सर्वात अधिक–५९.
–च्या अटी–५१, ५२, ५८, .
–त वधुवर पसंति–५४, ५९, ६५, ६७.
–त यश–६६.
–द्विभार्या–७२.
–बाल विवाह–६०, ६४.
–समय–११९.
–संस्था–६७.
–विजोड–६७.
–आंतरजातीय–३९, ४१, ४२, –४४.
–आंतरधर्मीय–३९, ४३, ४४, ५६.
–विच्छेद–५८, २५७.
विवाहेच्छु–५९.
वंध्यत्व–२५७.
वैफल्य–२६४, २७०.
व्यक्तिमत्व–१८७.
व्यक्तिस्वातंत्र्य–१२१,१२४.
व्ययकेंद्र–७९.
व्यवसाय–१२, १२९, १४४, १६७, १५८, १७५, १८७, २१२.
–अंशकालिक–२६३, २६८.
–निम्न काल–२६३, २६८.
–कलाकार–१९१,१९८.
–कारकून–१५८, १८७.
–ग्रंथपाल–१९०, १९५.
–लघुटंकलेखिका–१५८.
–टेलिग्राफिस्ट–१९९.
–दूरध्वनि संचालिका– १८९, १९४.
–नटी–१८, १९१, १९८.
–परिचारिका–२०१, २०२, २०३.
–राजकारण–२१८, २२६.
–वृत्तपत्रीय–१५८, १९०, १९५, २०१, २०४.
–शासकीय–२३, १८७, १८८.
–शिक्षकाचा–२३, १८८.
–सेवेचा–१८५.
–स्वागतकार–१५८.

श

शक्तिव्यय–९७.
शिशुगृहे–८८, २११, २५९, २६१.
–संगोपनगृहे–९०.
शिक्षण–१५८, २५७.
–उच्च–१२७, १३८.
–तांत्रिक–१३८, २८७.
–दुय्यम–१२६, १२७.
–नैतिक–२६७.
–माध्यमिक–१२६, १२.

—लैंगिक—२६७.
—स, ह—१२५, १७०.
—चा दर्जा—२०, ५४, २५८.
—प्रगति—१२४, १२५, १२६. १२७, १२८, १२९, १३३-३९, २६८.
शिक्षिका—३८, १६०, १६१, १६६ १८१, १९२, १९४, २६२.
—प्राथमिक—१५८, १९३, १४७.
—दुय्यम—१५८, १९३.
—उच्च—१५८.
शेतकरी—२५१.
श्रमविभाजन—२५९.
श्रमिक—१७९, १८४, १८५, १८७, २०१, २०६, २४०, २४५, २४६, २५७, २५९, २६०, २६१, २६२, २६३, २६४, २६८, २७०.

स

समता—२२५.
समाजवादी समाजरचना—२६९.
समाजशास्त्र—३६, २४२.
समाजीभवन—७८.
समाधान—८, २४, ३५, ९३, २७०.
—सांस्कृतिक—२३९.
समानता—७, १७१—१७५, २१२, २१६, २३१, २६८.
—चे स्थान—२७८.
सामुदायीकरण—९२.
साक्षरता—३३,
—चे प्रमाण—३३.
सुप्रजाजनन—१२१.
सेवा—१८५.
सेवानिवृत्ती—९१.
—अकालिक—९१, १५४, २०९, २१२, २४६, २६४.
सेवायोजन कार्यालय—१५२, १५४, १५७, १६९.
संततीनियमन—१००, १०२.
संवेदनाक्षमता—३१.
संशोधन—९.
संस्कृति—
—आम—९२.
—पाश्चात्य—५०.
संसद—२२२, २२५.
संमतीवय—१२०.
संस्था—२३८, २६५.
संस्था—
—मेडिकल—२३८, २३९, २६५.
—लीगल—२३९.
टीचर्स—१५८, २३९.
संयुक्त राष्ट्रसंघ—२.
सांख्यकी—१३३.
स्त्री—
—आधुनिक—२६९.
अपत्यरहित—
—उत्तरदायी—१३८, १४४.
—चा मृत्यु—३१.
—ची राजकीय भूमिका—२१६.
—ची लोकसंख्या—२७, १२९.
—ची वृत्ति—
—चे प्रमाण—२९, ३०.
—चे नेतृत्व—२७.
चे स्थान—२०५, २७१.
—प्रतिसादी—२०३, २०५, २०७, २३६, २३९, २५९, २६५.

स्त्रीशिक्षिका–१२६, १२७, १२८.
स्वातंत्र्यप्राप्ती ३.
स्वातंत्र्य पूर्व–१७३.
स्वातंत्र्योत्तर–१७३.
स्वित्झर्लंड–२१८.
स्वित्झर्लंड–२१८.
स्वीडन–१७४, १७७, १८२, १८८, १९३, २२३.

ह

हिंदुवारसाकायदा–२३२, २३३.
हिंदुसमाज–३९, ५१.
हुंडापद्धति–५५, ५६, ५७, ५८, ८३, २६६, २७४.
होम सायन्स–१५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती
मंडळ ग्रंथालय सचिवालय
मुंबई-४०० ०३२.
रजिस्टर नंबर ९३३
वर्गीकरण नंबर ३८५

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र | ६२/१
मंत्रालय

डॉ. श्रीमती चंद्रकला आनंदराव हाटे यांचे सर्व शिक्षण मुंबई विद्यापीठात झाले. "मुंबई नगरातील सुशिक्षित स्त्रियांची आर्थिक स्थिति" हा प्रबंध कै. प्रा. खु. त. शहा ह्यांच्या मार्गदर्शनाखाली लिहून एम्. ए. ची पदवी मिळविली. नंतर समाज शास्त्राचे सन्मानित प्रा. गो. स. धुर्ये ह्यांच्या नेतृत्वानुसार पीएच्. डी. होण्याचा मान लाभला. पुढे हा प्रबंध "हिंदु स्त्री व तिचे भवितव्य" ह्या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला.

अर्थशास्त्राची अध्यापिका म्हणून श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाच्या मुंबईतील विद्यालयात डॉ. श्रीमती हाटे ह्यांच्या जविनक्रमास सुरुवात झाली. त्याच विद्यालयातून १९६४ साली समाजशास्त्राच्या प्रमुख म्हणून त्या सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या सेवेचा उपयोग करून घेण्याची विद्यापीठ अनुदान मंडळाची जी योजना आहे त्या योजनेनुसार त्यांची होऊन निवड प्रस्तुत संशोधन कार्य त्यांनी पुरे केले. सध्याही त्या एका संशोधनात गुंतल्या आहेत.

डॉ. श्रीमती हाटे ह्यांचा मुंबई शहरातील स्त्रियांच्या व इतर अनेक संस्थांशी संबंध आहे. त्याचप्रमाणे आपल्या विव्दतेत, साधेपणाने व माणुसकीच्या दृष्टीकोनामुळे शैक्षणिक व सामाजिक परिसरात त्या चांगल्या परिचित आहेत. म्हणूनच त्यांना नॅशनल कमिटी ऑन् द स्टेटस् ऑफ वुइमेन ह्या मंडळाच्या पोटमंडळावर घेतले आहे. १९४८ सालीच त्याना जे. पी. व ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट करण्यात आले. नागरिकशास्त्र अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र ह्यावर त्यांनी आपली लेखणी चालविली आहे. अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरू व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व्र. गु. रा. द. रानडे ह्यांच्या आदेशानुसार अंडर हिलबाईच्या मिस्टिसिझम ग्रंथाचे साक्षात्कारशास्त्र म्हणून रुपांतर केले आहे. साक्षात्कारशास्त्राच्या मराठी अभ्यासूना तो एक मार्गदर्शन करणारा ग्रंथ झाला आहे. डॉ. हाटे ह्यांनी अनेक स्त्री विषयक प्रश्नांवर विविध मासिकांतून वेळोवेळी प्रकाशझोत टाकला आहे.

डॉ. श्रीमती हाटे ह्यांनी स्त्रीविषयक जी पहाणी केली आहे, तशा पहाणीची अत्यंत आवश्यकता होती. **सन्मानित प्रा. गो. स. घुर्ये, मुंबई विद्यापीठ.**

आजवर फारच थोडे संशोधन झालेले आहे अशा विषयावर उपयुक्त माहितीसहित डॉ. श्रीमती हाटे त्यांचा हा मौलिक ग्रंथ— **प्रा. ए. आर. देसाई, समाजशास्त्राचे प्रमुख-मुंबई विद्यापीठ.**

दुसऱ्या महायुद्धामुळे व नंतरही झालेल्या शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीमुळे शारिरीक श्रमांपेक्षा बौद्धिक श्रमांना अधिक महत्त्व आले व हा बदल स्त्रीची समानता प्रस्थापित करण्यास फार उपकारक आहे. तथापि स्त्रीचे धोके तसेच कायम आहेत. मातांच्या मृत्यूचे प्रमाण बरेच आहे. त्याचबरोबर जबरदस्तीने पळवून नेलेल्या स्त्रियांची संख्याही लेखिकेने दिली आहे.

विवाह व कुटुंब ह्यांच्याशी स्त्रीचे जीवन निगडीत असल्यामुळे हुंड्यासारख्या चाली तिच्या आड येत आहेत.

लेखिकेच्या मते नवोदित स्त्रीचे चित्रण बरेच आशादायक पण मधूनच निराशजनकही वाटते — **हितवाद, नागपूर.**

सर्वांगीण व सखोल अभ्यास ह्या ग्रंथात आढळतो. विवाह, कुटुंब, कुटुंब नियोजन अर्थार्जन व राजकारण ह्या ... बाबतीत स्त्रीची वृत्ति कोणती आहे आणि त्याचा परिणाम कुटुंब व मुलें ह्यांच्यावर कसा होत आहे हें प्रस्तुत ग्रंथाच्या योगाने वाचकांच्या लक्षात येते. समाजशास्त्राच्या कोणत्याही अभ्यासूला ह्या ग्रंथात महत्वाचा संदर्भ सापडेल — **दी मेल, मद्रास.**

एका आधुनिक महत्वाच्या प्रश्नावर हा ग्रंथ म्हणजे विशेष उल्लेखनीय शोध ज्यांत आहे. समानतेकडे स्त्रीचे पुढे पाऊल पडले नाही हे अत्यंत उत्तमरीतीने चित्रण केले आहे — **अमृत-बझार पत्रिका, कलकत्ता.**

ह्या ग्रंथामुळे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून भारतीय स्त्रीच्या वाटचालीचा मागोवा फार परिश्रमपूर्वक घेण्यात आला आहे. केवळ मध्यमवर्गीय स्त्रीच्या त्यागामुळे भारतातील कुटुंब अजून एकत्रित राहिले आहे — **दी डेक्कन हेरॉल्ड, बंगलोर.**

व्यापक संशोधनाचे फल. त्यामुळे स्त्री कशी वाट काढीत आहे ह्याचे सुंदर दिग्दर्शन होते — **दी हिंदु, मद्रास.**

प्रथम दर्जाचे व अत्यंत मौलिक असा हा ग्रंथ सर्वतया शिफारशीस पात्र आहे. **सोशालॉजिकल रिव्ह्यू — मुंबई.**